

राज्याभिषेक शक-कर्ते

छत्रपती शिवाजी महाराज

गोविंद सखाराम सरदेसाई

वरदा प्रकाशन

राज्याभिषेक शक-कर्ते
छत्रपती शिवाजी महाराज

गोविंद सखाराम सरदेसाई

वरदा प्रकाशन प्रा. लि.

CONTENTS

"The Territory And Treasures, However, Which Shivaji Acquired Were Not So Formidable To The Muhammadans As The Example He Had Set, The System And Habits He Introduced And The Spirit He Had Infused Into A Large Proportion Of The Mahratha People."

- Grant Duff

I Regard Shivaji As The Last Great Constructive Genius And Nation-Builder That The Hindu Race Has Produced... He Was Truly An Original Explorer, The Maker Of A New Road In Medieval Indian History With No Example Or Guide Before Him. He Has Shown That The Tree Of Hinduism Is Not Really Dead, That It Can Rise From Beneath The Seemingly Crusihing Load Of Centuries Of Political Bondage; That It Can Put Forth New Leaves And Branches; That It Can Again Lift Up Its Head To The Skies.

- Jadunath Sarker

छत्रपती शिवाजी महाराज

1627 - 1680

पराक्रमकला-दशक

1 मावळांतील बच्चा---------1627-1642
2 देशमुखांचा पुढारी---------1642-1644
3 स्वराज्याचा भिक्षेकरी------1644-1647
4 स्वातंत्र्याचा कैवारी-------1648-1649
5 स्वधर्माचा सेवक---------1649-1659
6 महाराष्ट्राचा नियंता-------1659-1663
7 सार्वभौमाचा उच्छेदक------1664-1668
8 स्वदेशाचा उद्धारक--------1668-1673
9 सिंहासनाधीश्वर छत्रपती--------1674
10 हिंदुपदपातशाहीचा निर्माता---1675-1680

प्रस्तावना

शिवाजीराजांसारखी विभूति हजार पाचशे वर्षांत क्वचित एखादी भूतलावर निर्माण होते आणि तशा व्यक्तीचे संशुद्ध चरित्र सर्व प्रकारच्या वाचकांस व अभ्यासकांस नेहमीच हवे असते. ग्रँट डफच्या काळापासून आतापावेतो नानाप्रकारची नवीन साधने प्रसिद्ध होऊन शिवचरित्रांतील अनेक शंकांचे व अप्रसिद्धान्तांचे निरसनही अलिकडे पुष्कळच झाले असल्याने, दोन-तीनशे पानांच्या सुटसुटित आकारात ते चरित्र व्यवस्थित आधारांनी नीट बसविता येईल, एवढी याची प्रगती आता नि:संशय झाली आहे असे मला वाटते.

शिवजन्मतिथीच्या वादाने व दोन त्रिशतसांवत्सरिक उत्सवांनी शिवकालीन इतिहासाची सूक्ष्म तपासणी होऊन आरंभीच्या माहितीत पुष्कळच नवीन भर पडली आणि ऐतिहासिक प्रगति वृद्धि पावली. मुख्यत: फारसी, संस्कृत, इंग्रजी, फ्रेंच, पोर्तुगीझ इत्यादी भाषांतील साहित्य बाहेर आल्याने प्रत्यंतर पुराव्याची सोय होऊन बखरीतील सत्यासत्य निवडता आले. अर्थात् शिवाजीराजांच्या चरित्रांतील नानाविध प्रसंगांचे कालस्थलादि तपशील बहुतेक निश्चित होऊन आधारभूत व व्यवस्थित चरित्रग्रंथ तयार करण्याची सिद्धता झाली.

तथापि तसे चरित्र अद्यापि लिहिले गेले नाही हा प्रकार महाराष्ट्रास भूषणावह नाही. या विषयात सर जदुनाथ सरकारांनी आघाडी मारून इंग्रजीत शिवाजीराजांचे चरित्र प्रथम प्रसिद्ध केले, तेव्हापासून त्यांनी आपल्या पुस्तकाच्या तीन आवृत्त्या काढून अधिकाधिक संस्करणाने पुष्कळच सुधारणा केली. दांडग्या व्यासंगाचा सतत उपचार त्यांनी आपल्या कृतीस दिला. मुख्यत: मोगल बादशाहीचे भरपूर तपशील फारशीतून बाहेर आणून त्यांनी आपल्या ग्रंथाचे स्वरूप भक्कम व उठावदार बनविले; आणि आता तर मराठी बंगाली वगैरे भाषात त्याचे रुपांतर होऊन त्या चरित्राने अखिल भारताचे क्षेत्र हस्तगत केले आहे. अर्थात सर्वसामान्य वाचकांची जिज्ञासा पुरी करणारे व प्रस्तुत कालास आणून पोचविलेले दुसरे पुस्तक अद्यापि उपलब्ध नाही. त्यांच्या कृतीस आपण कितीही नावे ठेविली तरी त्याची सर एकाही विद्यमान ग्रंथास येत नाही. ऐतिहासिक विवेचनाचे बाबतीत त्यांच्याशी आपला मेळ बसत नसला, तरी शिवचरित्राची पहिली मुख्य घटना त्यांनीच बनविली हे कबूल करणे प्राप्त आहे. नुसत्या शाब्दिक हेटाळणीने किंवा कुत्सित टीकेने त्यांच्या कृतीचे खंडन होणार नाही. त्याहून वरिष्ठ दर्जाची कृति निर्माण करूनच महाराष्ट्राला आपले दैन्य दूर करता येईल. समस्त हिंदी जनतेला शिवचरित्राची नेहमीच मोठी क्षुधा लागलेली असते, ती उपलब्ध पदार्थावर भागविली गेली तर नवल काय! दुसऱ्यांच्या कृतीस नावे ठेवणे मोठेसे कठीण

नाही, पण स्वत: तशी कृति निर्माण करणे किती अवघड आहे हे सांगावयास नको. यास्तव दुसऱ्याची अपेक्षा न ठेवता मला एकट्याला जितके करता आले तितके करून मी हे शिवाजीचे चरित्र वाचकांस सादर करीत आहे. या मर्त्य जगात निर्दोष अशी कृति बहुधा नसतेच आणि वाचकही भिन्नरुची असणार, या गोष्टी लक्षात ठेवल्यास हे पुस्तक शक्य तितके सर्वोपयोगी बनविण्यात मी कसूर केली नाही एवढे समाधान मला वाटत आहे. मराठी रियासतीची द्वितीयावृत्ती वीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाली तेव्हापासून आतापावेतो जी प्रचंड प्रगति या विषयात झाली तिचा संग्रह मी या पुस्तकात केला आहे.

शिवाजीराजां चरित्राकडे पाहण्याची लोकांची दृष्टिही झपाट्याने बदलत आहे. इंग्रज राज्यकर्त्यांचा शिवाजीसंबंधाचा पूर्वीचा ग्रह साफ बदलून गेला आहे. ता. 19 जून सन 1921 रोजी पुणे येथे शिवाजी स्मारकाचा समारंभ झाला त्या प्रसंगी प्रिन्स ऑफ वेल्सनी शिवाजीराजांचे व मराठ्यांचे गुणानुवाद बोलून दाखविले ते आपल्या स्मरणातून नष्ट झाले नसतील. मनुष्यप्राणी पराकाष्ठेचा कार्यसाधू असल्यामुळे, वक्ता काय किंवा लेखक काय जे सोयीस वाटेल ते बोलत व आचरत असतो. पण इतिहासकारास असा मतलबी प्रकार शोभणार नाही. त्याने आपली दृष्टि शक्य तितकी निर्विकार ठेवून स्वराष्ट्रोद्धाराच्या कळकळीने सत्यकथन केले पाहिजे. अशा प्रकारची मनाची साम्यवृत्ति ठेवून मी हे शिवचरित्राचे लेखन केले आहे एवढेच आपल्या तर्फेने सांगू शकेन, मग त्याची योग्यता वाचकांनी आपापल्या समजुतीप्रमाणे वाटेल ती ठरवावी.

शिवजन्मतिथीचा वाद आता शांत झाला असला तरी ठाम निर्णयास पोचलेला नाही. सर जदुनाथ व दुसरे अनेक अभ्यासक मिळून आम्ही स्वतंत्र व एकत्र या प्रश्नाचा पुष्कळ खल व विचार केला. त्यात जुनी तिथीच जास्त विश्वसनीय मानण्याकडे आमची प्रवृत्ति होत आहे हे आरंभीच सांगणे मला जरूर वाटते.

माझ्या वाढत्या व्यापाची दगदग लक्षात आणून माझे मित्र राजश्री श्रीपाद रामचंद्र टिकेकर यांनी नाना प्रकारचे साह्य करून माझे श्रम हलके केले ह्याबद्दल त्यांचे मी मन:पूर्वक जाहीर आभार मानतो.

कामशेत, जि.पुणे गो. स. सरदेसाई
ता. 1 ऑगस्ट 1935

प्रकरण 1- मातेच्या सहवासात

(1627 - 1644)

1. बालपण व शिक्षण, 2. दादोजी कोंडदेव, 3.मावळ प्रांतात नवचैतन्य, 4. आदिलशहाचा प्रकोप.

1. बालपण व शिक्षण :

जिजाबाईंचे पोटी शहाजीराजांना सहा पुत्र झाले असे शिवभारतकार सांगतो. त्यांपैकी संभाजी व शिवाजीराजे हे दोनच पुढे नावारूपास आले.[1] शके 1551 म्हरजे सन 1629-30 मध्ये एकोजी हा पुत्र तुकाबाईंचे पोटी झाला. म्हणजे त्यापूर्वी एक-दोन वर्षे तरी तिचे लग्न झाले असावे; आणि ही दुसरी बायको घरात आल्यावर पहिली जिजाबाई दूर राहत असाव्यात. यावरून शिवाजीराजांच्या पाठीवर आणखी मुले तिला झाली असण्याचा संभव नाही. तसेच शहाजीराजांचा जन्म सन 1594 च्या सुमारास होऊन जिजाबाई त्याजपेक्षा फारशी लहान नसावी, असे त्यांचा एकंदर आयु:क्रम पाहता निदर्शनास येते. विद्यमान वडिलपुत्र संभाजी याचा जन्म सन 1619 मध्ये दौलताबाद येथे झाला.[2] त्यानंतर आठ वर्षांनी वैशाख शुक्ल 2 शके 1549 गुरुवार ता. 6 एप्रिल सन 1627 रोजी मध्यरात्री शिवनेरी किल्ल्यावर शिवाजीराजांचा जन्म झाला.[3] त्यांच्या पहिल्या नऊ वर्षांत शहाजीराजांचा काळ अत्यंत धामधुमीत गेला हे मागे सांगितलेच आहे. अर्थात शिवाजींचे बालपण शिवनेर, वैजापूर, शिवापूर, पुणे इ. ठिकाणी गेले. त्या वेळी नारो त्रिमल हणमंते, गोमाजी नाईक पानसंबळ वगैरे मंडळी जिजाबाईंचे तैनातीत होती.

जिजाबाईंचे वैवाहिक जीवन अत्यंत कष्टमय झाले. लग्नव्यवहार घडला तोच आधी जुलमाचा रामराम होता. सासरे जावयांचा उघड सामना कैक वर्षे सारखा चालून सन 1629 मध्ये जाधवरावांचा खून झाल्यावर जिजाबाईंचा माहेरचा आधार साफ तुटला. भोसले व

जाधव या घराण्यांचा वैराग्नि आकस्मिकपणे कसा पेट घेत असे ही गोष्ट खंडागळ्यांच्या हत्तीच्या प्रकरणावरून लक्षात येते. भातवडीच्या लढाईत शहाजीराजांना यश मिळून जाधवरावास समरांगणातून पळून जावे लागले. एकंदरीत जिजाबाईंचा पायगुण नवऱ्याला फारसा सुखकर झाला नाही. सन 1632-33 मध्ये त्या मोगलांचे हस्तगत झाल्या, तेथून सुटका झाल्यावर त्या माहुलीचे किल्ल्यावर नवऱ्याबरोबर मोगलांचे वेढ्यात असल्या पाहिजेत. सन 1636 मध्ये मोगलांशी तह होऊन शहाजीराजे विजापुरास गेले आणि त्या बालशिवाजीला घेऊन दादोजी कोंडदेवाबरोबर पुण्यास आल्या. तेव्हापासून राजगड तयार होईपर्यंत म्हणजे सुमारे दहा वर्षे बालशिवाजींचा मुक्काम पुणे शिवापूरच्या आसमंतात झाला. शिक्षण वगैरे जे काय झाले ते याच काळात होय. सन 1640-43 चे दरम्यान बालशिवाजी मातु:श्रींसह वडिलांचे भेटीस बंगलोर व विजापूर येथे गेले होते.

अशाप्रकारे जी संकटमय परिस्थिती जिजाबाईंना सहन करावी लागली, त्या योगाने मूळच्या मानी स्वभावात निश्चय, धैर्य, साहस इत्यादी गुणांची भर पडली. दुसऱ्याच्या तोंडाकडे दीनपणाने पाहत राहणे त्यांना अयोग्य वाटले आणि मुलास घेऊन वडिलार्जित जागेत स्वावलंबनाने उद्योग करण्याचा मार्ग त्यांनी पत्करला. अर्थात बालशिवाजी हेच तिचा मुख्य आधार व प्राणविसावा बनले. त्याच्याच भरंवशावर त्या आपले सर्व दैन्य व अपमान भरून काढणार होत्या.

बालशिवाजी मोठे होत गेले, तशी त्यांना आपल्या असहाय स्थितीची जाणीव होत जाऊन त्यांच्या मनात मातृनिष्ठा बाणत गेली. एखादी गोष्ट करण्याचे मनात येऊन आईने त्यास अनुमोदन दिले की त्यांना कृतकृत्य वाटे. त्या त्यांचे लाड मोठ्या कौतुकाने पुरवीत. त्यांचा हूड स्वभाव पाहून 'त्याला योग्य वळण दिले असता हा आपले व कुळाचे नाव काढील' असा भरवसा त्यांना वाटू लागला. बापाची किंवा नवऱ्याची धोरणे व राजकारणे त्यांना माहीत होती, ती सर्व त्यांनी बालशिवाजीला समजावून दिली, त्यामुळे हिंमतीची कृत्ये करण्याचा हुरूप त्यांचे ठिकाणी उत्पन्न झाला. मावळच्या जंगलात व खेडेगावच्या राहणीत त्यांचे शरीर व मन उत्साही बनून राजदरबारातील दिखाऊ डामडौलाचा संबंध त्यांना घडला नाही आणि उन्हातान्हात हिंडून त्यांचे ठिकाणी काटकपणा उत्पन्न झाला.

रामायण व महाभारत हे दोन राष्ट्रीय संस्कृती-स्फूर्तीचे थोर ग्रंथ मुलांना ऐकविण्याचा प्रघात त्या वेळी विशेष होता. तदनुसार त्या ग्रंथातल्या कथा बालशिवाजी मोठ्या आवडीने ऐकत असे; आणि त्यासाठी चिंचवड, देहू, आळंदी इ. ठिकाणी देवदर्शनास जाऊन कथा-पुराणे ऐकण्याचा त्यांना फार नाद लागला. तुकाराम व इतर सत्पुरुषांची कीर्तने ऐकून त्यांच्या मनात धर्माभिमान उत्पन्न झाला. अशा सत्पुरुषांचा समागम ते मुद्दाम घडवून आणीत असत, याचे दाखले तत्कालीन कागदांत विपुल आहेत. भोसले व हणमंते या

घराण्यातील पुरुषांनी चिंचवडच्या देव-घराण्याची कृपा संपादली होती, असे वर्णन आढळते.[4]

लांब-लांबचे प्रवास करून बालशिवाजी मुद्दाम निरनिराळ्या व्यवसायातील पुरुषांच्या गाठी घेई. जंगली प्रदेशात वावरणारे मावळे लोक त्यांचे सोबती बनले. त्यांच्या बरोबर अनेक अवघड जागी फिरून स्वारी शिकारी करणे, डोंगरातील चोरवाटा धुंडाळणे, लोकांचे उद्योग व व्यवसाय यांचे निरीक्षण करणे, वारा, पाऊस, उन्ह, उपास, धावपळ असले बालपणचे उच्छृंखल अनुभव बालशिवाजीला भरपूर मिळाले. महाराष्ट्रीय सह्याद्रीचा असा कोणताही भाग नसेल की, तेथे बालशिवाजीचा पदन्यास घडला नाही. नुसता प्रवास किंवा देवदर्शन करून तो स्वस्थ बसत नसे तर प्रत्येक ठिकाणची तपासणी तो बारकाईने करी. ता.25.5.1642 च्या आपल्या एका पत्रात हा ‘बालशिवाजी’ रोहिडखोऱ्याच्या देशपांड्यास लिहितो, ‘तुझे खोरीतील गाव शिवाजी राजे यांनी रोहिडेश्वरास दिल्हा, देवाचे पूजेस माणसे नेमिली, ती तुवा काढिली, तरी तू याचा जाब देणेस येणे.’[5] अशा उल्लेखांवरून शिवाजीच्या प्रथमोद्योगाची कल्पना करता येते. सारांश, शिवाजींच्या शिक्षणाची मुख्य भिस्त ‘हल्लीप्रमाणे पढिक विद्येवर’ नसून नैसर्गिक परिस्थिती व जगाचा प्रत्यक्ष अनुभव यांजवर होती. त्यामुळे त्यांच्या उपजत साहसी व चौकस बुद्धीला मानसिक सामर्थ्याची व व्यावहारिक चातुर्याची जोड मिळत गेली. अडचणींना व संकटांना व जुमानता त्यांचाच उपयोग त्यांनी आपल्या कार्यात करून घेतला.

तथापि शिवाजीराजे अगदीच निरक्षर नव्हते. तत्कालीन रिवाजाप्रमाणे लहानपणी ते लिहिण्या-वाचण्यात निपुण झाले याबद्दल संशय बाळगण्याचे कारण नाही. भोसले घराण्यातले बहुतेक व तत्कालीन इतर स्त्रीपुरुष मोडी लेखन-वाचन जाणणारे, थोडेबहुत संस्कृत पढलेले व बहुश्रुत असत. शिवाजीराजांचे निश्चित हस्ताक्षर फारसे उपलब्ध नाही, याची कारणे अनेक आहेत. ‘बहुत लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ असा’, अशाप्रकारचे त्याचे अल्पस्वल्प हस्ताक्षरही नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.[6] सामान्य व्यवहार लिहून ठेवण्याचा कारकुनी प्रघात त्या वेळी फारसा नव्हता. शिवाजीराजांचे सर्वच आयुष्य धामधुमीत गेल्यामुळे लेखनात लागणारी परिस्थिती त्यांना अनुकूल नव्हती. तथापि राज्य स्थापन झाले, त्याचे सरकारी दप्तरही बनले, परंतु ते नष्ट झाल्यामुळे शिवाजीराजांचे हस्ताक्षर दुर्मिळ झाले आहे. लेखन-वाचनाशिवाय हिशेब, काही संस्कृत पठन, राजनीति, पुराणवाचन असे कित्येक विषय त्यांना लहानपणी शिकवले असावे असे दिसते. लष्करी पेशाचे अश्वारोहणादि व्यवसाय व कसरत कुस्तीचे पेच त्यांना चांगले अवगत होते. त्यांची जी कित्येक पत्रे उपलब्ध आहेत, त्यांची भाषासरणी त्यांनी स्वमुखाने सांगून चिटणीसाने लिहिलेली दिसते. अर्थात शिवाजीराजांना लिहिता-वाचता चांगले येत होतेच. शिवभारतातील वर्णनावरून असे अनुमान होते की, ‘मातीचे हत्ती, घोडे व गड करून’

लहानपणी बालशिवाजी खेळत असे, आणि पोपट, कोकिळा, वाघ इत्यादी प्राण्यांच्या आवाजाचे अनुकरण करून दाया त्यांना रमवीत किंवा ते स्वत: अशा आवाजांचे अनुकरण करीत. नानाप्रकारची सोंगे घेऊन इतरांशी खेळण्याचा त्यांचा अभ्यास लहानपणापासूनच असावा. बहुरूपी होऊन प्रसंगास पाहिजे तशी बतावणी करून संकट निवारण करण्याची तयारी पुष्कळांना त्या काळी अवश्य ठेवावी लागे. शिवाजीराजे तर या कलेत चांगलेच निष्णात होते. या संबंधाने संशय वाटत नाही. चेटकीविद्येने माशीमुंगीचे सुद्धा त्यांस रूप घेता येई असा पुष्कळांचा समज होता. शिवाजीराजांना पुष्कळशा परभाषा बोलता येत होत्या, त्यांची अनुकरणशक्ती जबरदस्त होती, आणि कोणी काही उच्चारलेले परभाषेतले शब्द ते स्मरणाने पुन्हा तसे वठवीत, असे त्यांच्या चरित्रक्रमावरून दिसून येते.

2) दादोजी कोंडदेव :

बालशिवाजीला योग्य शिक्षण देण्यात जिजाबाईला मुख्य साह्य दादोजी कोंडदेवाचे होते. मुसलमानी अमलातील परिस्थिती चांगली ओळखणारा असा हा धोरणी व चतुर पुरुष शहाजीच्या समागमात वाढलेला असून त्याच्या ओळखीनेच हणमंते वगैरे कित्येक ब्राह्मण कुटुंबे पुणे प्रांतातील उद्योगात पूर्वीपासून भोसल्यांचे पदरी असलेली पुढे शिवाजीराजांचे उपयोगास आली. सन 1631-32 च्या दुष्काळात महाराष्ट्रात पुष्कळ लोक मेले व परागंदा झाले, त्या संधीत.. 'दादाजी कोंडदेऊ सुभेदार दिवाण झाले, त्यांनी मुलुख लाविला. देशमुखांस व कुळकर्ण्यास ताकीद केली की गाव लावणे,'[7]... अशा प्रकारचे दादोजींच्या कारभाराचे उल्लेख भरपूर आढळतात. वरील उल्लेख सन 1633च्या डिसेंबरातला आहे, त्यावरून दादोजी निजामशाही कारभारात वाढलेले शहाजीराजांचे सहायक होते असे दिसते. हे मलठणचे कुळकर्णी असून हिंगणी, बेरडी, देऊळगाव वगैरे भोसल्यांच्या पाटिलकीची गावे मलठण जवळच असल्यामुळे उभयतांचा ॠणानुबंध पिढीजाद होता. पेटा, पुणे व सुपे यांची जागीर शहाजीराजांकडे आली, तेव्हा दादोजी कोंडदेवांनी पुणे सुप्याकडे अंमलदार पाठवले,[8] असा उल्लेख आहे. 'सुभेदार नामजाद व कारकून किले कोंढाणा व महालानिहाय,' आणि 'मुजूमदार सुभे मजकूर' असे त्यांचे हुद्दे सन 1637-47 काळाचे नमूद केलेले आढळतात.[9] यावरून दादोजी हे नुसते शहाजीराजांचे ताबेदार नसून ते मावळ प्रांताचे आदिलशाही अंमलदार होते हे उघड दिसते. 'आपल्या भरंवशाचा हा इसम आहे' असे जाणून सन 1636मध्ये कर्नाटकचे कामगिरीवर जाताना शहाजीराजांनी त्याजला आपल्या जागिरीची व्यवस्था सांगून शिवाजी व जिजाबाई यांचा सांभाळ

करण्याचे काम सोपवले. त्या वेळी शहाजीराजांनी त्यांच्या तैनातीस एक हजाराची पागा बनवून त्यावर सिद्दी हिलाल नावाचा गृहस्थ नेमून दिला.

पुणे-सुप्याची ही जागीर सांभाळण्यास शहाजीराजांना केवढे कष्ट पडले याची साक्ष तत्कालीन कागदांवरून पटते. 'पुणे प्रांत साहेबास मोकासा अर्जानी झाला,' हे शब्द हक्कदारांच्या कागदात वारंवार येतात. सन 1628मध्ये या प्रांताचा व्यवस्थित ताबा शहाजीराजांना मिळाला तेव्हा तेथे वाडे वगैरे बांधून त्यांनी कुटुंबाच्या राहण्याची सोय केली. हे वाडे सन 1630मध्ये मुरार जगदेवाने जाळले ते दादोजींनी पुन्हा बांधले. त्या वेळी पुणे हा लहानसा कसबा होता. दादोजींनी कसब्यात रंगमहाल नावाचा वाडा बांधून जवळच हत्ती-घोडे वगैरेंची पागा तयार केली. शिवाजीराजे तेथे येऊन राहू लागले तेव्हा त्यांजकरिता उंची कपडे, जवाहीर वगैरे सिद्ध करून लोकांनी त्यांना आपला स्वामी व पालनकर्ता समजावे अशा प्रकारची सिद्धता केली; जणू काय त्यांस शिवाजीराजांच्या भावी उदयाचे स्वप्नच पडले होते.[10]

पुणे प्रांताच्या जागिरीवर भोसल्यांची आसक्ती पिढीजाद होती. मालोजी शहाजींना फौजेच्या खर्चासाठी हा प्रांत प्रथम मलिकंबराचे वेळेस मिळाला. जुन्नर व त्रिंबक हे किल्ले शहाजीने मोगलांचे हवाली करावे असे कलम शहाजहानने विजापुरचे तहात मुद्दाम घातले होते. उत्तरेस जुन्नर, चाकण, दक्षिणेस वाई, पूर्वेस सुपे, बारामती, इंदापूर व पश्चिमेस सह्याद्रीतील मावळ खोरी असा हा जागिरीचा टापू नकाशावर पाहिला असता, कोंढाण्याच्या मध्यस्थानावरून बंदोबस्त राखण्यास विशेष सोयीचा आहे. कोंढाण्यास लागूनच पूर्वेस शिवापूर असून ते स्थळ दादोजींनी शिवाजीराजांच्या नावाने वसवले आणि तेथे उंची फळांचे बाग तयार केले, ते अद्यापि वाखाणले जातात. तसेच राजगडचे पायथ्याशी शिवापट्टण हे गाव जिजाबाईंनी वसविले.[11] सिंहगड आदिलशहाला परत द्यावा लागला, तेव्हा शिवाजींनी काही काळ शिवापट्टणास राहून कारभार चालवला आणि मग राजगडावर कारभाराची सिद्धता केली.

पुण्यास असताना दादोजींनी शिवाजींचे लग्न निंबाळकरांकडील सईबाई हिच्याशी केले आणि शहाजीराजांच्या बोलावण्यावरून ते जिजाबाई व शिवाजीराजे यांना घेऊन सन 1640 च्या सुमारास बंगलोरास गेले. तेथे पुण्यातील कारभाराची शहाजींनी कसोशीने तपासणी केली, त्यात शिवाजींचे शिक्षण व जागिरीची व्यवस्था दोन्ही गोष्टी दादोजींनी अल्पावधीत फार चांगल्या सिद्धीस नेल्या हे पाहून शहाजींना मोठा संतोष वाटला. त्यांनी दादोजीस बक्षिसे व पोषाख देऊन आणि पूर्वी तनखा होता त्यावर सातशे होनांची बढती करून त्यांचा गौरव केला आणि काही काळ त्या सर्वांना जवळ ठेवून मग विजापुरास नेले. तेथे आदिलशहाच्या भेटी वगैरे झाल्यावर पुढील कारभाराची व्यवस्था ठरवून शहाजीराजांनी शिवाजींची रवानगी पुण्यास केली. त्या वेळी शामराज नीलकंठ पेशवे,

बाळकृष्णपंत मुजुमदार, बाळाजी हरि मजालसी, रघुनाथ बल्लाळ कोरडे, सोनोपंत डबीर, रघुनाथ बल्लाळ (अत्रे-चिटणीस) इत्यादी आपल्या पदरच्या हुशार मंडळींना त्याने शिवाजींबरोबर पाठवले. हा प्रकार बहुधा सन 1642-43 चा असला पाहिजे. पुण्यास येताच वरील सर्व मंडळींना हाताशी घेऊन आणि समवयस्क मावळे सोबती जमा करून, दादोजी कोंडदेवाच्या व मातु:श्रीच्या सल्ल्याने त्यांनी जो साहसी उपक्रम सुरू केला, त्याचे वर्णन पुढे क्रमश: येईल.

दादोजी कोंडदेव एक लहानसे कारकून होते ही समज चुकीची आहे. ते राजकारण जाणणारे चतुर, मुत्सद्दी व करडे प्रधान होते. शहाजीराजांची नोकरी इमानाने बजावीत असताना शिवाजींना त्यांनी योग्य वळण लावून पुढील उद्योगास समर्थ केले. साबाजी अनंत, मुरार जगदेव वगैरे मुत्सद्द्यांचे चातुर्य त्याने अवलोकन केले होते. शहाजीराजांच्या जागिरीची व्यवस्था म्हणजेच भावी राज्याचा पाया त्यांनी घालून दिला. त्यांची शिस्त मोठी कडक होती. कृष्णाजी बांदल हा दांडगाई करी, त्याचा पाडाव करून मावळातील देशमुखास त्याने कब्जात आणले. प्रसंग आला असता कठोर शासन करण्यास ते कचरत नसत. फुलाजी नाइकास त्यांनी बासांनी ठार मारवले. एका ब्राह्मणाने वसुलाचा भरणा करण्यात टाळाटाळी चालवली, त्याजवर त्याने विषप्रयोग करवला.[12] मावळातील देशमुखांचे शौर्यबळ अंत:कलहात फुकट जात होते, हे पाहून ते कलह त्यांनी शिवाजींना पुढे करून त्यांचे नावाने मिटविले, त्यामुळे या देशमुखांचा उपयोग शिवाजींना आपल्या नूतन उद्योगात करता आला. दादोजींची व्यवस्था व न्यायपद्धती इतकी सुप्रसिद्ध झाली की पुढील कारकीर्दित तीच व्यवस्था चालू ठेवावी, तीत बदल करू नये, असे उल्लेख आढळतात. पूर्वीची मुसलमानी राज्यातली इनामे व वतने दादोजींनी तशीच चालवून राज्याला स्थायिकपणा आणला. ते आपली सही ‘दादो कोंडदेव’ अशी करी; आणि लोक त्याचा ‘दादोजी कोंडदेव’ या नावाने गौरवपूर्वक उल्लेख करीत. ते वृद्धावस्थेत सत्तरीच्या उमरीत ता.7.3.1647 रोजी मरण पावले. त्यांची बायकोही पतिनिष्ठ असून ते निधन पावताच ती जी निश्चेष्ट पडली ती पुन्हा उठलीच नाही असे सांगतात. हातून काही आगळीक घडल्यामुळे स्वत:स शिक्षा करण्याकरता त्यांनी आपल्या हाताची बाही आमरण आखूड ठेवली अशी आख्यायिका आहे. यावरून त्यांचा करारी व पापभीरू स्वभाव व्यक्त होतो. त्यांच्या मृत्युमुळे जिजाबाई व शिवाजी यांना अत्यंत दु:ख झाले. त्यांचा मुलगा कृष्णाजी पुढे शिवाजीराजांचे नोकरीत होता. विजापूर दरबाराकडून त्याजवर बंडखोरीचा गुन्हा लागू करण्यात आला, यावरून शिवाजींच्या स्वतंत्र राज्याच्या कल्पनेस त्यानेच पुष्टी दिली असावी असे दिसते. दादोजींचे कित्येक निवाडे उपलब्ध आहेत.

जागिरीची व्यवस्था लावताना दादोजींनी केलेल्या खालील गोष्टी विशेष नमूद करण्यासारख्या आहेत :-

1) लष्कर : शहाजीराजांची मूळची जागीर पुणे व सुपे हे प्रांत असून पुढे लवकरच कर्नाटकातील मोहीम फत्ते केल्याबद्दल बारामती, इंदापूर व मावळ हे आणखी प्रांत त्यांना मिळाले. मावळे लोक दिसण्यात अडाणी पण प्रामाणिक, मेहनती व चपळ होते. ह्या लोकांवर शिवाजीराजांची भक्ती विशेष बसली. दादोजीने देशाच्या बंदोबस्ताकडे त्यांचा उपयोग केला. मावळे लोकांची एक बिनकवाइती पायदळ पलटण त्यांनी तयार केली आणि तिजवरील हुकमतीचे दर्जे ठरवून दिले. तसेच गावोगाव चौक्या पहारे बसवून, चोरांची भीती नाहीशी केली आणि आपल्या हद्दीतील किल्ले वगैरे दुरुस्त करून त्याजवर शिबंदी ठेवून दिली.

2) जनावरांचा बंदोबस्त : दादोजींनी लोकांस असे जाहीर केले की, जो कोणी वाघ किंवा लांडगा मारून आणील, त्यास बक्षीस मिळेल. बक्षिसाच्या आशेवर पुष्कळ जनावरे मारली गेली व प्रांतातील उपद्रव नाहीसा झाला.

3) शेतीच्या कामी दादोजींनी पुष्कळ उपाय योजले. दर एक गावी फिरून, मलिकंबराच्या पद्धतीप्रमाणे जमिनीची मोजणी व प्रतबंदी करून दरसाल पिकाचे मानाने वसूल घेण्याचा ठराव केला. पुष्कळ वर्षेपर्यंत साऱ्याची माफी दिल्यामुळे लोकांनी भराभर वसाहती करून लागवडी केल्या. गावाच्या व त्यातील प्रत्येक इसमाच्या मालकीच्या हद्दी ठरवून दिल्या, निरनिराळ्या कामास जबाबदार माणसे नेमून तत्समाविष्ट बाबतींची व्यवस्था बांधून दिली.[13] ह्या व्यवस्थेने पूर्वी जेथे सारे रान होते अशा ठिकाणी बागाईत उत्पन्न झाले; लोकवस्ती वाढली आणि दहा वर्षांत मुलुखात आबादानी व भरभराट होऊन वसूलही पुष्कळ येऊ लागला. सारांश जो प्रांत पूर्वी बहुधा निरुपयोगी म्हणून गणला जात होता, तोच आता महत्त्वाचा बनून, त्यातून नियमीत वसूल सरकारास येऊ लागला. त्या योगे जागिरीची किफायत वाढून दादाजीस मोठा द्रव्यसंचय करता आला. याच द्रव्याच्या बळावर शिवाजीराजांना व्यवस्थित फौज ठेवण्याचे सामर्थ्य येऊन त्यांना राज्य स्थापता आले. अतएव हा प्रयोग विशेष स्मरणीय आहे.

4) तंट्यांचा निकाल : त्या वेळी सरकारची व्यवस्था बरोबर नसल्यामुळे लोकांत भाऊबंदकीचे व वतनांचे तंटे शेकडो वर्षे चालून त्यातच सर्वांचे सामर्थ्य खर्च होई, दुसरे उद्योग त्यांना सुचत नसत. शिवाजीराजांना सदरेस बसवून त्यांच्या समक्ष लोकांना आणून, पुरावा गोळा करून दादोजीने अशा तंट्यांचे निकाल समाधानकारक करून दिले. दहा वर्षांचे आत तंट्यांचे निर्मूलन होऊन देशात स्वस्थता झाली, आणि लोक जमिनी सुधारण्यात लक्ष घालू लागले. लोकांना आपले तंटे आपसात तोडण्याचे हे नवीन वळण लागले आणि त्या नमुन्यावर इतर व्यवसायातही संघशक्तीचा उपयोग प्रांतास होऊ लागला. कित्येक शहाण्या अंमलदारांनी अशा सुधारणा पूर्वीच केलेल्या होत्या. सन 1619 मध्ये

रोहिलखोऱ्याच्या मुसलमान अंमलदाराने झाडांसंबंधी खालील नियम बांधून दिलेला प्रसिद्ध आहे :-

‘गावगन्ना नवी लावणी आंबराई, चिंचा, अनार व निंबोली यांची लागवड झाल्यास दहा झाडांस एक झाड इनाम; बाकी झाडे नऊ, त्यास मुख्य राजवाटा एक व प्रजावाटा दोन उतार होई तो (झाडास लाग आहे तोपर्यंत), येणेप्रमाणे घेणे, कौल असे. वडिलांनी झाडझाडोरा लाविला असेल तो देशमुखास इनाम असे. कोणे बाबे अंदेशा न करिता झाडझाडोरा नवीन करून सुखी असावे.’

राज्यकारभारातील पुष्कळ बाबती जिजाबाई देखील प्रमुखपणे उरकीत असत. शिवाजीराजांच्या बालपणात जागिरीचा कारभार त्यांनीच दादोजींच्या साह्याने निभावला. पुढे शिवाजीराजे कारभार करू लागल्यावर त्यांनी मातु:श्रींची व्यवस्था ठरवून दिलेली पाहिली असता स्वराज्य निर्मितीत त्यांचे अंग केवढे होते ते दिसून येते.

3) मावळप्रांतात नवचैतन्य :

सह्याद्रीलगतच्या मावळतीकडच्या प्रदेशास ‘मावळ प्रांत’ हे नाव पडले असावे. पश्चिमेकडून पूर्वेकडे उतरत येणाऱ्या खोऱ्यास मावळे (एकापेक्षा जास्त म्हणून मावळे) अशी संज्ञा पडली. जुन्नराखालची बारा व पुण्याखालची बारा अशी सामान्यत: चोवीस मावळे या भागात लोकोपभाषणात येतात. शिवनेर, घोडनेर, पारनेर, जामनेर[14] वगैरे जुन्नराखालची रोहिडखोरे, वेलवंड, मुसे, मुठे, जोर, कानद, शिवथर, मुरूम, पौड, गुंजण, भोर, पवन ही पुण्याखालची समजतात. प्रत्येक खोऱ्याच्या मध्ये एक नदी वाहत असून या नद्या सह्याद्रीतील प्रचंड वृष्टीचे पाणी भीमा कृष्णांच्या द्वारा पूर्वसमुद्रात नेऊन पोचवतात. या खोऱ्यांत प्राचीन देशमुखांची घराणी नांदत असून, त्यांनीच बहुधा हा प्रांत आरंभी वसवला असावा. हे मावळे - देशमुख घरंदाज, इभ्रतदार, वतनदार, द्रव्यवान, शिकलेले व व्यवहारचतुर असत. आपल्या टापूत त्यांचा कारभार स्वतंत्र असे. त्यांच्या मदतीस प्रभू देशपांडे व ब्राह्मण कुळकर्णी दप्तर सांभाळण्यास असत. स्वभावाने ते भांडखोर असून मानाखातर जिवाचीसुद्धा पर्वा ते करीत नसत. वतनांच्या वगैरे संबंधाने एकाच घराण्यात किंवा अनेक घराण्यात कैक शतके कलागती चालून खून, मारामाऱ्या, जाळपोळ हे प्रकार नित्याचे झाले होते. सरकारातून किंवा पंचायतीमार्फत त्यांच्या तंट्यांचे निकाल होत, पण ते बहुधा पाळले जात नसत. लग्नसमारंभासारख्या गडबडीच्या प्रसंगी एकदम धाड घालण्याचा प्रकार किती तरी चाले. बायका-मुलांचे खून होणे, देशोधडीस लागणे, फिरून सावरासावर करून सूड घेणे अशी अंदाधुंदी शिवाजीराजांच्या पूर्वी शे-दोनशे वर्षे सारखी चाललेली आढळते. नेहमीचेच हे प्रसंग झाल्यामुळे त्यातून निभावून जाण्याच्या युक्त्या

बायका-मुलांस सुद्धा सुचत असत. उपाशी लपून बसणे, उन्हातून किंवा थंडीवाऱ्यांतून रात्री-अपरात्री दूरच्या मजला मारणे, विरूद्ध पक्षाचे कट फोडून आपले कट जमविणे, त्याबद्दल आपल्या कटातील लोकांस उत्पन्ने लिहून देणे, हुलकावण्या दाखवून वेळ मारून नेणे, कधी-कधी समोर लढाई करणे असे हे मावळातील देशमुखांचे वर्तनप्रकार शे-दोनशे वर्षे लोकांच्या अंगवळणी पडलेले असून शिवाजीराजांच्या तर ते रोज डोळ्यांपुढे घडत होते. कित्येक प्रसंगी शिवाजीराजांनीही अशाच काही युक्त्यांचा उपयोग केलेला आपण पाहतो, तेव्हा शिवाजीराजांच्या काळापूर्वीची ही स्थिती आपणास माहीत नसल्यामुळे, शिवाजीराजे म्हणजे कपटात पूर्ण निष्णात अशी कित्येकांची 'भलतीच समजूत' होऊन जाते. खरा प्रकार असा आहे की, ह्या कपटप्रचूर पद्धतीचा शेवट शिवाजीराजांनी करून त्या प्रदेशात सुव्यवस्थित राज्यपद्धती निर्माण केली. अलिकडे प्रसिद्ध झालेल्या शिवकालीन कागदपत्रांत हे प्रकार स्पष्ट दिसतात. दादोजींचे हाताखालील कारकूनमंडळी व कित्येक सलगीचे सोबती यांच्या साह्याने शिवाजीराजे मावळात गुप्त मसलती करू लागले. येसाजी कंक, तानाजी मालुसरे, बाजी पासलकर वगैरे तरुण मंडळींच्या; कान्होजी जेधे, गोमाजी नाईक वगैरे वृद्धांशी वाटाघाटी चालू झाल्या. बरेच देशमुख त्यांना अनुकूल झाले. परंतु बांदल देशमुख, सुपेकर मोहिते, जावळीकर मोरे इत्यादींनी त्यांना विरोध केला, म्हणून शिवाजीराजांनी पुढे अवसर सापडताच त्यांना नरम केले. मुसलमानी राज्यात आपल्या लोकांचा अपमान व उच्छेद होतो, तो दूर करण्याचे विचार या तरुणांनी चालवले. 'शिवाजीराजांचा उद्योग चोऱ्यामाऱ्या करून लोकांस लुबाडण्याचा होता' असा समज आहे, तो किती चुकीचा होय हे यावरून दिसून येईल. बखरकार म्हणतात की, 'जे वडिलांनी मेळविले, ते खाऊन राहणे योग्य नाही, आपण हिंदू; सर्व दक्षिण देश यवनांनी ग्रासला; देव ब्राह्मण गायी ह्यांस व क्षेत्रांस पीडा केली, धर्म बुडवला. हा रक्षणार्थ प्राणही वेचून धर्म रक्षू व आपले पराक्रमे नवीन दौलत संपादू. ते अन्न भक्षू. नवे सांधावे हे या कुळात जन्मल्याचे सार्थक. दैवावर भार न घालू. पुरुषयत्न बलवत्तर होय. दैव पंगू आहे, यास्तव प्रयत्न अचळ करावे. त्यास दैव जसे अधिक साह्य होईल, तसतसे अधिक करीत जावे. देव परिणामास नेणार समर्थ आहे.' दादोजींनी त्यास सांगितले, 'वडिली दौलत संपादली, ती गमावली हे तुमच्या वाट्यास येऊ नये.' रामदासी वाङ्मयाचा आशयही अगदी असाच आहे.

येणेप्रमाणे शहाजी, जिजाबाई, शिवाजी, दादोजी कोंडदेव, प्रभु-देशपांडे, मावळे देशमुख व सरदार घराणी ह्या सर्वांचे ठिकाणी त्या संधीस एक विशिष्ट राष्ट्रीय भावना उत्पन्न होऊन तिच्या योगाने महाराष्ट्रीय वातावरण उचंबळून गेले होते. त्याचा परिणाम शिवाजीराजांच्या उपक्रमास परिपोषक होऊन त्यास पुढे अनेक साहसांची व राष्ट्रोद्योगाची कृत्ये करण्याची शक्ती आली.

नाना प्रकारची संकटे सहन करताना जिजाबाईंच्या मनात एक प्रकारचा नवीन हुरूप चढला व त्याच्या जोरावर तिने शिवाजीराजांना अप्रतिम प्रोत्साहन दिले. शिवाजीराजांच्या जीवनाचा प्रत्येक अंश या परिस्थितीतच उद्भवल्यामुळे पुढील प्रचंड काम सिद्धीस नेण्याची धमक त्यांना येत गेल्याने त्यांनी लायक इसम व साधने निर्माण केली. शिवाजीराजांनी वादळ उत्पन्न करून त्याजवर आरूढ होऊन अश्वाप्रमाणे त्याला आपल्या उद्दिष्ट कार्याप्रत नेले, असे ओवेन म्हणतो. देशात परकीय जुलमाच्या दडपणाखाली निराशा व उद्वेग सर्वत्र पसरला होता. हा प्रकार मोडून शिवाजीराजांनी राष्ट्रात नवचैतन्य निर्माण केले. लोक अस्वस्थ झाले. फार दिवस चालत आलेला मनू एकदम पालटू लागला. प्रत्येकास स्वतंत्र विचार करण्याची जरूर भासू लागली. दहा-वीस वर्षांत शिवाजीराजांनी अशी जबरदस्त खळबळ देशात उडवून दिली की, तिच्या योगाने पादशहापासून तो शेतकऱ्यापर्यंत प्रत्येकाला स्वत:चा म्हणून काही तरी स्वतंत्र पंथ पहावा लागला. त्यात काही शिवाजीराजांच्या बाजूला वळले, काही त्यांच्या विरुद्ध झाले. स्वस्थ कोणाला बसता येईना. राष्ट्रात प्रचंड घडामोडी होतात, त्यापूर्वी अशी खळबळ उडालेली इतिहासात पुष्कळदा दिसून येते.

4) आदिलशहाचा प्रकोप (सन 1644-48) :

‘थोर व्यक्तिंची चरित्रे जितकी अद्भूत किंवा स्फूर्तिदायक असतात, तितकीच ती कागदावर मांडण्यास गुंतागुंतीची व अवघड होतात. याचे कारण अशा व्यक्तिंच्या वर्तनात अनेक भानगडी होऊन संबद्ध व्यक्तिंचे हिताहित भिन्न असते. सिंहगडासारखे स्थल अनेकवार हातातून येते-जाते. पन्हाळ्याच्या किल्ल्याची तीच अवस्था झालेली दिसते. असे प्रकार एकसारखे घडत असल्यामुळे कालक्रम किंवा कार्यकारणभाव निश्चित मांडताना लेखकास भिन्न प्रकारची व्यवधाने सांभाळल्याशिवाय विषयाची मांडणी थोडक्यात व सुटसुटित करता येत नाही. याच कारणास्तव शिवचरित्रातील नानाविध प्रसंग निश्चित स्वरूपात मांडण्याच्या प्रयत्नात आजपावेतो अनेक लेखकांची हजारो पाने खर्च होऊनही सर्व संगती यथास्थित जुळली असे होत नाही. सामान्य वाचकांस निव्वळ तत्त्व किंवा सार पाहिजे असते. साधकबाधक मुद्द्यांचे वादविवाद त्यांस नको असतात. शिवचरित्रावरील विवेचन व वाङ्मय इतके अवाढव्य बनले आहे की, त्यातून निश्चित संगती बनवणे मोठे अवघड काम झाले आहे. शिवाजीराजांच्या आयु:क्रमातील कित्येक ठळक टप्पे सहज दाखविता येतील, पण त्यातील तपशिलांची संगती निश्चित करताना अडचणी प्राप्त होतात, त्यांचे निरसन करण्यास पुष्कळदा केवळ तर्कावर भिस्त ठेवावी लागते. अफझलखानाचा वध, आगऱ्याहून सुटका व राज्याभिषेक हेच शिवचरित्रातले महत्त्वाचे

प्रसंग होत. हे मुख्य प्रसंग दृष्टिसमोर ठेवून त्या चरित्राचे पोटविभाग नमूद करावयाचे झाल्यास प्राथमिक आयु:क्रमासंबंधाने खालील गोष्टी लक्षात बाळगल्या पाहिजेत :

सन 1636 (28 मे) - 44 औरंगजेबाचे दक्षिणेच्या सुभेदारीवर वास्तव्य.

सन 1637-39 शहाजी व रणदुल्लाखान यांजकडून कर्नाटकचे आक्रमण.

सन 1640-42 शिवाजीराजांची बंगळूर व विजापूर येथे बापाशी भेट.

सन 1643 रणदुल्लाखानाचा मृत्यु, आणि शहाजी-शिवाजीची विजापुरास भेट.

सन 1644-48 मुस्ताफाखानाचा शहाजीराजांशी कर्नाटकात बेबनाव.

सन 1644 (1 ऑगस्ट) दादोजी कोंडदेवास दस्त करण्याचे आदिलशहाचे फर्मान.

सन 1645 (मार्च) रोहिडेश्वराजवळ शिवाजीराजे वगैरेंच्या स्वराज्याच्या शपथा.

सन 1646 - महंमद आदिलशहा आजारी पडला तो पुढे दहा वर्षे मरणकालपर्यंत अंथरुणास खिळलेला होता.

सन 1647 मार्च 7 - दादोजी कोंडदेवाचा मृत्यु. शिवाजीराजांना अधिकारप्राप्ती; कोंढाण्याचा अंमलदार सिद्दी अंबर याजकडून बापूजीपंत नऱ्हेकरामार्फत तो किल्ला शिवाजीराजांचे कब्जात आला.

सन 1648 जुलै 25 - जिंजीजवळ मुस्ताफाखानाकडून शहाजीराजांना कैद.

सन 1648 ऑक्टोबर - पुरंदर शिवाजीराजांना हस्तगत झाला.

सन 1648 नोव्हे.6 - जिंजीचा वेढा चालू असताना मुस्तफाखानाचा मृत्यु; पुढे दोन महिन्यात जिंजी किल्ला आदिलशहाचे कब्जात आला.

सन 1648 नोव्हेंबर-डिसेंबर - फर्हादखान व तानाजीराव डुरे या आदिलशाही सरदारांनी बंगलोर हस्तगत करण्याकरता स्वारी केली. तो हल्ला ‘शहाजीपुत्र’ संभाजी याने शौर्याने लढून परत फिरविला.

सन 1649 (पहिले दोन-चार महिने) शिरवळ व पुरंदर येथे शिवाजीराजांकडून आदिलशाही फौजांचा पराभव, खळद बेलसरची लढाई.

सन 1649 (एप्रिल) - शहाजीराजांना बंदोबस्ताने कैदेत घेऊन अफझलखान विजापुरास दाखल. बरोबर जिंजीच्या लुटीचे 89 हत्ती असल्याने प्रवासास तीन-चार महिले लागले.

सन 1649 मे 16 - शहाजी व त्यांचा हस्तक कान्होजी जेधे यांची कैदेतून सुटका.

शिवाजीराजे व दादोजी कोंडदेव यांस पुण्याचे जागिरीवर रवाना केल्यावर सन 1644 च्या सुमारास शहाजीराजांनी वडिलपुत्र संभाजीस बरोबर घेऊन बंगलोरास प्रयाण केले. यापूर्वीच सन 1643 मध्ये त्यांचा मुख्य पुरस्कर्ता रणदुल्लाखान मरण पावला आणि कट्टर विरोधी मुस्तफाखान दरबारात कारभाराची सूत्रे हलवूं लागला. शहाजीराजांचा स्वातंत्र्यवृत्तीचा बाणा जो खुद्द त्यांच्या पत्रांत व्यक्त होतो, तो लक्षात ठेवला तर, इतउत्तर शहाजीराजे-शिवाजीराजांनी पृथकपणे दोन ठिकाणी आपला स्वतंत्र जम बसवायचा, असे

‘आपसात ठरविले असावेसे दिसते.’ कर्नाटकचा प्रदेश हस्तगत करण्यास शहाजीराजांचा पराक्रम कारण झाला असून शेवटी त्याचे श्रेय त्यांना काहीच मिळाले नाही. आदिलशहाने धर्मद्वेषाने हिंदूंचा नि:पात चालविला ही गोष्ट शहाजीराजे डोळ्यांनी पाहत होते. पुढे रणदुल्लाखान मेल्यावर त्यास आपली धडगत दिसेना. तेव्हा स्वत: सगळ्या कुटुंबाने लहानशा पुण्याच्या जागिरीत कुचंबत राहण्यापेक्षा आदिलशहास दोन शह एकदम उपस्थित करावे असे शहाजीराजांनी दादोजी कोंडदेव व इतर सल्लागार यांच्या विचाराने ठरवले आणि पुण्याचा अखत्यार दादोजींवर सोपवून आपण पुन्हा बंगलोरास गेले. उभयतांना शक्य तितके मुसलमानशाहीवर आक्रमण करून आपली इभ्रत व शक्ती वाढवायची, परंतु बाह्यत: हा सगळा उद्योग केवळ आदिलशाहीचा अंमल सुरळीत व निर्वेध करण्यासाठीच आपण करीत आहोत असे स्पष्ट दाखवायचे, अशी ही उभयत्र योजना होती. हिंदूंचे संघटन हे या योजनेचे मुख्य इंगित होते. मावळात शिवाजीराजांना जसे देशमुख मिळाले, तसे कर्नाटकात शहाजीराजांना निरनिराळ्या ठिकाणचे ‘नायक’ भेटले. दोन्ही ठिकाणच्या उद्योगांची तपशीलवार वर्णने शहाजीराजांच्या चरित्रात आली आहेत. त्यांची सूक्ष्म दृष्टीने तुलना केल्यास, शहाजीराजांचे आदिलशहास पत्र, मालोजी घोरपड्यास लिहिलेले शिवाजीराजांचे पत्र, शिवभारतातील उल्लेख व बखरीतील वर्णने या सर्वांची एकवाक्यता केल्यास, वरील द्विविध योजनेसंबंधाने संशय बाळगण्याचे कारण राहत नाही. सरकारपक्ष व लोकपक्ष यांचा झगडा सुरू होतो तेव्हा असाच प्रकार घडत असलेला इतिहासात दृग्गोचर होतो.

‘आपल्या चळवळी कितीही गुप्त रितीने चालवल्या तरी सरकारास त्यांची बातमी इत्थंभूत असतेच’ अशा संशयाने दादोजी कोंडदेव व शहाजीराजे संगनमताने वागत असून त्यांचे उद्देश आपल्या राज्यास अत्यंत बाधक आहेत अशी खात्री आदिलशहाची लगेच झाली आणि हे दोघे आपले शत्रू समजून त्यांचा बंदोबस्त करण्याचे काम त्याने एकदम हाती घेतले, त्याची खूण म्हणजे ता.1.8.1644 चे आदिलशाही फर्मान कान्होजी जेध्यास आले ते असे :-

‘शहाजीराजे भोसले यांना दरबारातून अप्रतिष्ठेने काढून लावण्यात आले असून त्याचा मुतालिक दादोजी कोंडदेव याने कोंढाण्याचे बाजूस धामधूम चालविली आहे,[15] त्यास शिक्षा करून प्रदेश ताब्यात घेण्यासाठी खंडोजी व बाजी घोरपडे यांची नेमणूक करण्यात आली आहे. तरी तुम्ही आपल्या जमावासह मशारनिल्हेस सामील होऊन त्यांच्या संमतीने तो दुष्ट दादोजी व त्या हरामखोराचे साथीदार यांना नेस्तनाबूद करावे आणि विलायत ताब्यात आणावी. तेणेकरून तुमची सरफराजी होईल.’ रवाना छ 7 जमादिलाखर सन 1054 पाा खास हुजूर.[16]

या फर्मानाचा परिणाम शिवाजीराजांवर झाल्याचे आढळत नाही. त्यांची बंडखोरी वाढत चाललेली पाहून कान्होजी जेधे व त्यांचा कुळकर्णी दादाजी नरस प्रभू यास ता.30.3.1645 चा आदिलशाही अधिकाऱ्याचा हुकूम दाखल झाला तो असा :- 'शिवाजीराजे याने शहाशी बेमानगी करून मावळे लोकांचा जमाव केला. रोहिडा किल्ल्यावरील ठाणे उठवून आपण किल्ल्यात शिरला. हल्ली राजगड किंवा नाव करून बळकावला. तू त्यास सामील होऊन वसूल देतोस, ठाणे शिरवळ येथील अमीनास रुजू राहत नाहीस, मगरुरीचे जबाब देतोस, हे योग्य नाही. हुकूम पोचताच अमीनाशी रुजू होणे. नाही तर शहा तुला विजापुरी नेऊन गर्दन मारतील.'[17]

हा दादाजी नरस प्रभू शिवाजीराजांच्या उद्योगात प्रथमच जाऊन मिळाला. त्याने वरील हुकूम लगेच शिवाजीराजांकडे पाठवून पुढे कसे करायचे त्याचा सल्ला विचारला. त्यावरून शिवाजीराजांनी त्यास कळवले की, 'तुम्ही व आम्ही आदिलशहाशी बेमानगिरी बिलकूल करीत नाही. तुम्ही तो कागद घेऊन लगेच आमचे जवळ यावे. रोहिडेश्वराने आम्हाला यश दिले आणि पुढेही तोच तुमचे आमचे हिंदवी स्वराज्याचे मनोरथ पुरे करण्यास समर्थ आहे. श्रींचे संनिध दादाजीपंताचे विद्यमाने तुमचे आमचे इमान झाले ते वज्रप्राय कायम आहे. हे राज्य व्हावे अशी श्रींचीच इच्छा दिसते. तुम्ही बिलकूल हवालदिल होऊ नये.'[18]

मावळचा प्रमुख - देशमुख, कान्होजी जेधे यास शहाजीराजांनी बंगलोरहून शिवाजीराजांचे तैनातीस पाठविले होते. तो बाजी पासलकराचा जावई. ही मंडळी शिवाजीराजांचे उद्योगात सामील झाली. दादोजी कोंडदेव शिवापुरास आले ते समयी कृष्णाजी नाईक बांदल देशमुख जोरावारीने मावळात वसूल घेऊ लागले, तो प्रकार कान्होजींनी चालू दिला नाही.[19] मात्र या वेळ पावेतो बंडाळी संबंधाने दादोजींचेच नाव पुढे आले होते, शिवाजीराजांचे नव्हते. पुढे सन 1645 मध्ये शिवाजीराजांनी आपल्या साथीदारांकरवी रोहिडेश्वरासंनिध स्वराज्याच्या शपथा घेवविल्या. मात्र बाह्यत: विजापूर दरबारला नम्रता दाखवून त्याने आपला खरा हेतू प्रगट होऊ दिला नाही. अशा नाजूक कामात प्रसंग पडेल तसा निभाव करावा लागतो हे उघड आहे. पण सन 1646 मध्ये 'महाराजांनी चाकणचे ठाणे बसवून रुद्रमाळ (पुरंदर) किल्ल्याचे बेरड फितवून राजगड, पुरंदर हे किल्ले घेऊन पुण्यातच नवी शिबंदी ठेवून सिंहगडही घेतला, हे वर्तमान विजापुरास जाहीर झाले.'[20] शिवाजीराजे असा उपक्रम सुरू करतात तोच विजापुरास शहा अर्धांगवायूने आजारी होऊन त्यास आपल्या कारभारात नरमाईचे धोरण स्वीकारणे भाग पडले, ही गोष्ट त्याने 'शहाजीला शिक्षा न करता सोडून दिले' यावरून सिद्ध होते. शिवाजीराजांनी बंडाळी चालवली तिला बापाची अंतस्थ फूस आहे असे शहाच्या कानावर जाऊन त्याने शहाजीराजांना जिंजीजवळ कैद करवून विजापुरास आणले, आणि तेथे पुष्कळ विचार व वाटाघाट करून शेवटी त्यांना सोडून दिले, हा प्रकार शहाजीराजांचे

चरित्रात विस्ताराने सांगितला आहे, त्याचा संदर्भ या ठिकाणी लक्षात बाळगला पाहिजे. शहाला त्याच्या कित्येक सल्लागारांनी सांगितले की, ‘मुलाच्या अपराधाबद्दल बापास शिक्षा करणे हे कुराणाच्या आज्ञेविरूद्ध आहे.’[21] त्यावरून शहाने शहाजीराजांना काही अटींवर सोडून दिले.

शहाजीराजांना शिक्षा करणे आदिलशहाला शक्य नव्हते, म्हणून आधारासाठी त्याने कुराणातल्या वचनाची मदत घेतली. शिवाजीराजे व संभाजीराजे हे दोघे स्वपराक्रमाने गर्जू लागले हे वरील प्रकरणात स्पष्ट दिसते. शहाजीराजांची सुटका होताच त्याने कान्होजी जेध्याकडून बेलरोटीवर शपथ घेवविली, की तुम्ही जाऊन शिवाजीराजांना सामील व्हावे आणि कोणीही शत्रू चालून आला तरी त्याचा पाडाव करावा. यावरून शिवाजीराजांच्या उद्योगास शहाजीराजांची पूर्ण संमती होती, किंबहुना ज्या पूर्ण स्वातंत्र्याच्या क्षेत्रात स्वत: उतरण्यास ते कचरत होते, त्यात आपल्या मुलास त्यांनी उतरवले असे दिसून येते.

प्रकरण 2 - स्वराज्याच्या मार्गावर

(1644 - 1656)

1. स्वतंत्र राज्याच्या मुद्रा, 2. पुरंदर व सुपे हस्तगत, 3.मिळाले बारभाई, बुडाली चंदरराई.

1. स्वतंत्र राज्याच्या मुद्रा :

सन 1643 मध्ये शिवाजीराजे बंगरुळाहून पित्याची आज्ञा घेऊन पुण्यास आले त्या वेळी त्यांचे वय पंधरा-सोळा वर्षांचे होते. तेव्हापासून त्यांचा उद्योग झपाट्याने चाललेला दिसतो. त्यापैकी प्रत्यक्ष शिवाजीराजांचा भाग किती आणि जिजाबाई व दादोजी यांचा किती असे पृथकपणे ठरविणे शक्य नाही. मात्र प्रत्येक हालचाल तिघांच्या पूर्ण विचाराने ठरवली जात होती यात शंका नाही. रानावनातल्या मोकळ्या वातावरणात शिवाजीराजांची निरीक्षणशक्ती प्रदीप्त झाली. गावंढळ लोकांच्या संगतीत संचार करताना जागिरीच्या व आसपासच्या टापूतील एकूणएक जागा, वाटा, घाट, किल्ले वगैरे त्याने बारकाईने तपासून पाहिले. ठिकठिकाणी यावनी राज्यकर्त्यांचा बंदोबस्त कसा आहे, कोण कसा वश होईल, दऱ्याखोऱ्यांतून चोरवाटा कोणीकडे कशा आहेत इत्यादी प्रकार त्याने पाहून घेतले; देशमुखांशी ओळखी केल्या आणि आसपास कोण वश होईल आणि कोण विरोध करील याचा कयास बांधला. अर्थात त्यांनी लोकसंग्रहाची तयारी चालवलेली होती.

दुसरी गोष्ट त्यांच्या नजरेस आली ती ही की, मुसलमानी अंमलाखाली लोक गांजून गेले आहेत. त्या राज्यात न्याय अपवादात्मक होता. 'ऐसा अंधेर कारभार बादशाहीमध्ये कोणी मनास आणीत नाहीत. पैके पावले म्हणजे एकाचे वतन एकास देतील.'[22] स्त्रियांवर बलात्कार, हिंदूंचे खून, मंदिरांचा विध्वंस, गोवध इत्यादी अनन्वित प्रकार उघड होत होते. जिजाबाईंचे पित्यास व त्यांचे बांधवांस निजामाने कपटाने ठार मारले. शिवाजीराजांचा सासरा मुधोजी निंबाळकर मारला जाऊन मेहुणा बजाजी यास मुसलमानी धर्म स्वीकारावा लागला. अब्रूने उद्योग करून लौकिक मिळविण्याचे व धर्माचरण करण्याचे साधन हिंदूंस राहिले नाही. विजापुरास असताना रस्त्यावर चाललेला गोवध शिवाजीराजांच्या

अंत:करणास झोंबला. मुसलमानी राज्य केवळ दिखाऊ आबावर चालले होते. त्याची खरी खरी शक्ती किती आहे ही शहाजीराजांनी अनेक वार अजमावलेली गोष्ट शिवाजीराजे पहात होते. अशा निरीक्षणाने शिवाजीराजांचा स्वाभिमान जागृत होऊन त्यांच्या विचारात स्वतंत्रतेचे वारे उत्पन्न झाले आणि एकदम उघड वैर न दाखवता प्रांताच्या बंदोबस्ताचे इलाज त्यांनी सुरू केला. रामचंद्रपंत अमात्य लिहितात, 'शककर्ते छत्रपतीसाहेब यवनाश्रय असतां त्यांपासून पुणे आदिकरून स्वल्प सत्ता स्वतंत्र मागून घेऊन पंधरा वर्षांचे वय असतां त्या दिवसापासून तितकेच स्वल्प मात्र सत्तेवर उद्योग केला. 'गांडीविनो मतमिदं कुतो दैन्यं कुतो भयम्'।[23] या दृढ बुद्धीने शरीरास्था न पाहता केवळ अमानुष पराक्रम स्वांगे केले. मनुष्यपरीक्षेने नूतनच सेवक नेमून योग्यतेनुसार भार वाढवून महत्कार्योपयोगी करून दाखविले.'[24] यावरून विजापुराहून पुण्यास आल्यावर सन 1642-43 मध्ये पंधरा वर्षांचे वयात शिवाजीराजांचा उद्योग झपाट्याने सुरू झाला असे दिसून येते.

हा उपक्रम कसा सुरू झाला त्याचे वर्णन बखरकारांनी खालील प्रमाणे केले आहे. 'कारकून सरदार वगैरे येतील ते मसलतीत घेऊन आणखी चांगले मर्द शिपाई पाहून त्यांस जवळ ठेवावे. कारकून चांगला कर्ता लिहिणार पाहून त्यास ठेवावा. तसेच राजकारणे करावी; मातबर चहूं जागचे मराठे यांसी आप्तपणा करावा; पत्रे लिहावी; त्यांस आणून भेट घ्यावी, आपण त्यांजकडे जाऊन आम्हांस अनुकूळ असावे असे बोलावे. असे करण्यात ज्यांनी महाराजांचे बोलणे परम आदराचे व पराक्रमाचे ऐकावे, त्यास वेध लागून वाटावे की, हे परम थोर आहेत. यांचेच संमते चालावे, हे सांगतील तसे चालावे. प्राणही गेले तरी जावोत, परंतु सेवा करून यांचे आज्ञेत चालावे, अशी सर्वांची चित्ते वेधून घेतली.'[25]

देशमुखांना अनुकूल करून घेण्यात ज्या राज्यकार्यकुशल मुत्सद्द्याचा उपयोग शिवंाजीराजांना झाला, त्याला डबीर म्हणजे युक्त्यभिज्ञ हा हुद्दा शिवाजीराजांनी दिला. तेच सोनोपंत डबीर होय. ज्या हुद्देदाराने त्यास दस्त केले, त्यास म्हणजे शामराज नीळकंठ यास त्यांनी पेशवाई म्हणजे मुख्य प्रधानकी दिली; आणि ज्या लहानशा सैन्याच्या जोरावर त्याने पुंडांना जमीनदोस्त केले, त्या सैन्याची व्यवस्था ठेवण्याकरता एक सबनीस नेमावा लागला, तेच रघुनाथ बल्लाळ कोरडे होय. येणेप्रमाणे बारा मावळे काबीज करताना हे हुद्देदार अस्तित्वात आले. मुलुख ताब्यात आल्यामुळे जमाखर्चाचे काम पडू लागले तेव्हा अमात्याची जरूर लागली व ते काम बाळकृष्णपंत हणमंते[26] यांजकडे शिवाजीराजांनी दिले. अशा रीतीने अष्टप्रधानांची निर्मिती हळूहळू जरुरीप्रमाणे होत गेली. हे प्रधान शहाजीराजांनीच शिवाजीराजांबरोबरच बंगळुराहून पाठवले.

'पुण्यास येताच बारा मावळे काबीज केली, मावळे देशमुख बांधून दस्त करून पुंड होते त्यांस मारिले,' असे जे स्पष्ट वृत्त सभासद व दुसरे बखरकार वर्णितात ते बरोबर दिसते. या उपक्रमात घडलेले कित्येक विशिष्ट प्रकार उघड दिसतात. पुरंदर, सिंहगड, तोरणा व

राजगड हे चार किल्ले मावळ प्रांताचे रखवालदार होते, तेच शिवाजीराजांनी युक्तीने प्रथम आपल्या कब्जात आणले. सन 1644मध्ये कोंढाणा प्रांत व किल्ला दादोजींनी हस्तगत केला ही गोष्ट विजापुराहून सुटलेल्या फर्मानाने सिद्ध झाली आहे. सिंहगडचा बंदोबस्त करून नंतर शिवाजीराजांनी तोरण्याच्या किल्लेदाराशी संधान बांधून तोही ताब्यात आणला आणि त्याची डागडुजी करून वर मावळ्यांची शिबंदी ठेवली आणि नाव प्रचंडगड दिले. या किल्ल्यातील पडिक जागेत शिवाजीराजांस द्रव्यसंचय सापडला, तो पाहून लोकांची अशी भावना झाली की ‘या पुरुषास देवी भवानी प्रसन्न होऊन साह्य करीत आहे.’ नंतर तोरण्याचे आग्नेयेस तीन मैलांवर राजगड किल्ला शिवाजीराजांनी नवीन बांधला. हे बांधकाम मोरोपंत पिंगळे यांनी केले. या कृत्यासंबंधाने विजापुरास शहाकडे शिवाजीराजांबद्दल पुष्कळ कागाळ्या गेल्या. त्यावर शिवाजीराजांनी कळवले, ‘जागिरीचा बंदोबस्त करण्यास आम्हास किल्ल्यांची जरूर आहे. किल्ले कब्जात असल्याशिवाय जागीर सांभाळता येत नाही.’ या उत्तराने शिवाजीराजांची थोडी निभावणूक झाली, परंतु त्यामुळे दरबारचे समाधान फार वेळ झाले नाही.

एकामागून एक किंवा एकसमयावच्छेदे शिवाजीराजांनी वरील प्रकार सिद्ध केले ते लक्षात घेता ता. 7.3.1647 रोजी दादोजी कोंडदेवांचा मृत्यु झाला, तोच काल त्यांच्या स्वतंत्र राज्यस्थापनेचा समजणे युक्त होईल. दादोजींच्या हयातीतच त्याची रूपरेषा ठरली होती आणि ते मृत्यु पावताच शिवाजीराजांनी मावळातील टापूत आपली स्वतंत्र सत्ता चालू केली. विजापुराहून आल्यावर बारा बावळे काबीज केली असा प्रमुख उल्लेख सर्व बखरीत व इतर कागदात आढळतो. ही बारा मावळे म्हणजे जुन्नरपासून पुणे सुपे पावेतोचा प्रदेश होय. या भागात उत्तरेस राजमाची किल्ला, कल्याणचा विजापुरी अंमलदार मुल्ला अहमद याचे ताब्यात होता. हिलाल हबशी लोहगडावर राहून, अंदर, नाणे व पवन ह्या तीन मावळांचा बंदोबस्त ठेवी. फिरंगोजी नरसाळा चाकणच्या किल्ल्यावरून घोटण, पौड व मुसे ह्या तीन मावळांवर ताबा राखी. गुंजण मावळ तोरण्यावरील किल्लेदाराच्या देखरेखीखाली होते. वेळवंड व भोर ही तेथील देशमुखांच्या हातात होती. हिरडस मावळात बांदल देशमुख नांदत होते व शिवथर खोरे बाबाजी कोंडदेवाच्या ताब्यात होते. पूर्वेकडील मुलुखात पुणे व सिंहगड दादोजी कोंडदेवांकडे होते. पुरंदर किल्ला निळो नीळकंठ नाइकवाडी याजकडे व सुपे प्रांत शहाजीचा मेहुणा संभाजी मोहिते याजकडे होता. या मंडळींस हळूहळू दस्त करून शिवाजीराजांनी आपल्या वडिलार्जित जागिरीचे स्वतंत्र राज्य बनवले. घाटावरील प्रदेश हस्तगत करण्यात बाजी पासलकरांचा व घाटाखालील प्रदेश हस्तगत करण्यात तानाजी मालुसऱ्यांचा शिवाजीराजांना मोठा उपयोग घडला. या स्वराज्यसिद्धीची दोन-तीन ठळक गमके उपलब्ध आहेत. ‘छत्रपती’ हे विशिष्ट पद व ‘प्रतिपच्चंद्ररेखेव’ ही त्यांची मुद्रा या वेळेपासून उपयोगात आलेली आढळते. रा.राजवाड्यांनी एक जुना बेहेडा म्हणजे जमाखर्ची कागद छापला आहे त्यात ‘तेरीज रकमा कारकीर्द - इ.महाराज छत्रपती ताो

हवेली किल्ले सरसगड[27] सु॥[28] सिद्धेश्वर भट ब्रह्मे यास लिहिलेले असून, त्यात 'स्वामींच्या अनुष्ठानबळे राज्यास अधिकारी झालो' असे शब्द आहेत, त्यावरून यापूर्वी शिवाजीराजांचे स्वतंत्र राज्य निर्माण झाले होते याविषयी संशय राहत नाही.

शिवाजीराजांची मुद्रा तर पुष्कळ अगोदरची आहे. ही मुद्रा अत्यंत सार्थ असून ती मराठी राज्याची गुरुकिल्लीच म्हणता येईल. ती मुद्रा अशी :-

प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता।

शाहसूनो: शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते॥[29]

शहाजीपुत्र शिवाजीराजे यांच्या स्वराज्यस्थापनेच्या प्रतिपदेची म्हणजे प्रारंभाची ही मुद्रा सूक्ष्मदृश्यांवाचून इतरांस सहज न दिसणारी पण कलेकलेने दिवसेंदिवस वाढत जाणारी बारीक कोर उगवली असून ती उत्तरोत्तर पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे परिपूर्ण होऊन सकल विश्वाला वंद्य होणार आहे आणि हिचा अवतार केवळ लोककल्याणार्थ झाला आहे. अशी ही सुंदर मुद्रा म्हणजे मराठ्यांचा सारभूत इतिहास व शिवचरित्राचे मुख्य रहस्य दाखविते. या मुद्रेचा काल हाच शिवाजीराजांच्या उद्योगाचा आरंभ असे नि:संदिग्धपणे म्हणता येते. सारांश, सन 1647 पासून शिवाजीराजांचा हा उद्योग लोकांचे मनात चांगला भरून बाहेर त्याला कृर्तृत्वाविषयी आदरभाव उत्पन्न झाला. इतका, की आदिलशाही मुलुखाच्या मानाने मावळातील लोकांस वित्तजीविताची जास्त शाश्वती वाटू लागली. शिवभारतकार म्हणतो-

महाराष्ट्रो जनपद: तदानीं तत्समाश्रयात्।

अन्वर्थतामन्वभवत्समृद्धजनतान्वित:॥

म्हणजे शिवाजीच्या आश्रयाखाली महाराष्ट्राची जनता समृद्ध होऊन महाराष्ट्र नावाला सार्थत्व प्राप्त झाले.

2) पुरंदर व सुपे हस्तगत (1648 ऑक्टोबर) :

शिवाजीमहाराजांनी पुरंदरावर आपले ठाणे केले, त्याचा प्रकार असा. 'निळो निळकंठराव नाईकवाडी किले पुरंधर निजामशाही किला बळकावून भोवता मुलूख मारून खंडणी घेऊन होते, त्यांजकडे शहाजीराजे यांचा घरोबा फार होता. त्याजवरून शिवाजीराजे यांनी पत्र पाठविले जे, दादो कोंडदेव आम्हांजवळ वडिली ठेवून दिल्हे होते ते मृत्यू पावले. आता आम्ही निराश्रीत जालो. तुमचे आमचे वडिलांचा बहुत घरोबर स्नेह यास्तव किल्ल्याआश्राने खाली माचीजवळ येऊन राहू. तुम्ही सांगाल तसी वर्तणूक करीत जाऊ.' त्यांनी उत्तर पाठविले की, 'किला घर तुमचे आहे. दुसरा विचार नाही. आपण यावे.' ऐसी उत्तरे येताच घरात स्त्रीस व जिजाबाईस सांगून आपण पंचवीस हजार मावळे व पागा

घेऊन गडाखाली येऊन राहिले. तेथे पावसाळा छावणी केली. निळोजी, पिलाजी व शंकराजी तिघे बंधू. वडील निळोजी कारभार करीत. शंकराजी रिकामे घरीच होते, त्यांस शिवाजीराजे यांजपाशी ठेविले. त्यांस शंकराजींनी आपले मनोगत एकांती सांगितले, ‘आमचे ं बधू आम्हास वाटा देत नाहीत, कामकाज सांगत नाहीत. आता साहेबांजवळ आहे. तिजाई हिशाचे कामकाज माझे मजला सोपून द्यावे.’ शिवाजीराजे यांणी मान्य करून चिंता न करणे असे म्हणून जवळ ठेविले. नित्य भोजन एक ठिकाणी, त्याजवर बहुत प्यार. इतक्यामध्ये दिवाळीचा सण आला. निळोजींनी शंकराजीस सांगून पाठविले की तुम्ही उदईक सणास किल्यावर निरोप घेऊन यावे. त्याजवर शंकराजीने सांगून पाठविले की आम्हास येकट्यास येता येत नाही, शिवाजीराजांस व मातुश्रीस टाकून कैसे यावे! त्यावरून जिजाऊ व शिवाजीराजे व दहा-वीस मानकरी यांस आमंत्रणे सांगून घेऊन यावे असा निरोप आला. बहुत आग्रह करून जिजाबाई व राजे मावळे लोक व पागेचे बारगीर सर्वांस गडावर नेऊन सन्मान करून तीन दिवस नहाणे भोजने करून राहविले. प्रतिपदेस भोजने जाली. रात्रीस निळो निलकंठराव स्त्री सुद्धा निद्रा केली. पिलाजी व शंकराजी यांनी राजांस वर्तमान सांगोन पंचवीस बारगीर खासे समागमे देऊन निळोजीच्या पायात बेडी घातली. राजांनी पिलाजी व शंकराजी यांस सांगितले जे ‘किल्ल्याचा बंदोबस्त आम्हासच करावा लागतो.’ असे बोलून सर्वांचे पायात बेड्या ठोकून दिल्या. वस्तभाव मालमत्ता खजिना पुष्कळ सापडला. तीन दिवस तिघे भाऊ कैदेत होते. चौथे दिवशी बंद खुले करून गाव इनाम देऊन समाधान केले. वस्त्रे देऊन पुरंदराखाली ठेविले.’ (ता.29.10.1648) ‘तुम्ही आम्हासी इमानाने वर्ताल तोपर्यंत आम्हीही तुम्हासी इमानाने वर्तू’ अशी आणभाक त्यांस शिवाजीराजांनी दिली.[30] किल्ल्यावरील शिबंदी आपण होऊनच शिवाजीराजांस अनुकूल झाली.

दादोजी कोंडदेव सन 1647 मध्ये मरण पावल्यावर शहाजीराजांस अटक होऊन सिंहगड हातचा जाणार असे दिसू लागताच शिवाजीराजांनी युक्ती करून पुरंदर किल्ला काबीज केला त्याची ही हकिगत आहे. खळद-बेलसरच्या लढाईत शिवाजीराजे पुरंदरावर होते आणि ती लढाई सिंहगड हस्तगत करण्याकरता शहाजीराजे अटकेत असताना झाली. यावरून उघड आहे की वरील लेखात वर्णिलेला प्रकार सन 1648 च्या पावसाळ्यात व त्यापुढील दिवाळीतला आहे. किल्ला काही नीलकंठरावांच्या मालकीचा नव्हता. मूळ किल्ला निजामशहाचा. निजामशाही बुडाल्यावर मावळचा हा भाग आदिलशहाकडे जाऊन तो शहाजीराजांच्या जागिरीत दाखल झाल्यामुळे एका अर्थाने शिवाजीराजांच्याच मालकीचा झाला आणि विशेष कोणास न दुखवता मोठ्या युक्तीने त्यांनी त्याजवर आपली सत्ता बसवली. नीलकंठरावाच्या कुटुंबाचा त्यांनी चांगला परामर्ष घेतला आणि अखेरपर्यंत हे चांबळीचे नाईक मराठेशाहीत होते.

चाकणचे ठाणे शिवाजीराजांनी हस्तगत केले त्याजवर फिरंगोजी नरसाळा हा किल्लेदार होता. राजांनी त्यासच आपल्यातर्फेने किल्ल्यावर मुख्य नेमले. फिरंगोजीने पुढे पुष्कळ दिवस शिवाजीराजांची नोकरी इमानाने केली.[31]

सन 1648 च्या सुमारास विजापूरचे नोकरीतील पाचसातशे पठाण शिवाजीराजांकडे चाकरीस राहण्यास आले. राजांच्या मनात त्यांना आपणाकडे ठेवायचे नव्हते. परंतु गोमाजी नाईक पानसंबळ यांचा सल्ला विचारता बोलले की, 'तुमचा लौकिक ऐकून हे लोक आले आहेत, त्यांना विन्मुख जाऊ देणे योग्य नाही. 'हिंदूंचाच संग्रह करू, इतरांची दरकार ठेवणार नाही' अशी कल्पना धरली तर राज्य प्राप्त होणार नाही. ज्यास राज्य करणे त्याने अठरा वर्ण, चारही जाती यांस आपापले धर्माप्रमाणे चालवून त्यांचा संग्रह करून ठेवावे.' हा सल्ला फार चांगला जाणून राघो बल्लाळ कोरडे यांचे निसबतीस त्यांना ठेवून घेतले.

शहाजींची सुटका होताच मावळातील संघटनांचे काम शिवाजीराजांनी कसे चालविले हे वरील हकिकतीवरून कळून येईल. या कामात जे कोणी विरोधक त्यांना भेटले त्यांचा त्यांनी नि:पात केला. अशा विरोधकांपैकी जावळीचे मोरे व सुप्याचे मोहिते प्रमुख होते. सुप्यास संभाजी मोहिते होता व तो महाराजांची ताबेदारी मान्य करीत नव्हता. त्याचेजवळ तीनशे स्वारांची पागा होती. मावळ्यांची एक टोळी घेऊन महाराजांनी एके दिवशी मध्यरात्री संभाजी मोहितेवर छापा घातला. त्याला व त्याचे पक्षाचे लोकांना कैद करून मुलूख व पागा हिसकाऊन घेतली. त्याच्या खजिन्यात द्रव्य, जवाहीर, वस्त्रे वगैरे मौल्यवान वस्तू सापडल्या. महाराजांनी आपणास साह्य करण्याविषयी मोहिते यास सांगितले असताना तो कबूल होईना म्हणून त्याला शहाजींकडे कर्नाटकात रवाना केले. हा मोहिते, महाराजांच्या सावत्र आईचा भाऊ होय. वरील प्रकार सन 1649-52 च्या दरम्यान घडला असावा. सर जदुनाथ त्याची तारीख 25.9.1656 कोणत्या आधाराने देतात ते समजत नाही. मात्र मोहित्यांचे व मोऱ्यांचे उच्चाटन महाराजांनी केले त्यात त्यांनी बापाचा सल्ला व अनुमती घेतली असावी असा तर्क होतो.

शहाजींच्या सुटकेनंतर पितापुत्रांची भेट लगेच झाली नाही. बारा वर्षांनी त्यांची भेट मोठ्या संमारंभाने झाली असे अनेक उल्लेख आहेत, त्यांवरून म्हणता येते की सन 1649 मध्ये शिवाजीराजे विजापूरहून बापाची रजा घेऊन गेल्यावर बारा-तेरा वर्षांनी ते भेटले. ही भेट पुष्कळ वर्षांनी होऊन उभयतांचा विचारविनिमय झाला असे ठिकठिकाणी उल्लेख आहेत, ते सर्वथा त्याज्य मानता येत नाहीत. बारा वर्षांनी ही भेट व्हावयाची ती मुद्दाम जेजुरीनजीक पूर्वतयारीने घडून आली. शहाजीराजांचा मुक्काम बारामतीचे मैदानात नीरेवर झाला. उभयपक्षी जासूद हरकारे जाऊन-येऊन आरडगावचे पलिकडे भेटीचा नेम ठरवला. भेटी मोठ्या समारंभाने झाल्या. किल्लोकिल्ल्यांस तोफांची सरबत्ती एकावच्छेदे जाली. विधियुक्त शिवालयी पूजा होऊन उभयता भेटले. नंतर मातुश्रींची भेट जेजुरीत जाली.

प्रमाने बोलणी व भोजने होऊन मनाची निर्मलता जाली. पुण्यास येऊन सिंहगड, राजगड, तोरणा, रेहिडा, रायगड वगैरे किल्ले दाखवीत साताऱ्यात आले. पुत्र सर्व गोष्टींनी निपुण आहे अशी शहाजीराजांची खात्री होऊन परत जाण्यास निरोप घेतला.'[32] यावरून चार-दोन महिने तरी पितापुत्र एकत्र होते आणि त्यांनी परिस्थितीची चांगली वाटाघाट करून उभयतांच्या उद्योगाचे स्वरूप निश्चित केले याबद्दल संशय वाटत नाही.

3) 'मिळाले बारभाई बुडाली चंदरराई' (सन 1656) :

शहाजीराजांच्या सुटकेनंतर मावळ प्रांतावर आपला ताबा मजबूत करण्यात शिवाजीराजांना मोऱ्यांचा पाडाव करावा लागला. जावळी उर्फ जोर खोरे या भागात मोऱ्यांचे वास्तव्य असून त्यावर आदिलशहाचा अंमलही निरपवाद असा कधीच बसला नव्हता. शिवाजीराजे त्या भागात स्वतंत्र बाणा धारण करू लागले. त्याचप्रमाणे हे मोरेसुद्धा आपणास स्वतंत्र सत्ताधारी समजून आजूबाजूच्या देशमुखांवर आपली बळजबरी चालवत. हे मोऱ्यांचे घराणे मोठे व प्राचीन असून त्यांची जागीर विस्तृत होती. मावळातील पुष्कळ देशमुखांशी त्यांचा आप्तसंबंध होता. चंद्रराव हा या घराण्याचा किताब होय. जावळीचा मालक दौलतराव मोरे सन 1648 च्या सुमारास मरण पावला. त्यास संतान नसल्यामुळे वारसासंबंधाने तंटे उपस्थित होऊन त्यांचा उपयोग महाराजांनी आपल्या कार्याकडे करून घेतला. दौलतरावाचे बायकोने शिवथरकर मोऱ्यांपैकी एक मुलगा दत्तक घेऊन महाराजांच्या साह्याने जावळीचा कारभार चालवला. या पुत्राचे नाव यशवंतराव असून व्यवहार सर्व हणमंतराव मोरे पाहत असे. सन 1649मध्ये अफझलखानाची नेमणूक वाईस झाली तेव्हा त्याने प्रथम जावळी प्रांत संपूर्णपणे कब्जात आणण्याची खटपट चालवली. ही खटपट अर्थातच महाराजांच्या योजनेस अनुकूल नव्हती. यशवंतराव व हणमंतराव यांनी महाराजांशी विरोध करून अफझलखानाशी मिलाफ केला. सिलीमकर देशमुख हैबतराव हा मोऱ्यांचा मातुल असून त्यास महाराजांनी आपल्याकडे वळवून घेतले. "जावळीस गलबल झाली त्यामध्ये हैबतरावाने आपले जमेतीनिशी शिवाजीराजांचे साह्यास येऊन एकतारी केली, त्यावरून हैबतराव व त्याचा पुत्र बाजी सिलीमकर व दुसरा एक सिलीमकर बाळाजी नाईक यांजवर शहाजींची मेहेरबानी झाली," (सन 1650).[33] या कारणास्तव सिलीमकरांचे व मोऱ्यांचे वाकडे आले आणि महाराजांच्या उपक्रमाने त्यात भर पडत गेली. सिलीमकरावर ज्याप्रमाणे मोरे आपला अंमल सांगू लागले त्याचप्रमाणे कान्होजी जेधे वगैरे देशमुखांवरही आपली सत्ता ते गाजवू लागले. म्हणजे मावळातील ज्या देशमुखांवर महाराजांनी आपला ताबा बसवत आणला होता, त्यांना फोडून आपल्या बाजूला

वळविण्याचा मोऱ्यांचा प्रयत्न निकराने सुरु झाला, त्यामुळे या मोऱ्यांचा कायम पाडाव केला नाही तर आपला उद्योग साफ फसणार अशी धास्ती महाराजांना उत्पन्न झाली.

शिवाजीमहाराजांच्या उद्योगास आळा घालण्याचे सामर्थ्य आता विजापूर दरबारात बिलकुल उरले नव्हते. महंमद आदिलशहा आसन्नस्थितीस पोहोचून दरबारात धरबंद उरला नव्हता. वजीर खानमहंमद तडफदार नसून अफझलखानासारखे उपद्व्यापी गृहस्थ 'पुढे काय घोटाळे होतात' ते आतुरतेने पाहत टपून बसले होते. अशा स्थितीत शहाजी व शिवाजी यांना दुखावून नवीन अडचण उत्पन्न करण्याचे धाडस विजापूर दरबारात त्या वेळी कोणी केले नाही. उलट शहाजीला 'महाराज' व 'फर्जंद' अशा विशेषणांनी गोंजारून खूश ठेवण्याचीच जरूर त्यांना भासली. मात्र या वेळी शिवाजीराजांचे आक्रमण मोऱ्यांना अतिशय दु:सह झाले. रायगडचा मजबूद किल्ला त्यांचे ताब्यात असून तो महाराजांना राजधानी करण्यासाठी सोयीचा वाटला. परंतु मोऱ्यांचे समूळ उच्चाटन झाल्याशिवाय तो किल्ला महाराजांना मिळण्याजोगा नव्हता. यास्तव वडिलांच्या विचाराने मोऱ्यांना जिंकण्याचे ठरवून शिवाजीराजांनी कित्येक देशमुखांची फौज आपल्या मदतीला आणली. हैबतराव सिलीमकरास महाराज लिहितात,[34] "कित्येक बड्या लोकांनी तुम्हाला शक घातला आहे की, तुमची देशमुखी आम्ही घेऊ तर तुम्हास आम्ही घरच्या लेकराप्रमाणे जाणतो. तुमच्याशी आम्ही वाईट गोष्टी करू तर आम्हास महादेवाची व आईसाहेबांची आण असे, तर आमचे इमानावर मान ठेऊन भेटीस यावे." शिवाजीराजांनी सिलीमकर, बांदल व कान्होजी जेधे यांचे जमाव एकत्र करून त्यांच्यासह संभाजी कावजी या आपल्या शूर सरदाराला जावळीवर रवाना केले, (सन 1655 अखेर). या संधीस अफझलखान मावळच्या भागात नव्हता. मोऱ्यांनी हा पहिला हल्ला मारून काढला तेव्हा महाराजांनी मागाहून रघुनाथ बल्लाळ कोरडे याचेबरोबर आणखी फौज जावळीवर रवाना केली. त्या वेळी युद्ध होऊन हणमंतराव मोरे मारला गेला आणि प्रतापराव मोरे विजापुरास पळून गेला. त्यामुळे जावळीचे ठिकाण महाराजांच्या हस्तगत झाले. हा प्रकार ता.27.1.1656 रोजी[35] घडला. लगेच महाराजांनी स्वत: जावळीस जाऊन तेथील मुलखाची व्यवस्था करीत दोन महिने राहिले. लढाई झाल्यावर जावळीकर यशवंतराव मोरे रायगडावर जाऊन बंदोबस्ताने राहिले. त्यास हस्तगत केल्याशिवाय महाराजांचे कार्य तडीस जाणार नव्हते, म्हणून त्यांनी लगेच आपली फौज रायरीवर रवाना केली. तीन महिने पावेतो किल्ला मोऱ्याने लढवला. पुढे त्याचा नाइलाज होऊन बाळाजी नाईक सिलीमकर हैबतराव याचेमार्फत त्याने शिवाजीशी तहाचे बोलणे लावले. सिलीमकराने मध्यस्थी करून यशवंतराव व त्याचे दोन पुत्र कृष्णाजी व बाजी यांना गडाखाली महाराजांच्या भेटीस आणले. महाराजांनी यशवंतरावास मुख्य गुन्हेगार म्हणून ठार मारले. त्याच्या पुत्रास पुण्यास नेऊन कैदेत ठेवले आणि त्याच्या बायकामुलांची व्यवस्था लावून रायगड किल्ला ताब्यात घेतला. (मे 1656).

पुढे बाजी व कृष्णाजी मोरे यांनी कैदेत असताना विजापुराकडे फितूर चालविल्याचे कळल्यावरून त्यांचाही महाराजांनी शिरच्छेद केला. एवंच वरप्रमाणे सर्व मोऱ्यांचा नि:पात होऊन एक प्रतापराव मात्र शिल्लक राहिला. त्यानेही पुढे कैक वर्षे महाराजांशी वैर चालवले. जयसिंह चालून आला तेव्हा त्याला प्रतापराव मोरे सामील झाला.[36] मोऱ्यांची स्वत:ची पागा मोठी होती. जावळी ठिकाण समृद्ध आणि प्रदेश उत्पन्नाचा असल्यामुळे मोऱ्यांच्या पाडावाने महाराजांचा मोठा फायदा झाला. त्या प्रांतात शूर लोक पुष्कळ होते ते महाराजांच्या लष्करात दाखल झाले, त्या योगे महाराजांची फौज एकदम दुप्पट वाढली आणि झपाट्याने राज्यविस्तार करण्याचे सामर्थ्य त्यांना प्राप्त झाले. समस्त मावळ प्रांतावर महाराजांची सत्ता कायम होऊन आजूबाजूचे लहान-मोठे सरदार त्यांचेशी नमून वागू लागले. या प्रकरणासंबंधाने जावळी प्रांतात, 'मिळाले बारभाई व बुडाली चंदरराई' ही म्हण प्रचारात आहे.

इतिहाससंग्रहात मोऱ्यांची बखर छापलेली आहे त्यात या प्रकरणासंबंधाने काही उपयुक्त मजकूर आहे, त्यावरून प्रकरण कसे विकोपाच गेले त्याची समजूत पटते. मात्र त्यात नावांच्या संबंधाने बरीच तफावत आढळते. "कृष्णाजी बाजी मोरे हा पराक्रमी पुरुष जावळीस होता, त्याला महाराजांनी सांगून पाठवले की, "तुम्ही मुस्तफद[37] राजे म्हणविता! राजे आम्ही!! आम्हा श्रीशंभूने राज्य दिधले आहे, तर तुम्ही राजे न म्हणावे. आमचे नौकर होऊन आपला मुलुख खाऊन, हमराहा चाकरी करावी. नाहीतर बदफैल करून फंद कराल, तर जावळी मारून तुम्हास कैद करून ठेवूं." ऐशी पक्की इशारत लिहिली. त्याजवरून राजराजे मोरे कृष्णाजी बाजीही शिवाजीराजे यांना लिहून पाठवितो की, 'तुम्ही काल राजे जाहला. तुम्हास राज्य कोणे दिधले? मुस्तफद राजा आपले घरी म्हटलियावर कोण मानितो? येता जावळी, जाता गोवली. पुढे एक मनुष्य जिवंत जाणार नाही. तुम्हामध्ये पुरुषार्थ असला, तर उदईक याल तर आजच यावे. आम्ही कोकणचे राजे असून, आमचा राजा श्रीमहाबळेश्वर, त्याचे कृपेने राज्य करितो. आम्हा श्रींचे कृपेने पादशहाने राजे किताब, मोरचेल, सिंहासन मेहेरबान होऊन दिधले. आम्ही दाईमदारी दरपिढी राज्य जावळीचे करितो. तुम्ही आम्हासी खटखट कराल, तर स्पष्ट समजून करणे. आणखी वरकड मुलुख तुम्हास आहे, येथे उपाय कराल तर अपाय होईल. यश न घेता अपयशास पात्र होऊन जाल.' असे कृष्णाजी राजे मोरे याने शिवाजी महाराजांना लिहून पाठवले. त्यांची पत्रे शिवाजी महाराजांनी ऐकून परम संतप्त झाले. आणखी प्रतिउत्तर पाठविले जे, 'जावळी खाली करून, राजे न म्हणोन, मोरचेल दूर करून, हात रुमाले बांधून, भेटीस येऊन, हुजूरची काही चाकरी करणे, इतकियावर बदफैली केलिया मारले जाल.' ऐसे पत्र ऐकून चंद्रराव मोरे यांना परम राग आला. मग करडा जबाब शिवाजीराजे यांना लिहिला की, 'दारूगोळी महझूद आहे. काही बेजबाबास खुते घालून लिहिले, ते कासियास ल्याहाविले?

थोर समर्थ असो.' याउपर चंद्ररावाचा व शिवाजीमहाराजांचा थोर आकस पडला. मग शिवाजी महाराजांचे सुरराव काकडे दोन हजार हासम (हाशम) जावळीवर रवाना केले. महाबळेश्वराचा निसरणीचा घाट दरियाचा उतरून जावळीस वेढा घातला. जावळी अवघड वाट, कळकीच्या दाट जाळ्या, तेथे महिनाभर झुंज झाली. महिन्या एका कृष्णाजी बाजी मोरे राजे जावळी सोडून, आपले हासम सुद्धा रायगडास गेले. रायगड बळकावून राहिले. तेथे शिवाजीमहाराज चढाई करून गेले. रायगड तीन महिने चंद्ररावांनी भांडवला. मग सल्ला जाहला. जावळीत महाराजांचे ठाणे बैसले. रायगडही महाराजांना सर झाला. कृष्णाजी राजे मोरे यांचा शिवाजी राजियांनी बहुत मान केला. घोडा व सिरपाव दिधला. कृष्णाजी चंद्ररायांही रुमाल न घेतला. शिवाजीराजांही चंद्रराजांचा मोरचेल दूर करवला. शिवाजीराजांचे मानस होते की यांस आपला नोकर म्हणून स्थापावे, जेव्हा हुजूर बोलावू तेव्हा येतील ऐसे करून, यांची जावळी त्यांना द्यावी. पुढे कृष्णाजी राजाने मुधोळकर व्यंकोजीराजे घोरपडे यांजकडे संधान लावून आपण पळून जाऊन शिवाजीराजांचा पाडाव करण्याची खटपट चालवली. या फितुराचे कागद शिवाजीराजांच्या हाती पडले. त्याचे कागदपत्र मुद्देदस्त केले, तेव्हा रुजुवात करून मोरे बेइमान असे समजून चाकण येथे त्यांची गर्दन मारली. बायका व लेकी सोडून दिल्या. जावळी बहुता दिवसांची जागा, पुंडपणा करून मोरे यांनी अमोल्य वस्तू जातिमात्र संग्रह केला होता, तो सर्व हरण केला.' जावळीचे मुलखातील वासोटा किल्लाही शिवाजीराजांना मिळाला.

राज्यस्थापनेचा उद्योग एकदा हाती घेतला म्हणजे व्यवहारात पुष्कळदा न्यायान्याय बाजूस ठेवावा लागतो. तसाच प्रकार मोऱ्यांसंबंधाने शिवाजीरांजांना करावा लागला. पाच-सात वर्षे प्रकरण सारखे धुमसत होते. शिवाजीराजांनी मोऱ्यांची व्यवस्था लावून दिली, ती त्यांनी मानली नाही. त्यांचा ओढा आदिलशहाकडे असल्यामुळे आपल्या नूतन उद्योगास शेजारी घरभेदी शत्रू असू नये यास्तव त्यांचा पाडाव करणे महाराजांना अपरिहार्य होऊन बसले. त्यात अन्याय घडले, तथापि त्यामुळे शिवाजीराजांचा शह मावळ प्रांतावर कायम होऊन त्यांचे द्रव्यबळ व मनुष्यबळ वाढून स्वतंत्र राज्य निर्माण झाले. मोऱ्यांचा पाडाव झाल्यावर शिवाजीमहाराज आपण 'राजे' असे समजून पुणे प्रांतातील न्यायनिवाडे राजरोस करू लागले. लोक त्यांच्याकडे फिर्यादी आणू लागले. निवाड्यांवर 'परवानगी हुजूर, पंताजी गोपीनाथ चिटणीस' अशी अक्षरे आहेत. शामराज नीलकंठ पेशवे, वासुदेव बाळकृष्ण मुजुमदार, सोनाजी विश्वनाथ डबीर, बाळकृष्णपंत व नारोपंत हणमंते दीक्षित, महादाजी सामराज सुरनीस (सचिव), माणकोजी दहातोंडे - स्वारांचे सरनोबत, रघुनाथ बल्लाळ - स्वारांचे सबनीस, नूरबेग - सरनोबत पायदळ, सामराज पद्मनाभी - सबनीस पायदळ, अशा अधिकाऱ्यांच्या सह्या तत्कालीन महजरांवर आहेत.[38] यावरून 1653-56 पावेतो शिवाजीराजांच्या स्वतंत्र राज्यस्थापनेची सिद्धी पूर्ण झाली असे म्हणता येते.

जावळीनजीक शिवाजीराजांनी कृष्णेच्या उगमाजवळ पारघाटाचे नाके ताब्यात ठेवण्यासाठी व ह्या नवीन मुलुखाच्या बंदोबस्तासाठी एका उंच डोंगरावर मजबूद किल्ला बांधला. ते काम त्यांनी मोरो त्रिंबक पिंगळे यास सांगितले. ह्या नवीन किल्ल्याचे नाव 'प्रतापगड' असे ठेवण्यात आले. मोरो त्रिंबक ह्यास पुरंदर किल्ल्याच्या व्यवस्थेसाठी महाराजांनी ठेवले होते. त्याचा बाप शहाजीराजांपाशी कर्नाटकात होता. सन 1653च्या सुमारास मोरेपंत कर्नाटक सोडून शिवाजीराजांना येऊन मिळाला. मोरोपंताने वर सांगितलेला किल्ला बांधण्याचे काम फारच उत्तम रितीने तडीस नेऊन (1656 मध्ये) महाराजांची मर्जी संपादली. इतउत्तर मोरोपंत पिंगळे हा महाराजांचा केवळ उजवा हात बनला. तुळजापुरास देवीचे दर्शन घ्यावयास जाणे लांब पडते, सबब तुळजापूरच्या देवीचीच एक प्रतिमा एका चतुर कारागिराकडून करवून सुमुर्हूर्ताने तिची स्थापना महाराजांनी प्रतापगडावर केली. ह्या देवीवर महाराजांची विशेष निष्ठा होती.

हिरडसचा देशमुख फार शिरजोर होता, जावळी घेतल्यावर त्याचेवर थोड्याच दिवसांनी महाराजांनी एकाएकी रात्री हल्ला केला. देशमुखांचा रोहिडा नावाचा मजबूत किल्ला होता. तो त्याने मोठ्या शौर्याने पुष्कळवेळ लढवला, परंतु लढाईत देशमुख मारला जाऊन, किल्ला शिवाजीराजांना हस्तगत झाला. देशमुखाचा दिवाण बाजीप्रभू ह्यांचे शौर्य पाहून शिवाजीने त्यांना मोठ्या आदराने आपले पदरी घेतले आणि त्यांचे पूर्वीचे उत्पन्न त्यांचेकडे चालू ठेवले. बाजी प्रभूनेही महाराजांची नोकरी अखेरपर्यंत मोठ्या इमानाने केली.

सन 1644-53 पावेतो मावळात शिवाजीराजांचे स्वतंत्र राज्य कसे निर्माण झाले ते वर सांगितले आहे. या कामी मोऱ्यांनी महाराजांना विरोध केला म्हणून सन 1656 मध्ये त्यांनी मोऱ्याचा नि:पात करून जावळी प्रांत कब्जात आणला. या कृत्यामुळे विजापूर दरबारात मोठी धास्ती उत्पन्न झाली, ते प्रकरण नीट लक्षात येण्यासाठी आपणास प्रथम मोगलांच्या हालचालींकडे नजर दिली पाहिजे.

प्रकरण 3 - औरंगजेबास पहिली सलामी

(1657-58)

1.औरंगजेबाचा दक्षिणेतील कारभार; 2.उत्तरकोंकण, कल्याणप्रांत; 3.लोकसंग्रह, सहकारी व किल्ले काबीज; 4.शिवाजीराजांचा औरंगजेबाशी पत्रव्यवहार; 5.मोगल अधिकारी, शायिस्ताखान.

1) औरंगजेबाचा दक्षिणेतील कारभार :-

सन 1649 पासून पुढील पाच-सहा वर्षांत शिवाजीराजे व शहाजीराजे यांनी कोणतीही ठळक धामधूम न करता शांत वृत्तीने आपला पाया मजबूत केला. मात्र प्रत्येक बाबतीसंबंधाने पितापुत्रांचे वर्तन एकमेकांच्या पूर्ण संगनमताने चालले यात संशय नाही. उताविळपणा करून निष्कारण शत्रूंचा विरोध अंगावर ओढून घेऊ नये असा या अवधीत उभयतांचाही संकल्प झालेला दिसतो. त्यास कारणेही तशीच होती. शहाजीराजांशी प्रथमपासूनच ज्याचा उघड द्वेष होता, तो अफझलखान मावळ प्रांतावर नेमून आला. शहाजीराजांची सुटका सन 1649 च्या ज्येष्ठ पौर्णिमेस झाली आणि लगेच पुढील अधिक आषाढात अफझलखान वाई प्रांतात हजर होऊन कारभार करू लागला. म्हणजे शिवाजीराजांच्या छातीवर हे एक कायमचे दडपण येऊन बसले. त्यामुळे विजापूर दरबारास न रुचणाऱ्या गोष्टी शिवाजीराजांना बंद ठेवाव्या लागल्या. आपल्या कृत्यांचा उपसर्ग वडिलांस पोहोचू नये असेच वर्तन ठेवणे त्यास भाग होते. या काळातील दक्षिणेच्या कारभारात शहाजीराजे व शिवाजीराजे दोघांचीही नावे कागदपत्रांतून दृष्टीस पडतात. म्हणजे मालक या नात्याने शहाजीराजांचा अंमल नाहीसा झाला नव्हता. अफझलखानाचा वाई प्रांतावरचा ताबा त्याच्या मृत्युपर्यंत कायमच होता. मध्यंतरी तो प्रसंगानुसार विजापूर-कनकगिरीकडे गेलेला आढळतो, तरी मावळ प्रांतातील कारभारात त्याच्या नावचे कागद अगदीच नाहीत असे नाही. म्हणजे सन 1649 नंतर अफझलखानाचा इकडचा अधिकार

अजिबात सुटला असे झाले नाही. एकंदरीत खानाच्या सान्निध्याने शिवाजीराजांच्या हालचालींवर सक्त दडपण कायमचे येऊन बसले ते काढून टाकल्याशिवाय आपणास स्वतंत्र संचार करणे शक्य नाही अशी त्यांची खात्री झाली.

शिवाजीराजांना दुसरी धास्ती मोगलांची होती. बादशहाच्यातर्फेने इ.स. 1636 ते 1644 पावेतो आठ वर्षे औरंगजेब दक्षिणेच्या कारभारावर होता, पण त्या अवधीत त्याने विशेष असे काही कृत्य केलेले दिसत नाही. सन 1639 मध्ये खेळोजी भोसल्यास बंडखोरीबद्दल पकडून त्याने ठार मारले आणि बागलाण प्रांत हस्तगत केला. त्या वेळी शहाजहानची चलती असून जहाँआरा व दारा शेखो यांच्या तंत्राने राज्याची सूत्रे दरबारातून हालत होती. औरंगजेबाजवळ दिवाण म्हणून मुर्शीद कुलीखान कामावर असून प्रांताचा वसूल वाढविण्याची तो पराकाष्ठा करीत होता. पूर्वीचे सुभेदार बऱ्हाणपुरात रहात असत ते ठिकाण सोडून औरंगजेब दौलताबादेस राहू लागला. त्यास शिकारीचा नाद विशेष असून त्या निमित्ताने त्याने आजूबाजूचा प्रदेश फिरून पाहिला आणि वसूल वाढविण्याचे प्रयत्न केले. मलिकंबराने 'खिडकी' येथे नवीन शहर वसविले होते त्याची सुधारणा करून त्यास औरंगजेबाने 'औरंगाबाद' हे आपले नाव दिले ते अद्यापही चालू आहे. सन 1640 साली पश्चिम किनाऱ्यावरील सिद्दिचा किल्ला जंजिरा कब्जात घेण्यासाठी तो स्वत: त्या बाजूस गेला होता.[39] सन 1644 मध्ये काही अवज्ञा केल्यावरून बापाने त्यास दक्षिणेतून बदलून आपल्याजवळ बोलावून घेतले. त्याची वडिलबहिण जहाँआरा दिव्याने भाजून आजारी झाली. तिला भेटण्याकरता म्हणून तो ता.2.5.1644 रोजी आग्ऱ्यास गेला. तेथे त्याचे व बापाचे पटले नाही तेव्हा बापाने दक्षिणेच्या सुभ्यावरून त्याची गुजरात प्रांतावर बदली केली. तेथे सन 1645 ते 1647 पावेतो दोन वर्षे कारभार केल्यावर त्याची नेमणूक अफगाणिस्तानावर झाली. तेथून परत येताच सन 1648 पासून चार वर्षे तो मुलतानच्या सुभ्यावर होता. त्यानंतर पुन्हा त्याची नेमणूक दक्षिणेच्या सुभ्यावर झाल्यावरून सन 1653 च्या जानेवारीत तो बऱ्हाणपुरास व पुढे दौलताबादेस आला. सन 1644मध्ये औरंगजेब परत गेल्यावर दक्षिणेत मोगलांचे सुभेदार झाले त्यांची नावे व काळ लक्षात ठेवणे जरूर आहे :-

1-मे 1644 ते जून 1645 - खान डौरान.
2-जून-जुलै 1645 - मिर्झाराजा जयसिंह
3-जुलै 1645 ते नोव्हेंबर 1647 - इख्लासखान
4-डिसेंबर 1647 ते जून 1648 - शहानवाजखान
5-जुलै 1648 ते सप्टेंबर 1649 - शहाजादा मुरादबक्ष
6-सप्टेंबर 1649 ते 1652 अखेर - शायिस्ताखान
7-जानेवारी 1653 ते ता.5.2.1658 - औरंगजेब

वरील नावनिशीवरून उघड होते की, शहाजीराजे-शिवाजीराजांसंबंधाने दक्षिणेत मोगली अंमलदाराचे एकच विशिष्ट धोरण असे ठरलेले नसून त्याजवर लक्ष ठेवण्यासारखे कारणही घडले नव्हते. मोगलांची पहिली आगळीक शिवाजीराजांनी सन 1657 च्या उन्हाळ्यात जुन्नर व अहमदनगर या शहरांवर छापा घालून केली (तो प्रकार पुढे येईल). शिवाजीराजांनी ह्या वेळपर्यंत मोगल सरकारास कोणत्याही तऱ्हेने दुखविले नव्हते. उलट शहाजीराजांच्या सुटकेच्या निमित्ताने त्याने मोगल सुभेदार मुरादबक्ष याचेबरोबर पत्रव्यवहार केला तो शहाजीराजांच्या भागात दिला[40] आहे. त्यात मुरादबक्षाने सुचविल्याप्रमाणे शिवाजीराजांनी रघुनाथपंत कोरडे यास आपला वकिल म्हणून दिल्लीस पाठवले. तेथे शहाजहान बादशहाने विजापूरचे राज्य जिंकण्यास शिवाजीराजांचा उपयोग चांगला होईल असे मनात आणून त्यास पाच हजारी मनसबीचे अभिवचन दिले. याप्रसंगी शिवाजीराजांनी दक्षिणेतील काही प्रदेशांवर चौथाई व सरदेशमुखी हे हक्क वसूल करण्याची परवानगी वकिलामार्फत बादशहाकडे मागितली. परंतु तुम्ही स्वत: येऊन भेटल्याशिवाय याचा निकाल करता येत नाही असा बादशहाचा जबाब घेऊन वकील परत आला.

2) उत्तर कोकण, कल्याण प्रांत व किल्ले काबीज :

दि. 24.10.1657. कोणताही उपक्रम हाती घेण्यापूर्वी तत्संबंधीची सर्व गुप्त बातमी आगाऊ काढून प्रदेश व माणसे स्वत: तपासून पाहण्याचे काम शिवाजीराजे अवश्य करीत. त्यांनी इकडे मोऱ्यांचा पाडाव केला, त्यानंतर लवकरच महंमद आदिलशहा मृत्यु पावला आणि नवीन कारभाराची घडी बसण्यापूर्वीच औरंगजेबाने विजापुरावर चढाई केली, त्या गडबडीचा फायदा शिवाजीराजांनी करून घेतला. या वेळी एक नवीन डाव पुढे टाकून त्याचा परिणाम इकडे विजापुरावर व तिकडे औरंगजेबावर काय होतो ते त्यांनी अजमावून पाहिले. हा डाव म्हणजे उत्तर कोकणातील मोहीम होय.

निजामशाही बुडाल्यावर उत्तर कोकणचा कल्याण प्रांत म्हणजे भिवंडीपासून नागोठण्यापर्यंतचा प्रदेश विजापूरचे वाटणीस आला, तो आदिलशहाने मुल्ला अहमद नटिया यास जागीर म्हणून दिला, त्याचवेळी घाटावरचे दोन महाल पुणे व सुपे येथील त्यांनी शहाजीराजांस दिले. मुल्ला आदिलशहाचा आजार वाढला, त्या वेळी बंदोबस्तासाठी त्याने मुल्ला अहमद यास कल्याणहून खजिना घेऊन विजापुरास बोलावून घेतले. त्यामुळे कोकणचा बंदोबस्त ढिला पडला, ही संधी शिवाजीराजांनी साधली.[41]

प्रथम त्याने स्वत: गुप्त रूपाने हिंडून सर्व प्रांत तपासला आणि कल्याणहून काही खजिना विजापुराकडे रवाना झाला होता त्याची पाळत राखून एकदम त्यावर छापा घालून

तो खजिना काबीज करून त्याने राजगडास नेला. नंतर लगोलग शामराज नीळकंठ रांजेकर याचा चुलत बंधू दादाजी बापूजी यास स्वार व पायदळ देऊन कल्याणावर आणि सखो कृष्ण लोहकरे यास मावळे लोकांची टोळी देऊन भिवंडीवर रवाना केले.[42] त्या दोघांनी आश्विन वद्य 12 (24.10.1657) रोजी ती दोन स्थळे ताबडतोब काबीज केली. नंतर शिवाजीराजांनी काही जहाजांचाही संचार कल्याणच्या खाड्यांतून चालू केला. कल्याण प्रांतात पुष्कळ किल्ले होते. ते अल्पायासे एकामागून एक महाराजांनी हस्तगत केले. कल्याणजवळ बंदरी कोट बांधला तेथे पुष्कळ द्रव्य व मत्ता मिळाली. ता. 8.1.1658 रोजी माहुली किल्ला घेतला. चौल, प्रधानगड, तळे-घोसाळा इ. हस्तगत झाले. घाटावरचे किल्ले कांगोरी, तिकोना, लोहगड, राजमाची हे सुद्धा सहज ताब्यात आले. अशा रीतीने सर्व कल्याण प्रांत ताब्यात घेऊन त्यावर आबाजी सोनदेव[43] यास शिवाजीराजांनी सुभेदार नेमले आणि घाटावरील बारा मावळांवर कृष्णाजी भास्कर[44] नावाचा आणखी एक आपला स्वतंत्र अधिकारी नेमला. मुसलमानी अधिकाऱ्याची सून पकडून आबाजीने शिवाजीराजांकडे पाठविल्याची आख्यायिका खरी असेल तर ती या वेळची असावी. चौलवर पोर्तुगिझांचा अंमल होता, त्यास शिवाजीराजांचा उपद्रव लागताच त्यांनी त्याजबद्दलची कागाळी आपल्या सरकाराकडे केली. (ता.5.5.1658).[45]

वर प्रधानगड किल्ला शिवाजीराजांना हस्तगत झाल्याचे लिहिले आहे. त्या संबंधाने खालील आख्यायिका बखरीत आहे. किल्ल्याचा अधिकारी केशरीसिंग म्हणून होता. त्याने जोहार केला, त्यांतून केशरीसिंगाची मातु:श्री, दोन पुत्र वाचले होते ते घेऊन ती पळून किल्ल्यावर झाडीत लपून राहिली. महाराज वर चढून गेले. झुंज झाली. केशरीसिंग पडला. किल्ला फत्ते झाला. मार्गी चढताना बोरीची काठी पालखीस लागली, तेव्हा महाराज बोलले, ‘काय निमित्त काठी अटकावते खाली खणावे’.. खणल्यावर बावीस घागरी व चार कढया मोहोरा, होन, सोन्याच्या कांबींनी भरलेल्या सापडल्या. नंतर केशरीसिंगाची आई सापडली. तिचे पायांवर डोई ठेवून पालखीत बसवून तिला पुत्रांसह देऊळगावास वतनावर रवाना करून दिली. तत्पूर्वी केशरीसिंग वगैरे रणी पडले होत त्यास अग्नी दिला.[46]

उत्तर कोकण प्रांत कब्जात आल्यावर शिवाजीराजांची दृष्टी दक्षिण कोकणाकडे वळली चिपळुणावरून पुढे थेट राजापूर वेंगुर्ला पावेतोचा प्रदेश रणदुल्लाखानाचा मुलगा रुस्तुमिजमा याजकडे जागीर म्हणून होता. वाडीचा लखम सावंत (1651-1675) त्यास जुमानीना, म्हणून रुस्तुमिजमाने सन 1658 च्या उन्हाळ्यात वाडीवर चाल केली, लढाया होऊन एकमेकांचे पुष्कळ लोक मारले गेले. तेव्हा सावंतास आपल्या बचावाची मोठी धास्ती पडली. शिवाजीराजांनी आता राजरोसपणे स्वतंत्र उद्योग आरंभलेला पाहून त्याचेच तंत्राने वागणे बरे असे सावंताने ठरवले आणि आपला वकील पितांबर शेणवई यास

शिवाजीराजांकडे पाठवले. ता. 5.3.1659 रोजी उभयतांचा तह[47] ठरला तो प्रसिद्ध आहे. या तहाने सावंताने शिवाजीराजांचे मांडलिकत्व पत्करले; शिवाजीराजांनी त्याचे संरक्षण करावे आणि त्याने जरूर पडेल तेव्हा फौजेनिशी महाराजांचे साह्य करावे, असा करार ठरला. यावरून महाराजांचा उद्योग दोन वर्षांत किती वाढला त्याचा अंदाज होईल. सन 1658 मध्ये राजांनी दक्षिणेस कर्नाटक प्रांतापर्यंत मजल मारून सोंधे-बिदनूरकडे नजर टाकली, यावरून शहाजीच्या उद्योगाचाच परिपोष शिवाजीराजे करीत होते. सावंतास आपल्या कब्जात आणणे हे त्या उपक्रमातलेच एक कृत्य होय, याविषयी संशय राहत नाही. बिदनूरवर चाल करण्यास सावंताने मदत करावी असा उल्लेख वरील तहात आहे.

शिवाजीराजांनी देशावरील भानगडीत विशेष लक्ष न ठेवता कोकण प्रांतातच समुद्रकिनाऱ्याने दक्षिणेकडे आपली सत्ता वाढवीत नेली, हे ध्यानात ठेवणे जरूर आहे. कल्याणवर त्यांनी स्वारी केली तेव्हा जंजिऱ्याचा अंमलदार फत्तेखान सिद्दी म्हणून होता. त्याचे पदरच्या कित्येक सरदारांनी शिवाजीराजांचा घाटावर चालू झालेला उद्योग ऐकून त्यास असे सांगून पाठवले की, ‘आपली स्वारी कोकणात यावी, म्हणजे तळे व घोसाळा हे किल्ले आम्ही आपल्यास घेऊन देतो.’ त्यावरून शिवाजीराजांनी जाऊन ते दोन्ही किल्ले घेतले, आणि त्या प्रांतात आपला अंमल बसवून बिरवाडीस किल्ला बांधला. नंतर हरिहरेश्वराचे दर्शन घेऊन, पुढे जात असताना गोवेकर (रायगड जिल्ह्यातल्या ‘गोवे’ गावातले गोवेकर) सावंत भेटले. त्यांना नावाजून आपले चाकरीस ठेवले. त्यांजपाशी एक युरोपात बनलेली नामांकित तलवार होती, ती, तीनशे होन व पोशाख देऊन महाराजांनी त्यांचेकडून घेतली. तिचे नाव भवानी ठेवले. ती हाती आल्यावर ते बहुत यशस्वी झाले, म्हणून तिची पूजा नित्य नेमे करीत. अद्यापि ही तलवार साताऱ्यास देवीचे देवळात पूजेत आहे.[48] रायरीचा डोंगरसुद्धा प्रथम सिद्दिकडून याच संधीत महाराजांनी काबीज केला असे कित्येक लेखक सांगतात.

उत्तरेस कल्याण तसेच दक्षिणेस राजापूर हे त्या वेळी व्यापाराचे धनाढ्य स्थळ असून त्यावर महाराजांनी आपली भिस्त ठेवली. त्या ठिकाणी इंग्रजांनी आपली वखार प्रथम सन 1648 मध्ये घातली. त्याच सुमारास महाराज दक्षिणकोकण फिरून आले आणि हलकेहलके सुवर्णदुर्ग, रत्नागिरी, खारेपाटण, विजयदुर्ग ही स्थळे त्याने कब्जात आणली. शके 1575 (सन 1653), विजयनाम संवत्सरे या साली विजयदुर्गचा किल्ला महाराजांनी नवीन बांधला. संवत्सराच्या नावावरून विजयदुर्ग नाव ठेवले. आतील इमले वगैरे कामास अडीच लाख रुपये खर्च आला. शिवाजीराजांच्या या पूर्व हालचाली कोकणच्या उद्योगात लक्षात ठेवणे जरूर आहे.

वरील हकिकतीवरून शिवाजीराजांच्या उद्योगाचे परिणाम कसकसे झाले, हे कळून येईल. नकाशावर वसईवरून इंदापूरपर्यंत एक रेघ काढून, इंदापूरवरून कोकणात

राजापूरपर्यंत दुसरी रेघ काढावी. म्हणजे राजापुरपासून वसईपर्यंतचा किनारा ही पायाची रेषा धरून इंदापूरच्या शिरोबिंदूवर जो त्रिकोण होईल, एवढा टापू स्थूलमानाने शिवाजीराजांनी ह्या तीन-चार वर्षांच्या उद्योगात आपल्या कब्जात आणला.' त्यांनी वसई व चौलकडील पोर्तुगीझ प्रदेश काबीज करून भिवंडी, कल्याण, पनवेल या बंदरात लढाऊ गलबते बांधली. चौलपासून बांद्यापर्यंत सर्व मुलुख त्यांच्या ताब्यात आहे. त्यातील शहरे व समुद्रकाठची बंदरे त्यांनी काबीज करून संपत्ती पैदा केली आहे.' असे त्यावेळचे लेख आढळतात.[49]

3) लोकसंग्रह आणि सहकारी :

समान संकटामुळे निरनिराळ्या पक्षांतील भेदभाव नाहीसे होतात आणि ते संकट परिहार करण्याचा पुढाकार घेऊन जो उद्योग करू लागतो त्यास ते कसे साह्य करतात, हा प्रकार शिवाजीच्या ह्या उपक्रमात चांगला व्यक्त होतो. त्यामुळेच शिवाजीराजांना लवकर यश येत गेले. शिवाजीराजांची जरब जिकडे तिकडे बसत चालली. द्रव्यसंचय झाल्यामुळे फौजफाटा वाढला. 'द्रव्येकरून लोक राजी राहतात, किल्लेकाव्याने मुलुख जेरदस्तीत येतो, मुलुख मिळाल्यावर राज्य साध्य होते. मोगलाई राज्यात बिकट जागा म्हणजे सह्याद्रीची ओळ. त्या मुलुखातील लोक माहितगार, पावसात डोंगरावर चढणे, झाडीत शिरणे, हे काम मावळे व कोकणे यांवाचून घडणे नाही; हेच आधी ठेवावे. त्यात सरदार येसाजी कंक, तानाजी मालुसरे, पासलकर, देशपांडे वगैरे यांस सरदारी व किताबा देऊन नावनिशीवार शिपाई ठेवते झाले. नामांकित मनुष्य, शिपाई असेल तेथून आणावा, किल्ल्यांची राजकारणे करून किल्ले घेण्यास आपणच जावे, भेदांनी व माहितगार यांचे युक्तींनी ते घ्यावे. घरे शाकारण्याचे गवत घेऊन लोक किल्ल्यावर जात असताना आपण व आपले लोकांनी डोईवर भारे घेऊन आत तलवारी घालून आपणही आत जावे, वर किल्ला घ्यावा. किल्लेकोट घेतले त्यावर विश्वासू आणि मर्द असे हवालदार, सरनोबत, घाडगे, निंबाळकर, गुजर, पारकर, जगताप, शिर्के, मोहिते वगैरे सरदार व स्वार ठेविले.' 'याप्रमाणे दिवसेंदिवस राज्याची वृद्धी होत चालली. मोठमोठी मातबर मनुष्ये जमा झाली. संपूर्ण स्थळोस्थळीची राज्यकारणे यावी, आणावी. महाराज आर्तवंत, मनुष्यांचे भुकेले, सर्वांचा संग्रह करू लागले. स्वराज्याचा बंदोबस्त, चंचुप्रवेश शत्रूचा नाश होय. हजारो माणूस जागजागी ठेवले. त्यांस सदर परवानगी की, आपणास राजी राहून आज्ञेप्रमाणे वागतील त्याचे संगोपन करावे, उन्मादेकरून हेळणा करितील त्यांचा नाश जसा कळेल त्या रीतीने करणे. आला दिवस संपादून, यवनी परराज्यात स्पर्धार्थी; त्यांचे गावी अगर शहरी हरएक जागा मातबर गृहस्थ अगर सावकार चांगला पाहून धरून आणावा, त्याजपासून द्रव्य घेऊन

सोडून द्यावे. यवनांचा उत्कर्ष, यास्तव त्यांची मोठमोठी शहरे, तेथे द्रव्य बहुत आहे, त्याची पाळद राखून आणावे. द्रव्यवान ते जेरदस्तीत आणून त्यांजपासून खंड अगर कर्ज म्हणून घ्यावे.' अशाप्रकारे शिवाजीराजाांनी कार्योपक्रम चालवला. प्रथम नेमणूका केल्या होत्या त्यात आता जरूरीप्रमाणे आणखी फेरफार केले, ते लक्षात ठेवणे जरूर आहे. आबाजी सोनदेव कल्याणच्या सुभ्यावर होताच; त्याचा भाऊ निळो सोनदेव यास मुजुमदार केले. अण्णाजी दत्तोस सुरनिशी दिली. गंगू मंगाजीस वाकनिशी सांगितली. माणकोजी दहातोंडे याजकडे सरनोबती होती, तो वारला, म्हणून नेताजी पालकर यास सरनोबती दिली आणि फौज पुष्कळ वाढवली. राघो बल्लाळ कोरडे याजकडे फौजेची सबनिशी होतीच. येसाजी कंक यास पायदळाची सरनोबती दिली. बाळाजी आवजीस चिटणिशी सांगून, त्याचा भाऊ चिमणाजी यास फडनिशी दप्तरचे काम व तिसरा भाऊ श्यामजी यास रायगडची कारखाननिशी दिली. श्यामराज नीळकंठ रांझेकर याजला अपसव्य (फारशी) लिहिण्याचा अभ्यास येत होता, त्याजला जवळ ठेवून घेऊन; हत्ती, उंट, तोफखाना वगैरे सरंजामाचे काम सांगितले. याच श्यामराजपंताला शिवाजीराजांनी आपला पेशवा केले.

बाळाजी आवजी चिटणीस याचे नाव वर आले आहे. त्याचा बाप आवजी हरि चित्रे मुजुमदार हा एक प्रभू गृहस्थ जंजिऱ्याचे सिद्दीजवळ दिवाण होता. त्याजवर सिद्दी सरकारची इतराजी होऊन त्याला व त्याचे भावाला हबश्याने ठार मारले; आणि आवजीचे बायकामुलांस मस्कत येथे नेऊन गुलाम म्हणून विकण्याचा हुकूम केला. आवजीची बायको गुलबाई ही धूर्त होती. तिने खलाश्यांचे मन वळवले, तेव्हा मस्कत येथे न नेता त्यांनी तिला राजापूर येथे आणून सोडले. राजापूर येथे गुलबाईचा भाऊ विसाजी शंकर हा इभ्रतदार व्यापारी होता. त्याने ही आपली बहीण आहे अशी ओळख न देता खलाश्यांपासून त्या मंडळींस विकत घेतले. बाळाजी हा गुलबाईचा वडिलमुलगा होय. चिमणाजी व श्यामजी असे त्यास आणखी दोन भाऊ होते. विसाजीने या तिघा मुलांना विद्याभ्यास चांगला करवला. बाळाजी मोठा झाल्यावर हबशी सरकारच्या भीतीमुळे त्यास आपल्या नावाने प्रकट होण्याची धास्ती वाटली. 'शिवाजीराजा नावाचा कोणी पराक्रमी पुरुष यवनांच्या जाचातून हिंदूंची सुटका करण्यास अवतरला आहे' ही खबर बाळाजीस लागताच त्यास आनंद झाला. त्या वेळेस तो राजापुरातील कसबेदाराच्या हाताखाली कारकुनीचे काम करीत असे. संधी साधून आपल्या दैन्यावस्थेचे एक पत्र त्याने शिवाजीराजांस लिहिले. पुढे शिवाजीराजे राजापुरास आले, त्या वेळेस पकडलेल्या इतर मंडळींमध्ये हा बाळाजी त्यांना सापडला. बाळाजीची चौकशी चालली असताना, त्याच्या आईने धावत येऊन शिवाजीराजांचे पायांवर लोटांगण घातले आणि आपली सर्व हकिकत निवेदन केली. त्याचवेळेस शिवाजीराजांनी त्या कुटुंबास आपल्या पदरी ठेवले आणि बाळाजीची हुशारी पाहून त्यास आपल्या चिटणिशीचे काम सांगितले (सन 1658). यापुढे बाळाजी आवजी चिटणीस हा शिवाजीराजांच्या हरएक उद्योगात नेहमी हजर असे.

4) शिवाजीराजांचा औरंगजेबाशी पत्रव्यवहार (सन 1656-1660) :

विजापूरच्या राज्यात शिवाजीराजांचे आक्रमण चालू असताना त्याने मोगलांना दुखविण्याचे साहस सहसा केले नाही. सन 1653 च्या आरंभी औरंगजेब दक्षिणेच्या कारभारावर आल्यापासून हळूहळू त्यांची नजर एकमेकांकडे वळत चालली. सन 1656च्या नोव्हेंबरात महंमद आदिलशहा मरण पावताच 'औरंगजेबाने विजापुरावर स्वारी करण्याची तयारी चालविली आहे' हे वर्तमान कळताच, शिवाजीराजांनी आपला वकील सोनोपंत डबीर यास अहमदनगरचा मोगल अधिकारी मुल्ताफतखान याजकडे पाठवून कळविले की, 'आदिलशाहीचा कोकणातील भाग माझ्याकडे चालविण्याचे आपण वचन देत असल्यास विजापूरच्या युद्धात मोगलांना मदत करण्यास मी तयार आहे.' ह्याचा जबाब ता.3-4-1657 रोजी आला की, 'तुमचे वकील सोनोपंत यांनी आमची खातरजमा केली. तुमचे मनोगताप्रमाणे बंदर दाभोळ व त्याजखालील मुलुख व किल्ले विजापुरकरांकडील तुमचे हाती होते, ते तुम्हास दिल्हे असत. तुमचे वकिलांस परत जाण्याची जलदी होती, सबब निरोप दिल्हा आहे.' पण ही सर्व उडवाउडवीची कारवाई आहे असे पक्के ओळखून महाराजांनी मोगलांस न जुमानता सन 1657 च्या एप्रिलात एकदम रात्री जुन्नर शहरावर छापा घातला. हे ठिकाण मोगलांचे होते. दोरीच्या शिड्यांनी तटावर चढून मराठ्यांनी आतील पहारेकऱ्यांस कापून काढले; आणि अकराहजार होन, दोनशे घोडे, जवाहीर, कापड वगैरे पुष्कळ सामान लुटून नेले. पुढे मराठे स्वारांच्या चपळ टोळ्या मोगली मुलखात हिंडू लागल्या. त्यांनी मोगलांची रसद व लहान गावे लुटली आणि मे महिन्यात प्रत्यक्ष अहमदनगरच्या दरवाज्यापर्यंत प्रलय उडवून दिला. अहमदनगर लुटण्याच्या बेतात मराठे होते, इतक्यात किल्ल्यातील फौजेने अचानक बाहेर चालून येऊन त्यांस हाकून लावले; तरी शहरच्या लोकांस मराठ्यांची इतकी दहशत बसली की तेथील अधिकाऱ्याने लोकांचे सर्व जडजवाहीर किल्ल्यात नेऊन सुरक्षित ठेवले!

औरंगजेबाला ही बातमी पोहोचताच त्याने अहमदनगरला मदत पाठवली. त्याचे अंमलदार मराठ्यांवर चालून जाण्यास दिरंगाई करू लागले, त्यास त्याने ठपके दिले. त्या वेळच्या त्याच्या पत्रात शिवाजीराजांसंबंधाने सूड व त्वेष जळजळीत दिसतो. 'गावे जमीनदोस्त करा, लोकांना कापून काढा, दयामाया कशी ती बिलकूल करू नका, त्यांचे सर्वस्व लुटून आणा, पुणे व चाकण ही शिवाजीची दोन ठिकाणे धुळीस मिळवा, आमचे मुलुखातील पाटील कुळकर्णी, जे कोणी त्यांस सामील असतील, त्यांची डोचकी उडविण्यास कमी करू नका,' अशा प्रकारची पत्रे लिहून त्यांनी आपल्या लोकांस शिवाजीराजांच्या मुलुखावर एकदम चहूकडून पाठवले. शिवाय त्याने सरहद्दीवर भरंवशाचे

शूर सरदार ठेवून आपल्या प्रदेशास फौजेचा गराडा घालून ठेवला. जुन्नरजवळ कर्तलबखान, गडनमुना येथे अब्दुल मुनीम, चांभारगुंडा येथे होशदारखान आणि बीड व धारूर येथे रायसिंह व नासिरीखान अशारीतीने हे सरदार आपल्या रयतेचे संरक्षण करीत समोरून येणाऱ्या मराठ्यांस गिळण्यासाठी टपून बसले. औरंगजेबाने त्यांना ताकीद दिली, 'सरहद्दीवर नुसते बसून राहू नका. संधी दिसताच मराठ्यांच्या मुलुखावर हल्ला करून लगेच आपापल्या जागेवर परत या.' नासिरीखान नेहमीच जरा ढिला असे. बादशहाने वारंवार ठपका दिल्यामुळे संतापून त्याने ता.4.6.1657 रोजी चांभारगोंद्याजवळ शिवाजीराजांवर चाल करून त्यांचा पराभव केला आणि पुष्कळ लूट मिळवली. लगेच महाराजांचा जलद पाठलाग करण्यास औरंगजेबाने नासिरीखानास हुकूम केला, पण पावसाळा सुरू झाल्याने डोंगरातून मोगल फौजेचे शहाणपण चालेना, तेव्हा ते परत आले. पुढे 1657च्या सप्टेंबरात मोगलांचा व विजापुरकरांचा तह झाला, म्हणून आता एकट्यानेच मोगलांशी लढण्यापासून फायदा नाही असे पाहून महाराजांनी आपला वकील रघुनाथपंत ह्यास नासिरीखानाकडे आणि दुसरा वकील कृष्णाजी भास्कर यास औरंगजेबाकडे, केलेल्या आगळिकीबद्दल माफी मागण्यासाठी, पत्रे देऊन पाठवले. हे वकील आले तेव्हा औरंगजेब दिल्लीस जाण्याच्या धांदलीत होता, म्हणून त्याने बाह्यत: सामोपचाराचे पत्र शिवाजीराजांना लिहिले, ते असे :-

'तुमची अर्जदास्त कृष्णाजी भास्कर पंडित यांचे पत्रासुद्धा रघुनाथपंत वकील यांजबरोबर आलेली पाहून मजकूर ध्यानास आला. यद्यपि तुमच्या पेशगीच्या गोष्टी विसरण्याजोग्या नाहीत, तथापि तुम्ही आपले कृतकर्मांचा पश्चात्ताप केला; आणि हा दरबार उपेक्षेचा नाही जाणून, व तुमचे लक्ष निभ्रान्त इकडे आहे असे समजून, तुमचे पूर्व कृत्य मनात आणीत नाही. येविषयींचा संतोष मानून इकडील दौलतीविषयी कोशीस करीत जावी. 'आपले वतनी महाल किल्ले व कोकण देश सुद्धा, निजामशाहीचे खेरीज, विजापूर आदिलखानाचे इलाख्यात जे आहेत ते, त्यांजकडून मुलुख हस्तगत झाल्यानंतर बंदोबस्त होण्याविषयी वचन असावे, म्हणजे सोनोपंत ह्यास हुजूर पाठवितो आणि इकडील लक्षात वागून सरकारी मुलुखाची सरहद्द रक्षण करून कामदाराशी परीख होतो, की ज्या योगे बंड बखेडे वगैरे न व्हावे, म्हणोन तुम्ही लिहिले; त्यास, तुम्ही लिहिल्यान्वये वर्तन हा फर्मान पाहताच आपले मजकुराची अर्जी लिहून सोनोपंतांबरोबर[50] पाठवून देणे, म्हणजे त्याप्रमाणे केले जाईल. जाणून लक्षात वागवून, आमचे लोभाची पूर्णता समजावी. ता. 24 फेब्रुवारी सन 1658.'

बापाच्या आजाराचे वर्तमान कोणासही न कळविता सन 1657, ऑक्टोबर 4 रोजी औरंगजेब कल्याणीहून निघाला, तो औरंगाबादेस येऊन तेथून 25 जानेवारी 1658 रोजी दिल्लीकडे जाण्यास निघाला. तेव्हा दिल्लीहून त्याचेविरूद्ध दाराची मोहीम चालू झाली.

त्यासाठी त्याने महाबतखान, छत्रसाल व नासिरीखान, मीरजुमला वगैरे सरदारांस हिंदुस्थानात आपल्याजवळ बोलावून घेतले. याप्रमाणे मोगल फौजा दक्षिणेतून निघून गेलेल्या पाहून विजापूर व गोवळकोंडा येथील फौजा बाहेर पडल्या आणि खुशाल आपला पूर्वीचा मुलुख परत घेऊ लागल्या. विजापूरचा सरदार अफझलखान कल्याण व बेदर हे किल्ले परत घेण्यासाठी चालून गेला. त्याचे कारण असे की औरंगजेबाचे मीरजुमल्यास जात असलेले एक गुप्त पत्र दैवयोगाने अफझलखानाने पकडले. त्यात बादशहाच्या आजाराची व पुढील सर्व गोंधळाची इत्थंभूत हकिगत होती. जी गोष्ट औरंगजेबाने महत्प्रयासाने अद्यापपावेतो गुप्त म्हणून ठेवली होती. ती एकदम चहूकडे जाहीर झाली आणि औरंगजेबाचा कावा सर्वांस समजला. परिंडा किल्ला राहिला आणि विजापूरकडील एक कोट दंड तोही येणे बाकी राहिला. औरंगजेबाने मीरजुमला ह्यास कैद करून आपणाजवळ ठेवले आणि ते दोघे निघून उत्तरेकडे गेले. जाण्यापूर्वी औरंगजेबाने विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतानास गोडगोड पत्रे लिहून त्यांची मने शांत केली. दंडापैकी आणखी 30 लाख रुपये माफ केले. ह्याप्रसंगी आदिलशहास लिहिलेल्या पत्रात खालील मजकूर आहे. 'देशाचे संरक्षण करा, व्यवस्था चांगली ठेवा, शिवाजी किल्ले बळकावून बसला आहे त्यास हुसकावून द्या. त्याच्या नोकरीची जरूरच असेल तर त्याला नवीन जागिरी कर्नाटकात द्या; पण ह्या डोंगरी मुलुखात त्यास ठेवू नका. आमच्याशी निष्ठेने वागाल तर तुमचे कल्याण होईल. आम्ही हल्ली फौजेसह हिंदुस्थानात जात आहोत. तुमची निष्ठा आणि मैत्री दाखविण्याची हीच वेळ आहे. तुमच्या वडिलांनी आम्हास जरूर लागल्यास फौज पाठविण्याचे वचन दिले होते, तरी तुम्ही दहा हजार स्वार एकदम पाठवून द्या, म्हणजे बाणगंगेपर्यंतचा सर्व मुलूख तुम्हास देऊ. बहलोलखानाच्या मुलांना किंवा शहाजीला आम्ही कधीही आमच्या नोकरीत घेणार नाही, ह्याजबद्दल खात्री ठेवा. तुमच्या राज्यावर कोणी येऊन हल्ला केल्यास मी स्वत: तुमचे संरक्षण करीन.' औरंगजेब हिंदुस्थानात गेला, तेव्हा कित्येक मराठे सरदारांची फौज त्याने आपणाबरोबर तिकडे घेतली होती. शिवाजीराजे व शहाजीराजांचे औरंगजेबाकडे संधान असून त्यांची आदिलशहास किती भीति वाटत होती, हे वरील पत्रात व्यक्त होते. पुढे बादशहा झाल्यावर औरंगजेबास शिवाजीराजांच्या आक्रमणाची वार्ता कळून त्याच्या निराकरणार्थ लगेच त्याने शायिस्ताखानाची नेमणूक दक्षिणच्या सुभ्यावर केली आणि शिवाजीराजांचा नाश करणे हेच मुख्य काम त्यास सांगितले. या कामी खानाने विजापूर दरबाराशी संगनमत करून दोघांनी एकदम सर्व बाजूंनी शिवाजीराजांवर प्रहार सुरू केला. अफझलखान चालून आला त्याच सुमारास शायिस्ताखानानेही उत्तरेकडून महाराजांवर मोहीम सुरू केली.

5) मोगल अधिकारी शायिस्ताखान :

सन 1658 च्या जुलैत औरंगजेबास दिल्लीचे तख्त प्राप्त झाले. नंतर हळूहळू त्याने आपल्या भावांची वाट लावली. त्यामुळे त्याचा चांगला जम बसण्यात कित्येक वर्षे गेली त्याचाउपोग महाराजांनी केला. आरंभी औरंगजेबास जवळचे मोठमोठे सरदारही अनुकूल होते असे नाही. सन 1659 च्या मे महिन्यात दिल्ली येथे त्याने यथाविधि राज्यारोहण केले. शहाजहान जिवंत असेपर्यंत तो आगऱ्यास गेला नाही. संशयपिशाच्चाने त्यास इतके ग्रासले होते की, सर्व लोक त्यास शत्रूसमान वाटत.शहाजहान विशेष लोकिप्रिय होता, म्हणून कैदेतून सुटून तो पुन्हा राज्याधिकार हाती घेईल अशी भीति औरंगजेबास सारखी वाटत होती. दिल्लीचे काजी औरंगजेबाच्या नावाने खुत्बा वाचीत नव्हते, ते 1660 ऑक्टोबर पासून वाचू लागले. त्याचे 1661 हे वर्ष साधारण स्थिरस्थावर करण्यात गेले. 1662 मध्ये तो इतका आजारी पडला की एक वर्ष पावेतो तमाम राज्यात गोंधळ उडून गेला. तिकडे अफगाण लोक व इराणचा शहा औरंगजेबाची अनुचित कृत्ये ऐकून त्याजवर इतके रुष्ट झाले होते की, ते केव्हा काय करतील ह्याचा नेम नव्हता, जसवंतसिंह, जयसिंह वगैरे डोईजड सरदारांना दूर कोठे कामगिरीवर पाठवून औरंगजेब आपली निभावणूक करीत होता. सन 1666 च्या जानेवारीत शहाजहान मरण पावला, तेव्हा औरंगजेब स्वस्थचित्त झाला. त्यानंतर लगेच आगऱ्यास जाऊन तेथे त्याने ता. 27 मार्च रोजी पहिला राज्यारोहणसमारंभ मोठ्या थाटाने केला. हा समारंभ म्हरजे मोगल बादशाहीच्या भरभराटीचा कळस होय. त्यापूर्वी व त्यानंतर त्या बादशाहीचे वैभव एवढे मोठे कधी नव्हते.

त्यानंतर लवकरच अफगाण व राजपूत लोकांशी युद्धे सुरू झाली, त्यातून मोकळा होण्यास औरंगजेबास आणखी पंधरा वर्षे लागली. ह्या संधीचा उपयोग शिवाजीमहाराजांनी चांगला करून घेतला. हे प्रकार लक्षात घेऊन आपणास शिवाजीराजांचा चरित्रक्रम पाहिला पाहिजे. त्या संबंधाने दक्षिणेत आलेल्या खालील मोगल सुभेदारांची नावे दृष्टीसमोर ठेवावी लागतील.

दिल्लीस जाताना औरंगजेबाने आपला वडिलमुलगा मुअज्जम यास मागे कारभारावर ठेवले होते (1658). राज्यारूढ झाल्यावर त्याने शायिस्ताखानाची नेमणूक इकडे केली (1659). पुढे शिवाजीने खानाची दुर्दशा केल्यावर ता. 13 मे 1663 रोजी औरंगजेबाने त्यास बंगालमध्ये बदलून पुन्हा आपल्या मुलास दक्षिणेच्या कारभारावर पाठवले आणि त्याच्या मदतीस सन 1664 मध्ये महाबतखानाची नेमणूक केली. नंतर सन 1665 मध्ये जयसिंहाची नेमणूक झाली, तेव्हा मुअज्जम परत गेला. विजापुरकरांकडून जयसिंहाचा पराभव झाल्यावर पुन्हा शहाजाद्याची नेमणूक ता.3 मार्च 1667 रोजी झाली. त्याच्या जोडीस जसवंतसिंह व दिलेरखान दिलेले होते. ता.12 जुलै 1667 रोजी जयसिंह बऱ्हाणपूर येथे मरण पावला. शहाजाद्याने 1672 पर्यंत दक्षिणेचा कारभार केला. पुढे 1673 च्या जानेवारीत बहादुरखानाची नेमणूक झाली. त्याने 1677 च्या अखेरपर्यंत कारभार केला. सन 1678 मध्ये त्यास बादशहाने परत बोलावले. बहादुरखान हा बादशहाचा दूधभाऊ

असून त्यासच खानजहान कोकलताश असा किताब होता. सन 1672 मध्ये शहाजाद्याने शिवाजीराजांशी तह केला होता, तो मोडून एकदम युद्ध सुरू करावे, असा हुकूम बादशहाने 1678 च्या एप्रिलमध्ये बहादुरखानास फर्मावला आणि दिलेरखानास त्याच्या हाताखाली दिले. ता.28 सप्टेंबर 1678 रोजी दक्षिणेत शहाजाद्याची पन्हा नेमणूक झाली, ती 1680च्या जून पर्यंत चालली. त्यानंतर बहादुरखानास पुन्हा नेमण्यात आले. पुढे 1682 मध्ये बादशहा स्वत: दक्षिणेत आला तेव्हा बहादुरखान कारभारावर होता. बादशहा स्वत: आल्यानंतर त्याच्या अखेरीपर्यंत इकडे कारभाऱ्याचे महत्त्व राहिले नाही.

विजापुरावरील मोहिमेत शिवाजीराजे निमग्न असताना ता.28 जानेवारी 1660 रोजी शायिस्ताखान औरंगाबादेहून निघाला, तो ता. 11 फेब्रुवारीस अहमदनगरास पोहोचला. जिजाबाईचा चुलता जगदेवराव जाधव त्याजबरोबर होता. तेथून 25 फेब्रुवारी रोजी निघून सोनवाडी, पुणे, बारामती या ठिकाणी मुक्काम करीत ता. 16 एप्रिल रोजी खान शिरवळ येथे दाखल झाला. तेथून 20 मैलांवर राजगडच्या बाजूस महाराजांची फौज होती, ती खानाने हल्ला केल्यामुळे पळून गेली. तेव्हा खान शिरवळहून परत फिरून दि. 7 मे रोजी पुण्यास येऊन शिवाजीराजांच्या वाड्यात राहू लागला. पावसाळ्यात पुण्यास राहण्याचा त्याचा विचार होता, पण महाराजांच्या लोकांनी सभोवारचा सर्व प्रदेश जाळून निर्जन केल्यामुळे तो चाकणला गेला. पावसात चाकणच्या किल्ल्यास वेढा घालून ऑगस्टमध्ये त्याने तो किल्ला काबीज केला. सन 1647मध्ये महाराजांनी तो प्रथम घेतला तेव्हापासून फिरंगोजी नरसाळा हा तेथील बंदोबस्तास नेमलेला होता. त्याजपासून आपण किल्ला सहज घेऊ अशी खानास घमेंड होती, पण दोन महिनेपर्यंत किल्ला हाती आला नाही. शेवटी एक सुरुंग उडून आत जाण्यास लहानसे भगदाड पडले. फिरंगोजी व त्याचे लोक इतक्या आवेशाने लढले की, प्रत्यक्ष शायिस्ताखानास मराठ्यांचे पराक्रमाविषयी अचंबा वाटला. फिरंगोजी त्याच्या हाती सापडला तेव्हा त्याच्या शौर्याची तारीफ करून खानाने त्यास सन्मानाने वागवले आणि पुष्कळ प्रकारची लालूच दाखवून त्यास आपल्या नोकरीत येण्याविषयी आग्रह केला, परंतु त्याने खानाच्या सूचनेचा अव्हेर केला, तेव्हा खानाने त्यास इतमामाने महाराजांकडे रवाना केले. 'तू शर्थ केलीस' म्हणून महाराजांनी त्यास नावाजून भूपाळगडची हवालदारी दिली.

चाकणच्या अनुभवावरून 'मराठ्यांचे डोंगरी किल्ले घेणे फार दुर्घट आहे', असे शायिस्ताखानाने औरंगजेबास कळवले. खान एकनिष्ठ, उद्योगी व अनुभवी होता. दक्षिणदेशाची व इकडील लोकांची त्याला चांगली माहिती होती. बादशहाने हा डोंगरी मुलुख जिंकण्याचा नाद सोडून, युक्तीने शिवाजीराजांचा समेट करावा असा त्याने बादशहास सल्ला दिला. महाराजांनाही समेट हवाच होता. नेहमी युद्धाची तयारी ठेवणे अशक्य पडू लागले, म्हणून त्यांनी आपला वकील सोनोपंत डबीर यास शायिस्ताखानाकडे पाठवले. सन 1660 च्या कार्तिक महिन्यात सोनोपंत खानाकडून महाराजांकडे परत आला

असा उल्लेख आहे. परंतु या शिष्टाईपासून कोणताही अर्थ निष्पन्न झाल्याचे दिसत नाही. यास कारण औरंगजेबच होय. ‘महाराजांशी कोणत्याही प्रकारचा समेट करू नये, त्यास लढून नेस्तनाबूद करावे,’ असाच बादशहाचा आग्रह असून त्यासाठी राजपूत राजा जसवंतसिंह यास औरंगजेबाने खानाचे मदतीस गुजरातेतून पाठविले. तेणेकरून मोगलांची अफाट फौज पुण्याचे आजूबाजूस जमली. इकडे नेताजी पालकर व मोरोपंत पिंगळे यांनी जुन्नरपासून औरंगाबादपर्यंतचा मोगलांचा मुलूख उद्ध्वस्त केला. परंतु मोगलांचे हे पुढचे व्यवहार सांगण्यापूर्वी कालानुक्रम पाळण्यासाठी महाराजांनी अफझलखानाचा पाडाव केला, तो प्रकार अगोदर समजणे जरूर आहे.

प्रकरण 4 - अफझलखानाचा निकाल

(1659)

1.अफझलखानाची रवानगी; 2.उभयतांची मिठी पडली; 3.बाजी प्रभूंचा आत्मत्याग.

1) अफझलखानाची रवानगी (सप्टेंबर 1659) :-

मोऱ्यांचा पाडाव झाल्यापासून विजापूर दरबारावर एकामागून एक संकटेच कोसळू लागली. खुद्द आदिलशहा मरण पावल्याने राज्यकारभारातील धरबंद सुटला. वजीर खान महंमद, बहलोलखान, रुस्तुमेजमा वगैरे सरदारांचा मेळ बसेना. इतक्यात विजापुरावर औरंगजेबाचे आक्रमण सुरू झाले. त्या संबंधाने शहाजीराजांस विचारता त्याने निक्षून कळवले की, 'पुत्र माझ्या आज्ञेत वागत नाही. आपण त्याचे पारिपत्य पाहिजे तसे करावे. त्यास माझी हरकत नाही.' अर्थात शहाजीराजांचे पाठबळ शिवाजीराजांना नाही अशी खात्री झाल्यामुळे तितकी दरबारची चिंता हलकी झाली. या संकटसमयी शहाजीच काय तो आपल्या धन्याशी निष्ठेने वागत होता. ही गोष्ट सिद्ध करणारे आदिलशहाचे फर्मान सर जदुनाथास उपलब्ध झाले आहे ते असे. 'शहाजी भोसले यांस- तुमचा पुत्र शिवाजी याने जी बंडखोरी चालवली आहे, तीत तुमचा काही एक संबंध नाही अशी आमची खात्री झाल्यावरून तुमची बंगलोरकडील जागीर व पूर्वीचे तुमचे सर्व मान-मरातब पहिलेप्रमाणे तुमचे तुम्हाकडे बहाल करण्यात येत आहेत.' छ 4 रमजान सन 1068 हिजरी (=27.5.1658). या कागदावरून महाराजांचा जोर या वेळी कसा वाढू लागला होता हे स्पष्ट आहे. औरंगजेब उत्तरेत निघून जाताच महाराजांच्या पारिपत्याचा विचार विजापूरच्या दरबारात सुरू झाला. खानमहंमद मरण पावल्यावर खवासखान वजिरीवर आला आणि अफझलखान हा एकच विश्वासू व हिमतीचा सरदार आदिलशहाचे पदरी होता. त्यास सन 1659 च्या उन्हाळ्यात शिवाजीराजांवर रवाना करण्याचा विचार विजापुरास कायम झाला.

अफझलखानाचे नाव पूर्वी वारंवार येऊन गेले आहे. महंमद आदिलशहाची त्याचेवर मर्जी बहाल होती आणि कर्नाटकचे युद्धात त्याने चांगले नाव मिळवले होते. महंमद

आदिलशहाचा हा दासीपुत्र असावा. कारण वाई येथे सापडलेल्या एका हुकुमनाम्यात त्यास महंमदशाही हे विशेषण लावलेले आहे. त्याची आई भटारीण (=स्वयंपाकीण) होती असे पोवाड्यात आहे. शिवाजीजराजांचा पाडाव केला नाही तर आपले राज्य संपले अशी स्थिती विजापुरात उत्पन्न झाली होती. कर्नाटकचा प्रदेश शहाजीने आक्रमिला आणि जावळी, सिंहगड, पुरंदर ही नाक्याची ठिकाणे हस्तगत करून शिवाजीमहाराज स्वतंत्र झाले. औरंगजेबाचे आक्रमण व दरबारातील अव्यवस्था यामुळे शिवाजीराजांशी समोर लढून त्यांना जिंकण्याइतकी फौज विजापुरात नव्हती. अफझलखान हा एकच इसम हिमतीचा होता, त्याला बारा हजार फौज मोठ्या शिकस्तीने देऊन बडे साहेबिणीने आणखी एक असा कानमंत्र सांगितला की, दोस्तीचे आमिष दाखवून कपटाने किंवा कशाही तऱ्हेने शिवाजीला मारावे किंवा जिवंत पकडून आणावे. कपटविद्येत खानाचा लौकिक बाहेर मशहूर होता. सन 1638 मध्ये रणदुल्लाखान व शहाजी कर्नाटक जिंकण्यास गेले असताना शिऱ्याचा नाईक कस्तुरीरंग याला अफझलखानाने अभयवचन देऊन भेटीस आणले आणि विश्वासघाताने त्याचा शिरच्छेद केला,[51] ही गोष्ट लौकिकात सुप्रसिद्ध होती. ता.16.6.1659 रोजी अली आदिलशहाने कान्होजी जेध्यांस फर्मान पाठवले, त्यात त्यास असा हुकूम होता की, ‘शिवाजीने निजामशाही कोकणातील मुसलमानांचा उच्छेद व लूट करून किल्ले हस्तगत केले आणि त्याचे पारिपत्यासाठी अफझलखानास रवाना केले आहे, तरी त्यास तुम्ही सामील होऊन शिवाजीचा पराभव करून निर्मूल फडशा करावा; त्याच्या लोकांस आश्रय न देता ठार मारून या दौलतीचे कल्याण इच्छिणे.’ अर्थात खानाची ही स्वारी महाराजांना केवळ प्राणघातक वाटली यात आश्चर्य नाही.[52]

शिवाजीराजांचे अलिकडचे उद्योग वाई प्रांतातच चालू होते. प्रतापगड, जावळी या जागा वाईच्या आसमंताद्भागी होत्या, तेव्हा शिवाजीराजांबद्दल दरबारास खरी खबर कळविण्यासाठी व त्याच्या बंदोबस्ताचा विचार करण्यासाठी सन 1658 च्या नोव्हेंबरात बादशहाने अफझलखानास विजापुरास बोलावले. तेथे त्याचेबरोबर शिवाजीराजांना पकडून आणण्यासंबंधाने पुष्कळ वाटाघाट झाली. अफझलखानाने ती कामगिरी मोठ्या उत्साहाने स्वीकारली आणि प्रतिज्ञा केली की, ‘या डोंगरातील उंदरास जिवंत अगर मेलेला पकडून मी येथे आणून रुजू करतो.’ त्या संबंधाची सर्व तयारी पूर्ण करून त्याने बारा हजार निवडक फौज बरोबर घेतली आणि सन 1659 च्या सप्टेंबर महिन्यात विजापुराहून प्रयाण केले. शिवाजीराजांचे अधिष्ठान पुणे असल्यामुळे तिकडेच जाण्याचा रोख धरून तो पंढरपूर, माणकेश्वर, करकंब, भोसे, शंभुमहादेव, मलवडी यावरून रहिमतपुरावर आला. वाटेने हिंदूंची देवस्थाने मुद्दाम उद्ध्वस्त करून त्याने आपल्या धर्माची प्रौढी प्रकट केली. पंढरपूरच्या विठोबाची दुर्दशा करून तेथून तुळजापुरास जाऊन तेथील भवानी देवीचे त्याने तुकडे केले. मलवडी येथे त्याने वजाजी निंबाळकरास पकडून त्यास हिंदूंचा पुरस्कार

केल्याबद्दल तंबी दिली. या हकिगती महाराजांना राजगडावर कळल्या आणि पुण्याकडील मैदानी प्रदेशात खानाशी सामना देणे श्रेयस्कर नाही असे ठरवून, ते त्या बाजूचा बंदोबस्त करून स्वत: प्रतापगडावर येऊन राहिले. 'वाईपासून प्रतापगड पावेतोच्या अवघड प्रदेशात खानास गाठून त्याची दुर्दशा उडवून द्यावी' असा बेत त्यांनी मनात योजला. हिंदू देवस्थानांच्या उच्छेदामुळे लोकांची मने प्रक्षुब्ध झाली आणि खानाचा पाडाव करण्यास लोकही उत्सुकतेने तयार झाले. आता पुढे भीषण रणकंदन माजणार अशी धास्ती लोकांना वाटू लागली.

'शिवाजीराजे प्रतापगडावरच आहेत' अशी खबर लागताच खानाने पुण्याकडील रोख सोडून वाईस येऊन वास्तव्य केले. वाईस कृष्णाजी भास्कर[53] कुलकर्णी होता त्यास पढवून खानाने महाराजांच्या भेटीस प्रतापगडावर पाठवले. अद्यापि या कृष्णाजीचे वंशज वाईस आहेत. अफझलखान पूर्वी कैक वर्षे कारभारी होता. तेव्हापासून कृष्णाजीशी त्याचा चांगला परिचय होता. शिवाजीराजांना वाई येथे आपल्या भेटीस आणावे असा खानाचा उद्देश असून तो योग घडवून आणण्यासाठी त्याने कृष्णाजी भास्कर यास शिवाजीराजांकडे पाठवले. तेथे उभयतांचे बोलणे झाल्यावर 'पंताजी गोपीनाथ बोकील'[54] म्हणून महाराजांजवळ एक हुशार व धोरणी गृहस्थ होता, त्यास त्यांनी कृष्णाजीबरोबर परत वाई येथे अफझलखानाकडे शिष्टाईसाठी रवाना केले. 'विश्वासराव नानाजी मुसेखोरेकर' म्हणून एक प्रभू सरदार शिवाजीराजांजवळ होता; त्याने फकिराच्या वेषाने गुप्तपणे खानाच्या छावणीत वारंवार येऊन तेथील खडान्खडा बातमी आणून महाराजांना दिली. त्यावरून व वकिलांच्या बोलाचालीच्या धोरणाने महाराजांनी आपला पुढील बेत ठरवला. खानाकडे वरचेवर ते असे निरोप पाठवू लागले की, 'एवढ्या मोठ्या सैन्याशी सामना करण्याची ताकद माझ्यात नाही; झालेले अपराध पोटात घालून खान जीवदान देतील, तर मी आपल्या ताब्यातील सर्व मुलुख सोडून देण्यास तयार आहे.' अशा नम्रतेच्या निरोपांनी खानास वाटले, की आपली मोहीम आता खचित फत्ते होणार. वाई प्रांताची त्यास उत्तम माहिती होती आणि त्या डोंगराळ व झाडीच्या प्रदेशात लढाई सुरू केल्यास विनाकारण फौजेची खराबी होईल हेही तो जाणून होता. तेव्हा सौम्योपचारांनी किंवा दगाबाजीने शिवाजीराजा हस्तगत होईल तर बरे असे त्याने ठरवले. रोहिडखोऱ्यातील खोपडे म्हणून एक देशमुख होते, त्याचे व जेधे देशमुखांचे वाकडे होते. जेधे, सिलीमकर व बांदल देशमुख आरंभापासूनच शिवाजीराजांना सामील होते. म्हणून अफझलखानाने खोपड्यांना अनेक प्रकारची लालूच दाखवून आपल्या बाजूस वळवले. 'बबई खोपडी पहिलीच तिकडे गेली होती. त्यावर अफझलखान वाईस राजश्री छत्रपति स्वामींवर चालोन आले ते समयी खंडोजी खोपडे पारख (फारख) होऊन अफझलखानास भेटले आणि स्वामींना धरून देतो म्हणवून कबुलात केली.[55]' यावरून खानाचा उपक्रम व्यक्त होतो. कोणीकडून तरी

शिवाजीला किल्ल्यातून बाहेर काढावे व साधल्यास मारून वा कैद करून विजापुरास न्यावे, असा त्याचा विचार होता. त्याचे सैन्य वाईपासून महाबळेश्वरपर्यंत पसरले होते. शिवाजीराजांची गोष्ट तशी नव्हती. त्यांनी आपली फौज दाट झाडीतून व दऱ्याखोऱ्यांतून लपवून ठेवल्यामुळे एकदम दिसून येत नव्हती. महाराजांनी कृष्णाजी भास्कराची बडदास्त चांगली ठेवली आणि दुसऱ्या बैठकीत त्याची एकांती गाठ घेऊन, खानाचा खरा उद्देश काय आहे हे त्यांनी समजून घेतले. 'आपण आरंभलेल्या महत्कृत्यास तुमच्यासारख्या ब्राह्मणांची मदत अवश्य पाहिजे,' इत्यादी गोष्टी सांगून महाराजांनी त्या वकिलाचे मन आपणाकडे वळवले. त्याच्या अंत:करणात धर्माभिमान व देशाभिमान जागृत करणारे बोलणे महाराजांनी केल्यावर, स्वधर्मीयांविरूद्ध निकराने वागण्याचे धाडस कृष्णाजीस झाले नाही. पुढे ह्या उभयतांनी खानास किल्ल्याखाली भेटीस बोलवावे असे ठरवले. शिवाजीराजांचा सल्लागार पंताजी गोपीनाथ यासही हा बेत पसंद पडला. दोघा वकिलांनी खानाकडे जाऊन प्रतापगडाखाली शिवाजीराजांच्या भेटीस येण्याविषयी त्याचे मन वळवले. खानास आपल्या शहाणपणाची व शक्तीची घमेंड होती. 'शिवाजी दुर्बळ आहे, त्याचे हातून काय व्हावयाचे आहे? एकदा विश्वास पटल्यावर तो वाटेल तेथे तुमच्याबरोबर येईल,'' इत्यादी भाषणे वकिलाचे तोंडून ऐकल्यावर, त्याने शिवाजीराजांचे म्हणणे कबूल करून आपणच त्याचे भेटीस जाण्याचे ठरवले आणि रडतोंडीच्या घाटाने आपली फौज जावळीपर्यंत नेली.

2) उभयतांची मिठी पडली (ता10.11.1659) :

इकडे महाराजांनी खानाच्या भेटीची व आपल्या बचावाची एकंदर तजवीज फार बारकाईने व काळजीपूर्वक लावली. खुद्द खानाची व त्यांच्या फौजेची, खाण्यापिण्याची वगैरे व्यवस्था इतकी उत्तम ठेवली, की शिवाजीराजांविषयी खानाच्या मनात अंदेशा आला नाही. किल्ल्याखाली शिवाजीराजांनी भेटीकरता एक उत्तम मंडप तयार करवला. खानाकडील मंडळींनी येऊन ती जागा पसंत केली. रानात जागोजाग महाराजांनी आपल्या चौक्या बसवल्या. तसेच किल्ल्यावर येण्याची एक वाट खुली ठेऊन बाकीच्या सर्व वाटा चहूकडून तोडलेली मोठमोठी झाडे पसरून अडवून टाकल्या. भेटीची व पुढील व्यवस्था कशी ठेवावयाची त्याजबद्दल बारीक तपशील त्यांनी आगाऊ ठरवलेले होते. तसेच अनिष्ट परिणाम घडल्यास किल्ल्याचा व राज्याचा बंदोबस्त कसा करावयाचा ह्याची निरवानिरवही महाराजांनी केली. किल्ल्यावर जिजाबाई, अण्णाजी दत्तो सचिव, बाळाजी आवजी चिटणीस इ. ठेवले. 'आम्ही ही होड आरंभली. श्री सिद्धीस नेईलच. कदाचित वाकडेही पडल्यास तुम्ही घाबरे न होता शत्रूस बुडवावे, राज्य रक्षावे.' असे सांगून महाराजांनी भेटीस निघण्याची तयारी केली.

पुतण्या उमाजी राजाला। पाचशे लोक दिले त्याला॥
आणि, सराईत उमाजी। राज्य होईल तुम्हाला॥

असा मजकूर अफझलखानाच्या पोवाड्यात आहे. उमाजी हा महाराजांचा वडिलभाऊ संभाजी, यांचा धाकटा मुलगा पाच वर्षांचा होता. या साहसात महाराजांना अपाय झाला तर उमाजीला राज्य द्यावे, असा बेत होता असे दिसते.

मार्गशीर्ष शु.7 गुरुवार ता. 10.11.1659 हा उभयतांच्या भेटीचा दिवस मुक्रर झाला. ते दिवशी भेटीच्या आधी महाराजांनी आपल्या बचावाचा पोषाख चढविला. अंगात चिलखत व त्यावर अंगरखा, डोकीस शिरस्त्राण व वर पागोटे, उजव्या हातात भवानी तलवार व बाहीत बिचवा, डाव्या हातात वाघनखे, अशी आपल्या संरक्षणाची सिद्धता केली. भोजन आटोपून देवीचा आणि मातु:श्रींचा आशिर्वाद घेऊन महाराज खानाचे भेटीस निघाले. तिकडून खानही भेटीस येण्याकरता पंधराशे लोक घेऊन आला. परंतु 'इतके लोक आल्यास शिवाजी घाबरेल व भेटीस येणार नाही,' असे वकिलाने सांगितल्यावर फौजेस अर्ध्या रस्त्यात ठेवून, खान दोन हत्यारबंद शिपाई घेऊन सदरेस आला. तिकडून महाराजही तसेच दोन शिपाई बरोबर घेऊन आले. फारशी हत्यारे न घेता शिवाजीराजे येत आहेत असे पाहून, खानास समाधान वाटले. शिवाजीराजे दबकतच आले. प्रथम आलिंगन देताना खानाने महाराजांना आपल्या बगलेत आवळून धरले व पोटात जमदाड चालवली. इतक्यात महाराजांनी डाव्या हाताची वाघनखे खानाच्या पोटात खुपसली. त्याबरोबर, 'दगा रे दगा' म्हणून ओरडून खानाने महाराजांच्या डोक्यावर वार केला; परंतु डोक्यास शिरस्त्राण असल्यामुळे तो वार महाराजांना लागला नाही. इतक्यात महाराजांनी आपल्या तरवारीचा वार खानाच्या खांद्यावर करून त्याला पोटापर्यंत चिरले, त्याबरोबर खान गतप्राण होऊन पडला. त्याचा शिपाई सय्यद बंडा हा महाराजांवर चालून आला, त्यास जिऊ महाल्याने ठार केले.[56] इकडे भोयांनी खानाचा मुर्दा पालखीत घालून चालवला, परंतु संभाजी कावजी वगैरे महाराजांच्या माणसांनी भोयांना ठार मारले आणि खानाचे शिर कापून किल्ल्यावर नेले. त्यावेळी दोन प्रहरोत्तर दोन-तीन तास झाले असावेत. नंतर महाराजांच्या फौजेने बाहेर येऊन खानाच्या फौजेचा पाडाव केला.

पुढे काही वेळपर्यंत उभय फौजांची तुंबळ लढाई झाली, तिला प्रतापगडची लढाई म्हणतात.[57] अफझलखानाचा वध होऊन संकेताप्रमाणे किल्ल्यावरून तोफा झाल्या, त्या वेळेस सायंकाळचा चार घटका दिवस राहिला होता. इशारा मिळताच चोहोंकडून मावळे लोकांनी एकदम बाहेर पडून मुसलमानी फौजेस घेरले, त्यांस हत्यारे घेण्यास किंवा घोड्यावर चढण्यासही सवड मिळाली नाही. पुढे लवकरच दिवस मावळून अंधार पडल्याने मुसलमान लोक त्या भयाण रानाच्या मध्यभागी पेचात सापडले. खानाबरोबर आलेले लोक किल्ल्याचे पायथ्याशी होते, त्या बहुतेकांची नेताजी पालकर याने कत्तल उडवली. मागच्या

फौजेवर मोरोपंत पिंगळे तुटून पडला. 'शरण येतील त्यास जिवदान द्यावे, व्यर्थ रक्तपात करू नये,' अशी शिवाजीराजांची मोरोपंतास ताकीद होती. त्याप्रमाणे त्याने वर्तन केले. प्रतापराव मोरे याने काहींना वाट दाखवून वाईपर्यंत निभावून आणले. येणेप्रमाणे चालून आलेल्या फौजेची दाणादाण होऊन त्यांचे पुष्कळ द्रव्य व सामान महाराजांच्या हाती लागले. खानाचे निशाण, नगारा, 95 हत्ती, चार हजार घोडे, उंट, 70 तोफा, शिवाय सामान व जडजवाहीर वगैरे दहा लाखांचा विषय महाराजांना मिळाला. कित्येक पळून गेलेले लोक संकटाने मार्गक्रमण करीत स्वदेशी गेले. हस्तगत झालेल्यांपैकी खुशी होते ते महाराजांचे नोकरीत राहिले, बाकीच्यांना त्यांनी परत जाऊ दिले. रुस्तुमिजमान, अंबरखान राजाजी, झुंजारराव घाटगे व अफझलखानाचे दोन धाकटे मुलगे वगैरे अनेक पाडाव आले. झुंजारराव हा विजापुरचा प्रतिष्ठित सरदार शहाजीचा स्नेही असून तो शिवाजीराजांजवळ राहण्यास कबूल झाला नाही, म्हणून त्याचा मोठा सन्मान करून महाराजांनी त्याला परत जाऊ दिले. परंतु खंडूजी खोपडे नामक एका मावळे सरदाराने द्रव्याचे लालुचीने शत्रूस मिळून अफझलखानाचा वडीलमुलगा फाझलखान व बायकामाणसे यांना आडवाटेने पळवून नेऊन कऱ्हाड येथे सुरक्षितपणे पोहोचवले, हे वर्तमान महाराजांना कळताच त्यांनी खोपडे याचा शिरच्छेद केला. बाबाजी भोसले,[58] शामराव पद्मनाभी वगैरे महाराजांचे प्रमुख सरदार युद्धात कामास आले.

आलमगीरनामा, खाफीखान वगैरेंच्या लेखात कमी-जास्त फरकाने वरचीच हकिकत आहे. एकंदर प्रकरणावर जदुनाथ सरकारांची टीका मार्मिक आहे. तिचा तात्पर्यार्थ असा. 'अफझलखानाच्या मृत्यूचा खरा प्रकार बाहेर येणे शक्य दिसत नाही. दोन पुढारी अशा रीतीने एकांतात भेटून जेव्हा घात होतो, तेव्हा खरा प्रकार बाहेर येणे शक्यच नसते. मुसलमान लेखकांत खाफीखान मात्र या प्रकारास 'शिवाजीने खून केला' असे म्हणतो. ग्रँट डफने त्याच्यातही भर घालून, 'जाणून बुजून केलेला खून,' असे त्याचे 'व्याख्यान केले आहे.' मुसलमान लेखकांत मतभेद आहेत आणि ग्रँट डफच्या लेखातही बऱ्याच गोष्टी विसंगत दिसतात.'

याप्रसंगी शिवाजीराजांची फौज 20,000 असून खानाची 12,000 होती, असे सर्व मुसलमान इतिहासकार सांगतात. शिवाय 'मावळ्यांना ह्या जागेची पूर्ण माहिती असल्यामुळे, त्यांच्यापुढे खानाच्या फौजेचा नाश झाला ह्यात आश्चर्य काही नाही किंवा खानाच्या भीतीने शिवाजी निराश झाला होता,' हे ग्रँट डफचे म्हणणेही संभवनीय नाही. अशा परिस्थितीत खून करण्याचा बेत आगाऊ ठरविणे शिवाजीला मुळी शक्यच नव्हते. तिसरे, ...भेटीच्या प्रसंगी प्रत्येकाजवळ दोन-दोनच नोकर होते. दोघे हातघाईवर येताच दोघांचेही लोक आत घुसले, असे मुसलमान लेखकांचे म्हणणे आहे आणखी असे की, खानाची फौज भेटीच्या जागेपासून बरीच जवळ होती. तिच्या योगाने खानाचा मृत्यु जरी

टळला असता, तरी इतक्या जवळ फौज आहे हे माहीत असताना शिवाजीराजांच्या मनात खुनाचा बेत आगाऊ असणे संभवनीय नाही. अशा आणखी बऱ्याच विसंगत गोष्टी ग्रँट डफच्या लेखात दाखविता येतील.

शिवाजीराजांचा काटा एकदम काढण्याचा खानाने प्रयत्न केला, परंतु तो सिद्धीस न जाऊन तोच हाती घेतलेल्या साहसात फशी पडला. भेटीच्या पूर्वी शिवाजीराजांनी हरएक प्रकारची सावधगिरी ठेवली होती. यावरून त्यांच्याच मनात कपट होते असे म्हणावे, तर शिवाजीमहाराजांनी अलौकिक सावधगिरी अशी काहीच ठेवली नव्हती. असे प्रकार इतिहासात वारंवार घडलेले आहेत. शिवाजी राजे नेहमीच धूर्त व सावधगिरीने वागणारे होते, त्यामानाने विजापुरची फौज बेसावध होती. विजापूरचा पडता काळ आलेला होता आणि खून व रक्तपात यांची क्षिति अशा पडत्या काळात लोकांस फारशी राहत नाही. महंमद गावान, चांदबिबी, लखूजी जाधवराव, मुरार जगदेव वगैरे अनेक नामांकित माणसे मुसलमानांच्या हातून मारली गेलेली आपण पाहतो. खुद्द विजापुरात सन 1657 च्या नोव्हेंबरात सालस वजीर खानमहंमद मारला गेला. त्या पुढील सन 1658 च्या ऑगस्टमध्ये बहलोलखानाचा खून झाला. त्यानंतर सहा महिन्यांनी फत्तेखानाला विष देण्यात आले. असे प्रकार धडधडीत डोळ्यांसमोर असताना शिवाजीराजांनी सावधपणा ठेवला नसता तर त्यांची गणना शहाण्या माणसांत झाली नसती. सारांश, शिवाजीराजांचे एकंदर चरित्र पाहिले म्हणजे मुद्दाम भेटीस बोलावून आणलेल्या पाहुण्याचा खून करण्याचा त्यांचा संकल्प प्रथमपासून होता असे दिसत नाही.

'मी शरण येण्यास तयार आहे, आपण माझे घरी येऊन माझे म्हणणे ऐकून घ्यावे व सलोखा करावा,' अशा प्रकारचा निरोप शिवाजीराजांकडून खानास आला होता. ह्या निरोपातील वचने अक्षरश: पाळण्याचा शिवाजीराजांचा इरादा नव्हता असे म्हणण्यास काहीच पुरावा नाही. असा निरोप आल्यावर खानाने दोन वैकल्पिक चुका केल्या. शिवाजीराजांचा निरोप खरा समजून तदनुसार खानाने अखेरपर्यंत वागले पाहिजे होते किंवा निरोप लबाडीचा समजून वाईच्या पुढे एकदम एकटे न जाता उघडपणे लढाई करून शिवाजीराजांना जेरीस आणावयाचे होते. भेटताक्षणी 'त्याने' शिवाजीराजांवर प्रथम वार केला असे म्हणतात, ते खरे असले पाहिजे. स्वत:च्याच जिवावर बेतली, तेव्हा खानावर हात उगारणे शिवाजीराजांना अपरिहार्य झाले आणि अशाही प्रसंगास आपण सर्वथैव तयार आहोत हे पूर्वीच्या सावधगिरीने व भेटीच्या वेळच्या वर्तणुकीने, शिवाजीराजांनी सर्वांना दाखवून दिले. खून करण्याची शिवाजीराजांची इच्छा असती तर स्वत:चा जीव धोक्यात घालण्याचे त्यांना कारण नव्हते. हे कृत्य उरकणारे दुसरे इसम त्यांचेजवळ पाहिजे तितके होते. अशाप्रकारची पुष्कळ टीका या प्रकरणावर करता येण्यासारखी आहे.

शिवाजीराजांनी ह्या विजयाबद्दल पुष्कळ दानधर्म केला. ज्यांनी विशेष पराक्रम केले त्यांना बक्षिसे वगैरे देऊन संतुष्ट केले. मराठेशाहीच्या खऱ्या स्थापनेस शिवाजीराजांचा हा

अद्भूत पराक्रम मुख्यत: कारण झाला. लोकांवर त्यांचा वचक बसला. अचाट कल्पना, साहस, प्रसंगावधान इ. थोर पुरुषांच्या अंगी असणारेगुण त्यांजमध्ये आहेत, अशी लोकांची एकदम खात्री होऊन हा कोणीतरी अद्वितीय पुरुष आहे आणि तो म्हणेल ते करील, असा त्यांचा बाहेर लौकिक झाला. 'पुणे, इंदापूर, चाकण, सुपे, बारामती ऐसे इनाम हिंदू व मुसलमान यांसी आहेत, त्यांस पेशजी आपणास मुकासा असता, अफझलखानाआधी जेणे प्रमाणे ज्यास जे पावत असेल त्यास तेणेप्रमाणे देणे ऐसा तह केला असे.'[59] 18 डिसेंबर 1660 च्या या लेखावरून अफझलखान मेल्यावरही पूर्वीची इनामे शिवाजीने जशीच्या तशी चालवली हे स्पष्ट आहे.

3) बाजी प्रभूंचा आत्मत्याग (जुलै 1660) :

अफझलखानाच्या वधाने ही पहिली मोहीम संपली असे नाही. त्या वधाचा फायदा घेण्याकरिता शिवाजीराजे मोठ्या त्वरेने फौज घेऊन बाहेर पडले. प्रथमत: त्यांनी विजापूरची पश्चिम राजधानी जो पन्हाळा किल्ला तो ता.28.11.1659 रोजी युक्तीने काबीज केला. कोल्हापूर प्रांत त्या वेळी विजापूरचा एक सुभा असून त्याचे काम रुस्तुमिजमान नावाचा सरदार पाहत असे. त्या प्रांतात पन्हाळा किल्ला फार मजबुदीचा होता. हा प्रांत मुसलमानांचे ताब्यात असूनही त्यातील जागोजागचे ठाणेदार व किल्लेदार बहुतेक हिंदू होते. या डोंगराळ प्रदेशाचा बंदोबस्त राखण्यास हिंदू कामगारांचाच विशेष उपयोग दरबारास होत असे. पन्हाळा, पावनगड, विशाळगड ऊर्फ खेळणा व रांगणा हे किल्ले या प्रांतात प्रसिद्ध होते. हा प्रांत काबीज करण्याचा शिवाजीराजांचा फार दिवस प्रयत्न चालू होता. अफझलखानाचा पाडाव होताच पन्हाळ्याच्या हिंदू किल्लेदाराशी संधान बांधून शिवाजीने अनाजी दत्तो यांजकरवी तो किल्ला हस्तगत केला. त्याचप्रमाणे पावनगड व वसंतगड हेही त्यांना मिळाले आणि कृष्णाकाठचे प्रदेशातून खंडणी वसूल करून नंतर रांगणा व खेळणा हे किल्ले त्यांनी मोठ्या शर्थीने लढून घेतले आणि खेळण्यास विशाळगड हे नाव दिले. या गोष्टी ऐकून आदिलशहाच्या हुकूमाने रुस्तुमिजमान व फाजलखान मिरजेहून फौज जमा करून शिवाजीराजांवर चालून आले. परंतु त्यांची फौज थोडी असल्यामुळे त्यांचेबरोबर लढून दि.28.12.1659 रोजी शिवाजीराजांनी त्यांना कृष्णानदीचे पार हाकलून लावले आणि आपण खंडण्या वसूल करीत थेट विजापूरपर्यंत चालून गेले. पण तेथून ते इतक्या वेगाने परत फिरले की, कोणाच्यानेही त्यांचा पाठलाग करवला नाही. रायबाग वगैरे समृद्ध स्थळे त्यांच्या लोकांनी हस्तगत केली आणि पुढील गदग, लक्ष्मेश्वरपर्यंतचा मुलुख नेताजीने लुटला. याप्रमाणे पुष्कल लूट मिळवून शिवाजीराजे सन

1660च्या जानेवारीअखेर राजगडावर परत आले. इकडे त्याचवेळी त्यांच्या सरदारांनी राजापूर व दाभोळ ही ठिकाणे काबीज केली.

शिवाजीराजांनी अफझलखानास मारले, रुस्तुमिजमानचा पराभव केला व पन्हाळगड घेऊन विजापूरच्या मुलखात पाहिजे तशी लूट मारण्याचा सपाटा चालवला इत्यादी गोष्टी समजल्यावर आदिलशहाची पाचावर धारण बसली आणि 'शिवाजीराजांचा बंदोबस्त कसा करावा' हा दरबारात मोठा विचार पडला. रुस्तुमिजमान तर उघड-उघड शिवाजीचा दोस्त बनला. 'आता विजापूरचे राज्य संपून शिवाजीचे चालू होणार, त्याचा बाप शहाजी सतरा हजार फौज घेऊन कर्नाटकातून त्याचे मदतीस येत आहे,' अशा बातम्या 'पाश्चात्त्य व्यापाऱ्यांनी' आपापल्या वरिष्ठांना लिहून कळवल्या. यावेळी उत्तरेकडून मोगलांचे व दक्षिणेकडून विजापूरचे अशी दोन शत्रूंची तोंडे सांभाळून शिवाजीराजांनी आपला उद्योग मोठ्या शिताफीने निभावून नेला, ही गोष्ट त्यांची लोकोत्तर कर्तबगारीच दाखवते.

सिद्दी जौहर नावाचा विजापुरी सरदार कर्नूल प्रातंाच्या कारभारावर होता. तो मूळचा 'मलीक रयहान' नामक सरदाराचा नोकर असून, धनी मेल्यावर तो त्याच्या मुलास बाजूस सारून आपण कारभार बळकावून बसला होता. म्हणून आदिलशहाची त्याचेवर मर्जी नव्हती. प्रस्तुत प्रसंगी शहाने त्यास बोलावणे पाठवून कळवले की, 'शिवाजीवर चालून जाऊन त्याची तुम्ही खोड मोडाल, तर तुम्हावरील आमची इतराजी नाहीशी होईल.' सिद्दी जौहर याने ही गोष्ट तत्काळ मान्य केली. आदिलशहाने त्यास सलाबतखान असा किताब देऊन शिवाजीराजांवर पाठवले. त्याजजवळ दहा हजार स्वार व चौदा हजार पायदळ इतकी फौज असून शिवाय बाजी घोरपडे, रुस्तुमिजमान हे आपल्या फौजा घेऊन सामील झाले. शिवाय अफझलखानाचा मुलगा फाजलखान हा बापाच्या वधाचा सूड घेण्याकरता बरोबर होता. ही तयारी पाहून जंजिऱ्याचा सिद्दी व वाडीचे सावंत हेही शिवाजीराजांवर उठण्यास उद्युक्त झाले. इकडे शिवाजींनी एक महिना पन्हाळ्यावर राहून शत्रूशी लढण्याची तयारी केली. त्याने आपले भरंवशाचे सरदार आजूबाजूच्या प्रांतात बंदोबस्तास ठेवले. राघो बल्लाळ यास सिद्दीवर नजर ठेवण्यास पाठवले. बाजी पासलकर यास वाडीचे सावंताची बाजू सांभाळण्यास नेमले. पुरंदर, सिंहगड, प्रतापगड यांच्या आटोक्यातील मुलुखात मोरोपंत पिंगळे फौजबंद राहिले. कल्याण प्रांती आबाजी सोनदेव होतेच. ह्याप्रमाणे तयारी करून, स्वत: शिवाजीराजे पन्हाळा किल्ल्यावर गुढीपाडवचे दिवशी म्हणजे ता.2.3.1660 रोजी येऊन राहिले.

यापूर्वीच सलाबतखानाने शिवाजीराजांचा पराभव केला असा मजकूर ता. 3.3.1660 च्या एकोजी भोसल्यास गेलेल्या अली आदिलशहाच्या फर्मानात आहे, तो असा :-

'कळविण्यात येते की बंडखोर शिवाजीचे पारिपत्य करण्यास सिद्दी जोहर सलाबतखान यांची इकडून रवानगी करण्यात आल्यावर शिवाजी पराभव पावून पळून

गेला आणि आदिलशाही फौजा त्याचे पाठलागावर चालून गेल्या आहेत. छ 1 रजब सन 1070 हिजरी.'

यावेळी शिवाजीराजांचा 'खरोखरच पराभव झाला की काय?' हे समजण्यास प्रत्यंतर पुरावा नाही. तथापि ते बचावासाठी पन्हाळ्यावर येऊन राहिले हे उघड आहे. पावसाळा नजीक आल्यामुळे पन्हाळ्यावर आपला निभाव लागेल असे त्यांस वाटत होते. पण सलाबतखानाने वैशाख अखेर वेढा पुरा करून शिवाजीराजांचा बाहेरचा संबंध साफ तोडला. शिवाजीराजांची बाहेरची भिस्त नेताजींवर होती. त्यांनी विजापूरचे धनाढ्य शहर शहापूर लुटले. तेव्हा मुल्ला महंमद विजापुरी फौज घेऊन त्यांचेवर चालून आला, त्याचा नेताजींनी पराभव केला आणि प्रत्यक्ष विजापुरावर चाल केली. तेव्हा खवासखान वजिराने पाच हजार सैन्यानिशी नेताजींशी निकराने लढून त्यांना पिटाळून लावले.'

नेताजींची फौज थोडी असल्यामुळे बाहेरून सिद्दी जोहरला पन्हाळ्याखाली शह पोहोचविण्याचे कार्य त्यांना साधले नाही. तथापि किल्ल्यावर कडतोजी ऊर्फ प्रतापराव गुजर होता त्याने रात्री अपरात्री वारंवार हल्ले करून व छापे घालून विजापुरी फौजेची अतिशय खराबी केली. जोहरने राजापूरच्या इंग्रजांची मर्जी संपादली आणि त्याजकडून वेढ्याच्या कामी उपयोगी पडणारे दारूगोळ्याचे सामान व इंग्रज गोलंदाज आणवले. इंग्रज वखारीचा मुख्य हेन्री रिव्हिंग्टन, मिंघम, गिफर्ड व वेलजी असे राजापुराहून अणस्कुरा घाटाने 1 तोफ व 50 गोळे घेऊन एप्रिलात पन्हाळ्याजवळ दाखल झाले. राजापूरच्या इंग्रजांचा पुढे शिवाजीराजांनी उच्छेद केला, त्याचे हे मुख्य बीज होय.

इकडे याच संधीस शायिस्ताखानाने पुणे प्रांतावर स्वारी करून शिवाजीराजांच्या ताब्यातील कित्येक स्थळे काबीज केली. फेब्रुवारीअखेर खान नगरहून निघून दोन महिन्यात शिरवळपर्यंत आला. त्याला थोपवून धरण्याचे सामर्थ्य नेताजीला राहिले नाही. पन्हाळ्याचा वेढा तर दिवसेंदिवस निकराचा झाला. जिजाबाई रायगडावर होती, तळाशी शिवापट्टण येथे तिने नेताजी व इतर मंडळींचा विचार घेऊन प्रथम शिवाजीराजांना सोडवून बाहेर काढावे असे ठरवले. शिवाजीराजांनाही आपण बाहेर पडल्याशिवाय परिस्थिती निवळणार नाही असे वाटून आधी तोच डाव त्याने हाती घेतला आणि नेताजीलाही त्यांनी तसेच सुचवले. वेढ्यात उपासमार किंवा अन्य अडचणी उत्पन्न झाल्यामुळे महाराजांना हरउपायाने स्वतःच्या बचावासाठी बाहेर पडावे लागले अशातला भाग नाही. प्रथम त्यांनी शरण येऊन तह करण्याची हुलकावणी दाखवली. त्यावरून महाराज आता आपले हाती खचित येतील, अशी सलाबतखानास मोठी आशा लागली आणि तो वेढ्याचे काम जोराने चालवू लागला. तेव्हा 'किल्ला स्वाधीन करून देतो आणि अभयवचन दिल्यावर आपण स्वतः किल्ल्याखाली येऊन स्वाधीन होतो,' असे शिवाजीराजांनी त्याच्याशी बोलणे लावले. त्याप्रमाणे इमान झाल्यावर शिवाजीराजे एका मोर्च्याजवळ येऊन खानास भेटले, तेव्हा दुसरे दिवशी किल्ला स्वाधीन करण्याचे ठरले. नंतर शिवाजीराजे परत किल्ल्यात गेले. त्या

रात्री सलाबतखानाचे सैनिक, 'तह ठरला' असे समजून बेसावध राहिले. दुसरे दिवशी आषाढ व.1, ता. 13 जुलै 1660 रोजी मध्यरात्र होताच शिवाजीराजे मावळ्यांची एक हजारांची टोळी बरोबर घेऊन अंधारातून शत्रूचे चौक्यापहारे चुकवीत किल्ल्याखाली उतरले आणि थेट विशाळगड किल्ल्याकडे चालते झाले. शिवाजीराजे निघून गेले हे बराच वेळ विजापूरच्या फौजेस कळलेसुद्धा नाही. परंतु पक्की खबर लागताच सलाबतखानाने आपला जावई सिद्दी मसूद व फाजलखान यांना ताबडतोब घोडेस्वार बरोबर देऊन शिवाजीराजांच्या पाठलागावर पाठवले. परंतु सकाळी बराच वेळपर्यंत त्यांना शिवाजीराजे दिसले नाहीत. शिवाजीराजे किल्ल्याचा घाट चढत असताना शत्रूचे सैन्य पाठलाग करीत आलेले पाहून त्यांनी बाजूप्रभू याचे हाताखाली काही मावळेलोक देऊन त्यांस किल्ल्याजवळील खिंडीत पांढऱ्या पाण्यानजिक ठेवले, आणि सांगितले की, ''मी किल्ल्यावर सुखरूप पोहोचल्यावर तोफा ऐकू येईपर्यंत शिकस्त करून शत्रूस पुढे येऊ न देता तेथेच अडवून धरावे.'' ह्याप्रमाणे ते शूर वीर बाजी प्रभू शत्रूस अडवण्याकरता खिंडीत आडवे उभे राहिले. यवन येऊन अंगाशी भिडले. बाजी प्रभुंनी आपल्या शूर मावळ्यांनिशी शत्रूंवर निकराचा मारा करून त्यास खिंडीतून परत खाली घालवले. पुढे विजापूरचे पायदळ येऊन पोहोचल्यावर त्यांनी फिरून दोनदा हल्ले केले, तेही बाजींनी मागे हटवले. त्यानंतर दुपारचे सुमारास फाजलखान ताज्या दमाची टोळी घेऊन स्वत: चाल करून आला. बाजी प्रभूंचे यापूर्वी बरेच लोक पडले होते. तरी ते मोठ्या आवेशाने लढू लागले. त्यांचे सर्व लक्ष किल्ल्यावरील तोफेकडे होते. त्यांचे अर्धेअधिक मावळे लोक रणांगणी पडले, त्यात बाजीही गोळी लागून पडले. पण प्राणोत्क्रमणापूर्वी शिवाजीराजे सुखरूप पोहोचल्याबद्दल किल्ल्यावरील तोफा त्यांना ऐकू आल्या. त्यामुळे मरताना अत्यंत समाधान वाटून, ''मी आपली कामगिरी बजावली,'' असे उद्गार काढून,[60] त्यांनी प्राण सोडला. मावळे लोकांनी बाजींचे प्रेत शत्रूच्या हाती लागू न देता मोठ्या शिताफीने किल्ल्यावर पोहोचते केले. ते पाहून शिवाजीराजांना किती दु:ख व बाजीच्या नि:सीम भक्तीबद्दल किती प्रेम वाटले असेल याची कल्पनाच केली पाहिजे.

बाजी प्रभू देशपांडे 'सिंधकर प्रधान' विशाळगडाखाली पडला त्यास सात मुलगे होते. वडिलमुलगा 'बाबाजी बाजी' यास शिवाजीराजांनी बापाची सरदारी दिली आणि इतरांना पालख्या व तैनात देऊन मावळे लोकांची सबनिशी सांगितली.

सिद्दी जोहर सलाबतखान हा मूळचा बंडखोर असून त्याजवर आदिलशहाचा विश्वास नव्हता. शिवाजीराजे निसटून गेले हे शहास कळताच त्याची खात्री झाली की त्याने लाच घेऊन शिवाजीराजांना जाऊ दिले. त्यावरून चिडून जाऊन स्वत: अली आदिलशहा ता.5.8.1660 रोजी फौज घेऊन मिरजेस तळ देऊन राहिला. तेथून पन्हाळ्याचा वेढा निकराने चालवून किल्ला काबीज केला. पन्हाळा लढवणे व शायिस्ताखानास शह देणे या

दोन गोष्टी एकदम सिद्धीस नेणे शिवाजीराजांना शक्य वाटले नाही. तेव्हा पन्हाळा सोडून देण्याचे ठरवून तेथील अधिकारी त्र्यंबक भास्कर यास महाराजांनी कळविले की, 'किल्ला सिद्दी जोहरचे ताब्यात द्या!' त्याप्रमाणे ता. 22.9.1660 रोजी पन्हाळगड आदिलशहाचे कब्जात आला. पुढे 'शहा आपणास शिक्षा करील' या भीतीने सिद्दी जोहर शहास न भेटता परस्पर आपल्या जहागिरीकडे कर्नूल येथे निघून गेला. तेथे त्याचा छळ झाला. तो दु:सह होऊन दोन महिन्यांनी विषप्राशनाने त्याने आत्महत्या केली (सन 1661)[61]. एवंच 'कल्याण तो तहत् बिदनूरपर्यंत कोकण किल्ले सुद्धा राज्य महाराजांचे झाले. विजापूरची बादशहात फार करून त्यांनी घेतली. राहिली तीही पादाक्रांत करू अशी त्यास उमेद आली. अमीर आले तितके नामोहरम कले.'

प्रकरण 5 - औरंगजेबाची गाळण उडाली

(सन 1661-1663)

1.उंबराणीचे खिंडीत करतलबखानाची त्रेधा; 2.दक्षिण कोकण काबीज; 3.राजापूरची लूट, सात इंग्रजांना कैद; 4.शायिस्ताखानावर रात्रीचा छापा.

1) उंबराणीचे खिंडीत करतलबखानाची त्रेधा (3.2.1661) :-

अफझलखान प्रकरणाने शिवाजीराजांस नाना प्रकारचा नवीन अनुभव प्राप्त झाला. 'आपले शत्रू कोण व मित्र कोण' आणि 'बाह्य जगात कोणाशी कसे वागावे' व 'आपले राज्य वृद्धिंगत कसे करावे' याची त्यांस कल्पना येऊन तदनुसार त्याने आपला उद्योग चहूकडे चालू केला. 'या गोष्टीचे पूर्ण अनुसंधान ठेवल्याशिवाय ऐतिहासिक संगती लक्षात येणार नाही' ही नीति ठरवली. यात मोगलांचा शायिस्ताखान, कोकणातले दळवी व सुर्वे, राजापूरचे इंग्रज यांचा संबंध येतो. सन 1660च्या ऑगस्टमध्ये चाकण उर्फ संग्रामदुर्ग हे ठिकाण हस्तगत करून शायिस्ताखान पुण्यास येऊन राहिला. चाकणची मैदानी गढी अगदीच लहान असतानाही ती काबीज करण्यात खानाचे नऊशे लोक खर्ची पडले. या अनुभवाने त्याने शिवाजीचे किल्ले घेण्याचा उद्योग सोडून दिला. बसल्या-बसल्या त्याने आदिलशहाचा परिंडा किल्ला तेथील अधिकाऱ्यास मोठी रक्कम देऊन हस्तगत केला (ता.20.11.1660). शिवाजीराजांनी पावसाळ्याचे महिने राजगडावर काढून पुढील बेत ठरविले, ते शायिस्ताखानाने उत्तर कोकण प्रांत शिवाजीराजांचे ताब्यातून घेण्याचे ठरवले. त्या भागात इस्माइलखानाच्या हाताखाली लहानशी फौज ठेवलेली होतीच. बाबाजीराम होनप देशपांडे वगैरे त्या भागातले कित्येक मराठे मोगलांना सामील होते. त्यांच्या हातून म्हणण्यासारखी कामगिरी झाली नाही, तेव्हा करतलबखान म्हणून एक नावाजलेला सरदार शायिस्ताखानाचे हाताखाली होता, त्यास त्याने या नवीन कामगिरीवर नेमले. उदाजीरामाची[62] शूर स्त्री रायबागण ही त्याजबरोबर आपली लष्करी तुकडी घेऊन हजर होती. सन 1661 च्या जानेवारीत करतलबखान पुण्याहून निघाला आणि लोहगडाखालच्या

उंबरखिंडीने[63] कोकणात उतरू लागला. त्याच्या हालचालींची बिनचूक माहिती शिवाजीराजांना मिळून खिंडीच्या सभोवार डोंगरांच्या दाट झाडीत त्यांनी आपली फौज गुप्तरूपे बसवून ठेवली, तिचा मागमूस खानास नव्हता. निरुंद वाटांनी अवघड जागांतून मोगल फौजा संचार करीत पूर्ण काबूत आल्याचे आढळताच शिवाजीराजांचे लोक भुतासारखे उठून त्यांचेवर पडले. खानाबरोबर तोफा वगैरे जड सामान असल्यामुळे त्याचा संचार साफ बंद झाला. ता.3.2.1661 रोजी प्रात:काळीच खानाची फौज सर्व बाजूंनी मराठ्यांनी वेढली. मागच्यांस पुढच्यांची दाद नाही की पुढच्यांना मागच्यांची नाही. काय झाले हे कळण्यासच त्यांना दोन प्रहर लागले आणि पाण्यावाचून त्यांचे प्राण तडफडू लागले. शरण जाऊन प्राणांची याचना करण्याशिवाय त्यांना गत्यंतर उरले नाही. करतलबखानाने शिवाजीराजांच्या लोकांची पायधरणी करून शरणागती कळवली, तेव्हा मोठा दंड ठरवून व सर्व सामान लुटून घेऊन महाराजांनी खानाला वाट दिली. डोंगरांतून मोठा पुकारा करून लगेच आपला हुकूम महाराजांनी ताबडतोब आपल्या सर्व लोकांना कळवला. जीव मुठीत घेऊन खान परत गेला. हा प्रसंग शिवभारतात रसाळ वाणीने वर्णिलेला आहे.[64]

2) दक्षिण कोकण काबीज (एप्रिल 1661) :

करतलबखानाचा पाडाव केल्याबरोबर नेताजीस मोगलांवर लक्ष ठेवण्यास नेमून शिवाजीराजांनी काही चपळ स्वारांची निवडक फौज बरोबर घेतली आणि विजापूरच्या ताब्यातील दक्षिण कोकणात प्रवेश केला. अफझलखानास आपल्यावर पाठविल्याचा पुरेपूर वचपा त्याला आता आदिलशहावर घ्यावयाचा होता. कल्याणपासूनचा दक्षिण किनारा हे त्याने आपल्या उद्योगाचे मुख्य अधिष्ठान बनविले. दाभोळ, राजापूर, कारवार वगैरे धनाढ्य बंदरे या किनाऱ्यावर असून त्यांचा बाह्य देशांशी मोठ्या किफायतीचा व्यापार चालू होता. या व्यापाराच्या प्राप्तीमुळे जंजिऱ्याचा सिद्दी बलाढ्य होऊन शिवाजीराजांना पावलोपावली विरोध करी. सबब त्याचे ठाणे तेथून उठवणे महाराजांचे मुख्य काम बनले. त्या पुढील कोकणाचा म्हणजे रत्नागिरीपासून कारवारपर्यंतचा भाग धाकटा रणदुल्ला उर्फ रुस्तुमिजमान याजकडे जागीर असून, त्यात राजापूर व कारवार ही दोन महत्त्वाची बंदरे होती. तेथे इंग्रजांच्या वखारी होत्या. ठोकळमानाने, कोल्हापूरपासून बेळगावपर्यंतचा घाटावरचा भागही या जागिरीत मोडत होता. तसेच वेंगुर्ला हे गलबतांच्या बाह्य संचाराचे मोठे बंदर होते. रुस्तुमिजमानशी शिवाजीराजांनी अंतस्थ सूत राखल्यामुळे या प्रदेशात शिवाजीराजांचा प्रवेश सुलभ झाला. अनेक विजापुरी सरदार परदेशच्या व्यापारात आपले भांडवल घालून व स्वत:ची गलबते ठेवून पैदास करीत, त्यांना उपद्रव न व्हावा म्हणून

शिवाजीराजांशी स्नेह ठेवण्याकडेच त्यांची प्रवृत्ती होती. सन 1660 मध्ये अफझलखानाचे वधानंतर शिवाजीराजांच्या फौजेने दक्षिण कोकणात एक फेरी केली होती, तिची पूर्तता त्यांनी पुन्हा सन 1661 मध्ये केली आणि कोकणातील धनाढ्य शहरे व पेठा हस्तगत करून तेथे आपले अंमलदार नेमले. प्रथम निजामपूर लुटून तो दापोलीच्या उत्तरेस पालवण म्हणून ठिकाण होते त्याजवर चालून गेला. पालवणचा राजा यशवंतराव, पन्हाळ्याचे वेढ्यात शिवाजीराजांविरूद्ध लढला, म्हणून त्याचे पारिपत्य करून त्याने ते ठिकाण काबीज केले. तेव्हा यशवंतराव पळून शृंगारपुरकर सुर्व्यांचे आश्रयास गेला. याच शृंगारपुरकर सुर्व्याचे ताब्यात त्यावेळी प्रभावळीचे ठिकाण होते. पालवण घेतल्यावर महाराजांनी दाभोळचे धनाढ्य ठाणे दळवींच्या ताब्यात होते ते हस्तगत केले व चिपळुणास परशुरामाचे दर्शन घेऊन सावर्ड्यावरून ते संगमेश्वरास गेले. त्यांच्या आगमनाची वार्ता ऐकूनच संगमेश्वरचा मुसलमान अधिकारी पळून गेला. अनायासे ते ठिकाण शिवाजीराजांच्या कब्जात आले. तेथे तानाजी मालुसरे व पिलाजी नीळकंठ यास बंदोबस्तास ठेवून ते देवरुखवरून राजापुरास गेले. राजापुरास इंग्रजांची वखार होती ती लुटून त्यांनी सहा इंग्रजांना पकडून कैदेत ठेवले, त्याचे प्रकरण पुढे विशेष गाजले, त्याची हकिगत स्वतंत्रच दिली आहे. राजापूर व खारेपाटण येथे शिवाजीराजांनी आपले अधिकारी नेमले. इतक्यात शृंगारपुरचा सूर्यराव सुर्वे याने संगमेश्वरास तानाजींच्या फौजेवर हल्ला केल्याची बातमी शिवाजीराजांना कळली, म्हणून ते लगोलग परत आले. सूर्यरावाने पूर्वी जावळीचे मोऱ्यांना साह्य करून कैक वर्षे वेळीअवेळी शिवाजीराजांचा निकराचा विरोध चालवला असल्यामुळे त्याजला एकवार चांगली दहशत बसविण्याचा शिवाजीराजांनी निश्चय केला. यापूर्वी सूर्यरावाची समजूत करून त्यास आपल्या बाजूस वळविण्याचे होते तेवढे प्रयत्न महाराजांनी केले, पण ते सफल झाले नाहीत. खारेपाटणाहून निघून ते ता. 29.4.1661 रोजी शृंगारपुरावर आले. ते येताच सूर्यराव पळून गेला आणि शृंगारपूर महाराजांचे कब्जात आले. तेथे त्रिंबक भास्कर यास आपला कामगार नेमून महाराजांनी रायगडाकडे प्रयाण केले. मिळून खारेपाटणपर्यंतचा सर्व प्रदेश या स्वारीत त्यांचे राज्यात सामील झाला. शृंगारपुराजवळ प्रचितगड आणि दापोलीजवळ पालगड व मंडनगड हे किल्ले महाराजांनी नवीन बांधवले. सुर्व्यांजवळ शिर्के नावाचा कारभारी होता, त्यास आपले पदरी घेऊन त्याची मुलगी सोयराबाईंशी त्यांनी 1660 मध्ये लग्न केले. तेव्हापासून मराठेशाहीच्या अखेरपर्यंत हे शिर्क्यांचे घराणे छत्रपतींजवळ नांदत होते. त्यांचे वास्तव्य कुटरे येथे आहे. येणेप्रमाणे 'तळकोकण महाराजांना अर्जानी झाले,' आणि या प्रदेशातील कारभाराची वगैरे व्यवस्था लावून आणि देवस्थानांचा योग्य बंदोबस्त ठरवून महाराजांनी प्रजाजनात निश्चिंती उत्पन्न केली.[65]

3) राजापूरची लूट, सात इंग्रजांस कैद (मार्च 1661-जाने.1663) :

सन 1660 मध्ये शिवाजीराजांची फौज, कोकण हस्तगत करीत दाभोळवर आली, तेव्हा त्या धनाढ्य बंदरात अफझलखानाची तीन जहाजे होती ती घेऊन दाभोळचा विजापुरी अंमलदार महंमद शरीफ पळून राजापुरास गेला. राजापूर येथे अब्दुल करीम नावाचा अंमलदार होता, त्यास अफझलखानाचा पुत्र फाजलखान याने कळवले, की तुमचेकडे दाभोळची तीन गलबते आली असून त्यांजवर आमचे वडिलांचा माल आहे तो आपले ताब्यात सुरक्षित ठेवावा. आपला शत्रू अफझलखान याची ही जहाजे असे शिवाजीराजांना समजताच त्याने दाभोळेस लगेच हुकूम पाठवून आपला अंमलदार दोरोजी यास ती गलबते ताब्यात घेण्यास त्वरेने राजापुरास रवाना केले. शिवाजीराजांनी केलेली अफझलखानाची दुर्दशा जगजाहीर होतीच. तेव्हा अब्दुल करीम अत्यंत भयभीत होऊन जीव बचावण्यासाठी त्या गलबतांवर चढला आणि पळून जाणार होता. इतक्यात ती गलबते इंग्रजांनी आपल्या कबजात घेतली. दोरोजीने ती मागितली असता इंग्रज म्हणू लागले, अब्दुल करीमकडे आमचे व्यापारी कर्ज घेणेआहे त्याचे फेडीसाठी ही गलबते आम्ही घेतली. त्यावरून महाराजांचा इंग्रजांशी तंटा सुरू होऊन कदाचित आपण पकडले जाऊ या भीतीने इंग्रज वखारीचा मुख्य रेव्हिंग्टन हा अब्दुल करीमसह बंदर सोडून भर समुद्रात निघून गेला. त्यावरून दोरोजीने दुसरा व्यापारी गिफर्ड मागे होता त्याला पकडून घेतले. (20.1.1660) अशाप्रकारे शिवाजीराजांचा इंग्रजांशी पहिला तंटा सुरू झाला. राजापूरचा मुख्य मालक रुस्तुमिजमान, त्याचे शिवाजीराजांशी व इंग्रजांशी सख्य होते. त्याने दोरोजीच्या आगळिकीबद्दल महाराजांकडे तक्रार केली. ती ऐकून महाराजांनी कैदी व सामान दोरोजीकडून इंग्रजांना परत देववले. अशारीतीने पहिला तंटा कसाबसा मिटला. हा प्रकार सन 1660 मध्ये झाल्यावर पुढे लवकरच महाराज पन्हाळ्याच्या वेढ्यात अडकले. त्या युद्धात सिद्दी जोहरच्या मागणीवरून रेव्हिंग्टन, मिंघेम, गिफर्ड व त्यांचा दुभाष्या वेलजी असे राजापुरचे इंग्रज व्यापारी 1 तोफ व 50 गोळे घेऊन पन्हाळ्यावर गेले. महाराजांनी आपली आगळीक न करण्याविषयी त्यांना बजावले असता इंग्रजांनी ऐटीने आपला बावटा समोर दाखवून सिद्दी जोहरकडून पन्हाळ्यावर गोळे टाकवले. इंग्रज हे त्रयस्थ व्यापारी असल्यामुळे एतद्देशीयांच्या युद्धात एका पक्षास मदत करून दुसऱ्यास दुखविणे त्यांना रास्त नव्हते. पुढे संधी येताच महाराजांनी या अपकृत्याचा भरपूर सूड घेतला.

पुढील साली सन 1661 च्या मार्च महिन्यात महाराजांनी स्वत: दक्षिण कोकणावर स्वारी केली. त्याप्रसंगी त्यांनी एक हजार स्वार व तीनहजार पायदळ आगाऊ राजापूर हस्तगत करण्यासाठी पाठवले. जवळ येताच महाराजांनी शहरातील मुख्य इसमास भेटीस

बोलावले. एतद्देशीय मंडळी आली, त्यांचेबरोबर रेव्हिंग्टन व दुसरे सहा इंग्रज केवळ जिज्ञासेने म्हणून भेटीस गेले. त्यांची नावे अशी, 'रॅंडॉल्फ टेलर, रिचर्ड टेलर, गिफर्ड, फेरांड, रिचर्ड नेपियर व सॅम्युएल बर्नार्ड.' महाराजांनी एकदम या सर्व इंग्रजांना गिरफ्तार करून त्यांची जिंदगी जप्त केली व काहींना महाडजवळच्या सोनगडावर व बाकीच्यांना वासोटा किल्ल्यावर अटकेत ठेवले. बर्नार्ड व नेपियर कैद झाल्यावर एक महिन्याने राजापुरासच मरण पावले. रावजी सोमनाथ पंडित हा त्यावेळी राजापुरास महाराजांचा दरोगा म्हणून होता, त्याने इंग्रजांना कळवले, 'महाराजांना सिद्दीचे ताब्यातून दंडा-राजापुरी घ्यावयाची आहे, त्याकामी तुम्ही मदत करीत असाल तर तुम्हास सोडून मोठे बक्षीस देऊ, नाहीतर दंड भरल्याशिवाय तुमची सुटका व्हावयाची नाही.' त्यांनी या गोष्टी साफ झिडकारून दिल्या. याप्रसंगी राजापूरच्या दुसऱ्याही पुष्कळ हिंदू व मुसलमान व्यापाऱ्यांना महाराजांनी पकडले आणि पैशासाठी त्यांचा छळ केला.

कैदेत पडलेल्या इंग्रजांची निगा महाराजांनी फार चांगली ठेवली. परंतु महाराज, पुढे राजापूर सोडून परत कल्याणचे बचावासाठी गेल्यामुळे या कैदी इंग्रजांच्या सुटकेचा प्रश्न फार दिवस रेंगाळत पडला. त्यांनी त्रागा केला; धाक घातला; सुरतच्या इंग्रज प्रेसिडेंटास आपल्या सुटकेचा प्रयत्न न केल्याबद्दल नाही-नाही तशी पत्रे लिहिली. प्रेसिडेंट ऑक्झिंडेन याने त्यांची बिलकूल कीव केली नाही. उलट ता. 10.3.1662 च्या पत्रात त्याने त्यांची भरपूर खरडपट्टी काढलेली आढळते. तो लिहितो, 'कंपनीच्या मालाचे संरक्षण केल्यामुळे तुम्हास ही कैद प्राप्त झाली असे तुम्ही म्हणता ते साफ खोटे आहे पन्हाळ्याच्या वेढ्यात इंग्रजांचे निशाण फडकावून तुम्ही गोळे उडवले त्याचे हे प्रायश्चित्त आहे. तुम्ही अशी आगळीक दुसऱ्या कोणाची केली असती तरी त्याने अशीच शिक्षा केली असती. व्यापारी म्हणवणाऱ्यांनी दारूगोळा विकायचा नसतो की शत्रुसैन्यावर उडवायचा नसतो. परदेशात असे उपद्व्याप केल्यावर असेच फळ भोगावे लागते.' रेव्हिंग्टनला तर महाराजांनी बजावले होते की, 'तुम्ही आमच्या वाटेस जाऊ नका.' सुरतच्या प्रेसिडेंटने त्यांना असे कळवले की, 'शिवाजीराजांना वठणीस आणण्याइतकी आज आमची ताकद नाही; सबब तुम्ही आपले क्लेश असेच निमूटपणे सहन केले पाहिजेत.' अशारितीने बाहेरचे उपाय हरले तेव्हा दंडाची रक्कम ठरविण्यासंबंधी त्यांनी महाराजांकडे बोलणे सुरू केले. रेव्हिंग्टन आजारी पडला आणि 'बरा होऊन पुन्हा परत येईल' असे कबूल केल्यावर त्याची सुटका झाली. तो ता.17.10.1661 रोजी सुरतला गेला आणि तेथेच तो पुढे एक वर्षाने मरण पावला. ता. 17.1.1663 रोजी रावजी पंडिताने रायरीस येऊन बाकीच्यांची सुटका केली आणि त्यांना राजापुरला आणले. तेथे रावजीने त्यांना महाराजांच्या खास शिक्क्याचे पत्र वाचून दाखवले आणि त्यांना कळवले की, 'झाल्या गोष्टी विसरून जाव्या. विजापुराशी युद्ध चालू होते, त्यामुळे राजापूरला उपद्रव घडला. त्यावेळी महाराजांना दोन शत्रूंशी लढताना पैशाची टंचाई भासून लूट करणे भाग पडले. परंतु पुन्हा असे प्रकार आमचेकडून होणार नाहीत' असा

महाराजांचा खास शिक्क्याचा हुकूम वाचून दाखवून रावजीने सर्व कैद्यांची सुटका केली. तेव्हा ते पुन्हा राजापूरला व्यापार करू लागले. कैदेतील बंदिवासाच्या त्यांच्या हकिगती विस्तृत व वाचण्यालायक आहेत. 'राजापूरच्या प्रकरणात चोवीस हजार होन लूट, दोन इसमांचा मृत्यु व आमची दोन वर्षे कैद इतके नुकसान झाले,' असे एका इंग्रजाने सुरतेस लिहून कळवले. ही नुकसानी भरून देण्याबद्दल इंग्रजांचे टुमणे महाराजांच्या मागे कैक वर्षे लागून राहिले होते. पण इंग्रजांना त्यापासून लभ्यांश काही झाला नाही.

4) शायिस्ताखानावर रात्रीचा छापा (ता.5.4.1663) :

दक्षिणकोकणचा ताबा पुरा होतो तो प्रयासाने जिंकलेले उत्तर कोकण महाराजांच्या हातातून गेले. करतलबखानाचा पाडाव झाल्यावर शायिस्ताखानाने दुसरी मोठी फौज मे 1661 मध्ये पाठवून कल्याण व तदंतर्गत प्रदेश काबीज केला, तो पुन्हा परत घेण्यास महाराजांना नऊ वर्षांचा काळ लागला. पेणपासून दक्षिणेचा प्रदेश मात्र त्यांनी हातचा जाऊ दिला नाही. सन 1661 चा पाऊसकाळ संपल्यावर पुन्हा थोडीबहुत चळवळ मोगलांनी सुरु केली. त्यांचा सरदार नामदारखान पेणवर आला. पण महाराजांनी निकराने लढून त्याचा पराभव केला. (जाने. 1662) शायिस्ताखान पुण्यास खळे देऊन बसला, त्यामुळे महाराजांचे तिकडील बहुतेक उद्योग बंद झाले. सन 1662 मध्ये खानाचे हातून म्हणण्यासारखे कृत्य काहीच घडले नाही. मात्र दक्षिणकोकणातून व पुणे-सातारा प्रांतातून शिवाजीराजांचा उच्छेद करण्याचे त्याचे इलाज एकसारखे चालू होते. त्याने दोन मोठ्या फौजा तयार करून एक घाटाखाली चौलजवळ व दुसरी घाटावर रहिमतपूर येथे ठेवली आणि दोन्ही बाजूंनी महाराजांना रेटण्याचा प्रयत्न चालवला. अशा स्थितीत काहीतरी युक्तीने पुण्यातून खानाचे आसन उठवले नाही, तर आपल्या प्राणावर बेतणार अशी आणीबाणीची वेळ येऊन ठेपली. असा निकराचा प्रसंग येतो तेव्हाच थोर पुरुषांची कर्तबगारी कयास लागते. यापूर्वी मोरे, अफझलखान सिद्दी जोहर, करतलबखान इत्यादिकांना महाराजांनी चांगला हात दाखवून यश मिळवले; पण त्याहून हल्लीचा प्रसंग जास्त अनर्थावह होता. समस्त मोगल बादशाही सत्तेला उलथून पाडण्याजोगे धाडस या प्रसंगाला जरूर होते. अशाही प्रसंगाचे वेळी शिवाजीराजांच्या अकल्य अनाकलनीय बुद्धीतून कशी शक्कल निघाली ते आता पाहू.

सन 1663 च्या मार्च महिन्यात नेताजींनी मोगलांच्या मुलखात स्वारी करून लूट मिळवली, पण मोगल स्वारांनी त्यांचा असा निकराने पाठलाग केला की मोठमोठ्या मजलांनी धावत परत येऊन त्यांना आपला बचाव करावा लागला. ते परत येताच

महाराजांनी पुण्यास शायिस्ताखानावर रात्रीचा छापा घातला, तो प्रकार आता सांगायचा आहे.

पुण्यात स्वत: खान महाराजांच्याच वाड्यात रहात होता. त्यांचाच तो राहाता वाडा असल्यामुळे त्याची रचना महाराजांच्या पूर्णपणे परिचयाची होतीच. महाराज नजिकच सिंहगडावर येऊन राहिले. मराठ्यांनी कपटाने घात करू नये, म्हणून खानाने आपला बंदोबस्त विशेष काळजीने केला होता. पुणे शहराची नाकेबंदी केली असून कोणीही हत्यारबंद मराठ्यास परवानगीशिवाय शहरात येण्याची मनाई होती. प्रथम दोन ब्राह्मण शहरात पाठवून खानाच्या व्यवस्थेची बारीक खबर महाराजांनी आणवली. चारशे निवडक मावळे बरोबर घेऊन महाराज सिंहगडावरून चंद्र 6 रमजान, ता. 5 एप्रिल सन 1663 रोजी सायंकाळी बाहेर पडले. बरोबर बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी हे दोन खेडचे हुशार प्रभू सरदार होते. 'आम्ही पहाऱ्यावरचे शिपाई पहारे सोडविण्यास जातो' असे सांगून, ते वाड्याच्या आवारात मध्यरात्रीपूर्वी शिरले. रमजानचा उपवास रात्री सोडून वाड्यातील मंडळींची सामसूम झाल्यावर चिमणाजी बापूजी हा दोनशे लोकांची एक टोळी बरोबर घेऊन मागच्या बाजूस स्वयंपाकघराच्या मागे आला. मध्यरात्री लष्करी बाजा होऊ लागताच त्या आवाजात कुदळींनी भिंतीस भोक पाडून ते वाड्यात शिरले. आत कापडी पडद्यांनी अनेक खोल्या बनवलेल्या होत्या, ते पडदे तलवारीने कापून शिवाजीराजे आणि त्यांचे लोक थेट खानाच्या खोलीत शिरले. जनानखान्यातील बायकांनी हे परके पुरुष आत पाहून एकदम गोंधळ केला. त्याबरोबर खानाचा मुलगा अबुल फत्तेखान तलवार घेऊन धावला, त्याचे डोके शिवाजीराजांच्या लोकांनी कापले. बायकांना वाटले खानच कापला गेला आणि लगेच दिवे मालवून त्यांनी आरडाओरड सुरू केली. इतक्यात पुढच्या दरवाज्यावरच्या पहारेकऱ्यांना कापून दुसरी दोनशेची टोळी घेऊन बाबाजी बापूजी आत शिरला. त्याचेपुढे खान हातात भाला घेऊन उभा राहिला. त्याच्या अंगावर काही लोक धावून गेले, तेव्हा त्याने एकाचे डोके उडवले. त्याबरोबर दुसऱ्याने खानाच्या हातावर वार केला, त्याने खानाचे बोट तुटून हातचा भाला सुटून खाली पडला. खान मेला अशा बायकांच्या आरोळ्या ऐकून 'आपले काम झाले' असे वाटून महाराजांचे लोक मागे परतले; पण रस्ता न सापडल्यामुळे आठ असामी टाकीत पडून बुडाले. बाकीचे दार उघडून पळून गेले. काही पहारेकऱ्यांना त्यांनी कापले. महाराजही बाहेर पडून बरोबरची सर्व मंडळी जमवीत परत सिंहगडावर आले. जसवंतसिंह जवळ फौजबंद होता, परंतु तो खानाच्या मदतीसाठी धावून आला नाही. पहाऱ्यापैकी सहा इसम मरण पावले आणि चाळीस जखमी झाले. खानाचा एक मुलगा, सहा बायका व दासी मारल्या गेल्या. स्वत: खान, त्याचे दोन मुलगे व आठ दासी जखमी झाल्या. अशारितीने चार वर्षे आपला राहता वाडा दाबून बसल्याबद्दल खानाचा सूड घेऊन शिवाजीराजे आल्यावाटेने अल्पावधीत पसार झाले.

पहाट होताच, मोगलांच्या फौजा मोठ्या त्वेषाने सिंहगडावर चालून गेल्या. त्या अगदी जवळ तोफेच्या टप्प्यात येताच त्यांचेवर महाराजांनी तोफा सुरू केल्या; त्यामुळे लोक जाया होऊ लागले. वेढा घालून बसावे तरी पुढे पर्जन्यकाळ, शिवाजी दगेबाज, तोफखाना आल्याशिवाय किल्ला हाती येणार नाही; तोफखाना आणावा तर अडचणीच्या जागेत मराठे तो लुटून टाकतील अशा विचारात खान असताना, त्याचा हत्ती किल्ल्यावरील गोळ्याने ठार झाला. तेव्हा शायिस्ताखान नाउमेद होऊन, 'शिवाजीराजांच्या नजीक राहणे ठीक नाही' असे जाणून, मजल दरमजल करत औरंगाबादला जाऊन छावणीत राहिला. पुढे जसवंतसिंहाने नोव्हेंबरमध्ये सिंहगडला वेढा घातला, पण त्याला त्यात लभ्यांश न होऊन उलट पुष्कळ लोक व एक बडा सरदार जाया होऊन ता.28.5.1664 रोजी वेढा उठवून तोही औरंगाबादला गेला. लगेच शिवाजीराजांनी सिंहगडावर जाऊन तेथील सर्व व्यवस्था केली.

छाप्याची वार्ता बादशहास काश्मिरात ता. 8 मे रोजी कळली. लगेच त्याने खानाची बदली केली. पण शिवाजीराजांचा सूड उगविण्याची खानास अनावर इच्छा असल्यामुळे त्याने काही दिवस इकडे राहण्याची परवानगी मागितली. 'आपणास लोक भित्रा म्हणतील, आणि एकवार सूड घेतल्याशिवाय आपणास चैन पडणार नाही,' असे त्याने कळकळीने लिहून कळवले. तथापि 'अशा क्षुब्ध मन:स्थितीत त्याचे हातून शहाणपणाचे काम होणार नाही', असे लिहून त्याने खानास एकदम बंगालमध्ये निघून जाण्याचा निक्षून हुकूम पाठवला आणि त्याचे जागी मुअज्जमची नेमणूक केली. शायिस्ताखान ता.1.12.1763 रोजी निघून गेला.[66]

अंगावर आलेला डाव अकल्पित चतुराईने उलटवून शिवाजीराजांनी यश मिळवले, तेणेकरून सर्वतोमुखी त्यांची वाहवा होऊन 'या पुरुषाचा पाडाव करणे शक्य नाही' अशी भावना सर्वत्र पसरली.

सन 1658 मध्ये औरंगजेब दिल्लीच्या सिंहासनावर दाखल झाल्यापासून त्याचे व विजापूरचे शिवाजीराजांवर एकदम आक्रमण सुरू झाले ते ह्या वेळपावेतो चालूच होते. पैकी विजापूरच्या राज्याची त्यांनी दाणादाण उडवली आणि औरंगजेबास तर शायिस्ताखानाची दुर्दशा पाहून शिवाजीराजांवर स्वत: चालून येण्याची छातीच झाली नाही. इकडे खानावर मिळविलेली बहादूरी आणखी एक तसाच अकल्प घाला घालून बादशहाची नापत करण्याचा शिवाजीराजांनी जो विलक्षण डाव टाकला त्याचे वर्णन पुढील प्रकरणात येईल.

प्रकरण 6 - प्रतिपच्चंद्रकला फैलावली

(सन 1664)

1.सुरतेची बेसुरत; 2.कुडाळ देश काबीज; 3.बाजी घोरपड्यावर दावा उगवला; 4.सिंधुदुर्गाची उभारणी.

1) सुरतेची बेसुरत (ता. 6 ते 10 जाने. 1664) :-

शशायस्तेखानावरच्या हल्ल्यानंतर लगेच आणखी एका अद्भूत कृत्याने शिवाजीराजांनी औरंगजेबास जबरदस्त धक्का दिला. सुरत हे त्येवेळचे श्रीमंत शहर, मोगल बादशाहीतील पश्चिम किनाऱ्यावरचे नाके व व्यापाराच्या प्रचंड घडामोडीचे स्थळ होते. त्यावर हल्ला केला म्हणजे अमाप द्रव्य मिळून मोगलांची पुण्याची मिठी सुटेल अशी युक्ती योजून सुरतेची स्वारी करण्याचा शिवाजीराजांनी विचार ठरवला. सन 1658 पासून 1707 पर्यंत सुरत शहराची अत्यंत भरभराट होती. बाहेरून हिंदुस्थानास येणारे कोणतेही व्यापारी गलबत सुरतेला आल्याशिवाय जात नसे. सन 1664 मध्ये सुरतेत हाजी सय्यद बेग व बहर्जी बोहरा हे दोन व्यापारी इतके सधन होते की, पृथ्वीवर त्यांच्याइतके समृद्ध त्यावेळी कोणी नव्हते. एक हिंदू व्यापारी तर आठ कोटी रुपयांचा धनी होता. पुढे सांगायच्या स्वारीत शिवाजीराजांना एका हिंदू व्यापाऱ्याचे घरी 28 शेर वजनाचे मोत्यांचे कंठे सापडले. मुल्ला अब्दुल जाफर म्हणून एक व्यापारी होता, त्याची स्वत:ची 19 गलबते मालाने भरलेली होती. दुसरे असे पुष्कळ व्यापारी होते की, ज्यांच्या वखारीतील मालाने एकेका जहाजाची भरती तेव्हा सहज झाली असती. शिवाजीराजांची राजधानी पुणे होती, म्हणूनच मोगल सुभेदार पुण्यास येऊन राहत. मोगलांच्या हल्ल्यापासून आपला बचाव व्हावा यासाठीच पुढे शिवाजीराजांनी पुणे सोडून पश्चिमेस डोंगरात रायगडावर आपली राजधानी केली. सुरतेची ही मोहीम स्वत: शिवाजीराजांनी अंगावर घेतली. जंजिऱ्यानजीक दंडा-राजापुरीजवळ एक व कल्याण येथे दुसरी अशा दोन फौजा आदल्या वर्षी त्यांनी तयार केल्या, त्या पोर्तुगीझ व सिद्दी यांचा पाडाव करण्याकरता जमवल्या आहेत असे जाहीर केले. पण अंत:स्थ हेतू

निराळाच होता. बहिर्जी नाईक म्हणून शिवाजीराजांच्या नोकरीत एक हुशार हेर असून तो निरनिराळ्या ठिकाणची माहिती काढून आणण्यात पटाईत होता. त्याने सुरत येथील खडान्खडा बातमी आणून महाराजांना दिली. नंतर उत्तरेच्या बाजूस काही निकडीचे काम काढून महाराज मोठ्या झपाट्याने नाशिकला गेले आणि 'तेथेच मुक्काम आहे' असे लोकांस भासवून, चार हजार निवडक घोडेस्वारांनिशी ता. 6 जानेवारी सन 1664 रोजी सकाळी एकदम सुरत शहरापुढे येऊन धडकले. परदेशच्या व्यापाराचे मुख्य ठिकाण, सर्व पश्चिम हिंदुस्थानचे नाके, व प्राचीन काळापासून संपत्तीचे माहेरघर असे ते दोन लाख अठरापगड वसतीचे शहर मोगली फौजेस दाद लागण्यापूर्वी शिवाजीराजांनी सावकाशपणे पाच दिवसपर्यंत लुटून सुमारे पाऊण कोटीची मत्ता लांबवली.

मंगळवार ता. 5.1.1664 रोजी महाराज घणदेवीस दाखल झाले आणि ते पुढे चालून येत असल्याची बातमी सुरतेत पसरून लोकांचे अंगात एकदम धडकी भरली. शहरातले लोक भयभीत होऊन संरक्षणासाठी बायकामुलांसह बाहेर निघून गेले. लोकवस्ती बहुतेक तटाच्या बाहेर होती. शहराचा मोगल अंमलदार इनायतखान नामक असून त्याचे जोडीस किल्लेदार आणखी निराळा होता. त्याशिवाय नदीकिनाऱ्यावर इंग्रज व डच यांच्या वखारी असून, त्या वखारींनाही थोडीबहुत तटबंदी होती. काही धनाढ्य व्यापाऱ्यांनी किल्लेदारास पैसे भरून तटाचे आत आश्रय मिळविला. आदले दिवशी सायंकाळी शिवाजीराजे नगराबाहेर पाच मैलांवर येऊन उतरले. लगेच त्यांनी पुढे माणसे पाठवून सुरतेत असे जाहीर केले की, 'इंग्रज व एतद्देशीय व्यापारी किंवा इतर लोक यांना कोणत्याही प्रकारे इजा पोहोचवण्याची आमची इच्छा नाही. फक्त बादशहाने आमच्या मुलुखावर हल्ला करून लोक मारले आणि आमचे पुण्याचे वास्तव्य बंद पाडले त्याचा वचपा घ्यावा एवढाच आमचा हेतू आहे.' इनायतखानास पाचशे स्वारांचा तनखा मिळे, परंतु स्वार न ठेवता ती सर्व रक्कम तो स्वत: गडप करी. त्याने महाराजांचा प्रतिकार बिलकूल केला नाही. महाराजांनी आपले दोन दूत मुद्दाम आगाऊ पुढे पाठवले आणि त्यांचेबरोबर पत्रे देऊन मोगल सुभेदार व तीन प्रमुख व्यापारी हाजी सय्यद बेग, बहर्जी बोहरा व हाजी कासम यांना उद्देशून त्यांनी असे कळवले की, 'उद्या आम्ही सुरतेत दाखल होताच आम्हास समक्ष भेटून दंड ठरवून रक्कम भरण्याची तजवीज करावी. असे न केल्यास आम्हास लूट व जाळपोळ करावी लागेल, त्याची जबाबदारी तुमचेवर राहील.' त्यावर इनायतखानाने स्वत: भेटीस न जाता वकिलामार्फत उद्धट जबाब पाठवून विचारले, 'आपणास दंड काय पाहिजे?' हे दांडगाईचे उत्तर ऐकून व खान भेटीस आला नाही म्हणून महाराजांनी वकिलास अटकेत ठेवले. हे ऐकताच इनायतखान घाबरून शहर सोडून किल्ल्याचे आत राहण्यास गेला. शहरवासी लोकांची क्षिती त्याने बिलकूल ठेवली नाही. ता. 6 बुधवारी सकाळी 11 वाजता शिवाजीराजे बऱ्हाणपूर दरवाजाबाहेर येऊन त्यांनी बागेत तंबू ठोकून तळ दिला. त्यावेळी त्यांचे भेटीस शहरातून कोणीच आले नाहीत. त्यामुळे या बेपर्वाईबद्दल त्यांना चांगली अद्दल

घडेल असे शासन करणे महाराजांना भाग पडले. सामोपचाराने महाराजांची समजूत काढली असती तर पुढील अनर्थ टळले असते.

इंग्रजांच्या किंवा डचांच्या वाटेस शिवाजीराजे गेले नाहीत. सर जॉर्ज ऑक्झिंडेन हा इंग्रज अधिकारी वखारीचा अध्यक्ष होता. त्याने आपल्या वखारीतले व गलबतावरचे मिळून सुमारे दोनशे लोक जमवून व सहा लहान तोफा आणून, शिवाजीराजे वखारीवर चालून आल्यास त्यांचेबरोबर लढून आपला बचाव करण्याचा निश्चय केला. डच लोकांनीही असाच आपल्या वखारीचा बंदोबस्त केला, पण त्यांची वखार इंग्रजांपासून एक मैलाचे अंतरावर असल्यामुळे त्या दोघांना एक होऊन शिवाजीराजांना विरोध करता आला नाही. पण महाराज या पाश्चात्त्यांच्या वाटेस मुळीच गेले नाहीत. त्यांचा दावा बादशहाशी होता, या लोकांशी नव्हता. बादशहाने चहूकडून उच्छेद चालवला; प्रत्यक्ष त्यांच्या राहत्या वाड्यात चार वर्षे शायिस्ताखानाने आपले ठाणे दिले; उभयतांचे उघड युद्ध सुरू होते; सुरत हे व्यापाराच्या योगाने धनसंपन्न झालेले शहर मोगल सरकारची पश्चिमेकडील राजधानीच होती; मक्केच्या यात्रेकरूंची ने-आण या सुरतेतूनच केवळ धार्मिक भावनेने बादशहा करी. असे हे शहर लुटून शिवाजीराजांना बादशहावर सूड उगवायचा होता. ‘करा, कसा करायचाय तो सुरतेचा बचाव’, अशा प्रकारचे आव्हानच महाराजांनी याप्रसंगी बादशहास दिले. शिवाय इंग्रज व डच वगैरे केवळ परस्थ व्यापारी, त्यांच्याजवळ माल भरपूर असला तरी रोख संपत्ती थोडीच असणार. म्हणून त्यांच्या वाटेस जाण्याचे महाराजांना प्रयोजन नव्हते आणि त्यांना भिऊन शिवाजीने माघार घेतली असा त्यांचा बडेजाव सांगण्यातही हंशील नाही. एकदा मात्र तिसरे दिवशी हाजी बेगचे घर लुटत असताना इंग्रजांनी महाराजांचे लोकांना प्रतिबंध केला, त्यावरून त्यांनी इंग्रजांकडे तीन लाखांची मागणी केली, ती ऑक्झिंडेनने झिडकारून दिली. चार दिवसात महाराजांना भरपूर लूट मिळाल्यामुळे, उगाच थोड्यासाठी इंग्रजांशी तंटा उपस्थित करण्याची इच्छा त्यांनी ठेवली नाही. याशिवाय क्रूरपणाचा जो काय थोडाफार प्रकार शहरात घडला, त्याचा दोष सुद्धा महाराजांकडे येत नाही. गुरुवारी इनायतखानाने किल्ल्यातून आपल्या एका इसमास महाराजांचा खून करण्याच्या उद्देशाने त्यांचे भेटीस पाठविले. ‘आपल्याशी तहाची बोली करण्यासाठी मला इनायतखानाने पाठवले आहे,’ असे सांगून तो इसम जवळ आला, तेव्हा त्यास महाराजांनी हटकले, ‘तुझा धनी बायकोसारखा खोलीत लपून बसला आहे, पण त्याच्या या गोष्टी मान्य करण्यास मीसुद्धा त्याची बायकोच आहे असे तो समजतो की काय?’ हे शब्द ऐकून तो गृहस्थ म्हणाला, ‘मला आपणास काही कानगोष्ट सांगायची आहे.’ असे म्हणून जवळ येऊन त्याने कट्यार काढून ती महाराजांच्या छातीत जोरात खुपसली. पण जवळ नागव्या तलवारीचा पहारेकरी होता, त्याने त्याचा तो हात तोडला, तथापि महाराजांना थोडी जखम होऊन दोघेही रक्तबंबाळ होऊन जमिनीवर लोळू लागले. तेव्हा शिवाजीराजांचा खून झाला अशीच किंचितकाळ काहींची समजूत झाली. त्या भावनेत

पुष्कळसे लोक पकडून आणले होते त्यांना ठार मारून टाकावे अशी कित्येकांनी इच्छा दर्शवली. परंतु महाराजांनी लगेच उठून सर्व कैदी आपल्यासमोर आणले आणि चौघांची शिरे व चोविसांचे हात तोडून बाकीच्या सर्वांना सोडून दिले.

अशा स्थितीत शहरास उपद्रव देणे ओघास आले. शुक्रवारी महाराजांचे स्वार शहरात संचार व लूट करून घरांना आगी लावू लागले. दुसरी एक लहान टोळी तटावर जाऊन आत बंदुकांचा मारा करू लागली. त्याबरोबर किल्ल्यातूनही तोफांचा मारा बाहेर सुरु झाला. पण तो महाराजांच्या लोकांवर लागू न होता उलट शहरालाच बाधक झाला. बुधवार ते शनिवारपर्यंत चार दिवस सर्व शहर मराठ्यांनी यथेच्छ लुटले आणि बहुतेक मोठी घरे जाळून टाकली. गुरुवार व शुक्रवार या दोन रात्री तर आगीचा अगदी कहर झाला. डच वखारीजवळ बहर्जी बोहरा याचा भव्य वाडा होता. तो त्यांनी लुटून खणून व जाळून टाकला. तसेच हाजी सय्यद बेग याची प्रचंड वाडी इंग्रज वखारीजवळ होती, ती यांनी साफ लुटून जाळली. हाजी सय्यद बेग अगोदरच किल्ल्यात जाऊन राहिला होता. चांदी-सोने-मोती व जवाहीर यापलिकडे दुसरे हलके जिन्नस लुटीत शिवाजीराजांनी घेतले नाहीत.

मोगल फौज सुरतेच्या बचावास येत आहे अशी बातमी आल्यावरून रविवार ता. 10 जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता शिवाजीमहाराज एकदम सुरतेहून परत फिरले, त्या रात्रीचा मुक्काम बारा मैलांवर करून लगेच त्वरेने रायगडास पोहोचले. ता. 17 रोजी सुरतेच्या संरक्षणास बाहेरची मोगल फौज आली, तेव्हाच इनायतखान किल्ला सोडून शहरात आपल्या मुक्कामावर राहण्यास आला. शिवाजीराजांचा सामना केल्याबद्दल औरंगजेबाने ऑक्झिंडेनची तारीफ करून युरोपियन व्यापाऱ्यांना एक वर्षभर जकातीची माफी दिली.

अशा अचानक रीतीने घाला घालून सुरत शहर लुटल्याबद्दल इंग्रज ग्रंथकारांनी शिवाजीराजांवर गहजब उडवलेला आढळतो. परंतु ते असे ध्यानात आणत नाहीत की, ‘महाराजांच्या राज्यात मोगल फौज चार वर्षे धुडगूस घालीत होती.’ शिवाजीराजांची राजधानी पुणे शहर काबीज करून प्रत्यक्ष त्यांच्याच वाड्यात मोगल सुभेदार कायम वसती करून बसले होते. अशा स्थितीत ‘सुरतचे नाक दाबल्याबरोबर पुण्याचे तोंड उघडले,’ ही महाराजांची अजब युक्ती हल्लीच्या युद्धकलेत वाखाणलीच जाईल. त्यांनी शहराच्या लोकांना आगाऊ जाहीर इशारा दिला होता. चारचौघा जाणत्यांनी त्यांचे भेटीस जाऊन सामोपचाराने प्रकरण मिटवले असते तर राजापूरप्रमाणेच सुरतेतून द्रव्य घेऊन कोणासही इजा न करता शिवाजीराजे परत फिरले असते. अशाही स्थितीत लोकांना दहशत घालून द्रव्य हरण करण्यापलिकडे दुसरे अत्याचार त्याने केले नाहीत. प्रत्यक्ष त्यांचा खून करण्याचाच प्रयत्न मोगल अधिकाऱ्याने केला म्हणूनच घरास आगी लावून काही थोड्या लोकांना त्यांनी शिक्षा केली. तोफा वगैरे जड सामान घेऊन शिवाजीराजे आलेच नव्हते. म्हणून ‘दोनशे इंग्रजांना भिऊन ते त्यांचे वाटेस गेले नाहीत’ याही म्हणण्यात काही अर्थ

नाही. केवळ औरंगजेबास हात दाखवण्याचा त्यांचा मुख्य उद्देश होता, तो त्यांनी पार पाडला. युद्धनीतिचे कोणतेही नियम त्यांनी मोडले नाहीत. सुरतेची फक्त बेसुरत केली, असे या प्रकरणाचे वर्णन बखरकार करतात.

सन 1664 मध्ये मोगलांनी शिवाजीराजांविरूद्ध फारशी हालचाल केलीच नाही. मुख्य सुभेदार शहाजादा मुअज्जम औरंगाबादेत शिकार करीत व मजा मारीत बसला. जसवंतसिंहाची व त्यांची गट्टी होती. शिवाजीराजांनी मात्र मोगलांच्या ढिलाईचा फायदा अत्यंत दक्षतेने करून घेतला. सुरतपासून बसनूरपर्यंत ते विजेसारखे चमकू लागले. नेताजी पालकर मोगलांचे मुलुखात सारखा नाचत होता. मोगलांचे हातून त्याचा बंदोबस्त होईना. शिवाजीराजांच्या आरमारानेही यावेळेस पुष्कळ काम गेले. मुसलमान यात्रेकरूंनी भरलेली मोगलांची जहाजे अरबस्तानास चालली असताना त्यांना शिवाजीराजांच्या आरमारातील लोकांनी पकडले आणि यात्रेकरूंपासून चांगली रक्कम हबकून त्यांना सोडून दिले. खुद्द शिवाजीराजांनी अहमदनगर पेट्यावर छापा घातला आणि औरंगाबादपर्यंत मुलुख उद्ध्वस्त केला. (ऑगस्ट 1664). 'शिवाजीराजांना पंख आहेत, त्यांना दृश्य शरीर नसून अदृश्यतेचा वर मिळालेला आहे, म्हणून त्यांना पाहिजे तेव्हा पाहिजे तिकडे बिनहरकत फिरता येते, त्यांचेपुढे कोणाचाही निभाव लागत नाही, स्वत: कल्पनातीत श्रम करून तसेच ते इतरांकडून करवून घेतात,' अशा प्रकारचे उल्लेख त्यांच्यासंबंधाने तत्कालीन पाश्चात्त्य लेखकांनी काढलेले आहेत. खुद्द शिवाजीराजांनी यावेळी मोगल अधिकाऱ्यास लिहिलेले पत्रच हा विषय जास्त चांगले बोलते. ते सन 1664 चे अखेरीस किंवा 1665 चे आरंभी शिवाजीमहाराजांनी मुन्शी 'नील प्रभू'चे हस्ते दक्षिणेतील मोगल अधिकाऱ्यास लिहिलेले आहे, ते असे :-

'आज तीन वर्षे बादशहाचे मोठमोठे सल्लागार व योद्धे आमचा प्रदेश काबीज करण्यासाठी चालून येत आहेत, हे तुम्हा सर्वांस माहीत आहेच. बादशहा हुकूम फर्मावतात, 'शिवाजीचे किल्ले व मुलूख काबीज करा.' तुम्ही जबाब पांविता, 'आम्ही लवकरच काबीज करितो.' आमच्या ह्या कठीण प्रदेशात 'नुसता कल्पनेचा घोडा सुद्धा नाचवणे कठीण आहे.' मग तो प्रदेश काबीज करण्याची गोष्ट कशाला! भलत्याच खोट्या बातम्या बादशहाकडे लिहून पाठवण्यास तुम्हाला लाज कशी वाटत नाही! कल्याणी व बेदरचे किल्ले केवळ उघड्या मैदानात होते ते तुम्ही काबीज केले. आमचा प्रदेश अवघड व डोंगराळ आहे. त्यातून नदी-नाले उतरून जाण्यास वाट नाही. अत्यंत मजबूत असे साठ किल्ले आज माझे तयार आहेत, पैकी काही समुद्रकिनाऱ्यावर आहेत. बिचारा अफझलखान बेसावधपणे जावळीवर फौज घेऊन आला आणि नाहक मृत्युमुखी पडला. इकडचा हा सर्व प्रकार तुम्ही आपल्या बादशहास का कळवत नाही! अमीर-उल्-उमराव शायिस्ताखान आमच्या या गगनचुंबित डोंगरात व पाताळात पोहोचणाऱ्या कप्प्यांत तीन वर्षे सारखा खपत होता. मी 'शिवाजीचा पाडाव करून लवकरच त्याचा प्रदेश काबीज

करतो,’ असे बादशहाकडे लिहून-लिहून तो थकला. ह्या खोडसाळ वर्तनाचा परिणाम त्याला भोवला. तो परिणाम सूर्यासारखा स्वच्छ सर्वांच्या डोळ्यांसमोर आहे. आपल्या भूमीचे संरक्षण करणे माझे कर्तव्य आहे, आणि तुम्ही बादशहाकडे कितीही खोट्या बातम्या लिहून पाठविल्या तरी मी आपले कर्तव्य बजावण्यास कधी चुकणार नाही.’[67]

मोगलांचे निवारण करताना दक्षिणेकडील आपला मुख्य उद्देश शिवाजीराजांनी बिलकूल दृष्टिआड केला नव्हता. म्हणून विषय व काल यांचे व्यवधान सांभाळण्यासाठी सन 1663-64 सालच्या कोकण प्रदेशातील शिवाजीराजांच्या हालचाली प्रथम सांगितल्या पाहिजेत. हीच वर्षे त्यांचा प्रचंड आक्रम व्यक्त करतात.

2) कुडाळदेश काबीज (मे 1663) :

सन 1659 च्या मार्चमध्ये वाडीकर लखम सावंताने विशिष्ट करार करून शिवाजीराजांचा आश्रय पत्करला हे मागे सांगितलेच आहे. सावंताचा हा प्रकार पाहून अली आदिलशहास फार राग आला आणि पन्हाळ्यास वेढा घालून त्याने शिवाजीराजांना पकडण्याचा उद्योग आरंभला, तेव्हाच दक्षिणकोकणातही त्यांना पायबंद देण्याचा प्रयत्न शहाने केला. त्याचा वजीर खवासखान यास वेंगुर्ला प्रांत जागीर होता, त्या प्रांताचे बचावास त्याने काजी अब्दुल्लाची रवानगी केली (14.2.1660), त्यास लखम सावंत येऊन मिळाला. इतक्यात महाराजांचे लोकांनी चालून येऊन कुडाळ हस्तगत केले. ते लखम सावंताने येऊन पुन्हा काबीज केले (18.3.1660). महाराजांच्या लोकांनी वारंवार प्रयत्न केला असतानाही त्यांचा अंमल कुडाळवर बसला नाही. पुढे सन 1661 मध्ये उंबरखिंडीच्या लढाईत मोगल फौजेचा पराभव करून शिवाजीराजांनी लगोलग दक्षिणेस वळून दाभोळ व राजापूर ही स्थळे काबीज केली, तेव्हाच लखम सावंतावर चालून जाण्याचा त्यांचा बेत होता. परंतु कल्याणचे ठाणे हातचे गेल्यामुळे महाराजांना पुढे दीड वर्षपावेतो दक्षिणेकडे लक्ष देण्यास अवसरच मिळाला नाही.[68]

मध्यंतरी विजापुरास महंमदशहाची बायको बडीसाहेबीण कारभार पाहत होती, त्या अवधीत दरबारात पुष्कळच बाचाबाची माजली. तेव्हा अलीने तिच्याकडून सर्व कारभार आपल्या हाती घेतला. त्यामुळे रुसून अगर अन्य कारणाने ती बाई मक्केच्या यात्रेस निघून गेली. सन 1661 च्या मे महिन्यात ती वेंगुर्ला बंदरातून निघून पुढील सालच्या जून महिन्यात यात्रा आटोपून परत आली आणि तेथून परत विजापुरास गेली. मध्यंतरी सन 1663 च्या एप्रिल महिन्यात शायिस्ताखानाची दुर्दशा केल्यावरून शिवाजीराजांची बाहेर वाहवा झाली, या संधीचा उपयोग करून महाराजांनी एकदम चहूकडे चढाई सुरू केली, त्यात त्यांनी फिरून सावंताकडे नजर फिरवली. त्याच सुमारास म्हणजे सन 1663 च्या ता.1 मार्च रोजी

अली आदिलशहाने दक्षिणेकडे आपला जम चांगला बसविण्याकरता विजापूर सोडले आणि कोकणात व घाटावर स्वत: अंमल बसवीत तो बंकापुरास येऊन राहिला. जून महिन्यात त्याने अल्पकाळ शहाजींना कैद केले हे मागे सांगितलेच आहे. शिवाजीराजांनी उच्छेद चालवल्यामुळे दक्षिणकोकण शहाच्या हातून बहुतेक गेल्यासारखेच झाले होते. शायिस्ताखानाचा छापा आटोपल्यावर स्वत: शिवाजीराजे दक्षिणकोकणात गेले. लगेच त्यांनी कुडाळ हस्तगत केले. ता. 23.5.1663 रोजी त्यांचा मुक्काम कुडाळ येथे झाला. त्याबरोबर लखम सावंताने वाडीस जाऊन डच व पोर्तुगीझ यांची मदत मागितली. परंतु महाराजांनी ह्या लोकांना कळवले की, आदिलशहानेच कुडाळ प्रांत मला दिला आहे. त्यावरून वेंगुर्ला येथील डच अधिकाऱ्याने आपल्या वकिलाबरोबर शिवाजीराजांना काही चिजा नजर पाठविल्या, त्या महाराजांनी स्वीकारल्या नाहीत. पुढे महाराज बांद्यास गेले. तेथे गोव्याच्या अधिकाऱ्याने आपला वकील रामाजी कोठारी यास पत्र व 4300 होन नजराणा देऊन महाराजांचे भेटीस पाठविले. पण कोठारी येण्यापूर्वीच जून महिन्यात महाराज बांद्याहून परत गेले. जाताना कुडाळ येथे आपला लष्करी बंदोबस्त त्यांनी पक्का केला. त्यावरून अली आदिलशहास पुढे कुडाळ घेण्याची मोठी उत्कंठा लागली. ते स्थळ परत घेण्यासाठी सिद्दी जौहरचा मुलगा सिद्दी अजीज व जावई सिद्दी मसूद यास फौज देऊन त्याने तिकडे रवाना केले. हा सिद्दी अजीज पुढे ता. 10.6.1666 रोजी विषप्रयोगाने मरण पावला. असे म्हणतात की हा प्रयोग शिवाजीराजांनी करविला.[69]

3) बाजी घोरपड्यावर दावा उगविला (नोव्हेंबर 1664) :

शिवाजीराजांनी कुडाळ प्रांत हस्तगत केल्याचे वर्तमान ऐकून अली आदिलशहाने बेदनूरचे प्रकरण पुरे केले आणि लगेच बंकापुरहून परत विजापुरास प्रयाण केले. रस्त्यातूनच त्याने इखलासखानाच कुडाळ प्रांत परत घेण्याची आज्ञा करून सावंताचे साह्य करण्यासाठी रवाना केले. अल्पावधीत शहा विजापुरास पोहोचला आणि लगेच वजीर खवासखान व मुधोळचा बाजी घोरपडे यांस त्याने आणखी फौजा घेऊन कुडाळवर जाण्याचा हुकूम केला. मुधोळकर घोरपडे हे आदिलशहाचे पुरातन, एकनिष्ठ व शूर सरदार असून मुसलमानाचे राज्य राखण्यास सदैव तत्पर असत. भोसल्यांशी तर त्यांचा भाऊबंदकीचाच दावा होता. शिवाजीराजांची अशी चढती कळा पाहून त्यांचा पाडाव करण्याची संधी बाजी घोरपडे फुकट जाऊ देत नसे. त्याच्या संबंधाने खालील उल्लेख शकावलीत आहे. ‘कार्तिक मासी इदलशहाचा व राजांचा बिघाड झाला. खवासखान कुडाळास आले. राजांनी जाऊन घोरपडे मारिले. खवासखानाशी झगडा केला. तो पळोन घाटावर गेला.’

खवासखान व घोरपडे आपल्यावर चालून येणार ही बातमी शिवाजीराजांस लागताच त्याने ताबडतोब परभारे मुधोळवर चाल केली. घोरपडे व खान यांची त्याने गाठच पडू दिली नाही. 'घोरपड्यांचा प्रांत लुटून तळपट करून ठाणे जेरदस्तीत आणले. बाजी घोरपडे सर्व जमेतीनिशी लढाईस आले. युद्ध तरफेचे जाले. बाजी घोरपडे व कित्येक खासे लोक पडले. मुधोळ लुटून फस्त केले. मत्ता बहुत हाती लागली. मुधोळ पंचमहाल आपलासा करून घोरपड्यांची स्थापना केली. त्यानंतर खवासखान पुढे आला त्याजवर चाल केली. मारीत लुटीत गर्दी केली. खटा होऊन पळून विजापुरास गेले. त्यानंतर सावंताचा निशाच करावा म्हणोन त्या प्रांतात शिरलो. मुलूख तळपट करीत चाललो. ठाणी किल्ले तमाम घेतले. सावंत दमोन गेले. गोमंतकराचा आश्रय निघोन फोंड्याचा किल्ला भांडू लागला. सुरुंग लावून बुरूज बळाने उडवून घेतला. त्यानंतर फिरंगी याजवर शह देऊन त्यांचा प्रांत मारीत चाललो. त्यांनी तह करून तोफा नजराणा पाठविला. सावंत यांस गोमांतकात दम न निघे. टोपीकर यांस धीर न पडे. त्याजवरून पितांबर शेणवई कारभारी वकील पाठविले. आपण सावंत भोसले कुळीचे, आपले पुत्र आहोत. प्रांताचा ठराव निमे ऐवज फौजेनिशी चाकरी करतो. ऐसा ठराव करून घेतला.' असा मजकूर शिवाजीराजांनी खुद्द आपल्या पत्रात लिहून पाठविलेला आढळतो. वाई प्रांत घोरपड्यांच्या मूळच्या जागिरीत मोडत होता तो आता शिवाजीराजांनी घेतला. इतउत्तर घोरपड्यांचे स्वामित्व मावळात राहिले नाही.[70]

बाजी घोरपडे, खवासखान व लखम सावंत यांचा शिवाजीराजांनी पराभव केल्याचा असंदिग्ध पुरावा डच दप्तरातील कागदात मिळतो. 'आदिलशहाने शिवाजीराजांवर चढाई करून खवासखानास कुडाळ प्रांतावर पाठविले, त्याचे साह्यास बाजी घोरपडे व लखम सावंत येत होते. बाजी येऊन खवासखानास मिळणार त्या पूर्वीच शिवाजीराजांनी मुधोळवर स्वारी केली. लढाई होऊन बाजीचे दोनशे लोक मेले, त्याला जखमा लागून तोही पुढे अल्पावधीने मरण पावला. शिवाजीराजांना पुष्कळ लूट मिळाली.'[71]

खवासखानाशी शिवाजीराजांचे युद्ध झाले त्या संबंधाने पुढील उतारा बखरकारांचे वर्णनातला ज्यास्त खुलासेवार आहे. 'शिवाजीने सुरत वगैरे बादशहाची बलिष्ठ शहरे व मक्केचे यात्रेकरू लुटले. दक्षिण किनाऱ्यावरील व्यापारी बंदरांवर हल्ले केले. आरमार वाढविले. शाएस्तेखान व जसवंतसिंह यांचा त्याजपुढे टिकाव लागला नाही. ही बातमी औरंगजेबास पोहोचून, तो फार चिंताक्रान्त झाला. तेव्हा विजापुरच्या आदिलशहाकडे वकील पाठवून त्याजकरवी शिवाजीराजांशी युद्ध सुरू करवून दोघांनी मिळून एकदम लढण्याची तयारी औरंगजेबाने केली. त्याचा एक हुशार वकील विजापुरास आला. 'आम्हा उभयता मुसलमान बादशहास या सर्व फंदफितुराचे व बंडाचे मूळ कारण जो शिवा त्याचा समूळ नाश करून गरीब रयतेस त्याच्या जाचातून सोडविणे प्राप्त आहे. इकडून पारिपत्यासाठी शूर योद्धे व शिपाई रवाना होत आहेत, तसे आपणाकडूनही व्हावेत व त्या

शिवारूपी सर्पाचे मस्तक फोडून, त्याच्या गैररहा वागणुकीचा सूड घ्यावा. एका बाजूने आम्ही, दुसऱ्या बाजूने तुम्ही, शिवाजीवर स्वारी करावी.' आदिलशहाने ही गोष्ट कबूल केली आणि खवासखानास शिवाजीराजांवर पाठवले. महाराजांनी खवासखानाच्या सर्व वाटा बंद केल्या. तरी तो गाफीलपणाने त्यांच्या मुलखात शिरला. महाराजांची फौज दबा धरून बसलेली आहे, हे त्याला ठाऊक नव्हते. खवासखानाचा समाचार घेऊन मग जयसिंहाच्या समाचारास जावे, असा शिवाजीचा मानस होता. 'त्याने एकदम येऊन खवासखानास कोंडले. डावी उजवीकडे हलण्यास सुद्धा त्याला वाव ठेवला नाही. विजापूरच्या फौजेची गाळण उडाली. खवासखानाने हाताखालच्या अंमलदारांना जवळ बोलावून निकराने लढण्याविषयी उत्तेजन दिले. लढाई मोठ्या निकराची झाली. सिद्दी जोहर, शहा हजरत व शेख मिरान इत्यादि विजापूरचे सरदार रणांगणी पडले. तेव्हा स्वत: खवासखान तलवार घेऊन धावला. त्याबरोबर सर्व मुसलमान मराठी फौजेवर तुटून पडले. तेव्हा मराठे पराभव पावून पळून गेले.' बाजी घोरपड्यास मारल्यानंतरचा हा प्रकार होय. या प्रसंगात शिवाजीराजांचा सावत्र बंधू एकोजी आपल्या पथकासह विजापुरचे साह्यास आलेला असून त्याच्या बहादुरीबद्दल त्यास आदिलशहाने दोन गाव इनाम दिले.[72]

4) सिंधुदुर्गाची उभारणी (25.11.1664) :

सन 1664 हे वर्ष शिवाजीराजांच्या चढत्या पराक्रमाचे निदर्शक आहे. आरंभीच त्यांनी पाच दिवसात सुरत लुटून अमाप संपत्ती पैदा केली. उन्हाळ्यात दक्षिण कोकणात जाऊन त्यांनी कुडाळ हस्तगत करून रावजी सोमनाथ पंडित याला तेथील व्यवस्था सोपवली. नंतर वेंगुर्ले लुटून जाळून टाकले. गोवेकरांना गप्प बसवले. मुधोळचे संस्थान ताब्यात आणले. डिसेंबरात त्यांच्या सरदारांनी हुबळीची समृद्ध पेठ लुटून पुष्कळ संपत्ती महाराजांना आणून दिली. ता. 25.11.1664 रोजी सिंधुदुर्ग बांधण्याची सुरुवात करून तेथील बंदरात मोठ्या गलबतांचे लढाऊ आरमार त्यांनी बनवले. ता. 8.2.1665 रोजी मालवणपासून 85 गलबते व तीन मोठ्या महागिऱ्या घेऊन शिवाजीराजे थेट बेदनूरच्या राज्यातील प्रसिद्ध बंदर बसरूर (बसनूर) येथे दाखल झाले. एका दिवसात प्रचंड लूट पैदा करून ते लगोलग परत गोकर्ण महाबळेश्वरास गेले आणि शिवरात्रीची यात्रा संपवून परत येत असताना कारवारला विजापुरी सरदार शेरखान त्यांना आडवा आला. त्याचे निवारण करून महाराज पायमार्गे ता.14.3.1665 रोजी भीमगडास पोचले. तोच 'जयसिंगाने पुण्याकडे चढाई सुरु केल्याची वार्ता' त्यांना समजली. अर्थात या नवीन बनावामुळे लखम सावंताचे मन फिरले आणि त्याने आदिलशहाशीच आपला स्नेह कायम केला. पीतांबर शेणवी यास त्याने विजापुरास वस्त्रे घेण्यास पाठवले, (ता. 17.3.1665).[73] त्याजबरोबर वाटाघाट होऊन ता.26.5.1665

रोजी शहाने लखम सावंतास लिहून कळविले की, ‘पितांबर शेणवी यांनी येऊन अर्ज केला की तुम्ही पुरातन चाकर, आज्ञेप्रमाणे शिवाजीशी लढता. पेशजी शिवाजीने तुमचा परगणा घेऊन तुम्हास परागंदा केले. हल्ली महंमद इख्लासखान वजीर यास त्या प्रांताची सरसुभेदारी देऊन त्यांचे कारभारी श्रीपतराव मजालसी यांना पाठविले आहेत. त्यांना भेटून परगण्याचा बंदोबस्त करून लष्करसह चाकरीस हजर राहणे.’[74] इतके होऊनही दक्षिण कोकणाचा हा भाग शिवाजीराजांचे कब्जात पुढे हळूहळू आला.

उत्तरेस जंजिरा व दक्षिणेस गोवा या दोन तटबंदीच्या नाविक स्थळांमुळे राज्यास बळकटी कशी येते हे शिवाजीराजांच्या उत्तम लक्षात आले आणि तशाच तोडीचे नवीन व्यापारी बंदर त्यांनी मालवणास निर्माण केले. अशाप्रकारे सिंधुदुर्ग बांधण्याचे शिवाजीराजांचे प्रयोजन स्पष्टपणे कळून येते. जंजिऱ्याच्या जोरावर व्यापार वाढतो, त्यासाठी लढाऊ व व्यापारी आरमार पाहिजे हे जाणून ‘मार्गशीर्ष व॥

सन 1664 मध्ये सुरतेच्या स्वारीहून परत येताच शिवाजीराजांना पितृवियोग सहन करावा लागला तो प्रकार मागे शहाजींच्या चरित्रात सांगितला आहे. पितृवियोगाचे हे वर्ष शिवाजींच्या अद्भूत कृत्यांनी इतके फुलून गेलेले दिसते की, एका पुरुषाने अल्पावधीत एवढा राज्यविस्तार केलेला पाहून मन थक्क झाल्याशिवाय राहत नाही.

प्रकरण 7 - जयसिंहाने घातलेला पेच

(सन 1665-1666)

1.शिवाजीराजांवर जयसिंहाची पाठवणी; 2.मुरारबाजीचा अद्भुत पराक्रम; 3.जयसिंहाचे डोळ्यांत अंजन पडले; 4.जयसिंहाचा बादशहाकडे रिपोर्ट, 5.पुरंदरचा तह; 6.विजापूरच्या युद्धात जयसिंहाची अखेर.

1) शिवाजीराजांवर जयसिंहाची पाठवणी (सन 1665) :-

जसवंतसिंह व मुअज्जम यांचे हातून शिवाजीराजांचा बंदोबस्त होत नाही असे लक्षात आल्यावर, औरंगजेबाने त्यास परत बोलावून मिर्झाराजा जयसिंह यास शिवाजीराजांवर चालून जाण्याची आज्ञा केली; आणि त्याचे हाताखाली पठाण सरदार दिलेरखान यास दिले. शिवाजीराजांनी सुरत शहराचा नाश केला आणि मक्केस जाणारी मुसलमान यात्रेकरूंची जहाजे लुटली हे प्रकार पाहून बादशहा अत्यंत चिंतातूर झाला. स्वत: शिवाजीवर चालून जाण्याचे धाडस न करता त्याने वरील दोघा सरदारांना शिवाजीराजांस पकडून आणण्याची आज्ञा केली. दोघेही सरदार पराक्रमी म्हणून नावाजलेले होते. दिल्लीचे तख्त मिळविण्यासाठी जे युद्ध औरंगजेबाने केले, त्यात आरंभी या सरदारांनी शहाजहानच्या आज्ञेने ‘दारा’चा पक्ष स्वीकारला होता. या कारणास्तव औरंगजेब त्यांजबद्दल साशंक असे. पण महाराष्ट्रासारख्या परक्या ठिकाणी त्यांचे हातून दगलबाजीचे वर्तन होणे संभवनीय नाही, अशा विचाराने बादशहाने त्यांजबरोबर भरपूर सामान व फौज दिली आणि प्रथम शिवाजीराजांना पकडून मग विजापूरचे राज्य जिंकण्याची त्यांना आज्ञा केली.

जयसिंहास अपजय असा कधी ठाऊक नव्हता. सन 1617 मध्ये बारा वर्षांचा असताना तो मोगल फौजेत प्रथम दाखल झाला. तेव्हापासून मध्यआशियातील बाल्कपासून विजापूर आणि पश्चिमेस कंदाहारपासून मोंगीर एवढ्या प्रदेशात त्याने नाना प्रकारचे विजय संपादन केले होते. शहाजहानच्या कारकीर्दित दरसाल काहीना काही तरी विजय मिळविल्याबद्दल

त्याला बक्षिस मिळाले होते. बादशाही लष्करात त्याचा मान शहाजाद्यांच्या बरोबरीचा होता. अलिकडे पुष्कळ वर्षे तो स्वतंत्र सेनापती म्हणून वावरत होता. युद्धकौशल्यापेक्षा मुत्सद्देगिरीबद्दल त्याची विशेष ख्याती होती. एखादा भानगडीचा प्रश्न आल्यास बादशहाकडून जयसिंहास पाचारण होत असे. त्याचे भाषण मधूर व दुसऱ्यावर छाप पाडणारे होते. तुर्की, फारशी, हिंदी व उर्दू या भाषा यास चांगल्या अवगत होत्या. मुसलमानी रीतरिवाजात तो पूर्ण तरबेज होता. तरूणपणाचा त्याचा उत्साह वयाने व अनुभवाने बराच कमी होऊन त्याची वृत्ती अलिकडे शांत झाली होती. गंभीर वृत्तीने व विचारी धोरणाने मनुष्यस्वभाव ओळखून आपला हेतू सिद्धीस नेण्याकडे हल्ली त्याचा कल विशेष होता. असा हा 60 वर्षांचा वृद्ध व अनुभवी सरदार औरंगजेबाने शिवाजीराजांवर पाठविण्यास योजला. मात्र शिवाजीराजांना जिंकणे हे काम जयसिंहासही सोपे वाटले नाही. शायिस्ताखान, जसवंतसिंह, अफझलखान यांची उदाहरणे त्याच्या डोळ्यांसमोर होती. ‘ज्या कामासाठी मी आलो आहे, त्यापुढे रात्रंदिवस एक क्षणही मला विश्रांती किंवा शांतता मिळत नाही,’ असे त्याने वारंवार बादशहास लिहिलेले आढळते.

ता.30 सप्टेंबर सन 1664 रोजी औरंगजेबाचा वाढदिवस होता. त्या दिवशी मिर्झा राजा जयसिंह यास त्याने शिवाजीराजांवर चालून जाण्याची आज्ञा केली. त्याच्या हाताखाली दिलेरखान, दाऊदखान कुरेशी, राजा रायसिंह सिसोदिया, राजा सुजनसिंह बुंदेला, जयसिंहाचा मुलगा कीरतसिंह, राजा नरसिंह गौड, पुराणमल बुंदेला वगैरे सरदार दिलेले होते. निकोलो मनूची हा तोफखान्यावर मुख्य म्हणून त्याजबरोबर होता. सर्वांची मिळून 14000 फौज स्वारीत होती. जयसिंह निघाला तो ता. 9 जानेवारी 1665 रोजी नर्मदा नदी ओलांडून ता.19 ला बऱ्हाणपुरास पोहोचला. तेथे ता.30 पर्यंत मुक्काम करून फौजेची व सामानाची नीट व्यवस्था केल्यावर फेब्रुवारी ता.10 रोजी तो औरंगाबादेस आला. या ठिकाणी शहाजादा मुअज्जमची व इतर अधिकाऱ्यांची भेट घेऊन ता.13 रोजी जयसिंह औरंगाबादेहून निघाला, तो ता.3 मार्च रोजी पुण्यास पोहोचला. तेथे जसवंतसिंहाकडून सर्व कामाचा हवाला त्याने सोपून घेतला आणि ता. 7 मार्च रोजी जसवंतसिंह पुणे सोडून परत गेला.

‘शिवाजीला विजापूरचा आश्रय मिळू नये’ म्हणून जयसिंहाने दोहोंच्या दरम्यान आपला तळ दिला. तळकोकणात जाऊन शिवाजीराजांचा पाडाव करावा असे बादशहा त्यास आग्रहाने सुचवीत होता, परंतु तळ कोकणात गेल्यास आपला निभाव लागणार नाही आणि विजापूरची फौज शिवाजीराजांना मिळाल्यास आपला सर्व बेत फसेल, असे त्याने बादशहास कळविले. खाली कोकणात न उतरता लोहगड, पुरंदर व राजगड या तीन किल्ल्यांच्या दरम्यान शिवाजीचा मुख्य प्रदेश असल्यामु तेवढ्यात जयसिंहाने युद्ध चालवले. आतून आदिलशाही दरबाराशी संधान ठेवून त्याने गोडगोड वचनांनी त्यांस शिवाजीराजांस मिळू दिले नाही आणि अनेक ठिकाणी शिवाजीराजांवर अनपेक्षित घाले

घालण्याचा क्रम चालवला. औरंगाबादला पोहोचण्यापूर्वीच फ्रॅन्सिस माइल् व डिक माइल् ह्या दोन युरोपियन गृहस्थांना स्वदस्तूरची पत्रे देऊन गोवा, सुरत व मुंबई येथील व्यापाऱ्यांकडे बोलणे करण्यास त्याने पाठवले आणि शिवाजींशी युद्ध करण्यासाठी त्यांच्या आरमाराची मदत ताबडतोब मागितली. मे महिन्यात त्याने बादशहास लिहिले, 'आमची फौज पुण्यास असल्यामुळे कोकण किनाऱ्याविषयी शिवाजीराजे अगदी निर्धास्त आहेत. यावेळी जर गुजरातेकडून एखादे आरमार पश्चिम किनाऱ्यावर येईल तर शिवाजीराजांच्या प्रदेशातून आपणास पुष्कळ लूट मिळेल.'

कर्नाटकातील जमीनदारांकडेही जयसिंहाने आपले ब्राह्मण वकील रवाना केले. बाजी चंद्रराव व अंबाजी गोविंदराव मोरे वगैरे जे कोणी सरदार शिवाजीराजांच्या विरूद्ध होते, त्यांजकडेही जयसिंहाने आपले वकील पाठवले. अफझलखानाचा मुलगा फाझलखान व बिदनूरचा नाईक हेही येऊन त्यास सामील झाले. प्रत्यक्ष शिवाजीराजांच्या फौजेतील सरदारांस लाच वगैरे देऊन त्यांना आपणाकडे वळविण्याचा त्याने भरपूर प्रयत्न केला. सुप्याचे दोन जमीनदार त्याने अशारितीने आपणाकडे वळवून घेतले. बादशहाकडून त्याने सर्वाधिकार मागून घेतला होता. अहमदनगर, परिंडा वगैरे ठिकाणच्या लष्करास जयसिंहाच्या हाताखाली काम करण्याचा हुकूम बादशहाने पाठवला. फौजेचा पगार सुद्धा जयसिंह स्वत: आपले जवळ खजिना ठेवून वाटत असे. त्यात हिशेबी खात्याकडून त्यास अडथळा न व्हावा अशी बादशहाने तजवीज करून दिली. पर्जन्यकाळ समीप आल्यामुळे जयसिंहाने सर्व कामे अत्यंत तातडीने चालवली. त्याने आपल्या छावणीचा तळ सासवड येथे ठेवला आणि आजूबाजूचा प्रदेश उद्ध्वस्त करण्यास सुरुवात केली. कुतुबुद्दिनखान नावाच्या सरदारास सात हजार फौज देऊन त्याने लोहगड येथे ठेवले. अशीच आणखी निरनिराळ्या ठिकाणी त्याने सैन्याची राखण ठेवली.

पुण्यास आल्यावर जयसिंहाने विचार करून मनाशी दुसराही एक मुत्सद्दी कावा ठरवला आणि शिवाजींना निरोप पाठविला की, 'तुम्ही बादशहास शरण याल तर तुमचे सर्वप्रकारे कल्याण होऊन वैभव वाढेल. आमच्या मध्यस्थीने तुमची बादशहाशी इतमामाने भेट होईल. आपण दोघेही हिंदू एकधर्मी आहोत ह्यात कोणताही कपटभाव एकमेकांनी मनात ठेवू नये. मी म्हणतो यास परमेश्वर साक्ष आहे.' दिलेरखान याला मात्र जयसिंहाचे हे धोरण पसंत पडले नाही.

जयसिंह 11 दिवस पुण्यात राहून ता.14 मार्च रोजी पुणे सोडून 31 मार्च रोजी सासवडास पोहोचला आणि लगेच दिलेरखानाने पुरंदरास वेढा घातला. ता.14 एप्रिल रोजी रुद्रमाळ किल्ला मोगलांच्या स्वाधीन झाला. ता.25 एप्रिल रोजी दाऊदखानास जयसिंहाने राजगडावर हल्ला करण्यास पाठवले. इकडे शिवाजीराजांनी नेताजी पालकर यास परिंड्यावर पाठवले, पण मोगलांच्या फौजेपुढे त्याचे फारसे चालले नाही. दिलेरखानाने

पुरंदर किल्ल्याचा वेढा नेटाने चालवून काही दिवस तोफांचा मारा करताच किल्ला पडण्याच्या बेतात आला.

2) मुरार बाजीचा अद्भुत पराक्रम (एप्रिल 1665) :

मुरारबाजीचे वडिल बाजी मुरार, चंद्रराव मोरे याच्या पथकात सन 1637 पासून नोकरीवर होते. मोगलांबरोबर चाललेल्या युद्धात विजापूरच्या तर्फेने बाजी मुरारने विशेष पराक्रम केल्यावरून त्यास आदिलशहाने उमराव असा किताब देऊन, हुजुरात ठेवून घेतले होते आणि त्याचे बदल्यात मोरे याचे पथकात त्याचा वडिलमुलगा मुरार यास नोकरी दिली होती. मुरार याचा जन्म सन 1616 मधे झाला. त्यास त्रिंबक, शंकराजी, संभाजी व महादजी असे आणखी चार भाऊ होते. या पाच भावांच्या वंशास 'पंच बाजीचा वंश' असे म्हणतात. चंद्रराव मोरे याजवरील स्वारीत मुरारबाजी शिवाजीराजांच्या फौजेशी मोठ्या निकराने लढला. परंतु तो हतवीर्य होऊन, मोरे यांची मुलेमाणसे शिवाजीराजांचे हाती पडली. 'मुरारबाजीस आमचे नोकरीत द्याल तर तुमचा जीव वाचवितो' अशी अट शिवाजीराजांनी मोरे यास कळविल्यावरून त्यांच्या आज्ञेने भ्रातृवरसिंह मुरारबाजी शिवाजीराजांच्या नोकरीस राहिला. महाराजांनी त्याला पुरंदरची किल्लेदारी दिली.

ता.30.3.1665रोजी दिलेरखान पुरंदराखाली येऊन उतरला. मोगल फौज नजीक येताच मुरारबाजीने त्याला दाणावैरण मिळू नये अशी तजवीज केली आणि त्यांचा दारूगोळा पेटवून दिला. तथापि पुन्हा सर्व तजवीज करून दिलेरखानाने पुरंदर किल्ल्यास वेढा घातला, तेव्हा मुरारबाजीजवळ किल्ल्यावर मावळे व हेटकरी मिळून दोन हजार निवडक लोक होते, त्यांना कित्येक चोरवाटांनी अन्नसामुग्रीचा पुरवठा होत होता. पुरंदरच्या किल्ल्याचे, वरचा कोट व खालचा कोट असे दोन भाग होते. दोहोतही दारूगोळ्याची सामुग्री शिवाजीराजांनी भरपूर ठेवली होती. मोगलांनी शिकस्त करून खालचा कोट काबीज केला. तेव्हा मावळे लोक वरचे कोटात शिरल्यावर मोगल फौज लढण्याचा उद्योग सोडून देऊन गाफीलपणाने लूट करू लागली. मावळ्यांनी त्यांची अव्यवस्थित स्थिती पाहून, त्याजवर वरून गोळ्यांचा असा जोराचा मारा केला की, कित्येक मोगल लोक पळून गेले व कित्येक कोनाकोपऱ्यात लपून राहिले. त्यावेळी मोगल व मराठे यांची निकराची लढाई झाली. मुरारबाजी तर मोगलांना किल्ल्यातून हाकलून लावून त्यांचा पाठलाग करीत थेट दिलेरखानाच्या तंबूपर्यंत गेला. सर्व मोगलांना त्याच्या पराक्रमाचा अत्यंत अचंबा वाटला. खानास त्वेष चढून तो आपली सर्व फौज गोळा करून मराठ्यांवर चालून गेला. त्यावेळेस मुरारबाजीचे कित्येक लोक जखमी झाले व कित्येक मरणही पावले. मुरारची ढाल तुटली, तेव्हा हातास शेला गुंडाळून तिजवर तो शत्रूचे घाव झेलून घेऊ लागला. त्या

झटापटीत मुरारचा एक वार खानाचे अंगावर लागला. याप्रमाणे लढाई चालू असताना खानाने सोडलेला बाण एकाएकी मुरारबाजीस लागून त्याचे शिर उडाले आणि तो शूर पुरुष एकदम गत:प्राण झाला. मुरारबाजीचे शव त्याचे लोकांनी मुसलमानांचे हाती लागू न देता त्याचे तुकडे जमवून रायगडास पाठवले.[75] त्यावेळी शिवाजीराजांना किती दु:ख झाले असेल याची आपण कल्पनाच केली पाहिजे. मुरारबाजी पडला हे कळल्यावर त्याच्या मृत्युच्या दुसऱ्याच दिवशी महाराज पुरंदरावर येऊन पोहोचले. मुरारबाजी पडला, तरी मराठ्यांनी मोगलांना वरचे कोटात येऊ दिले नाही.

पुरंदरचे ईशान्येस वज्रगड म्हणून दुसरा एक लहानसा किल्ला आहे, त्यास रुद्रमाळ असे नाव होते. त्याच्या बंदोबस्तास बाबाजी बोवाजी व यशवंतराव बोवाजी हे दोघे प्रभू बंधू होते. दिलेरखानाने त्या किल्ल्यास वेढा घातला, तेव्हा मुरारबाजी आपणास सोडविण्याकरता पुरंदरावरून येईल या भरंवशावर रुद्रमाळच्या तुटपुंज्या लष्कराने मोगलांशी पुष्कळ वेळ चांगलाच टिकाव धरला. तेथे झालेल्या हातघाईत वरील दोन्ही प्रभू सरदार पडले आणि किल्ला मोगलांना मिळाला (एप्रिल 14). रुद्रमाळच्या किल्ल्यावरून पुरंदरवर मारा चालविण्याची दिलेरखानाने खटपट केली, पण पावसाळा लागल्यामुळे व मोगलांचा तोफखाना चांगला नसल्यामुळे पुरंदरचे वरचे कोटावर मारा लागू होईना. इकडे पुरंदर किल्ल्यावरचे लोकही टेकीस येऊन किल्ला स्वाधीन करणार होते. इतक्यात तसे न करण्याबद्दल शिवाजीराजांचा हुकूम आला व त्यांनी आपला बेत रहित केला.

जयसिंह आल्यापासूनच त्याजकडे शिवाजीराजांनी वकील पाठवून सलोख्याचे बोलणे चालवले होते. त्याप्रमाणे तह ठरून शिवाजीराजे शरण आल्यास पुरंदर जिंकण्याची संधी हातची जाईल म्हणून दिलेरखानास वाईट वाटले आणि त्याने खालील पत्र शिवाजीराजांना लिहिले :-

‘महालदाराबरोबर तुमचे पत्र आले ते पावले. मजकूर कळला. तह करण्याची तुमची इच्छाही कळून आली. लढण्याच्या पूर्वीच तुम्ही तहाचे बोलणे करता हे आश्चर्य आहे. अशा बोलण्याकडे लक्ष देणे हे आमच्यासारख्या बादशाही अधिकाऱ्याला शोभत नाही. तुमच्या या डोंगराळ प्रदेशात शिकार व नाच करण्यासाठी आम्ही हिंदुस्थानातून इतके दूर आलो आहोत. आमची एवढीच इच्छा आहे की, तुम्ही एकदा येऊन आमचा समाचार घेण्याऐवजी तुम्ही दूर राहता हे योग्य नाही. तुमचे ते मजबूत किल्ले, गगनचुंबित पर्वत आणि पाताळास पोचविणारी खोरी प्रत्यक्ष पाहण्याची आमची इच्छा असताना तुम्ही तर कोठे दिसत नाहीत आणि वर तहाचे बोलणे करता! हा विचार तुम्ही प्रथमच केला असता तर बरे झाले असते. आता तरी हा विचार सुचला हे चांगले झाले.’

3) जयसिंहाचे डोळ्यांत अंजन पडले (11.6.1665) :

जयसिंहाची कडेकोट तयारी पाहून पुढे विचार काय करावा याजविषयी शिवाजीराजांनी आपल्या सरदारांशी पुष्कळ वाटाघाट केली. त्याने शरण यावे अशी जयसिंहाचीही आतून खटपट होती. जयसिंहाच्या तडफेमुळे शिवाजीराजांना दुसरे उपाय योजण्यास अवकाश मिळाला नाही. त्यातून जयसिंहापेक्षाही दिलेरखान जास्त हट्टी होता. पावसाळा जवळ आलेला होता. एकदा पाऊस सुरू झाल्यावर मोगलांचे प्रयत्न हलके पडले असते. हे सर्व जाणूनच दिलेरखानाने पुरंदरचा वेढा सक्तीने चालवला. पुढे मुरारबाजी व तीनशे मावळे लोक पडल्याची बातमी महाराजांना कळली. मोठमोठे योद्धे कुटुंबासह पुरंदर किल्ल्यावर होते; किल्ला पडल्यास त्यांचा शेवट भलताच होईल असे समजून शिवाजीराजांनी तहाचा निश्चय कायम केला. सामोपचाराने आपले कार्य साधून जयसिंहासारख्या कर्तृत्ववान पुरुषाशी स्नेह जोडून पुढे आपला कार्यभाग हळूहळू जमवून आणावा असा विचार त्यांनी मनाशी ठरवला.

जयसिंह शिवाजीराजांवर चालून आला तेव्हा त्याला महाराजांनी आपला आशय पत्ररूपाने कळवला, त्याचे एक सुंदर फारसी कवन प्रसिद्ध झालेले वाचण्यालायक आहे.[76] पत्रात शिवाजीराजांनी जयसिंहास कळविले आहे की, 'बादशहा तुम्हास थापा देऊन फसवीत आहे, पण तुम्ही फसू नका. अफजलखानाच्या वार्तेने तुम्ही माझी दहशत बाळगू नका. खानाने मला पकडण्यासाठी बाराशे हबशी स्वार दबा धरून ठेवले होते, म्हणून त्याचा प्रतिकार करणे मला प्राप्त झाले.

जयसिंहाचे मुक्कामावर मनूचीची व शिवाजीराजांची भेट झाली त्याची हकिगत त्याने आपल्या पुस्तकात दिली आहे. त्यातील गोषवारा येणेप्रमाणे. जयसिंहाने शिवाजीराजांच्या प्रधानास पैसे भरून त्यांजकरवी आपल्याबद्दल शिवाजीराजांच्या मनात चांगला ग्रह उत्पन्न केला. जयसिंहाने महाराजांना कळवले, ''तुम्ही माझ्या शब्दावर पूर्ण भरवसा ठेवून नि:शंकपणे सांगतो असे कराल, तर बादशहाकडून तुमचे मनोरथ चांगले तडीस जातील.'' जयसिंहाच्या वचनावर सर्वस्वी भरंवसा ठेवून महाराज आपण होऊन त्याचे भेटीस गेले. महाराज दाखल झाले तेव्हा सर्व शिबिरात मोठी खळबळ उडून राहिली होती. ज्याला-त्याला वाटे, 'शिवाजीराजा काय गडबड उडवितो कोणास ठाऊक.' परंतु त्यांचेबरोबर फारसे लोक नाहीत असे पाहून लोकांची अंत:करणे शांत झाली. आपल्या तंबूला लागूनच शिवाजीराजांना राहण्यासाठी जयसिंहाने एक स्वतंत्र तंबू दिला. एके दिवशी रात्री मनूची व जयसिंह पत्ते खेळत बसले असताना महाराज आत आले. त्यावेळी सर्वांनी उठून त्यांचा सत्कार केला आणि खाली बसल्यावर, मनूचीकडे बोट दाखवून 'हे कोण' असे जयसिंहास शिवाजीने विचारले. शिवाजीपेक्षा मनूची बारा वर्षांनी लहान होते. जयसिंहाने सांगितले. 'हे फिरंग्यांचे राजे आहेत.' नंतर मनूची व शिवाजीराजांचे पुष्कळ वेळा संभाषण झाले.

मनूचीला उर्दू व हिंदुस्थानी दोन्ही भाषा चांगल्या येत होत्या. युरोपातील राजांविषयी व लोकांविषयी नाना प्रकारची माहिती शिवाजीराजांनी मनुचीपासून विचारून घेतली.

4) जयसिंहाचा बादशहाकडे रिपोर्ट (18.6.1669) :

या एकंदर प्रकरणाची तपशीलवार हकिगत पुढे जयसिंहाने बादशहास लिहून कळवली, ती अशी. ‘आमची फौज पुण्याकडे चाल करू लागली, तेव्हा शिवाजीचे कामगार त्याची पत्रे घेऊन माझ्याकडे येऊ लागले; परंतु मी त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. शिवाजीराजांचा चांगलाच पाडाव केल्याशिवाय त्यांच्या शब्दावर किंवा वचनावर विश्वास ठेवणे योग्य नाही हे मी पूर्ण जाणून होतो. पुढे कर्माजी नावाचा त्यांचा एक कामदार हिंदीत लिहिलेले एक पत्र घेऊन इकडे आला आणि अत्यंत आर्जवे करून सांगू लागला. ‘एकवार पत्रातील मजकूर वाचून उत्तर देण्याची मेहेरबानी करा.’ तेव्हा मी शिवाजीराजांचे पत्र वाचले, त्यात खालील मजकूर होता. ‘मी बादशहाचा बंदा नोकर आहे आणि मी लहान असलो तरी बादशहाचा पुष्कळ फायदा करू शकेन. कोकणच्या ह्या डोंगराळ प्रदेशात लढण्याचा त्रास करण्यापेक्षा, विजापूरचा मुलुख आपल्यास सहज जिंकता येईल.’ त्यावर मी जवाब लिहिला की, ‘बादशाही फौज आकाशातील ताऱ्याप्रमाणे असंख्य आहे. तुमचा पाडाव करण्यासाठी ती आली आहे. तुमचा डोंगराळ व खडकाळ प्रदेश तिला दुर्गम आहे असे नाही. आमच्या अश्वांच्या पायाखाली कसल्याही अवघड प्रदेशाची धूळ होईल. तुम्हाला जर जीव वाचवायचा असेल, तर बादशहाची गुलामगिरी धारण करून शरण या. अशी गुलामगिरी करण्यात आमच्यासारख्या सरदारांसही भूषण वाटते. आता तुम्ही आपल्या किल्ल्यांची व डोंगरांची आशा सोडा. असे न कराल, तर आपल्या हाताने तुम्ही आपली खराबी करून घ्याल.’ ह्यावर शिवाजीने आणखी अनेक पत्रे पाठवली. इकडे आमच्या फौजेने त्याचा समाचार घेण्याचा सपाटा चालविला, तेव्हा बादशहास खंडणी देऊन एक-दोन किल्ले स्वाधीन करण्यास तो कबूल झाला. त्यावर पुन्हा मी पहिल्याप्रमाणेच जवाब पाठवला. पुढे आमच्या फौजेने पुरंदर नजीकचा रुद्रमाळ किल्ला काबीज केला. आम्ही आणखी फौजा त्याचे दुसरे प्रांत काबीज करण्यास पाठवल्या आणि काही फौज तर सारखी फिरती ठेवून सर्व मुलखात धुमाकूळ उडवून दिला. आमच्या फौजेने आपले काम उत्कृष्ट केले. मीही प्रत्येक ठिकाणी जाऊन व्यवस्था पाहत होतो. अशी आमची करामत पाहताच शिवाजी उघडपणे लोकांस सांगू लागला की, ‘आता आपला निभाव ह्या मोगल फौजेपुढे लागत नाही.’ इकडे पुरंदरचा वेढा मोठ्या निकराने चालूच होता. पाच बुरूज व एक तट काबीज झाला; शिवाजीचा पुष्कळ मुलुख उजाड झाला. त्याच्या फौजेतील बऱ्याच लोकांस फोडून मी मोठे आमिष दाखवून बादशाही फौजेत

दाखल केले. जावळीस खेळो भोसला पाचशे फौजेसह होता, त्यास मोठ्या युक्तीने फोडून आमच्याकडे आणण्याचा प्रयत्न जारीने चालू आहे. अशा स्थितीत शिवाजीला दोन मार्ग राहिले. एक, बादशहास शरण येऊन आपल्या जीविताचे व वित्ताचे रक्षण करावे, नाहीतर तळकोकणचा विजापुरी प्रदेश आदिलशहास परत देऊन, त्यास जाऊन मिळावे, आणि दोघांनी मिळून आमच्याशी सामना करावा. ह्यापैकी पहिलाच मार्ग शिवाजीच्या फायद्याचा होता हे उघड आहे.

'इकडे गुप्तहेरांकडून मला अशी खात्रीलायक बातमी कळली की, आदिलशहा बाह्यत: आमच्याशी गोडी दाखवून, आतून शिवाजीशी संगनमत करून, त्याच्या मदतीस कोकणात फौज पाठवीत आहे. आता शिवाजी व आदिलशहा ह्या दोघांशी सामना करणे जरी बादशाही फौजेस अशक्य नाही, तरी युक्तीने कार्य साधल्यास विलंब का करावा असे मनात आणून, शिवाजीला विजापुराकडे जाऊ देणे मला बरे वाटले नाही. इतक्यात ता. 20 मे रोजी शिवाजीचा विश्वासू व विद्वान वकील रघुनाथपंत गुप्त बोलणे करण्यासाठी माझ्याकडे आला आणि हिंदू रिवाजाप्रमाणे अत्यंत पवित्र शपथा घेऊन शिवाजीच्या मनोदयाविषयी त्याने खातरजमा केली. त्यावर मी कळविले की, 'शिवाजीशी तह करण्याची बादशहाची मला परवानगी नाही. म्हणून उघडपणे मला शिवाजीशी बोलणे करता येत नाही. तथापि शिवाजी नि:शस्त्र होऊन अपराधी म्हणून शरण येऊन क्षमेची याचना करील तर परमेश्वररूपी बादशहाच्या दयेचा ओघ कदाचित त्याजकडे वळेल.' त्यावर रघुनाथपंत परत गेला; आणि पुन्हा निरोप घेऊन आला की, 'शिवाजी आपला मुलगा संभाजी ह्यास आपल्याकडे पाठविण्यास तयार आहे.' त्यावर मी रघुनाथपंत यास कळविले, 'संभाजी येऊन चालावयाचे नाही.' पुढे शिवाजीने अशी विनंती केली की, 'आमच्या जीवितास अपाय होणार नाही असे वचन बादशहाच्या तर्फेने आपणास उघड देता येत नसेल, तर निदान तुम्ही आपले खासगी वचन द्या, म्हणजे त्यावर भरंवसा ठेवून मी नि:शंक आपणास येऊन भेटतो.' त्याप्रमाणे वचन देऊन व ठराव करून मी शिवाजीस पुन्हा बजावले की, 'तुम्ही आमच्या भेटीस येऊन बादशहाचे हुकूम पाळण्याचे कबूल कराल तर, तुमच्या अपराधांची क्षमा होऊन बादशाही कृपेस पात्र व्हाल. भेटीत ही गोष्ट तुम्हास कबूल झाली नाही तर सुरक्षितपणे परत जाण्याची परवानगी मिळेल.

'ता. 9 जून सन 1665 रोजी रघुनाथ पंडित परत गेला आणि ता. 11 रोजी सकाळी एक प्रहर दिवसास मी दरबारात बसलो असताना पंडिताने येऊन कळविले की, 'शिवाजी ठरल्याप्रमाणे आपल्या भेटीस आले आहेत; बरोबर सहा ब्राह्मण व पालखीसह भोई आहेत.' लगेच मी उदयराज मुनशी व उग्रसेन कछवा ह्यांना शिवाजीकडे रस्त्यात पाठवून पळविले की, 'सर्व किल्ले स्वाधीन करून देण्यास कबूल असाल तर पुढे या, नाहीतर आल्यापायी माघारे जा.' त्यावर शिवाजीने उत्तर पाठविले, 'मी आता बादशाही नोकरीत दाखल झालो आहे आणि माझे पुष्कळ किल्ले बादशहास देण्यास मी कबूल आहे.' असे

बोलून त्याच गृहस्थाबरोबर शिवाजी आत आला. जानीबेग बक्षी यास तंबूचे दाराशी पाठवून त्याजकरवी मी शिवाजीस आत आणले. याचवेळेस आम्ही आगाऊ ठरवून ठेवल्याप्रमाणे दिलेरखान व कीरतसिंह ह्यांनी पुरंदर किल्ल्याचा खालचा कोट काबीज केला. तेथील धुराचा लोट व लढाईची हातघाई आमचे तंबूतून दिसत होती. शिवाजीने हा प्रकार पाहून लगेच पुरंदर किल्ला स्वाधीन करण्याचे कबूल केले. मी म्हणालो, 'पुरंदर किल्ला तर आम्ही घेतलाच आहे. आता थोडक्याच वेळात आमच्या तलवारी आतील सर्व लोकांची कत्तल करतील. बादशहास नजर करण्यासाठी दुसरे किल्ले तुमच्या जवळ पुष्कळ आहेत. त्याबरोबर शिवाजीने विनंती केली की, 'पुरंदरच्या लोकांची कत्तल करू नका. मीच किल्ला खाली करून देतो.' मी बरे म्हणून लगेच गाजीबेग व शिवाजीचा एक इसम अशा दोघांस दिलेरखानाकडे पाठविले आणि 'किल्ला ताब्यात घ्या व आतील लोकांना निघून जाऊ द्या' असे कळविले. किल्ला खाली झाल्याची हकिगत आपणास पूर्वी कळवलीच आहे. मी आपल्या दिवाणखान्यात शिवाजीला राहवून घेतले. सुरतसिंह कछवा व उदयराज मुनशी ह्यांच्या मार्फत शिवाजीशी पुष्कळ बोलणी झाली. मध्यरात्रपर्यंत प्रश्नोत्तरे, विनवण्या व क्षमेची आर्जवे वगैरे प्रकार झाले. एक सुद्धा किल्ला कमी घेण्यास मी कबूल नाही असे मी त्यास साफ सांगितले. अशा रीतीने बोलणी होऊन खालील मुद्दे ठरावात आले. चाळीस लक्ष होन वसुलाचे लहान-मोठे 23 किल्ले बादशहाचे ताब्यात सुप्रत करावे आणि राजगड वगैरे बारा किल्ले स्वत:कडे ठेवून शिवाजीने राजनिष्ठ राहून बादशहाची नोकरी करावी. शिवाजीने अशीही विनंती केली की, 'आजपर्यंत मी अन्यायाने वागल्यामुळे मला आता बादशहांकडे तोंड दाखविण्यास जागा नाही. म्हणून त्यांच्या नोकरीस मी आपला मुलगा संभाजी यास पाठवून देतो. मी तर गुन्हेगार असून इत:पर बादशहाशी बेइमान करणार नाही. दक्षिणेत मला जी कामगिरी सांगण्यात येईल ती मी करीन.'

'हे ठराव प्रथमच आपणास कळवून आपली मंजुरी त्यास आणावयाची खरी, परंतु तसे करण्यास वेळ नव्हता. शिवाजी इतके दिवस येथे राहण्यास खुशी नव्हता. त्यास मी शपथपुरस्सर अभयवचन दिल्यावरही जर ते वचन मोडून अडकवून ठेवावा, तर त्याचे दोन परिणाम होतील. या बाजूचे जहागीरदार, पाळेगार, नाईक वगैरे लोकांचा विश्वास आमच्या वचनावरून साफ उडून जाईल. वास्तविक आमची वचने सिकंदरच्या तटाप्रमाणे सदैव भक्कम असली पाहिजेत. दुसरा परिणाम असा की, शिवाजी आमचे भेटीस आला, तो राज्याची व दौलतीची संपूर्ण निरवानिरव करून आला. जर कदाचित आमचेकडून त्याच्या जिवास अपाय झाला, तर मागे सर्व व्यवस्था नीट चालावी, अशी त्याने सोय करून ठेवल्याची पक्की बातमी आम्हास लागली. म्हणजे केवळ शिवाजी आमचे ताब्यात आल्याने, सर्व काम भागत होते असे नाही.'

'हे दोन परिणाम मनात घेऊन मी शिवाजीस दिलेले वचन पाळून त्याची विनंती मान्य केली. दुसरे दिवशी किल्ले आमच्या हवाली करण्याविषयी मी त्यास तगादा लावला. तेव्हा

त्याने आपला कामदार रोहिडा किल्ला स्वाधीन करून देण्यास पाठविला. मीही सुजनसिंहाचा भाऊ इंद्रमणी ह्यास किल्ला ताब्यात घेण्यास कळविले. त्याचप्रमाणे लोहगड, इसागड (विसापूर), तुंग व तिकोना हे किल्ले आमचे हवाली करण्यासाठी शिवाजीने दुसरा कामदार पाठवला. हे चार किल्ले एकाच ओळीत जवळ-जवळ आहेत. मी ते किल्ले स्वाधीन करून घेण्यास कुत्बखानास पाठविले. कोंढाण्यासंबंधाने शिवाजी बोलला, 'मी स्वत:च परत जाताना कोंढाणा किल्ला खाली करून मग राजगडास जाईन; आणि दुसरे किल्ले स्वाधीन करण्यास संभाजीला पाठवीन.'

'शिवाजी माझ्याकडे आल्याची बातमी अजून बाहेर फुटली नव्हती, तोच म्हणजे ता.13 जून रोजी मी शिवाजीला हत्तीवर बसवून व राजा रायसिंहास बरोबर देऊन त्यास दिलेरखानाकडे पुरंदरचे माचीस पाठविले. तेथून परत आल्यावर ता.14 जून रोजी त्याला एक हत्ती व दोन घोडे बक्षीस देऊन कीरतसिंहाबरोबर त्याची परत रवानगी करून दिली. दुपारी तो कोंढाण्यास पोहोचला; लगेच त्याने किल्ला माझ्या मुलाचे स्वाधीन केला. तेथून पुढे उग्रसेन कछवा ह्यास बरोबर घेऊन शिवाजी राजगडास गेला. उग्रसेनाबरोबर संभाजीस आमचेकडे पाठविण्याचे ठरले होते.'

'ता.15 रोजी शिवाजी राजगडास पोहोचला. ता.16 रोजी सर्व व्यवस्था करून ता.17 मार्च रोजी उग्रसेनाबरोबर त्याने संभाजीस आमचेकडे रवाना केले; तो ता.18 रोजी आमच्या छावणीत दाखल झाला. संभाजीला मी आपल्याच तंबूत ठेवून घेतले. त्याच दिवशी रोहिडा व लोहगड वगैरे किल्ले ताब्यात आल्याची खबर आली. ह्या सात किल्ल्यांच्या किल्ल्या मी गाजीबेगच्या हाती आपल्याकडे रवाना केल्या आहेत. त्याचा मुलगा संभाजी दाखल झालाच आहे, तेव्हा आता बाकीचे किल्ले ताब्यात घेऊन त्यांच्याही किल्ल्या आपल्याकडे रवाना करतो.

'पुरंदर किल्ला काबीज करण्यासाठी जेवढी रक्कम माझ्या नावे खर्ची पडली आहे म्हणजे रोख रक्कम माझ्या नावे खर्च पडली आहे म्हणजे रोख रुपये तीस हजार व शिवाय दारूगोळा, तेवढी रक्कम ह्यासोबत आज मी आपल्याकडे परत भरणा करीत आहे. बाकी माझा देह आपल्या खिदमतीस अर्पण केलेला आहेच.'

'आता शिवाजीकडे अजून बारा किल्ले राहिले ही गोष्ट खरी. परंतु त्याचे सर्व डोंगरी किल्ले त्याजकडे असताच आम्ही त्यास जेरीस आणून शरण येण्यास लावले आणि हल्लीही त्याच्या सभोवार आमच्या किल्ल्यांचा वेढा कायम आहेच. तेव्हा कराराप्रमाणे चालण्यास शिवाजी यत्किंचित हयगय करील तर त्याचा नाश करण्यास आता आपणास विलंब लागणार नाही. त्याच्या मुलास पंचहजारी मनसब कबूल केली आहे; ही म्हणजे ह्यापूर्वीच शिवाजीच्या सरदारांस इकडून दिलेल्या मनसबींपेक्षा जास्त नाही. मला वाटते ही मनसब व जागीर औरंगाबादचे सुभ्यास द्यावी; कारण तेथे ती वाटेल तेव्हा खालसा करता येईल. आता विजापूरचे काही प्रांत शिवाजीच्या ताब्यात आहेत. परंतु विजापुरशी युद्ध

करून ते राज्य काबीज करण्यास हा समय चांगला आहे; त्या कामी शिवाजी मदत करण्याचे कबूल करीत आहे. तेव्हा हा कार्यभाग प्रथम उरकून घ्यावा हे मला बरे दिसते. ह्यासंबंधाने आपला मनोदय ताबडतोब दुसरे कोणास न कळविता माझ्याकडेच लिहून यावा. तसेच, शिवाजीच्या मागण्यांसंबंधाने आपला काय विचार आहे, तो खुलासेवार कळवावा. आपले फर्मान शिवाजीच्या नावाचे येईल त्यात 'मी केलेले ठराव कबूल आहेत आणि सर्व किल्ले ताब्यात आल्यावर दुसरे नवीन फर्मान पाठविण्यात येईल,' असा उल्लेख असावा.'

* * ता.14 जून रोजी शिवाजीराजांनी कोंढाणा खाली करून दिला. किल्ल्यावर शिवाजीराजांची आई, बायको व आप्त मंडळी होती, ती सर्व व फौजेसुद्धा सात हजार लोक निघून गेले. ता.18 जून रोजी संभाजी जयसिंहाचे छावणीत हजर झाला, आणि त्यास बादशहाचे हुकुमाप्रमाणे जयसिंहाने पाच हजारांची मनसब दिली.

अफझलखानाच्या व जयसिंहाच्या भेटीमधील विरोध अनेक दृष्टींनी मोठा हृदयंगम वाटतो. रघुनाथपंत 20 मे रोजी जयसिंहास भेटला आणि त्याने जयसिंहाचे मनात शिवाजीराजांबद्दल आदर उत्पन्न केला. शिवाजीने 11 जून रोजी जयसिंहाची भेट घेतली. दोन दिवस तो त्याच्याच घरी पाहुण्यासारखा राहिला. त्यावेळी निजणे-बसणे, जेवणखाण सर्व जयसिहाचेच येथे शिवाजीने केले. अर्थात उभयतांचे यथेच्छ संभाषण झाले असले पाहिजे. काही व्यक्ती अशा असतात की, 'एक वार त्यांची गाठ पडल्यावर त्यांची छाप आपल्यावर बसल्याशिवाय राहत नाही.' शिवाजीराजे अशा व्यक्तींपैकी होते. पाहिजे तशा व्यक्तीवर ते आपली छाप बसवीत असत. थोडेसे संभाषण झाल्यावर शिवाजीराजांचा सद्हेतू व राष्ट्रप्रेम यांचा परिणाम जयसिंहाचे मनावर तेव्हाच झाला. जयसिंहाने बादशहाचा व शिवाजीराजांचा मिलाफ करून दोघांच्याही हिताचा मार्ग सांगितला. शिवाजीराजांनी बादशहास भेटावे, आपली राजनिष्ठा नम्रपणे व्यक्त करावी आणि बादशहाने शिवाजीराजांचा योग्यप्रकारे सत्कार करून त्यांजकडून राज्याची सेवा घ्यावी; शिवाजीराजे हा मोगल बादशाहीचा एक मजबूद खांब व्हावा, अशा प्रकारची जयसिंहाची योजना होती.

5) पुरंदरचा तह :

शिवाजीचा व बादशहाचा तह ठरला, त्यावेळी बादशहाचे खालील पत्र ता.5.9.1665 चे शिवाजीस आले.

'...मुसलमानी धर्मरक्षक शिवाजी राजे यांनी बादशाही कृपेचे उमेदवार होऊन जाणावे, की सांप्रत तुमचे पत्र बहुत नरमाईचे राजे जयसिंह याची भेट, आपले केलेले कृत्य माफ व्हावे म्हणोन घेतल्याचे, पावून मजकूर ध्यानास आला. यापूर्वी तुमचे मनातील हांशील

सरकार कामदारांनी समजाविले होते की, तुम्ही आपले कृत्याचा पश्चात्ताप करून या दौलतीचे आश्रयास येऊन, वीस किल्ले आपणाकडील इकडील कामदारांचे स्वाधीन करून, बारा किल्ले व त्याखालचा मुलुख एक लक्ष होनांचा, निजामशाहीचे किल्ले व मुलुखापैकी, त्याचप्रकारे आणखी चार लक्ष होनांचा मुलुख तळकोकणातील विजापुरकरांचे इलाख्याचा जो हल्ली तुमच्याकडे चालत आहे, व पाच लक्ष होनांचा मुलुख बालाघाटापैकी विजापूरकरांचे इलाख्यातील, येणेप्रमाणे एकंदराचा फर्मान बादशाही मागता व चाळीस लाख होन, दरसाल तीन लाख प्रमाणे पेशकशीबद्दल देऊ म्हणता; ऐसीयास, तुमच्या गोष्टी, ज्या तुम्ही दूरंदेशा न पाहता केल्या, त्या माफीजोग्या नाहीत. तथापि राजे जयसिंह यांनी लिहिल्यावरून सर्व माफ करून तुमचे मनोरथाप्रमाणे बारा किल्ले, ज्यांचा तपसील खाली लिहिला आहे ते व त्याखालचा मुलुख देऊन, आणखी हुकूम केला आहे की जो मुलुख नऊ लक्ष होनांचा, पैकी चार लक्ष होनांचा तळकोकणापैकी विजापूरकरांचे इलाख्यातील हल्ली तुम्हाकडे चालत आहे, तो बंदोबस्तामुळे इकडील सरकारात आला. सबब, व बालाघाटी पाच लक्षांचा, विजापूर आमचे हाती येई त्याआधी तुम्ही त्यांचेकडून घेतल्यास, या अन्वये तुम्ही चांगले फौजेसुद्धा राजे जयसिंह यांचेशी मिळोन बादशाही कामात त्यांचे मर्जीप्रमाणे कोशीस केल्यास, विजापूर फत्ते जाहल्यानंतर तुम्ही पेशकशीचे ऐवजाचा भरणा केल्यास, तुम्हाकडे बहाल ठेवू. हल्ली तुमचे चिरंजिवास पाच हजारी मनसबा व पाच हजार स्वार, की एका-एकाची दोन-दोन, तीन-तीन घोडी असावी, याप्रमाणे देऊन तुम्हाकरिता पोषाख पाठवून हा फर्मान आपले पंजाचे चिन्हासह पाठविला आहे. तरी तुम्ही इकडील लक्षात वागोन बादशाही लहान मोठे सुद्धा काम करून, हे सर्व आपले ऊर्जिताची गोष्ट आहे असे समजत जावे. छ 5 रबिलावल सन 1077 हिजरी.'

शिवाजीराजांकडे राहवयाचे बारा किल्ल्यांचा तपसील :-

1 राजगड	1 तोरणा	1 लिंगणगड	1 महाडगड
1 घोसाळा	1 अलवारी	1 भोरप	1 कुंवारी
1 रायरी	1 पाल	1 तळेगड	1 उदयदुर्ग

शिवाजीराजांनी वीस किल्ले जयसिंहाच्या स्वाधीन करून दिले. परंतु त्या सर्वांचा बंदोबस्त करण्याइतकी फौज जयसिंहाजवळ नव्हती. सिंहगड, पुरंदर व लोहगड या किल्ल्यांवर मात्र त्याने मजबूद बंदोबस्त केला; दुसऱ्या कित्येकांवर थोडे बहुत लोक ठेवून दिले. कित्येकांचे दरवाजे जाळून टाकून काही तट वगैरे पाडले आणि सर्वांवर आपली निशाणे चढवली. नावनिशीवार बारा किल्ले व सभोवतालचा मुलुख जागीर म्हणून बादशहाने शिवाजीराजांना दिला. ठरल्याप्रमाणे संभाजीराजांना मनसब मिळाली. शिवाजीराजांच्या विश्वासाची खात्री होण्याकरता विजापूर जिंकण्यास त्यांनी जयसिंहाचे मदतीस जावे असे बादशहाने फर्मावले. शिवाजीराजांचे इमान कसास लावण्याचा जयसिंहाने एकदम प्रसंग आणला. त्याने शिवाजीराजांकडून घेतलेल्या किल्ल्यांचा

बंदोबस्त करून बादशाही हुकुमाप्रमाणे आपला मोर्चा विजापूरकरांवर फिरवला आणि शिवाजीस मदतीस बोलावले. शिवाजीराजांना इकडील प्रदेशाची चांगली माहिती असल्यामुळे, जयसिंहास त्यांचा चांगलाच उपयोग झाला. या संबंधाने खालील पत्र ता.15.12.1665 चे औरंगजेबाकडून शिवाजीराजांना आले. 'तम्ही फौजेसुद्धा बादशाही लष्करात आहात आणि ताथवडा, फलटण हे किल्ले विजापुरकरांकडील होते, ते घेऊन त्यांची फौज तळकोकण प्रांती होती तेथे रात्री (?) पोहोचवली, म्हणोन राजे जयसिंह यांनी लिहिल्यावरून तुमचे शाबासकीस कारण झाले. सबब तुम्हाकरिता उत्तम पोषाख व जडावाची कट्यार पाठवली आहे. या लाभाचा संतोष मानून इत:पर या स्वारीत जितके कोशीस कराल तितके पहिल्यापेक्षा अधिक लोभास कारण होईल.'

6) विजापूरच्या युद्धात जयसिंहाची अखेर (सप्टेंबर 1665 ते जुलै 1667) :

पुरंदरचा तह झाल्याबरोबर जयसिंहाने पावसाळ्याचे महिने विजापूर जिंकण्याच्या तयारीत घालवले. सप्टेंबरात बादशहाकडून तह मंजूर होऊन येताच त्याने शिवाजीराजांना जवळ बोलावले. ता.30.09.1665 रोजी कीरतसिंह व शिवाजीराजे यांनी सहा मैल 'पायी' सामोरे जाऊन बादशहाकडून आलेल्या फर्मानांना वंदन केले. नंतर लगेच शिवाजीराजे 9000 फौज घेऊन नेताजी पालकरसह जयसिंहास सामील झाले. त्याचे खर्चास जयसिंहाने तोन लाख रुपये दिले. ता.20.11.1665 रोजी पुरंदराहून या संयुक्त फौजा विजापुरकडे चालू लागल्या. ता.7 डिसेंबर रोजी फलटण हस्तगत करून नंतर ताथवडा, खटाव ही स्थळे घेऊन ता.18 रोजी ते मंगळवेढ्यास दाखल झाले. इतक्यात विजापुरहून सर्जाखान व खवासखान त्यांजवर चालून आले. त्यांच्या फौजेत मुधोळकर मालोजी घोरपडे व शिवाजीचा बंधू एकोजी भोसले आपली पथके घेऊन सामील झाले होते. दिलेरखान व नेताजी पालकर यांनी निकराने हल्ला करून पुढे आलेल्या विजापुरी फौजांचा पराभव केला. या लढाईत शिवाजीराजे व एकोजी यांचा सामना झाला. नंतर मोगल फौजा विजापुरकरांचा पाठलाग करीत व धावपळीचे युद्ध खेळत थेट विजापूरनजीक येऊन ठेपल्या. मध्यंतरी अनेक कारणे घडून दिलेरखान व जयसिंह यांचे वाकडे येऊन अत्यंत गोंधळ उडाला. तेव्हा विजापूर हस्तगत करणे शक्य नाही असे जयसिंहास वाटून युद्धाचा इरादा सोडून तो परिंड्याकडे चालता झाला. त्यावेळी शिवाजीराजाने जयसिंहास कळवले की, 'तुमची परवानगी असेल तर मी पन्हाळ्यावर हल्ला करून तो किल्ला तुमचे हस्तगत करून देतो. जयसिंहाने ती गोष्ट कबूल केली. लगेच महाराज पन्हाळ्यावर चालून गेले व ता.16.1.1666 रोजी त्याने पहाटेच्या अंधारात पन्हाळ्यावर हल्ला चढवला, पण त्यात

महाराजांना यश आले नाही. त्याचे सुमारे एक हजार लोक जाया होऊन स्वत:च्या बचावासाठी त्यांना विशाळगडावर जावे लागले.

वरील युद्धात सर्जाखान व खवासखान यांनी मोगलांना चांगलाच हात दाखवला. गोवळकोंड्याच्या कुतुबशहाचीही मदत त्यांना आली होती. शिवाजीराजे जेव्हा पन्हाळ्यावर चालून गेले, तेव्हा त्यांचे व नेताजीचे काही कारणावरून सडकून वाकडे आले. त्यांचे कारण काय याची स्पष्टता होऊ शकत नाही.[77] विजापूरकरांनी त्याला आपल्या नोकरीत घेऊन चार लाख होन बक्षीस दिले. त्याने लगेच जयसिंहाच्या फौजेची लांडगेतोड सुरू केली. तो त्रास चुकविण्यासाठी जयसिंहाने नेताजीला अंत:स्थ रीतीने पत्रे पाठवून आणि बादशहाचा हुकूम आणवून विजापूरचे नोकरीतून आपल्याकडे आणले आणि 38 हजार होन बक्षीस, पंचहजारी मनसब व खर्चास जागीर दिली. (20 मार्च 1666)

या वेळच्या आपल्या सर्व अडचणी जयसिंहाने बादशहास लिहून कळवल्या आणि सूचना केली की, ‘‘कदाचित शिवाजी सुद्धा विजापुरकरांना जाऊन मिळण्याचा संभव आहे. तो टाळण्यासाठी त्याने आपल्या भेटीस जावे हे मला योग्य दिसते. यास्तव त्याला आपल्याकडे पाठविण्याची परवानगी यावी.’’ बादशहाने ही गोष्ट मान्य केली. पुढे शिवाजीराजे आगऱ्यास गेल्यावर तेथेच अडकले. परंतु तेथून ते कसे निसटले तो वृत्तांत पुढे स्वतंत्र सांगायचा आहे. तूर्त जयसिंहाच्या विजापूर स्वारीचे प्रकरण पूर्ण करू.

विजापुरावर जयसिंहाची मोहीम चालू असताच शिवाजीराजे आगऱ्यास गेले. नंतर तेथून ते सुटून गेल्यामुळे जयसिंहावर बादशहाची अवकृपा झाली. त्यासंबंधाने जयसिंह शोकग्रस्त होऊन लिहितो, ‘शिवाजीस बादशहाकडे पाठविण्यात मी केलेले सर्व बेत व युक्त्या विपरीत झाल्या. मी तर अगदी वेडावून गेलो आहे. नशिबात लिहिले असेल ते चुकत नाही. बादशहाशी मी यत्किंचित कपट केले असेल तर देवाने मला भरपूर शासन करावे. काळ फिरला आहे हे खरे. विजापूर दरबाराने तर माझा पुरता उच्छेद मांडला आहे.’ जयसिंहाची ही उतरती कळा शिवाजीराजांच्या अधिकाऱ्यांना लगोलग कळली आणि बादशाही कैदेतून तो निसटून गेला ही बातमी बाहेर पसरून महाराजांचे अंमलदार चहूकडून मोगलांवर उठले. रोहिडा किल्ल्यावर सय्यद मसूद म्हणून मोगल अधिकारी होता, त्याने जयसिंहास कळवले, ‘शिवाजीचे लोक चहूकडे उठावा करीत असून माझी अवस्था येथे बिकट होत आहे, तर ताबडतोब मला मदत पाठवा.’ त्यावरून सुखमन चौहान यास जयसिंहाने रोहिड्याचे संरक्षणास पाठवले. लवकरच खुद्द महाराज दक्षिणेत दाखल झाले, तेव्हा तर त्याच्या लोकांना दुप्पट जोर चढून ते मोगलांवर तुटून पडले. महाराजांचा जावई महादाजी निंबाळकर पुण्याचे आसपास दंगा करू लागला. त्याजवर जयसिंहाने तानाजी भोसले म्हणून सुप्याचा अधिकारी होता,[78] त्यास रवाना केले. महादाजीने तानाजीशी लढाई करून त्यास ठार मारले. जयसिंहाचे हातून ही बंडाळी मोडवेना. तेव्हा वैतागाने त्याने

बादशहास असे लिहून कळविले की, ‘आपली परवानगी असेल तर अद्यापि मी काही युक्ती करून या दुष्ट शिवाजीचा काटा काढण्यास सिद्ध आहे. मी आपल्या मुलासाठी शिवाजीच्या मुलीची मागणी करतो. आम्हा उच्च कुलीन रजपुतांशी शरीरसंबध जोडण्याची त्यास फार हौस आहे. विवाहविधिकरिता त्याची माझी गाठ पडणारच.[79] म्हणजे मी लगेच त्यास छाटून टाकतो. मात्र हा बेत आपण सर्वथा गुप्त ठेवला पाहिजे.’ पण औरंगजेबाचा मात्र काडीइतका विश्वास जयसिंहाच्या म्हणण्यावर बसला नाही. विजापूर व गोवळकोंडा या दोन राज्यांनी त्याचा उच्छेद चालवला, तेव्हा बादशहाने जयसिंहास परत बोलावून आपला पुत्र मुअज्जम याची नेमणूक पुन्हा दक्षिणच्या सुभ्यावर केली. तो सन 1667 च्या मे महिन्यात अधिकारापन्न होताच जयसिंह परत निघाला. ‘आजपर्यंत ज्याच्याकरिता आपण पडेल ती चाकरी बजावली, तोच बादशहा आता आपली अशी अपेष्टा करतो,’ हे दु:ख अनिवार होऊन जयसिंह बऱ्हाणपुरास पोहोचताच ता.28.8.1667 रोजी मरण पावला.

मनूची म्हणतो, ‘औरंगजेबाच्या सांगण्यावरून राजा जयसिंह बऱ्हाणपूर येथे विषप्रयोगाने मरण पावला. ही बातमी ऐकून औरंगजेबाचा जीव शांत झाला. कारण हा डोईजड सरदार त्यास दृष्टीसमोर नको होता. शुजावर चालून जात असताना पुष्कळदा औरंगजेब जयसिंहाचे कब्जात एकटा सापडला होता आणि जयसिंहाने त्यास सहज मारून टाकले असते. औरंगजेबावर सर्व उपकार जयसिंहाचे होते. त्यानेच दिल्लीचा बचाव केला. दाराचा मुलगा सुलेमान शेखो ह्यास त्यानेच पकडून आणले. जयसिंहामुळेच शिवाजीचा बंदोबस्त झाला. ह्या सर्व उपकारांची फेड, वरप्रमाणे औरंगजेबाने केली! जशवंतसिंहाची अशीच वाताहत त्याने केली.’

ह्या राजपूत राजांचे स्वत्व नाहीसे झाले होते हे लक्षात आणले असता शिवाजीराजांच्या उद्योगाची किंमत कळू लागते.

प्रकरण 8 - आगऱ्याचा दिवाण-इ-आम

(मार्च-डिसेंबर 1666)

1.बादशहाच्या भेटीचे प्रयोजन; 2.पहिली व शेवटची भेट; 3.उभय पक्षांची विवंचना; 4.अद्भूत युक्तीने शिवाजींची सुटका; 5.शिवाजींशी औरंगजेबाचा नामुष्कीचा तह (1668).

1) बादशहाच्या भेटीचे प्रयोजन[80] :-

जयसिंहाने बादशहाला लिहून कळवले होते की ‘कसेही करून मी शिवाजींना आपल्या भेटीस रवाना करतो.’ पण ही गोष्ट जयसिंहाच्या हातची नव्हती. पुरंदरच्या तहात असे स्पष्ट कलम होते की ‘बादशहाची नोकरी करण्याची किंवा त्याचे दरबारास जाण्याची सक्ती शिवाजीराजांवर होऊ नये.’ बादशहाचा विश्वासघातकी स्वभाव सर्वत्र मशहूर होता. वाटेल ते बेइमान आचरण्यास औरंगजेबास दिक्कत वाटणारी नव्हती. कोणत्याही मुसलमानापुढे मान वाकविण्याचा शिवाजीराजांना अत्यंत तिरस्कार वाटत असे. मावळच्या जंगलात अनिरुद्ध संचाराची त्यांना सवय असल्यामुळे दरबारी रिवाज ते जाणत नव्हते. मातु:श्री, गुरू व साधुसंत यांच्या शिकवणीने त्यांच्या अंत:करणात स्वधर्माचे वारे सारखे खेळत असल्यामुळे सेवाधर्माचे आचरण त्यांनी यावज्जन्म अनुभवले नाही. यास्तव बादशहाचे भेटीस जाण्याची त्यांची बिलकूल इच्छा नव्हती. पण जयसिंहाने नाना प्रकारचे आमिष दाखवून त्यांना अत्यंत भर घातली. ‘कसेही करून शिवाजींना आपल्या भेटीस पाठवतो,’ असे त्याने बादशहास वारंवार लिहून पाठविलेले आढळते. ‘बादशहाची मोठी इच्छा आहे की तुम्हास भेटावे, तुमचा गौरव करावा, तुम्हास दक्षिणेची सुभेदारी देऊन आणि फौज व पैसा पुरवून तुमचेकडून विजापूर, गोवळकोंडा ही राज्ये जिंकावी,’ असे अनेक आशावाद जयसिंहाने शिवाजीराजांना दाखवले. खरे पाहता निश्चित असे वचन बादशहाने दिलेले त्याच्या पत्रव्यवहारात कधीच आढळत नाही. मात्र आजपावेतो दक्षिण देश जिंकण्याचे कामी मोठमोठ्या नामांकित सेनापतींना अपयश आल्यामुळे त्या कामी शिवाजींसारख्या चतुर व अनुभवी सेनानींचा उपयोग करून घ्यावा ही कल्पना बादशहाचे

मनात अगदीच नसेल असे नाही.' 'आम्हीच स्वत: येऊन हे काम पुरे करतो,' असे दिखाऊ उद्गार औरंगजेबाच्या पत्रात सन 1666 चे आढळतात. या अवघड कामी 'आपण शिवाजीचा उपयोग करून घ्या, म्हणजे स्वत: दक्षिणेत येण्याचे कारण पडणार नाही.' असे जयसिंहाने त्यास कळवले असावे. शिवाजींच्या मनात सिद्दीच्या ताब्यातले जंजिऱ्याचे स्थळ आपल्या हाती असावे अशी मोठी उत्कंठा होती. जयसिंहाकडे त्यांनी तसे बोलणे केले. त्यावर बादशहाचा साफीचा जवाब आला नाही. अलिकडे हा सिद्दी औरंगजेबाचा नोकर बनला होता. तेव्हा समक्ष भेटीत बादशहाची समजूत घालून सिद्दीचे काम आपल्याकडे बदलून घेता येईल, असे जयसिंहाने शिवाजीराजांना सांगितले. अशी अनेक प्रकारची आशा दाखवून त्याने भेटीस जाण्याची भर शिवाजीराजांना घातली. त्यावरून आपल्या मंडळींत या संबंधाने शिवाजीराजांनी भरपूर चर्चा कैक दिवस केली. 'सिंहाच्या गुहेत आपण होऊन शिरणे योग्य नाही' असे पुष्कळांचे मत पडले. पण देवीचा कौलही त्यांना मिळाला, ज्योतिष्यांचा सल्ला विचारता त्यांनीही कळवले की अवश्य जावे, त्यात यश:सिद्धी खात्रीने होईल. 'तुमचे जिवास कोणताही अपाय आम्ही होऊ देणार नाही, त्याबद्दल मी व माझा पुत्र रामसिंह जामीन आहोत', अशा शपथा व करार जयसिंह व त्याचा पुत्र या दोघांनीही विधिपूर्वक शिवाजीराजांना पाठवून दिले. तेव्हा अखेरीस बादशहाकडे जाण्याचाच निश्चय शिवाजीराजांनी ठरवला.

निघण्यापूर्वी आपल्या नूतन राज्याची व्यवस्था शिवाजीराजांनी ठरवून दिली, त्यात त्यांची दूरदृष्टी व चातुर्य विशेष दिसून येते. आपल्यावर कसाही प्रसंग गुदरला तरी पाठीमागे सर्व गोष्टी सुरळीत चालाव्या अशी त्यांची योजना होती. प्रसंग पडेल त्याप्रमाणे वागून ज्याने-त्याने आपापली कामे यथासांग पार पाडावी अशी सिद्धता त्याने केली. म्हणजे जी कल्पकता प्रत्यक्ष शिवाजीराजांचे अंगी होती, तीच थोड्या बहुत अंशाने त्यांनी आपल्या अनुयायांचे ठिकाणी उत्पन्न करून दिली. मुख्य कारभार त्यांनी जिजाबाईंवर सोपवला. प्रधान मोरोपंत, मुजुमदार निळो सोनदेव व सेपापती प्रतापराव गुजर या तिघांनी सर्वत्र दृष्टी ठेवून जिजाबाईंचे आज्ञेने वर्तावे असे मंत्रिमंडळ त्यांनी ठरवून दिले. किल्लेदारांनी रात्रंदिवस डोळ्यांत तेल घालून सावध राहावे, घालून दिलेले धारे बिनचूक पाळावे, अकस्मात घाला आल्यास त्याचे निरसन वेळेवर करावे, अशी व्यवस्था त्यांनी लावली. आपले किल्ले व मुलुख एकवार त्यांनी स्वत: हिंडून पाहिला आणि निरनिराळ्या अधिकाऱ्यांना भरपूर इशारती व सूचना दिल्या. नंतर सोमवार फाल्गुन शुद्ध 9 शके 1588 (5.3.1666) रोजी सुमुहूर्तावर राजगडाहून सर्वांचा निरोप घेऊन (सभासद बखर पृ.क्र.46 वरून), पुत्र संभाजी, कित्येक निवडक मंडळी व चार हजार स्वारांचा लवाजमा बरोबर घेऊन शिवाजीराजांनी उत्तरेकडे प्रयाण केले. तानाजी मालुसरे, येसाजी कंक, सर्जेराव जेधे, हिरोजी फर्जंद, बाळाजी आवजी, निराजी रावजी, रघुनाथ बल्लाळ कोरडे, त्रिंबक सोनदेव डबीर, मदारी मेहतर इत्यादी मंडळींबरोबर गेल्याचे वर्णन आढळते. त्यांच्या वाटखर्चाकरता

बादशहाने त्यांना एक लाख रुपये बादशाही खजिन्यातून देववले, आणि प्रवासात गाजीबेग नावाचा आपला अधिकारी त्यांचे तैनातीस दिला. शहाजाद्यांची बरदास्त ठेवण्यात येते तशी शिवाजीराजांची रस्त्यात ठेवावी असे सरपत्र बादशहाने प्रांतिक अंमलदाराला पाठवले.

2) ता. 12 मे ची पहिली व शेवटची भेट :

प्रवासात असता बादशहाने आग्ऱ्याहून लिहिलेले पत्र त्यांना पोहोचले की, 'तुम्ही आमचे भेटीस निघाल्याचे तुमचे पत्र पोहोचले. तुम्ही बेकिलाफ आमचे वचनावर विश्वास ठेवून हुजूर तख्त मुकामी यावे. तुमचे मुद्दे असतील ते उलगडून देऊ. कोणेविशी दिक्कत न धरावी. बादशाही कृपा संपादून तुम्हास स्वदेशी परत पाठविण्यात येईल.'

शिवाजीराजे औरंगाबादेस पोहोचले तेव्हा शहरचे लोक त्यांचा थाट पाहण्यास बाहेर आले. औरंगाबादचा अधिकारी सफशिकनखान शिवाजीराजांना सामोरा आला नाही. त्यांचा समज की, शिवाजींराजे आपल्या भेटीस येतील. याजबद्दल शिवाजीराजांना राग आला आणि ते तसेच शहरातून थेट जयसिंहाच्या मुक्कामावर गेले. तेथे जयसिंहाने शिवाजीराजांचा विशेष आदर केलेला पाहून सफशिकनसह सर्व अधिकारी शिवाजीराजांच्या भेटीस आले. दुसऱ्या दिवशी शिवाजीराजांनी ज्याचे-त्याचे योग्यतेप्रमाणे परत भेटी दिल्या. पुढे बादशहाने हुकूम केल्याप्रमाणे शिवाजीराजांना बहुमान, पोषाख व नजर नजराणे देण्यात आल्यावर ते औरंगाबाद सोडून पुढे जाण्यास निघाले. ते तारीख 9 मे रोजी आग्रा ह्या राजधानीच्या बाहेर येऊन बागेत उतरले. जयसिंहाचा मुलगा कुमार रामसिंह व मुखलिसखान या दोघांना बादशहाने शिवाजीराजांच्या तैनातीस देऊन ता.12 मे रोजी त्यांचा 50वा वाढविदवस होता, त्यावेळेस आपल्या भेटीस दरबारात आणण्यास सांगितले. 'भेट कशी व्हावी' ते या 'तीन' दिवसात ठरवण्यात आले. विजापुरास आदिलशहाशी शिवाजीराजांची भेट झाली त्याप्रमाणे ही भेट व्हावी असा ठराव झाला. बरोबरीचे नात्याने भेट व्हाव असे शिवाजीराजांचे मनात होते. परंतु ही गोष्ट शक्य नाही असे सांगून रामसिंहाने शिवाजीराजांची समजूत घातली. नेमलेल्या दिवशी शिवाजीराजे दरबारास गेले. बरोबर संभाजी व दहा अंमलदार होते.

'दिवाण-इ-आम'च्या शृंगारलेल्या जागेत मोठा दरबार भरला. सर्व दरबारी उंची पोषाख चढवून आपापल्या जागेवर उभे होते. सोन्याचांदीने बादशहाची तुला करण्याची तयारी होती. हजारो लोकांनी समोरील सर्व पटांगण गजबजून गेले होते. समग्र बादशाहीचे वैभव व डामडौल यांचे प्रदर्शन करण्यात बिलकूल कमतरता नव्हती. कुमार रामसिंहाने संभाजी व शिवाजीराजे यांना बादशहापुढे आणले. शिवाजीने 1500 मोहोरांचा नजराणा व सहा हजार रुपयांचा सत्का पुढे ठेवला. 'या शिवाजीराजे' असे बादशहाने म्हणताच त्यांनी

सिंहासनाजवळ जाऊन तीन वेळा प्रणाम केला. नंतर बादशहाने परत जाण्याची खूण करताच चोपदारांनी शिवाजीराजांना तिसऱ्या प्रतीच्या सरदारांत नेऊन उभे केले आणि दरबारचे काम सुरू झाले.

शिवाजीराजांना हा अपमान सहन झाला नाही. आरंभापासून या अपमानास सुरुवात झाली होती. त्यांना घेण्यास आलेले अधिकारी रामसिंह व मुखलिसखान हे हलक्या प्रतीचे 2500 व 1500 चे मनसबदार होते. शिवाजीराजांना पोषाख, किताब किंवा दुसरे काही एक बक्षीस देण्यात आले नाही. त्यांना उभे केले त्यांच्यापुढे सरदारांच्या अनेक रांगा असून तेथून बादशहा त्यांना दिसत सुद्धा नव्हता. त्यांनी रामसिंहास विचारले, 'ही कोणत्या प्रतीची जागा आहे?' रामसिंहाने सांगितले, 'पंच हजारी सरदारांची ही रंग आहे.' 'काय, पंचहजारींच्या रांगेत उभे राहण्यासाठी म्हणून मी बादशहांचे भेटीस आलो काय!! माझा पुत्र संभाजी तर येथे येण्यापूर्वीच पंचहजारी झाला आहे. माझा सेनानायक नेताजीसुद्धा पंचहजारी आहे आणि इतक्या दूर येऊन बादशहाची भेट झाल्यावर माझी बोळवण पंचहजारीवरच होणार काय?' शिवाजीराजांनी पुन्हा विचारले, 'माझ्यापुढे उभे आहेत हे कोण?' रामसिंह म्हणाला, 'हे जसवंतसिंह.' हे ऐकताच शिवाजी म्हणाले, 'काय म्हणता, आमच्या सैनिकांना पाठ दाखवून पळणारे तेच का हे जसवंतसिंह! आणि त्यांची पाठ पाहत आता मी येथे उभे राहवे म्हणजे काय!'

भर दरबारात आपला असा अपमान झालेला पाहून शिवाजीराजांच्या अंगाचा तीळपापड झाला आणि त्यासंबंधी ते मोठमोठ्याने रामसिंहाशी बोलू लागले की, 'मी येथे प्राण देईन, पण अपमान म्हणून सहन करणार नाही.' त्यांचे ते आवेशाचे बोलणे व हावभाव यांच्यायोगाने दरबारची आदब बिघडलेली पाहून रामसिंह तर अगदी घाबरून गेला आणि त्याने आपलेकडून शिवाजीराजांची समजूत घालण्याचा भरपूर प्रयत्न केला. पण त्यांची समजूत न होता ते धाडकन खाली पडले. कदाचित त्यांना संतापवायू होऊन घेरी आली असावी. हा प्रकार दृष्टीस पडताच दरबारात एकदम गडबड उडाली आणि बादशहाने विचारले, 'काय प्रकार आहे?' रामसिंहाने सांगितले, 'जंगलात वावरणारा वाघ अशा या अपरिचित ठिकाणी येऊन उष्णतेने बेहोष झाला आहे. या दक्षिणी लोकांना दरबारचे रीतरिवाज माहीत नाहीत, सबब यांना आपण क्षमा केली पाहिजे.' हे उत्तर ऐकून बादशहाने सांगितले, 'रांजांना बाजूस नेऊन त्यांचे डोक्यावर गुलाबपाणी घाला आणि शुद्धीत आल्यावर त्यांना मुक्कामावर घेऊन जा, दरबार खलास होईपर्यंत थांबू नका.' तशी व्यवस्था झाली.

मुक्कामी गेल्यावर बादशहाने वचनभंग करून आपणास फसविले अशी उघड हाकाटी शिवाजीराजांनी चालवली, आणि 'असा अपमान करण्याऐवजी मला मारून का नाही टाकीत' असा सवाल विचारला. जवळच्या अधिकाऱ्यांनी त्याचे हे वर्तन बादशहाच्या कानांवर घातले. त्यामुळे त्यास शिवाजीराजांचा अत्यंत संताप येऊन अविश्वास उत्पन्न

झाला आणि त्याचा वेळीच बंदोबस्त करणे जरूर आहे असे बादशहाने ठरवून रामसिंहास बोलावून फर्मावले की, ‘शिवाजींना दरबाराची मनाई आहे. शहराच्या तटाबाहेर जयपूर बंगल्यात नेऊन त्यांना बंदोबस्ताने ठेवावे; संभाजीने पाहिजे तर एखादेवेळी दरबारास यावे. तुम्ही शिवाजींवर सक्त नजर ठेवावी. तो निघून गेला तर तुम्हास जबाबदार धरण्यात येईल.’ एवम्-च, आजपर्यंतचे सर्व मनोरथ व्यर्थ जाऊन शिवाजीराजे बादशहाचे उघड-उघड कैदी बनले.

3) उभय पक्षांची विवंचना :

‘आता पुढे करायचे काय!’ याचा विचार शिवाजीराजे व औरंगजेब दोघेही आपापल्यापरीने करू लागले. रघुनाथपंत कोर्डे हा औरंगजेबाचे दरबारात शिवाजीराजांचा वकील म्हणून होता, त्यास बोलावून महाराजांनी वाटाघाट चालवली. रघुनाथपंताने असा सल्ला दिला की बादशहाला विजापूर व गोवळकोंडा जिंकण्याची अत्यंत उत्कंठा आहे. ही कामगिरी मी करून देतो असे सांगून येथून सुटका करून घ्यावी. अशा प्रकारचा अर्ज शिवाजीराजांनी लिहून तो रघुनाथपंताने दरबारात बादशहाकडे दाखवला. त्यावर बादशहाने जवाब दिला, ‘थोडे दिवस थांबा, म्हणजे तुमची विनंती मान्य करू.’ याचा अर्थ शिवीराजांनी योग्य तोच घेतला. त्यानंतर शिवाजीराजांनी पुन्हा विनंती कळवली की, ‘मला एकवार समक्ष भेटीची परवानगी व्हावी, आपल्या फायद्याच्या पुष्कळ गोष्टी मी आपणास सांगणार आहे.’ जाफरखान म्हणून बादशहाचा वजीर होता, त्याला शायिस्ताखानाचे गुप्त पत्र आले होते की, ‘शिवाजी केवळ सैतान आहे, त्याच्याशी समक्ष भेटीचा प्रसंग बादशहांनी कधी आणू नये.’ परंतु अशा बाबतीत बादशहाला दुसऱ्याच्या सल्ल्याची बिलकूल जरूर नव्हती. ज्याने दहाहजार फौजेच्या सानिध्यात अफझलखानास स्वर्गाची वाट दाखवली आणि वीस हजार फौजेच्या गराड्यातून शायिस्ताखानाच्या जनानखान्यात शिरून त्यास जखमी केले, त्यास एकान्तात समक्ष भेटण्याइइतका औरंगजेब भोळा नव्हता. शिवाजींना चेटुकविद्या अवगत आहेत, त्यांना शेपन्नास हात उडी सहज मारता येते, अदृश्य रूप धारण करून ते हवेतून तरंगत जातात, असले जनप्रवाद बादशहाने ऐकलेले होते. तेव्हा शिवाजीराजांना ‘स्वत: भेटण्याची’ परवानगी बादशहा देईल कसा?

‘बादशहाची गाठ पडत नाही’ असे दिसल्यावर शिवाजीराजांनी जाऊन वजीर जाफरखानाची भेट घेतली आणि त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. शिवाजीराजे त्यास म्हणाले, ‘तुम्ही बादशहाचे मन वळवून मला परत पाठवा आणि पैसा व फौजा बरोबर द्या म्हणजे बादशहाचे राज्य मी पाहिजे तितके वाढवून देतो.’ पाच मिनिटे भेट होते तोच जाफरखानाने बोलणे आटोपून शिवाजीराजांना कळवले, ‘बरे आहे राजे, मी बादशहांशी

बोलून तुमचे विचार कळवितो.' जाफरखानाची बायको ती शायिस्ताखानाची बहीण होती. तिने नवऱ्यास बजावले होते की, 'शिवाजींशी फार वेळ बोलत बसू नका.' अर्थात वजिराचे हातून काय कार्यभाग होणार ते महाराजांना कळून चुकले.

'हाती सत्ता असणाऱ्यांना पुष्कळदा इतरांच्या भावना कळत नाहीत.' राजपूत राजे व सर्व रयता बादशहाच्या ताटाखालील मांजरे बनली होती. अशा स्थितीत शिवाजीराजांनी स्वाभिमान दाखवला, त्याची बादशहास चीड येऊन 'आपण त्यांना सहज चिरडून टाकू' अशी बादशहाची समजूत झाली. उत्तरोत्तर पाहुणचाराच्या मर्यादा सोडून बादशहाने शिवाजीराजांना राहत्या घरी पक्की अटक केली, तेव्हा आता 'पुढे शिवाजीराजांचे करायचे काय,' हा त्याच्यापुढे मोठा प्रश्न पडला. फ्रेंच प्रवासी थिवेनो त्यावेळी आगऱ्यास होता. तो लिहितो, 'शिवाजीराजांना ठार मारावे' असेच बादशहाने ठरवले होते. परंतु राजपूत राजांची त्यास जामीनगिरी असल्यामुळे, कदाचित ते बंड करून आपल्यावर उठतील या भीतीने बादशहाने तो बेत रहित केला.' बादशहाची मामी शायिस्ताखानाची बायको आगऱ्यास बादशहाजवळ जनानखान्यात होती. तिची व दुसऱ्या कित्येक दुखावलेल्या इसमांची बादशहास टोचणी लागली की, 'यास एकदम मारून टाकावा.' याचे उलट दुसरा पक्ष तितक्याच निकराचा अशी खटपट करू लागला की, 'बादशहाने दिलेले पवित्र व जाहीर वचन कधी मोडू नये. शिवाजीराजांना सन्मानाने परत जाऊ द्यावे आणि मग त्याच्याशी युद्ध किंवा इतर व्यवहार करणे असेल तो खुशाल करावा.' या पक्षात जयसिंह वगैरे कित्येक राजपूत व मुसलमान गृहस्थ प्रमुख होते. शिवाजीराजांचा अद्भूत पराक्रम ऐकून बादशहाच्या मुलीस सुद्धा त्यांच्याबद्दल आदर उत्पन्न झाला होता. पराक्रमी व लायक नवरा न मिळाल्यामुळे बादशाही राजकन्येस बहुधा यावज्जीव अविवाहित राहण्याची पाळी येई. अशाप्रसंगी त्यांचे मनात शिवाजींबद्दल प्रेमांकुर उत्पन्न होऊन त्यांनी 'शिवाजीस मुसलमानी 'दीक्षा' देऊन सरदार बनवावे' अशी बादशहास विनंती केली असल्याचा संभव आहे. तीन महिने शिवाजीराजांचा मुक्काम आगऱ्यास होता. तेवढ्या अवधीत कोणत्या-ना-कोणत्या कारणाने जनानखान्यातूनही थोडा-बहुत वशिला लागला असला माहिजे, इतके सर्वांचे लक्ष त्यावेळी शिवाजीराजांकडे वेधलेले होते. शहाजादीचे प्रेम शिवाजीराजांवर जडल्याचे प्रवाद पुढे उठले ते सर्वस्वी त्याज्य मानता येणार नाहीत. औरंगजेब स्वत: विचारी वृत्तीचा होता. रागाच्या आवेशात तडकाफडकी एखादे कृत्य करण्याचा त्याचा स्वभाव नव्हता. तेव्हा शिवाजीचा प्रश्न मनात वारंवार घोळविल्यावर (1) त्यास मारून टाकावे, किंवा ग्वाल्हेरसारख्या किल्ल्यात जन्मभर कैदेत ठेवावे (2) मुसलमान करून सरदारकी द्यावी किंवा (3) आल्या मार्गे परत पाठवावे असे तीन पक्ष त्याच्या मनात उभे राहिले. पैकी तिसरा मार्ग त्याला कधीच पसंत वाटला नाही. कारण मग त्याने शिवाजीराजांची अटक दिवसेंदिवस कडक केली नसती. स्वाभिमानी शिवाजीराजे दुसरी गोष्ट खुशीने कबूल

करणार नाहीत हे तर उघडच होते. तेव्हा तर्कच करायचा तर पहिला मार्ग म्हणजे मारून टाकण्याच्या बादशहाने मनात निश्चित केले असावे आणि तसा पुरावाही आहे.

रामसिंहाचे वाड्यात शिवाजीराजे राहत होते, तेथे योग्य बंदोबस्त राहू शकत नाही अशी तक्रार बंदोबस्त-अधिकाऱ्यांनी बादशहाकडे केली, तेव्हा त्यांना दुसऱ्या एखाद्या सोयीच्या जागेत नेण्याचा विचार ठरून, फिदाई हुसेन याचा लहान बंगला बांधीत होते तो घाईघाईने पुरा केला आणि ता.18.8.1666 रोजी 'या नवीन बंगल्यात आपणास जावे लागेल' असे शिवाजीराजांना कळवले. या अदलाबदलीचा सरळ अर्थ काय हे महाराजांच्या तेव्हाच लक्षात आले आणि दोन-तीन दिवसात नवीन बंगल्यात जावे लागणार असे दृष्टीस पडताच तत्पूर्वीच त्यांनी आपले निर्गमन घडवून आणले.

सुटकेचे उघड सर्व उपाय थकले, तेव्हा पुढे स्वत:च्या अकलेशिवाय दुसरा आधार महाराजांना राहिला नाही. दिवसेंदिवस त्यांची कैद जास्त सख्त होऊ लागली. आगऱ्याचा कोतवाल पोलादखान याने महाराजांच्या बंगल्यास हत्यारबंद शिपायांचा वेढा घालून सभोवर तोफा रोखून ठेवल्या. त्यायोगाने महाराजांची कैद आता जगजाहीर झाली. त्यांना अत्यंत खेद वाटू लागला. 'कशाला आपण हे संकट ओढून आणले' असे त्यांना झाले. संभाजींना पोटाशी धरून त्यांनी नानाप्रकारे शोक केला. अशारितीने जवळ-जवळ तीन महिने गेले.

औरंगजेबाचा प्रथम विचार होता की, 'पहिल्या भेटीच्या अखेरीस हत्ती, वस्त्रे व जवाहीर वगैरे देऊन त्यांचा गौरव करावा.' पण पहिल्याच दिवशी दरबारात जो प्रकार त्यांनी केला, त्यायोगाने राग येऊन बादशहाने काही दिवस तसेच जाऊ दिले. 'मध्यंतरी दिलेली वचने मोडून बादशहाने विश्वासघात केला' अशी हाकाटी महाराजांनी सुरू करताच बादशहाने जयसिंहास पत्र पाठवून विचारले, की तुम्ही अशी कोणती वचने त्यास दिली आहेत! जयसिंहाने निक्षून व शपथपूर्वक कळविले की, 'पुरंदरच्या तहात जे काय दाखल आहे त्यापलिकडे जास्त काही वचन मी शिवाजीराजांना दिलेले नाही. तथापी अशा थरास प्रकरण पोहोचलेले पाहून जयसिंहाची मात्र त्रेधा उडाली. विजापुरी युद्धात आपल्यावर बाजू उलटत चाललेली पाहून जयसिंहाने शिवाजीराजांची ही पीडा इकडे नको असे मनात आणून त्यांना नाना युक्तीने उत्तरेत रवाना केले होते. तरी त्यांना सुरक्षितपणे परत आणून पोहोचविण्याची शपथक्रियाही जयसिंहाने केली होती. म्हणून त्याने बादशहास पुन्हा आग्रहाने लिहिले की, 'शिवाजीराजांना कैदेत ठेवून किंवा ठार मारून आपणास काहीएक फायदा नाही. तो एकटा नाहीसा झाल्याने मराठ्यांचे राज्य मोडेल अशातला प्रकार बिलकूल नाही, इतकी त्याची व्यवस्था इकडे परिपूर्ण झालेली आहे. उलट शिवाजीराजांची मर्जी सांभाळून त्यांचा योग्य उपयोग करून घेण्यातच दक्षिणेतील आपला डाव सुधारणारा आहे. मुख्य गोष्ट बादशहा आपला शब्द पवित्र समजून यथायोग्य पाळतात ही गोष्ट जगजाहीर झाल्याने लोकांची मने स्थिर राहतील.' असे बादशहास स्पष्ट लिहून शिवाय

जयसिंहाने पुत्र रामसिंहास विशेष कसोशीने लिहिले की, 'कसेही करून शिवाजीराजांना अपाय न होता ते सुरक्षित परत येतील अशी तजवीज ठेवण्यास तुम्ही चुकू नका.'

लिहिणे सोपे होते, परंतु ही गोष्ट घडावी कशी! औरंगजेबाचा कपटी स्वभाव बदलण्याचे सामर्थ्य जयसिंहात नव्हते. तसेच बादशहाचे मनात काय आहे हे ओळखणेही तितकेच अशक्य होते. प्रथम तर बादशहा नुसते कालहरण करू लागला; आणि शिवाजींवर फक्त नजरकैद तेवढी ठेवून दक्षिणेत युद्धाचा काय निकाल होतो ते तो पाहत राहिला. यास्तव बादशहाने रामसिंहास बजावले की, 'शिवाजींना निघून जाऊ देऊ नका; त्याजबद्दल तुम्हास जबाबदार धरण्यात येईल.' पुत्राने अशी जबाबदारी घेणे जयसिंहास बिलकूल आवडले नाही. त्याने निक्षून रामसिंहास लिहिले, 'शिवाजीराजांबद्दल कोणतीही जबाबदारी तुम्ही आपल्या अंगावर घेऊ नये.' पुढे हळूहळू बादशहास अशी भीति वाटू लागली की हे हिंदू-हिंदू एक होऊन आपला डाव मोडतील. सबब रामसिंहाची जामीनगिरी रद्द करून शिवीराजांना दूर अफगाणिस्तानात पाठवण्याच्या गोष्टी बादशहा बोलू लागला. म्हणजे तिकडे दूर अंतरावर शिवाजीराजांकडून भलताच उपद्व्याप होण्याचा संभव नव्हता. परंतु हा विचार फार वेळ टिकला नाही. बादशहाने नंतर असे जाहीर केले की, शिवाजींना आगऱ्यास कैदेत ठेवून आम्ही स्वत: दक्षिणेत जाणार आणि आगऱ्याचा बंदोबस्त रामसिंहाकडे देणार. पण 'अशा प्रकारची अप्रिय कामगिरी तुम्ही बिलकूल अंगावर घेऊ नये' असे जयसिंहाने रामसिंहास निक्षून लिहिले आणि इकडे बादशहासही पत्राने कळवले की, 'शिवाजीराजांना परत पाठवा असे मी पूर्वी आपणास लिहिले तेव्हा विजापूरचे युद्धात यश मिळण्याची मला चांगली आशा होती. पण तो प्रकार आता पुष्कळसा बदलला असल्याने तूर्त आपण शिवाजीराजांना इकडे न पाठविता आगऱ्यासच बंदोबस्तात ठेवावे हे चांगले. मात्र त्यांना अशा रितीने वागवावे की त्यांचे लोकांना आपला वहीम येऊ नये. नाही तर ते इकडे येऊन आदिलशहास सामील होतील. शिवाजीराजांना आपण सांगावे की 'आम्ही पुढे दक्षिणेत जातो आणि मग तुम्हाला तिकडे बोलावून घेऊ.' त्याचे मुलास मात्र आपण आपल्याबरोबरच इकडे आणावा म्हणजे त्याचे साह्यकारी आपणास अनुकूल राहतील.'' पण लवकरच विजापुरावर अपयश येऊन जयसिंहाचा हा वरील व्यूह साफ ढासळला आणि शिवाजीराजांना सुटकेची आशा दिसेना.

4) अद्भुत युक्तीने शिवाजीराजांची सुटका :

अशा स्थितीत स्वावलंबनापलिकडे दुसरा इलाज शिवाजीराजांना राहिला नाही. काही दिवस गेल्यावर त्यांनी आपले वर्तन साफ बदलले. 'आता आपणास काहीएक आधार नाही, बादशहा सांगतील तसे वागण्यास आपण तयार आहोत,' असे ज्याच्या-त्याच्या

जवळ ते सांगू लागले आणि 'कोणीतरी जाऊन बादशहास चार गोष्टी सांगून त्याचे मन वळवावे' अशी करुणा शिवाजी भाकू लागले. हेतू हा, की 'शिवाजीचा सर्व ताठा नाहीसा झाला' अशी बादशहाची समजूत व्हावी. नंतर आपल्याजवळ लवाजमा आहे तो परत देशी पाठविण्याची परवानगी त्यांनी मागितली, ती मात्र लगेच मिळाली. बादशहास वाटले, 'तितकेच लोक देखरेख ठेवण्याचे कमी झाले!' अशारितीने बहुतेक लोक लहान-लहान टोळ्या करून परत गेले. पुढे काही दिवसांनी शिवाजीराजांनी आजारी पडल्याचे सोंग केले. औषधांच्या व अनुष्ठान-शांती वगैरेच्या निमित्ताने दररोज सायंकाळी त्यांनी ब्राह्मणांना व बैराग्यांना वाटण्याकरता मिठाई पाठविण्याचा प्रघात पाडला. त्यातच काही टोपल्या ते नजर म्हणून कित्येक दरबारी लोकांकडे पाठवू लगले. दोन असामींनी उचलण्याजोग्या कावडी करून दांडीला या मिठाईच्या लहान-मोठ्या टोपल्या लटकावून त्या नावनिशीवार बाहेर पाठविण्याची व्यवस्था त्यांनी सुरु केली. आरंभी काही दिवस पहारेकरी या टोपल्या कसोशीने तपासीत, पण पुढे तो प्रकार रोजचाच होऊन ते तपासणीकडे दुर्लक्ष करू लागले. ता.17 ऑगस्ट सन1666 रोजी शिवाजींच्या नोकराने पहारेकऱ्यांना कळवले, 'आज महाराजांना बिलकूल बरे वाटत नाही. दोन दिवस झोप नाही. कोणी गडबड करून त्यांना त्रास देऊ नका.' हिरोजी फर्जंद, मदारी मेहेतर वगैरे एक-दोनच इसम त्यांचेजवळ शुश्रुशेसाठी होते. सूर्यास्ताचे सुमारास महाराजांचे बिछान्यावर हिरोजी निजून राहिला; सोन्याचे कडे हातात असे तो हात हिरोजीने पांघरुणाबाहेर ठेवला आणि शिवाजी व संभाजी कावडीच्या दोन टोपल्यांत बसून पहारेकऱ्यांचे देखत कोणालाही वहीम न येता बाहेर निघून गेले. त्यांच्या कावडीबरोबर दुसऱ्याही कित्येक मिठाईच्या कावडी मागेपुढे होत्याच. शहराबाहेर एकान्तस्थळी शिवाजीराजांची कावड अंधारात आणून भोयांनी ठेवली आणि ते निघून गेले. लगेच महाराज व संभाजी पायी चालत सहा मैलांवर एक गाव होते तेथे गेले. त्या ठिकाणी बाहेरच्या रानात, निराजी रावजी, दत्ताजी त्रिंबक, रघू मित्र हे गृहस्थ घोडे सज्ज करून तयारच होते. लगेच त्या घोड्यांवर बसून शिवाजीराजे व संभाजीराजे यांनी उत्तरेस मथुरेकडे प्रयाण केले. काही मंडळी दक्षिणेकडे गेली.[81]

मागे शिवाजीचे जागी हिरोजी तसाच निजून राहिला. दुसऱ्या दिवशी सकाळी पहारेकऱ्यांचे दृष्टीस हात पडून त्यांना वाटले शिवाजीराजे अजून निजलेलेच आहेत. जवळ नोकर पाय दाबीत बसला होता. दुपार झाल्यावर हे दोघेही बाहेर येऊन शिपायांना सांगू लागले, 'आताकोठे महाराजांचा डोळा लागला आहे, त्यांना उठवू नये किंवा जवळ गडबड करू नये, असे वैद्यांनी सांगितले आहे, थोड्या वेळात आम्ही परत येतो, महाराजांवर नजर ठेवा.' असे बोलून तेही दोघे निसटले. पुष्कळ वेळ सर्व सामसूम झालेली पाहून पहारेवाले आत जाऊन पाहू लागले, तो काय, 'आत कोणीच नाही.' लगेच त्यांनी जाऊन हा प्रकार पोलादखान फौजदारास कळवला. त्याने तो बादशहाचे कानावर घातला. तो म्हणाला,

‘काही चेटकी विद्येनेच शिवाजी निघून गेला. आमची त्याचेवर सारखी नजर होती. आमच्या डोळ्यांस तर बाहेर कोणी गेलेले दिसलेच नाही. खोलीतच तो गडप झाला.’ बादशहाला ही बतावणी बिलकूल पटली नाही. त्याने लगोलग शिवाजीराजांचा पाठलाग करण्याचे हुकूम चहूकडे पाठवले. मुख्यत: दक्षिणेच्या बाजूस विशेष तपास चालू केला. शिवाजीराजांची दुसरी मंडळी परत चाललेली आढळली, त्यांना पकडण्यात आले. हा तपास चालू होईपर्यंत चांगले चोवीस तास गेले. तेवढा अवधी महाराजांना पुष्कळ झाला.

शिवाजीराजांच्या मुक्कामावर कसोशीने तपास करता बादशहास असा पक्का वहीम आला की ‘या कृत्यात रामसिंहाचे अंग खास असावे.’ रामसिंहाने पुन:पुन्हा बादशहास विनंती केली होती की शिवाजींना बंदोबस्तात ठेवण्याचे जबाबदारीतून मला सोडा. जयसिंह व रामसिंह दोघांनीही शिवाजींना आणभाक देऊन त्यांना सुरक्षित परत जाऊ देण्याची हमी पत्करली होती. शिवाजींबरोबरच कित्येक ब्राह्मणांना पकडून त्यांना तंबी देताच त्यांनी कबूल केले की ‘रामसिंहानेच हा व्यूह घडवून आणला.’ त्यावरून बादशहाने रामसिंहाचा मरातब काढून घेऊन त्याला दरबारास येण्याची मनाई केली. जयसिंहावरही पुढे त्याची इतराजी होण्याचे कारण हेच होय. पण खरे पाहता यात रामसिंहाचे काही इतकेही अंग नव्हते. सगळी शिताफी शिवाजीराजांचीच. मुद्दाम दक्षिणेची बाजू चुकवून ते यात्रेकरू म्हणून मथुरा, प्रयाग, बनारस, गया इत्यादी स्थळांकडे जाण्यास निघाले व उजाडताच ते मथुरेस दाखल झाले. तेथे बरोबरच्या दहा-वीस असामींनी दाढी-मिशी काढून अंगास राख फासून बैराग्याचा वेष स्वीकारला. हातातील दांड्यात व कुबड्यांत त्यांनी पुष्कळसे द्रव्य भरून घेतले. काही द्रव्य अंगावरील कपड्यांत व पायांतील जोड्यांत शिवून ठेवले. संभाजींना पळण्याची ताकद नसल्यामुळे त्यांना मथुरेस कृष्णाजी त्रिमल म्हणून मोरोपंत पिंगळ्यांचा मेहुणा राहत होता, त्याचेपाशी ठेवले. हा कृष्णाजी यात्रेचा माहीतगार होता, त्याला बरोबर घेतले आणि त्याचे बंधू काशीपंत व विसाजीपंत यांनी संभाजीचा सांभाळ केला. प्रयाग येथे ‘कवि कलश’ भोसल्यांचा क्षेत्रोपाध्या होता, त्याचा चांगला उपयोग झाला.[82] प्रवासात त्यांना अनेक ठिकाणी जिवावरचे प्रसंग आले, त्या संबंधाच्या नाना प्रकारच्या आख्यायिका पुढे रूढ झाल्या, त्यातील खऱ्या-खोट्याचा भाग निवडून काढणे आता कठीण आहे. बादशहाचे हुकूम चहूकडे सुटलेले असून त्याचे गुप्तहेर सर्वत्र संचार करीत होते. परंतु नाना तऱ्हेच्या बतावण्या करून व पुष्कळदा भरपूर द्रव्याने तपासणीदारांच्या मुठी दाबून महाराजांनी आपली निभावणी करून घेतली आणि गोंडवण, गोवळकोंडा करीत विजापूरमार्गे ता.20.11.1666 रोजी बैराग्याचे वेषाने रायगडास येऊन त्यांनी प्रथम मातुश्रींचे पाय धरले. येणेकरून जिजाबाईंचाच काय, पण सर्व मराठ्यांचा आनंद गगनात मावेना. शिवाजी खरोखर अवतारी पुरुष होय अशीच सर्वांची भावना झाली. मागाहून दोन-चार महिन्यांनी कृष्णाजीपंत व त्यांचे बंधू यांनी संभाजींनाही सुरक्षित स्वदेशी

आणून पोहोचवले. या उपकाराबद्दल महाराजांनी त्यांना ‘विश्वासराव’ हा किताब व एक लाख रुपये बक्षीस दिले.

शिवाजीराजांच्या अद्भुत सुटकेने त्यांची कीर्ति सर्व देशात कशी पसरली हे वेगळे विस्ताराने सांगण्याची जरूर नाही. महाराष्ट्रात तर त्यानिमित्त सर्वत्र आनंदोत्सव करण्यात आले. ‘किल्लोकिल्ल्यांस तोफांची सरबत्ती अहोरात्र चालू झाली. हे वृत्त महाराजांना कळले, नंतर ‘कोणते कार्यास किती आवाज करावे, ते धारे (नियम) त्यांनी बांधून दिले’ जे लोक शिवाजीराजांच्या विशेष उपयोगी पडले होते, त्यांना बक्षिसे वगैरे देऊन त्यांनी खूष केले. निराजी रावजी, बाळाजी आवजी, हिरोजी फर्जंद, त्र्यंबक सोनदेव यांनी तर उत्कृष्ट कामगिरी बजवली. हिरोजी फर्जंद यास शिवाजींनी पागेवर सरदारी व पालखीअबदागिरी दिली. ब्राह्मणांना व गोरगरिबांना बहुत धर्म केला. सर्व शहरांतून किल्ल्यांवर हत्तीवरून साखर, इनामे व बक्षिसे वाटण्यात आली. शिवाजीराजांच्या जिवावरचे संकट टळले. नूतनोद्भव मराठेशाहीवरील दहा महिन्यांच्या ह्या पहिल्या मोठ्या आपाताचे निरसन झाले. ‘आपण आगऱ्यास बादशहाचे भाटीस गेलो ही यावज्जन्मांत आपण एक चूक केली’ असे शिवाजीराजांना वाटत असे. यात आनंद मानण्यासारखाही प्रकार आहे. शिवाजीराजांच्या पाठीमागे सर्वांनी आपापली कामे मोठ्या दक्षतेने केली. शिवाजीराजांनी परत आल्यावर त्यांना सर्व व्यवस्था पूर्वीपेक्षाही काकणभर चांगली अशीच आढळली. मोगल फौजेच्या ताब्यात किल्ले व सभोवारचा प्रदेश असताना कोणीही राजद्रोह केला नाही. सर्वांनी आपली कामे नीट बजावली, यावरून शिवाजीराजांनी एकंदर राष्ट्रीय नीतिमत्ता अल्पावकाशात किती सुधारली हे लक्षात येते. दुसरा फायदा असा की शिवाजीराजांनी कारागृहात असतानासुद्धा मोगल दरबाराची नाना प्रकारची उपयुक्त माहिती बारकाईने मिळवली. बादशहाच्या सामर्थ्याबद्दल मोठा भ्रम लोकांना वाटत असे, तो पुढे त्यांचे मनातून नाहीसा झाला. राजपूत राजे बिथरलेले असून दिल्लीपतीची सत्ता तिळ-तिळ कमी होत आहे ही स्थिती नजरेत येऊन शिवाजींना पुढे आपल्या उद्योगात द्विगुणित स्फूर्ति उत्पन्न झाली.

शिवाजीराजे आगऱ्याहून निघाल्यानंतर दोन दिवसांनी त्रिंबक सोनाजी डबीर व रघुनाथपंत कोरडे यांना बादशहाने पकडून कैदेत ठेवले. पोलादखानाने त्यांचे बरेच हाल केले. नंतर ता.3.4.1667 रोजी त्यांची सुटका झाली. शिवाजीराजे कदाचित आपल्यातच लपून राहून संधी साधून आपले जिवास अपाय करील अशा भीतीने खुद्द बादशहा अत्यंत बंदोबस्ताने राहू लागला. रामसिंहावर तर बादशहाची मर्जी पुन्हा कधी बसली नाही. जयसिंहाचे मृत्युनंतर रामसिंहाला चार हजारी मनसब देऊन आसामात पाठविले. तिकडेच तो वाईट हवेने मृत्यु पावला. कोणाला कितीही शिक्षा केल्या तरी झालेली चूक भरून येणे कधीच शक्य नव्हते. ‘शिवाजींना मारून टाकला नाही ही आपल्या जन्मातली अत्यंत मोठी चूक झाली’ असे औरंगजेबाला अखेरपर्यंत वाटत असे. त्याबद्दल त्याला खेद झाला नाही

असा बहुधा त्याचा एकही दिवस गेला नाही. आपल्या शेवटच्या मृत्युपत्रात त्याने खालील विधान केलेले आढळते - 'राज्यात काय चालले आहे याची बातमी ठेवण्यात एका क्षणाची कसूर झाली तरी त्याबद्दल जन्मभर पस्तावण्याची पाळी येते. त्या दुष्ट शिवाजीच्या बंदोबस्तात थोडी हयगय झाली त्यामुळे अखेरपर्यंत मला या युद्धाच्या यातना सारख्या भोगाव्या लागत आहेत.' वेळ आली की मोठमोठ्यांच्या अकला गुंग होतात.'

5) शिवाजीराजांशी औरंगजेबाचा नामुष्कीचा तह (ता.9.3.1668) :

शिवाजीराजे निसटून जाताच 'मराठ्यांना कसे वठणीस आणावे' ही विवंचना बादशहास रात्रंदिवस लागली. शिवाजींसारखाच नेताजी पालकर मोठा हिकमती म्हणून प्रसिद्ध असून तो जयसिंहाचे तैनातीस दक्षिणेत होता. तो देखील तिकडे काहीतरी उपद्व्याप करील असा संशय येऊन बादशहाने जयसिंहास लिहिले की, 'तुमचेजवळ नेताजी पालकर व त्याचा चुलता कोंडाजी आहेत त्यांना कैद करून आमचेकडे पाठवा.' त्याप्रमाणे नेताजी व कोंडाजी बादशहाजवळ दाखल झाले. तेथे शिवाजींविरूद्ध त्यांचा उपयोग करावा अशी औरंगजेबाने योजना ठरवली, आणि 'तुम्ही मुसलमान व्हा म्हणजे मोठी नोकरी देऊ, नाही तर जन्मभर अशीच कैद भोगीत राहिले पाहिजे,' असे बोलणे त्याने चालवले. तदनुसार सन 1667 च्या फेब्रुवारीत बादशहाने त्यास मुसलमानी दीक्षा दिली आणि सुंता करून नेताजीचे नाव 'महंमद कुलीखान' असे ठेवले. पुढे त्याला तीन हजारी मनसब देऊन अफगाणिस्तानात युद्ध चालले होते त्या कामगिरीवर महाबतखानाचे हाताखाली रवाना केले. अफगाणिस्तानच्या डोंगरी प्रदेशात चांगले काम करून नेताजीने बादशहाकडून बहादुरी मिळवली. अशारितीने नेताजीची सात-आठ वर्षे तिकडे गेली.[83]

इकडे शिवाजीराजांनी दक्षिणेत परत आल्यावर मुद्दाम बादशहास दुखविण्याचा उपक्रम न करता काही काळ नरमाईने वागून कारभारात जास्त लक्ष घातले. 'राजेश्रींनी मुलकाची बटाई केली' असा उल्लेख शकावलीत आहे, तोच शिवाजींची मन:स्थिती दर्शवितो. विजापूरकडून मिळविलेले राज्य व्यवस्थित करून सिद्दीला उखडून काढणे आणि तूर्त शक्य तोवर युद्धप्रसंग अंगावर न घेणे हे धोरण त्यांनी जवळजवळ तीन वर्षे चालवले. खरे म्हटले तर बादशहाने स्वत: त्यांचेवर चालून येऊन शिवाजीराजांचा नि:पात करणे आवश्यक होते. परंतु मोठमोठ्या फौजा पाठवूनही निभाव लागला नाही आणि 'प्रत्यक्ष आपल्या हातातून शिवाजी निसटून गेला' यावरून आपलाही त्याचेपुढे निभाव लागणार नाही अशी खात्री झाल्यामुळे तो स्वत: इकडे चालून आला नाही हेच खरे दिसते. अफगाण युद्ध किंवा राजपूत युद्ध अंगावर असल्यामुळे तो इकडे आला नाही हे समर्थन तितकेसे पटत नाही.

काहीतरी सबबी दाखवून 'झाकलीमूठ सवा लाखाची' हा मार्ग बादशहाने पत्करला. न जाणो आपणालाही जर शिवाजीराजांपुढे हात टेकावे लागले तर सर्व जगापुढे आपली उघड अप्रतिष्ठा होईल असा प्रसंग त्याने येऊ दिला नाही. हिंदू धर्माचा पुरस्कर्ता म्हणून आव्हान देणाऱ्या शिवाजीराजांशी प्रत्यक्ष सामना न करता, राजपूत राजांना नमवून व काशीसारख्या क्षेत्रातील मंदिरे पाडून अप्रत्यक्ष रीतीने शिवाजीराजांचा व हिंदूंचा उपमर्द करण्याची शक्कल बादशहाने काढली. वास्तविक शिवाजीराजांचा एकंदर चरित्रक्रम पाहून त्यांचेवर स्वत: चाल करण्याचे धाडसच बादशहास झाले नाही. शिवाजीराजांच्या मृत्युनंतर त्याने तो क्रम अंगीकारला आणि त्यातही त्याची काय दशा झाली ते इतिहास सांगतोच. काही असले तरी इतका अपमान झाल्यावर लगोलग शिवाजींचा बंदोबस्त करण्याचे काम त्याने अंगावर घेतले नाही यात त्याचा भ्याडपणाच व्यक्त होतो.

शिवाजीराजांनी मात्र बादशहावर एकदम उठाव केला नाही. 'जीव बचावण्यासाठी मला पळून यावे लागले. परंतु बादशहाशी मी कोणताही विरोध करू इच्छित नाही. मी वाटेल ती सेवा करण्यास सिद्ध आहे.' अशाप्रकारे बोलून मोगलांना न चिडवता त्यांनी मोगलांचीच कामगिरी म्हणून विजापुरकरांवर मोहीम केली. 'वैशाख मासी (मे 1667) बहलोलखान व एकोजीराजे यांनी रांगण्यास वेढा घातला. राजियांनी वेढा मारून काढिला. मग भाद्रपद मासी येदिलशहा व शिवाजीराजे यांचा सल्ला जाला.' असा मजकूर शकावलीत आहे. रांगणा किल्ला नुकताच रुस्तुमिज्जमनने रावजी पंडिताचे हवाली केला असून (5.9.1666) तो परत घेण्यासाठी अली आदिलशहाची ही खटपट होती. या प्रसंगात पुनरपि शिवाजीराजे व त्यांचा सावत्र बंधू एकोजी यांचा सामना झाला. तथापि तूर्त काही काळ युद्धप्रसंग अंगावर न घेता आपल्या राज्याची अंत:स्थिती सुधारण्याचा त्यांनी उद्योग आरंभला आणि तेवढ्यापुरते त्यांनी विजापूरचे वैर तूर्त मिटविले.

विजापूरचे युद्धात अयपश आल्यामुळे जयसिंहाचे जागी दक्षिणेच्या कारभारावर मुअज्जमची नेमणूक बादशहाने केली हे मागे सांगितलेच आहे. जसवंतसिंह व दिलेरखान हे मुअज्जमचे मदतनीस होते. सन 1667 च्या एप्रिलमध्ये[84] शिवाजीराजांनी बादशहास लिहून कळवले की, 'मी आपणास सर्वथा शरण आलो असतानाही आपली फौज मजवर चालून येते हे काय? मी आपल्या पुत्रास आपले तैनातीत देऊन आपले हुकूम उठविण्यास सिद्ध आहे.' या पत्राचे उत्तरच आले नाही, तेव्हा शिवाजींनी जसवंतसिंहास पत्र लिहून बादशहाची व आपली गोडी करून द्या अशी विनंती केली आणि कळवले, बादशहांनीच मला हाकलून दिले नसते तर मी बादशहांची वाटेल ती नोकरी बजावली असती. जिवाच्या भीतीमुळे मला पळून यावे लागले. मिर्झाराजा जयसिंह माझे दोस्त होते, ते मरून गेले. नाहीतर, मला अफगाणांवर पाठवा, मी ते काम फत्ते करून देतो, अशी विनंती मी बादशहांना करणार होतो. आता तुमच्या मध्यस्थीने बादशहा माझे अपराध माफ करतील,

तर मी आपला मुलगा संभाजी दक्षिणच्या सुभेदाराच्या हाताखाली नोकरीस ठेवण्यास तयार आहे व मी स्वत: हुकूम होईल तिकडे जाऊन बादशहांची कामगिरी उठविण्यास सिद्ध आहे.' मुअज्जम व जसवंतसिंह यांनी त्यास पसंती दर्शवली तेव्हा बाळाजी आवजी चिटणीसास लवाजमा देऊन तहाची बोली करण्यास शिवाजीराजांनी औरंगाबादेस पाठवले. वाटाघाटीत पूर्वीचा पुरंदरचा तह कायम करावा असे ठरून ती सूचना शहाजाद्याने बादशहाकडे पाठविताच तिकडून ती मंजूर होऊन आली, (9.3.1668). बादशहाने शिवाजीराजांना 'राजे' हा किताब देऊन पुरंदरचाच तह मंजूर करून दिला. यापुढे दोन-तीन वर्षे पावेतो शिवाजीराजे मोगलांचे वाटेस बिलकूल गेले नाहीत. सन 1667-69 पावेतोच्या तीन वर्षांत त्यांनी कोणतीही बाह्य उलाढाल न करता राज्यकारभाराचे धारे बांधून दिले असे उल्लेख इंग्रजी पत्रांतून आहेत.

पूर्वी मोगल बादशहाच्या दहशतीने पोर्तुगीझ वगैरे सत्ताधीश शिवाजीराजांना जुमानीत नसत तेही आता त्यांची आर्जवे करून स्नेह जोडण्यास उत्सुक झाले. पोतुगिझांनी आपले वकील शिवाजीराजांकडे पाठवले. ता.15.5.1667 रोजी तहाची वाटाघाट सुरू झाली. नंतर शिवाजीराजांनी आपला वकील सखोपंत गोव्याला पाठवला. त्याचे व पोर्तुगीझ व्हाईसरॉयचे बोलणे होऊन ता.5.7.1667 रोजी तह कायम झाला. लगेच पोर्तुगीझ वकील गोंझालो मार्टिन यास बरोबर घेऊन सखोपंत रायगडावर आला. तेथे ता.11.12.1667 रोजी शिवाजीराजांनी तह पुरा करून दिला.[85]

याप्रमाणे शिवाजीराजांनी बादशहाकडून आपले स्वतंत्र राज्य उघडपणे कबूल करून घेतले, एवढ्यावरून दक्षिणेत आता मराठ्यांचे स्वतंत्र राज्य कायम झाले. याजबद्दल कोणाच्याही मनात शंका राहिली नाही. मोगलांचे प्रांतोप्रांतीचे सुभेदार, जंजिऱ्याचे सिद्दी, विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतान व एकंदर लोकसमुदाय यांजपासून शिवाजीराजांना 'स्वतंत्र राजा' असा मान मिळू लागला. वऱ्हाड प्रांताची जागीर सांभाळणे व संभाजींनी बादशाही फौजेत मनसबदारी करणे या निमित्ताने औरंगाबाद येथे सरहद्दीवर शिवाजीराजांनी आपली कायमची फौज ठेवून दिली आणि संभाजी लहान असल्यामुळे तिचे आधिपत्य प्रतापराव गुर्जर यांचेकडे दिले. शिवाय शिवाजीराजांनी शहाजाद्याकडून अशी कबुलात करून घेतली की, 'त्या दोन राज्यांतून चौथाई व सरदेशमुखी हक्क आपण वसूल करू, त्यास मोगलांनी प्रतिबंध करू नये.' परभारे ही राज्ये दुर्बल करण्याच्या हेतूने शहाजाद्याने शिवाजीराजांना हे हक्क दिले. लगेच शिवाजीराजांनी त्यांच्या मुलखात स्वाऱ्या करून वरील हक्क वसूली करण्यास सुरुवात केली. तेव्हा विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतानांनी शिवाजीराजांना चौथाई व सरदेशमुखी या हक्कांबद्दल दरसाल अनुक्रमे तीन लाख व पाच लाख रुपये देण्याचे कबूल केले. हे हक्क शिवाजीराजे पुष्कळ दिवस मागत

होते, पण यावेळी ते त्यांना राजरोस मिळाले आणि सालोसाल खंडणी वसूल होऊ लागली. यास्तव सन 1668 हे वर्ष शिवाजीराजांच्या उद्योगसिद्धीचे निदर्शक गणता येईल.

प्रकरण 9 - पुनरपि रणांगण

(सन 1670-1674)

1.शहाजादा व दिलेरखान यांचे वितुष्ट; 2.गड आला पण सिंह गेला; 3.सुरतेवर दुसरी स्वारी, दिंडोरीची लढाई; 4.साल्हेरचा घनघोर संग्राम; 5.बादशहाचा जळफळाट; 6.पन्हाळा काबीज, उंबराणीचे लढाईत बहलोलखानाचा पाडाव; 7.नेसरीची लढाई, प्रतापरावाचा मृत्यु.

1) शहाजादा व दिलेरखान यांचे वितुष्ट :-

दक्षिणच्या कारभारावर बादशहाने नेमलेले दिलेरखान व मुअज्जम यांचे याचवेळी सडकून वाकडे आले, ते शिवाजीराजांच्या पथ्यावर पडले. बादशहाजवळ दिलेरखानाचा मोठा बडेजाव होई, तो शहाजाद्यास बिलकूल सहन होत नसे. आपल्या चहाड्या हा बादशहास सांगतो आणि आपले हुकूम मानीत नाही असा त्याचा ग्रह बनला. शहाजाद्याची मर्जी जसवंतसिंहावर होती, ती दिलेरखानास पसंत नव्हती. खान मुद्दाम जसवंतसिंहाचा पदोपदी पाणउतारा करी. बीकानेरचा राजा रावकर्ण राठोर खानाचे हाताखाली होता, त्याने रात्री खानाचे छावणीत लूट केली, ते प्रकरण चिडीस जाऊन, त्याला कैद करावे असा बादशहाचा हुकूम आला. तो मुअज्जमने मानला नाही. त्यामुळे त्याचे व दिलेरखानाचे उघड वैर जुंपले. तिकडे इराणचा शहा पंजाबवर चालून येऊ लागला आणि पेशावरास अफगाणांचे बंड उद्भवले (मार्च 1667), तेणेकरून दक्षिणेच्या कामात लक्ष घालण्यास बादशहास फावले नाही. अशा कारणास्तव शिवाजींशी मिटते घेऊन त्याची तहाची मागणी बादशहाने मान्य केली. संभाजीला घेऊन निराजी रावजी व प्रतापराव गुजर औरंगाबादेस राहत होते (ऑगस्ट 1668), त्यांनी मुअज्जमला खूश करून त्याच्याशी स्नेह जमवला, तो इतका की हे आता संगनमत करून आपणास केव्हा पदच्युत करतील कोण जाणे, अशी धास्ती खुद्द बादशहास पडली. त्याने आपल्या पुत्रास हुकूम पाठवला की, प्रतापराव व निराजी रावजी यांला अटकेत ठेवावे. हा हुकूम हातात पडण्यापूर्वीच त्याची वर्दी शहाजाद्यास मिळून त्याने त्या दोन मराठे सरदारांना गुप्त इशारत दिली, त्यावरून ते लगोलग मोगल छावणीतून निघून गेले.

सन 1669 साली औरंगजेबाने राजपुतांशी युद्ध सुरू केले आणि ता.9.4.1669 रोजी आपल्या समस्त राज्यांतील हिंदूंची मंदिरे पाडण्याचा एकसहा हुकूम जाहीर केला. तदनुसार पुढील ऑगस्टमध्ये काशी येतील विश्वेश्वराचे मंदिर पाडून तेथे एक भव्य मशीद उभारली, ती अद्यापि कायम आहे. अर्थात या गोष्टींनी शिवाजीराजांना फार चीड येऊन स्वधर्मरक्षणासाठी तो सज्ज झाला. बादशहाने आपण होऊन संकटे कशी ओढून आणली, हे यावरून कळून येते.

सन 1670मध्ये मुअज्जम व दिलेरखान यांचे भांडण निकरावर आले. देवगडाकडील धनिकांना पिळून दिलेरखान चापून खिसे भरीत असताना, बादशहाचा निकडीचा हुकूम आल्यावरून तो ता.29.3.1670 रोजी नागपूर सोडून 8 एप्रिल रोजी 'पाथ्री' पावेतो दाखल झाला. तो त्याला शहाजाद्याचे पत्र पोहोचले की, 'तुम्ही प्रथम येथे आमचे भेटीस यावे.' यावरून खानास वाटले की, 'मी असाच एकटा जाऊन भेटलो तर कदाचित शहाजादा आपणास ठार मारेल,' म्हणून तो भेटीस गेला नाही. खानाने पूर्वीच बादशहाला लिहून कळवले होते की, 'शहाजादा शिवाजीराजांचा प्रतिकार न करता उलट त्याच्याशी स्नेह वाढवून राज्याचे अहित करीत आहे. त्याच्या हाती अधिकार आहे तोपर्यंत शिवाजीराजांचा पाडाव होणार नाही. मला हा मुख्याधिकार द्या म्हणजे दोन वर्षात मी शिवाजीराजांचा फन्ना उडवून दाखवतो. फक्त तोफखान्याचे भरपूर साहित्य माझे ताब्यात पाहिजे.' ही तक्रार दाखल होताच भांडण कसे मिटवावे हे बादशहाला सुचेना. म्हणून खरा प्रकार काय आहे, शहाजादा व शिवाजीराजे यांचे संगनमत आहे की काय, तसेच दिलेरखान शहाजाद्याचे हुकूम बजावण्यात कितीशी कसूर करतो, इत्यादि गोष्टींचा बारकाईने तपास करून हकिगत लिहून पाठविण्यासाठी बादशहाने आपला खास भरंवशाचा खानसामा इफ्तिकारखान यास दक्षिणेत पाठवले. पण दोघा हत्तींच्या भांडणात लहानशा बैलाचा निभाव कसा लागावा! त्याने दोघांनाही खूष ठेवून वेळ निभावून नेण्याचा मार्ग पत्करला. त्यामुळे पूर्वी असलेल्या अग्नीत आणखी तेल ओतण्याचे काम मात्र त्याने केले. मुअज्जमचा दिलेरखानावर मुख्य आरोप असा होता, की 'याची अफगाण फौज याचे कह्यात वागत नाही. गरीब रयतेची लूट त्या फौजेकडून सारखी चाललेली असते, तिला खान आळा घालीत नाही, तेणेकरून राज्याचे भारी नुकसान होत आहे.' अशीच खबर इतरांकडूनही बादशहास पोहोचली होती. हे लक्षात येऊन दिलेरखानाने स्वत:च बादशहाकडे जाऊन सर्व प्रकार त्याला समजावून सांगण्याचा निश्चय केला. हा बेत प्रकट होताच शहाजाद्याने बापास कळवले की, 'खान बंड उभारून उत्तरेत निघाला आहे.' हे वर्तमान समजताच बादशहाने शहाजाद्यास लिहिले, 'दिलेरखानास एकदम पकडून कैद करावे.' असा हुकूम हाती येताच शहाजाद्याने बाहेर ठिकठिकाणी असलेल्या सर्व फौजा आपले जवळ बोलावल्या. दिलेरखान गोदावरीचे आसमंतात मराठ्यांचा पाठलाग करीत असताना आपणास पकडण्याचा हुकूम दाखल झाला असल्याची खबर त्याला कळली. त्यामुळे तो अधिकच गोंधळून गेला आणि भर

पावसाळा चालू असून नदी-नाले भरले असतानाही तो आपले सामान आवरून एकदम माळव्यात निघून गेला. मागून शहाजादा व जसवंतसिंह हे त्याचा पाठलाग करीत गेले आणि जाताना त्यांनी शिवाजीराजांनाही त्वरेने आपल्या साह्यास बोलावले. ह्या आपसातील दंडेलीची बातमी हां-हां म्हणता देशभर पसरून राज्यात एकदम गोंधळ उडून गेला. बादशहास हे सर्व प्रकरण वेळेवर कळून त्याने मुअज्जम यास एकदम औरंगाबादेस परत जाण्याचा हुकूम पाठवला आणि जसवंतसिंहास बऱ्हाणपूर येथे राहण्याची आज्ञा केली. सप्टेंबर अखेरीस शहाजादा औरंगाबादेस आला आणि हे भांडण तेवढ्यापुरते मिटले.

या गोंधळाचा उपयोग शिवाजीराजांनी चांगलाच करून घेतला. त्यांनी आपल्या फौजा चहूकडे पाठवून मोगलांचा मुलूख लुटला. पुरंदरच्या तहाने गेलेले किल्ले त्यांनी भराभर परत घेतले. ता.24 जानेवारी सन 1670 चे वर्तमान. खानदेशचा दिवाण आश्रफखान याजकडून बादशहास लिहून गेले की, 'शिवाजींची फौज वऱ्हाड प्रांत लुटीत आहे. बादशाही प्रांतातून 20 लाख रक्कम त्याने गोळा केली.' औसा येथील किल्लेदार बरखुरदारखान याजकडून लिहून आले की, 'शिवाजींची वीस हजार फौज या प्रांतात आली आहे. मराठे सर्व प्रांत लुटून वसूल घेत आहेत. किल्ल्यापासून दोन कोसांवर त्यांचा मुक्काम आहे. मी किल्ल्याची डागडुजी चालवली आहे. माझी सर्व जागीर शिवाजीराजांनी लुटली. मला निर्वाहाला देखील साधन नाही. बादशहाने मेहेरबानी करून काही पैशाची मदत करावी.' त्यावर बादशहा बोलले, 'असे पुष्कळ लोक मराठ्यांनी लुटले म्हणून पैसे मागत येतील. आम्ही कित्येकांना असे नुकसान भरून द्यायचे?'

यावेळी औरंगजेबास पैशाची अडचण विशेष जाचू लागली, म्हणून त्याने दक्षिणेतील फौज कमी केली. कमी झालेल्या या लोकांना शिवाजीराजांनी आपल्या नोकरीत घेतले. शिवाजीराजे आगऱ्यास गेले तेव्हा बादशहाने त्यांच्या खर्चास एक लाख रुपये दिले होते, ती सर्व रक्कम त्याने आता संभाजीच्या जागिरीतून कापून घेतली. त्याबरोबर प्रतापराव गुजर वगैरे मोकळे झालेले सरदार बेधडक मोगली प्रदेशात लुटालूट करू लागले. ती बंद करण्यास शहजाद्याजवळ फौज नव्हती, म्हणून दिलेरखान देवगडावर गुंतला होता त्यास बादशहाने ताबडतोब औरंगाबादेस जाण्याचा हुकूम पाठवला (26.1.1670). खानदेशात दाऊदखान खुरेशी होता, त्यासही असाच हुकूम मिळाला. अर्थात तह मोडून बादशहाने शिवाजीराजांवर पुन्हा युद्ध पुकारले.

2) गड आला पण सिंह गेला (4.2.1670) :

पुरंदरच्या तहाने सोडून दिलेले किल्ले पुन्हा हस्तगत करण्याचा सपाटा महाराजांनी आरंभला. 'आज हा किल्ला गेला, उद्या तो गेला' अशी बातमी बादशहास पोहोचू लागली.

शुक्रवार माघ व.9 ता.4.2.1670 रोजी तानाजी मालुसरे हा आपला भाऊ सूर्याजी व वृद्ध मामा शेलार आणि तीनशे निवडक मावळे बरोबर घेऊन काळोख्या रात्री सिंहगडाखाली आला. किल्ल्याचा बंदोबस्त मोगलांनी उत्तमप्रकारचा ठेवला असून तेथील शिबंदीवर उदेभान राठोड हा शूर राजपूत सरदार मुख्य होता. थोड्याशा मावळ्यांनी हा किल्ला काबीज करणे हे काम मोठेच मर्दुमकीचे व धाडसाचे होते. तानाजीने दोन टोळ्या केल्या व एक स्वत:बरोबर घेऊन तिच्यासहीत तो एका अपरिचित वाटेने घोरपडीला दोर लावून किल्ल्यावर चढला आणि दुसरी टोळी आपला भाऊ सूर्याजी याचे हाताखाली त्याने मागे मदतीसाठी म्हणून ठेवून दिली. वरून खाली सोडलेल्या दोराने तानाजीचे काही लोक मुकाट्याने किल्ल्याचे कोटात उतरले. त्यांची किल्ल्यावरील राजपुतांना चाहूल लागून ते एकदम सज्ज होऊन युद्धास आले. याप्रसंगी थोडा वेळ फारच निकराची तुंबळ लढाई झाली. त्यात पन्नास मावळे व पाचशे राजपूत ठार झाले. त्याचवेळेस तानाजी व उदेभान यांची प्रत्यक्ष गाठ पडून दोघेही हातघाईवर येऊन एकमेकांच्या वारांनी मरून पडले. तानाजी पडलेला पाहून मावळ्यांनी पाठीमागे पाऊल घेतले. इतक्यात काही मावळ्यांनी धावत जाऊन कल्याण दरवाजा उघडला, तेव्हा सूर्याजीचे बाहेर असलेले लोक आत आले. त्यांना शेलारमामाने धीर देऊन राजपुतांवर सोडताच त्यांनी त्वेषाने पुढे घुसून राजपुतांची कत्तल आरंभली. काही जण किल्ल्यावरून उड्या टाकून मरण पावले. याप्रमाणे तानाजी पडला, परंतु गड काबीज झाला. संकेतानुरूप सूर्याजीने किल्ल्यावरील एका झोपड्यास आगलावून त्या उजेडाने किल्ला हाती आल्याची इशारत शिवाजीराजांना राजगडावर दिली. त्या खुणेने शिवाजीराजांना आनंद झाला, पण ‘आपला पाठीराखा सिंह आपणास सोडून गेला’ हे कळले नाही. दुसऱ्या दिवशी शिवाजीराजे व त्यांची आई यांना तानाजीचा पराक्रम व त्याचा शोचनीय अंत याची वार्ता कळल्यावर किती दु:खावेग झाला असेल, हे सांगण्याची जरूर नाही.

सिंहगडावरील तानाजीचा पराक्रम इतिहास, कादंबरी व काव्य या सर्वांस अत्यंत महत्त्वाचा व वर्णनीय विषय झाला आहे. सिंहगड घेण्याविषयी जिजाबाईंचा अत्याग्रह असून तो तडीस नेण्यास दुसरा कोणी पुढे होईना. तेव्हा तिने स्वत: तानाजीस बोलावून ‘लोक नको-नको म्हणत असताना,’ हे काम त्याच्या गळ्यात बांधले. शिवाजीराजांनाही ते पसंत वाटले. नवमीस तानाजीने गड काबीज केला, त्याच्या अगोदर तीन दिवस म्हणजे षष्ठीच्या दिवशी तानाजीचा मुलगा रायबा याचे लग्न ठरले होते. जिजाबाईंनी देखतपत्र येऊन भेटण्यासाठी बोलावल्यावरून तानाजी ‘लग्नाची तयारी तशीच टाकून’ धावत आला आणि रायबास शिवाजीराजांच्या स्वाधीन करून मग सिंहगड काबीज करण्यास गेला. उदयभानूशी लढताना तानाजीची ढाल तुटली असताना डाव्या हाताची ढाल करून तो लढला. इत्यादी प्रकार रोमांचकारी आहेत. तानाजी संबंधाने तुलसीदास शाहीर म्हणतो, ‘शिवाजीराजांच्या राज्यात ऐसा उमराव होणे नाही.’

लगेच महिन्याने ता.8.3.1670 रोजी निळोपंताने राझीउद्दिनखान किल्लेदार पुरंदरावर होता त्याला पकडून तो नामांकित किल्ला हस्तगत केला. इकडे शिवाजीराजांच्या लोकांनी चांदवड लुटून बादशाही खजिना ताब्यात घेतला. मनोहरदास गौड म्हणून बादशहाचा मोठा राजनिष्ठ सरदार माहुलीवर होता. त्या किल्ल्यास फेब्रुवारीत शिवाजीराजांनी वेढा घातला. पण मनोहरदासाचे दक्षतेमुळे शिवाजीराजांचेच पुष्कळ लोक जाया झाले, तेव्हा माहुलीचा नाद सोडून शिवाजीराजांनी प्रथम कल्याण, भिवंडी ही स्थळे हस्तगत केली आणि तेथील ठाणेदार ऊझबकखान यास ठार मारले (30.3.1670). पुढे मनोहरदासाने मदत मागितली, ती आली नाही, तेव्हा शिवाजीराजांच्या भीतीने किल्ला सोडून तो निघून गेला. हे पाहून ता.16.6.1670 रोजी शिवाजीराजांनी माहुलीचा किल्ला काबीज केला आणि नवीन किल्लेदार अलावर्दीबेग व त्याचे दोनशे लोक त्यांनी कापून काढले. त्यापूर्वीच कोकणचा फौजदार लुदीखान लढाईत जखमा लागून पळून गेला आणि तो सर्व प्रांत शिवाजीराजांना मिळाला. नांदेडचा फौजदार असाच दहशतीने पळून गेला. एप्रिलअखेर पावेतो अहमदनगर, जुन्नर, परेंडा इत्यादी प्रांतातील 51 गावे मराठ्यांनी लुटली. यावेळी बादशहाचा पक्ष उचलून धरण्यास मनापासून कोणी झटला असेल तर तो एक दाऊदखान खुरेशी[86] हा होय. हा पूर्वी पुरंदरचे वेढ्यात दिलेरखानाचे हाताखाली कामावर होता. पुढे खानदेशात असताना हुकूम आल्यावरून ता.28.3.1670 रोजी तो अहमदनगरास दाखल झाला. चपळ घोडेस्वार बरोबर घेऊन तो लगेच पारनेर, जुन्नर, माहुली या भागात मराठ्यांचा पाठलाग करीत निकराने चालून आला. त्याजपुढे निभाव न लागता शिवाजीराजांचे लोक आपली ठाणी सोडून पळू लागले. माहुली किल्ल्यास दाऊदखानाने मदत पाठवून काही दिवस बचाव केला, त्याबद्दल बादशहाने त्याची फार वाहवा केली.

3) सुरतेची दुसरी स्वारी (3.10.1670) दिंडोरीचा संग्राम (16.10.1670):

सुरतेचा सुभेदार नुकताच मरण पावला असून, तेथील शिबंदी जसवंतसिंह किंवा मुअज्जम यांनी काढून घेतली, अशी बातमी शिवाजीराजांना कळताच ते पंधरा हजार स्वार बरोबर घेऊन सुरतेच्या वेशीबाहेर येऊन उतरले. (ऑक्टोबर ता.3, 1670). यावेळी शिवाजीराजांबरोबर त्यांचे बहुतेक मोठमोठे सरदार होते. किल्ल्यात शिबंदी होती ती पुरती हजार सुद्धा नव्हती. मराठ्यांनी तीन दिवसपर्यंत त्या शहरातून सावकाशपणे पैसा गोळा केला आणि जवळजवळ निम्मे शहर जाळून टाकले. इंग्रज, डच, फ्रेंच यांचेवर शिवाजीराजांनी कोणतीच सक्ती केली नाही. त्यांनी अगोदरच आपला माल खाली सुवाळीस नेऊन लांबवला होता. तिसऱ्या दिवशी शिवाजीराजांना बातमी मिळाली की

बऱ्हाणपुराहून आपल्यावर मोठी मोगल फौज चालून येत आहे. त्याबरोबर सुरत शहरातूनच दरसाल बारा लाखांची खंडणी ठरवून शिवाजीराजे परत निघाले. दरसाल बारा लाख रक्कम बिनबोभाट पावती केल्यास तुमचे शहरास आमचेकडून उपद्रव घडणार नाही असे त्यांनी लोकांना आश्वासन दिले. सर्वांवर अशी दहशत बसवून आणि सहासष्ट लाख वित्त घेऊन सुरतेहून शिवाजीराजे परत फिरले. त्यांचा बेत साल्हेर-मुल्हेरवरून चांदवडास येऊन कंचनमंचन घाटाने कोकणात उतरण्याचा होता. पण चांदवडनजीक त्यांना मोगलांनी गाठले, तेव्हा बरोबरची लूट सुस्थानी कशी पोहोचते याची त्यांना मोठी धास्ती पडली. मोगल सरदार दाऊदखान खुरेशी शिवाजीराजांची बातमी काढत चांदवडला आला. ता.16.10.1670 रोजी रात्री वणी-दिंडोरीवरून शिवाजीराजे जात आहेत अशी वर्दी दाऊदखानाला मिळताच लगेच कूच करून त्याने पहाटेच्या काळोखात शिवाजीराजांना गाठले. शिवाजीराजे काही कमी सावध नव्हते. त्यांनी आपल्या फौजेच्या चार लहान-लहान टोळ्या केल्या; शिवाय लूट घेऊन जाण्यासाठी त्यांनी एक निराळीच टोळी नेमली. तिच्या तंत्राने व शत्रूचे धोरण राखून इतर टोळ्यांनी वर्तावे असे त्यांनी ठरवले आणि आपण औरंगाबाद घेण्यास जातो अशी हूल ठरवली. दोन टोळ्यांनी मोगल फौजेच्या आगे-मागे राहून तीला हैराण करण्याचा क्रम चालवला. एखलासखान व वाकेखान हे दोन सरदार आरंभी मोगलांचे आघाडीवर होते. शिवाजीराजांकडे प्रतापराव गुजर, व्यंकाजी दत्तो व आनंदराव मकाजी हे मुख्य सरदार होते. आदले दिवशी चांदवडनजीक बाकेखान एकटाच पुढे आल्यामुळे, शिवाजीराजांच्या हातून पराभव पावून तो चांदवडच्या किल्ल्यात लपून राहिला. शिवाजीराजे तसेच धिमे-धिमे पुढे जात होते. मागाहून दाऊदखानाची फौज येऊन पोहोचली. तिच्या आघाडीस एखलासखान होता. मराठ्यांनी एकदम हल्ला करून एखलासखानाला जखमी केले. तेव्हा राय मकरंद व भवान पुरोहित हे दोन मोगलांचे सरदार मराठ्यांशी लढू लागले. इतक्यात दाऊदही स्वत: लढण्याकरता पुढे आला. त्यावेळी प्रत्यक्ष शिवाजी व दाऊद यांची दोन प्रहर मोठ्या निकराची लढाई झाली. त्यात तीन हजार मोगल व थोडे मराठे पडले. मोगलांचे चार हजार घोडे व काही सरदार शिवाजीराजांनी काबीज केले; परंतु आपल्या संप्रदायाप्रमाणे त्याने त्या लोकांना त्रास न देता सोडून दिले. ऐशी फत्ते करून पुढे चालले तो मोगलांच्या तर्फेने माहूरची देशमुख रायबागन शिवाजीराजांना अडविण्यास आली असताना तिचा शिवाजीराजांनी पराभव केला. तेव्हा ती दाती तृण धरून शिवाजीराजांना शरण आली, तिला कौल देऊन शिवाजीराजे रायगडास सुखरूप परत आले. ‘मालमत्ता आणलेला हिशेब करून पाहता पाच कोटी[87] होनांची रक्कम झाली व घोडे पाच हजार आणले, त्यांची पागा केली आणि घोड्यांचे उजवे चौकावर चौकडीचे डाग देऊन खूण केली.’

सुरतेच्या या लुटीने त्या शहरातील रहिवाश्यांमध्ये कैक वर्षे शिवाजीराजांची अतिशय दहशत बसली होती. दोन महिन्यात पाच-दहा वेळा लोकांची पळापळ झाली. तेथील व्यापार बहुतेक बसला आणि हळूहळू इंग्रजांनी सुरत सोडून मुंबईस आपले मुख्य ठाणे केले.

4) साल्हेरची घनघोर लढाई (फेब्रुवारी 1672) :

दिंडोरीच्या संग्रामात वाताहत झाल्यामुळे दाऊदखानाने एक महिना नाशकास राहून पुन्हा सर्व सिद्धता केली. जखमी लोक औरंगाबादेस पाठवून दाऊदखान अहमदनगरास जातो, तो पुन्हा त्यास मोरोपंत पिंगळ्यांशी सामना करण्यास बागलाणमध्ये यावे लागले. ता.25.10.1670 रोजी मोरोपंताने त्रिंबकचा किल्ला घेऊन नंतर लगेच औंढा पट्टा, रावळा-जवळा वगैरे काबीज केले. प्रतापराव गुजराने उत्तरेस खानदेशात शिरून बऱ्हाणपूरजवळचे बहादरपुरा शहर लुटले. नंतर वऱ्हाडात उतरून धनाढ्य शहर कारंजा म्हणून होते त्यावर तो एकदम आला. याठिकाणी मोठमोठ्या वाड्यांतून अपरंपार संपत्ती पुरलेली होती, ती खणती लावून प्रतापरावाने साफ धुऊन नेली. या एका शहरातून चार कोट रुपयांचा ऐवज त्याने लांबवला. त्यानंतर दुसरी अशीच आणखी शहरे समृद्ध होती ती लुटून वऱ्हाड प्रांत त्याने साफ नागवला. वऱ्हाडात खानेजमान हा मोगल अधिकारी होता, त्याला मराठ्यांपुढे येण्याची छाती झाली नाही. यावेळी शिवाजीराजांनी सर्व प्रांतांतून चौथाई वसूल करण्याचा हुकूम जाहीर केला. प्रतापरावाने गावोगावचे पाटील-कुळकर्ण्यांकडून वसुलाचा चौथा हिस्सा शिवाजीराजांना देत जाऊ असे लिहून घेतले आणि हा वसूल घेतल्याबद्दल लोकांना पावत्या लिहून देण्याची वहिवाट पाडली. तेणेकरून 'जे पावती दाखवतील त्यास मराठ्यांकडून उपद्रव पुन्हा व्हावयाचा नाही' असा बंदोबस्त झाला.

शिवाजीराजांची ही चढाई पाहून बादशहास फारच धास्ती पडली. बादशहाचा पक्का संशय आला की, 'आपला पुत्र मुअज्जम याची शिवाजीराजांना फूस असली पाहिजे.' त्याने जसवंतसिंहास परत बोलावून महाबतखान नामक आपल्या नामांकित व अनुभवी सरदाराला दक्षिणेत पाठवून सर्व फौजेचे अखत्यार त्याला दिले; आणि शहाजाद्याजवळ फक्त एक हजार लोक ठेवून त्याला औरंगाबाद येथेच ठेवले. माळव्यातून दिलेरखान व गुजराथेतून बहादुरखानास बादशहाने महाबतखानाची साथ करण्याचा निकडीचा हुकूम पावला. याप्रमाणे सन 1671चे आरंभापासून दीड वर्षे पावेतो मोठमोठे मोगल सरदार व प्रचंड फौजा शिवाजीराजांवर लोटल्या असताना त्याने जो शौर्याचा सामना केला आणि मोगलांना हरवून खानदेश बागलाण, वऱ्हाड इत्यादि समृद्ध प्रांतात आपली सत्ता प्रस्थापित केली, त्याचे योगाने 'शिवाजी हा नुसता पुंड नसून एक नामांकित योद्धा आहे' अशी

बादशहाची व समग्र हिंदुस्थानाची खात्री झाली. ‘आनी घर हद्द किनी रेवा है’ अशा शब्दांनी, ‘आगऱ्याहून सुटून घरी येऊन रेवा नदी आपल्या राज्याची हद्द केली’ असे भूषण कवि लिहितो त्याचे रहस्य हे आहे. या प्रचंड संग्रामाची कालक्रम जुळणी व त्यातले युद्धप्रसंग निश्चित करण्यास लागणारे साहित्य अपुरे आहे. शके 1692-93 चे शकावलीचे उल्लेख व खरे असले तरी सर्व संग्राम व्यवस्थित मांडण्याइतके ते स्पष्ट नाहीत. प्रथम मोरोपंताने बागलाणातले किल्ले घेतले ते परत घेण्यास दाऊदखान महाबतखान व दिलेरखान यांनी जो जबरदस्त प्रयत्न केला, त्यामुळे साल्हेरच्या सारखे भीषण रणसंग्राम घडले. प्रथम शिवाजीराजांच्या वीस हजार फौजेने साल्हेरीस वेढा घातला आणि किल्लेदार फत्तुल्लाखान यास ठार मारून ता.5.1.1671 रोजी किल्ला शिवाजीराजांनी हस्तगत केला. तो परत घेण्यासाठी महाबतखान व दिलेरखान यांनी पुढील जून महिन्यात वेढा घातला. तो उठविण्यासाठी मोरोपंत पिंगळे पावसाळा संपल्यावर चालून गेले व मागाहून प्रतापराव गुजरही आला. तेव्हा कित्येक महिने झोंबाझोंबी चालून सन 1672 च्या फेब्रुवारीत घनघोर संग्राम होऊन दिलेरखानास वेढा उठवून परत जावे लागले. मोरोपंत व प्रतापराव चालून येत असलेले पाहून महाबतखानानेही त्यांना अडविण्याकरता एखलासखानास पाठवले. त्यावेळी जी लढाई झाली तिला साल्हेरची लढाई असे नाव आहे. (फेब्रुवारी 1672). प्रथमत: प्रतापरावाने ‘घाबरलो’ असे दाखवून पळ काढला आणि मोगलांची फौज फाकली जाऊन पाठलागावर येताच प्रतापराव उलटला. तेव्हा फारच निकराची लढाई झाली. तीत मोगलांचा पूर्ण पराजय झाला. राव अमरसिंग चंडावत वगैरे मोगलांचे नामांकित तीस सरदार व लहानमोठे दहा हजार लोक पडले मराठ्यांकडचेही काही लोक मेले, त्यात सूर्यराव काकडे म्हणून शिवाजीराजांचा लहानपणचा सोबती होता, तो पडला. ‘चार प्रहर युद्ध कडाक्याचे झाले. दुतर्फा दहा हजार माणूस मुर्दा जाहले. घोडे, हत्ती, उंट यांस गणना नाही. रक्ताचे पूर वाहिले. सहा हजार घोडे, सहा हजार उंट, सवाशे हत्ती, मालमत्ता, खजिना, जवाहीर, कापड अगणित बिछाईत हातास लागली.’

मोरोपंत पेशव्यांनी साल्हेरीवर जे घनघोर युद्ध केले त्याची तारीफ करावी तितकी थोडीच होईल. त्या युद्धाची आठवण लौकिक कवितेतसुद्धा उतरलेली आढळते. पेशव्याच्या त्या वेळच्या पराक्रमास अनुलक्षून खालील श्लोक तिकडे लोकांच्या तोंडी आहे तो असा :

पुण्याच्या कप्या[88] गर्जताती शिवाजी
तिथे नांदतो पेशव्या मर्द गाजी।
जशी कौरवे मर्दिली अर्जुनाने
तशी मारिली मोगले पेशव्याने॥

सभासद बखरीतील या कवनावरून मोरोपंत पेशव्यांची बहादुरी निदर्शनास येते. त्यात 'प्रतापराव सरनोबत, आनंदराव, व्यंकाजी दत्तो, रूपाजी भोसले, सूर्यराव काकडे, सिधोजी निंबाळकर, मानाजी मोरे यांनी व मावळ्यांनी बाजेवजीर व उमराव कस्त केले. वर्तमान ऐकून महाराज बहुत खूष झाले. साखरा वाटल्या. खबर घेऊन जासूद आले, त्यांचे हाती सोन्याची कडी घातली. दिलेरखान पळून गेला. शत्रूकडील पाडाव झालेल्या लोकांच्या व सरदारांच्या जखमा वगैरे बऱ्या झाल्यावर त्यांना नजर-नजराणे देऊन शिवाजीराजांनी सोडून दिले. ज्यांची मर्जी होती ते महाराजांकडे राहिले. त्यांच्या फौजेत ज्यांनी-ज्यांनी म्हणून विशेष बहादुरी दाखवली त्यांना वस्त्रे भूषणे देऊन संतुष्ट केले.'[89] पाश्चात्त्यांच्या लेखात या संग्रामाची वर्णने भरपूर आहेत. बादशहाला शिवाजीराजांचा हा उत्कर्ष मुकाट्याने सहन करावा लागला. त्याने मुअज्जम व महाबतखान यांना परत बोलावून बहादूरखानास दक्षिणेत नेमले.

ज्याप्रमाणे अफझलखानाचे स्वारीसारखा कठीण प्रसंग उद्भवला म्हणजे स्वत:च्या बुद्धिबळाने बिकट डाव हटकून जिंकण्याची शिवाजीराजांची कर्तबगारी अनेकवार प्रगट झाली. तशाच प्रकारे हिकमतीचे खेळ खेळणारे अनेक सहायक त्यांच्या पदरी निर्माण झाले. थोर पुरुषांचे लक्षणच हे की त्यांचे स्वत:चे बुद्धिवैभव अनुयायांच्या ठिकाणी लगोलग उतरत जाते. शिवाजीराजांच्या अनुयायांनी बुद्धि पराक्रमाची कृत्ये करून अडचणीचे निरसन केल्याची उदाहरणे त्याकाळी किती तरी घडलेली दिसतात. चांदवडजवळ कणेरागड म्हणून शिवाजीराजांचा किल्ला होता, तो घेण्यासाठी दिलेरखान मोठ्या फौजेने चालून आला असताना हशमांचा सरदार रामजी पांगेरा म्हणून किल्ल्यावर होता, त्याने आपले लोक जमवून निवड केली. 'निदान करावयाचे, आपले सोबती असतील त्यांनी पुढे येणे' असे बोलून प्राणार्पण करण्यास सज्ज झालेले सातशे लोक निवडून बरोबर घेतले आणि खाली उतरून दिलेरखानावर चालून घेतले आणि घनघोर रणकंदन करून बाराशे पठाण कापले. रामजी पांगेरा व सातशे माणूस उघडे-बोडके होऊन लढत असताना एकएकास वीस-तीस पावेतो जखमा लागल्या. दिलेरखान हतवीर्य होऊन निघून गेला.'

वरील प्रकार घडल्यावर 1673 मध्ये (?) प्रतापरावाने आणखी एकदा सुरतवर स्वारी करण्याचा धाक घातला, त्यावेळी त्याने खालील जाहीर पत्रक काढले.

'सुरत येथील कानूनगो[90], देसाई, व्यापारी, महाजन व शेटे, आणि इंग्रज फ्रेंच व डच वखारीचे कप्तान आणि रयत लोक यांना कळावे की :

'सुरत येथील व्यापारी मालावर सालोसाल जकातीचे उत्पन्न किती येते, त्याचा पूर्ण तपास करून चौथा हिस्सा शूर मराठी फौजेची खंडणी म्हणून घेत जावा, अशी आम्हास शिवाजीमहाराजांची आज्ञा झाली आहे, आणि ह्या कामावर त्यांनी माझी नेमणूक केली आहे. त्या बरहुकूम तुम्हा सर्वांना असे कळविण्यात येत आहे की, या हुकुमान्वये

बऱ्याबोलाने वागण्याची सुबुद्धी देव तुम्हास देईल तर आमचा गुमास्ता तुमच्याकडे जात आहे, त्यास सर्व कागद दाखवून हिशेब चुकवून द्यावा. असे तुम्ही न कराल तर आमचे शूर शिपाई तुमच्या शहरावर लगेच झडप घालतील व घरेदारे जमीनदोस्त करून तुमची दुर्दशा करतील. तुम्ही त्यांच्या कब्जातून पळून जाऊ शकणार नाही. बादशहा तुमचे संरक्षण करील असे तुम्हास वाटत असल्यास हा तुमचा भ्रम आहे. यापूर्वी दोन वेळा आम्ही तुम्हास तुडवले, तेव्हा कोठे त्याने तुमचे रक्षण केले? तटावरील तोफांचा धूर तुमच्या डोळ्यांवर येऊन त्या तुमचे रक्षण करतील असे तुम्हास वाटत असेल तर आमचे शूर योद्धे पिंजलेल्या कापसाप्रमाणे क्षणमात्रांत ह्या तटाच्या चिंधड्या उडवून देतील आणि त्याच तोफांनी तुमची घरेदारे नाहिशी करतील. साल्हेर-मुल्हेरचे किल्ले किती बळकट होते, ते आम्ही काबीज करू अशी कोणास कल्पनाही होत नव्हती; परंतु महाराजांच्या पुण्यप्रतापाने आमच्या शिपायांनी ते इतक्या लवकर काबीज केले की ही गोष्ट सांगण्यास सुद्धा वेळ जास्त लगेल. हा प्रकार तुम्हास ठाऊक आहेच. अशा आमच्या योद्ध्यांपुढे तुमच्या सुरतच्या तटाची किंमत ती काय? तुमचे नावाजलेले योद्धे दिलेरखान व बहादूरखान हे साल्हेरवरून मनगटे चावीत परत गेले. हेही तुम्हास ठाऊक आहेच. एकदम तुमच्या शहरावर फौज न पाठवता तुम्हास ही आगाऊ सूचना मेहेरबानीराहे दिली जात आहे. ईश्वराची तुम्हावर कृपा असेल तर हा हुकूम पाळण्याची सुबुद्धी तो तुम्हास देईल. नाही तर तुमचे हाल तुम्ही जाणा.’

याजवर सुरतेच्या अधिकाऱ्यांकडून आलेला जवाब :-

‘प्रतापराय व मराठे, ब्राह्मण, नाईकवाडी व बारगीर यांचे तीव्र बुद्धीस कळावे की, तुमचे पत्र आताच आमचे हातास आले. दुष्टांनो, ज्या बादशहाचा लहानसा नोकर मिर्झाराजा जयसिंह याने तुमच्या शिवाजींना वठणीस आणून बादशहापुढे नाक घासण्यास लावले; विजापूर व गोवळकोंडा येथील शहा, ज्या बादशहाच्या नोकरांपुढे नाक घासून सालोसाल खंडणी भरून आपला बचाव करतात; त्या बादशहाचा प्रभाव तुम्हास अजून ठाऊक झाला नाही काय? तुमच्या या उद्धट शब्दांबद्दल तो तुमची जीभ कापून तुम्हास दगडाखाली ठेचून काढील, हे तुम्हास कळत कसे नाही? पहिली ती सुरत ही नव्हे. तुम्हा उंदरांच्या बंदोबस्तासाठी सुरतला आता नवीन तट बांधलेला आहे आणि आता येथे मोगलांचे शूर सिंह जागत बसले आहेत. सबब हा भलताच खटाटोप सोडून देऊन, पळून जाऊन, लपून बसा कसे! सुलतान शहाजादा सत्तर हजार फौज घेऊन तुमचे पाठीवर येत आहे तो आल्यावर तुमच्या प्रेतांनी गिधाडांची मात्र चैन होईल. आपला बचाव व्हावा अशी तुमची इच्छा असेल तर आजपावेतो तुम्ही जे काही अपहार करून घेतले आहे, ते सर्व बहादूरखान व दिलेरखान यांना नेऊन सोपून द्या, म्हणजे ते तुम्हास केलेल्या अपराधांची क्षमा करून बादशहाच्या कृपाछत्राखाली घेतील.’

शिवाजीराजे आणि औरंगजेब यांच्यातील वैर किती विकोपास गेले होते, हे या पत्रांवरून दिसून येते.

5) बादशहाचा जळफळाट :

साल्हेरच्या युद्धातील पराभवाचे वर्तमान ऐकून औरंगजेबाचा अत्यंत जळफळाट झाला. त्याने सुभेदारास लिहिले, आमचा मुलुख शत्रूने जिंकला, तुमच्यासारख्यांना त्याने युद्धात नामोहरम केले, तेव्हा त्या ठिकाणी तुम्ही लढून मेला का नाहीत? जगलात कशाला? आदिल, कुत्ब, फिरंगी, हबशी वगैरे सत्ताधारी त्यास नजराणा पाठवून खूष करतात, त्याऐवजी ते व तुम्ही मिळून चोहोंकडून त्याजवर चाल कराल तर तो किल्ल्यावर किती दिवस कोंडून राहील. बोल-बोल म्हणता जेरीस आला पाहिजे.'

बहादूरखान व दिलेरखान यांनी बादशहास कळवले, 'आपण शिवाजीराजांना आगरा येथे एवढ्या बंदोबस्तात ठेवला असताना पक्ष्यासारखा पुत्रासह पळून गेला ही गोष्ट मनात आणा, म्हणजे आमची कसूर झाली असे आपणास वाटणार नाही. हल्ली त्याने दूरवर विचार करून आपला शहाणा मुसलमान वकील काजी हैदर आमच्याकडे पाठवला आहे.'[91] पण या वकिलास पुढे मोगलांनी परांड्यास अडकवून ठेवल्यामुळे पुन्हा शिवाजींचा मोगलांशी सामना सुरू झाला.

महाबतखानास बादशहाने परत बोलावून अफगाणिस्तानात पाठवले. तिकडे जात असताना तो रस्त्यातच मरण पावला (सन1672). नंतर बादशहाने बहादूरखानास दक्षिणेचा कारभार देऊन त्याचे हाताखाली दिलेरखानास नेमले. बहादूरखानासच पूर्वी खानजहान हे नाव होते.

साल्हेरच्या लढाईनंतर लगेच मोरोपंताने मुल्हेर हस्तगत केले आणि दोन्ही ठिकाणचा योग्य बंदोबस्त करून तो खाली कोकणात उतरला. ता. 6.6.1672 रोजी जव्हारचा राजा विक्रमशहा याचा पाडाव करून लगेच ता.19 रोजी रामनगरचा राजा सोमशहा याचा पराभव केला आणि तेही शहर त्याने हस्तगत केले. सुरतेच्या वाटेवरची ही स्थळे शिवाजीराजांच्या हाती पडल्यामुळे त्या शहराला शिवाजीराजांची धास्ती पुढे कायमचीच बसली. दमणच्या पोर्तुगिझांनी रामनगरकडून चौथाई वसूल करण्याचा हक्क पैदा केला होता, तो या वेळेपासून शिवाजीराजांनी आपल्याकडे कसा घेतला, त्यात चौथाईच्या उगमाची हकिगत मिळते ती येथेच संपविणे सोयीचे आहे.

शिवाजीराजांनी रामनगरचे राज्य जिंकले, तेव्हा त्या राज्याला पोर्तुगीझ सरकार चौथाईचा हक्क देत असत, तो आपणास मिळावा अशी मागणी शिवाजीराजांनी त्या सरकाराकडे केली आणि त्यासंबंधी कैक वर्षे वाटाघाट चालून कायम व्यवस्था ठरवण्यासाठी त्यांनी आपला हुशार वकील पितांबर शेणवी गुळगुळे यास सन 1677 च्या डिसेंबरात गोव्यास पाठवले. पुढील वर्षी तो मरण पावला व त्याच्या जागी पितांबरचा नातू शिवाजी शेणवी याची नेमणूक गोव्यास झाली. नंतर त्याच चौथाईच्या कामगिरीसाठी ता.15.3.1679 रोजी शिवाजीराजांनी गणेश शेट नावाच्या वकिलास गोव्याला पाठवले.

तेव्हा त्या सरकारने शिवाजीराजांची चौथाईची मागणी मान्य केली; परंतु प्रत्यक्ष रकमा सालोसाल दिल्याचा दाखला मिळत नाही.[92]

सन 1671 च्या पावसाळ्यानंतर समस्त मोगल सरदारांनी चहूकडून शिवाजीराजांवर एकदम घाला घालण्याचा बेत ठरवला होता. बहादूरखानाने येऊन सुपे व दिलेरखानाने पुणे हस्तगत करून तेथील लोकांची कत्तल केली. पण शिवाजीराजांनी साल्हेरचे नाक दाबल्याबरोबर ‘पुण्याचा शह’ सुटला. बहादूरखान व दिलेरखान तातडीने निघून उत्तरेकडे गेले आणि पुनरपि पुणे प्रांतावर झडप घालण्यास मोगलांना शिवाजीराजांनी अवकाशच दिला नाही. मात्र शिवनेरचा किल्ला मोगलांचे ताब्यात होता तो सन 1671 मध्ये प्रयत्न करूनही शिवाजीराजांना मिळाला नाही.

बागलाण प्रांत व त्याखालील कोकण हे भाग जिंकण्याचे मुख्य श्रेय मोरोपंत पेशव्यांना आहे. ते खालून वर सारखा फिरत होते. नासिक-त्रिंबकचा मोगलांचा ठाणेदार लखुजी जाधवरावाचा नातू[93] चार हजार फौज घेऊन त्रिंबक हस्तगत करण्याकरता आला असताना मोरोपंतांनी त्याचा पराभव करून त्याला पकडले (जुलै 1672). वणी-दिंडोरीचा ठाणेदार सिद्दी हिलाल याचाही असाच पराभव होऊन तो मोरोपंतांकडून लुटला गेला. या दोघांची बहादूरखानाने अत्यंत निर्भर्त्सना केली, तेव्हा ते आपल्या पथकांसह बादशहाची नोकरी सोडून शिवाजीराजांच्या नोकरीत दाखल झाले. (ऑक्टोबर 1672). पुढे लवकरच शिवाजीराजांच्या फौजा पुन्हा वऱ्हाडात व उत्तर तेलंगणात उतरून लुटालूट करू लागल्या, त्यांचा पाठलाग करता-करता बहादूरखान व दिलेरखान यांची पुरेवाट झाली. अशा अनेक स्वाऱ्यांचे तपशील कंटाळवाणे वाटण्याचा संभव असल्यामुळे ते न देणेच श्रेयस्कर. एकंदरीत बहादूरखान व दिलेरखान यांनी झटून उद्योग केल्यामुळे मोगलांची घसरलेली बाजू बरीच सावरली. बहादूरखानाने चढाईचे धोरण अशक्य समजून सोडून दिले आणि तो केवळ बचावाचे तयारीने वागू लागला. समस्त प्रांतावर देखरेख ठेवण्यास सोयीचे पडावे म्हणून त्याने सन 1672 च्या पावसाळ्यात दौंडच्या पूर्वेस भीमा नदीच्या वाकणावर पेडगाव येथे छावणी केली, तीच पुढे चाळीस वर्षे कायम होती. तेथे एक भुइकोट किल्ला बांधून त्याला बहादूरगड असे नाव त्याने दिले. या ठिकाणाहून शिवाजीराजांवर दाब ठेवणे जास्त सोईचे असे मोगलांनी ठरवले.

सन 1670 पासूनच्या दोन-तीन वर्षांत जे निकराचे युद्धप्रसंग झाले, त्यात मराठ्यांचे शौर्य, पराक्रम व राष्ट्रतेज उत्तम कसास लागले. याच युद्धात मराठ्यांचे राष्ट्र तयार झाले. त्या राष्ट्राचा मध्यवर्ती खांब शिवाजीराजे होते. राष्ट्रावर जेव्हा असे चोहोंकडून सारखे आघात होऊ लागतात, तेव्हाच त्याचे ऐक्य होऊन त्याची संघशक्ती वाढत जाते. मराठे, ब्राह्मण, प्रभू वगैरे शेकडो इसम जिवावर उदार होऊन राष्ट्रकार्ये करू लागले; आपण सर्व या राष्ट्राचे घटक आहोत, ‘राष्ट्रसेवेकरता सर्वस्व खर्ची घालणे हे आपले कर्तव्य आहे’ अशा भावनेने

यावेळी सर्वांनी उद्योग केला. म्हणूनच चारही दिशांना शिवाजीराजांचे राज्य वृद्धिंगत झाले. ठिकठिकाणांहून आणलेला पैसा व लूट सर्व सरकारात जमा होऊन राज्याची शक्ती वाढली होती. पण पंधरा वर्षे मोगल बादशहाशी टक्कर देऊन त्यात जेव्हा शिवाजीराजांना चांगले यश आले, तेव्हा त्यांच्या प्रयत्नांचे खरे स्वरूप प्रगट झाले. विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतान शिवाजीराजांना खंडण्या देऊ लागले आणि मोगलांच्या राज्यातील बऱ्याच प्रदेशातून शिवाजीराजांना चौथाईचा हक्कही मिळू लागला. अशाप्रकारे शिवाजीराजांचे राज्य व मराठ्यांचे राष्ट्र लैकिकदृष्ट्या सिद्ध झाले.

6) पन्हाळा काबीज (6.3.1673), उंबराणीचे लढाईत बहलोलखानाचा पाडाव (15.4.1673) :

औरंगजेबाशी चाललेले युद्ध बहादूरखानाने आवरते घेतले तोच शिवाजीराजांना विजापूरकरांशी पुन्हा झगडा करण्याची पाळी आली. अली आदिलशहा ता.24.11.1672 रोजी मरण पावला आणि सिकंदरशहा नावाचा चार वर्षांचा मुलगा राज्यारूढ झाला. त्यावेळी राज्यात चार प्रमुख मुत्सद्दी होते. वजीर अब्दुल महंमद, हबशी सेनापती खवासखान, पन्हाळा भागाचा सुभेदार बहलोलखान व कर्नाटकचा सुभेदार मुजफ्फरखान. यांपैकी खवासखानाने सर्व सत्ता बळकावली. त्यायोगे दंगल माजून राज्यात घोटाळे झाले. त्यांचा फायदा शिवाजीराजांनी करून घेतला. बाबाजी नाईक पुंडे म्हणून त्यांचा वकील विजापुरास होता, त्यास परत बोलावून प्रथम शिवाजीराजांनी पन्हाळा किल्ला हस्तगत केला. त्याचे भरपूर वर्णन जयराम पिंडे यांच्या 'पर्णाल पर्वत-ग्रहणाख्यान' या संस्कृत काव्यात उपलब्ध आहे.

पन्हाळा किल्ला हा रायगडाप्रमाणेच शिवाजीराजांची दक्षिणेकडील राजधानी. सिद्दी जोहरने तो किल्ला शिवाजीराजांचे कब्जातून घेतल्यामुळे त्याचे उद्योगास मोठा लंगडेपणा आला होता. त्यातून तानाजीने सिंहगड घेतल्यावर पन्हाळ्यासंबंधाने शिवाजीराजांचे प्रयत्न सुरू झाले. त्यांनी अनाजी पंडित व कोंडाजी रवळेकर यांना राजापूर येथे थोडी फौज जमविण्यास सांगितले व तेथून गुप्तपणे जाऊन पन्हाळगड काबीज करण्याची सिद्धता केली. शे-दोनशे लोकांनिशीच हे सरदार अंधाऱ्या रात्री पन्हाळगडाखाली आले. कोंडाजीने पुढे येऊन किल्ल्यातील शिबंदीचे काही लोक फितवून ठेवले होते. कोंडाजी साठ माणसे बरोबर घेऊन फाल्गुन व.13 च्या रात्री (6.3.1673) दोऱ्यांवरून तटावर चढला. कर्णे वाजवून त्यांनी पहारेकऱ्यांमध्ये असा गोंधळ उडवून दिला की कोणासही पुढे काय करावे हे सुचेना. मागाहून अनाजी व त्याचे लोक आत आले, त्यांनी किल्लेदारास ठार मारले. दुसरा अधिकारी नागोजी पंडित म्हणून होता तो पळून गेला आणि अनायासेच किल्ला मराठ्यांचे

कब्जात आला. लोकांना हाणमार केल्यावर पुष्कळसे पुरलेले द्रव्य शिवाजीराजांचे लोकांना प्राप्त झाले. हे वर्तमान रायगडावर शिवाजीराजांना समजताच मोठी खुशाली होऊन ते समारंभाने निघून पन्हाळ्यास येऊन पुढील व्यवस्था करीत तेथे एक महिना मुक्काम करून राहिले. त्याच साली ता.1 एप्रिल रोजी परळी व 27 जुलै रोजी सातारा हे विजापूरकरांचे किल्ले शिवाजीराजांनी घेतले.[94]

अशाप्रकारे पन्हाळा हातचा गेलेला पाहून विजापुरात मोठी धांदल उडाली. खवासखानावर त्याचे अपयश येऊन त्याने ठिकठिकाणच्या फौजांना ताबडतोब बहलोलखानाचे हाताखाली देऊन त्यास पन्हाळा हस्तगत करण्यास रवाना केले. ही विजापुरी फौज किल्ल्यावर चालून येत आहे अशी बातमी लागताच शिवाजीराजांनी प्रतापराव गुजर व आनंदराव यांना पंधरा हजार फौजेनिशी त्यांचे मुकाबल्यास पाठवले. प्रतापरावांबरोबर विठोजी शिंदे, विठ्ठल पीलदेव, कृष्णाजी भास्कर, विसो बल्लाळ, सिद्दी हिलाल वगैरे नामांकित व कल्पक सरदार देण्यात आले होते. प्रत्येकाने आपापली युक्ती भरपूर लढवून विजापूरकरांचा पूर्ण समाचार घ्यावा अशी शिवाजीराजांची ताकीद होती. त्यांनी विजापूरचे पश्चिमेस 36 मैलांवर उंबराणी येथे खानास गाठले आणि त्याच्या लोकांना अवचित वेढून पाणी बंद करताच उभयतांमध्ये ता.15.4.1673 रोजी तुंबळ रणकंदन माजले. त्यात विजापूरची भयंकर हानी झाली, तेव्हा बहलोलखानाने अजिजी करून सुखरूप परत जाण्यास वाट मागितली. ती प्रतापरावाने देताच खान तिकोटे येथे आपल्या मुक्कामावर गेला.

पन्हाळगड हातचा गेल्याने विजापूर दरबाराची केवढी गाळण उडाली, हे खालील एका लौकिकी पद्यावरून दिसून येते.

सरित्पतीचे जल मोजवेना
माध्यान्हिचा भास्कर पाहवेना।
मुष्टीत वैश्वानर बांधवेना
तैसा शिवाजी नृप जिंकवेना॥[95]

7) नेसरीची लढाई, प्रतापरावाचा मृत्यु (24.2.1674) :

बहलोलखान तावडीत सापडला असताना त्यास प्रतापरावांने सोडून दिल्याबद्दल शिवाजीराजांनी प्रतापरावाची अत्यंत निर्भर्त्सना केली आणि ‘खानाचा पाडाव केल्याशिवाय आम्हास तोंड दाखवू नये’ असा खरमरीत निरोप त्याला पाठवला. हे शब्द जिव्हारी लागून प्रतापरावाने सात-आठ महिने हुबळी-कोल्हापूरच्या प्रदेशात त्वेषाचा झगडा केला. प्रथम त्याने दक्षिणेकडे वळून हुबळीची धनाढ्य पेठ लुटली. त्यावेळी मुजफ्फरखान

त्याचेवर त्वरेने चालून आल्यामुळे लुटीचे काम अर्धवट सोडून प्रतापराव परत फिरला. इतक्यात बहलोलखानाने चांगली तयारी करून कोल्हापुरास तळ दिला आणि तेथून तो पन्हाळा, राजापूर, कोकण इत्यादी प्रदेशातून शिवाजीराजांचा अंमल साफ उठविण्याचा उद्योग करू लागला. परंतु सप्टेंबरात मिरजेस असताना तो आजारी पडल्याने त्याचे दोन महिने फुकट गेले. दसरा होताच शिवाजीराजे स्वत: मोठी फौज घेऊन विजापुरी कर्नाटकवर स्वारी करण्यास निघाले आणि बंकापूर वगैरे अनेक शहरे त्यांनी लुटली. इतक्यात सर्जाखान व बहलोलखान चालून आल्यामुळे त्यांना टाळून शिवाजीराजे परत फिरले. मागाहून बहलोलखान बेळगावच्या वाटेने येत असल्याची बातमी प्रतापरावास लागताच गडहिंग्लजजवळ घटप्रभेच्या उत्तरेस एक मैलावर नेसरीच्या खिंडीत प्रतापरावाने त्याला गाठले. खान हातातून निसटून जाईल असे वाटून बरोबर सहा स्वार होते तेवढेच घेऊन तो अविचाराने खानावर घुसला (24.2.1674). पण मोठ्या फौजेपुढे या सात असामींचा कितिसा निभाव लागणार? ते सर्व अल्पावकाशात कापले गेले. धन्याचा ठपका अंत:करणास लागून प्रतापरावाने हा आत्मयज्ञ केला, त्याबद्दल शिवाजीराजांना पुढे अत्यंत दु:ख झाले. सहा वर्षांनी याच प्रतापरावाची मुलगी त्यांनी राजारामास केली.

प्रतापरावाचे जोडीस आनंदराव मकाजी होताच. त्यालाही शिवाजीराजांचा हुकूम आला की बहलोलचा पाडाव करून प्रतापरावाने त्याचेवर उपकार केले, त्याची भरपाई त्यास करून द्यावी. परंतु बहलोलखान मोठा हिकमती होता. त्याने मोगल सरदार दिलेरखान यास आपल्या मदतीस बोलावले. तेव्हा आनंदरावाचा त्याचेपुढे इलाज चालला नाही. मात्र त्याने दक्षिणेस जाऊन बंकापूरजवळचे बहलोलच्या जागीरचे ठिकाण संपगाव म्हणून होते, ते लुटून दीड लाख होन मिळवले (23.3.1674). ते व दुसरे सामान घेऊन आनंदराव परत येत असताना बहलोलखान व खिजरखान यांनी त्याचेवर झडप घातली. त्यावेळी जोराचा संग्राम होऊन आनंदरावाने त्यांचा पराजय करून आणखी पुष्कळ लूट पैदा केली. बहलोलखानाने त्यांचा पाठलाग केला असताना त्यास चुकवून आनंदराव लूट घेऊन सुरक्षितपणे परत आला. पण विजापूरचे युद्ध एवढ्यावरच थांबले नाही, त्याची हकिगत पुढे येईल. त्यापूर्वी कालक्रमास अनुसरून प्रथम राज्याभिषेक समारंभाचे वर्णन करणे जरूर आहे.

प्रकरण 10 - राज्याभिषेक समारंभ

(5-6-1674)

1.प्रयंोजन; 2.गागाभट्ट; 3.समारंभाची घटना; 4.स्वतंत्र राजचिन्हे.

1) प्रयोजन :-

मनुष्यप्राणी जात्याच उत्सवप्रिय आहे. नेहमीच्या व्यवहारात सुद्धा निरनिराळ्या प्रसंगांच्या निमित्ताने नानाप्रकारचे उत्सव पाळण्याचा प्रघात आपणात रूढ आहे. जन्मोत्सव, वाढदिवस, विवाहसमारंभ इत्यादी प्रकार सामान्यजनांत तसे राजेरजवाड्यांतही होतातच. पण राज्यारोहण, रौप्यसुवर्णादि राज्योत्सव व तुलाप्रसंग, हे खास राजे लोकांचेच असल्याने धार्मिक महत्त्वाबरोबर त्यांस व्यावहारिक महत्त्वही बरेच असते. जनतेवर छाप पाडण्यास, इतरत्र दरारा वाढविण्यास आणि एकंदरीने नावलौकिक पसरविण्यास अशा समारंभाचे पुष्कळ साह्य होते. तेव्हा शिवाजीराजांनी बालपणापासून राष्ट्रोद्धारार्थ केलेल्या आपल्या प्रचंड उद्योगाची सांगता राज्याभिषेकाने व्हावी हे योग्यच होते. कारण असे केल्याशिवाय शिवाजीराजांची व त्यांच्या कार्याची श्रेष्ठता जनान्त:करणावर मुळीच ठसली नसती. त्यावेळी मराठे सरदारांना 'राजे' हा किताब बादशहाकडून मिळत होता हे खरे; पण ते फक्त नावाचे राजे होते असे म्हणता येईल. त्यांना राज्याभिषेक करवून घेता येत नसे व तसा प्रयत्नही कोणी केला नव्हता. म्हणून शिवाजीराजांच्या राज्याभिषक समारंभाची मातब्बरी वेगळी आहे. आपण स्वतंत्र राजे आहोत, मराठ्यांत अत:पर स्वतंत्र तख्तनशीन राजे झाले, एवढेच जाहीर करण्यासाठी हा समारंभ शिवाजीराजांनी घडवून आणला असे नाही. तर उत्तरेतील मोगल व दख्खनमधील आदिलशाही, कुत्बशाही वगैरे पातशहांच्या तोडीचे आपण झालो हेही त्याला उघडपणे जाहीर करावयाचे होते. हिंदूंचा धार्मिक छळ यापुढे मुसलमानांना करता यावयाचा नाही, त्यांचा त्राता, रक्षक असा एक छत्रपती आहे असे आश्वासन भयत्रस्त हिंदूंना द्यावयाचे होते; आणि त्यांना आपल्या धर्माप्रमाणे आचरण करण्याचे स्वातंत्र्य आहे ही गोष्ट या समारंभाने सिद्ध करायची होती.

शिवाजीराजांनी स्वराज्याचा उपक्रम सन 1644 मध्ये सुरू केला. तीस वर्षांच्या उद्योगाने मराठ्यांचे स्वतंत्र राज्य निर्माण होऊन त्यांचा वचक खुद्द महाराष्ट्रावर व बाहेरच्या

सत्ताधीशांवर बसला. तेव्हा या उद्योगास नीतिचे व कायद्याचे कायम स्वरूप देऊन सर्व जनतेच्या ठिकाणी या नूतन राज्याची जाणीव उत्पन्न करण्यासाठी शिवाजीराजांनी आपणास यथाविधि राज्याभिषेक करवून घेण्याचा संकल्प ठरवला. शिवाजीराजे कितीही बलवान झाले, तरी ते केवळ 'एक विजापुरी सरदाराचा बंडखोर मुलगा' गणले जात असत. मराठमंडळ त्यास नमून वागू लागले तरी त्यास न जुमानणारे असे कित्येक मराठे सरदार होते, त्यांचे मनावर मुसलमानी सत्तेचा पगडा कायम होता. अशा स्थितीत शत्रुमित्रांनी शिवाजीराजांना 'राजा' म्हणून मान द्यावयाचा असेल तर ते राजेपण शास्त्रोक्त रितीने जनतेत सिद्ध होणे आवश्यक होते. जोपर्यंत शिवांजीराजांचे स्वतंत्र राज्य जाहीर झाले नाही, तोपर्यंत रयतेकडून कर वसूल करणे, कायद्याने त्यांचे नियमन करणे, परराज्यांशी बरोबरीच्या नात्याने व्यवहार ठेवणे वगैरे गोष्टी त्यांना करता येत नव्हत्या. त्यांना सामील झालेले सरदार किंवा कर देणाऱ्या देशातील रयता गुन्हेगार ठरून पूर्वीच्या सत्ताधीशांकडून शिक्षेस पात्र ठरल्या. म्हणून एकंदर उद्योगाचा कायमपणा सर्वांना पटवून देणे हे ओघाने आलेच. खुद्द महाराष्ट्रातील कित्येक प्राचीन सरदार भोसल्यांचे कुल हलके समजत; त्यामुळे सामाजिक व्यवहारात अडचणी उत्पन्न होऊन पुष्कळदा शिवाजीराजांना मानहानी सहन करण्याचा प्रसंग येई. धार्मिक बाबतीत पुरातन क्षत्रियांचे आचार भोसल्यांचे कुटुंबात लुप्त झाले होते. म्हणून चातुर्वर्ण्यांचे दृष्टीने ते शूद्रात मोडत. अशाप्रकारच्या नानाविध अडचणी दूर करण्यासाठी निरनिराळ्या लोकांशी बरेच दिवस वाटाघाट करून शेवटी विधिपूर्वक राज्याभिषेकाचा जाहीर समारंभ करून त्या प्रसंगाने राज्याची कायम व्यवस्था बांधून देण्याचा निश्चय शिवाजीराजांनी ठरवला.

असा समारंभ यापूर्वीच व्हावयास पाहिजे होता. पण सन 1672 मध्ये मोगलांवर त्यांचा शह बसेपर्यंत अशा मोठ्या समारंभाचा उपक्रम हाती घेणे शक्य झाले नाही. पण तेव्हापासून त्याची वाटाघाट चालू होऊन हळूहळू सर्व सिद्धता झाल्यावर सन 1674 च्या मृगसालारंभी तो घडून आला. पूर्वतयारी करण्यातही अनेक अडचणी व विरोध उत्पन्न झाले. भोसल्यांचे घराण्यात क्षत्रियांचे धार्मिक विधि कैक शतके बंद पडलेले असल्यामुळे शास्त्रोक्त राज्याभिषेक करून घेण्याचा शिवाजीराजांना अधिकार नाही अशी सामान्य समजूत प्रचलित होती. परंतु त्यांचा सर्व उद्योग मुख्यत: धर्मस्थापनेसाठी असल्यामुळे धर्माचे प्राचीन स्वरूप मलीन झाले होते. त्याला उजाळा देऊन जनतेकडून मान्यता मिळवण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. स्वराज्य नष्ट झाल्यामुळे सर्वच धर्माचार लुप्त झाले होते. महाराष्ट्रात तर यादवांचे राज्य संपल्यावर राज्याभिषेकाचा विधि कोणास ऐकूनही माहीत नव्हता. म्हणून उत्तरेत राजपूत राजे असे समारंभ करीत, त्यांची माहिती, माणसे पाठवून शिवाजीराजांनी आणवली.

2) गागा भट्ट :

या कामी पुढाकार घेणारा विद्वान व सर्वमान्य पंडित महाराष्ट्रात कोणी नव्हते. गोदावरीच्या आसमंतात पुणतांबे वगैरे ठिकाणी पूर्वी अनेक विद्वान पंडितांची नामांकित घराणी नांदत होती, त्यांचा मुसलमानी अंमलात छळ सुरू झाल्यामुळे देशत्याग करून पुष्कळांनी काशीवास पत्करला. भट्ट, शेष, धर्माधिकारी, देव, मौनी इत्यादी आडनावे धारण करणारी दक्षिणी घराणी अद्यापि काशीत आढळतात, त्यांचे पूर्वज दक्षिणेतून दुष्काळ, परचक्र वगैरे आपत्तींमुळे आपली पोथ्यापुस्तके बरोबर घेऊन चौदाव्या शतकात काशीस जाऊन राहिले. त्यांच्या विद्वत्तेचा लौकिक पुढे तिकडे वृद्धिंगत झाला. कृष्ण नृसिंह शेष नावाचा विद्वान पंडित अकबराचे वेळेस काशीत होता. त्याने ‘शूद्राचार शिरोमणि’[96] नावाचा ग्रंथ लिहून ‘कलियुगात क्षत्रियांचे अस्तित्व नाही’ असे प्रतिपादन केले. हा प्रकार शिवाजीराजांच्या योजनेस अत्यंत बाधक झाला. त्याचे खंडन करण्यासाठी शिवाजीराजांनी आपला चिटणीस बाळाजी आवजी यास उत्तर हिंदुस्थानात उदेपूर वगैरे ठिकाणी पाठवून तेथून तिकडील राज्याभिषेक समारंभांची व आपल्या भोसले कुलाची पूर्वपीठिका पैदा करून आणली. शेषाने क्षत्रियांवर शस्त्र धरले, त्याचा प्रतिकार करण्यासाठी त्याच्याच तोडीचा दुसरा काशीस्थ पंडित विश्वेश्वर उर्फ गागाभट्ट यास शिवाजीराजांनी हाताशी धरले. शेषांप्रमाणेच हे भट्ट घराणे पैठण येथे पूर्वी नामांकित असून त्यांचा पूर्वज गोविंद भट्ट सोळावे शतकाचे आरंभी काशीस जाऊन राहिला. या गोविंद भट्टाचा पाचवा वंशज गागाभट्ट होय. या भट्ट घराण्यांतील पुरुषांनी काशीत विद्वत्ता संपादून धर्मशास्त्रावर अनेक ग्रंथ लिहिले ते अद्यापि वाखाणले जातात.[97] राजपुतान्यात अभिषेक समारंभ होत ते या भट्ट घराण्यातील विद्वानांचे हातून करवण्याचा प्रघात होता. गागाभट्टांचेही अनेक संस्कृत ग्रंथ प्रचलित असून त्याची हिंदुस्थानात मोठी ख्याती होती. काशीत धर्मसभा भरत त्यात अग्रपूजेचा मान या भट्ट घराण्यास मिळे. गागाभट्टास शिवाजीराजांचा लौकिक व पराक्रम ठाऊक होता, म्हणून शिवाजीराजांनी त्यांचेकडे गोविंदभट्ट खेडकर वगैरे मंडळींना पाठवून अभिषेक समारंभास येण्याची विनंती केली. तेव्हा त्यांनी दक्षिणेत येऊन ठिकठिकाणच्या विद्वानांचे अनुमतीने हा राज्याभिषेक सिद्धीस नेला. त्या प्रसंगी कित्येक ब्राह्मणांनी विरोध केला, त्याचे खंडन गागाभट्टाने करून ‘कायस्थ ज्ञातीस क्षत्रियांप्रमाणे वेदोक्त संस्कार करण्याचा अधिकार आहे’ असे प्रतिपादिले.[98] या कामी शिवाजीराजांचा मुख्य हस्तक चिटणीस बाळाजी आवजी हा असून त्यानेच राजपुतान्यात व काशीपावेतो हिंडून वरील व्यवस्था घडवून आणली. उदेपूरच्या सिसोदे घराण्यातून आपली उत्पत्ति झाली हे दाखविणारा वंशवेल सिद्ध करण्यात आला व तोच सध्या उपलब्ध आहे.

सोमनाथभट कात्रे, केशव पंडित, भालचंद्रभट पुरोहित वगैरे कित्येक ब्रह्मण मंडळी बाळाजीबरोबर हिंदुस्थानात गेली होती. शिवाय इकडे शिवाजीराजांनी रामदासस्वामी व इतर प्रतिष्ठित मंडळींचा सल्ला घेतला. पुष्कळांना पालख्या पाठवून सन्मानाने रायगडावर आणले. व्रतबंधादि संस्कार लुप्त झाले होते ते सर्व पुन्हा करून एकंदर समारंभाचा कार्यक्रम सर्वांच्या विचाराने कायम करण्यात आला. महानद्यांची पुण्योदके, सुलक्षणी गजाश्व, व्याघ्रचर्मे व मृगचर्मे, छत्रचामरादि राजचिन्हे, सुवर्णकलश, सिंहासन असे सर्व साहित्य जमविण्यात येऊन आप्तजन, विद्वान, पंडित, लहानमोठे सरदार व सेवकजन इत्यादिकांना निमंत्रणे पाठवून रायगडावर त्यांचे मुक्कामासाठी अनेक जागा तयार करविल्या. जेवणासाठी व सभागृहासाठी मोठमोठे मंडप घातले.

3) समारंभाची घटना (ता.5.6.1674) :

एकंदरीत अपूर्व राष्ट्रीय महोत्सवास शोभेल अशी तयारी शिवाजीराजांनी केली. सन 1674 च्या मे महिन्यात चिपळूणला जाऊन लष्कराची पाहणी केली आणि नंतर परशुरामाचे मंदिरात पूजा करून महाराज ता.11 मे रोजी रायगडावर आले. तेथे हंबीरराव मोहिते यांना सरनौबती दिली. नंतर प्रतापगडावर जाऊन तुळजाभवानीचे दर्शन घेतले, त्याप्रसंगी देवीस सुवर्णछत्र अर्पण केले. त्याची किंमत सुमारे 56000 रु. होती. तदनंतर परत रायगडावर आल्यावर ज्येष्ठ शु.4 (=ता.29 मे) रोजी राजेश्रींची मुंज झाली. नंतर षष्ठीस समंत्रिक विवाह केला. लुप्तविधिबद्दल प्रायश्चित्ते पुण्याहवाचन, होम, शांती वगैरे झाली. ब्राह्मण भोजनाचे मुक्तद्वार सारखे चालूच होते. 'शके 1596 आनंद संवत्सर ज्येष्ठ शु.12 शुक्रवार (=ता.5.6.1674) रोजी तीन घटका रात्र उरली तेव्हा राजे सिंहासनी बैसले,' असा उल्लेख जेधे शकावलीत आहे. कुलगुरु प्रभाकरपुत्र बाळंभट गृहकृत्यांची देखरेख करीत होता. सुवर्णाने व इतर पदार्थांनी शिवाजीराजांच्या तुला होऊन त्यांची दाने करण्यात आली. शिवाजीराजांचे वजन सोळा हजार होन म्हणजे सुमारे 140 पौंड भरते. पण ते 150 पौंड असल्याचा उल्लेख आहे.[99]

मंगलस्नान करून वस्त्राभूषणे परिधान केल्यावर मुहूर्ताच्या वेळेवर शिवाजीराजांनी सिंहासनारोहण केले. सभोवार अष्टप्रधान आपापल्या राजचिन्हांनी युक्त होत्साते अष्टदिक्स्थानी विराजमान झाले. आसमंतात भागी कोशशालांचे अधिकारी, सुहृज्जन, मांडलिक, सेनाधिकारी वगैरे नियुक्त स्थळी उभे होते. सिंहासनारोहण होताच ब्राह्मणांनी मंत्राक्षतांची व इतरांनी सुवर्णरौप्य पुष्पांची वृष्टि महाराजांवर केली. सर्व राज्यात तोफांची सरबत्ती झडली. ब्राह्मणांना दक्षिणा वाटल्या. गागाभट्टास एक लक्ष रुपये दक्षिणा व बहुमोल वस्त्रभूषणे देऊन गौरवले. रोख रक्कम भरपूर दिली, पण इनाम जमीन वगैरे दिली

नाही. ऋत्विजांस प्रत्येकी पाच-पाच हजार व पुरोहितास चोवीस हजार रुपये दक्षिणा दिली. इतरांना योग्यतेप्रमाणे हजार, पाचशे, दोनशे अशा रकमा मिळून किमान पक्ष ब्राह्मण म्हटला की पंचवीसांहून कमी दिले नाहीत. त्याचप्रमाणे गोसावी, तापसी व गोरगरीब यांचाही परामर्ष यथायोग्य घेतला.

सिंहासनारोहण झाल्यावर सकाळी आठ वाजण्याचे सुमारास शिवाजीराजांनी इंग्रज वकील हेन्री ऑक्झेंडेन[100] यास जवळ बोलावून त्याची भेट घेतली. त्याचेबरोबर त्याचा हस्तक नारायण शेणवी होता. इंग्रजांनी या प्रसंगी एक अंगठी, एक चांगली विलायती खुर्ची, एक हिरेजडित शिरपेच, दोन हिरेजडित सलकडी व तीन मोत्ये असे जिन्नस शिवाजीराजांना, व इतरांना आणखी काही जिन्नस, मिळून सुमारे तीनहजार रुपये किमतीचा नजराणा केला. त्यास परत पोषाख देण्यात आले. दरबार खलास झाल्यावर स्वारी समारंभाने हत्तीवरून बाहेर मिरवत जाऊन देवदर्शन करून परत आली. सिंहासनासहित समारंभाचा खर्च जवळजवळ पाच कोटी रुपये झाला असे सभासद लिहितो. परंतु तो पन्नास लक्ष रुपयांहून जास्त नसावा असा अंदाज सर जदुनाथ सरकारांनी केला आहे. पुत्राचे हे महद्भाग्य अवलोकन करून मातुश्री जिजाबाई कृतकृत्य होत्साती. पुढे बारा दिवसांनी ता.17 जून रोजी पाचाड[101] येथील आपल्या वाड्यात दिवंगत झाल्या.

4) स्वतंत्र राजचिन्हे :

सिंहासनाबरोबर काही विशिष्ट राजचिन्हे शिवाजीराजांनी प्रचारात आणली. जरीपटका, डंका इत्यादि प्रकार राजचिन्हे म्हणून प्राचीन काळी उपयोगात असत, त्यांचा शास्त्राधार काढून तदनुसार तशी चिन्हे शिवाजीराजांनी राज्याभिषेकसमयी निर्माण केली. भगवा झेंडा हा पूर्वी पुष्कळ योद्ध्यांपाशी उपयोगात होता. सामान्यत: मराठे सरदार हा झेंडा युद्धावर जाताना वापरीत असत. जरीपटका हे त्याचेच मोलवान रूपान्तर राजचिन्ह म्हणून प्रथम महाराजांनी बनवले, ते पुढे मराठी राज्यात ठिकठिकाणी स्वीकारण्यात आले हा जरीपटका नेहमी बाहेर युद्धात वापरावयाचा नसून समारंभाच्या प्रसंगापुरताच मिरवणुकीत बाहेर काढण्यात येई. शिवाजीराजांच्या पूर्वी शहाजीराजे भगवा झेंडाच वापरीत असत. अशी ही आपल्या निशाणांची उपपत्ती सांगितलेली आहे, ती ग्राह्य वाटते.

प्राचीन काळच्या राजधान्या देवगिरी, विजयनगर वगैरे दुर्भेद्य ठिकाणी करण्यात आल्या, त्या प्रघातास अनुसरून व प्रस्तुतच्या अडचणी लक्षात आणून शिवाजीराजांनी मुद्दाम रायगडचा हा दुर्गम किल्ला राजधानीसाठी पसंत केला. रायगडावर वाडे, पागा, मंदिरे, सभागृहे, कारखाने, गंगासागर तलाव इत्यादि राजधानीला आवश्यक अशा सर्व तजविजी सिद्ध केल्या. त्यावरची बांधकामे आता बहुतेक नष्ट झाली आहेत.

दिल्लीदरवाजा, दरबारमंडप व सिंहासनाचा चबुतरा, जनानखान्याचे भाग इत्यादींचे अल्पावशेष व जगदीश्वरमंदिर थोडीबहुत शाबूत आहेत, त्यावरून मागची कल्पना करता येईल. मुख्य सभागृह दिवाण-इ-खासच्या धर्तीचे असावे. पुढे काही काळ हे दरबार देवीच्या मंदिरात भरत असत. इतर वाडे, व बाजारपेठेचे काही दगडी भाग अद्यापि दिसतात. किल्ल्याला तट असा फारसा नाहीच. बहुतेक दुर्भेद्य तुटलेले कडे असून काही थोड्या ठिकाणी उंच पाषाणांच्या भिंती बांधून वाटा बंद केलेल्या आहेत.[102]

मुख्य समारंभ धर्मशास्त्रानुसार यथासांग झाला, त्याचप्रमाणे एकंदर राज्याची सुव्यवस्था कायमची बांधून देणे हे पहिले मुख्य कृत्य शिवाजीराजांनी केले. तदनुषंगिक ज्या इतर गोष्टी त्यांनी याप्रसंगी केल्या त्यांवरून हिंदुपदपातशाहीचा त्यांचा उद्योग चांगला कळून येतो. आपल्या नूतन राज्याची खूण म्हणून 'राज्याभिषेक शक' नावाची स्वतंत्र कालगणना त्यांनी सुरू केली.[103] क्षत्रियकुलावतंस, सिंहासनाधीश्वर महाराज छत्रपती' अशी उपपदे स्वीकारून त्यांनी आपल्या राज्याची सांगता जाहीर केली. शककर्ता हजार-पाचशे वर्षांनीच निपजतो हे लक्षात घेता, स्वत:च्या कामगिरीबद्दल प्रत्यक्ष शिवाजीराजांना काय वाटत होते, हे त्यात व्यक्त होते. मुसलमानी अमलात दरबारी भाषा म्हणून फारसी व उर्दू यांचा फैलाव झाला होता, तो बंद करून प्राचीन भारतीय स्मृत्यादि ग्रंथांतील रिवाज व भाषा यांचाच उपयोग करण्याचा हुकूम शिवाजीराजांनी प्रस्तुत-प्रसंगी जाहीर केला. राजव्यवहारकोशाच्या द्वारे संस्कृत भाषेतले पर्याय शब्द त्यांनी प्रचारात आणले. हा ग्रंथ रघुनाथपंत हणमंत्यांनी कर्नाटकात धुंडिराज लक्ष्मण व्यास या पंडिता करवी बनवून तो कर्नाटकचे स्वारीत शिवाजीराजांचे हवाली केला.[104] दरबारी कामाची पद्धत बांधून देण्यासाठी कानू-जाबते व लेखनपद्धती शिवाजीराजांनी ठरवून दिली; त्यात अधिकाऱ्यांनी पाळावयाचे नियम आणि लिहावयाचे मायने व व्यवहार सांगितलेले आहेत.

5) अष्टप्रधान :

या सर्व कृत्यात अष्टप्रधानांची व्यवस्था ही विशिष्ट हेतूने सिद्ध केलेली असून ती बहुधा प्राचीन प्रघातास अनुसरून स्वीकारलेली दिसते. तिची स्पष्टता पुढे राज्यकारभार प्रकरणात केली आहे. राज्याभिषेक-प्रसंगी अष्टप्रधानांचा जाबता ठरविण्यात आला, त्यावरून प्रधानांची जुनी व नवी नावे[105] सांगता येतात ती अशी :-

सिंहासनाच्या डावीकडे : हंबीरराव मोहिते, सरनोबत-सेनापती रामचंद्र त्रिंबक, डबीर-सुमंत रावजी निराजी, न्यायाधीश (नवीन पद), रघुनाथ पंडितराव, (नवीन पद)

सिंहासनाच्या उजवीकडे : मोरोपंत पिंगळे, पेशवा-मुख्य प्रधान; रामचंद्र नीलकंठ, मुजुमदार-अमात्य; अण्णाजी दत्तो सुरनीस-सचिव; दत्ताजी त्रिंबक वाकनीस-मंत्री.

या नेमणुका करताना तक्रारी व रुसवे बरेच झाले असावे असे अनुमान पुढील उताऱ्यावरून होते. '...हंबीरराव मोहिते अडील सिपाई, जोहार करणार नाही ऐसे बोलिला. ते समयी राघो मित्र याने बहुत श्रम समागमे केला, दिल्लीस बराबर होता ऐसे पाहून त्यास सेनापतिपद देऊन उभा केला. रामचंद्र त्रिंबक हा सोनोपंत डबिराचा नातू. रघुनाथ पंडितराव याचे पुत्रास दानाध्यक्ष, येणेप्रमाणे नावे ठेविली ते समयी अवघे उभे राहून विनंति केली, आपण शाश्वत नरेन्द्र आम्हास पदे दिली परंतु या दत्तास शाश्वत असावे.' इत्यादि मजकूर आहे तो जिज्ञासूंनी पहावा.[106]

राज्याभिषेक समारंभाने देशातील हिंदी जनतेस पराकाष्ठेचा आनंद झाला. विजापूर, गोवळकोंडा येथील राज्यकर्त्यांस सुद्धा या गोष्टींचे दु:ख न वाटता उलट औरंगजेबाचे राज्यतृष्णेचा प्रतिकार करण्यास त्यास शिवाजीराजांचे आश्रयस्थान निर्माण झाले. या गोष्टीने अत्यंत खेद झालेली व्यक्ती एकच, ती म्हणजे औरंगजेब होय. शिवाजीराजांना स्वतंत्र राज्यस्थापना करू देऊ नये, त्यांच्या समारंभास विघ्न करावे, चहूकडून एकदम गर्दी करून त्याचा उच्छेद करावा अशा ताकिदी बादशहाने त्यावेळी बहादूरखानास वारंवार लिहून पाठवल्या; परंतु शिवाजीराजे सावध असल्यामुळे त्यांचे बहादूरखानाकडून काही एक वाकडे झाले नाही. उलट नाक्याच्या ठिकाणी बंदोबस्त ठेवून शिवाजीराजांनी बहादूरखानास कोकणात उतरू दिले नाही. त्यावरून औरंगजेब म्हणाला, ''परमेश्वरच शिवाजीला साह्य झाला, त्याचे वाकडे कोण करू शकणार!''

या राज्याभिषेक समारंभास सर्व पक्षांची संपूर्ण अनुमती मिळाली नाही. क्षत्रियांचे अस्तित्वच कलियुगात नाही, शिवाजी क्षत्रिय नव्हे आणि त्यास वेदमंत्रांनी धार्मिक कृत्ये करण्याचा अधिकार नाही, असे मानणारा कित्येक ब्राह्मणांचा व मराठ्यांचाही वर्ग होता. पैशाने व अधिकाराने शक्य तितकी मंडळी शिवाजीराजांनी आपल्या पक्षास अनुकूल करून घेतली. तथापि गागाभट्टास दूषणे देणारे कित्येक गृहस्थ समारंभास हजर होते. निश्चलपुरी नावाचा एक विद्वान गोसावी तांत्रिक विद्येत प्रवीण होता. त्याने गागाभट्टाची निंदा करून झालेला समारंभ सर्व व्यर्थ आहे अशी घोषणा चालवली आणि या पापाचरणामुळे अपाय घडतील अशी भाकिते केली. पुढे मातुश्रींचा मृत्यु वगैरे कित्येक प्रकार घडलेले पाहून या विरोधी पक्षाच्या समजुतीसाठी शके 1596 च्या आश्विन शुक्लपक्षात ललितापंचमीचे दिवशी (24.9.1674) पुन्हा एक लहानसा राज्यारोहण समारंभ शिवाजींनी निश्चलपुरींकडून करवला, त्याचे वर्णन 'शिवराज्याभिषेक कल्पतरू' या संस्कृत कवनात प्रसिद्ध आहे.

प्रकरण 11 - शिवाजींची चिंता जिवी सोसवेना

(सन 1674-1676)

1.बहादूरखान पेंडीचे गुरू; 2.फोंडा, सोंधे, बिदनूर; 3.दिलेरखान व नेताजी पालकर; 4.गोवळकोंड्याचे मादण्णा व आक्कण्णा; 5.एकोजीची मूलबुद्धि, धाकुटेपणास योग्य.

1) बहादूरखान पेंडीचे गुरू :-

राज्याभिषेकाच्या समारंभाने औरंगजेबाचा जळफळाट झाला. त्यास विघ्न करण्याचा बहादूरखानाने पुष्कळ प्रयत्न केला. त्यावरून समारंभ उरकल्यावर पावसाळ्यातच शिवाजीराजांनी त्याचा समाचार घेतला. खानाची छावणी पेडगावास होती. दोन हजार मराठेस्वारांनी या छावणीवर छापा घालण्यासाठी जुलै 1674 मध्ये चालून घेतले. त्यांचा प्रतिकार करण्यास खान छावणी सोडून पुढे 50 मैल दूर गेल्याचे दिसताच दुसरी फौज सात हजार स्वारांची एकदम येऊन मोगल छावणीवर कोसळली. त्यांनी सर्व तंबू जाळले आणि एक कोटीचा खजिना व बादशहास नजर पाठविण्याकरता जमविलेले दोनशे सुंदर घोडे ताबडतोब लांबवले. ऑगस्ट-सप्टेंबरात रामनगरच्या बाजूचा कोळ्यांचा प्रदेश हस्तगत करण्यात शिवाजीराजांच्या फौजा झटत होत्या. ऑक्टोबरमध्ये खुद्द शिवाजीराजे बाहेर पडले आणि बागलाणमधून औरंगाबादेवरून खानदेशातला प्रदेश लुटीत गेले. एरंडोलच्या उत्तरेस दहा मैलांवर धरणगाव येथे इंग्रज वखार होती, ती त्यांनी याप्रसंगी लुटली. कुतुबुद्दिनखान खेदगी नावाचा मोगल सरदार शिवाजीराजांना आडवा आला. पण त्याचा पराभव होऊन त्याला परत औरंगाबादला जावे लागले (नोव्हें.1674). पुढील सालच्या फेब्रुवारीत मोगल फौजांनी घाटातून कोकणात उतरून कल्याण शहराचा भाग जाळला. पण त्या फौजा परत जाताच शिवाजीराजांच्या लोकांनी कल्याण पुन्हा हस्तगत केले. अशारितीने बहादूरखान अगदी त्रासून गेला हे ओळखून शिवाजीराजांनी त्याजबरोबर तहाची वाटाघाट सुरू केली. शिवाजीराजांनी 17 किल्ले बादशहास द्यावे आणि बादशहाने संभाजीराजांना सहा हजार मनसब द्यावी, असे बोलणे चालू झाले. बहादूरखानाने ते बादशहाकडे लिहून कळवले. तिकडून मंजुरीचे फर्मान आले. मध्यंतरीच्या काळात

शिवाजीराजांनी विजापूरचा फोंडा किल्ला आहे तो हस्तगत करण्याचा उद्योग चालवला होता, म्हणून शिवाजीराजांनी ही तहाची हुलकावणी दाखवली. पुढे फोंडा त्यांचे ताब्यात आला, तेव्हा शिवाजींना मोगलांशी तह करण्याची मुळीच जरुरी उरली नाही. त्यांनी मोगल वकील आले होते त्यांना घालवून दिले; त्यामुळे बहादूरखानाची अत्यंत नामुष्की झाली. 'बहादूरखान म्हणजे पेंडीचे गुरू' असे शिवाजीराजांचे उद्गार आहेत.[107]

2) फोंडा, सोंधे, बिदनूर (एप्रिल 1675) :

शिवाजीराजांनी स्वराज्याचा उद्योग चालू केला, तो पोर्तुगिझांच्या कार्यास अनेक बाबतीत जाचक झाला. शिवाजींच्या राज्याचा पाया पश्चिम किनाऱ्यावर असून तो किनारा सुरत पासून कारवारपर्यंत अविच्छिन्न आपल्या कबजात असावा असा त्यांचा उत्कट प्रयत्न होता. पश्चिम किनाऱ्यावरून परदेशाशी मोठा व्यापार चालत असून त्यापासून शिवाजीराजांना बरीचशी प्राप्ती होई. पोर्तुगीझ वगैरे पाश्चात्त्य लोक तोफा, बंदुका चालविण्यात आणि दर्यावर्दी कामात विशेष निपुण म्हणून प्रसिद्ध होते आणि ह्या दोन्ही कला आपल्या लोकांनी हस्तगत कराव्यात अशी शिवाजीराजांची इच्छा होती. विजापूर मोगल इत्यादिकांशी शिवाजीराजांचे युद्धप्रसंग चालू झाले म्हणजे हे पाश्चात्त्य दर्यावर्दी लोक त्यांच्या शत्रूंस दारूगोळा व हत्यारे पुरवीत, वेळी तोफांचे काम करणारे वाकब गोलंदाजही पाठवीत. शिवाय सुरतपासून कारवारपर्यंतच्या किनाऱ्यावर एकदम कोठेही झडप घालून हे पोर्तुगीझ लोक लूट व जाळपोळ करून रयतेचा उच्छेद करीत आणि हिंदुंना पकडून त्यांना जबरदस्तीने ख्रिस्ती करीत. अशा अनेक कारणांस्तव त्यांचा या प्रदेशांतून उठावा करणे, निदान त्यांना चांगले धाकात ठेवणे शिवाजीराजांना अपरिहार्य झाले. त्यामुळे त्यांच्या हयातीत उभयतांचा वैरभाव कैक वर्षे चालू राहिला आणि त्यांजवर आपला नक्ष बसविण्यासाठी त्यांनी पीतांबर शेणवी गुळगुळे याचा उपयोग करून घेतला. हा गृहस्थ त्याच भागात राहणारा, पूर्वी वाडीकर सावंताचा कारभारी होता. दक्षिण कोकणातील पोर्तुगीझ, सावंत वगैरे सत्तांच्या व्यवहारांची त्याला चांगली माहिती होती. तसेच शिवीराजांनी तोफांचा कारखाना बनवला त्याकामी पोर्तुगिझांचे नैपुण्य प्रसिद्ध होते, सबब पितांबराचे मार्फत माणसे व माहिती आणून शिवाजीराजांनी कारखाना उभारला. पितांबरास बहुधा पोर्तुगीझ भाषा येत असावी; आणि त्याच्याच मार्फत चौथाईच्या उत्पत्तीची माहिती मिळवून शिवाजीराजांनी तो हक्क मराठशाहीत चालू केला. पोर्तुगीज गव्हर्नराची पीतांबर पंडितास लिहिलेली कित्येक पत्रें उपलब्ध आहेत, त्यांवरून त्याची प्रतिष्ठा व्यक्त होते. ता.6.12.1676 च्या पत्रात शिवाजीराजांनी पीतांबर शेणवी यास दस्त

करून त्याचे सर्व कागदपत्र आणले, पण त्या प्रकरणाचे निराकरण होऊन शिवाजीराजांनी ते त्याला परत दिले. अशा रितीने पश्चिम किनाऱ्यावर त्यांनी आपले वजन बसवले.[108]

इंग्रज, सिद्दी व पोर्तुगीझ या तिघांचा संपर्क पश्चिम किनाऱ्यावर शिवाजीराजांना पोहोचला आणि त्यांचा समूळ उठाव करणे अनेक कारणांस्तव त्यांना अशक्य वाटल्यामुळे त्यांनी या किनाऱ्यावरच ठिकठिकाणी आपली स्वत:ची नवीन दर्यावर्दी ठिकाणे सिद्ध केली. ती कुलाबा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, फोंडा व कारवार ही होत. चौल, जंजिरा, गोवा वगैरे परसत्तांच्या पायाला शह देण्याची शिवाजीराजांची ही योजना असून, किनाऱ्यापासूनचा अंतर्गत प्रदेश सुद्धा कल्याणपासून कारवार, बसनूरपर्यंत नवीन किल्ल्यांनी व लष्करी बंदोबस्ताने शत्रूंशी टक्कर देण्यास त्याने सिद्ध केला. सन 1674च्या ऑगस्ट महिन्यात त्यांनी मुद्दाम अण्णाजी दत्तोला फौज देऊन विजापूरचा फोंडा किल्ला, गोव्याचे हद्दीस लागून होता, तो काबीज करण्यास पाठवले. त्यावेळी विजापुरात बहुनायकी माजली होती. दक्षिण पक्षाचा मुख्य खवासखान वजिरीवर असून तो त्याचा कारभार पठाण पक्षाचा प्रमुख बहलोलखान हिसकावून घेण्यास टपला होता. त्यामुळे फोंड्याचे बचावास विजापूरची फौज येणे संभवनीय नव्हते. तथापि अण्णाजी दत्तो जेव्हा कुडाळच्या मार्गाने फोंड्यावर चालून गेला तेव्हा तेथील किल्लेदार मुहंमदखान याने शौर्याने लढून किल्ल्याचा बचाव केला आणि अण्णाजी दत्तोने कैक महिने कष्ट केले तरी त्याचा इलाज चालेना. हे वर्तमान शिवाजीराजांना समजताच त्यांनी वर सांगितल्याप्रमाणे सेनापती बहादूरखान याचेशी तहाचे बोलणे सुरू करून त्यास तूर्त गप्प बसवले व स्वत: मोठ्या फौजेनिशी दक्षिणेकडे प्रयाण केले. ता.22.3.1675 रोजी ते राजापुरास दाखल झाले. तेथून सामानाची चाळीस गलबते वेंगुर्ल्यास रवाना करून आपण पायवाटेने फोंड्यास गेले. सामानही भरपूर मिळाले. ता.8.4.1675 रोजी त्यांनी फोंड्यास वेढा घातला आणि बाहेरची मदत किल्ल्यास येऊ नये म्हणून आपल्या लहान टोळ्या विजापुरी-मुलखात लूट करण्यास पाठवल्या. बहलोलखान विजापुराहून फोंड्याचे बचावास धावून येत असताना त्याला मिरजेवरच शिवाजीराजांच्या लोकांनी अडवून धरले. महाराजांनी केलेल्या माऱ्याने जेरीस येऊन ता.6 मे रोजी किल्ला त्यांचे ताब्यात आला. मुहंमदखानाने सभोवारचा प्रदेश सोडून देऊन आपला जीव वाचवला. त्याचे पुष्कळ लोक पकडण्यात आले होते, त्यांना महाराजांनी ठार मारले. नंतर अंकोला, शिवेश्वर, काद्रा वगैरे ठिकाणे त्यांनी लगोलग कब्जात घेतली. फोंड्याचे बंदोबस्तासाठी पुष्कळ नवीन तटबंदी करून तेथे लष्करी बचावाची तजवीज पक्की केली. लगेच दक्षिणेकडे चाल करून त्यांनी कारवार बंदर, तेथील किल्ला सदाशिवगड व नजीकचे सोंधे वगैरे प्रदेश काबीज केले, आणि त्यावर चौथाईचा हक्क लागू केला. धर्माजी नागनाथ नावाचा आपला एक हुशार अधिकारी फोंडा येथे त्यांनी नेमला आणि त्याचेकडे या नवीन प्रदेशाची व्यवस्था सांगितली.[109] राजापुरपासून सावंतवाडीच्या

प्रदेशावर जसा रावजी सोमनाथ, तसाच सावंतवाडीपासून सोंध्यापावेतोच्या प्रदेशावर धर्माजी नागनाथ हा महाराजांचा अंमलदार असून त्याचे मुख्य ठिकाण फोंडा[110] होते. फोंडा हस्तगत झाल्याने गोव्यावर शिवाजीराजांची दहशत बसली. नंतर महाराज ता.12 जून रोजी परत राजापुरास येऊन लगेच रायगडावर पोहोचले.

परत येण्यापूर्वी महाराजांनी काही लष्कर सोंधे बिदनुरकडे रवाना केले. बिदनूरची राणी व तिचा कारभारी तिमय्या यांचे वाकडे येऊन राणीने महाराजांची मदत मागितली. बिदनुरातून दरसाल खंडणी घेण्याचा ठराव करून महाराजांनी आपला वकील उमाजी पंडित तेथे ठेवून दिला. येणेप्रमाणे हल्लीचे दोन जिल्हे उत्तर व दक्षिण कानडा यांचा हा प्रदेश अविच्छिन्न महाराजांना मिळाला आणि दक्षिणेस बिदनूरपर्यंत त्यांच्या राज्याची हद्द पोहोचली.

सातारा किल्ला विजापूरचे ताब्यात होता, तो महाराजांनी पावसाळ्यानंतर ता.11.11.1675 रोजी हस्तगत केला आणि तेथेच राहत असताना दोन-तीन महिने महाराज आजारी पडले. तेणेकरून त्यांच्या निधनाची बातमी चहूकडे उठली. '...संभाजींनी शिवाजीराजांवर विषप्रयोग केला...' अशाप्रकारचेही तर्कवितर्क चालू झाले. परंतु दोन-तीन महिन्यांत महाराज खडखडीत बरे झाले. मात्र त्यांना या संधीस अत्यंत उद्विग्नता प्राप्त होऊन, ते त्यांचे औदासिन्य श्रीसमर्थांनी दूर केले. शिवाजीराजांनी आपल्या राज्याची भिक्षा समर्थांना घातली आणि सातारा किल्ल्यावरून परळीचे किल्ल्यावर समर्थांशी त्यांनी संभाषण केले वगैरे ज्या दंतकथा आहेत, त्या बहुधा या आजाराचे मागच्या-पुढच्या असाव्यात. विशेषत: त्यांचा पुत्र संभाजी दुर्वृत्त निघाला, त्याचेवर इतराजी झाली, त्याला शृंगारपुरी ठेवले' असे उल्लेख आहेत, हेच कारण शिवाजीराजांच्या उद्विग्नतेचे असावे आणि यामुळे बाहेर भलभलत्या बातम्या उठल्या. सन 1676च्या फेब्रुवारीत दुखण्यातून बरे होऊन शिवाजीराजे पुढे काही काळ पन्हाळ्याला जाऊन राहिले. तरी सातारकडील आदिलशाही प्रदेशावर त्यांचे आक्रमण चालूच होते. 'शके 1598 आश्विन व। 8 शुक्रवार (20.10.1676) या दिवशी शिवाजीराजे स्वारी करून खटाव येथे आले. कोट पाडला. आपले ठाणे घातले व भोवती किल्ले बांधले.'[111] यावेळी कर्नाटकची स्वारी घाटत होती.

3) दिलेरखान व नेताजी पालकर (19.6.1676) :

दक्षिणेत या वेळी आदिलशाही, कुतुबशाही, मोगल व मराठे अशा ज्या चार सत्तांची एकच दंगल सुरु झाली, त्यांचे हेतू व कावे पृथक्पणे नजरेत आणणे कठीण पडते. विजापुरास अल्पवयीन सिकंदरशहा गादीवर असून दक्षिणी पक्षाचा प्रमुख खवासखान कारभारी होता. अशा स्थितीत विजापूरचे राज्य एकदम जिंकण्याचे हुकूम औरंगजेबाकडून

बहादूरखानास येत होते. शिवाजीराजांनी तहाची हुलकावणी दाखवून आपणास तोंडघशी पाडले म्हणून खान त्यांचेवर अत्यंत चिडला होता, त्यांचा आश्रय आता खवासखानाने केला. ता.19.10.1675 रोजी खवासखानाने भीमेच्या काठावर बहादूरखानाची भेट घेऊन पुढील बेत ठरवला. परंतु खवासखानाचा हा उद्योग बहलोलखानाच्या पठाण पक्षास बिलकूल मान्य झाला नाही. तेव्हा उभयतांत वाकडे आले. बहलोलखानास कैद करण्याचा घाट खवासखानाने रचला. याची अंतस्थ खबर बहलोलखानास मिळताच त्याने खवासखानास रात्री भोजनास बोलावून दारू पाजून नशेत असताना गिरफ्तार केले (ता.19.11.1675) आणि त्याला बंकापूरचे किल्ल्यावर अटकेत ठेवून आपण वजीर बनला.

येणेप्रमाणे विजापूरचा कारभार पठाणांचे हाती गेला हा प्रकार दक्षिणेत कोणासही रुचला नाही. शिवाजीराजांनी मालोजी घोरपड्याला लिहिलेल्या पत्रात या पठाणांचा अत्यंत निषेध केला आहे. मोगल बरे पण पठाण नकोत अशी भावना सर्वत्र होती. खुद्द विजापूरचे दरबारात तर हबशी व पठाण यांचेमध्ये उघड दंगल माजली. मोठमोठ्यांचे उघड खून होऊ लागले. तेव्हा ता.18.1.1676 रोजी बहलोलखानाने बंकापुरास खवासखान होता त्याला ठार मारून बंडखोरांवर चाल केली, तेणेकरून यादवीचे युद्ध सुरू झाले. विजापूर जिंकण्यास ही संधी चांगली आहे असे पाहून बहादूरखान फौजेनिशी चालून आला. ता.21.3.1676 रोजी विजापूरनजीक लढाई होऊन बहादूरखान पराभव पावून मागे सोलापुरावर हटला. तरी पुन्हा सर्व सावरासावर करून त्याने पुन्हा विजापुरावर चाल केली. तेव्हा ता.13.6.1676 पासून तीन दिवस पावेतो फारच तुंबळ रणकंदन झाले. बहादुरखानाचे हाताखालील इसलामखान वगैरे सरदार मारले जाऊन मोगलांना मागे हटावे लागले. याच संधीत गोवळकोंड्याची फौज बहलोलखानाचे साह्यास आली. याप्रमाणे बहादूरखानास वारंवार अपयश आल्यामुळे बादशहाची त्याजवर अवकृपा होऊन दिलेरखानास त्याने पुन्हा दक्षिणेत पाठवले (जून 1676). दिलेरखानाबरोबर बहुधा नेताजी पालकर ऊर्फ महंमद कुलीखान यासही बादशहाने इकडे पाठवले. शिवाजीराजांना जिंकण्यासाठी त्यांच्याच तोडीचा दक्षिणेची पूर्ण माहिती असलेला इसम बादशहास पाहिजे होता. सात-आठ वर्षे मुसलमानी धर्म पाळून नेताजीने बादशहाची कृपा संपादली होती आणि पुष्कळदा 'पिढीजाद मुसलमानांपेक्षा बाटलेले गृहस्थ जास्त कडवे असतात' असा अनुभव असल्यामुळे, नेताजीबद्दल बादशहाला मोठा भरंवसा वाटत होता. पण दक्षिणेत येताच त्याने शिवाजीराजांवर चालून येऊन, एकेदिवशी गुप्तरूपाने मोगल छावणीतून निघून शिवाजीराजांची गाठ घेतली. शिवाजीराजांनी लगेच त्याला प्रायश्चित्त देऊन परत हिंदुधर्मात घेतले. (ता.19.6.1676).[112]

नेताजी निघून गेल्याने दिलेरखानाची बाजू लंगडी पडली. त्याने विजापूरच्या बहलोलखानाशी स्नेह करून बादशहास कळवले की, 'बहादूरखानाचे हातून इकडचा

निभाव लागणार नाही. त्याचे दक्षिणेतील तीनही सत्ताधीशांशी अंत:स्थ सूत आहे. आपण मला साह्य कराल तर मी बहलोलखानाच्या साह्याने शिवाजीराजे व कुतुबशहा यांना जिंकून आपले हेतू सिद्धीस नेतो.' बादशहाने ही विनंती मान्य करून बहादूरखानास बदलून दक्षिणेचा कारभार दिलेरखानास सोपवला. सन 1677 च्या सप्टेंबरात बहादूरखान परत गेला. गोवळकोंड्यावर दिलेरखानाची धाड आल्यामुळे वजीर मादण्णास शिवाजीराजांचा आश्रय घेणे भाग पडले. पण पठाणांचा हा व्यूह सिद्धीस गेला नाही. बहलोलखान आजारी पडून ता.23.12.1677 रोजी मरण पावला आणि सिद्दी जोहरचा जावई सिद्दी मसूद दक्षणी पक्षाचा मुख्य होता तो विजापुरास वजीर झाला. दिलेरखान चालून आल्याने विजापूरच्या बचावाची सिद्दी मसूद यास मोठी धास्ती पडली आणि अनिवार्य संकट जाणून मोठ्या मिनतवारीने त्याने शिवाजीराजांशी सख्य करून त्यांची मदत मागितली. विजापुरात दंगा सुरू होऊन चिंतो चिमणाजीने सर्व शहर नागवले. तेव्हा रयतेची धूळधाण उडाली. मसऊदखानाने शिवाजीराजांना लिहिले, 'आपण शेजारी आहोत, एका ताटात जेवणारे आहोत. आदिलशाहीचा अभिमान आमच्या इतकाच तुम्हासही आहे. रात्रंदिवस शत्रू राज्याचा नाश करीत आहेत. आपण दोघांनी एक होऊन परकीय शत्रूंना हाकलून देणे आपले कर्तव्य आहे.' शिवाजीराजांनी शपथपुरस्सर मदत देण्याचे कबूल गेले. दिलेरखानास हा प्रकार कळला तेव्हा तो चिडून गेला आणि विजापूर जिंकण्याचा त्याने अटोकाट प्रयत्न सुरू केला. त्याने विजापुरचे बहुतेक सरदार फोडून आपल्या पक्षास आणले. याच संधीस संभाजीराजे त्यास मिळाले. परंतु हा प्रकार कालक्रमाने पुढे सांगऱ्यात येईल. तूर्त शिवाजीराजांची कर्नाटकातील मोहीम समजण्यास वरील परिस्थिती लक्षात ठेवणे जरूर आहे.

4) गोवळकोंड्याचे मादण्णा आक्कण्णा :

कोणत्याही राज्याचे सर्वात मोठे सामर्थ्य म्हणजे पैसा ही गोष्ट आजच्या इंग्रज राज्यकर्त्यांप्रमाणेच शिवाजीराजांनी ओळखली होती. व्यापाराने, करनीतिने व कायद्याच्या शिस्तीने इंग्रज राज्यकर्ते लोकांकडून पैसे काढतात, तोच मार्ग परिस्थितीला अनुरूप अशा अन्य उपायांनी शिवाजीराजांनी अवलंबिला होता. युद्धे, स्वाऱ्या व राज्याभिषेक समारंभ यांच्या योगाने पूर्वीचा द्रव्यसंचय खलास झाल्यामुळे धनोत्पत्तीचे नवीन काही साधन शोधून काढणे शिवाजीराजांना भाग पडले. खानदेश, वऱ्हाड, बागलाण व उत्तर कोकणातील जव्हार, रामनगर सुरतपावेतोचा प्रदेश शिवाजीराजांनी बहुतेक धुऊन काढलाच होता. औरंगजेबाची सत्ता नर्मदोत्तर भागात भक्कम असल्यामुळे त्या बाजूस आपली दृष्टी वळविण्याची सोय त्यांना नव्हती. तेव्हा दक्षिणेतूनच जी काय पैदास होईल ती करण्याचा

विचार शिवाजींनी ठरवला. विजापूर व गोवळकोंडा ही राज्ये खिळखिळी होऊन पूर्वी शहाजी व मीरजुमला यांच्यावेळी खाली कर्नाटकात वाढलेली या राज्यांची सत्ता अलिकडे बरीच संपुष्टात आली होती. विजापूरचा पश्चिमेकडील प्रदेश बहुतेक शिवाजीराजांनी हस्तगत केलाच होता. पूर्वकिनाऱ्यावरचा गोवळकोंड्याचा प्रदेश जिंजी-तंजावर-मदुराईपर्यंत बराच सधन होता. शिवाय कुतुबशहाचा बुद्धिमान दिवाण मादण्णापंत याने त्या राज्याची इभ्रत बरीच वाढवली होती. हिऱ्यांच्या खाणींनी व कावेरी सारख्या समृद्धिदायक नद्यांनी या पूर्व-कर्नाटकाची भरभराट बाहेर कैक शतके मशहूर होती. विजयनगरचा वंशज श्रीरंगराय याने हिंदू सत्ताधिशांची एकी घडवून मुसलमानांना पायबंद देण्याचा प्रयत्न केला, तो सिद्धीस गेला नाही. तदनंतर आता हिंदूंचा पुरस्कर्ता शिवाजीराजा निर्माण झाला. अर्थात विजयनगरचा संहार भरून काढण्याचे कर्तव्य ओघानेच आता शिवाजीराजांवर येऊन पडले, ते त्यांनी यावेळी हाती घेतले. या उद्योगात गोवळकोंड्याचा मादण्णापंत व तंजावरचा रघुनाथ नारायण हणमंते हे शिवाजीराजांचे सहायक बनले.

मदनपंडित उर्फ मादण्णा व एकनाथपंत ऊर्फ आकण्णा हे दोघे बंधू एका गरीब ब्राह्मणाचे मुलगे पूर्वी मीर जुमला याचे जवळ नोकरी करून हुशार झाले. पुढे मीर जुमला डोईजड झाला, त्यास दूर करण्यात मादण्णाचा उपयोग कुतुबशहास घडल्यापासून त्याची राज्यात बढती झाली. मादण्णास फारसी, संस्कृत व देशी भाषा चांगल्या अवगत असून देशातील परिस्थितीची व राजकीय घडामोडींची त्याला माहिती असल्यामुळे गोवळकोंड्याच्या दरबारात त्याला वजन प्राप्त झाले.[113]

सन 1672 मध्ये विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतान मरण पावल्यामुळे त्या राज्यांच्या कारभारात दोन्ही ठिकाणी क्रांती घडून आली. प्रथम अब्दुल्ला कुतुबशहा ता.21.4.1672 रोजी व मागाहून अली आदिलशहा ता.24.11.1672 रोजी मरण पावले. अलीच्या मृत्युने विजापूर दरबारात घोटाळे माजले, त्याचे वर्णन मागे आले आहेच. अब्दुल्ला कुतुबशहा मरण पावल्यावर त्याचा जावई सय्यद अहमद याने कुतुबशाही तख्त मिळविण्याचा प्रयत्न केला. हा सय्यद अहमद पूर्वी बरेच दिवस वजिरीचे कामावर असून त्याचेवर दरबारचे अधिकारी नाखूष झालेले होते. सय्यद मुजफ्फर नावाचा एक गृहस्थ फौजेचा अधिकारी असून त्याने अब्दुल्लाचा पुत्र अबुलहसन यास तख्तावर बसवून आपण वजिरी संपादली. परंतु अल्पावकाशातच त्याने अबुलहसन यास न जुमानता स्वैर वर्तन चालवले, ते असह्य होऊन अबुलहसनने मादण्णापंताचे साह्याने सय्यद मुजफ्फर यास दूर केले आणि मादण्णासच ‘सूर्यप्रकाशराव’ हा किताब देऊन वजिरीवर नेमले (सन 1673). या वेळेपासून सन 1686 मध्ये औरंगजेबाने गोवळकोंड्यावर स्वारी केली तोपर्यंत तेरा वर्षे मादण्णाने कारभार केला. सन 1676मध्ये शिवाजी व मादण्णाचे सख्य घडून आले.

मादण्णा मनमिळाऊ व चौरस आणि त्याचा भाऊ आकण्णा लहरी व तिरसट होता, अशी त्यांची वर्णने पाश्चात्त्यांनी लिहिलेली आढळतात. मादण्णास प्रधानपद मिळाले तेव्हा आकण्णा कर्नाटकातील प्रदेशाच्या कारभारावर होता, त्यास मादण्णाने प्रथम गोवळकोंड्याच्या तर्फेने विजापुरास वकील म्हणून नेमले आणि नंतर थोड्या अवकाशात त्याजकडे फौजेचा मुख्याधिकार दिला. मादण्णाचे तिघे पुतणे लिंगण्णा, गोपण्णा ऊर्फ रामदास व यंगण्णा ऊर्फ रूस्तुमराव हे निरनिराळ्या ठिकाणी तहसिलीच्या कामावर असून, त्यांचे उल्लेख फ्रेंच अधिकारी मार्टिन इत्यादींच्या लेखात येतात. मादण्णाच्या या समस्त कुटुंबाने गोवळकोंड्याच्या मुसलमानी राज्यात हिंदूंचा पुरस्कार घेऊन राज्याचा बंदोबस्त चांगला केला, बंडाळी वगैरे मोडून वसुलाची निपज व्यवस्थित केली, त्यामुळे राज्याचा दरारा चहूकडे वाढला; पण ह्याच कारणास्तव औरंगजेबाचे हातून त्या राज्याचा नाश झाला.[114]

5) तंजावराचे एकोजी व रघुनाथपंत हणमंते :

मादण्णाशिवाय कर्नाटक प्रकरणात रघुनाथ नारायण हणमंत्यांचा संबंध येतो. याचा बाप नारो त्रिमल दादोजी कोंडदेवांबरोबर निजामशाहीत कामे करून पुढे शहाजींचे पदरी आला. नारोपंताचे मुलगे रघुनाथपंत व जनार्दनपंत. रघुनाथपंत प्रथम शहाजींजवळ कर्नाटकात कारभार करून पुढे व्यंकोजींचा कारभारी झाले. दक्षिणेच्या राजकारणात ते चांगले निष्णात असून शहाजींचा व पुढे एकोजींचा तिकडे जम बसविण्यात रघुनाथपंतांची कर्तबगारी चांगली दिसून आली. तंजावरचे राज्य प्रथम शहाजींनी विजापूरच्या तर्फेने 1659च्या मार्चमध्ये जिंकले, तेव्हापासून दोन-एक वर्षे तो प्रदेश शहाजींच्या ताब्यात होता. पुढे दुष्काळ व रोगांची साथ येऊन व आपसात विजापुरी लष्कराचे तंटे होऊन शहाजींना तंजावर सोडून द्यावे लागले. पश्चात शहाजी मरण पावले आणि मदुराई व तंजावर येथील नायकांचे तंटे लागले असताना, एकोजीने तंजावरास जाऊन आपणच ते स्थळ सन 1675 चे आरंभी हस्तगत केले, तो प्रकार असा-

मदुराई व तंजावर येथील नायकांचे बहुधा पिढ्यान्पिढ्या वैर चालत आले होते. तंजावरास विजयराघव व मदुराई येथे चोक्कनाथ[115] हे सत्ताधीश असताना विजयराघवाची मुलगी होती तिला चोक्कनाथाने मागणी घातली, ती विजयराघवाने नाकबूल करून चोक्कनाथाचा आणखी काही अपमान केला. त्यावरून चोक्कनाथाने तंजावरावर स्वारी केली. पुढे लढाई झाली त्यात चोक्कनाथाने विजयराघव व त्याचा मुलगा यांना ठार मारले आणि राजवाडा जाळून खाक केला.त्यातून विजयराघवाचा एक अल्पवयीन नातू चेंग अमलदास मात्र एका दासीच्या चतुराईने वाचला. चोक्कनाथाने आपला एक सावत्रभाऊ

तंजावरचे बंदोबस्तास ठेवून मदुराईस प्रयाण केले. त्या अल्पवयीन नातवाच्या नावाने तंजावरच्या कारभाऱ्यांनी विजापुराकडे मदत मागितली. विजापूर दरबाराने एकोजीराजा बंगळूरच्या जागिरीवर होता त्याला हुकूम पाठवला की, 'चोक्कनाथ नायकाने तंजावरच्या नायकावर स्वारी करून तंजावरास वेढा दिला आहे, तरी तुम्ही देखतपत्र सैन्यानिशी जाऊन चोक्कनाथ नायकास हाकलून द्यावे आणि तंजावरची खंडणी फार दिवस तुंबली आहे, ती राजास नजरबंदीत ठेवून वसूल करून पाठवावी आणि त्या खंडणीतून आपला खर्च काढून घ्यावा.' या हुकुमानुसार एकोजीने फौजेनिशी तंजावरावर स्वारी केली. रस्त्यात अरणीचा किल्ला हस्तगत केला आणि तंजावरातून चोक्कनाथास घालवून देऊन, खंडणीसाठी लष्करी पहारा बसवून आपण कोलरूनच्या अलिकडे त्रिमलवाडी येथे छावणी करून राहिला. याच छावणीत असताना त्याला सन 1674 साली पुत्र झाला, त्याचे नाव सरफोजी होय.

पुढे विजयराघवाचा नातू व त्याचे भाईबंद यांजमध्ये तंटे सुरू होऊन विजापूरची खंडणी जाईना, तेव्हा दरबारातून पुन्हा एकोजीस हुकूम गेला की तंजावरास जाऊन तेथील बंदोबस्त नीट करावा. तदनुसार एकोजीने निवडक लोक बरोबर घेऊन गुप्त रीतीने तंजावरात प्रवेश करून तेथील सर्व प्रमुख मंडळींच्या भेटी घेतल्या व त्यांच्या सल्ल्याने तंजावरचा कारभार आपल्या हाती आणला. यात त्याने राज्यापहार केला असे म्हणता येत नाही. तंजावरास शांतता प्रस्थापित करून सुरळीत कारभार करण्यास कोणीतरी पाहिजेच होता. विजापुरातही त्यावेळी चहूकडून दंगल माजल्याने तिकडून बंदोबस्त होईना. अशा स्थितीत सर्व जाणत्या लोकांच्या विनवणीवरून एकोजीने परत बंगळुरास न जाता तंजावरासच आपले कायम वास्तव्य केले. एकोजीची इभ्रत एवढी मोठी मशहूर होती की, सर्व पक्षांनी त्यालाच प्रमुख स्थानी आणून राज्याचा बचाव केला. ''माघ शु.7 शके 1596 आनंद नाम संवत्सरी (=23.1.1675 रोजी) एकोजीने तंजावरचा राजवाडा व किल्ला आपल्या ताब्यात घेतला आणि शके 1597 राक्षस संवत्सरच्या वर्षप्रतिपदेस (=17.3.1675) नायक राजांच्या प्राचीन सिंहासनावर समारंभाने आरोहण केले. नंतर आदिलशहाकडे नजराणा पाठवून त्याची संमती एकोजीने मिळवली. तेव्हा आदिलशहाकडून त्याला तंजावरची जागीर वंशपरंपरेने दिल्याची सनद व बहुमोल पोषाख आला.[116] या व्यवहारात व्यंकोजीच्या तर्फेने मुख्य सूत्रे हलविणारा रघुनाथ नारायण हणमंते होय. मिळून शहाजींच्या दोन्ही पुत्रांनी दोन दिशांस एकाच आनंद संवत्सरात दोन मराठी राज्यांची प्राणप्रतिष्ठा करून राष्ट्रात आनंद फैलावला. हा इतिहासातला योगायोग अपूर्व व स्मरणीय आहे. एकोजीने विजापूरची ताबेदारी पूर्णपणे झुगारून दिली नाही. मुसलमानांची सेवा करण्यातच त्याने धन्यता मानली. याबद्दल शिवाजींना परम खेद उत्पन्न होऊन हा नामुष्कीचा कलंक धुऊन काढण्याकरताच शिवाजींना पुढील सर्व प्रचंड

कारस्थान अंगावर घेणे भाग पडले. त्यासाठी रघुनाथपंताने काढलेली शक्कल व कुतुबशहाशी जोडलेला स्नेह ही केवळ मुख्य उद्देश तडीस नेण्याची साधने होत. हे सूत्र लक्षात ठेवून पुढील घडामोडींचे निरीक्षण केले पाहिजे. शिवाजीराजांचे राज्य सन 1818 पर्यंत किंबहुना सन 1848 पर्यंत टिकले. परंतु एकोजींचे राज्य अनेक गंडांतरे भोगून सन 1855 मध्ये डलहौसीचे हातून खालसा झाले, हा कालमहिमा होय.

प्रकरण 12 - रायगडाहून जिंजीवर

(सन 1677)

1.रघुनाथपंत हणमंत्यांची शिष्टाई; 2.'कोप्पल' म्हणजे दक्षिणचा दरवाजा काबिज; 3.भागानगरास कुतुबशाही संमेलन; 4.श्रीशैलमल्लिकार्जुन, जिंजी, वेलोर; 5.बंधू एकोजी, गृहकलह बरा नव्हे.

1) रघुनाथपंत हणमंत्यांची शिष्टाई (सन 1676) :-

तंजावरास एकोजीचा कारभार रयतेस सुखाचा व शांततेचा गेला. त्याचे तंजावरचे बस्तान बसविण्यात रघुनाथपंत हणमंते प्रमुख होते. महाराष्ट्रात शिवाजीराजांचा उद्योग वाढत गेला, त्यासच पुष्टी देऊन पंतांनी कर्नाटकात मराठ्यांची सत्ता दृढ केली. असे करताना ते आपला शह एकोजीवर बसवीत, तो त्यास सहन झाला नाही. कदाचित शिवाजीराजांना कर्नाटकात आणून एकोजीला दाबण्याचा पंताचा प्रयत्न चालला असावा. बहुधा शिवाजीराजांचे व पंताचे अंतस्थपणे संगनमत असून रायगडास राज्याभिषेक समारंभ झाल्यावर छत्रपती असा एकच, इतरांनी त्याचे आज्ञेत वागले पाहिजे, असे राजकारण चालून त्याचा सुगावा एकोजीस लागल्यामुळे उभयतांचे बिलकूल पटेनासे झाले. पंताने व्यंकोजीस दटावले, 'आमची बडदास्त दुसरे ठिकाणी होणार नाही. असे आपण म्हणाल तर आज्ञा द्यावी, प्रत्यक्ष दाखवू.' असे शब्द पंताने एकोजीपुढे उच्चारले, त्यावरून क्रोध येऊन एकोजीने विडे आणवून पंतास रजा दिली. पंतही मुजरे करून काशीयात्रेस जाण्याच्या निमित्ताने कुटुंबासह निघून शहराबाहेर डेरे देऊन राहिला आणि विचार करता त्याने असे ठरविले की, 'विजापूरची पडती कळा आहे,' कुतुबशहाचा कारभार मादण्णापंत शहाणपणाने हाकलत आहे. तर आपण शिवाजीराजांकडे जाऊन त्यांना घेऊन कर्नाटकात यावे आणि सर्वत्र एकछत्री मराठ्यांचे राज्य चालू करावे. असा विचार मनात ठरवून तो प्रथम विजापुरास गेला व तेथील हालहवाल पाहिल्यावर पुढे भागानगरास जाऊन मादण्णापंतास भेटला. पंताची विद्वत्ता पाहून मादण्णाचे मनात त्याचेबद्दल आदर उत्पन्न झाला. एकांतात भेटी होऊन बोलणी झाली. पुढे उभयतांनी कुतुबशहाची गाठ घेऊन त्याचेपुढे सर्व राजकारण पंताने फारसी भाषेत इतके उत्तम वठवले

की, 'शिवाजीराजांना येथे भेटीस आणा' अशी पंतास शहाने आज्ञा केली. तेथून रघुनाथपंत निघाला तो पन्हाळ्यास येऊन शिवाजीराजांना भेटला. त्यावेळी शिवाजीराजे नुकतेच आजारातून उठले होते. चंजावरास 'भाऊवाटणी' मागण्यास स्वारी जाणार असा लौकिकात पुकारा करून रायगडास जाऊन सर्वांच्या विचारे कर्नाटकचे हे नवीन व साहसाचे कारस्थान त्याने अंगावर घेतले. या स्वारीचे रसभरीत वर्णन शिवदिग्विजय बखरीत दिलेले आहे.

हा नवीन उपक्रम अंगीकारण्यास आणखी एक विशिष्ट कारण झाले ते ऐतिहासिक दृष्ट्या प्रत्यक्ष घडले नसले, तरी लोकचर्चेत आविष्कृत होते. ते असे की, 'क्षत्रियकुलावतंस छत्रपति महाराज' 'सिंहासनाधीश्वर' 'गोब्राह्मण प्रतिपालक' इत्यादि मोठमोठे किताब धारण करून शिवाजीराजांनी राज्याभिषेक समारंभ तडीस नेला, पण त्यांचे राज्य पाहावे तर महाराष्ट्राच्या टीचभर भूमिभागापलिकडे नव्हते. सभोवार स्वंतत्र सत्ताधीश स्वैरपणे वावरत होते. याबद्दल शिवाजीराजांना दूषणे देणारे विरोधक काही कमी नव्हते. 'जंजिऱ्याचा सिद्दी तर प्रत्यक्ष तुमच्या राजधानीच्या दाराशी शस्त्र रोखून उभा आहे. कर्नाटकात वडिलांनी मिळवलेले राज्य सुद्धा तुमचे ताब्यात नाही. अर्थात दिग्विजय केल्याशिवाय नुसते सिंहासन स्थापून काय उपयोग! या हिणवणीस जवाब म्हणून शिवाजीराजांनी दक्षिण दिग्विजयाचे काम हाती घेतले.'[117] पण ही गोष्ट सिद्धिस जावी कशी याचा विचार करता अनेकांनी अनेक उपाय सुचवले. अशा अवघड कृत्यास कोणा सत्पुरुषाचा आशिर्वाद मिळेल तर कार्यसिद्धी हटकून होईल, असे त्याला कोणी सुचवल्यावरून सन 1676च्या दसऱ्याच्या सुमारास आसपास असे अलौकिक सिद्धपुरुष कोण आहेत याचा तपास करता कळले की, केळशी येथे 'बाबा याकूत' नावाचे कोणी लोकोत्तर साधू असून मालवणजवळ पाटगाव येथे मौनीबुवा म्हणून तसेच दुसरे पुरुष सुप्रसिद्ध आहेत. 'केळशीस बाबांचे दर्शनास जाऊन संकल्प करून काही उत्तर आशिर्वादाचे बोलावे, तो बाबा याकूत उठोन चालिले. त्यांजमागे महाराज हिंडो लागले. पायाशी लागले तेव्हा पिकला केस दाढीचा व मिशीचा बाबांनी महाराजांचे हाती दिला. त्याचा ताईत करून घालावा, तो केस हरपला, त्यावरून जंजिऱ्यास सिद्धी नाही असे बोलले. तदनंतर रामदास स्वामींचे दर्शन घेतले. ते बोलले, जंजिऱ्यास प्रयत्न लागेल. तदनंतर विजापूरचे राजकारण राखून पाटगावी मौनीबुवांचे दर्शनास गेले. मोरोपंत पिंगळ्यांचे हाती चाफ्याचे फुलांचा तुरा व हार दिला. पंचपात्री दिली. हुजऱ्यांचे हाती नारळ व फुलांचे जिन्नस दिले. मनात महाराज कल्पना करून राहिले की, आपण चंदीचे राज्यावर जातो, तर बाबांनी प्रसाद द्यावा. संकल्प करून महाराज सात तास पावेतो उभे होते. उपरांतिक पूजा केली. आपले हाती साखरेचा प्याला घेऊन बाबांचे तोंडात साखर घातली. बाबांनी तोंडातले उच्छिष्ट महाराजांचे हातावर दिले, डोईवर हात ठेवला. हा लाभ समजून

नमस्कार करून दक्षिण दिग्विजयास निघाले.' असा प्रसंग बखरकारांनी वर्णिला आहे. दोन वर्षांनी स्वारी यशस्वी होऊन परत आल्यावर मौनीबुवांचे मठास शिवाजीराजांनी नेमणूक ठरवून दिली, तिची सनद ता.3.5.1678 ची उपलब्ध आहे.

यावेळी खुद्द विजापुरात कशी यादवी माजली होती, तिचे वर्णन पूर्वी येऊन गेले आहे. गोवळकोंड्याच्या राज्याची बरीच सुव्यवस्था असून मादण्णा व रघुनाथ नारायण या दोन धूर्त मुत्सद्द्यांनी शिवाजीराजांना वश करून दक्षिण हिंदुस्थानातील हिंदुपदपातशाहीचा नवीन उद्धार करण्याचा डाव आरंभला. हा डाव उलथून पाडण्याचे सामर्थ्य एका औरंगजेबात होते आणि त्याचा पठाण सरदार दिलेरखान शिकस्त करून त्या कामी झटत होता. शिवाजीराजांना अल्पायुष्य नसते तर किंवा संभाजींचे अंगी बापाचे शहाणपण असते तर हिंदुपदपातशाहीचा हा डाव सिद्धिस गेला असता याबद्दल शंका घेण्याचे कारण नाही.

2) 'कोप्पल' म्हणजे दक्षिणेचा दरवाजा काबीज (जाने-मार्च1677) :-

कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांचे मधला विजापुरी प्रांत मसूदखान वजिराने शिवाजीराजांना दिला, तो कब्जात घेण्यास त्यांनी हंबीररावास रवाना केले. तिकडे अब्दल रहीमखान मियाना नावाचा विजापुरचा एक बलिष्ठ अंमलदार कोप्पलास राहून कारभार करी. हंबीरराव चालून आला तेव्हा या अब्दुल रहीमखानाचा भाऊ हुसेन मियाना कोप्पल येथे होता. या मियाना बंधूंच्या दुष्ट वर्तनाबद्दल शिवाजीराजांकडे लोकांच्या कागाळ्या फारच आल्या होत्या. 'खान फार खाष्ट आहे, याची नेक नजर नाही. जुलूम जाजती करणे, बायकापोरांस उपद्रव देणे, गोवधादि निंद्य कामे करणे. हा अविचारी, याचे हाताखाली वागण्यास आम्ही फार कंटाळलो. याजकरिता तुम्ही यश घ्या, आम्हास या दुष्टाचे हातून सोडवा. याचा संसर्ग आम्हास नको असे करा. तुम्ही म्हणाल आम्ही तुम्हास बोलावू कोठे पाठविले, तर मधुकर अरण्यात स्वेच्छेकरून विहार करतो, परंतु वायूच्या योगे सुगंध आला म्हणजे, ते स्थान सोडून सुगंधाकडे जसा जातो, तसे तुम्ही हिंदू धर्माचे स्थापक, या म्लेच्छांचे नाशक, म्हणून तुम्हाकडे आलो. तुम्हाकडे आम्ही आलो हे ऐकून आमचे द्वारी आज तीन दिवस चौकी बसवली आहे. अन्नपाण्यावाचून जीव घेण्यास उद्युक्त झाले आहेत. तरी तुम्ही पत्र पावताच रात्रीचा दिवस करून यावे.' हंबीरराव आला त्याजबरोबर लहानशीच फौज होती. तिजवर मियानांच्या फौजा चालून गेल्या. जानेवारी 1677 मध्ये लिंगसागर नजीक येल्बुर्गा येथे त्यांचा सामना झाला. 'मियाना शरीरेकरून जबर, कजाखही विशेष, हंबीररावाजवळ सरंजाम थोडा, मायण्याची जमियत मोठी, असे असताना हंबीररावाने वीज चकाकता अंध:कार दूर होऊन शुद्ध उदकधारा नजरेस येते,

तद्वत सैन्यात हलकल्लोळ होऊन खानाचे लोकांनी रस्ता देऊन, जसे वेणीचे केस दुभांग करून स्त्री वेणी घालते, तशा रीतीने हंबीररावाने हत्यार चालविताच, फळी फुटोन दुभंग केले. शेकडो मनुष्य जाता येता मारिले, खान नामोहरम होऊन पळू लागले, त्यांस धरून आणवले, सरंजाम सुद्धा सर्व लष्कर पाडाव करून आणले. हंबीररावाकडील फक्त पाच-पन्नास लोक जखमी झाले. हे वर्तमान विजापुरी गेल्यावर तिकडून मियानास सोडवण्यास आणखी फौज चालून आली. हे वर्तमान ऐकून धनाजी जाधव हंबीररावाचे मदतीस धावून आला. 'मग चहूंकडून लांडगेतोड करून बेजार करून दिले. मुक्कामी छापा घालावा, चालत्या मार्गी लांडगेवृकासारखे पाडाव करावे, याप्रमाणे विजापुरास पोहोचेपर्यंत गलबल करून दिली. आईस लेकरू, लेकरास आई ओळखीना, आपला जीव वाचला तरी सर्व काही मिळेल, परंतु पळावे असेच मनास वाटावे; पुन्हा 'मराठ्यांचे लढाईची गाठ ईश्वरा घालू नकोस' असे अंत:करणात म्हणावे. असे पराक्रम करून विजापुरी फौजांस घालवून देऊन व मियाना बंधूंना कैद करून धनाजी व हंबीरराव गोवळकोंडा येथे शिवाजीराजांना सामील झाले. धनाजींच्या शौर्याची महाराजांनी फार वाखाणणी केली. अब्दुल रहीमखानास ठार मारले तेव्हा हुसेनखानाने स्वत: कोप्पलास जाऊन किल्ला मराठ्यांचे कब्जात दिला. शिवाजीराजांनी हुसेनखानास सोडून दिल्यावर तो पुढे मोगलांचे पदरी जाऊन राहिला. औरंगजेबाने त्यास फत्तेजंगखान असा किताब दिला.[118]

3) भागानगरास कुतुबशहाशी संमेलन (फेब्रु.-जून 1677) :

रघुनाथपंताने कर्नाटकातील परिस्थितीची व धनसंपन्नतेची संपूर्ण माहिती शिवाजीराजांना दिली. एकोजीने जर तंजावर सहज हाताखाली घातले तर शिवाजींसारख्या अद्वितीय पुरुषाला अशक्य ते काय वाटणार! मोरोपंत पिंगळे व अण्णाजी दत्तो यांना महाराजांनी दक्षिणेची व्यवस्था सांगितली आणि रघुनाथपंत हणमंते, निराजी रावजी व त्याचा हुशार पुत्र प्रल्हाद निराजी यास पुढील व्यवस्थेसाठी भागानगरास आगाऊ रवाना केले. त्यांनी जाऊन शहाची भेट घेऊन त्याची खात्री केली की, 'शिवाजीराजांच्या येण्यात कोणतेही कपट नसून उलट फायदाच आहे. शिवाजीराजांना द्रव्यसाह्य केल्यास ते सर्व कर्नाटक प्रांत जिंकून कुतुबशहाचा अंमल तिकडे पूर्ववत चालू करून देतील.' असा बेत ठरून, त्याची वार्ता शिवाजीराजांना कळताच ते सन 1677 च्या जानेवारी अखेर माघ शुद्धात सुमुहूर्तावर रायगडावरून निघून राजापूर वेंगुर्ल्यावरून पूर्वेस भागानगरास गेले. बरोबर फौज पंचवीस हजार निवडक घोडेस्वार होते.[119] नेताजी पालकर, हंबीरराव मोहिते, आनंदराव मकाजी, मानाजी मोरे, सूर्याजी मालुसरे, येसाजी कंक, सोनाजी नाईक ही सरदार मंडळी, आणि हणमंते बंधू, दत्ताजी वाकनीस, केसो निळो व गंगाधरपंत पिंगळे,

पारसनीस नील प्रभू, बाळाजी आवजी, श्यामजी नाईक ही मुत्सद्दी मंडळी बरोबर असल्याची नावे आढळतात. गोवळकोंड्याची हद्द लागल्यापासून फौजेकडून कोणासही यत्किंचित त्रास होऊ नये अशी सख्त तजवीज शिवाजीराजांनी ठेवली आणि कित्येकांना शिस्तभंगाबद्दल कडक शासने केली. लांब मजला करीत शिवाजीराजे भागानगराबाहेर येऊन उतरताच शहाच्या आज्ञेने मादण्णापंत अमीर उमरावांसह भेटीस आला, त्याच्या बरोबर शिवाजीराजांनी समारंभाने शहरात प्रवेश केला. त्यांचे सर्व सैनिक उत्कृष्ट शृंगाराने सजले होते. इकडे त्यांच्या सत्कारार्थ सगळे शहर मुद्दाम शृंगारण्यात आले होते. शिवाजीराजांची ही अपूर्व स्वारी पाहण्यास तमाम नगर बाहेर लोटले. दादमहालात स्वारी दाखल होताच लवाजमा बाहेर ठेवून शिवाजीराजांनी पाच आसामी बरोबर घेऊन वाड्यात प्रवेश केला. दरबारच्या दालनाचे प्रवेशद्वारात शहाने पुढे येऊन आलिंगनपूर्वक भेटून त्यांना आपल्याजवळ बसवले. हे दोघे व मादण्णा खेरीज करून बाकी सर्व दरबारी उभे होते. भेटीचा एकंदर कार्यक्रम उभयतांना बरोबरीच्या नात्याचा झाला. एकमेकांकडील प्रमुख मंडळींच्या ओळखी करून देण्यात आल्या. अफजलखान, शायिस्ताखान इत्यादि सरदारांचा धुव्वा उडविणारे, सुरतेची सुरत हरविणारे, खुद्द औरंगजेबास दहशत घालणारे हे शिवाजीराजांचे वीर पाहून सर्वांना मोठी धन्यता वाटली. शहाने महाराजांना खासे विडे स्वहस्ते दिले, त्यांच्या सरदारांची नावाजणी करून वस्त्रे, घोडे, हत्ती, कंठ्या, शिरपेच, तुरे व हत्यारे देऊन गौरव केला.

उभय राजपुरुषांची ही पहिली भेट तीन तास पावेतो चालली. एक-एक अद्भुत पराक्रम आपण कसे केले याची मनोरम कहाणी खुद्द शिवाजीराजांच्या तोंडून सोत्कट भावनेने शहाने ऐकून घेतली. ज्याला जन्मात जनानखान्याच्या बाहेर फिरकण्याचे साहस ठाऊक नाही त्याला शिवाजीराजांचे हे पराक्रम ऐकून नवीनच सृष्टि दिसली असल्यास नवल नाही. भेटीच्या पूर्वी त्याच्या अंत:करणात जी धडधड भरली होती, ती पुढे साफ मावळून गेली. असो. तेथून परत जाताना शिवाजीराजे रस्त्याने गरिबांना द्रव्य उधळीतच मुक्कामावर गेले.

दुसऱ्या दिवशी मादण्णाने शिवाजीराजांना व त्यांच्याबरोबरच्या प्रमुख मंडळींना मेजवानी दिली. मादण्णाच्या आईने स्वहस्ते स्वयंपाक करून शिवाजीराजांना वाढला. जवळ मादण्णा व आकण्णा हे बंधू गोष्टी करीत बसले. भोजनोत्तर नजर-नजराणे होऊन ते पाहुणे मुक्कामावर गेले. नंतर उभयपक्षी वाटाघाट होऊन गुप्त करार ठरला की, शहाने ‘शिवाजीराजांना दररोज तीन हजार होन फौजेच्या खर्चासाठी द्यावे, मिर्झा महंमद अमीन याचेबरोबर भागानगरची पाच हजार फौज व तोफखाना शिवाजीराजांचे मदतीस पाठवावा आणि शिवाजीराजांनी कर्नाटकचा प्रांत जिंकून त्यापैकी पूर्वी शहाजींनी हस्तगत केलेला तेवढा स्वत:कडे ठेवून बाकीचा कुतुबशहास द्यावा. तसेच उभयतांनी मिळून मोगल हल्ल्याचे निवारण करावे आणि त्यासाठी शिवाजीराजांचा एक वकील कायमचा भागानगरास राहावा. याशिवाय सालाचे एक लाख होन शहाने शिवाजीराजांना

खंडणीदाखल द्यावे. हा तह घाटत असताना इतर पाहुणचार व सत्कार चालूच होते. शहाने सर्व मराठी फौजेची पाहणी करून सलामी घेतली. भागानगरच्या सरदारांनी शिवाजीराजांना मेजवानी दिली. एकेदिवशी येसाजी कंकाने मस्त हत्तीशी सामना करून त्याची सोंड कापून काढली. शिवाजीराजांनी उलट मेजवान्या व नजराणे देऊन सर्वांना संतुष्ट केले. बाजी सर्जेराव व येसाजी कंक यांचेबरोबर शहाच्या फौजा देऊन त्यांना शिवाजीराजांनी पुढे कर्नाटकात तवाना केले आणि स्वत: महाराज सुमारे पाऊण महिना भागानगरात राहिल्यावर फाल्गुन शुद्धात पुढे निघाले. भागानगराहून मालोजी घोरपड्याला शिवाजीराजांनी लिहिलेले पत्र छापले आहे, त्यात त्यांचे एकंदर उद्देश व स्वधर्मोद्धाराचे विचार चांगल्याप्रकारे नमूद झाले आहेत.

4) श्रीशैलमल्लिकार्जुन, जिंजी, वेलोर (एप्रिल-जून 1677) :

हैद्राबाद सोडून शिवाजीराजे थेट दक्षिणेस कृष्णा तुंगभद्रा यांच्या संगमावर गेले. त्या जागेस निवृत्तिसंगम म्हणतात. त्या ठिकाणी व तेथून खाली थोड्या अंतरावर चक्रतीर्थ नावाचा मोठा भोवरा आहे, त्यात स्नान करन शिवाजीराजांनी दानधर्म केला. कर्नूल शहरातून त्यांच्या लोकांनी पाच लाख होन खंडणी घेतली. बरोबरची मुख्य फौज पुढे अनंतापुरास पाठवून महाराज थोड्या लोकांनिशी श्रीशैलमल्लिकार्जुनाचे स्थान ईशान्येस 37 मैलांवर आहे त्याचे दर्शनास गेले. या ठिकाणी कृष्णा कैक मैलपावेतो दोन उंच डोंगरांच्या दरीमधून खोल वाहत जाते. मंदिराचे प्रवेशद्वारास कैलासद्वार म्हणतात. मंदिराचे प्रकारावर उत्कृष्ट नक्षीचे दगडी काम आहे. हे मंदिर इ.स. 1513 मध्ये कृष्णदेवरायाने दुरुस्त केले. टेकडीवरील मंदिरापासून खाली पंधराशे फुटांवर कृष्णेचे पात्र आहे. तेथपावेतो दगडी पायऱ्या कोरलेल्या असून, त्या पात्रास पाताळगंगा म्हणतात. या निसर्गरम्य शांत देवस्थानात प्रवेश करताच शिवाजीराजांच्या अंत:करणात एवढी उपरति झाली की सर्वसंग परित्याग करून येथेच कायमचा वास करण्याचे त्यांनी योजले. या त्यागवृत्तीपासून जवळच्या मंडळींनी मोठ्या प्रयासाने त्यांचे मन वळवून पुढील कर्तव्यास त्यांना प्रवृत्त केले. दहा दिवस या रम्य स्थळी राहून, मोठा दानधर्म करून, नदीवर श्रीगंगेश नावाचा एक सुंदर घाट, धर्मशाळा वगैरे बांधण्याची तजवीज करून, एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात म्हणजे चैत्र पौर्णिमेच्या सुमारास अनंतापूर येथे शिवाजीराजे मुख्य फौजेस येऊन मिळाले. तेथून नंदियाळ, कडप्पा या ठिकाणांवरून ते तिरुपति बालाजींचे दर्शन घेऊन कालहस्तीच्या वाटेने मद्रासचे आसमंतात मे महिन्याच्या आरंभी दाखल झाले. तेथून ता.9 मे रोजी 5000 स्वार कांचीवरून त्यांनी जिंजीवर रवाना केले. जिंजीचा विजापुरी किल्लेदार नसीर महंमदखान याला शिवाजीराजांचा अधिकारी किल्ल्यात जाऊन भेटला आणि दरसाल

पन्नासहजारांची जागीर त्यास देण्याचे ठरवून त्याने किल्लेदारास वश केले. लगेच मागाहून शिवाजीराजे तेथे आले आणि किल्ला कब्जात घेऊन रायाजी नलगे यास किल्लेदार नेमले आणि विठ्ठल पीलदेव अत्रे गराडकर याला किल्ल्याखालील प्रदेशाची सुभेगिरी सांगितली. त्याने महाराष्ट्राप्रमाणे जमीनधाऱ्यांची व्यवस्था त्या प्रांतात सुरू केली. जिंजी किल्ल्याची डागडुजी व लष्करी व्यवस्था शिवाजीराजांनी अल्पावधीत इतकी परिपूर्ण केली की पाश्चात्त्यांसही तिजबद्दल अचंबा वाटला.

जिंजी किल्ला निसर्गत:च दुर्गम होता. शिवाजीराजांनी त्याची पुन्हा विशेष डागडुजी केली. पहिले तट पाडून नवे तट व बुरूज अशा कौशल्याने बांधले की, ते काम अजब आहे अशी मनाची खात्री पटल्याशिवाय रहात नाही. कित्येक जुने निरुपयोगी किल्ले पाडून नवे बांधले, त्यातले काही भुईकोट व काही डोंगरी होते. त्यांनी डोंगरातले मोठाले खडक फोडले, तलाव बांधले आणि नवीन युद्धोपयोगी इमारती उभारल्या. त्या कामी त्यांनी अपरंपार खर्च केला.[120]

विजापूरचे तीन अधिकारी शिवाजीराजांना मद्रासच्या बाजूस विरोध करण्यासारखे होते. एक पूर्वीच्या खान महंमद वजिराचा मुलगा नसीर महंमद जिंजीचे किल्ल्यावर होता, हे वर सांगितलेच आहे. दुसरा, त्रिचनापल्लीच्या उत्तरेस सुमारे तीस मैलांवर वलिगंडपूरम् येथे राहणारा विजापुरी पठाण सरदार शेरखान लोदी बराच प्रदेश हस्तगत करून प्रतिष्ठितपणे नांदत होता. तिसरा सरदार अब्दुल्लाखान वेल्लोर येथे मजबुदीने राहत होता. या तिघांशी शिवाजीराजांना युद्धप्रसंग करावे लागले. यांपैकी शेरखानच काय तो विशेष महत्त्वाकांक्षी असून, पाँडिचेरीहून फ्रेंचांची मदत घेऊन प्रसंगी गोवळकोंडाही हस्तगत करून समग्र दक्षिण भागात पठाणशाही निर्माण करावी अशी महत्त्वाकांक्षा धारण करीत होता.[121]

जिंजीहून शिवाजीराजे वायव्येस ता. 23 मे रोजी वेल्लोर येथे गेले. त्या किल्ल्यावर अब्दुल्लाखान म्हणून विजापुरी अधिकारी होता. दक्षिण हिंदुस्थानात अत्यंत मजबूत असा हा किल्ला हस्तगत करण्याची महाराजांना मोठी उत्कंठा लागली, पण अब्दुल्लाखानाने शौर्याने लढून किल्ल्याचा बचाव चालवला. महाराजांनी किल्ल्याला वेढा घालून नजीक दोन टेकड्या बाहेर होत्या, त्यांजवर नवीन किल्ले बांधून त्यांना साजरागोजरा असे नाव दिले आणि त्यांवरून तोफांचा मारा वेल्लोरच्या किल्ल्यावर सुरू केला. स्थळ लवकर हाती येण्याचे लक्षण दिसेना, तेव्हा नरहर रूद्र सबनीस याला वेढ्याचे काम सांगून ता. 20 जूनच्या सुमारास महाराज दक्षिणेस शेरखान लोदीवर चालून गेले. मागाहून चौदा महिन्यांनी दि.22.7.1678 रोजी वेल्लोरचा किल्ला महाराजांना हस्तगत झाला. वास्तविक अशा एक-दोन स्थळांशिवाय एवढ्या प्रचंड भूप्रदेशात महाराजांना अन्यत्र विरोध असा बहुधा दिसून आलाच नाही. कारण कोणाही एका सामर्थ्यवानाचा अंमल त्या बाजूस मुळीच बसला

नव्हता. शिवाजींच्या नावाचा दरारा एवढा होता की लोक जीव वाचवण्यासाठी घरे-दारे मोकळी सोडून जंगलातून व ज्यास जसे सुचेल तिकडे आश्रयार्थ गेले. धनाढ्य लोक कोण कोठे आहेत याची शिवाजीराजांना आगाऊ वर्दी असे. त्यांचेबरोबर हेरांचा व हिशेबी कारकुनांचा भलामोठा तांडा असून त्यांचा उपयोग महाराजांनी माहिती मिळविण्यास व प्रांतात आपला अंमल बसवण्यास केला.

इतक्यात शेरखान लोदी आपल्या जवळची होती-नव्हती तेवढी फौज जमा करून शिवाजीराजांशी सामना करण्यास उत्तरेस वलिगंडपुराहून कडलूरजवळ चालून आला. ता.26.6.1677 रोजी तिरुवादी येथे शिवाजीराजांच्या फौजेची व त्याची दृष्टादृष्ट झाली. पण मराठ्यांपुढे आपला निभाव लागेल असे न वाटून शेरखान मागे हटू लागला. तेव्हा महाराजांनी पाठलाग करून त्याचा फन्ना उडवला आणि तेन्गापटण, भुवनगिरपट्टण, व्हाल्डौर वगैरे त्याची ठाणी हस्तगत केली. अशा रीतीने शेरखानाचा चहूकडून कोंडमारा होताच तो शरण आला. ता.5.7.1677 रोजी भेटीस येऊन त्यान वीसहजार होन दंड व ताब्यातला प्रदेश शिवाजीराजांचे हवाली करण्याचे कबूल केले आणि आपला मुलगा ओलीस देऊन आपली सुटका करून घेतली. तदनंतर तो आरियलूर येथील निबिड जंगलात जाऊन गुप्तपणे एका जमीनदाराच्या आश्रयास राहिला. या जंगलातून त्याने पाँडिचरी येथे मार्टिन बरोबर गुप्त व्यवहार ठेवले, त्याचे भरपूर वर्णन फ्रेंच कागदात आहे. सन 1678 च्या फेब्रुवारीत दंडाची रक्कम भरल्यावर मुलाची सुटका झाली, त्यास घेऊन शेरखान पुढे मदुराई येथील नायकाच्या आश्रयास जाऊन राहिला. कर्नाटकच्या सुभेगिरीवर शिवाजीराजांनी आपला जावई हरजी महाडिक याला नेमले. त्याने हा कारभार कैक वर्षे दक्षतेने केला.

जुलैचे आरंभी शेरखानाचा तह होताच शिवाजीराजे बंधूस भेटण्यासाठी दक्षिणेस तंजावरकडे कूच करून, कोलरून नदीच्या काठी तिरुमलवाडी येथे छावणी करून उतरले. हे गाव तंजावरचे उत्तरेस दहा मैलावर आहे. ता. 12.7.1677 पासून पंधरा दिवस त्यांचा मुक्काम तिरुमलवाडीस झाला.

5) बंधू एकोजी, गृहकलह बरा नव्हे :

सर्व प्रांतात आपली सार्वभौम सत्ता स्थापन करायची, भावाने मांडलिकी नात्याने आपल्या आज्ञेत चालावे, हा शिवाजीराजांचा उद्देश पुढील व्यवहारात लक्षात ठेवणे जरूर आहे. त्यांचा मुक्काम तिरुमलवाडी (तिरुवाडी-त्रिवाडी) येथे कोलरून नदीच्या काठी होता. यापुढील दक्षिणेच्या प्रदेशात किंवा तंजावरास महाराज गेलेच नाहीत. त्रिवाडी येथे मदुराईच्या चोक्कनाथाने आपला वकील शिवाजीराजांकडे पाठवला, त्याचेपाशी

शिवाजीराजांनी भलीमोठी खंडणी मागितली आणि रघुनाथपंतास बरोबर देऊन वकिलास नाइकाचे भेटीस पाठवले. तेथे पुन्हा खंडणीची मागणी केल्यावर चोक्कनाथाने सहा लाख होन देण्याचे कबूल केले. याचवेळी शिवाजीराजांनी एकोजीस पत्र पाठवले की, 'तुमची आमची भेट जन्मापासून नाही, भेटीचा हेतू धरून देशीहून आलो. तरी भेटीस येणे.' त्यावरून एकोजीराजे व जगन्नाथपंत पेशवे फौजेसहवर्तमान भेटीस आले. शिवालयी भेटी झाल्या. बहुत लोभे नित्य एकेताटी भोजन एकांती बसोन भाषण वाद जाले.[122] श्रावणशुद्धात एकोजी शिवाजींचे मुक्कामावर येऊन सुमारे एक आठवडा झाला; परंतु खुलासेवार बोलणे काहीच न करता मनात कुढत राहिला आणि कदाचित शिवाजीराजा आपणास अटक करील अशी भीति वाटून, एके दिवशी रात्री गुप्तपणे कावेरी नदीत तराफ्यावर चढून पुरातून पलिकडे तंजावरास निघून गेला. या संबंधाने जेधे शकावलीचा उल्लेख असा आहे - 'श्रावणमासी बंधूंची भेट जाली. परस्परे कीत[123] पडोन येकोजी राजे न पुसता पळोन तंजावरास गेले. त्यावरी स्वामींनी त्यांचा प्रदेश जगदेवगड, चिदंबरम्, वर्धाचलम् हा प्रांत कुल घेतला आणि कोलारास वेढा घातला.'

एकोजींच्या मनात शिवाजीराजांबद्दल आदर किंवा पूज्यबुद्धी नसून उलट भीति मात्र अतोनात होती. एक तर सावत्र बंधू; त्याची आई तुकाबाई बापाची आवडती. बापाचे पश्चात एकोजीने विजापुरच्या तर्फेने सावंतवाडी व घाटावरील प्रदेशात शिवाजीराजांशी कैक वेळा उघड सामना केला होता. अशा स्थितीत शिवाजीराजांशी भेटीत काय बोलावे व त्यांची कशी समजूत काढावी हेच त्यास सुचेना.

समक्ष भेटीत एकोजीने मोकळ्या मनाने शिवाजीराजांची समजावणी केली नाही. शिवाजीराजांनी वारंवार सांगावे की, 'वडिलांचे संपादिल्या अर्थाचे उभयताही विभागी; तुम्ही आम्हास काहीच न कळवता आपले विचारांनी वहिवाट केली. तुम्ही संपादल्या दौलतीत आम्ही विभाग मागत नाही. तुम्हास ईश्वराने सामर्थ्य द्यावे; नवीन संपादावे. परंतु वडिलांचे जोडीचे अर्थात आमचे विचाराविाय करणे चालणे तुम्हास विहित नाही. काय दौलत आहे त्याचे कागदपत्र समजवावे. तुम्ही आम्ही समजून चालू. तुम्हास जड पडेल तेथे आम्ही मदत देऊ. कोणेविशी मनात खतरा ठेवू नये.' एकोजीने 'आज्ञा प्रमाण,' या शब्दांपलीकडे कर्तव्याकर्तव्यतेचे बोलणे काढले नाही. अशाप्रकारे भेटीत खुलासा न करता एकोजी चिडखोरपणा दाखवून परत गेला. नंतर या बंधूंचे व्यवहार सलोख्याने न मिटता हातघाईवर कसे आले, त्याचे दिग्दर्शन खालील संवादात व्यक्त होते.

शिवाजी : हल्ली त्रिवर्ग पाठवले आहेत. दौलतीचे वाट्याचा यांजजवळ निकाल करून द्यावा. न दिल्यास वाटा सुटणार नाही, द्यावा लागेल. तुम्ही विचारांनी चालल्यास कमी-जास्तीचा विचार घरातील आहे.

एकोजी : वडील असता शिवाजीमहाराजांनी बंडपणा पादशहाशी केला. तमाम मुलूख घेतला, त्यामुळे वडिलांस कित्येक प्रकारे इजा झाली. आम्ही वडिलांजवळ तंत्र देऊन राहिलो, त्यामुळे बादशहांनी दौलत रक्षिली. वाटा देणे ही वतनदारी तरी नाहीच. वतनबाब असेल त्याचा वाटा घ्यावा. चाकरीची दौलत सर्व विजापुरचे शहाची; आम्ही शहाचे चाकर; त्यांचे हुकुमाचे मालक; यात तुमचा संबंध नाही.

एकोजीने हा जबाब मुसलमान सल्लागारांच्या शिकवणीने दिला. शिवाजीराजांचा पाडाव करण्याविषयी मदुराई व म्हैसूर येथील नायकांचा मनोदर असून त्यांनीही एकोजीस विशेष भर दिली. तेव्हा प्रसंगी शिवाजीराजांशी दोन हात करण्याचा निश्चय एकोजीने मनाशी ठरवून विजापूरचे दरबारी ही हकिगत लिहून कळवली. विजापुराहून एकोजीस पाठींबा मिळाला नाही. 'उलट कलह वाढवू' नये अशी ताकीद आली. विजापूरची परिस्थितीच यावेळी शिवाजीराजांना दुखविण्यास अनुकूल नव्हती. परंतु एकोजीने मुसलमान सल्लागारांच्या नादी लागून शिवाजीराजांशी गोडी करण्याचे सोडून दिले. अशा स्थितीत बंधूचा व्यवहार बहिर्जी, हंबीरराव मोहिते[124] याजकडे सोपवून महाराज 27 जुलै (श्रावण शुद्ध 8) रोजी त्रिवाडी सोडून परत निघाले. दक्षिणेत व विजापुराकडे भानगडी उपस्थित झाल्याची बातमी आल्यामुळे त्यांना पुढे कर्नाटकात जास्त राहण्याची सोय नव्हती. कावेरी नदीपलीकडे बंधूंवर चालून जाणे लौकिकात गैर आणि युद्धप्रसंगाशिवाय सामोपचाराने आपली छाप बसविण्याची त्यांची पद्धत, वगैरे कारणांनी स्वत: परत जाणेच त्यांना युक्त वाटले. कोलार, होसकोट, बंगळूर, बालापूर, शिरे वगैरे कावेरीच्या उत्तरेस जितका एकोजींचा प्रदेश होता तितका सर्व त्यांनी हस्तगत केला. तिरुवाडीच्या उत्तरेस 50 मैलांवर वृद्धाचलम् नावाचे शिवालय आहे, त्या ठिकाणी दोन दिवस राहून देवदर्शन केले. (ऑगस्ट 1-2); आणि पुढील दोन महिने आजूबाजूची स्थळे हस्तगत करून खंडण्या जमविण्यात व मुलकी व्यवस्था नेमून देण्यात घालवून, 'कार्तिकमासी स्वामी कर्नाटकातून गदग प्रांतास आले. बेलवडीस वेढा घातला. मागे याच मासात 'येकोजी राजे हंबीररावांवर चालून आले (16.11.1677), झगडा झाला; एकोजीची तीन हजार घोडी व हत्ती पाडाव केले. मग कोलार कोट एकोजीने देऊन सला केला. ही लढाई बालगोंडपूर येथे होऊन एकोजीचा पूर्ण पराभव झाला. संताजी राजे व रघुनाथपंत हे हंबीररावांच्या बाजूने लढाईत होते. शिवाजी डबीर आणि शहाजींच्या नाटकशाळेचे पुत्र प्रतापजी व भीवाजीराजे पाडाव होऊन हंबीररावांचे कब्जात आले.' हा प्रकार शिवाजीमहाराजांना महाराष्ट्रात परत आल्यावर कळला, तेव्हा त्यांनी बंधूंची समजूत काढण्यासाठी पत्रे लिहिली, ती बाळाजी आवजीच्या हातची महत्त्वाची आहेत. त्यांवरून या स्वारीतील व्यवहारांचा उलगडा चांगला होतो.[125] ती पत्रे अशी :-

ता.1.3.1678

श्री महादेव॥

श्री सहस्त्रायु चिरंजीव अखंडितलक्ष्मीअलंकृत राजेश्रिया विराजित राजमान्य राजश्री येकोजी राजे प्रति राजेश्री शिवाजी राजे, आशिर्वाद. येथील क्षेम जाणोन स्वकीय कुशल लेखन केले पाहिजे. उपरी. कैलासवासी साहेबी कैलासवास केला, त्यास आजी तेरा वर्षे जाली. महाराजांचे पैके व जडाव व हत्ती व घोडे व मुलुख अवघेही राजेश्री रघुनाथपंती तुम्हाला राज्यावर बैसवून संपूर्ण राज्य तुमचे हाती दिले. ऐशियास आमचा अर्धा वाटा तेरा वर्षे तुम्हीच खादला. आम्ही जरी तुम्हाजवळी मागावे, तर बहुत दूर होतो. बऱ्या बोले तुम्ही देणार नव्हां. म्हणून तेरा वर्षे सबुरी केली. मनामध्ये ऐसा विचार केला की 'बरे, महाराजांचे पुत्र तेही आहेत. खाती तोवरी खात. मालाचे धनीच आहेत. जे समयी आम्हाला फावेल, ते समयी आम्ही वेव्हार सांगोन घेऊ.' असे मनी धरोन होतो. ऐशीयास राजकारणप्रसंगे आम्ही कुतुबशहाचे भेटीस भागानगरास गेलो. तेथून कर्नाटकात गेलो. चंजीस आलो. चंजी घेतली व येलूरतर्फेचा मुलुख घेतला व शेरखानास झगड्यात मोडून गर्देस मेळविले. शेरखानाचे हाती मुलुख होता तेवढाही घेतला. त्यावरी मजल दरमजल कावेरीतीरास गेला. तेथून तुम्हाला पत्रे लिहिली, की राजेश्री गोविंदभट गोसावी व राजश्री काकाजीपंत व राजेश्री निळोबा नाईक व राजेश्री रंगोबा नाईक व तिमाजी यख्तियार राऊ असे भले लोक आम्हापासी पाठविणे, म्हणून तुम्हाला बहुतां रीती लेहून पाठविले. त्यावरून तुम्ही सदरहू भले लोक आम्हापाशी पाठवून दिले. त्या भल्या लोकांशी बहुता रीती घरोबियाचा व्यवहार सांगून आमचा अर्धा वाटा आम्हास बऱ्या बोले द्या म्हणून सांगून पाठविले व त्यांबराबरी राजेश्री बाळंभट गोसावी, राजेश्री कृष्ण ज्योतिषी, व कृष्णाजी सखाजी असे आपले तर्फेने भले लोक दिल्हे. हे भले लोक तुम्हांजवळी जाऊन बहुता रीती बोलिले, की गृहकलह करू नये. आपला अर्धा वांटा मागतात तो द्यावा. असे बोलले. परंतु कपटबुद्धि तुम्ही ऐसी मनी धरिली, की या समयात आम्ही थोर राजे झालो आहो. आम्हांसी आपण खासा भेटीस येऊन हलमस्त[126] नरमी बहुत दाखवावी, आणि आमचा वांटा बुडवावा. तेरा वर्षे सारे राज्य आपणच खादले. पुढेही आपणच सारे राज्य खावे. अशी बुद्धि मनी धरून वाटियांच्या निवाडियाचा तह न करिता आपण खासाच आमचे भेटीस आलेस. यास आमची व तुमची भेट जाली. त्या उपरी आम्ही बहुतां रीती तुम्हासी बोलिलो, की आमचा अर्धा वांटा द्या. परंतु तुम्ही वांटा द्यावा हा विचार मनी धराचना. मग जरूर जाहले, की तुम्ही धाकटे भाऊ; आपण होऊन आमचे भेटीस आलेत, यास तुम्हाला धरावे आणि वाटा मागावा ही गोष्ट थोरपणाचे इजतीमध्ये लायख नव्हे. या निमित्त तुम्हाला चंजाउरास जावयाचा निरोप दिला. तुम्ही चंजाउरास गेलेसी.[127] त्या उपरी गृहकलह वाढवू नये, वाढविल्याने पहिले युगी पांडव कौरव बहुत-बहुत कष्टी झाले, ते सारी महाभारताची कथा मनात आणून गृहकलह वाढविलियात उभय पक्षी कष्टी होईजेत. असे जाणून राजश्री शामजी नाईक व कान्हेरीपंत

व शिवाजी शंकर या हाती मागते बहुतां रीती सांगून पाठविले की, तुम्ही व आम्ही वाटे करून घेऊ; परस्परे समाधाने राहूं. परंतु तुम्ही दुर्याधनासारखी दुष्टबुद्धि करून संधि न करावा, युद्ध करावे ऐसेच मनी धरिले. ऐशियास आम्हाला रायगड प्रांते बहुत काही कार्य होते. या निमित्ते चिरंजीव संताजी भोसले व राजेश्री रघुनाथपंत व राजेश्री हंबीरराव असे ते प्रांती ठेवून आम्ही स्वार होऊन तोरगळ[128] प्रांतास आलो. तेथे अशी खबर ऐकली की, तुम्ही तुरक लोकांच्या बुद्धीस लागून, आमचे लोकांशी झगडा करावा असे मनी धरून आपली सारी जमेत एकवट करून आमचे लोकांवर पाठवून दिलेत. ते बालगोंडपुरास आले. तुमचे लोक चालून आल्यावर तुमचे-आमचे लोकांत थोर झगडा झाला. तुमचे लोक पराजय पावले. प्रतापजी राजे व भीवजी राजे[129] व शिवाजी डबीर असे तिघे धरिले, व कितीएक लोक मारिले. कितीएक लोक पळून दाणादाण होऊन गेले. ऐसा समाचार ऐकिला. हे ऐकून बहुत नवल असे वाटले की, कैलासवासी महाराज, त्यांचे तुम्ही पुत्र, बहुत थोर लोक, ऐसे असून काही विचार करीत नाही व धर्माधर्म विचारीत नाही. असे असताना कष्टी व्हाल याचे नवल काय? तुम्ही म्हणाल की काय विचार करावा? तरी ऐसा विचार करावा होता की, अधर्मेकरून तेरा वर्षे आपण सारे राज्य खादले ते खादले; आता अर्धा वाटा मागतात तो त्यांचा त्यांस द्यावा, आणि आपण सुखी राहावे, ऐसा विचार करावा होता. दुसरा विचार करावा होता, की श्री देवाची व श्रींची कृपा त्यांवरी पूर्ण झाली आहे. दुष्ट तुरुकाला ते मारतात. आपल्या सैन्यात तुरक लोकच असता जय कैसा होता, आणि तुरक लोक कैसे वाचू पाहतात. हा विचार करावा होता; आणि युद्धाचा प्रसंग पाडावा नव्हता. परंतु दुर्योधनासारखी बुद्धि करून युद्ध केले आणि लोक मारविले. जे जाहले ते जाहले. पुढे तरी हट्ट न करणे. तेरा वर्षे तुम्ही सारे राज्य खादले ते खादले. या उपरी कितेक आमचे आम्ही घेतले असे. अरणी, बंगलुरु, कोलार, होसकोट, सिरलकोट, किरकोळ जागे व चंजाऊर असे जे जागे तुमचे हाती उरले आहेती, ते आमचे लोकांचे हाती देणे; आणि नगद पैके व जडाव व हत्ती व घोडे यांचा अर्धा वाटा देणे. ऐसा विचार करून आम्हाशी संधि करणे. तुम्ही ऐसा संधि निर्मलपणे केलीया आम्ही आपणापासून तुम्हाला तुंगभद्रे अल्याड पन्हाळे प्रांते तीन लक्ष होनांची दौलत देऊन, अथवा आम्हाजवळील दौलत तुम्हाला मानेना, तरी कुत्बशहास अर्ज करून त्यापासून तुम्हास तीन लक्षांची दौलत देऊ. असे दोनही विचार तुम्हाला लिहिले आहेत. या दोनही मधील एक मनी धरून मान्य करणे. हट्टाचे हाती न देणे. आपल्यात आपण गृहकलह करावा आणि कष्टी व्हावे याचे काही प्रयोजन नाही. या उपरी तरी आमचा आपला संधि व्हावा असे बुद्धि मनी धरून वाटियाचा व्यवहार निर्गमून टाकणे आणि सुखे असणे. गृहमलह बरा नव्हे. आम्ही रीतीने वडिलपणे आजवरी तुम्हाला सांगितले. आताही सांगतो. ऐकाल तरी बरे, तुम्ही सुख पावाल. न ऐकाल तरी तुम्हीच कष्टी व्हाल. आमचे काय चालते? बहुत काय लिहिणे... 'मर्यादेयं विराजते.'

शिवाजींचे वरील पत्र वाचून एकोजीस अत्यंत उदासीनता प्राप्त झाली. रात्रंदिवस चैन नाही. तेव्हा एकोजीची स्त्री दीपाबाई हिने त्याचे समाधान केले आणि कादरखा, हिमतखा, मनीरखा, राजेखा वगैरे मुसलमान सल्लागारांस दूर करून रघुनाथपंतास शरण जाऊन त्याजकरवी शिवाजीराजांचे समाधान करण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे रघुनाथपंतास एकोजीने लीनतेचे पत्र लिहून भेटीस बोलावले. रघुनाथपंत जिंजीहून तंजावरास जाऊन एकोजीस भेटला. एकोजीने त्याचा सत्कार चांगला केला. दीपाबाईनेही आपल्याकडून रघुनाथपंताची परोपरी विनवणी केली. तेव्हा दोघा भावांचा तह रघुनाथपंताने करून दिला. तहाचे कागदपत्र सनदा, सोडचिठ्ठ्या, वाटा, बक्षीस सुद्धा सर्व कागदपत्रे लिहून पंतांनी शिवाजीराजांकडे पाठवली आणि आपण निघून आपल्या कामावर चंदीस गेला.

रघुनाथपंताने जे लेख तयार करून शिवाजीराजांकडे पाठवले, तदनुसार शिवाजीराजांनी तहाची मान्यता दाखवून त्यास जबाब लिहिला, त्यात असा मजकूर आहे की, ‘आमची भावजई शहाणी, पुढील होष्यमाण जाणून विचारावरी आणिले; उत्तम झाले. आम्हास विभाग घेऊन तरी काय कर्तव्य? त्यांजकरिताच संपादन करणे. जनरीति म्हणून बोलणे आले? आम्हांस तरी मेळवून काय कर्तव्य. पदरची मनुष्ये यांचे चालावे, आपली कीर्ति उरावी इतका अर्थ. विचारांनी चालले असता तुम्हांस फार श्रेयस्कर आहे.’ असे म्हणून रघुनाथपंतास पत्राचा जवाब शिवाजीराजांनी लिहून बंधूच्या वागणुकीची कलमे कळवली ती येणेप्रमाणे:-

(1) सोयरे मानकरी यांचा बंदोबस्त माफक करून, अपमान होऊ न देता आदर ठेवावा, कामात वागवू नयेत. (2) दरखदार व कामदार यांचे इतल्ल्याशिवाय कामकाज होऊ नये. लौकिकात त्यांचे हाती काही नाही, असे दिसू नये. दरखात खलेल करू नये, भूषण देऊन चालवावे. (3) शागीर्दपेशा मंडळी चांगली कुलीन इमानी पाहून जवळ कृपेत ठेवावे. बातमी सर्वांठायीची राखावी, परंतु ऐकतात असे दुसऱ्यास कळू न देता जरबेत वागवून, नाजूक कामी चाकरी घेत जावी. (4) शत्रुमित्राचे ठायी संस्थानमाफक वकील व बातमीदार ठेवून दुसऱ्यास न समजता, सर्व जागेतील बातमी आणवीत असावी. (5) पागा, पथके, तोफा वगैरे कारखाने कायम व हुशारीत ठेवावे व चाकरीचा राबता नित्य ठेवावा. गाफिली येऊ देऊ नये. (6) दुष्ट, हिंदुद्वेषी यांस आपले राज्यांत ठेवू नये व बंदोबस्त राखावा. (7) लहानथोरांशी तह वगैरे करिता तोटा न पाडता गोरगरीब अनाथ यांचा अभिमान धरून चालावे. (8) देवस्थाने वगैरेचा बंदोबस्त चांगला ठेवून उच्छेद करू नये. (9) फिर्यादीचा इनसाफ तोडतांना पैशाचा लोभ न धरिता गोरगरिबांचा अभिमान धरून चालावे. (10) वचनप्रमाण झाल्यावर दंडेली करणे हे आपले कुलात झाले नाही व पुढे होऊ नये.

येथपर्यंतचे नियम सामान्य वागणुकीचे असून यापुढचे मुलुखाच्या वाटणीचे व बंदोबस्ताचे आहेत, ते असे :(11) अरणी प्रांत वेदोभास्कर[130] व त्याचे आठ मुलगे यांजकडे

चालवावा, त्यांस कोणतेही प्रकारची तोसीस लावू नये. हा वेदोभास्कर शहाजींचा विश्वासू ब्राह्मण सरदार अरणी येथे होता. शिवाजीराजांनी कर्नाटकात स्वारी केल्याबरोबर एकोजीस न जुमानता तो येऊन शिवाजीराजांना मिळाला. या कृत्याबद्दल रागास येऊन एकोजी कदाचित त्याचा सूड घेईल सबब हे कलम शिवाजीराजांनी मुद्दाम घातले. (12) विजापुरकरांचा व आमचा (शिवाजीराजांचा) वडिलांमार्फत तह ठरला, त्यात विजापुरकरांची चाकरी आपण अगर एकोजी करणार नाही, प्रसंग पडेल तेव्हा इमाने इतबारे मदत करू, त्यास अंतर पडणार नाही, इतकेच ठरलेले आहे. तरी त्याप्रमाणे पाच हजारपर्यंत फौजेची मदत विजापुरकरांनी मागितल्यास करीत जावी; चाकरी करणे असे समजू नये. तसेच नवीन पाळेगार व संस्थानिक यांजवर आपला अंमल बसला आहे तो कायम राखावा. विजापुरकरांची ताबेदारी एकोजीच्या मनातून शिवाजीराजांनी खुबीने काढून टाकली हे यावरून व्यक्त होते. (13) दक्षिणेत हिंगणी, बेरडी, देऊळगाव वगैरे ठिकाणी वडिलार्जित पाटिलक्या व वतने आहेत, त्यांजवर एकोजीने आपला हक्क सांगू नये. (14) वक्तशीर इकडील तिकडे व तिकडील इकडे कोणी माणूस, रघुनाथपंताप्रमाणे रुसून वगैरे गेल्यास, एकमेकांनी त्याचा परामर्श राखून, जिकडील तिकडे सोपवावे. (15) बेंगरुळ, होसकोट व सिलेकोट (शिरे) हे दोन लाखांचे प्रांत आम्ही जिंकिले असून ते पाच लाखांपर्यंत उत्पन्नास येतील, ते आम्ही चिरंजीव दीपाबाई 'एकोजींचे कुटुंब' यांस चोळीबांगडीसाठी दिले आहेत. त्यांजवर देखरेख एकोजीने राखावी, परंतु हक्क सांगू नये. हे प्रांत मुलीच्या वंशाकडे चालावे व सौभाग्यवती देतील त्यांनी खावेत. (16) चंदीनजीकचा आम्ही सोडविलेला सात लाख होनांचा मुलुख एकोजी राजे यांस दूधभाताकरिता म्हणून वंशपरंपरा देण्यात येत आहे. (17) कर्नाटकात एक लाख उत्पन्नाचे गाव रघुनाथपंत यांस वंशपरंपरेने देण्यात येत आहेत. त्यांनी मर्जीप्रमाणे पसंत करावे म्हणजे सनदा पाठवूं. (18) एकमेकांचे हद्दीतील चोर वगैरे गुन्हेगार दुसरे हद्दीत गेल्यास ते एकमेकांनी एकमेकांचे स्वाधीन करण्यास हरकत सांगू नये. (19) शहाजीराजे यांचे छत्रीची नेमणूक एकोजींनी उत्तमप्रकारे चालवावी.

'एकूण एकोणीस कलमे लिहिली. तुम्हास (रघुनाथपंतास) पसंत असल्यास, चिरंजीवांचे पत्रासोबत त्यांस पावती करून, समजूत द्यावी.' असा मजकूर या पत्रात आहे.

रघुनाथपंताचे पत्राबरोबर एकोजीसही शिवाजीराजांनी पत्र पाठवले. त्याचप्रमाणे रघुनाथपंताने एकोजीस सर्व प्रकार समजावून त्याचे समाधान केले. अशाप्रकारे दोघा भावांचा तंटा मिटला खरा; पण एकोजीचे स्वातंत्र्य गेल्यामुळे तो फार उदास झाला. शिवाजीराजांच्या कामगारांनी सर्व प्रांतात बंदोबस्त केला, तेव्हा एकोजीचा अधिकार जाऊन त्यास मनस्वी दु:ख झाले. त्याने खाणेपिणे सुद्धा सोडले. ते वर्तमान कळल्यावर शिवाजीराजांनी पुनरपि समाधानीचे प्रेमपत्र लिहून भावाची उदासीनता घालवली. हे पत्र

बाळाजी आवजीच्या हातचे असून शिवाजीराजांनी आपल्या मृत्युपूर्वी थोडे दिवस जानेवारी 1680 मध्ये लिहिलेले दिसते.

'श्रियासह चिरंजीव अखंडित लक्ष्मीअलंकृत राजेश्रिया विराजित राजमान्य राजेश्री महाराज एकोजीराजे प्रती राजेश्री शिवाजीराजे आशिर्वाद. येथील क्षेम जाणोन स्वकीय कुशल लेखन करणे. विशेष. कित्येक दिवस झाले, तुमचे पत्र येत नाही. याकरिता समाधान वाटत नाही. सांप्रत राजेश्री रघुनाथपंती लिहिले की, तुम्ही आपले ठायी उदास वृत्ति धरून पहिलेसारखे आपले शरीरसंरक्षण करीत नाही. सणवार उत्सवादिक हेही काही करीत नाही. सेना बहुत आहे, परंतु उद्योग करून कार्यप्रयोजन करवावे, हेही काही करीत नाही. वैराग्य धरिले आहे. एखादे तीर्थाचे जागी बसून कालक्रमण करू ऐशा गोष्टी सांगता, म्हणोन विस्तारे लिहिले होते. तरी या गोष्टी आम्हास बहुत अपूर्व वाटल्या की, कैलासवासी स्वामींनी कसे-कसे प्रसंग पडले ते निर्वाह करून यवनांच्या सेवा करून, आपल्या पुरुषार्थे बाजी संवारून, उत्कर्ष करून घेतला. शेवट बरा निर्वाह केला. ते सर्व तुम्ही जाणता. त्यांच्या साह्यतेस त्यांच्या बुद्धियुक्ती सर्वही तुम्हास उपतिष्ठोन त्यांपासून शहाणे जाले आहा. त्याउपरी आम्हीही जे-जे प्रसंग पडले ते निर्वाह करून कोणे तऱ्हेने राज्य मिळविले, हे जाणता व देखत आहां. असे असोन तुम्हाला ऐसा कोणता प्रसंग पडला जे इतक्याच मध्ये आपल्या संसाराची कृतकृत्यता मानून, नसते वैराग्य मनावरी आणून, कार्यप्रयोजनाचा उद्योग सोडोन, लोकांहाती रिकामेपणी द्रव्य खाऊन नाश करवणे व आपल्या शरीराची उपेक्षा करणे हे कोण शहाणपण व कोणती नीति? व आम्ही तुम्हास वडील मस्तकी असता चिंता कोणे गोष्टीची आहे? या उपरी सहसा वैराग्य न धरता मनातून विषण्णता (काढून) कालक्रमण करीत जाणे. सणवार उत्साह पूर्ववत करीत जाऊन तुम्ही आपले शरीरसंरक्षण बरे करीत जाणे. जमेती सेवक लोकांना रिकामे न ठेवून, कार्यप्रयोजनाचा उद्योग करून, त्यांपासून सेवा करून पुरुषार्थ व कीर्ति अर्जणे, तुम्ही त्या प्रांते पुरुषार्थ करून संतोषरूप असलिया, आम्हास समाधान व श्लाघ्य आहे की कनिष्ट बंधू असे पुरुषार्थी आहेती. रा.रघुनाथ पंडित त्या प्रांते आहेती. ते काही इतर नव्हेती, आपले पुरातन तुम्हासी रीतीने वर्तावे हे निपुण जाणितात. आम्हास मानितात तसे तुम्हास मानितात. आम्ही त्यांचे ठायी विश्वास ठेविला आहे, तैसा विश्वास तुम्हीही ठेवून, कार्यप्रयोजनास परस्परे अनुकूल व साह्य होऊन वर्तत जाणे. पुरुषार्थ व कीर्ति अर्जणे. रिकामे बैसोन, लोकांहाती नाचीज खाववून, काल व्यर्थ न गमावणे. कार्यप्रयोजनाचे दिवस हे आहेती. वैराग्य उत्तरवयी कराल ते थोडे. आज उद्योग करून आम्हांसही तमासे दाखविणे. बहुत काय लिहिणे, तुम्ही सुज्ञ असा.'

एकोजीचा जन्म शके 1551 (सन 1630) चा आणि मृत्यु रक्ताक्षी संवत्सर पौष मासी (जानेवारी 1685) झाला. शहाजींच्या मानाने त्यांचे हे दोघेही मुलगे अल्पायुषीच झाले. एकोजी शूर व मानी होता. परंतु शिवाजीराजांचे राज्यस्वातंत्र्य त्याचे मनात बिंबलेले नव्हते.

त्याचे सल्लागारही बहुतेक मुसलमानच होते. शहाजीराजांचे मृत्युपासून शिवाजीराजांशी संगनमत करून त्यानेही कर्नाटक प्रांतात शिवाजीराजांचा उद्योग चालू केला असता, तर या दोघा भावांनी मिळून सर्व दक्षिण हिंदुस्थानात मराठेशाहीची सत्ता स्थापन केली असती. सन 1673 पर्यंत शिवाजीराजे उत्तरेच्या कारस्थानात गुंतलेले होते, आणि त्याचा यथाविधि राज्यारोहणसमारंभ होईपर्यंत मराठ्यांचे स्वतंत्र राज्य आहे किंवा असावे ही कल्पना सुद्धा एकोजीच्या मनात आलेली नाही. परंतु शिवाजीराजांच्या तालमेत लहानपणापासून तयार झालेले मुत्सद्दी व योद्धे देशात संचार करून शिवाजीराजांच्या कल्पना सिद्धीस नेण्याच्या उद्योगात लागले, तेव्हा हणमंते वगैरे मंडळींनी शिवाजीराजांच्या उद्योगाचे खरे स्वरूप एकोजीस कळवले, परंतु ते त्याच्या मनाने ग्रहण केले नाही. परावलंबी राहून आपली गुजराण करण्यापलिकडे एकोजीची कल्पना गेली नाही. एवढा एक मुद्दा सोडला म्हणजे इतर बाबतीत एकोजी फार चांगला होता. तंजावरचे राज्य त्याने व्यवस्थित केले; द्रव्यसंचय केला, त्या प्रांतातील मंडळींमध्ये लौकिक व वर्चस्व मिळवले. त्याची बायको दीपाबाई ही इंगळ्यांची मुलगी, फार शहाणी व चतूर होती. हिच्या पोटी शहाजी, सरफोजी व तुकोजी असे तीन मुलगे एकोजीस झाले. या तिघांनीही पुढे तंजावरास एकेकामागून राज्य केले. ते सर्व विद्वान व प्रजापालनदक्ष होते. तंजावरास संस्कृत, मराठी व इतर विद्यांचा जो उत्कर्ष झाला, तो या तिघा भावांच्या श्रमाचे फल होय.

कर्नाटक प्रांताचा अंतर्भाव मराठेशाहीत करण्यात हणमंते घराण्याची व विशेषत: रघुनाथपंतांची कर्तबगारी विसरून चालणार नाही. 'आधीच पंडित, त्यात कारभारी, विशेष विद्वज्जनांचा समागम न्यायनीतिपरनिष्ठ होते. एकोजी राजाचे काम करून महाराजांचे मुलुखाचे व फौजेचे काम बोभाट न पडे असे चालवले.' त्याजविषयी शिवाजीराजांचा अभिप्राय लक्षात ठेवण्याजोगा आहे. 'वरकड मनुष्ये आमचे संपादिल्याची; परंतु तुम्ही वडिलोपार्जित सेवक, आम्ही चुकलो असताना शासन करून सन्मार्गास लावणार. अशी योग्यता व उपमा दुसरियास येणे नाही. आपण आम्हास महाराजांचे ठायी म्हणोन आमचे कल्याणाची इच्छा ठेविता; वरकडास हे इच्छा ठेवणे कारण काय! आपणासारीखे आपण एक.' स्वार्थ व धनलोभ साधण्यासाठी त्याने उगाच कर्नाटकाचे कारस्थान उपस्थित केले, असे अनुदार शब्द त्याच्या कृतीस लावल्याने ऐतिहासिक वृत्तीचा उपमर्द होतो.[131]

शिवाजीराजे पुढे लवकरच दिवंगत झाल्याने कर्नाटक प्रांत मराठी अमलाखाली आला नाही. तथापि दीडशे वर्षे तंजावरच्या राज्यास स्वातंत्र्य मिळून विद्याकलांचा उत्कर्ष झाला, हा परिणाम शिवाजीराजांच्या स्वारीचा होय. तंजावरच्या इतिहासात अलिकडील संशोधनाने पुष्कळ भर पडत आहे. शिवाजीराजांची स्वारी झाली नसती तर आदिलशाहीबरोबरच तो प्रांत मोगलांस हस्तगत झाला असता.

प्रकरण 13 - सुबुद्धिचा चंद्रमा मावळला

(सन 1678-1680)

1.महाराष्ट्रात प्रत्यागमन; 2.जिझियाबद्दल औरंगजेबाचा निषेध; 3.संभाजीचा दुराचार; 4.जालनापूरचा शाप; 5.अकाली मृत्यु (4.4.1680); 6.बायकामुले.

1) महाराष्ट्रात प्रत्यागमन (डिसेंबर 1677-एप्रिल1678) :-

शिवाजीराजांनी कुतुबशाहाशी सख्य केलेले पाहून, दिलेरखानाचा जळफळाट झाला आणि तो दूर गेलेला पाहून, खानाने एकाएकी गोवळकोंड्यावर चाल केली. मादण्णापंतास हे भविष्य ठाऊकच होते. मोगल व विजापुरकर ह्या दोन्ही फौजांचा पराभव करून त्याने त्यांस परतून लावले. ही हकिगत शिवाजीराजांना कर्नाटकात समजली. शिवाय ‘औरंगजेबाने आपल्या पारिपत्याची जय्यत तयारी चालवली आहे’ असे कानी आल्यावरून, शिवाजीराजे लगबगीने कर्नाटकातून परत महाराष्ट्रात आले. कर्नाटकची कामगिरी रघुनाथपंत, संताजी भोसले, हंबीरराव व धनाजी जाधव इत्यादिकांवर त्यांनी सोपवली आणि चित्रदुर्ग, बेल्लारी, रायदुर्ग, कनकगिरी, हरपनहळ्ळी इत्यादींचा बंदोबस्त केल्यावर सन 1677 चे अखेरीस तुंगभद्रा उतरून बंकापूर, लक्ष्मेश्वर, कोप्पळ, गदग वगैरे विजापुरी ठिकाणे हस्तगत करीत शिवाजीराजे सन 1678चे एप्रिल महिन्यात पन्हाळ्यास दाखल झाले. विजापूरच्या सिद्दी मसूदने वरील कानडी प्रदेश शिवाजीराजांना देऊन त्यांची मदत मोगलांशी लढण्यासाठी घेतली होती. अर्थात हा नवीन मुलुख कब्जात घेऊन तेथे आपली व्यवस्था चालू करण्याचे काम शिवाजीराजांनी परत येताना उरकले. जनार्दनपंत हणमंते यास त्यांनी या प्रदेशावर नेमले. याप्रमाणे सालीना वीस लाख होनांचा प्रदेश व त्यातील शंभर किल्ले यांची मालकी शिवाजीराजांकडे आली.

पुढे जाताना बेळगावचे आग्नेयेस 30 मैलांवर बेलवडी म्हणून लहानशी गढी आहे. तेथच्या पाटलाने ‘शिवाजींच्या फौजेची कही कबाड लुटली त्यावरून गढीवर चालून जाऊन महाराजांचे फौजेने वेढा घातला (डिसेंबर सन 1677). किल्लेदार पाटील लढाईत

पडल्यावर त्याची बायको सावित्री पाटलीण एक मास शौर्याने लढली. गढीतील सामान सरल्यावरही बाहेर निघून तीन दिवस हिमतीने सामना केला. शिकस्त होऊन पळून जाता धरून आणली. सखूजी गायकवाडाची तिजवर बदनजर याजकरिता त्याचे डोळे काढून पन्हाळ्यावर ठेवला.' तोरगळाहून स्वारी पन्हाळ्यास आली.

बेलूर व जिंजी ही दोन मजबूद ठिकाणे कबजात आल्याने या नूतन मराठी राज्याची हद्द दक्षिण समुद्रास मिळाली. 'चंदी म्हणजे जैसे विजापूर भागानगर तैसाच तख्ताचा जागा. तेथे रघुनाथ नारायण यास संपूर्ण राज्याची मज्मू सांगून ठेवले. संताजी राजे शूर पराक्रमी होते, त्यास हजार घोड्यांची मामलत दिली. म्हैसूर प्रांतात रंगो नारायण म्हणून कारकून सुरसुभेदार, रघुनाथपंताचे ताबीन नेमिले.' या प्रांतातून कैक वर्षे आदिलशहास किंवा दुसरे कोणास वसूल येत नव्हता, तो आता सुरळीत येण्याची तजवीज शिवाजीराजांनी केली.

संताजी भोसले, हंबीरराव मोहिते, जनार्दनपंत वगैरे मोठमोठ्या सरदारांनी पराक्रम करून प्रदेश जिंकले. पुढील कारकीर्दित प्रसिद्धीस आलेले बहुतेक सरदार प्रथम या कर्नाटकच्या मोहिमेत उदयास आले. शिवाजींनी पत्रे, वस्त्रे, अलंकार वगैरे पाठवून सर्वांचा परामर्ष घेतला. 'या प्रकारे चाकरी मनुष्यांची जाणून 'न मागता' बक्षिस देणे, दिले ते परंपरेस चालावयाजोगे, यामुळे सर्व लोक संतुष्ट. आपणही असेच काम करू, केले असता लेकरालेकरी चालावयाजोगे बक्षीस मिळवू, मिळाले म्हणजे आमचे कोण खाईल? अशी हुशारी ठेवून सर्व लोक आपलाले सेवेचे ठायी तत्पर राहते झाले.' कर्नाटकच्या स्वारीत पाळेगार, देशमुख इत्यादिकांस जिंकण्यास शिवाजीराजांचे सरदारांस पुष्कळ प्रयास पडले. या लोकांनी विजापुरकरांसही कधी मोजिले नव्हते. ह्या बंडखोरांचा पाडाव झालेला पाहून गोवळकोंडेकरांसही बरे वाटले. कुतुबशहाचा व शिवाजींचा स्नेह कायम राहिला. कर्नाटकात शिवाजीराजांनी नवीन राज्यव्यवस्था सुरू केली. त्यांचा जावई हरजी महाडिक बराच काळ प्रमुखपणे वागून सुव्यवस्था व बंदोबस्त राखता झाला. म्हणूनच संभाजीराजांच्या धांदलीच्या काळात व त्याचे पश्चात राज्यास जिंजीस आश्रयस्थान मिळून औरंगजेबाच्या तडाख्यातून त्याचा निभाव लागला.[132]

2) जिझियाबद्दल औरंगजेबाचा निषेध (1679) :

कर्नाटकची स्वारी आटोपून परत आल्यावर शिवाजीराजांचे भाग्य ओसरू लागले. यापुढची त्यांची दीड-दोन वर्षे बहुतेक दु:खात व काळजीत गेली. दक्षिणेकडील बराच प्रांत हस्तगत झाला खरा, तरी त्यामुळे त्याला शत्रूही जास्त वाढले. थोडक्या आटपशीर मावळात अवघड जागी स्वसंरक्षण करून बाह्य प्रदेशावर पाहिजे तेव्हा धाड घालण्याची त्याची पूर्वीची सोय आता नष्ट झाली. कर्नाटकच्या स्वारीत गोवळकोंड्याचा व विजापूरचा बहुतेक

मुलुख शिवाजीराजांचे कब्जात गेल्यामुळे त्या राज्यास हा अपहार वाटू लागला. गोवळकोंड्याच्या कुतुबशहाकडून कराराप्रमाणे शिवाजीराजांना पैशाचा व फौजेचा पुरवठा न झाल्यामुळे खर्च भरून काढण्यासाठी तरी नवीन प्रदेश आपल्याच कब्जात ठेवणे शिवाजीराजांना अपरिहार्य होते. यात शिवाजीराजांनी वचनभंग करून करार मोडला असा आरोप त्याजवर लागू होत नाही. परंतु शिवाजीराजांची चढती कळा दु:सह होऊन बादशहा व त्याचा हस्तक दिलेरखान प्रथम ती दोन मुसलमानी राज्ये हस्तगत करण्याचा कसून प्रयत्न करू लागले. दिलेरखान तर विजापुराजवळच ठाणे देऊन बसला. अशा प्रसंगी शिवाजीराजांना मदतीस बोलवावा तर तोच सर्व बळकावून बसेल, न बोलवावा तर मोगलांपासून बचाव होत नाही. आदिलशाही व कुतुबशाही दरबार 'ज्या क्षणी जे बरे दिसेल किंवा यदृच्छेने घडून येईल ते खरे,' अशा विवंचनेत काळ कंठू लागले. म्हणून सन 1679 साली इकडील राजकारणात घटकेत तह, घटकेत लढाया, घटकेत कपटविद्या अशा ज्या शेकडो घडामोडी झाल्या त्या कालक्रमाने उलगडण्यास प्रयास पडतात आणि तशा प्रयत्नापासून तादृश निष्पत्ति नाही. कोकणात अनाजी दत्तो व कोळवणात थेट सुरतपर्यंत मोरोपंत पिंगळे या दोघांनी नेटाने व दक्षतेने वागून राज्याचा बचाव व विस्तार केला. एकदा त्यांनी सुरतच्या पुढचे भडोच बंदरही लुटले. पण तूर्त शिवाजीराजांची मुख्य अडचण काय ती औरंगाबादपासून विजापूर पावेतोच्या प्रदेशात मोगलांनी धुमाकूळ मांडला ही असून, त्यास आळा घालणे जड पडू लागले. त्यात त्याचा पुत्र संभाजी फितबा करून दिलेरखानास सामील झाला त्या योगाने तर शिवाजीराजांची कंबरच खचली आणि राज्याच्या भावी स्थितीबद्दल त्यास अत्यंत काळजी उत्पन्न झाली.

सन 1678 चे एप्रिलात शिवाजीराजे कर्नाटक स्वारीतून पन्हाळ्यास दाखल झाला. लगेच त्याच्या फौजांनी पैठण व औरंगाबाद या दरम्यानचा गोदावरीच्या पलिकडील प्रदेश लुटून आणला. त्यानंतर शिवनेरी किल्ला मोगलांचे ताब्यात होता, तो हस्तगत करण्याचा प्रयत्न शिवाजीराजांच्या सरदारांनी केला. परंतु शिवनेरीचा मोगल अधिकारी अब्दुल अजीजखान याच्या दक्षतेपुढे मराठ्यांचा इलाज चालला नाही. मे महिन्यात शिवाजीराजे रायगडावर आले. त्याच साली ता.18.9.1678 रोजी शहाजादा मुअज्जमची नेमणूक दक्षिणेच्या कारभारावर होऊन ते 25.2.1679 रोजी औरंगाबादेस येऊन पोचले. तरी दक्षिणेच्या कारभारात दिलेरखानाकडेच प्रमुखपण राहिले. औरंगजेबाची कानउघाडणी करणारे शिवाजीराजांनी लिहिलेले सुप्रसिद्ध पत्र याच सुमाराचे आहे. बादशहाने देशातील समस्त हिंदूंपासून जिझिया कर वसूल करण्याबद्दल ता.3.4.1679 रोजी जाहीर फर्मान काढले. ते शिवाजीराजांना कळताच त्यांनी आपला पारसनीस नीलप्रभू याजकरवी सुंदर फारसी भाषेत एक लांब पत्र बादशहाचे नावे लिहून पाठवले ते सुप्रसिद्ध व वाचनीय आहे.[133] एवढ्या ऐश्वर्यवान बादशहाचे दोष स्पष्टोक्तीने दाखविलेले इतरत्र क्वचितच

आढळतील. 'पातशाही पुरातन हिंदूंची आहे. तुमचे दक्षिणेत काही नाही. पातशाही तुमची नाही. गरीब अनाथ मुंग्या-चिलटांसारखे त्यास उपसर्ग करण्यात आपला मोठेपणा नाही.' अशाप्रकारे अनेक गोष्टी बादशहास सांगून हिंदूंवर कर बसविल्याबद्दल शिवाजीराजांनी त्यांचा तीव्र निषेध केला.

3) संभाजींचा दूराचार (डिसेंबर 1678-नोव्हें. 1679) :

संभाजीराजांच्या दुर्वर्तनाचा उल्लेख पूर्वी आला आहे. त्यांना सन 1678 मध्ये वयाची एकवीस वर्षे पुरी झाली. त्यांचा स्वभाव रागीट व लहरी बनल्यामुळे हे कोणत्या वेळेस काय करतील याचा नेम नसे. काही दिवस त्यांना शिवाजीराजांनी रामदास स्वामींजवळ ठेवले, पण त्यांच्या वर्तनात सुधारणा झाली नाही. आगऱ्यासारख्या कैदेत बापाच्या सहवासात त्यांचे आयुष्य गेले; पण उत्तरोत्तर त्यांचे अवगुण दृष्टोत्पत्तीस येऊन शिवाजराजांचे चित्त उद्विग्न होऊ लागले. जिजाबाईंच्या मृत्युनंतर संभाजीराजांची वृत्ती फारच बिघडली. एका ब्राह्मण तरुणीवर हात टाकल्याचा बोभाटा शिवाजीराजांचे कानावर जाऊन त्यांनी त्यांना पन्हाळगडावर अटकेत ठेवले. त्यावरून ते शिवाजीराजांवर अत्यंत चिडून गेले आणि बायको येसूबाईसह[134] ता.13.12.1678 रोजी गुप्तपणे पन्हाळ्यावरून निसटून दिलेरखानास भेटण्यासाठी बहादूरगडाकडे गेले. दिलेरखानास त्यांनी आगाऊ पत्र पाठविले होते. त्यावरून खानाने त्यांस दोन सरदार सामोरे पाठवून सन्मानाने भेटीस आणले. करकंब येथे त्यांची भेट झाली. दिलेरखानास तर या गोष्टीने परमाल्हाद झाला. खानाने संभाजीराजांना सप्तहजारी मनसब ठरवून बादशहाकडे हा प्रकार लिहून पाठवला. बादशहालाही या गोष्टीचा आनंद झाला, पण कदाचित ही संगळीच शिवाजीराजांची कपटविद्या असेल असे वाटून त्याने दिलेरखानास सावध राहण्याविषयी लिहिले. पुढे संभाजीराजांना घेऊन दिलेरखान विजापुरावर चालून गेला. त्या संकटाच्या निवारणार्थ विजापुरचा कारभारी सिद्दी मसूद याने शिवाजीराजांकडे मदत मागितली, ती लगेच शिवाजीराजांनी रवाना केली व आपणही स्वत: दिलेरखानावर चढाई करून गेले. इकडे संभाजीराजांसह दिलेरखान विजापुराकडे चालला असता सातारच्या पूर्वेस भूपाळगड किल्ला आहे, तेथे शिवाजीराजांची पुष्कळ संपत्ती व अनेक घरंदाज मराठ्यांचे कबिले चागल्या बंदोबस्तात ठेवलेले होते. हा किल्ला घेतल्याने शिवाजीराजांचे नाक कापल्यासारखे होईल अशा बुद्धीने खान व संभाजीराजे किल्ल्यावर चालून गेले. त्याप्रसंगी तुंबळ रणकंदन होऊन ता.2.4.1679 रोजी भूपाळगड मोगलांस मिळाला. गडाचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा याने संभाजीराजांना समोर पाहून शत्रूंवर गोळे टाकले नाहीत, याबद्दल शिवाजीराजांनी त्यास ठपका दिला. किल्ला हस्तगत झाल्यावर

संभाजीराजांनी आतील लोकांची क्रूरपणे कत्तल केली. या एकंदर धांदलीत उभयपक्षी जयापजय व मारामाऱ्या फारच कल्पनातीत झाल्या. पुढे ता.18.8.1679 रोजी धूळखेड येथे भीमा उतरून संभाजीराजे व दिलेरखान विजापूरावर चालून गेले. सिद्दी मसूद व त्याचा दुय्यम यांची तर पाचावर धारण बसली; आणि त्यांनी अत्यंत मिनतवारीने शिवाजीराजांच्या विनवण्या करून विजापूरचे बचावास बोलावले. शिवाजीराजांनी ताबडतोब आश्वासन दिले की, 'तुम्ही बिलकूल धास्ती बाळगू नका, मी खानाचा पुरता समाचार घेतो.' असे कळवून निरनिराळ्या टोळ्या करून त्यांनी चहू बाजूंनी विजापूरचे बाहेर दिलेरखानावर चाल केली. शिवाजीराजांचे मनात खुद्द विजापुरात जाऊन सिकंदर आदिलशहास भेटावे असे होते. पण मोरोपंत पेशव्यांनी त्यांना मोडा घातला. ते म्हणाले, 'अशा संकटात न जाणो कसा प्रसंग उद्भवेल!' पुढे विजापुरास वेढा घालून दिलेरखानाने दोन महिने पावेतो लढण्याची शिकस्त केली. त्यावेळी शहराच्या बचावासाठी शिवाजीराजांनी फार कष्ट केले. विजापूरचे मुसलमान सरदार व मालोजी घोरपडे हेही शहराचे बचावाची शिकस्त करू लागले. शिवाजीराजांनी आपल्या राज्यातून मुबलक धान्य व सामान शहरात पोहोचवले, त्यामुळे विजापुरात नेहमीप्रमाणेच स्वस्ताई कायम राहिली. उलट मोगलांचे फौजेस मराठ्यांनी असा बेसुमार त्रास दिला की, धान्याची व दाणावैरणीची पंचाईत पडून निरुपायास्तव दिलेरखान वेढा उठवून ता.14.11.1679 रोजी परत फिरला. संभाजीराजांनी त्यास कळवले, 'विजापूरचा वचपा आपण पन्हाळ्यावर भरून काढू.' तूर्त शिवाजीराजांची फौज बाहेर आहे असे पाहून ते पन्हाळ्यावर चालून आले. शिवाजीराजांनी मदत केल्याबद्दल मसूद खानाने शिवाजीराजांचे फार-फार आभार मानले आणि वकिलाबरोबर वस्त्रे, जवाहीर, हत्ती, घोडे वगैरे नजर पाठवले. शिवाजीराजांनीही त्यास यथोचित गौरवाने उत्तर पाठवले. त्यानंतर शिवाजीराजे व विजापूरकर यांचा तह होऊन कर्नाटकात कोप्पळ, बेल्लारी व त्यापुढचे जिंजी वगैरे जे प्रांत दक्षिणेस शिवाजीराजांनी काबीज केले होते, त्याजवरील व तंजावरच्या जहागिरीवरचा आपला हक्क आदिलशहाने सोडून शिवाजीराजांना दिला!

दिलेरखान पन्हाळ्याचे रोखाने परत फिरला तो संभाजीराजांसह तिकोट्यास आला. त्या ठिकाणी चहूबाजूचे श्रीमान लोक आपले वित्त घेऊन गुप्तपणे राहिले होते. मोगलांची धाड या बाजूस येईल अशी कोणास कल्पनाही नव्हती. मुसलमानांनी येऊन एकदम भयंकर कृत्ये आरंभली, त्यामुळे हजारो हिंदूमुसलमान स्त्रियांनी अब्रूरक्षणार्थ आपल्या मुलाबाळांसह विहिरीत उड्या घेऊन मृत्यू पत्करला. दिलेरखानाने तीन हजार लोक कैदी म्हणून पकडले. तिकोट्याहून ही धाड अथणीवर आली. या ठिकाणच्या सर्व हिंदूंना पकडून त्यांची विक्री करून पैसे उकळण्याचा उद्योग खानाने सुरू केला, तो संभाजीराजांना पसंत पडला नाही. पण खानाने संभाजीराजांचे न ऐकता आपलाच हेका चालवला. त्यावरून उभयतांचे अत्यंत वाकडे आले. दिलेरखान म्हणाला, 'मी पाहिजे ते करण्यास मुखत्यार

आहे, तुम्ही हरकत करणार कोण?' अशा प्रकारची बाचाबाची सुरू होऊन संभाजीराजांचे मन विटले. गोवळकोंडा व विजापूर या दोन्ही ठिकाणी दिलेरखानाचे उद्योग फसले यामुळे इकडे खानावर औरंगजेब बादशहाची इतराजी झाली. त्यास त्याने परत बोलावून बहादूरखानासच पुनरपि दक्षिणेच्या कारभारावर रवाना केले आणि दिलेरखानास असा हुकूम पाठवला की, 'संभाजी तुमचे जवळ आहे त्यास एकदम कैद करून आमचेकडे पाठवा.' या सर्व गोष्टींची थोडीबहुत कुणकुण संभाजीराजांना कळून ते अगदी घाबरून गेले. त्यांना परत आणण्याविषयी शिवाजीराजांचेही प्रयत्न अंत:स्थपणे सुरू होते. प्रत्यक्ष त्यांचा मेहुणा महादाजी निंबाळकर[135] दिलेरखानाचा ताबेदार होता, त्यानेदेखील संभाजीराजांची पुष्कळ कानउघाडणी करून त्यांना परत जाण्यास सांगितले. याबद्दल निंबाळकराला दिलेरखानाने काही दिवस अटकेत सुद्धा ठेवले. अथणीहून ता.20.11.1679 रोजी रात्री येसूबाईस पुरुषाचा पोषाख देऊन तिच्यासह दहा स्वारांनिशी संभाजीराजे गुप्तपणे पळून विजापुरास मसूदखानाचे आश्रयास गेले. ही बातमी दुसरे दिवशी दिलेरखानास कळताच तो परत विजापुराकडे आला आणि आपला भरंवशाचा वकील ख्वाजा अब्दुल रझाकखान याच्यामार्फत मसूदखानास भली मोठी रक्कम कबूल करून त्याने संभाजीराजांना परत मागवले (28 नोव्हेंबर). संभाजीराजांना आणण्यासाठी शिवाजीराजांची एक लष्करी तुकडी विजापुराजवळ आली होती, ती संधी साधून संभाजीराजे ता.30 नोव्हेंबर 1679 रोजी रात्री विजापुरातून गुप्तपणे निघून बापाने पाठविलेल्या लोकांबरोबर लांब दौड करून 4 डिसेंबर रोजी पन्हाळ्यास दाखल झाले. ती बातमी कळताच स्वत: शिवाजीराजे पन्हाळ्यास आले, तेव्हा त्यांची व संभाजीराजांची भेट झाली. संभाजीराजांना आता मोगलांचा अनुभव आलाच होता, म्हणून शिवाजीराजांनी त्या पश्चात्तप्त मुलाचे मन जास्त दुखविले नाही. त्यास चार बोधाच्या गोष्टी सांगून महाराज, पुत्राची समजूत घालण्याकरता एक महिना तेथे राहिले. नानाप्रकारे बोध केला, पण उपतिष्ठा झाली नाही, त्यामुळे अत्यंत कष्ट होऊन शिवाजीराजांची प्रकृति क्षीण होत चालली. 'पुढे राज्य सांभाळणार कोण' याची विवंचना करीत दोघांनी एकत्र बसून सर्व राज्याची व दौलतीची मोजदाद केली. खजिना, कारखाने, गडकोट, जंजिरे, मुलूख, जिन्नस-जडजवाहीर, सुवर्ण-चांदी सर्वांच्या याद्या केल्या.[136] संभाजीराजांचे अंत:करण चांगले निवळेपर्यंत त्यांना पन्हाळगडावरील कारभारी बाजी मुरार देशपांडे यांचा नातू विठ्ठल त्रिंबक, हिरोजी फर्जंद, सोमाजी नाईक बंकी, सूर्याजी कंक वगैरे काही मंडळींच्या देखरेखीखाली ठेवून दिले आणि जनार्दनपंत हणमंते खाली कोप्पळाकडे होता त्यासही कोल्हापूर प्रांती येऊन संभाजींवर नजर ठेवण्याचा हुकूम केला. मुलाच्या उच्छृंखलपणाचा अत्यंत खेद वाटून त्याचेवर पहारे बसवून आपण रायगडावर जाण्यास निघाले. वाटेत

सज्जनगडास जाऊन 31 डिसेंबर 1679 पासून 4 फेब्रुवारी 1680 पावेतो समर्थांचा सहवास केला.

संभाजीराजांचा हा व यापुढचा उद्वेगकारक प्रबंध, औरंगजेबाचे निर्घृण कापट्य, शिवाजीराजांचा शोकपर्यवसायी अकाली शेवट इत्यादि प्रकरणे कल्पित कादंबरीलाही मागे टाकणारी आहेत. संसार विचित्र आहे. नाटक चालू असताना एका पुढचा एक-एक पडदा खुला होऊन भविष्यकाळ डोळ्यांपुढे उभा राहतो, तेव्हा मागची आठवण येऊन संसाराची खरी प्रचिती मानवास होते. नाही तर ज्या पुरुषाने औरंगजेबाच्या कैदेतून अकल्प्य रीतीने आपली सुटका करून घेतली, त्याची अक्कल प्रत्यक्ष पोटच्या पुत्रापुढे गुंग व्हावी आणि त्या चिंतेतच त्यास मरण यावे यापेक्षा दुसरा खेदकर दैवदुर्विपाक कोणता! जगाच्या राहाटीत थोर पुरुषांच्या नशिबात थोरच दु:खे लिहिलेली असतात. अकबर, शिवाजी, नेपोलियन अशा थोर पुरुषांचे अंत मोठे हृदयद्रावक झाले.

4) जालनापूरचा शाप (नोव्हेंबर 1679) :

विजापुरचे बचावासाठी शिवाजीराजे आठ हजार घोडेस्वारांनिशी चालून गेल्याचे मागे सांगितलेच आहे. ता.4.11.1679 रोजी ते सेल्गुरातून बाहेर पडले. स्वारांच्या दोन टोळ्या करून एकीवर आपण व दुसरीवर आनंदराव मकाजी असे जाळपोळ करीत दिलेरखानास पायबंद देण्यासाठी मोगलांचे प्रदेशात विजेसारखे येऊन कडाडले. ता.15 नोव्हेंबरचे सुमारास त्यांनी मोगलांचे नामांकित शहर जालनापूर हस्तगत करून लुटले आणि प्रचंड लूट पैदा केली. शहराला लागून सय्यद जान महंमद या एका मुसलमान साधूचा मठ असून त्यात पुष्कळ धनिकांनी आपले वित्त नेऊन ठेवले होते. शिवाजीराजांनी त्या साधूच्या विरोधास न जुमानता तो आश्रम साफ लुटला, त्यावरून साधूने शिवाजीराजांना शाप दिला. या शापामुळेच शिवाजीराजांना अल्पावकाशात मरण आले असे साफीखान लिहितो. ‘राजेश्री शिवाजी महाराज जालनापूरचे स्वारीस गेले. तानपाठक ब्राह्मण बहुत थोर तपस्वी यांचे दर्शन झाले. त्यांनी महाराजांना आशीर्वाद दिला. त्याप्रमाणे स्वारी फत्ते झाली. मौजे नागठाणे गाव इनाम करून दिला.’[137]

मोगल फौजांच्या जाळ्यातून जालनापुरची लूट सुरक्षित स्थळी आणणे सोपे नव्हते. सोने, चांदी, रत्ने, कापड, घोडे, हत्ती अशी नानाविध लूट सांभाळून नेण्यात गुप्तपणा राहू शकला नाही. शहाजादा मुअज्जम औरंगाबादेहून मराठ्यांचे पाठलागास धावून आला. त्याचा एक हुशार सरदार रणमस्तखान म्हणून होता, त्याने संगमनेरजवळ मराठ्यांना गाठले. तीन दिवसपर्यंत सिधोजी निंबाळकराने मोगलांशी शिकस्तीचा सामना केला. शेवटी सिधोजी पडला आणि संताजी घोरपडे पराभव पावून निघून गेला. प्रत्यक्ष शिवाजीराजे

यावेळी शत्रूचे तावडीत सापडले असते, पण त्यांचा कल्पक व विश्वासू बातमीदार बहिर्जी नाईक याने डोंगरांतील गुप्त वाटांनी ता. 22 नोव्हेंबर रोजी महाराजांना पट्टा[138] किल्ल्यावर सुरक्षित पोहोचवले. शिवाजीराजांचा सरदार आनंदराव जखमी झाला, एकंदर चार हजार शूर लोक मारले गेले आणि जमवून आणलेली बरीचशी लूट हातची गेली. पट्टागडावर लोकांना थोडी विश्रांती देऊन महाराज डिसेंबरचे आरंभी रायगडावर आले. तो संभाजीराजे परत आल्याची बातमी त्यांना कळाली. एवम्च जालनापूरची लूट व संभाजीराजांचे प्रत्यागमन हे प्रकार समकालीन होत.

5) अकाली मृत्यु (4.4.1680) :

संभाजीराजे परत आले तरी त्यांना पुन्हा हस्तगत करण्याची शिकस्त दिलेरखानाने चालवली. इतके दिवस जवळ असताना एवढा मोहरा खानाने हातचा घालवून शिवाजीराजांना वठणीस आणण्याची संधी वाया घालवली याबद्दल बादशहा त्यांचेवर अत्यंत क्षुब्ध झाला. पन्हा दिलेरखानावर त्याने कधी विश्वास ठेवला नाही.

दिलेरखान पन्हाळ्यावर चालून येतो असे कळताच शिवाजीराजांनी भराभर चहूकडून प्रचंड तोफा आणवून त्या किल्ल्याची बंदिस्ती केली. फ्रेंचांकडून मुद्दाम चांगल्या तोफा आणवून त्या वर चढवल्या. नोव्हेंबर ता.24 रोजी अण्णाजी दत्तोचा भाऊ सोमाजी यास अंकोला, कारवार, सोमेश्वर, फोंडा इ. ठिकाणच्या तोफा पन्हाळ्यावर आणण्याचा निकडीचा हुकूम शिवाजीराजांनी केला. डिसेंबरात दुसरी एक शिवाजीराजांची मोठी फौज खानदेशात बऱ्हाणपूर पावेतो प्रदेश लुटीत गेली. अशी दिलेरखानाची चहूकडून फजिती झाल्यामुळे त्याजकडून शिवाजीराजांना काही उपसर्ग घडू शकला नाही. विजापूरच्या सर्जाखानास घेऊन ते कोप्पलकडचा प्रदेश हस्तगत करण्याकरता गेले असताना तिकडे जनार्दनपंत हणमंत्यांनी त्याचा खरपूस समाचार घेतला.

संभाजीराजांची भेट झाल्यावर शिवाजीराजांनी नानाप्रकारे त्यांची समजूत घातली. तरीही जे बोलणे झाले त्यावरून तो पुढे सुधारून आपला राज्यभार हलका करील किंवा निदान केलेला राष्ट्रीय उद्योग टिकवील अशी आशा शिवाजीराजांना बिलकूल दिसली नाही. उलट संभाजीराजांचा उच्छृंखलपणा बंद पाडण्यासाठी शिवाजीराजांना संभाजीराजांना सख्त नजरकैदेत ठेवणे जरूर पडले. पण हा सर्व बनाव त्या मानी पुरुषाच्या (संभाजींच्या) मनास अत्यंत झोंबला. कोठेच आशेचा तंतू त्यांना दिसेना. दुसरा मुलगा राजाराम लहान दहा वर्षांचा, तूर्त कामात उपयोगी पडणारा नव्हता. घरातील बायकांतील धुसफूस शिवाजीराजांना चैन पडू देत नव्हती. विशेषत: सोयराबाईंच्या खटपटी स्वभावाची त्यांना मोठी धास्ती होती. दरबारात मोरोपंत पिंगळे व अण्णाजी दत्तो यांजमध्ये उघड-उघड द्वेष

असून अष्टप्रधानांकडे राज्यकारभार सोपविल्यास ही मंडळी 'एकमेकांच्या माना कापून राज्य बुडवतील' अशीच शिवाजीराजांची भावना झाली. 'दोघा पुत्रांत राज्य विभागून द्यावे' असाही विचार त्यांनी योजला. पन्हाळ्यावर महिना पंधरा दिवस राहून एका पुरुषास पराक्रमाने काय कमाई करता येते याचे प्रत्यक्ष प्रमाण पुत्र संभाजीराजांना दाखवून तूर्त समाधान केले की, 'आम्ही रायगडास जातो, राजारामाचे लग्न करून येतो. मग राज्यभाराचे विचार-कर्तव्य तो करू. तुम्ही वडिलपुत्र, सर्व प्रकारे भरंवसा तुमचा' असे बोलून सज्जनगडावर समर्थांचे भेटीस गेले. वाकेनिशी टिपणात या भेटीचा खालील उल्लेख आढळतो. 'महाराज पौष शुद्ध नवमीस भेटीस आले, माघ शु.15 पर्यंत होते. नित्य-नित्य समारंभही बहुत केला. समर्थांनी अनेक प्रकारच्या राजधानी संबंधे सांगोन अध्यात्मपर विषयहि श्रींनी सांगितला, तीन दिवस समाधि लागोन राजेश्री बसले होते. अनेक प्रकारच्या गोष्टी होऊन त्यात महाराज परम्धामास जाणार हे समर्थांनी सुचवले. माघ शु.14 रोजी आज्ञा घेऊन रायगडास गेले.[139] तेथे फाल्गुन वद्य 2 रोजी (7.3.1680) राजारामांची मुंज केली आणि फाल्गुन वद्य 10 रोजी (15.3.1680) प्रतापराव गुजर यांची मुलगी पसंत करून तिच्याशी राजारामांचा विवाह केला. नंतर आठ दिवसांनी (ता.23 मार्च) 'राजांस ज्वराची व्यथा जाहली. आयुष्याची मर्यादा झाली असे कळून चुकले. मातबर लोक जवळ बोलावून आणिले. शरीर क्षीण देखून पन्हाळ्यावरी संभाजीराजांस सांगून पाठविले, दोघा पुत्रांस राज्य वाटून देतो. संभाजीराजांनी ऐकिले नाही. सर्वांचे कंठ दाटून परमदु:ख झाले. भागीरथीचे उदक प्राशन केले. शके 1602 रौद्र संवत्सरी शनिवार चैत्रशुद्ध पूर्णिमा (=4.4.1680) दोन प्रहरी रायगडी काळ जाहला.' त्याप्रसंगी रामचंद्र नीळकंठ, प्रल्हाद निराजी व बाळाजी आवजी एवढेच जुने मुत्सद्दी जवळ होते. पेशवे सचिव वगैरे कोणी नव्हते.

शिवाजीराजे सत्पुरुषांना भजणारे होते हे सुप्रसिद्ध आहे. त्यांनी गुरुस्थानी अगर पूज्य मानलेल्या पुरुषांची नावे आढळतात ती ही :-

1)तुकाराम बाबा, 2)समर्थ रामदास, 3)बाबा याकूत केळशीकर, 4)मौनीबाबा पायगावकर, 5)निश्चलपुरी गोसावी, 6)परमानंद बाबा पोलादपूरकर, 7)जयरामस्वामी वडगावकर, 8)नारायणदेव चिंचवडकर, 9)रंगनाथस्वामी निगडीकर, 10)विठ्ठलस्वामी (रंगनाथ स्वामींचे बंधू), 11)भाऊदास बाबा (एकनाथस्वामींचे वंशज), 12)आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर, 13)बोधलेबाबा धामणगाव, 14)त्रिंबक नारायण वाराणसीकर.[140]

6) बायकामुले :

शिवाजीराजांनी आठ बायका केल्या त्या अशा :

1) सईबाई (निंबाळकर) लग्न 17.4.1640; मृ.5.9.1659.
2) सगुणाबाई (शिर्के) लग्न एप्रिल सन 1641.
3) सोयराबाई (शिर्के) लग्न सन1650 पूर्वी, मृ.1681
4) पुतळाबाई (मोहिते) लग्न सन 1653, सती गेल्या.
5) लक्ष्मीबाई (विचारे) लग्न सन 1656 पूर्वी.
6) सकवारबाई (गायकवाड) लग्न जानेवारी 1657.
7) काशीबाई (जाधव)लग्न 8.4.1657.
8) गुणवंताबाई (इंगळे) लग्न 15.4.1657.

याशिवाय दोन उपस्त्रिया असल्याचा उल्लेख सापडतो.[141] पहिली सईबाई हिला एक पुत्र व तीन कन्या झाल्या. पुत्र संभाजी याचा जन्म ता.14.5.1657. मुलगी सकवार उर्फ सखूबाई, हिचे लग्न महादाजी निंबाळकराशी झाले. दुसरी राणूबाई जाधवांचे घरी दिली. तिसर अंबिकाबाई हरजीराजे महाडिक तारळेकर यांस दिली. सोयराबाईला एक पुत्र राजाराम, जन्म 24.2.1670 व एक कन्या बाळाबाई ऊर्फ दीपाबाई हिचे लग्न विसाजीरावाशी झाले. सकवारबाईला एक कन्या कमळजाबाई हिचे लग्न गणोजी शिर्के मळेकर याच्याशी झाले. मिळून एकंदर अपत्ये आठ, दोन मुलगे व सहा मुली. शिवाजीमहाराजांच्या मृत्युसमयी तीनच स्त्रिया हयात होत्या असे दिसते. पैकी पुतळाबाई सती गेल्या, सोयराबाई संभाजीराजांकडून मारल्या गेल्या आणि एक सकवारबाई शाहूंबरोबर बादशहाच्या कैदेत होत्या.

प्रकरण 14 - समालोचना

येथपर्यंत शिवाजीराजांच्या एकंदर चरित्राचे जे वर्णन करण्यात आले आहे, त्यावरून त्याने हिंदुस्थानच्या इतिहासात काय कामगिरी केली तिचा योग्य अंदाज करिता येईल. किंबहुना एकंदर जगाच्या इतिहासात सदैव झळकत राहणारा असा राष्ट्रोन्नतीचा एक अनुपम प्रयोग शिवाजीराजांनी सिद्धीस नेला असेच म्हणावे लागेल. या प्रयोगाचे वास्तविक स्वरूप लक्षात येण्यासाठी त्यांच्या निरनिराळ्या अंगांचे स्वतंत्र विवेचन या समालोचनेत करण्याचे योजिले आहे. म्हणजे मुख्यत: यात खालील विषय चर्चिले आहेत :

1.स्वरूप, स्वभाव व कर्तबदारी; 2.हिंदुपद पातशाहीची उभारणी; 3.प्रधानमंडळ; 4.मुलकी व्यवस्था; 5.किल्ले; 6.लष्कर; 7.जागिरींवर शिवाजीराजांचा कटाक्ष; 8.आरमार व सिद्दीचा जंजिरा; 9.शिवाजीराजांकडे आलेले इंग्रज वकील; 10.शिवाजीराजांच्या लुटीचा अर्थ; 11.जागतिक संस्कृतीतील स्थान; 12.तुलना.

1) स्वरूप, स्वभाव व कर्तबगारी :-

शिवाजीराजांचे स्वरूपवर्णन अनेक लेखकांनी केलेले आढळते. आपल्या इकडच्या माणसाची नवलाई परकियांना वाटून तिचे त्यांनी वर्णन लिहून ठेवलेले ग्राह्य मानणे युक्त होईल. पुष्कळ पाश्चात्त्यांना शिवाजीराजांचा समागम घडला आणि या लोकोत्तर पुरुषाचा स्वभाव, स्वरूप, वर्तन वगैरे संबंधाने त्यांनी हकिगती लिहून पाठविल्या, त्या फार उपयुक्त आहेत. त्यातील तात्पर्यच येथे सांगता येईल. शिवाजीराजांचा बांधा फार उंच अथवा फार ठेंगू नसून मध्यम होता. त्यांचे सर्व शरीर प्रमाणबद्ध व शोभिवंत होते. तीक्ष्ण व घेरून टाकणारी नजर, अंगयष्टीची चपलाई व चेहेऱ्यावर मृदुहास्याचा खेळ या गोष्टी सहज कोणालाही दिसून येत. मराठ्यांचा सामान्य वर्ण गौर नव्हे, पण शिवाजीराजांचा वर्ण बऱ्याच अंशी गौर होता. पाहताक्षणी दुसऱ्यावर छाप बसावी असे तेज चेहऱ्यावर विलसत असे. त्यांचे वजन हल्लीच्या मानाने दीडशे पौंडाच्या अंदाजात होते.

समकालीन म्हणता येतील अशी शिवाजीराजांची हाताने काढलेली तीन चित्रे प्रसिद्ध आहेत, एक ब्रिटिश म्युझियममध्ये हॉलंडमधील डच चिताऱ्याकडून केलेले, दुसरे व्हॅलेंटाईन नामक चिताऱ्याने तयार करून ऑर्मच्या पुस्तकात घातलेले व तिसरे मनूचीने हिंदुस्थानात

असताना चित्रसंग्रह केला त्यातले. मनूची व शिवाजीराजे यांची प्रत्यक्ष भेट झाली होती हे मागे पृष्ठ 121 वर सांगितलेच आहे. ही सर्व चित्रे एकाच बैठकीस किंवा मूळ एका प्रतीवरूनच सिद्ध झाली असे नाही. ती निरनिराळ्या वेळी व भिन्न कारागिरांनी काढलेली असून त्यामुळे त्यात बारीक फरक दिसले, तर ती अस्सल असून त्या पुरुषाच्या वर्णनाशी जुळणारीच आहेत. मालवणच्या सिंधुदुर्ग किल्ल्यात शिवाजींची म्हणून जी मूर्ती बसवलेली आढळते ती मात्र खरी प्रतिमा बिलकूल नव्हे.

आपल्या लेखकांचे शिवाजीराजांसंबंधी समकालीन कागद फारच थोडे मिळू शकतात. बरेचसे शिवकालीन कागद नष्ट झाले. शिवाय त्यावेळी बाह्य व्यवहार हल्लीच्या प्रमाणे कागदावर नमूद करण्याचा प्रघात विशेष नव्हता. अगदी जरुरी पुरते कागदाचे लहान चिटोरे लोक वापरीत. खुद्द शिवाजीराजांची अशी पाच-पन्नासच पत्रे अद्यापपावेतो उपलब्ध झालेली आहेत. हे लक्षात ठेवले असता आपल्याकडील लेखात शिवाजीराजांचे स्वरूपवर्णन न आढळल्याबद्दल कोणासही दोष देण्याचे कारण नाही.

कोणाही प्रसिद्ध व्यक्तीची योग्यता नक्की ठरवणे शक्य नसते. ज्याच्या-त्याच्या अनुभवांप्रमाणे या संबंधात मतवैचित्र्य उत्पन्न होते. शिवाजीराजांनी स्वराज्य स्थापन केले याचा अर्थ त्यांनी मुसलमानांचे वर्चस्व नाहीसे केले. अर्थात याबद्दल मुसलमान लोक शिवाजीराजांना नावे ठेवतील तर त्यात आश्चर्य नाही. इंग्रज लोकांकडून शिवाजीराजांचे शत्रूंना दारूगोळ्याची वगैरे मदत झाल्यामुळे त्यांनी त्यांच्या वखारी जाळल्या किंवा लुटल्या, म्हणून इंग्रज लेखकही त्यांना भला म्हणणार नाहीत. हा मनुष्यस्वभाव ध्यानात घेऊनच आपणास शिवाजीराजांची योग्यता काय होती ते ठरवले पाहिजे.

शिवाजीराजे लोकोत्तर पुरुष होते अशी साक्ष त्यांचे सर्वच चरित्र देते. सामान्यत: भूतलावरील कोणाही थोर पुरुषांच्या अंगी दिसून येणारा गुण शिवाजीराजांमध्ये होते. अमुक एक गुण शिवाजीराजांमध्ये नव्हता, अथवा अमुक ठळक दोष त्यांचेमध्ये होता असे स्पष्टपणे दाखविता येत नाही. त्यांचे आयुष्य नाना प्रकारच्या संकटात व अनेकविध परिस्थितीत गेल्यामुळे, त्यांना जगाचा अनुभव विशेष आला होता आणि त्या अनुभवांचा क्षणोक्षणी उपयोग करण्याइतकी त्यांची तीव्र बुद्धी होती. बोलण्यात ते इतके कुशल असत की पाहिजे त्या इसमावर ते आपली छाप तेव्हाच बसवत. त्यांची राहणी साधी असल्यामुळे, इतरांना तसे राहण्यास ते आपल्या वर्तनाने भाग पाडीत. प्रत्येक गोष्ट स्वत:ला करता येत असल्यामुळे, लोकांच्या अडचणी काय त्या त्यांना चांगल्या समजत. स्वत: खऱ्या-खोट्याची पारख करण्यास समर्थ असल्यामुळे कोणाकडूनही ते फसले जात नसत. कसल्याही संकटात उडी घालण्यात ते कचरत नसत. लोकांना हाताखाली वागवण्यास इच्छिणाऱ्यांनी स्वत: तसे वागण्यास तयार असले पाहिजे, हे ते जाणून होते. जे नियम ते घालून देत व जे हुकूम ते दुसऱ्यांना सांगत असत, ते स्वत: पाळण्यास ते कधी चुकत नसत. ते अंत:करणातून क्रूर नव्हते, तरी चुकीबद्दल कडक शासन करण्यास ते कधी कचरत नसत.

आईच्या आज्ञेबाहेर त्यांनी कधीही पाऊल टाकले नाही, इतकेच नव्हे तर आई वारल्यावर त्यांना इहलोकची जीवनयात्रा कष्टप्रद वाटली आणि आपला पाठिंबा गेल्याप्रमाणे त्यांची स्थिती होऊन ते निराधार झाले. मित्रांची त्यांना अतिशय किंमत वाटत असे व जिवास जीव देणारे अनेक मित्र त्यांनी जोडले होते. भूक-तहान सोसण्यात ते फार काटक होते आणि ह्या कामी अगदी हलक्या शिपायालाही त्यांची बरोबरी करवत नसे.

नेहमी सावध राहून सुयुक्तीने आपली कामे महाराज तडीस नेत. खून वगैरे क्रूर प्रकार त्यांना मनापासून आवडत नसत. त्यांनी आपल्या सौजन्याने, दक्षतेने व ममतेने सर्व लोकांची मने आपणाकडे आकर्षून घेतली. शत्रूला पकडून त्याला जेरीस आणण्यात जो फायदा शिवाजीराजांना वाटे, तो शत्रूस ठार मारण्यात त्यांना वाटत नसे. मराठ्यांच्या राज्यस्थापनेस अडथळा आणणारी अशी जी काही मंडळी होती, त्यांना त्यांनी नाहिसे केले. त्यांनी आपले राज्य फार सावधगिरीने हळूहळू वाढवत नेले. एक काम पक्के झाल्यावरच दुसरे हातात घेतले. म्हणून झालेले काम पुन्हा कधी बिघडले नाही किंवा एकदम भलत्याच कामास हात घालून त्यांच्या जिवाची धांदल उडाली नाही. ते नीतिने खंबीर होते. त्यांना कोणतेही व्यसन असल्याचे लिहिलेले आढळणार नाही. शत्रूंकडील स्त्रियांना सुद्धा सन्मानाने वागवून स्वस्थानी पोहोचवून दिल्याची उदाहरणे नमूद आहेत. ते कपटी, लबाड व अप्रामाणिक होते, असा कित्येकांचा आक्षेप आहे. पण कपट शब्दाचा अर्थ मतलबाप्रमाणे बदलत असतो. काहीतरी युक्ती लढवून राष्ट्राचे कल्याण साधणे हे साधुत्वाचे लक्षण नसेल, परंतु राजनीतित 'डिप्लोमसी' म्हणता येईल अशा मुत्सद्देगिरीच्या व व्यवहाराच्या जोरावर युरोपियन राष्ट्रे वृद्धी पावली आहेत, तशा व्यावहारिक दृष्टीने शिवाजीराजे लबाड ठरत नाहीत, उलट चतुर ठरतात.

राज्यकारभारात शिवाजीराजांनी निरनिराळ्या इसमांना कामे वाटून दिल्यामुळे प्रत्येक इसम आपले काम हुशारीने करण्यास झटू लागला. एखादे बिकट प्रकरण उपस्थित झाले तर शिवाजीराजांचे प्रधान ते त्यांच्या कानावर घालत. एकांती त्यांचेबद्दल खलबत झाल्यावर जरुरीप्रमाणे त्यांचा खल प्रधानमंडळात किंवा ठरीव इसमांशी करण्यात येई. राज्याच्या हितसंबंधाच्या बाबतीत प्रधानमंडळात वाटाघाट होऊन सर्वानुमते शहानिशा होत असे. प्रत्येकावर विश्वास व जबाबदारी टाकलेली असल्यामुळे आणि प्रत्येकाच्या मसलतीस योग्य मान मिळाल्यामुळे, जो-तो आपली कामगिरी हुशारीने करण्यात दक्ष असे.

शिवाजीराजांची धर्मावर परिपूर्ण श्रद्धा होती. धर्म ही नुसती नावाची सबब त्यांनी पुढे आणलेली नव्हती, तर धर्मोन्नतीवरच राष्ट्रोन्नती अवलंबून आहे, ही त्यांची समजूत हरएक कागदात व प्रसंगात व्यक्त झालेली दिसते. कथापुराणे ऐकण्याची त्यांना अतिशय आवड होती व ती आवड पूर्ण करण्याकरता ते कोणत्याही अडचणीस जुमानीत नसत.

राज्याचे ओझे वाहणारास प्रसंगी अत्यंत कठोरपणा धारण करावा लागतो. भीडमुर्वत, सगासोयरा बिलकूल मनात आणता येत नाही. शिवाजीराजे स्वभावाने असेच अत्यंत

कडक होते. गुन्हेगारांना ते जबरदस्त शिक्षा करीत. कित्येकवेळा त्यांना हरामखोरांची डोचकी उडवावी लागत. अंमलदार लोक त्यांना चळचळा कापत असत. मागे त्यांची कित्येक पत्रे ठिकठिकाणी दिलेली आहेत, त्यांवरून त्यांचा कडक बंदोबस्त उघड दिसून येतो. कठोरपणाबरोबर त्यांचे मनात दयाही ओतप्रोत होती, म्हणून लोक त्यांची सेवा करण्यात भूषण मानीत.

शिवाजीराजे दयाळू व पापभीरू होते की नाही याचा पुष्कळांना संशय वाटतो. परकियांना तर ते पैसा व सत्ता यांच्या लोभाने अंध झालेले व दुष्ट असे दिसतात. परंतु या प्रश्नावर मत देताना अनेक गोष्टींचा विचार केला पाहिजे. शिवाजीराजांनी अनेक शहरे व गावे लुटली, परंतु केवळ लुटीसाठी कोणाचा जीव घेतला किंवा नुसती मारहाण केली, असे एकही उदाहरण नाही. उलट पक्षी गोरगरीब अगर स्त्रिया यांचे त्यांचेकडून काळजीपूर्वक संगोपन झाल्याची शेकडो उदाहरणे आहेत. याकामी ते मगरूर लोकांचा काळ व गरिबांचा मायबाप होते. विनाकारण त्यांचेशी तेढ ठेवणारास त्यांचेकडून चांगलीच अद्दल घडत असे. ते क्रूर व दुष्ट होते हा प्रवाद श्रीमंत व गर्विष्ठ लोकांकडून निघालेला आहे. त्या प्रवादाचा विचार करताना गरीब लोक त्यांना देवाप्रमाणे भजत असत, हेही ध्यानात ठेवले पाहिजे. त्याचप्रमाणे ते सहसा लढाई किंवा प्राणहानी न करता युक्तीने प्रसंग निभावून नेत. श्रम, खर्च व रक्तपात यांशिवाय एखादी गोष्ट सिद्धीस जात असेल तर बुद्ध्याच लढाईचे प्रकार त्यांनी कधी केले नाहीत. मागे ज्या मोहिमा सांगितल्या आहेत, त्यात प्रत्यक्ष शिवाजीराजांनी स्वपराक्रमे अनेक प्रसंगी समरांगणावर जय मिळवून आपल्या पक्षाची बाजू बचावलेली आहे. तसेच अफझलखानाचे भेटीस दुसऱ्या कोणास न पाठवता स्वत: एकटे गेले, असल्या अनेक प्रसंगी जाणूनबुजून त्यांनी संकटात उडी घातली आहे. शिवाजीराजे आचरणाने पवित्र होते. त्यांची राहणी अगदी साधी असे, तरी त्यांचा खर्च कमी नव्हता. ते अंत:करणाचे उदार असून, आपल्या लोकांना बक्षिसे व वतने देऊन ते नेहमी खूष ठेवीत असत. त्यांची कामगिरी बजावताना सर्वांना अशी खात्री असे, की 'शिवाजीराजे आपल्या मुलाबाळांना कधी कमी पडू देणार नाहीत.' या खात्रीमुळे त्यांची कामगिरी बजावण्यास लोक आपल्या जिवाकडेही पाहत नसत. इतके करूनही शिवाजीराजांनी पैसा पुष्कळ शिल्लक टाकला. ते कोणास मुलूख तोडून देत नसत आणि थोड्या खर्चात पुष्कळ काम भागवत. त्यांचा बहुतेक पैसा फौज व किल्ले यात खर्च होत असे. अडाणी दिसणाऱ्या मावळे लोकांच्या हातून त्यांनी अजब पराक्रम करविले, यावरून त्यांची योजकबुद्धी व्यक्त होते. त्यांची मसलत नेहमी दूरदृष्टीची असे. पुष्कळदा आपला बेत जवळच्यांना पसंत पडला नाही तर देवीचा कौल घेऊन तदनुसार ते आपले उद्युक्त सिद्धीस नेत. पुस्तकी विद्या विशेष येत नसातानाही सर्व ठिकाणच्या राजकारणांचे धागेदोरे ओळखून व गुप्तहेरांकडून संपूर्ण माहिती आणवून राजव्यवहाराचे बिकट प्रसंग ते मोठ्या खुबीने सिद्धीस नेत असत. प्रत्यक्ष अनुभवाने मनुष्यस्वभावाचे ज्ञान त्यांना उत्कृष्ट झाले होते. औरंगजेब बादशहानेही

त्यांच्या कर्तृत्वाची तारीफ केली आहे. शिवाजीराजे सर्वांशी प्रसन्नतेने वागत असत. 'प्रत्येकास' असे वाटावे की, राजांचे मन 'आपणावरच' आहे आणि आपणाशीच ते मनमोकळे करून बोलतात. सर्वांची चित्ते त्यांनी आपणाकडे आकर्षून घेतली होती. अशा काही प्रसिद्ध व्यक्ती असतात की, त्यांचा समागम अल्पकाळ झाला असतानाही ते श्रोत्यांना तात्काळ आपल्या भजनी लावतात. अशांपैकी शिवाजीमहाराज होते. जयसिंह व जसवंतसिंह यांची मने त्यांनी अल्पावकाशातच आकर्षून घेतली. औरंगजेबाची व त्यांची भेट स्वस्थपणे झाली नाही. ती झाली असती तर त्या दोघांमधील पुढील व्यवहारांना कदाचित निराळे स्वरूप आले असते.

बहुजन समाजाची प्रचलित भावना साफ बदलून, त्यास कार्यप्रवण करणारा व एकंदर राष्ट्रास स्वातंत्र्याची ओळख पटवून देणारा शिवाजीराजांनंतर दुसरा पुरुष आपल्या इकडे झाला नाही. या नवीन शिस्तीचे महत्त्व पुढे राष्ट्राच्या आपत्प्रसंगी कळून आले. नवीन राज्य संस्थापकांना स्वसंरक्षणार्थ काहीतरी विशिष्ट पद्धत अमलात आणावी लागते. मुसलमानांनी देश जिंकण्यास सुरुवात केली, तेव्हा जिंकलेल्या लोकांना स्वधर्मात आणून अगर त्यांचेवर जिझिया सारखे कर बसवून त्यांतून फौजेचा खर्च भागविण्याची शक्कल त्यांनी काढली. इंग्रजांनी सब्सिडियरी सिस्टिम काढून आपली तैनाती फौज जिंकलेल्या प्रदेशाच्या बचावार्थ ठेवून दिली, तिचा उगम शिवाजीराजांच्या चौथाईत दिसून येतो. शिवाजींनी जिंकलेल्या मुलुखावर 'चौथाई' म्हणून नवीन हक्क बसवला. त्याच्या उत्पन्नातून फौज ठेवून जिंकलेल्या प्रदेशाचे संरक्षण करावयाचे, अशी त्यांची योजना होती. पेशव्यांनी वगैरे पुढे शिवाजींच्याच पद्धतीची वृद्धी करून मराठ्यांचे राज्य काही दिवस चालवले. सारांश, शिवाजीराजांनी स्वराष्ट्रास जिवंतपणा आणला हे त्यांचे मोठे कर्तृत्व होय.

खाफीखान शिवाजीराजांविषयी म्हणतो. 'आपले राज्यातील लोकांचा मान कायम राखण्याविषयी शिवाजीराजांचे प्रयत्न एकसारखे चालू होते. देशात बंडाळी करावी, लंमाणे लुटावी, येणेकरून लोकांना त्रास होई खरा; परंतु ह्यापलिकडे कोणतेही नीच कृत्य त्यांचे हातून घडत नसे. त्यांचे हातात सांपडलेल्या मुसलमान जातीच्या बायकामुलांच्या अब्रूस त्यांनी कधीही धक्का लागू दिला नाही. ह्या बाबतीत त्यांचे हुकूम इतके साफ होते की ते मोडणारास ते शिक्षा दिल्याशिवाय राहत नसत.'

औरंगजेबाचे उद्गारही असेच प्रशंसापर आहेत. 'शिवाजी मोठा लढवय्या होता. हिंदुस्थानातील प्राचीन राज्ये बुडविण्याचा उद्योग मी सतत चालवला असताना, नवीन राज्य स्थापन करण्याचे महत्कार्य शिवाजीराजांशिवाय दुसऱ्या कोणाकडूनही झालेले नाही. सारखी एकोणीस वर्षे माझी फौज त्याचेबरोबर झडगत आहे; तरी त्याचे राज्याची दिवसेंदिवस भरभराटच होत आहे.'[142]

शिवाजीराजांच्या राज्यस्थापनेचे स्वरूप अनेक दृष्टींनी ध्यानात ठेवण्यासारखे आहे. महाराष्ट्रीयांचे एक राष्ट्र बनून त्यांना स्वतंत्रता प्राप्त झाली आणि जगाच्या इतिहासात मराठ्यांचे नाव इतर अनेक लोकांप्रमाणे लुप्त न राहता प्रसिद्धीस आले. त्या नावाचा दरारा अद्यापही वाटत आहे. तसेच महाराष्ट्रीय लोकांच्या अंगी असलेले अनेक गुण बाहेर प्रसिद्ध होण्याची संधी या राज्यस्थापनेने मिळाली. अंगी कसब आहे, पण प्रसंग नाही तर ते निरुपयोगी होते. प्रसंग येऊन अंगात कसब नाही, तर तो प्रसंग व्यर्थ जातो. हा सुयोग शिवाजीराजांच्या वेळेस जुळून आला. तिसरी गोष्ट अशी की महाराष्ट्रात परस्परविरोधी अनेक जाती असून शिवाजीराजांचे पूर्वी लोक विस्कळीत होते. शिवाजीराजांनी त्यांच्याठिकाणी ऐक्य उत्पन्न केले, म्हणजे प्रत्येक इसमाचे स्वत:चे संबंधाने व समाजाचे संबंधाने असे दोन प्रकारचे कर्तव्य असून ह्या दोन कर्तव्यांचा विरोध टाळून, दोन्ही कशी साधावी, हे शिवाजीराजांनी लोकांना शिकवले. ब्राह्मण, मराठे, प्रभू, वैश्य, शूद्र इत्यादी नाना जातींच्या लोकांनी, आपली जात पाहिजे तर आपल्या घराच्या उंबरठ्याच्या आत खुशाल पाळावी, परंतु बाहेर आल्यावर कोणत्याही सार्वजनिक कामात सर्व लोक सारखे, सर्वांनी एकदिलाने राष्ट्रहित, समाजहित, सार्वजनिक हित साधलेच पाहिजे. हे कर्तव्य करण्यास जो चुकेल तो प्राणास मुकला, त्यास मोक्ष नाही, त्यास इहपरलोकी सुख नाही. अशाप्रकारे स्वकर्तव्य बजावण्याची अपरिहार्य जबाबदारी शिवाजीराजांनी प्रत्येक इसमाच्या मागे लावून दिली. ह्या जबाबदारीचा पगडा महाराष्ट्रीयांच्या मनावर कसकसा कमी जास्त होत गेला, ह्या प्रश्नाचा सूक्ष्म दृष्टीने विचार करणे म्हणजेच महाराष्ट्रेतिहासाचे अध्ययन करणे होय.

शिवाजीराजांचा एकंदर उद्योग धर्माच्या भावनेवर उभारलेला होता. आज ती भावना आपणास पटो वा न पटो, परंतु शिवाजीराजांच्या अंत:करणात ती सदैव जागृत होती, याविषयी तिळमात्र संदेह नाही. बहुधा असे कोणतेही महत्कृत्य त्यांनी अंगिकारलेले दिसत नाही की ज्याचा आरंभ करताना त्यांनी कोणातरी सत्पुरुषाचा आशिर्वाद किंवा प्रसाद मिळवला नाही. याची उदाहरणे मागे ठिकठिकाणी दिली असून त्यांच्या शेकडो सनदा छापलेल्या आहेत, त्यात ही भावना उत्कटतेने प्रत्ययास येते. बहुधा असे कोणतेही प्रसिद्ध देवस्थान महाराष्ट्रात नाही की ज्याचे दर्शन केव्हा-ना-केव्हा तरी शिवाजीराजांनी घेतले नाही. चिंचवडचे देव तर त्यांचे धर्मगुरुच होते. ते गणपतीपुळ्यास गेले असताना तेथील मंदिरास त्यांनी वर्षासन करून दिले. मंदिरास लागून भंडारी यांचा बाग होता, तो माडी तयार करी, त्यावरून त्या भंडाऱ्यास तेथून काढून दुसरी जागा दिली. पुढे या भंडाऱ्याचा बोभाटा चालू राहिला तो संभाजीराजे व राजाराम महाराजा यांनी मिटविला.[143]

‘स्वभावो दुरतिक्रम:’ असे एक विधान आपण सामान्यत: व्यवहारात वापरतो आणि व्यक्तीचा किंवा राष्ट्राचा स्वभाव बहुधा कधी बदलत नसतो असा भाव व्यक्त करतो. परंतु

अशा काही थोर व्यक्ती राष्ट्रात कधी काळी उदय पावतात की त्या आपल्या कर्तबगारीने सबंद राष्ट्राचा स्वभाव साफ बदलून टाकतात. अशा व्यक्तींपैकी शिवाजीराजे ही एक अलौकिक विभूती निर्माण झाली. शिवपूर्वकालीन कागदपत्रे वाचली म्हणजे खून, मारामाऱ्या, जाळपोळ, कपटविद्या, बेबंदशाही इत्यादि अनीतिच्या प्रकारात महाराष्ट्रात जणू काय ऊतच आला होता. त्या प्रवृत्तीस आळा घालण्याचे प्रयत्न बहामनी सुलतानांनी वाटेल तितके केले, पण ते सफल झाले नाहीत. परंतु याच राष्ट्रीय स्वभागाचा फायदा शिवाजीराजांनी मोठ्या युक्तीने आपल्या कार्याकडे करून घेतला. आरंभी काही काळ आपण स्वत: त्या बेबंदशाहीत समरस झाल्यासारखे दाखवून एकएका देशमुखास व आजुबाजुच्या प्रमुखांस आपल्या भजनी लावून घेतले आणि मावळ प्रांतावर आपला ताबा बसवला. पुढे आपली सत्ता अप्रतिहत सुरू झाली असे लक्षात येताच त्याने सर्वत्र अशी कडक शिस्त बसवली की लुटीतील किंवा चोरीतील सुतळीचा लहानसा तुकडा सुद्धा लपवून ठेवण्याची लोकांना धास्ती वाटू लागली. मोऱ्यांच्या प्रकरणानंतर दांडगाईचे किंवा गैरशिस्तीचे एकही उदाहरण शिवाजीराजांच्या ताब्यातील प्रदेशात घडलेले दिसून येत नाही. चोरी जाळपोळीचा रोजचा खेळ अजिबात बंद पडून उलट अशा वर्तनाने झालेले लोकांचे नुकसान आपणासच भरून द्यावे लागेल अशी दहशत घरोघर निर्माण झाली. अल्पकाळातच देशात न्यायी कारभाराचा पगडा बसून पूर्वीची आसुरी प्रवृत्ति महाराष्ट्रातून साफ नाहीशी झाली. अमात्याच्या राजनीतिचे मनन केले असता लोकांच्या राष्ट्रीय स्वभावात शिवाजीराजांनी केवढी क्रांती घडवून आणली ते ध्यानात येते. याच कारणास्तव शिवाजीसारख्यांना 'थोर' हे अभिधान प्राप्त झाले असे सूक्ष्म विचारांती आपणास दिसून येईल. याच हेतूने 'राजा कालस्य कारणं' ही उक्ती सार्थ ठरते.

शिवाजीराजांच्या एकंदर परिश्रमांचे स्वरूप व फल यांचे मार्मिक वर्णन रामचंद्र नीलकंठ अमात्याच्या 'राजनीति' या ग्रंथात उपलब्ध आहे. त्याचे इंग्रजी रुपांतरही झालेले आहे. ज्या कोणास शिवाजीराजांच्या चरित्राचा अभ्यास करावयाचा असेल त्याने हे प्रकरण अभ्यासले पाहिजे. मासल्यासाठी खाली एक लहानसा उतारा देतो :-

'दक्षिण प्रांती आदिलशाही, कुत्बशाही व निजामशाही ही महान संस्थाने, तसेच मोगल एकेक सुभा लक्षलक्ष स्वारांचा, याविरहित श्यामल, फिरंगी, इंग्रज, वलंदेज रामनगरकर, पाळेगार, सोंधे बिदनूर म्हैसूरवाले, त्रिचनापल्ली आदिकरून संस्थानिक, तसेच जागजागा पुंड, चंद्रराव, शिर्के, सावंत, दळवी, वरघाटे निंबाळकर, घाटगे आदिकरून देशमुख सकलही पराक्रमी सज्ज असतानाही, बुद्धिवैभव पराक्रमे, कोणाची गणना न करता, कोणावर चालून जाऊन, तुंबळ युद्ध करून रणांशी आणले, कोणावर छापे घातले, कोणास परस्परे कलह लावून दिले. कोणाचे मित्रभेद केले, कोणाच्या डेऱ्यात शिरून मारामारी केली, कोणाशी एकांगी करून पराभविले, कोणाशी स्नेह केले, कोणाच्या दर्शनास आपण होऊन गेले, कोणास दर्शनास आणिले, कोणास परस्परे दगे करविले, कोणी इतर प्रयत्ने

नकळत त्यांच्या देशात जबरदस्तीने स्थळे बांधून अनुक्रमे आकळले. जलदुर्गसहित होते. त्यांस नूतनच जलदुर्गनिर्माण करून पराभविले. दुर्घट स्थळे नौकामार्गे प्रवेशिली. असे ज्या-ज्या उपाये जो-जो शत्रू आकळावा त्या-त्या उपाये तो-तो शत्रू पादाक्रांत करून सालेली अहिवंतापासून चंजी कावेरीतीरापर्यंत निष्कंटक राज्य, शतावधि किल्ले तसेच जलदुर्ग, किती एक विशाल स्थळे, चाळीसहजार पागा, साठ-सत्तर हजार शिलेदार, दोन लक्ष पदाति, कोट्यवधी खजिना, तसेच उत्तम जवाहीर, सकळ वस्तुजात संपादिले सिंहासनारूढ होऊन छत्र धरून छत्रपती म्हणविले. धर्मोद्धार करून देवब्राह्मण संस्थानी स्थापून यजनयाजनादि षट्कर्मे वर्णविभागे चालवली. तस्करादि अन्यायी यांचे नाव राज्यातून नाहीसे केले. देश दुर्गादि सैन्यादि बंद नवेच निर्माण करून एकरूप अव्याहत शासन चालवले. केवळ नूतन सृष्टिच निर्माण केली. औरंगजेबासारिखा महान शत्रू परीतापसागरी निमग्न करून दिगंत विख्यात कीर्ति संपादली, ते हे राज्य.'

या उताऱ्यात शिवाजीराजांची युक्ती, शक्ती व कमाई सफाईने वर्णिलेली असून तो तत्कालीन राजनीतीचा मासला आहे.[144]

शिवाजीराजांचे चरित्र थोर पुरुषांनी उत्तमोत्तम कवने करून वर्णिलेले आहे. परमानंद कवींचे शिवभारत, भूषण कवीची शिवाबावनी व भूषण काव्य, जयसिंहास लिहिलेले शिवाजीराजांचे फारसी पत्र, समर्थ रामदासांची आनंदवनभूवन इत्यादि प्रकरणे, जयराम कवीचे पर्णाल पर्वताख्यान, तुळसीदास व अज्ञानदास यांचे पोवाडे, चित्रगुप्तांचे काव्य, अमात्यांचे गद्यकाव्य म्हणजे राजनीति, राजव्यवहार कोशाची प्रशस्ति, असे कित्येक महनीय पुरुषाचे कथाप्रबंध अत्यंत रसाळवाणीने व अंत:करणाच्या तीव्र स्फूर्तीने लिहिलेले वाग्देवीला शोभविणारे अलंकारच होत. शिवाजीराजांच्या नानाविध बखरीसुद्धा उत्कट भावनेने वाचकांचे मन उचंबळून टाकणाऱ्या आहेत. पुढील समर्थांचे वर्णन पहा.

आनंदवनभूवन

खवळले लोक देवाचे। मुख्य देवचि ऊठिला॥
कळेना काय रे होते। आनंदवनभूवनी॥
दिक्पती चालिले सर्वै। नाना सेना परोपरी॥
वेष्टीत चालले सगळे। आनंदवनभूवनी॥
येथून वाढला धर्मू। यमा धर्म-समागमे॥
संतोष मांडिला मोठा। आनंदवनभूवनी॥
बुडाले भेदवाही ते। नष्ट चाडाळ पातकी॥
ताडिले पाडिले देवे। आनंदवनभूवनी॥
देवालये दीपमाळा। रंगमाळा बहुविधा॥
पूजिला देव देवांचा। आनंदवनभूवनी॥

सामर्थ्ये येश कीर्तिची। प्रतापे सांडिली सीमा।
ब्रीदेचि दीधली सर्वै। आनंदवनभूवनी॥
येथूनि वाचती सर्वै। ते ते सर्वत्र देखती॥
सामर्थ्य काय बोलावे। आनंदवनभूवनी॥
महिमा तो वर्णवेना। विषेष बहुता परी॥
विद्यापीठ ते आहे। आनंदवनभूवनी॥

2) हिंदुपद पातशाहीची उभारणी :

राज्याभिषेकाचा जाहीर समारंभ करण्यात शिवाजीराजांचा उद्देश केवळ महाराष्ट्रावर आपले स्वराज्य स्थापावे एवढाच होता की समस्त हिंदुस्थानावर गुप्तहर्षादिकांप्रमाणे हिंदूंचे सार्वभौम राज्य स्थापन करण्याचा होता हा प्रश्न इतिहासात विचारणीय असून त्याचा अल्प निर्देश येथे करणे आवश्यक आहे. पुण्याच्या आजूबाजूस बापाची लहान जागीर होती, तिच्या जोपासनेतून शिवाजीराजांनी हिंदुधर्मसंरक्षणाचे ब्रीद धारण करून द्वीपकल्पांतर्गत प्रदेशावर स्वराज्यस्थापन केले त्याचा उद्देश मुसलमानांचा उच्छेद करण्याचा बिलकूल नव्हता. मुसलमान राज्यकर्त्यांनी हिंदुधर्माचा नि:पात चालवला, तो बंद करावा आणि सर्वांना धर्माचरणाचे पूर्ण स्वातंत्र्य असावे एवढीच मनीषा शिवाजीराजांनी धारण केली. रामदासांचे शिष्यत्व स्वीकारण्यात त्यांचा हाच हेतू व्यक्त होतो. मुसलमानी अमलाखाली आपल्या अंगच्या पराक्रमाचे मातेरे होते ही गोष्ट वडील-मातुश्रींच्या आयु:क्रमावरून त्यांच्या मनावर बिंबली आणि सर्व लोकांना भरपूर पराक्रमक्षेत्र शिवाजीराजांनी उत्पन्न केले. गोब्राह्मण प्रतिपालनाचे ब्रीद, अष्टप्रधानादि संस्था, सिंहासनारोहण, राज्याभिषेकशकाची निर्मिति, चौथाई सरदेशमुखीचा अवलंब इत्यादि प्रकारांवरून शिवाजीराजांचा पाया इतका मजबूद व विस्तृत रचलेला दिसतो, की त्याजवर समस्त हिंदुपदपातशाहीची इमारत सहज उभारता यावी. पुढे पेशवाईत या व्यवस्थेत कित्येक अनिष्ट फेरफार घडून आले असले तरी शिवाजीराजांची ही विस्तृत महत्त्वाकांक्षा मराठेशाहीच्या अखेरपर्यंत महाराष्ट्रमंडळाच्या नजरेसमोर सारखी वावरत होती. बाजीराव, मुरारराव घोरपडे, महादजी शिंदे, माधवराव पेशवे, रघूजी भोसले इत्यादि पुरुषांनी याच हेतूच्या सिद्ध्यर्थ, कष्ट केले. जयसिंह, जसवंतसिंह, छत्रपाल, मादण्णा इत्यादि स्वधर्मी राजपुरुषांस शिवाजीराजांनी ममत्वाच्या दृष्टीने वळवून घेतले. शिवाजीराजांनी जयसिंहास लिहिलेले म्हणून जे सुप्रसिद्ध पत्र उपलब्ध आहे त्यात किंवा औरंगजेबास त्याने जिझियाचे बाबतीत लिहिलेल्या पत्रात हाच भाव व्यक्त होतो. 'येन श्रीजयसिंहेन दिल्लींद्रपदलिप्सव:। शिवप्रभृतिभूपाला वशं नीता स्वतेजसा॥[145] या जयसिंह प्रशस्तीतील वचनात दिल्लींद्राचे पद हिंदूकडे आणण्याची

भावना उघड दिसते. मालोजी घोरपड्यांस व बंधू एकोजींस शिवाजीराजांनी लिहिलेली पत्रे आहेत, तीसुद्धा हाच प्रकार बोलतात. जसजसे शिवाजीराजांना यश येत गेले, तसतशी त्यांची ही हिंदुपदपातशाहीची योजना दृढ होत गेली. विशेषत: बादशहाचे भेटीस जाण्याचे साहस स्वीकारण्यात सर्व देश स्वत: हिंडून परिस्थिती प्रत्यक्ष समजून घेण्याची त्यांची इच्छा व्यक्त होते. बजाजी निंबाळकर, नेताजी पालकर इत्यादिकांस शुद्धिसंकाराने स्वधर्मात आणण्याचे प्रयोजन या हिंदुपदपातशाहीसाठी उत्पन्न झाले. आगऱ्यातून सुटका झाल्याबरोबर शिवाजीराजांचा लौकिक सर्व देशभर पसरला. कविभूषण[146], छत्रसाल बुंदेला, गागाभट्ट इत्यादि उत्तरेतील गृहस्थांना शिवाजीराजांच्या दर्शनाची उत्कंठा लागली आणि मुसलमानांपासून हिंदूंचे संरक्षणासाठी परमेश्वरानेच हा त्राता पाठविला अशी भावना उत्पन्न झाली. कविभूषण शिवाजीराजांपाशी येऊन कैक वर्षे राहिला आणि त्याने 'शिवराजभूषणकाव्य' हा ग्रंथ लिहिला. शिवाजीराजांप्रमाणेच छत्रसाल बुंदेलाही आपल्या मायभूमीच्या व स्वधर्माच्या रक्षणासाठी पराकाष्ठेचे प्रयत्न करीत होता. त्याने जयसिंहाच्या पदरी नोकरी पत्करून दक्षिणेत येऊन शिवाजीराजांची भेट घेतली. यावरून हिंदुपदपातशाहीची कल्पना त्यावेळी देशात किती तीव्रतेने वावरत होती हे लक्षात येते.

खुद्द औरंगजेबाच्या वर्तनावरूनच शिवाजीराजांचा हेतू स्पष्ट होतो. हिंदुपदपातशाहीचा मराठ्यांचा प्रयत्न बुडवावा म्हणून स्वत: त्यांनी पंचवीस वर्षे दक्षिणेत युद्ध चालवले. दक्षिणेत जिंजीपर्यंत स्वारी करून बंधू एकोजीला विजापूरच्या नोकरीतून सोडवण्यात शिवाजीराजांचा उद्देश हिंदुसंघटनेचाच दिसतो. शिवाजीराजांनी उत्पन्न केलेले हे उद्दिष्ट पेशवाईत सुद्धा मराठीमंडळांच्या दृष्टीपुढे अव्याहत खेळत होते.

धर्मसंस्थापना हेच शिवाजीराजांच्या उद्योगाचे अधिष्ठान असले तरी त्यात परधर्माचा उच्छेद बिलकूल अभिप्रेत नव्हता. धर्माचरण प्रत्येकाने स्वेच्छेनुसार करावे, त्यास कोणी अडथळा किंवा जुलूम करू नये अशीच सहिष्णु भावना शिवाजीराजांची होती. मूळचे हिंदू असून जे जबरदस्तीने मुसलमान केले गेले त्यांनी केव्हाही परत स्वधर्मात येण्याची इच्छा दर्शविताच त्यास शास्त्रसंमत विधिने शिवाजीराजांनी प्रायश्चित्त देववून परत घेतले. परंतु मुसलमानांना बिलकूल उपद्रव दिला नाही. मुसलमानी देवस्थानांस त्यांनी हिंदूंच्या बरोबरीने इनामे व नेमणुका करून दिल्या. लुटीत सापडलेले कुराणाचे ग्रंथ त्यांनी सन्मानपूर्वक परत मालकांच्या हवाली केले. हिंदू संतांप्रमाणेच 'बाबा याकूत'सारख्या मुसलमान साधुपुरुषावर त्यांची पूर्ण भक्ती होती. त्यांचे मुख्य नाविक 'दौलतखान' व 'सिद्दी मिस्त्री' मुसलमान होते. 'मदारी मेहतर' या मुसलमान फरासाने आगऱ्यास त्यांचा जीव वाचवला. 'मुल्ला हैदर' नावाचा विद्वान गृहस्थ शिवाजीराजांपाशी फारशी भाषा लेखक किंवा चिटणीस होता.[147] सन 1673 मध्ये शिवाजीराजांनी त्यास बहादूरखानाकडे वकिलीस पाठवले. शिवाजीराजांचे मृत्युनंतर संभाजींशी त्याचे पटले नाही, तेव्हा मुल्ला हैदर सन

1683 मध्ये औरंगजेबाचे पदरी नोकरीत राहिला. त्यास बादशहाने दोन हजारी मनसब ठरवून नातू अजीमुश्शान यास पढविण्याचे काम दिले. नंतर काही वर्षांनी त्यास दिल्ली येथे मुख्य काजीची नेमणूक मिळाली आणि जून सन 1706 मध्ये तो तेथेच मुख्य काजी म्हणजे बादशाहीतला सरन्यायाधीश झाला. सारांश सर्व धर्मियांना समतेने वागविण्याचा शिवाजीराजांचा बाणा होता आणि हाच बाणा मराठेशाहीच्या अखेरपर्यंत यथायोग्य पाळला गेला.

धार्मिक, सामाजिक वगैरे बाबतीसंबंधाने शिवाजीराजांची मनोरचना तत्कालीन विचारांना अनुसरून होती. मात्र कोणतेही स्वीकृत कार्य सिद्धीस नेण्यासाठी लोकसंग्रहाची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे तितक्यापुरते पुढे पाऊल टाकण्यास त्यांनी कधी संकोच मानला नाही. राज्याभिषेक-समारंभ करण्याचे ठरल्यावर आपण क्षत्रिय आहोत हे त्यांनी शास्त्राधारे सिद्ध केले. बजाजी निंबाळकर, नेताजी पालकर वगैरे अनेक मंडळींना त्यांनी परत स्वधर्मात घेवविले. समर्थ रामदास, बाबा याकूत वगैरे सत्पुरुषांचा शुभाशिर्वाद मिळवून त्यांनी आपले उद्योग यशस्वी करून दाखवले. भवानीदेवीचा कृपाप्रसाद भक्तिभावाने संपादन करण्याची त्यांची वहिवाट नेहमीचीच होती. अशा भक्तिभावात खरोखर त्यांची मनाची श्रद्धा किती होती, अथवा त्यात केवळ लोकोपचार किती होता हे ठरवणे कठीण आहे. मात्र त्यांची मुख्य नजर आपल्या कार्यावर होती, त्या कार्यास समर्थांसारख्या साधूचा उपयोग घडत असेल तर तो करून घेण्यास ते सदैव तत्पर असत. नाना मतांचे व नाना पेशांच्या लोकांची त्यांना गरज असल्यामुळे त्यांनी केवळ स्वत:च्या आग्रहाखातर कोणाचाही स्वीकार अगर अव्हेर केला नाही. अनेक गुरूंपासून त्यांनी मंत्रोपदेश घेतले, यातसुद्धा त्यांचा मुख्य हेतू स्वराज्यसिद्धी हा असून पारमार्थिक कल्याणाचा नव्हता. याच भावनेने त्यांनी रामदासांचा परामर्ष घेऊन त्यांचेवर भक्ती ठेवली. त्यांच्या राजकारणास रामदासांचा उपयोग किती झाला, तसेच रामदास हे राजकारणी साधू होते किंवा नाही हे निश्चयात्मक ठरवणे कठीण आहे. निदान तसा सबळ व नि:संदिग्ध पुरावा अद्यापि मिळालेला नाही. इतर गुरूंच्या किंवा सत्पुरुषांच्या ठिकाणी जशी शिवाजीराजांची पूज्यबुद्धि होती, तशीच रामदासांच्या ठिकाणीही होती. असे पुरुष फार तर त्यांचे 'मोक्ष गुरु' होते असे म्हणता येईल. 'परंतु तेवढ्यावरून रामदासांनी त्यांना राजकारण पढविले' असे म्हणता येणार नाही. शिवाय हा प्रश्न ज्याच्या त्याच्या भावनेचा व मनोरचनेचा असल्यामुळे निव्वळ ऐतिहासिक विवेचनात त्यांना प्राधान्य देणे युक्त नाही. 'खुद्द रामदासांनाही -आपण राजकारणी पुरुष आहोत- असे म्हणवून घेणे किती पटले असते कोणास ठाऊक!' असे म्हटल्याने रामदासांची योग्यता बिलकूल कमी होत नाही. समर्थ रामदास व शिवाजीराजे दोघेही आपापल्या परी थोर पुरुष होते, मात्र त्यांची कर्तव्ये भिन्न होती.

3) शिवाजीराजांचे प्रधानमंडळ :

राज्याभिषेक प्रकरणात शिवाजीराजांच्या प्रधानमंडळाची उत्पत्ति सांगितली आहे. रणशौर्य व मुत्सद्दी शहाणपण ह्या दोन्ही बाबतीत शिवाजीराजांनी प्रवीणता मिळवली, हे त्या पुरुषाच्या महान योग्यतेचे दर्शक होय. एखादा पूर्वीचा आधार अगर अनुकूल परिस्थिती ह्यांपैकी काहीच साह्य प्रथम शिवाजीराजांना नव्हते. असे असतानाही शिवाजीराजांनी नवीन राज्य स्थापन करून, ते चिरकाल व मजबूद रहावे अशी योजना करून ठेवली. ती योजना देशकालाच्या मानाने इतकी योग्य, मजबुदीच्या मानाने इतकी भक्कम व उपयुक्ततेच्या मानाने इतकी सर्वव्यापी होती, की शिवाजीराजांचे पश्चात अनेक वर्षे ती मोडून काढण्याविषयी अनेकांचे प्रयत्न चालू असतानाही, मराठी राज्याचे कित्येक अवशेष हल्लीच्या स्थित्यंतरात सुद्धा कायम आहेत. शिवाजीराजांची अष्टप्रधानमंडळाची योजना मोठ्या दूरदृष्टीची होती. या योजनेमुळे स्वसंरक्षण व राज्यसंवर्धन ही दोन प्रधान कामे पुढे महाराष्ट्रीयांना करता आली. औरंगजेबाच्या प्रचंड शक्तीशी झगडा करून विजय पावण्यास हे प्रधान चौथाईच्या जोरावर समर्थ झाले. कामांची वाटणी करण्याच्या हेतूने शिवाजीराजांनी अष्टप्रधान नेमले. त्यांची नावे व कामे थोडी बहुत अलिकडच्या प्रधानमंडळासारखी असली तरी त्यातले फरकही तितकेच ठळक होते. पेशवा हा मुख्य प्रधान, त्याच्या खालोखाल सेनापती, त्याच्या खाली मुलकी प्रधान म्हणजे शिवाजीराजांचा अमात्य, त्याच्या खाली परराज्यसंबंधी प्रधान म्हणजे शिवाजीराजांचा सुमंत. हिंदुस्थान सरकारच्या प्रधानमंडळात मंत्री, पंडितराव व न्यायाधीश हे तीन प्रधान नाहीत. शिवाजीराजांचा खासगी चिटणीस वेगळा होता, तो हल्लीच्या प्रायव्हेट सेक्रेटरीसारखा असून, त्यास प्रधानमंडळात जागा नव्हती. मंत्री हा त्याहून श्रेष्ठ असून तो प्रधानमंडळात होता. शिवाजीराजांचा मुख्य न्यायाधीश अष्टप्रधानात होता, तसा हिंदुस्थान सरकारच्या रचनेत लॉ-मेंबर आहे.

शिवाजीराजांनी अधिकाऱ्यांना स्वतंत्र जागिरी तोडून दिल्या नाहीत. त्यांची कामे वंशपरंपरा चालावीत अशीही त्यांची योजना नव्हती. त्यांनी आपले प्रधान अनेकवेळा बदलले. अंगची योग्यता हेच अधिकार मिळविण्याचे उत्तम साधन असा प्रघात त्यांनी घातला. त्यांचे सर्व प्रधान अनेक बिकट प्रसंगात नावाजलेले व त्यांच्या धोरणात वाकबगार होते. ह्यांवरून विचार करता शिवाजीराजांचे राज्य लोकनायक, रणधुरंधर व मुत्सद्दी अशा पुरुषांच्या हातात होते. मोगलांच्या राज्यात करडा लष्करी अंमल गाजविणारा एक सुभेदार व त्या जोरावर प्रांताचा वसूल वाढविणारा एक दिवाण, असे दोन कामगार असत. प्रांतात बंडावे न होऊ देता राज्याचा वसूल जो वाढवील त्यासच ही कामे बादशहाकडून देण्यात येत. तसा प्रकार आपला न व्हावा अशी दक्षता ठेवून शिवाजीराजांनी सर्व कामात वाकबगार असे प्रधान नेमले. त्यांत एकट्या सेनापतीचे महत्त्व विशेष नव्हते.

प्राचीन भारतीय राजनीतित प्रधानांचे महत्त्व विशेष आढळे. निरनिराळ्या ग्रंथांत सात, आठ, दहा, बारा, सोळा, वीस मंत्री असावे असे उल्लेख आहेत. मागे पृ.185-186 वरील आठ नावांपैकी सुमन्त्राबद्दल सुमन्त असा शब्द प्रचारात आला. पाड्विवाक शब्दाबद्दल त्याच अर्थाचा न्यायाधीश शब्द शिवाजीराजांनी स्वीकारला. प्रतिनिधी त्यावेळी नव्हता, त्याचेऐवजी सेनापती नवीन आला. असे अष्टप्रधानमंडळ शिवाजीराजांनी योजले. वास्तविक हे ते एकदम राज्याभिषेकप्रसंगी निर्माण केले अशातला भाग नाही. जरुरीप्रमाणे हे प्रधान हळूहळू वाढत गेले. नुसत्या प्राचीन शास्त्रग्रंथावर शिवाजीराजांची भिस्त नव्हती. प्राचीन ग्रंथांत पुरोधा म्हणजे पुरोहित हाच मुख्य सल्लागार असे, त्याला शिवाजींनी आपल्या प्रधानमंडळात मुख्य पद दिले नाही. राजा अल्पवयी असला किंवा आकस्मिकरित्या मरण पावला तर राज्ययंत्रास अडचण येऊ नये म्हणून विशिष्ट प्रतिनिधीची योजना असते, ती पुढे राजारामाचे संकटप्रसंगी निर्माण झाली. पेशव्याचा पगार सालीना सात हजार होन असून इतरांचा पाच हजार होता. एक होन म्हणजे साडेतीन रुपये समजण्यास हरकत नाही. जाबत्यात या प्रधानांची कामे दिलेली आहेत, ती अशी : (1)‘सर्वदर्शी प्रधानस्तु’ ‘राज्यचिन्ताभारसमुद्वाहन:’ अशा वर्णनाचा तो प्रधान, याने ‘सर्व राजकार्य करावे. राजपत्रावरी सिका करावा, सेना घेऊन युद्धप्रसंग करावा, तालुका स्वाधीन होईल तो रक्षून बंदोबस्त करून आज्ञेने वर्तावे. (2)अमात्य यांनी सर्व राज्यातील जमाखर्च चौकसी करून, दप्तरदार फडणीस त्यांचे स्वाधीन असावे. फडणिसी चिटणिसी पत्रांवर निशाण करावे. युद्धप्रसंग करावे. (3)सचिव यांनी राजपत्रे शोध करून अधिक-उणे अक्षण शोध करून मजकूर शुद्ध करावा. युद्धप्रसंग करून राजपत्रांवर चिन्ह संमत करावे. (4)मंत्री यांनी सर्वमंत्र (=गुपत हेरांकडील बातम्या) राजकारणे यातील त्यांचा सावधतेने विचार करावा. आमंत्रण निमंत्रण वाकेनिसी त्यांचे स्वाधीन, तालुका जतन करून युद्धादि प्रसंग करावे. राजपत्रावर संमतचिन्ह करावे. (5)सेनापती यांनी सर्व सैन्य रक्षण करून युद्धप्रसंग स्वारी करावी. तालुका स्वाधीन होईल तो रक्षून हिशेब रुजू करून आज्ञेने वर्तावे. फौजेचे लोकांचे बोलणे बोलावे. सर्व फौजेचे सरदारांनी त्यांजबरोबर चालावे. (6)पंडितराव यांनी सर्व धर्माधिकार धर्म-अधर्म पाहून विवक्षा करावी. शिष्टांचे सत्कार करावे. आचार-व्यवहार प्रायश्चित्तपत्रे होतील त्यांजवर संमत चिन्ह करावे. दानप्रसंग, शान्ति, अनुष्ठान तत्काळ करवावे. (7)न्यायाधीश यांनी सर्व राज्यातील न्याय-अन्याय मनास आणून बहुत धर्मे करून न्याय करावे. न्यायाच्या निवाडपत्रांवर संमत चिन्ह करावे. (8)सुमंत यांनी परराज्यातील विचार करावा. त्यांचे वकील येतील त्यांचे सत्कार करावे. युद्धादि प्रसंग करावे. राजपत्रावर संमत चिन्ह करावे. चिटणिसांनी राजपत्रे लिहावी. राजकारणपत्रे, उत्तरे, सनदा, दानपत्रे, महाली हुकूम, जाबता फडनिसी चिटणीसी, याप्रमाणे लिहावी. मात्र हातरोखे, नाजूक पत्रे अथवा खास दत्तक यांजवर मोर्तब चिटणिसांनीच करावे. त्याजवर वरकडांचा दाखला चिन्ह नसावे.

यावरून उघड आहे की न्यायाधीश व पंडितराव या दोहोंखेरीज इतरांना युद्धप्रसंग करण्याची शिवाजीराजांची ताकीद होती. या जाबत्यात कोणास किती अधिकार स्वतंत्रपणे दिलेले होते याचा उल्लेख नाही. प्रसंग पडल्यास कोणासही सर्वाधिकार वापरून निभावणी करावी लागे आणि प्रधानाने केलेले कृत्य साफ मोडून दुसराच काही प्रकार करण्यास छत्रपतीस पूर्ण अधिकार होता. सारांश या अष्टप्रधान मंडळाचे नियंत्रण छत्रपतींवर काही सुद्धा नव्हते. तो पाहिजे ते करण्यास पूर्ण मुखत्यार होता, ही गोष्ट संभाजींचे वेळी निदर्शनास आली. अर्थात कामाच्या वाटणी पुरतेच हे प्रधानमंडळ शिवाजीराजांनी बनवले आणि जरूर पडत गेली तसे अधिकारी त्यांनी नेमले. शिवाजीराजे कितीही कुशल राज्यकर्ता झाले, तरी ते संपूर्ण स्वमतानुचारी होते. त्यांच्या अधिकारास कायद्याचे किंवा लोकांचे नियंत्रण बिलकूल नव्हते ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. शिवाजीराजांच्या सर्व फौजा सदा शत्रूच्या मुलखात फाकलेल्या असत. त्यांच्या ताब्यात मुसलमान प्रजा पुष्कळ होती आणि प्रत्यक्ष मुसलमानी राज्ये शिवाजींराजे पायाखाली तुडवीत होते, तरी मुसलमान प्रजा शिवाजीराजांवर उठली नाही. इतकेच नव्हे तर त्या मुसलमानांसही शिवाजीराजांचे राज्यात स्वत्व वाटू लागले. शत्रूच्या फौजेतील अनेक मुसलमान लोक आपल्या धन्यास सोडून शिवाजीराजांच्या नोकरीत आले व त्यांस शिवाजीराजांनी मोठ्या सन्मानाने वागवले. शत्रू हातात सापडला असता, त्याचे पारिपत्य करण्याऐवजी, त्याला सन्मानाने व इतमामाने वागवून त्याचेपासून आपला फायदा करून घ्यावा, असा शिवाजीराजांचा प्रघात होता.

सामान्यत: कोणत्याही देशाच्या राज्यकारभारात लष्करी व दिवाणी अशी दोन अंगे मुख्यत: असतात. प्रथमत: अंतर्बाह्य शांतता राखण्यासाठी लष्करी अंगाची जरूरी असते. पण हे अंग प्रधान नव्हे. लोकसुखाचे साधन दिवाणी कारभारावर अवलंबून असते. ज्या राज्यात लष्करी सत्ता दिवाणी सत्तेच्या ताब्यात असते, त्या राज्यात लोकसुखाची मर्यादा अत्यंत वाढलेली असते,. शिवाजीराजांनी राज्यकारभाराची व्यवस्था ठरवली तेव्हा त्यांनी अशा लष्करी धोरणास अगदीच मागे ठेवले. आठ प्रधानांपैकी जरी प्रसंगत: लष्करी काम करावे लागत होते, तरी त्या प्रधानांचा मूळ उगम दिवाणी कारभार व्यवस्थित चालविण्याचा असून तेच शिवाजीराजे आपले मुख्य कर्तव्य समजत असत. स्वसंरक्षणातच राज्याची वृद्धी होत असते, आणि पुष्कळदा स्वसंरक्षण करीत असताना राज्यवृद्धीसाठी अनिवार हाव धरल्याचा आरोपही राज्यकर्त्यांवर येतो. शेजारच्या लोकांनी व सत्ताधिशांनी शिवाजीराजांना मान दिला पाहिजे, त्यांचा वचक बाहेर पूर्ण असला पाहिजे, नाही तर स्वत:चे राज्यातही त्यांचा टिकाव लागणे शक्य झाले नसते. कुल्र्याचे प्रांतातून हबश्याने ब्राह्मण पकडून ठार मारले की हबश्यावर दहशत बसविणे भाग पडे. प्रत्यक्ष शिवाजीराजांचा भाऊ एकोजी जोपर्यंत विजापूरचा ताबेदार आहे तोपर्यंत, शिवाजीराजांचे राज्य स्वतंत्र झाले असे कोण मानणार? अर्थात शिवाजीराजांना तंजावरपर्यंत जाऊन एकोजीस कब्जात आणणे भाग पडले. महाराष्ट्रातच अंतर्भूत असलेली विजापूर

गोवळकोंड्याची राज्ये औरंगजेब आज नाही उद्या जिंकणारच, मग ती आपणच का न जिंकावी; शिवाय जोपर्यंत शेजारी ही राज्ये आहेत, तोपर्यंत रोज कटकटी व बंडाळी होणार. यासाठी त्या राज्यांवरही आपला शह बसविणे शिवाजीराजांना जरूर पडले. इंग्रजीत ह्या धोरणास 'व्हिगरस पॉलिसी' म्हणजे 'ठोकून काढण्याचे राज्यधोरण' असे म्हणतात. स्वसंरक्षणाची मर्यादा सोडून हे धोरण पुष्कळदा महत्त्वाकांक्षेच्या मर्यादेत शिरते; आणि कोणत्याही राज्यकारभाराचे धोरण समजून घेताना तत्कालीन परिस्थित्यनुरूप ह्या मर्यादा ठरवल्या पाहिजेत.

4) मुलकी व्यवस्था :

शिवाजीराजांच्या राज्याचा विस्तार ठोबळ मानाने तापीनदीपासून थेट दक्षिणेस जिंजी तंजावर पावेतो कावेरी नदीतीरास पोचला होता असे म्हणता येईल. 'सालेरी अहिवंतापासून चंजी कावेरीतीरापर्यंत' असे अमात्य म्हणतो. तथापि मध्ये त्यांच्या ताब्यात नसलेले प्रदेशखंडही बरेच होते. पोर्तुगीझ, सिद्दी, इंग्रज हे परदेशी त्याला चौथाईच्या किंवा अन्य रूपाने थोडाबहुत करभार देत. आदिलशाही कुतुबशाही राज्ये त्यांच्याच कृपेने टिकून होती. मोगलांचा रिघाव अहमदनगरच्या पुढे फारसा झालाच नव्हता. नासिक, पुणे, कुलाबा, कोल्हापूर, बेळगाव, धारवाड, पश्चिम किनाऱ्यापासून पूर्व किनाऱ्यापर्यंतचा कर्नाटक प्रांत हे बहुतांशी त्यांचे कब्जात आलेच होते. या प्रदेशाचे चार प्रांत किंवा सुभे असून उत्तर प्रांत बागलाण वगैरे मोरोपंत पेशव्याचे कारभारात होता. पश्चिम भागाची व्यवस्था अनाजी दत्तोकडे होती. पन्हाळगडापासून दक्षिणेकडील प्रांतात जनार्दनपंत व रघुनाथपंत हे हणमंते बंधू नेमलेले होते. एकंदर राज्याचा जास्तीत जास्त वसूल सात कोटी रुपये होता.

शिवाजीराजांच्या राज्यकारभाराची मुख्य तत्त्वे खाली लिहिल्याप्रमाणे थोडक्यात सांगता येतील. (1)डोंगरी किल्ल्यांच्या साहाय्याने देशाचा बंदोबस्त ठेवणे; (2)सरकारी नोकरी वंशपरंपरेने न देता लायक इसमास देणे; (3)लष्करी किंवा इतर नोकरीबद्दल स्वतंत्र जागीर किंवा नेमणूक तोडून न देणे; (4)लोकांकडील वसूल जमीनदारांचे मार्फत न घेता तो सरकारी नोकरांकडून जमवणे; (5)सरकारी महाल इजाऱ्याने किंवा लिलावाने वहिवाटीस न देणे; (6) निरनिराळ्या खात्यांवर स्वतंत्र प्रधान नेमून त्यांचेकडून ज्या-त्या खात्याचे काम घेणे; (7)राज्यकारभारात लष्कराचे माहात्म्य वाढू न देणे; (8)ब्राह्मण, प्रभू मराठे वगैरे सर्व जातींस नोकरीत घेऊन एकमेकांच्या दाबात ठेवणे; (9) सर्व खर्च भागवून नियमीत शिल्लक जवळ नेहमी टाकणे. ही धोरणे शिवाजीराजांच्या पूर्वी किंवा त्यांच्या नंतर राज्यकर्त्यांनी ध्यानात ठेवलेली दिसत नाही. अर्थात त्यावरून शिवाजींची योग्यता कळून येते.

शिवाजीराजांनी जमिनीची मोजणी करून तिचा सारा एकदा कायमचा ठरवून दिला आणि तो गोळा करण्याकरता सरकारी अंमलदार नेमले. जमिनीची मोजणी करून ती खातेदारांचे नावावर चढवायची व सरकारी साऱ्याबद्दल कबुलायत लिहून घेऊन जमीन खातेदारांचे हवाली करायची, असा प्रघात शिवाजीराजांनी घातला. सारा ठरवताना उत्पन्नाचे दोनपंचमांश पेक्षा जास्त वसूल केव्हाही घेऊ नये, अशी शिस्त होती. म्हणजे जमिनीचे मालकास तीनपंचमांश राही. आपत्काली लोकांस तगाई वगैरेची मदत देऊन सरकारी घेणे हप्त्याहप्त्याने वसूल करण्यात येईल. अशा हप्त्यांची मुदत चार-चार पांच-पाच वर्षेपर्यंत चाले.

वरील मुलकी अंमलदारांकडे फौजदारी कामेही सोपवलेली असत. गावपंचायतींची संस्था कायम असल्यामुळे लोकांच्या सर्व तंट्यांचा निकाल पंचायतीचे मार्फत जागचेजागीच होई. विशेष प्रसंगी आसपासच्या गावातील प्रमुख मंडळींतून पंच निवडण्यात येत व पंचांचे निकाल अमलात आणण्यास सरकारी अंमलदार मदत करीत. त्या वेळचा न्याय धर्मशास्त्रानुसार करण्यात येत असे. कित्येक ठिकाणी मुसलमानी रूढ प्रचाराचा स्वीकार केलेला होता.

मुख्य प्रश्नमंडळातील पंतअमात्य व पंतसचिव ह्या दोन कामगारांकडे राज्यातील जमीनमहसूलसंबंधी हरएक व्यवस्था असे. पंतअमात्याने वसूल जमा झाला की नाही हे पाहणे व सचिवाने सर्व स्तरावर देखरेख ठेवणे, अशी व्यवस्था होती. रयतेचा मुख्य हिताहिताशी ह्याच दोन कामगारांचा विशेष संबंध असे.

आयव्ययावर दाब ठेवण्याचे शिवाजीराजांचे कौशल्य अप्रतिम होते. सन 1671च्या एका कागदात असा मजकूर आहे :- ‘जो आपला वतन मुलूख आहे, त्यापैकी महालो-महालीहून खजाना करावयास पैसे आणावे. त्याचा खजानाच करून ठेवावा, (म्हणजे या शिलकेस कधी हात लावू नये.) जे वक्ती मोगलांशी झगडा सुरू होईल आणि मोगल येऊन गडास वेढा घालतील, त्याचे मदतीस जरूर. आणिकी करून ऐवज जुडेना तरीच खजानाचे पैके खर्च करावे. नाही तरी एऱ्हवी राज्यभागास सर्वही खर्च न करावा. ऐसा साहेबी तह केला असे.’ यापुढे नावनिशीवार महाल देऊन प्रत्येकातून किती शिल्लक टाकावी ते ठरवून एकंदर शिल्लक एक लक्ष पंचवीस हजार होन करावी असा ठराव शिवाजीराजांनी केला. त्याचप्रमाणे खर्चाबद्दलही आगाऊ मंजुरीचा ठराव करून मग खर्च करीत जावा, असे त्यापुढील लेखांक खं.8-22 वरून दिसते.

शिवाजीराजांच्या मुलखाचे स्वराज्य व मोगलाई असे दोन विभाग केलेले होते. स्वराज्य म्हणजे स्वत:च्या ताब्यात संपूर्णपणे आलेला प्रदेश. मोगलाई म्हणजे परकियांचे ताब्यात राहून खंडणी वगैरे देणारा प्रदेश. शिवाजीराजांच्या ताब्यातील एकंदर मुलखाची नावनिशी दिलेली आहे ती अशी : (1)त्यांची वडिलोपार्जित पुण्याचे आसपासची जागीर. (2)मावळप्रांत. ह्यात हल्लीचे मावळ, सासवड, जुन्नर आणि खेड हे तालुके येतात. यात

अठरा डोंगरी किल्ले होते. (3)वाई, सातारा आणि कराड प्रांत, हल्लीच्या सातारा जिल्ह्याचा पश्चिम भाग, यात पंधरा किल्ले होते. (4)पन्हाळ प्रांत, म्हणजे कोल्हापूरचा पश्चिम भाग. यात तेरा किल्ले. (5)दक्षिण कोकण म्हणजे हल्लीचा रत्नागिरी जिल्हा. यात जलदुर्गांचा समावेश झाल्यामुळे 58 किल्ले होते. (6)उत्तर कोकण म्हणजे ठाणे, यात बारा किल्ले; (7)बागलाण, त्र्यंबक म्हणजे नासिक जिल्ह्याचा पश्चिम भाग, यात 62 डोंगरी किल्ले; (8)प्रांत वनगड, म्हणजे हल्लीच्या धारवाड जिल्ह्याचा दक्षिण भाग; यात 22 किल्ले असून संरक्षणासाठी स्वतंत्र फौज ठेवावी लागत होती. (9)बेदनूर, कोलार व श्रीरंगपट्टण म्हणजे म्हैसूर संस्थान, यात अठरा किल्ले. (10)कर्नाटक प्रांत म्हणजे कृष्णेच्या दक्षिण तीराचा नवीन जिंकलेला प्रदेश; यात अठरा किल्ले. (11) वेल्लोर प्रांत म्हणजे हल्लीचा अर्काट जिल्हा; यात पंचवीस किल्ले. (12)तंजावर प्रांत, यात सहा किल्ले.

हे जे प्रांत सांगितले ते स्वराज्याखाली मोडत. याशिवाय परराज्यातून खंडणी देणारा मुलूख बराच होता. वरील प्रांतास मोगल व्यवस्थेप्रमाणे सुभे असेही म्हणता येईल. प्रत्येक प्रांतावर अगर सुभ्यावर सुभेदार म्हणून एक मुख्य अंमलदार असे. तसेच प्रांताचे दोन किंवा तीन पोटविभाग असून त्यास महाल अशी संज्ञा होती. प्रत्येक महालाचे सरासरीने उत्पन्न पाऊण लाख ते सव्वा लाख होन पर्यंत असे. म्हणजे शिवाजीराजांच्या स्वराज्याचा नक्त वसूल पन्नास लाख होन असावा असा अंदाज करता येतो. त्याशिवाय खंडणी व लूट वगैरेचे उत्पन्न येई ते वेगळे. सुभेदाराची वार्षिकी तनखा 400 होन म्हणजे दरमहा शंभर रुपये असे.

जमीन महसुलाशिवाय इतर बाबतीसंबंधाने शिवाजीराजांनी कोणते कर बसवले होते, ते समजत नाही. नारळ व सुपारीसंबंधाने खालील उल्लेख उपलब्ध आहेत. ‘मामले दाभोळ विलायतीस नारळ दर सद्दे लारी 4 व रोठा देखील जकात दर खंडीस लारी 125 प्रमाणे विकत आहे. कमनिरखे नारळसुपारी विकते ऐशी खबर कळो आली. पेस्तर ऐसे न व्हावे. कमनिरखे विकलीया इकडे धक्का बसतो, त्याची बदनामी तुम्हास. ऐसे जाणोन खबर घेऊन, चौकशी करून ऐनजिन्नस ठरावाप्रमाणे दिवाणातून विकीत जाणे.’ मिठाच्या खरेदीविक्रीसंबंधानेही शिवाजीराजांचे नियम होते आणि कित्येक ठिकाणी त्यांनी बाहेरून येणाऱ्या मिठावर जबर जकात बसवली होती. ‘संगमेश्वराहून बारदेशीच्या मिठास जबर निरख पडे ती गोष्ट करणे. ये गोष्टीचा जरा उजूर न करणे. ये गोष्टीत साहेबांचा बहुत फायदा आहे.’[148]

सन 1678 मध्ये अनाजी दत्तो ह्या सचिवाच्या मार्फत जमीन महसुलाची शिवाजीराजांनी व्यवस्था केली, त्यातील उतारा. ‘धान्याचा तह बसवून आकार करावा. अखेर कामास एक ब्राह्मण अगर प्रभू कारकून ठेवावा. जमिनीचे पोटफोडी गावी पीक काय पिकले व काय धारा घ्यावा हे त्या गरीबास काय ठाऊक. ह्याबद्दल तुमच्या महालचे मक्तेदार तुम्ही. आजपासून आपले महालचा आकार करणे. ह्याबद्दल खासा देशमुख व

देशकुळकर्णी व मुकादम व मोख्तसर (वजनदार) चार रयता अशा मिळवून एकविचाराने गावचा गाव फिरून, ऐसे करणे की, अमका गाव, त्यासी रक्कम अमकी, त्याची जमीन अमकी, त्यासी अव्वल दुय्यम सियम म्हणजे पहिल्या दुसऱ्या व तिसऱ्या प्रतीच्या अमक्या, ऐसी जाती निवडून, त्यास पिकाचा अजमास करून, कष्ट केल्याने काय पिकेल, ते चौकस करून, ती रक्कम त्या शेताच्या शिरी बसवून, समक्ष पाहून आकार करणे. ऐसे की, एक ठिकाण, मलिकंबरी रक्कम अमकी झाली, त्यामध्ये खरीफ एक पीक अमकी, रब्बी दुपीक अमकी, ऐसी जात निवडून त्यामध्ये अमके बिघे, अमका गल्ला, ऐसा पिकाचा आकार करून ठिकाणचे ठिकाणात पाच सात कुळे असली तरी असोत. त्या शेताबरहुकूम गावखंडणी सारा आकार करणे; सर्व तपाचा (तालुक्याचा) आकार तुम्हास करावयास आजपासून फुरसत पुढील सालपावेतो दिली आहे. इतक्यामध्ये कुल तपा फिरून गावचे गाव शेताचे शेत आकार करणे आणि आकार चौकशीने आम्हास लिहिणे. आम्ही येऊन तयामध्ये तीन गाव तीन प्रतीचे पाहून आणि चौघांचे समक्ष समजाऊन खरे करून, एके गावचा आकार असेल त्यावरी रुजू घालून बजिन्नस सवाई, दिढी, दुणी बेरीज झाली, तरी तुम्ही त्याप्रमाणे उत्पन्न करणे. येणेप्रमाणे कबूल करून कीर्द महाली देणे.'[149]

स्वराज्यात लूट, खंडणी, दरोडे वगैरेचा उपद्रव रयतेस न व्हावा याबद्दल शिवाजीराजांची दक्षता विशेष होती. मुलकी व्यवस्थेत लष्करी अंमलदारांस काहीच अधिकार नव्हता. प्रत्येक गावास एक पाटील व एक कुळकर्णी व दोन-तीन गाव मिळून एक कमाविसदार असे अधिकारी नेमलेले असून, त्यावर एक तरफदार किंवा तालुकदार किंवा महालकरी म्हणून ब्राह्मण किंवा प्रभू जातीचा एक अंमलदार असे आणि त्याचे जोडीस एक मराठा हवालदार असे. तालुकदारावरचा अधिकारी सुभेदार. शेखदार, कमाविसदार, सुभेदार व सरसुभेदार असे मुलकी अधिकारी मराठेशाहीत पुढे हळूहळू कायम झाले. प्रत्येक महालाचा वसूल किल्लोकिल्ली नेऊन ठेवण्याचा ठराव होता. या व्यवस्थेत मोगल पद्धतीप्रमाणे देशमुख, देशपांडे वगैरे पिढीजात वतनदार लोकांकडे काहीच अधिकार शिवाजीराजांनी ठेवला नव्हता. शिवाय कोणत्याही खात्यातील नोकरास जागिरी अगर उत्पन्ने तोडून दिलेली नव्हती. सर्वांना त्यांचे कामगिरीबद्दल दरमहाचे दरमहा रोख वेतने सरकारी खजिन्यातून देण्यात येत. या व्यवस्थांमुळे अमलदार बळावून सरकाराविरूद्ध उठण्याची भीति नाही. प्रत्यक्ष आपल्या जावयास त्याने कसे धुडकावून दिले ते खालील उताऱ्यात चांगले व्यक्त होते :

'लखम सावंत देसाई पोा कुडाळ यांही भीमगड फोंडे प्रांते फिसाद केली, याकरिता शिवाजी महाराजांनी पिलाजी राजे शिर्के यांस आज्ञा करून लखम सावंताकडे पाठविले. ते जाऊन कित्येक प्रकारे बोलोन त्याचा शक तोडून आणभाक क्रिया देऊन लखम सावंतास राजश्रींचे भेटीस आणले. महाडचे मुक्कामी भेटी केली. लखम सावंताचा तह करून त्यास

त्याचे वतनावरी ठेविले. तदुपर पिलाजी शिर्क्यांनी अर्ज केला जे मामले दाभोळच्या देशमुखीचे वतन आदिलशहांनी आपणास मऱ्हामत केले, त्याचा भोगवटा जाला नाही, ते वतन आपले आपणास देऊन चालवावे. त्यावरून स्वामींनी आज्ञा केली की आपल्या राज्यात वतने द्यावयाचा दंडक नाही, परंतु तुम्ही स्वामीकार्य केले व सोयरीकही तुम्हासी जाली, तरी चिरंजीव राजकुवरबाईस पुत्र होईल तेव्हा ते देशमुखी वतन आपण तुम्हास देऊ.'[150]

देशमुख, देशपांडे इत्यादि पिढीजात नोकरांना सुद्धा आपले हक्क रयतेपासून परभारे वसूल करण्याची सक्त मनाई होती. तसेच शिवाजीराजांनी गावोगावचे जुने तट पाडून टाकले आणि नवीन कोणासही करू दिले नाहीत. किल्ल्यातील संरक्षकाना, देवस्थानांना व लढाईत विशेष पराक्रम करणारांना मात्र ते केव्हा-केव्हा इनाम जमिनी देत असत. मुसलमान अगर हिंदू देवस्थानांची पूर्वी चालू असलेली उत्पन्ने त्यांनी बंद केली नाहीत.

त्यावेळी रस्ते फारसे नसून, अवघड जागांतून चोरांचे भय विशेष होते. पण शिवाजीराजांनी चोरांचा चांगलाच बंदोबस्त केला. अशा लोकांना पकडून आणून कित्येकांचे शिरच्छेद केले. कित्येकांना किल्ल्यांवर व इतर ठिकाणी बंदोबस्तासाठी नोकरीत ठेवून, त्यांना लागवडीसाठी जमिनी दिल्या आणि गडकऱ्यांकडे हजिरी देण्याचा ठराव केला. गावात चोरी झाली असता ती ह्या रखवालदारांनी भरून द्यावी, असा रिवाज होता. अशा व्यवस्थेने मुलखात बंदोबस्त झाला.

शिवाजीराजांची शिस्त किती कडक होती हे 'आज्ञापत्रा'तील खालील उताऱ्यात उत्कृष्ट दिसून येते. (पृ.20) 'कदाचित कोणी मामलेदार स्थळास संकट आले म्हणोन स्थळ गनिमास देऊन आपला जीव वाचवून तो गनिमाकडे गेला तरी तो यत्नेकरून हस्तगत होई ते गोष्ट करावी. कदाचित हातास न लागे तरी उपाये करून मारावा. उपाय करून गनिमांकडे गेला तो न ये असे झाले तरी त्याचे लेक गुलाम करावे, बायका बटकी कराव्या. त्यासही विषमारेकरी आदि करून हरप्रयत्ने तेथील तेथे मारवावा.'

5) शिवाजीराजांचे किल्ले :

राज्याच्या बंदोबस्तासाठी शिवाजीराजांनी केलेल्या तजविजी त्यांच्या दूरदृष्टीची व मुत्सद्दीपणाची साक्ष देतात. त्यांच्या लष्कराची रचना व किल्ल्यांच्या योगाने राज्य ताब्यात राखण्याची युक्ती, किनारा ताब्यात ठेवणारे आरमार व शिपायांना उत्तेजन देण्याची त्यांची हातोटी, इत्यादी व्यवस्था त्यांनी नवीन केल्या, त्यांचे वर्णन आता करावयाचे आहे.

महाराष्ट्रदेशभर, कोकणात, समुद्रकाठी, घाटमाथ्यावर व इतर प्रदेशी मोडकळीस आलेले असे पुष्कळ किल्ले आज आपण पाहतो व पुष्कळांची माहिती आपण कानांनी

ऐकली आहे. हे बहुतेक किल्ले शिवाजीराजांच्या वेळचे आहेत. म्हणजे त्यांची उपयुक्तता पाहून कित्येक मुसलमानी अंमलातील किंवा तत्पूर्वकालचे किल्ले, शिवाजीराजांनी दुरुस्त करून मजबूत केले व रायगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग वगैरे पुष्कळ किल्ले त्यांनी नवीन बांधले. ह्या किल्ल्यांच्या समांतर अशा तीन-चार रांगा आपल्या दृष्टीस पडतात. एक पश्चिमेस समुद्रकाठावर, दुसरी सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर, तिसरी सह्याद्रीला छेदणाऱ्या पूर्वपश्चिमेला, डोंगरांचे अनेक फाटे आहेत त्यांच्यावर. या तिसरीच्या दोन पोटरांगा आहेत. याशिवाय पूर्वेकडील सपाट प्रदेशात अहमदनगर, सोलापूर यांसारखी शहरे आहेत त्यांचे कोट. पाण्यात बेटावर अगर भूशिरावर जो बांधलेला असतो त्यास जंजिरा अगर दुर्ग असे म्हणतात. डोंगरावरच्या किल्ल्यास गड व मैदानातील तटास भुईकोट अगर नुसता कोट अशा संज्ञा होत्या. रायगड, प्रतापगड, पन्हाळगड हे डोंगरी किल्ले होत. सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग वगैरे जंजिरे होत. विजापूर, सोलापूर, बदामी इत्यादि ठिकाणचे किल्ले भुईकोट होत. मुख्यत: गड व दुर्ग यांचेवरच शिवाजीराजांची भिस्त होती. बखरीत सुमारे दोनशे किल्ल्यांची नावे दिलेली आहेत, त्यात भुईकोटांची नावे फारशी नाहीत. ह्या किल्ल्यांच्या ज्या चार रांगा वर सांगितल्या, त्यांच्या योगाने सर्व देश ताब्यात ठेवण्याची शिवाजीराजांची योजना होती. किल्ला अवघड डोंगरावर बांधलेला असे, त्यावर जाण्यास एखाद दुसरीच वाट असल्यामुळे, तेवढी वाट बंद केल्यावर शत्रूंचा प्रवेश किल्ल्यात होण्यास मुश्कली पडे. किल्ल्यांवर थोडीशी शिबंदी ठेवून, तिच्या योगाने किल्ला व सभोवारचा टापू यांचा अल्पायासाने बंदोबस्त ठेवता येई. किल्ल्यावर दाणागोटा, दारूगोळा, मीठ, तंबाखू, शस्त्रसामान, खजिना वगैरे मुबलक साहित्य ठेवल्यामुळे व लोकांना राहण्याच्या सोयी आत असल्यामुळे, वर्ष-दोनवर्षे जरी शत्रूचा वेढा पडला, तरी आतील थोडीशी शिबंदी शत्रूच्या अवाढव्य फौजेस दाद देत नसे. मुलखाच्या संरक्षणाची ही योजना शिवाजीराजांनीच अमलात आणली. महाराष्ट्राची सृष्टिरचना त्या व्यवस्थेस सोयीची होती. शिवाजीराजांचे एकंदर किल्ले जवळ-जवळ तीनशे होते. किल्ल्यावरचा हवालदार नेमताना तो चांगला इमानी व कर्तृत्ववान असा पाहून नेमण्यात येत असे. तटाच्या खाली माचीमाचीला रखवालदार नेमून दिलेले असत. या रखवालदारांनी आसपास शत्रूवर नजर ठेवून सभोवारचे रान राखावे असा हुकूम होता. किल्ल्याच्या पायथ्याशी नाक्यानाक्यावर रामोशी, मांग, बेरड वगैरे लोकांच्या चौक्या असत. त्यांनी शत्रूची बातमी ठेवून ती किल्ल्यावर तात्काळ पोहोचवावी अशी ताकीद होती. संध्याकाळी किल्ल्याचा दरवाजा लावून त्यास कुलूप लावीत. हवालदाराने दररात्री स्वत: एक-दोन वेळा येऊन बंदोबस्त पहावा असा नियम होता. दिवसापेक्षा रात्रीचा बंदोबस्त विशेष कडक होता. यत्किंचित ढिलाई केल्यास शिवाजीराजांकडून अत्यंत कडक शासन होत असे. खालून किल्ल्यावर येण्याचे कित्येक चढाव सोपे होते ते सर्व तासून सुरुंग लावून बेलाग करवले होते. किल्ल्यावर ठिकठिकाणी

तोफा लावून ठेवलेल्या होत्या. लष्करातील तोफखाना व त्याच बैल, हत्ती, सुतार, लोहार, गोलंदाज इत्यादींची व्यवस्था यथायोग्य ठेवलेली होती.

प्रत्येक किल्ला व तन्मर्यादापरिविष्ट प्रदेश हा शिवाजीराजांच्या राज्यमालिकेतील एक घटकावयव होता. या बहुमोल दुर्गमालिकेने शिवाजीराजांनी आपले राज्य बंदिस्त केले. शिवाजीराजांची बहुतेक अचाट कृत्ये ह्या किल्ल्यांच्या योगाने तडीस गेली. नाना ठिकाणची लूट सुरक्षितपणे किल्ल्यांवर आणून ठेवता आली. सुरत व खानदेश येथील लूट रायगडी आणताना बागलाण व नासिक या प्रांतातील किल्ल्यांचा त्यास अतिशय उपयोग झाला. शिवाजीराजांनी मिळविलेला बहुतेक पैसा या किल्ल्यांची बांधणी करून ते सुरक्षित ठेवण्यात खर्च झाला. सिंधुदुर्गासारख्या किल्ल्यावर त्यांनी पाण्याप्रमाणे पैसा खर्च केला. अनेक आणीबाणीचे प्रसंग शिवाजीराजांवर आले असताना, त्यातून निभावून जाण्यास हेच किल्ले त्यांना उपयोगी पडले. कित्येक किल्ले स्वसंरक्षणाच्या सोयीचे, तर कित्येक अचानक शत्रूवर छापा घालून त्याचा पाडाव करण्याच्या सोयीचे असे नावाजलेले असून त्यांच्याच योगाने मराठ्यांच्या तत्कालीन पराक्रमास एकप्रकारची विलक्षण रसाळता उत्पन्न झाली आहे. रायगड किल्ल्यावर शिवाजीराजांनी आपली राजधानी केली. कर्नाटक प्रांत जिंकून जिंजी किल्ला ताब्यात ठेवण्यात त्यांनी अतिशय श्रम व खटपट केली, तो जिंजी किल्लाच भावी संकटप्रसंगी मराठ्यांचे राज्य बचावण्यास समर्थ झाला. साताऱ्याची मजबुतीही अशाच प्रकारची होती. मोठमोठ्या किल्ल्यांच्या संबंधाने अत्यंत रसाळ, स्वाभिमानसंवर्धक व कविगुणपरीक्षक असे अनेक प्रसंग महाराष्ट्रेतिहासात घडले आहेत. त्यांचे वर्णन करण्यास कविकादंबरीकारांना भरपूर विषय मिळेल. सिंहगडाने तानाजी मालुसऱ्याचे नाव आबालवृद्धांच्या तोंडी आणून दिले आहे. जिंजीवासाने तर मराठ्यांचा खरा स्वाभिमान कसासच लावला. प्रतापगडाचे नाव निघाल्याबरोबर अफझलखानावर शिवाजीराजांनी मिळविलेल्या विजयाची आठवण कोणास होणार नाही! बागलाणातील सालेर व पट्टा ह्या किल्ल्यांनी मराठ्यांच्या धनप्राप्तीस किती हातभार लावला! सन 1671 च्या धुळवडीच्या रात्री राजपुरीच्या जंजिऱ्यावर सिद्दीने उडवून दिलेल्या कल्लोळाने रायगडावर शिवाजीराजे दचकून उठले, त्या प्रसंगाचे वर्णन करणारा बायरन अगर मूर आपल्यात निपजणे आहे. थर्मापिलीचे साम्य पावलेला खेळणा व तेथे आपले प्राण खर्ची घालून शिवाजींना वाचविणारा स्वामिभक्त बाजी प्रभू यांची आठवण बुजणे शक्य आहे काय! दिलेरखानास ‘दे माय धरणी ठाय’ करण्यास लावणारा ‘मुरारबाजी’ व ‘पुरंदर’ ही नावे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या मुखी घोळत राहिली पाहिजेत. पन्हाळा व खेळणा ऊर्फ विशाळगड हे तर प्राचीन काळापासून राष्ट्राचे रक्षण करण्यात सदैव निमग्न आहेत. विशाळगडावर छत्रपतींचा जनानखाना असे. अलिबाग व मालवण येथील जंजिरे शिवाजीराजांच्या आरमाराचे केवळ आदिस्थान होत. तसेच जेथे शिवाजीराजांचा जन्म झाला तो शिवनेरी किल्ला त्या प्रभूच्या नावाची आठवण लोकांस नेहमी करून देईल यात

संशय नाही. सारांश, अशा नामांकित किल्ल्यांच्या योगाने महाराष्ट्रेतिहासास एकप्रकारचे विलक्षण रमणीय स्वरूप प्राप्त झाले आहे. प्रत्यक्ष शिवाजीराजांना ह्या किल्ल्यांचे महत्त्व इतके वाटत होते की, 'किल्ले बहुत जाले, विनाकारण पैका खर्च होतो,' असा जवळच्या मंडळींनी शिवाजीराजांना अर्ज केला असता ते म्हणाले, ''जैसा कुळंबी शेतास माळा घालून शेत राखितो, तसे किल्ले राज्यास रक्षण आहेत. तारवांस खिळे मारून बळकट करितात, तशी राज्यास बळकटी किल्ल्यांची आहे. किल्ल्यांच्या योगाने औरंगशहासारख्याची उमर गुजरून जाईल.' 'आपणास धर्मस्थापना व राज्यसंपादन करणे. सर्वांस अन्न लावून, शत्रुप्रवेश न होय, ते किल्ल्यांमुळे होते. सर्वांचा निर्वाह आणि दिल्लींद्रासारखा शत्रू उरावर आहे. तो आला तरी नवे जुने तीनशेसाठ किल्ले हजरतीस आहेत. एक-एक किल्ला वर्ष-वर्ष लढला, तरी तीनशे साठ वर्षे पाहिजेत.'

प्रत्येक गडावर एक मराठा हवालदार किंवा गडकरी असून त्याचे हाताखाली त्याच्याच जातीचे दुसरे मदतनीस निरनिराळ्या बुरुजांची व्यवस्था पाहण्यास नेमलेले असत. किल्ल्यांवर दुसरा मोठा कामगार, ब्राह्मण जातीचा सबनीस म्हणून असे व तिसरा प्रभू जातीचा कारखानीस असे. मुख्य हवालदाराचे काम किल्ल्याचे रखवालीचे व बंदोबस्ताचे. ब्राह्मण सुभेदाराकडे मुलकी जमाबंदीचे काम सोपवलेले असून, किल्ल्याच्या टापूतील प्रदेशावर त्याची देखरेख असे. तसेच घासदाणा, दारूगोळा, डागडुजी इत्यादि कामे प्रभू कारखानिसाकडे सोपलेली असत. प्रत्येक किल्ल्याच्या व्यवस्थेत हीच कामे मुख्य असत व ती वरप्रमाणे बहुधा तीन भिन्न वर्गीयांकडे पृथकपणे नेमलेली असत. किल्ल्याच्या बंदोबस्ताकरता निवडक रखवालदार नेमलेले असून खालील प्रदेशात बंदोबस्तासाठी रामोशी ठेवलेले असत. चौकीदार, नाकेदार वगैरे रक्षक लोकांनी रात्री दिवसा कसकशी कामे करावयाची त्याजबद्दल नियम ठरविण्यात आले. शिबंदीची संख्या किल्ल्याच्या महत्त्वाच्या मानाने कमी-जास्त असे. शिवाय किल्ल्यावर कायमची वसती असून सर्व लोकांचा फायदा किल्ल्याच्या संरक्षणापासूनच व्हावा अशी योजना असल्यामुळे, एक किल्ला म्हणजे एका अर्थाने एक लहानसे स्वतंत्र राज्यच किंवा एकंदर राज्यव्यवस्थेचा एक स्वतंत्र भाग असा मानला जाई. फौज लढण्यास बाहेर गेली असताना, ब्राह्मण सुभेदार व प्रभू कारखानीस हे किल्ल्याची डागडुजी व सामानसुमान व पैशाचा पुरवठा करण्यात गुंतलेले असत. कारण बाहेरच्या फौजेस सामान पुरविण्याची पाळी केव्हा कोणत्या किल्ल्यावर येईल त्याचा नेम सांगता येत नसे. ग्रँट डफ म्हणतो, 'किल्ल्यातून आत-बाहेर कोणी केव्हा जाणे; गस्त फिरणे; पहारे, चौक्या सांभाळणे व त्यांजवर देखरेख ठेवणे; पाणी, धान्यसामुग्री, युद्धसामुग्री इत्यादी तयार ठेवणे, या गोष्टींविषयी अगदी सक्तीचे व सूक्ष्म नियम शिवाजीराजांनी केलेले असून प्रत्येक शाखेवरील मुख्य अधिकाऱ्याची बारीक-बारीक कामेसुद्धा ठरवलेली होती आणि ते नियम मोडण्यास तिळभर जागा नव्हती. इतके असूनही त्यांचा ह्या सर्व बाबींचा खर्च फारच काटकसरीने बांधलेला होता.' अंबाजीपंत व

अनाजी दत्तो ह्या दोघा तज्ज्ञ इसमांकडून शिवाजीराजांनी एकदा सर्व किल्ल्यांची तपासणी केली आणि दारूगोळा, अन्नसामुग्री बरोबर आहे की नाही हे पाहून त्याप्रमाणे किल्ल्यांची तरतूद केली. शिवाजीराजांनी पुष्कळशा किल्ल्यांची जुनी नावे बदलून संस्कृत वळणावर नवीन सुंदर नावे ठेवली. रायरी घेतल्यानंतर शके 1578 भाद्रपद व॥[151]

शिवाजीराजांच्या वेळी मोगलाईत किल्ल्यांच्या आश्रयाने मजबूत जागी फौज ठेवीत आणि मुलकी कारभारासाठी जवळच खाली मैदानात सुभ्याचे ठाणे असे. सुभ्याकडे मुलकी व लष्करी असे दोन्ही अधिकार असत. बऱ्हाणपूर-अशीरगड, औरंगाबाद-दौलताबाद अशी बहुधा जोडराजधानी मोगलांची असे. अहमदनगरसारख्या ठिकाणी किल्ला व सुभा एकास एक लागूनच होते. शिवाजीराजांचे पहिले ठाणे पुणे निराश्रय होते. त्यास नजीक किल्ले कोंढाणा व पुरंदर हे जवळजवळ वीस मैल अंतरावर होते. मोगलांशी जेव्हा शिवाजीराजांचे सामने जोराने सुरु झाले तेव्हा पुणे शहर शिवाजीराजांना गैरसोईचे वाटले, म्हणून मुलकी कारभारासाठी त्यांनी सिंहगडाच्या आश्रयास शिवापूरची स्थापना केली. पुढे सिंहगड मोगलांनी काबीज केला आणि मुलकी अमलापेक्षा लष्करी बंदोबस्ताचीच जरूर भासू लागली. तेव्हा मुलकी ठाण्यास फाटा देऊन शिवाजीराजांनी किल्ल्यावरच राज्याचा सर्व कारभार चालविण्याचा निश्चय केला. त्याअन्वये प्रथम राजगड व पुढे रायगड येथे मुलकी व लष्करी कारभाराच्या सोयी शिवाजीराजांनी बनवल्या. शत्रू पाठीवर आहे तोपर्यंत खाली मैदानात राज्यकारभाराचे ठाणे ठेवावयाचे नाही हा शिवाजीराजांचा दंडक होता. राजधानी मजबूत व शाबूत असणे राज्याच्या अस्तित्वाची मोठी खूण होय. शाहिस्तेखान, जसवंतसिंह, जयसिंह वगैरे सरदार औरंगाबादेवरून अचानक पुण्यावर येऊन उतरत आणि शिवाजीराजांच्या वाड्यात वसती करीत, तेणेकरून शिवाजीराजांचे राज्य संपले असा लोकांत ते जाहिराणा करीत, तो बंद पाडण्यासाठी शिवाजीराजांनी आपली राजधानी डोंगरात केली. मोगलांशी झालेल्या पत्रव्यवहारात हा त्यांचा विचार स्पष्ट दिसतो.

शिवाजीराजांनी रायगड किल्ला हस्तगत करून दुरुस्त केला. तेथे कायमपणा करण्यापूर्वी शंभर होन व एक सोन्याचे कडे बक्षीस लावून त्यांनी असे जाहीर केले की, ‘किल्ल्यावर एक मार्ग ठेवलेला आहे तो सोडून, दुसऱ्या वाटेने जो कोणी हातात निशाण घेऊन वर चढून ते निशाण किल्ल्यावर लावेल, त्यास हे बक्षीस देण्यात येईल.’ त्याप्रमाणे एका धेडाने एका कठीण वाटेने चढून किल्ल्यावर निशाण लावले. शिवाजीराजांनी ते बक्षीस त्या धेडास दिले पण त्याचे पाय तोडून टाकले आणि ती नवीन वाट बुजवून टाकली (खाफीखान). हिरकणी गौळणीची गोष्ट अशीच सुप्रसिद्ध असून, रागयडाच्या एका बुरुजाचे नाव ‘हिरकणी बुरूज’ आहे. अशा रीतीने त्यावेळी किल्ल्यांची मजबुती करीत असत.

मालवणच्या सिंधुदुर्ग किल्ल्याची प्रचंड बांधणी बखरीत वर्णन केलेली आहे, ती येथे सांगणे उपयुक्त होईल.

सिंधुदुर्ग जंजिरा, जगी अस्मानी तारा, जैसे मंदिराचे मंडन, श्रीतुलसीवृंदावन, तैसा महाराजांचे राज्याचा भूषणप्रद अलंकार. चतुर्दश महारत्नांपैकीच पंधरावे रत्न महाराजांना प्राप्त झाले. राजापूर प्रांतावर स्वारी झाली, त्यावेळी समुद्रातील संपूर्ण जंजिरे पाहिले, तो मालवणी जागा मनास आली. कोळ्यांना पाचारण करून त्यांचेकडून मार्गाचा ठिकाणा पाहिला. मार्ग कठीण, सर्पाकार, तरांडी होडी मात्र चालते. सभोवताली सारे खडक. दुसरी तरांडी तीन कोसपर्यंत यावयास गती नाही. कोळी मजकुरांवर मेहेरबान होऊन, त्यांना गाव वगैरे बक्षीस दिले आणि तांडेलकर्माची सेवा सांगितली. तदनंतर उत्तम मुहूर्त पाहून, पाथरवट असामी पाचशे व लोहार असामी दोनशे आणून लोखंड दोनशे खंडी खरेदी करून; टाक्या, हातोडे, पहारा, अडू वगैरे तयार करविले. पायाचे व इमारतीचे धोंडे काढवून तयार करविले. काही आरपार छिद्र पाडून कायम केले व पाच खंडी शिसे आणून जंजिऱ्याचा पाया शोधून घातला. श्रीगणेश व समुद्रपूजन करून तरांडियातून घोडे व सामान नेऊन काम चालीस लावले. शर्करा वाटल्या. ब्राह्मणभोजने घातली. समुद्रास दक्षिणा 100 सुवर्ण होन अर्पिले. वाद्ये वावली. सुवर्ण, श्रीफळ, वस्त्रे, मंदील, चादर वाहिली. तदनंतर महाराजांनी हुन्नरवंत पाथरवट चुना मुस्तेद करावयास कोळी, कामाठी व बाजे लोक मिळून तीन हजार माणूस व वरकड जंजिऱ्याचे सामान आणवून, पाण्यात गाव दोन गावचे तफावतीने ठेवले. तडीस पाच हजार मावळे लोकांची चौकी नेमली. गोवेकर फिरंगी यांना ताकीद करून तेथील फिरंगी हुन्नरवंत, काबील जंजिऱ्याचे कामकाजात म्हणून शंभर आणले. दिवसेंदिवस जंजिरा मुस्तेद करावयासाठी कोटी होनांचे उद (=बजेट) महाराजांनी सोडले. धोंड्यांत शिसेबंदी आरपार घालून पक्के काम पाण्यास भीति न खाय ऐसे बांधले. बांधावयास सारी युक्ती महाराजांनी सांगितली. त्या कामावर गोविंद विश्वनाथ प्रभू सुभेदार कुंभारजुवे यातील वतनदार शहाणे मनुष्य, यास ठेवून, स्वारी रायगडास आली. तिसरे वर्षी जंजिरा पुरा झाल्यावर स्वारी पाहवयास गेली. सुमुहूर्त पाहून आत प्रवेश केला. तोफा झाल्या, शर्करा वाटली. गोवेकर वगैरे हुन्नरवंतांना बक्षिसे दिली. वास्तू केली, सिंधुदुर्ग नाव ठेवून बंदोबस्त केला.[152]

6) शिवाजीराजांचे लष्कर :

हे दोन प्रकारचे होते. घोडेस्वार व पायदळ. स्वारांहून पायदळाचा भरणा मोठा असे. दहा पायदळ शिपायांवर एक नाईक; असल्या पाच तुकड्यांवर म्हणजे पन्नास शिपायांवर एक हवालदार, दोन हवालदारांवर म्हणजे शंभर शिपायांवर एक जुमलेदार व दहा

जुमल्यांवर किंवा एक हजार शिपायांवर 'एक हजारी' नावाचा कामगार असे. अशा पाच हजार फौजेवर सरनोबत म्हणून मुख्य कामगार असे. पायदळातील शिपाई मावळे व हेटकरी या दोन जातींचे असत. मावळे हे घाटमाथ्यावर राहणारे व हेटकरी कोकणात राहणारे. दोघेही अवघड जागी चढून जाण्यात मोठे पटाईत असत. बंदूक, ढाल, तरवार, बरची, तीरकामठा ही त्यांची हत्यारे असून, ती त्यांना आपल्या खर्चाने घ्यावी लागत. दारूगोळा मात्र सरकारातून मिळे. प्रथमत: नोकरीत ठेवताना नुसते धान्य देऊन ठेवीत; परंतु पुढे हुशारी दिसून येई त्याप्रमाणे त्यांना एकपासून तीन होनपर्यंत दरमहा पगार मिळे. जुमलेदारास सालीना शंभर होन, एकहजारी यास सालीना पाचशे होन, व पंचहजारी यास अडीच हजार होन असे पगार असत. शिवाय पंचहजाऱ्यास सरकारातून पालखी, अबदागीर वगैरेच्या नेमणूका असत.

घोडेस्वारांची व्यवस्था बहुतेक पायदळाप्रमाणेच होती. पंचवीस हजारांवर एक हवालदार, पाच हवाल्यांवर एक जुमलेदार, दहा जुमल्यांवर एक सुभेदार व दहा सुभ्यांवर पंचहजारी असे अंमलदार असत. दर पंचवीस घोड्यात एक नालबंद व एक भिस्ती असे. प्रत्येक मराठा अंमलदाराचे हाताखाली एक ब्राह्मश सबनीस व प्रभू कारखानीस, अथवा ब्राह्मण मुजुमदार व प्रभू जमेनीस हे अधिकारी असत. घोडेस्वारात शिलेदार व बारगीर असे दोन वर्ग असत. शिलेदार हे बरेच उच्च प्रतीचे असून घोडी, हत्यारे, दारूगोळा वगैरे स्वत:चे सामान बाळगीत. त्यांना सरकारातून उक्त्या नेमणुका असत. कित्येक शिलेदारांचे हाताखाली हजार-पाचशे स्वार असत. बारगीर हे सरकारचे प्रत्यक्ष नोकर असून त्यांना बसण्यास घोडी व वापरण्यास हत्यारे सरकारातून मिळत. त्यांना सरकारी पागेचे लोक असे नाव असून त्यांचेवर शिवाजीराजांचा विशेष भरंवसा असे. शिवाजीराजांजवळ स्वत:चे असे दहा-बारा हजार उत्कृष्ट कच्छी व अरबी घोडे नेहमी तयार असत, असे खाफीखान म्हणतो. शिलेदार डोईजड होऊ नयेत म्हणून त्यांच्या टोळ्यांत कित्येक बारगीर मिसळून ठेवीत. दोघांचीही हत्यारे ढाल, तरवार, भाला व कित्येकांपाशी बंदुकी अशी असत शिलेदारांचा पगार दरमहा सहा होनांपासून बारा होनांपर्यंत आणि बारगिरांचा दोन पासून पाच होनांपर्यंत असे. जुमलेदारास अडीचशे व सुभेदारास सहाशे होन सालीना पगार असे. सरनोबत यास अडीच हजार होन पगार वार्षिक असून शिवाय पालखी अबदागीर वगैरेंच्या नेमणुका असत. जुमलेदारापासून वरच्या सर्व अधिकाऱ्यांबरोबर बातमी आणणारे हेर व लिहिणारे कारकून असत. बहिर्जी नाईक म्हणून कोणी एक मराठा गृहस्थ सर्व हेरांवर मुख्य असून, तो आपल्या कामात अत्यंत निपुण असल्यामुळे त्याचेवर शिवाजीराजांचा विशेष लोभ होता.

शिवाजीराजांची लष्करी शिस्त किती कडक होती हे पुढील पत्रावरून दिसून येते.[153]

'मशरुल अनाम राजश्री जुमलेदारांनी व हवालदारांनी व कारकुनांनी मु.मौजे हलवर्ण तर्फ चिपळूण, मामले दाभोळ, प्रति राजेश्री शिवाजी राजे. कसबा चिपळुणी साहेबी लष्कराची विल्हे केली आणि याउपरी घाटावरी कटक (सैन्य) जावे ऐसा मान नाही, म्हणून एव्हां छावणीस रवाना केले. ऐसीयास, चिपळुणी कटकाचा मुक्काम होता. याकरिता दाभोळच्या सुभ्यात पावसाळ्याकारणे पागेस सामान व दारा व वरकड केली हाती. तो कित्येक खर्च होऊन गेला व चिपळुणा आसपास विलातीत लष्कराची तसवीस व गवताची व वरकड दरएक बाब लागली. त्याकरिता हाल काही उरला नाही. ऐसे असता वैशाखाचे वीस दिवस उन्हाळा, हेही पागेस अधिक बैठी पडली. परंतु जरूर झाले, त्याकरिता कारकुनांकडून व गडोगडी कल्ला असेल तो देववून जैशी तैशी पागेची बेगमी केली आहे. त्यास तुम्ही मनास मानेल ऐसा दाणा रातीब व गवत मागाल, असेल तांवरी धुंदी करून चाराल, नाहीसे झाले म्हणजे मग काही पडत्या पावसात मिळणार नाही, उपास पडतील, घोडी मरायास लागतील. म्हणजे घोडी तुम्हीच मारिली ऐसे होईल व विलातीस तसवीस देऊ लागला. ऐशास लोक जातील, कोणी कुणब्याचे येथील दाणे आणील, कोणी भाकर, कोणी गवत, कोणी फाटे, कोणी भाजी, कोणी पाले, ऐसे करू लागलेत, म्हणजे जे कुणबी घर धरून जीव मात्र घेऊन राहिले आहेत, तेही जाऊ लागतील. कित्येक उपाशी मराया लागतील, म्हणजे त्यांला ऐसे होईल की मोगल मुलकात आले त्याहूनही अधिक तुम्ही, ऐसा तळतळाट होईल! तेव्हा रयतेची व घोड्यांची सारी बदनामी तुम्हावर येईल. हे तुम्ही बरे जाणून, शिपाई हो, अगर पावखलक[154] हो, बहुत यादी धरून[155] वर्तणूक करणे. कोणी पागेस अगर मुलकास गावोगाव राहिले असाल, त्यांनी रयतेस काडीचा आजार द्यावया गरज नाही. आपल्याला जागाहून बाहीर पाय घालाया गरज नाही. साहेबी खजानातून वाटण्या पदरी घातल्या आहेती. ज्याला जे पाहिजे, दाणा हो, अगर गुरे-ढोरे वागवीत असाल त्यास गवत हो, अगर फाये, भाजीपाले व वरकड विकावया येईल ते, रास घ्यावे, बाजारास जावे, रास विकत आणावे. कोणावरही जुलूम अगर ज्यास्ती, अगर कोणासही कलागती करावयाची गरज नाही. व पागेस सामा केला आहे, तो पावसाळा पुरला पाहिजे ऐसे तजविजीने दाणा, रातीब-कारकून देत जातील, तेणे प्रमाणेच घेत जाणे, की उपास न पडता रोजबरोज खायाला सापडे, आणि होत होत घोडी तवाना होत ऐसे करणे. नसतीच कारकुनाशी घसपस कराया, अगर अमकेच द्या तमकेच द्या, असे म्हणाया धुंदी करून खासदार कोठीत कोठारात शिरून लुटाया गरज नाही. व हल्ली उन्हाळ्याला आहे तैसे खलक पागेचे आहेत, खण धरून राहिले असतील व राहतील, कोणी आगट्या करतील, कोणी भलतेच जागा चुली रंधनाला[156] करतील, कोणी तंबाकूला आगी घेतील, गवत पडले आहे अगर वारे लागले आहे तैसे मनास ना आणिता, म्हणजे अविस्ताच एखादा दगा होईल. एका खणास आगी लागली म्हणजे सारे खण जळोन जातील. गवताच्या लहळ्यास

कोणीकडून तरी विस्तव जाऊन पडला म्हणजे सारे गवत व लहव्या आहेत तितक्या एकेक जळोन जातील. तेव्हा मग काही कुणब्यांच्या गर्दना मारल्या अगर कारकुनास ताकीद करावी तैशी केली, तरी काही खण कराया एक लाकूड मिळणार नाही. एक खण होणार नाही. हे तो अवघ्यांला कळते. या कारणे, बरी ताकीद करून, खाचे खासे असाल ते हमेशा फिरत जाऊन, रंधने[156] करिता, आगट्या जाळिती, अगर रात्रीस दिवा घरात असेल, अविस्ताच उंदीर वात नेइल, ते गोष्टी न हो. आगीचा दगा न हो. खण गवत वाचेल ते करणे. म्हणजे पावसाळा घोडी वाचली. नाही तर मग घोडी बांधावी नलगेत, खायास घालावे नलगे, पागाच बुडाली, तुम्ही निसूर जालेत, ऐसे होईल. या कारणे तपशिले तुम्हास लिहिले असे. जितके खासे खास जुमलेदार, हवालदार, कारकून आहा, तितके हा रोखा तपशिले ऐकणे आणि हुशार राहणे. वरचेवरी रोजचा रोज, खबर घेऊन, ताकीद करून, येणेप्रमाणे वर्तणूक करिता ज्यापासून अंतर पडेल, ज्याचा गुन्हा होईल, बदनामी ज्यावर येईल त्यास, मराठ्याची तो इज्जत वाचणार नाही, मग रोजगार कैसा? खलक समजो जास्ती केल्या वेगळे सोडणार नाही. हे बरे म्हणून वर्तणूक करणे.’ (19 मे 1673).

हे पत्र खुद्द शिवाजीराजांनी आवेशात व रागारागाने सांगून, चिटणीस बाळाजी आवजीने लिहिलेले असे दिसते. ह्यावरून शिवाजीराजांची दक्षता व्यक्त होते आणि हरएक बाबतीबद्दल त्यांनी किती पत्रे व हुकूम सोडले असले पाहिजेत, त्याची कल्पना होते.

फौजेस पगार वेळच्या वेळी देण्यासंबंधी शिवाजीराजांचा सक्त नियम होता. लोकांकडे येणे राहिलेली बाकी वसूल करून फौजेने आपला पगार परभारे भागवून घ्यावा, असा प्रकार शिवाजीमहाराज कधी होऊ देत नसत. लष्करात बटीक, बायको, कलाल वगैरे नेण्यास सक्त मनाई असे. कर्ज काढण्याची मनाई असे. लग्नकार्यादि विशेष प्रसंगी लोकांस सरकारातून मदत देण्याची व्यवस्था होती. नवीन शिपाई नोकरीत ठेवताना जुन्या मंडळींतून त्याचे योग्य वर्तणुकीद्दल जामीन घेत असत. तसेच वरचे अंमलदारही जातवान व भरवशाचे असे पाहूनच शिवाजीमहाराज नेमीत असत.

शत्रूचे मुलखात मोहिमा व लूट करण्यासंबंधाने शिवाजीराजांचे नियम सक्त होते. दसऱ्याचे दिवशी मोठा दरबार भरवून, फौजेची व सामानसुमानाची झडती होई. ब्राह्मण, स्त्री, शेतकरी किंवा गाय यांस कोणत्याही प्रकारचा उपद्रव न देण्याबद्दल ताकीद असे. लुटीचा सारा ऐवज झाडून सरकारात भरावा लागे. तथापि लूट आणणारे इसमास लुटीच्या मानाने काही बक्षीस मिळे. लुटीचा ऐवज लपविल्याबद्दल कडक शिक्षा होत्या. मोहिमात पराक्रम केल्याबद्दल दरबारात गौरव करून वस्त्रे, किताब व इतर देणग्या देण्याचा परिपाठ होता. जे लढाईत पडले असतील त्यांच्या भावामुलांना नोकरीत घेऊन त्यांच्या योग्यतेप्रमाणे शिवाजीराजे त्यांचा परामर्ष घेत. लुटीच्या उद्देशाने आपली फौज घेऊन शिवाजीमहाराज एखाद्या शहरावर गेले, म्हणजे तेथील संपत्ती हुडकून काढण्यात त्यांचा

हातखंडा होता असे विल्क्सने लिहिले आहे. प्रत्येक गोष्टीविषयी गुप्त माहिती मिळविण्यात शिवाजीराजांची अगदी हद्द होती. संपत्ती पुरून ठेवण्याची ठिकाणे ते अचानक दाखवून देत असत. मोठ्या युक्तीने लपविलेली संपत्ती ते स्वानुभवाने व गुप्त बातमीने बाहेर काढीत असत. ह्यामुळे 'त्यांना देवीची मदत असून ती त्यांना सर्व गुप्त गोष्टी सांगून देते,' असा जाहीर समज झाला होता. घोडे, हत्ती, उंट, बैल, गाई वगैरे जनावरांची व्यवस्था शिवाजीराजांनी चांगली ठेवलेली होती. घोड्यांची अवलाद चांगली ठेवणे, जनावरांना दाणा घास वगैरे वेळच्या वेळेस देणे, अशा बाबतींविषयी बंदोबस्ताचे नियम होते. शिवाजीराजांच्या पीलखान्यात तीनशे-साडेतीनशे हत्ती व हजार दीडहजार उंट होते. तसेच तोफा वगैरे सामान वाहण्याकरिता बैलांचा कारखाना होता.

कर्नाटकात त्रिवादी येथे शिवाजीराजांचा मुक्काम असताना फ्रेंच वकील जर्मेन त्यांचे भेटीस येऊन तीन दिवस जवळ राहिला. त्याने शिवाजींच्या साध्या राहणीची विशेष तारीफ केली आहे. एक स्वत:चा व एक कारभाऱ्याचा अशा दोन लहानशा तंबूपलिकडे जड सामान त्यांचेजवळ काहीसुद्धा नव्हते. छावणीत बायका नव्हत्या. फौजेतले घोडे सर्व सरकारमालकीचे असून, दर दोघांस तीन घोडे नेमून दिलेले असल्यामुळे वाटेल तितक्या लांब मजला त्यांना अल्पावधीत करता येत.

7) जागिरीविषयी शिवाजीराजांचा कटाक्ष :

युरोपात पूर्वी असा एक काळ होता की, देशातील सर्व जमिनी मोठमोठ्या लोकांना वाटून दिलेल्या असत. त्याचे मोबदला प्रत्येक जमीनदाराने आपणापाशी लढाऊ लोक ठेवून राजाला जरूर लागेल तेव्हा आपआपल्या लोकांना घेऊन लढाईस जावे, असा करार असे. या पद्धतीच्या योगाने जमीनदार लोक बलाढ्य व डोईजड झाले आणि त्यांनी किल्ले वगैरे बांधून मजबुती केली. ही सरंजामी पद्धत मोडून टाकण्यासाठी युरोपीय राजांचे फार वर्षे प्रयत्न चालू होते. या पद्धतीस 'फ्युडल सिस्टिम' असे म्हणत. तशाच स्वरूपाची पद्धत काही अंशाने पूर्वी हिंदुस्थानात चालू होती. मोगल बादशाहीत पाच हजारी, दहा हजारी असे मनसबदार असत आणि त्यांच्या खर्चासाठी मोठमोठ्या जागिरी तोडून दिलेल्या होत्या. हाताखाली फौज ठेवण्याची आयतीच सोय झाल्यामुळे हे लोक बंडावे करीत आणि दूरच्या प्रांतातील अंमलदार बादशहास पुष्कळदा डोईजोड होत. मोगल शहाजादे अशा स्वतंत्र सत्तेच्या जोरावर बादशहांविरूद्ध उठत. शिवाजीराजांना हा जागिरीचा प्रकार चांगला अवगत असून ते स्वत: अशा जागीरदाराचा मुलगा होते. जागिरीच्याच जोरावर त्यांच्या बापाने सर्व उद्योग केले. विजापुरकरांचे व मोगलांच्या कित्येक जागीरदारांचा पाडाव त्यांनीच केला होता. किल्ल्यांच्या आश्रयाने मावळे देशमुख बंडावे करीत ते त्यांनी पाहिले

होते. राज्याचे उगम व संरक्षणाचे मार्ग शिवाजीराजांनी लहानपणापासून बारकाईने तपासलेले होते. तेव्हा आरंभीच त्यांची अशी खात्री झाली की, राज्य जर सुरळीत चालवायचे असेल तर कोणासही जमीन तोडून देणे अत्यंत अपायकारक आहे. हा आपला अनुभव त्यांनी पुढे कडकपणे अमलात आणला. कोणासही जमीन म्हणून त्यांनी तोडून दिली नाही. ज्यांना जमिनी तोडून दिलेल्या होत्या त्या त्यांनी खालसा केल्या. दरएक इसमाला नोकरीचे मानाने रोख पगार ठरवून दिले आणि ते त्यांना वेळच्यावेळी पोचवण्याची तजवीज ठेवली. ब्राह्मणांचे अग्रहार सुद्धा[157] त्यांनी बंद केले. ते बंद करणे म्हणजे एकप्रकारे धर्माच्या विरूद्ध वागण्यासारखे होते. गोब्राह्मणप्रतिपालक असे ब्रीद धारण करूनही शिवाजीराजांनी ब्राह्मणांना जमिनी किंवा जागिरी तोडून दिल्या नाहीत. यावरून उत्पन्ने सोडून देण्याविषयी शिवाजीराजांचा केवढा कटाक्ष होता हे दिसून येईल. शिवाजीराजांच्या राज्यात पूर्वीच्या जागीरदारांनी मजबूत वाडे, हुडे, कोट, किल्ले वगैरे बांधलेले होते, ते शिवाजीराजांनी पाडून टाकले. तसेच पाटील, कुळकर्णी, देशपांडे वगैरे लोकांना नगदी नेमणुका बांधून दिल्या. वतनदारीवर एवढा कटाक्ष शिवाजीराजांनी का ठेवला ते खालील उताऱ्यात व्यक्त होते.[158]

“आहे वतन इतकियावर कालक्रमणा करावी, सर्व देशचा स्वामी म्हणजे राजा, त्यांशी निष्ठेने वर्तावे, कोणाचा अन्याय न करावा, ही यांची बुद्धिच नाही. बळकट व्हावे व दुसऱ्याचे घ्यावे, दावे दरवडे करावे हा यांचा सहज हव्यास. राज्यशासन होईल हे जाणोन अगोदर दुसऱ्याचा आश्रय करतात, स्थळे बांधतात, त्या बळे वाटा पाडितात, देश मारितात, समयी जिवाचीही तमा धरीत नाहीत. परचक्र आले म्हणजे वतनाच्या आशेने अगोदर सलूख करितात, स्वत: भेटतात, तिकडील भेद इकडे, इकडील भेद तिकडे करून राज्यात शत्रूचा प्रवेश करितात. कदाचित वतनदारात उद्धृत उच्छृंखळ असा कोणी असला तर त्यास नावाजून जे कठीण कार्य असेल तशा कार्यावर पाठवावे. आधी वतनदार हा एक विश्वास. ततोपि प्रमाणिक म्हणजे सोने आणि सुगंध. याकरिता अशांचा अत्यादरे संग्रह करावा.”

शिवाजीराजांच्या या धोरणावर रा.राजवाड्यांनी खालील आक्षेप घेतले आहेत:- ‘राज्यास बळकटी यावी या हेतूने वतनदारांची वतने बंद करण्याचे महाराजांचे धोरण मराठी राज्याला जाचक झाले. या वतनदारांपैकी कुळकर्णी लोकांच्या वतनाला महाराजांनी धक्का लावला नाही; पण पाटील-देशपांडेपणाची व अग्रहारांची वतने महाराजांनी खालसा केली. यादव, राष्ट्रकूट किंवा मोगल कोणीही राजे असोत, त्यांचे अभीष्टचिंतन करून राहावयाचे एवढेच हे अग्रहार घेऊन उदरनिर्वाह करणाऱ्या ब्राह्मणांचे काम असे. स्वकीय असो वा परकीय असो, कोणाचेही अभीष्टचिंतन करून पोट भरणाऱ्या ब्राह्मणांचे अग्रहार बंद करण्याचा सल्ला महाराजांच्या मुत्सद्द्यांनी त्यांना दिला. कऱ्हाडजवळ असलेल्या सैदापूर गावातील अशाच एका ब्राह्मणाचा अग्रहार काढून घेतला व पोट भरण्याची पंचाईत

पडू लागली, तेव्हा वसंतगडच्या किल्लेदाराकडून वर्षाचे तांदूळ मागून घेऊन जावे, अशी महाराजांनी त्यास सनद दिली, ती सापडली आहे. तीवरून व अशाच प्रकारच्या दुसऱ्या अनेक सनदांवरून ही गोष्ट सिद्ध झाली आहे. महाराज गोब्राह्मणप्रतिपालक खरे. तथापि ज्या ब्राह्मणांना आपल्या पोटापुढे दुसरे काही दिसत नसे, ते पोटाकरिता महाराजांना सोडून मुसलमानांना जाऊन मिळत. अग्रहार काढून घेतल्यामुळे उघडे पडलेले भाऊ-भाऊ असले तर त्यांपैकी एक महाराजांकडे व एक मुसलमानांकडे जाऊन दोघांपैकी कोणालाही प्रसन्न करून आपले वतन कायम ठेवण्याची खटपट करीत. महाराजांच्या पश्चात गादीवर कर्तृत्ववान पुरुष न आल्यामुळे या धोरणाचे वाईट परिणाम दिसू लागून, मराठी राज्याच्या प्रगतीस जबरदस्त अडथळा आला. संभाजी बेहोष, अत्यंत क्रूरकर्मा, औरंगजेब दक्षिणेत आलेला व देशातील स्वाभिमानशून्य पोटभरू वतनदार शत्रुपक्षास मिळण्यास तयार असलेले, अशा बिकट परिस्थितीत मराठी राज्याचा हा गाडा मोडावयाचाच प्रसंग आला होता; पण औरंगजेब जातीचा कडवा व धर्मवेडा असल्यामुळे त्याच्या या वृत्तीचा मराठ्यांना एकप्रकारे फायदाच झाला. मराठी राज्यावर आलेल्या या संकटाचे वेळी शिवाजीमहाराजांच्या वेळी काढून घेतलेली वतने परत देण्यात आली, आणि संताजी व धनाजीसारख्या स्वामिभक्त वीरांनी औरंगजेबाचे दक्षिणेत काही चालू न दिल्यामुळे, या वतनदारांनाही राजाराममहाराजांच्याकडून सनदा घेणे फायदेशीर वाटले व तेवढ्याकरिता पुष्कळ लोक चंदीस राजाराममहाराजांकडे गेले. अशाप्रकारे ही चूक सुधारली गेली, असे त्यावेळच्या कागदपत्रांवरून कळून येण्यासारखे आहे. आता शिवाजीराजांसारखाच कर्तबगार पुरुष आणखी बरीच वर्षे जगला असता तर त्याने या पोटभरू लोकांचा समूळ उच्छेद केला असता की नाही, अगर या समाजास न दुखवता, हळूहळू क्रमाक्रमाने त्यांची वतने त्यांना काढून घेता आली असती की नाही, हा प्रश्न अलाहिदा आहे. परंतु जी घडून आलेली स्थिती कागदपत्रांवरून दिसून येते ती अशी आहे. हे वतनदार स्वार्थसाधू होते हे कबूल आहे; पण त्या समाजाच्या संघशक्तीपुढे शिवाजीराजांना अगर त्यांच्या वंशजांना नमावे लागले. अशारितीने शिवाजीराजांच्या राज्यधोरणापेक्षाही ही समाजशक्ती प्रबळ ठरली.' (केसरी 29.6.1915).

8) शिवाजीराजांचे आरमार व सिद्दीचा[159] जंजिरा :

मराठी आरमाराची उत्पत्ती जंजिऱ्याच्या सिद्धीमुळे झाली. जंजिरा म्हणजे पाण्यातला किल्ला. अरबी शब्द 'जझीरा' म्हणजे 'बेट' या शब्दाचा अपभ्रंश होय. कोकणात महाड दासगावावरून सावित्री नदी बाणकोटाजवळ समुद्रास मिळते. ही नदी रत्नागिरी जिल्ह्याची उत्तर हद्द व जंजिरा संस्थानाची दक्षिण हद्द होय. सावित्रीच्या मुखाजवळ दक्षिण बाजूस

बाणकोट व उत्तर बाजूस हरेश्वर व श्रीवर्धन ही प्रसिद्ध स्थळे आहेत. तेथून किनाऱ्या-किनाऱ्याने मुंबईकडे जाऊ लागले म्हणजे थोड्या अंतरावर दुसरी एक खाडी लागते, ती राजपुरीची खाडी. ह्या खाडीच्या उत्तर टोकावर राजपुरी नावाचे लहानसे गाव असून ते मराठेशाहीच्या वेळी आरमाराचे ठाणे होते. राजपुरीखाडीच्या मुखाजवळ समुद्रात एक अवघड बेट असून त्याजवर मजबूत किल्ला आहे, तोच 'जंजिरा' ह्या विशेष नावाने प्रसिद्ध आहे. तेथून पुढे आणखी उत्तरेस जाऊ लागले म्हणजे रेवदंड्याची खाडी लागते. तिच्या उत्तर बाजूस रेवदंडा व चौल ही ठिकाणे व दक्षिण बाजूस कोर्लईचा किल्ला आहे. चौलच्या उत्तरेस थोड्या अंतरावर अलिबाग शहर मुख्य किनाऱ्यावर आहे. तेथील किल्ल्यास कुलाबा म्हणतात. कुलाबा व मुंबई यांचे दरम्यान समुद्रात दोन अवघड बेटे आहेत, त्यांना खांदेरी व उंदेरी अशी नावे आहेत. जंजिरा प्रांतास हबसाण असेही नाव आहे. निजामशाहीचा संस्थापक अहमद निजाम-उल्-मुल्क याने सन 1490 मध्ये दंडराजपुरी व जंजिरा ही ठिकाणे घेतली व याकूतखान सिद्दी यास तेथील बंदोबस्ताचे काम सांगितले. तेव्हापासून जंजिरा येथे या हबशी सरदारांचे हाताखाली निजामशहाचे आरमार राहू लागले. जलमार्गाने परदेशांशी चालणाऱ्या व्यापारावर देखरेख ठेवावी आणि मक्केस जाणाऱ्या यात्रेकरूंची ने-आण करावी, ही दोन कामे ह्या आरमाराने करावयाची होती. सन 1571 मध्ये खाडीच्या मुखाशी असलेल्या ओसाड खडकावर हबशी सरदारांनी जंजिरा किल्ला बांधला. सन 1621 मध्ये सिद्दी अंबर नावाचा एक हबशी सरदार निजामशहाचे वतीने जंजिरा येथील आरमारावर मुख्य झाला. तो ते काम पाहत असताना सन 1636 मध्ये जंजिऱ्यासहीत कोकणप्रांत विजापुरकरांकडे गेला, तेव्हा सिद्दी अंबर हा विजापुरचा ताबेदार झाला. आदिलशहाने जंजिऱ्याचे अधिकाऱ्यास 'वजीर' हा किताब दिला. अंबर सिद्दी सन 1646 मध्ये मरण पावल्यावर त्याचा मुलगा सिद्दी युसुफ हा जंजिऱ्याचा अधिकारी झाला. तो सन 1655 मध्ये मरण पावला, तेव्हा फत्तेखान सिद्दीकडे ते काम आले. त्याचे हाताखालील सिद्दी संबूळ, कासम व खैर्यत हे तीन अधिकारी मराठ्यांचे कट्टे वैरी बनले. फत्तेखान 1667 मध्ये मरण पावला. सरहद्दीचा बंदोबस्त ठेवणे हे राज्यसंरक्षणाचे मुख्य काम असल्यामुळे कारवारपासून सुरतपावेतो पश्चिम किनाऱ्यावर आपणास कोणी शत्रू नसावा, अशी व्यवस्था शिवाजीराजांना करावयाची होती. हा हेतू सिद्धीस नेण्यास एका सिद्दीचीच काय ती अडचण त्यांना उत्पन्न झाली. म्हणून सिद्दीचा पाडाव करणे शिवाजीराजांना प्राप्त झाले आणि त्यातूनच त्यांच्या आरमाराची उत्पत्ती झाली.

ता.31.7.1657 रोजी जंजिरा काबीज करण्यास शिवाजीराजांनी निळोपंत व रघुनाथपंत यांजबरोबर आरमार व फौज देऊन पाठवले. आरमारावर दर्यासारंग, दौलतखान व मायनाक भंडारी हे नाविक अंमलदार होते. ह्या स्वारीत सिद्दीची व मराठ्यांची

जंजिरा किल्ल्याचे सभोवार निकराची लढाई होऊन मराठ्यांचा मोड झाला आणि ते वेढा उठवून परत आले.

त्याच साली शिवाजीराजांनी कल्याण प्रांत हस्तगत केला तेव्हा दक्षिणेकडे वळून त्यांनी वीरवाडी, सुरगड, तळा घोसाळा, सुधागड, कांगोरी व रायरी हे किल्ले व त्याखालील प्रदेश काबीज केला, त्यामुळे सिद्दीची किफायत पुष्कळ कमी झाली. पुन्हा सन 1659 च्या पावसाळ्यात शिवाजीराजांनी अनाजी दत्तोचा भाऊ व्यंकोजी दत्तो याबरोबर दुसरी फौज जंजिऱ्यावर पाठवली आणि मागून मोरोपंत पिंगळे ह्यासही व्यंकोजीच्या मदतीस पाठवले. दर्यासारंग व दौलतखान यांनी नवीन उत्कृष्ट आरमार वाढवून जंजिऱ्यास वेढा घातला आणि लढाईचे काम निकराने चालवले. सिद्दी खैर्यतही मोठ्या शिकस्तीने लढला. तेव्हा नाईलाजाने शिवाजीराजांना दंडराजपुरी देऊन सिद्दीने तह केला. फक्त पाण्यातला जंजिरा तेवढा त्याच्या हाती राहिला. शिवाजीराजांनी लगेच जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था ठरवून व्यंकोजीपंताला सुभेदार नेमले आणि त्याचे हाताखाली सिद्दीच्या बंदोबस्तासाठी सात हजार फौज कायमची ठेवून दिली. परंतु त्याचवेळी शिवाजीराजांवर अफझलखान चालून आल्यामुळे त्यांचे सिद्दीवरील दडपण काही काळ नाहिसे होऊन पुढे आठ वर्षे पावेतो सिद्दीने आरमाराच्या जोरावर दक्षिणेकडील शिवाजीराजांच्या मुलुखास उपद्रव मांडला. ते पाहून भरपूर आरमार असल्याशिवाय आपला ताबा कोकण प्रदेशावर बसणार नाही अशी शिवाजीराजांची खात्री झाली आणि मध्यंतरीच्या काळात त्यांनी आपले स्वत:चे आरमार तयार केले. लहानमोठी चार-पाचशे जहाजे बांधून, त्यांचे मुख्य ठिकाण कुलाबा हे केले. तसेच सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग येथेही काही जहाजे ठेवून दिली. त्या सर्वांवर दर्यासारंग इब्राहीमखान व मायनाक भंडारी हे दोन मुख्य सरदार नेमून त्यांचे हाताखाली कोळी खलाशी व तोफा वगैरे सज्ज करून बंदोबस्त केला. ह्या आरमारामुळे पोर्गुगीझ लोकांवरही शिवाजीराजांचा वचक बसला. त्यांनी आपला वकील शिवाजीराजांकडे पाठवून तह केला, की शिवाजीराजांनी पोर्तुगीझ मुलुखास उपद्रव करू नये, आणि त्यांनी तोफा, दारूगोळा वगैरे सामान शिवाजीराजांना पुरवावे. अशा रीतीने लवकरच शिवाजीराजांनी आपला वचक चहूकडे बसवला. सन 1664 पासूनच इंग्रजांना शिवाजीराजांच्या आरमाराची भीति पडू लागल्याचे उल्लेख आढळतात. सन 1665 मध्ये जयसिंहांने शिवाजीराजांवर मोहीम सुरू केली, तेव्हा त्यास आरमाराची अत्यंत जरूर भासली आणि सिद्दीला त्याने मोगल बादशहाचा आधार देऊन शिवाजीराजांवर उठवले. सुरतेच्या बंदरातून मक्केस जाणाऱ्या यात्रेकरूंची ने-आण सिद्दीने करावी असे जयसिंहाने बादशहाचा हुकूम आणून ठरवून दिले, तेव्हापासून सिद्दी हे हळूहळू मोगल बादशहाचे आरमारी सरदार बनले, आणि विजापुराशी त्यांचा संबंध होता तो बहुतेक सुटला. सन 1669 मध्ये शिवाजीराजांनी पुन्हा सिद्दीशी निकराचे युद्ध चालवले तेव्हा तो अगदी टेकीस आला. फतेखानाचा काहीच इलाज चालेना आणि तो पाण्यातला जंजिरा किल्ला शिवाजीराजांच्या स्वाधीन करण्यास कबूल झाला.

त्यावेळेस संबूळ, कासम व खैर्यत हे तीन सिद्दी सरदार फत्तेखानाच्या हाताखाली असून शिवाजीराजांचे कट्टर वैरी होते. तेव्हा सिद्दी संबूळ हा जंजिऱ्याचा अधिकारी झाला. आदिलशहाकडे त्याने मागितलेली मदत मिळाली नाही; तेव्हा औरगजेबाचा दक्षिणेतील सुभेदार खानजहान याजकडे संधान बांधून त्याने आदिलशहास सोडून मोगलांचे स्वामित्व पत्करले. सन 1670 पासून पुढे सिद्दी मोगलांच्या आश्रयाने मराठ्यांशी लढू लागले व ह्या कामी सुरतेच्या मोगल सुभ्याचे सिद्दीस पाठबळ मिळू लागले. औरंगजेबाने सिद्दीस आपल्या पदरी ठेऊन त्याचा वजीर हा किताब काढून 'याकूतखान' हा नवीन किताब त्यास दिला आणि त्यास सुरतच्या उत्पन्नातून तीन लाखांची नेमणूक करून दिली. तेव्हापासून संबूळ हा मोगलांच्या एकंदर आरमाराचा मुख्य झाला आणि सिद्दी कासम हा जंजिरा येथे व सिद्दी खैर्यत राजपुरी येथे असे दोन सरदार त्याचे दुय्यम बनले. सन 1677 मध्ये संबूळ मरण पावल्यावर कासम हा मोगल आरमाराचा अधिपती झाला आणि खैर्यत जंजिऱ्याचा मुख्य झाला.

मोगलांचा आश्रय सिद्दीने केल्यामुळे त्याचे शिवाजीराजांशी चालेलेले युद्ध जास्तच जोरात आले. शिवाजीराजांनी आपले आरमार पुष्कळ वाढवले. उभयतांचे अनेक युद्धप्रसंग झाले. त्यात सिद्दीस यश आले असे मुसलमान इतिहासकार लिहितात. सन 1671 च्या होळीच्या दिवसात सिद्दी कासम व खैर्यत यांनी दंडाराजपुरी येथील शिवाजीराजांच्या ठाण्यावर गुप्तपणे रात्री हल्ला केला आणि दारूगोळ्याचे कोठारास आग लावली. त्यावेळी जो धडाक्याचा आवाज झाला, तो शिवाजीराजांना चाळीस मैलांवर रायगड येथे ऐकू आला. त्याबरोबर 'राजपुरीस काहीतरी अपघात आहे' असे म्हणत शिवाजीराजे दचकून झोपेतून जागे झाले. पुढे बातमी आली तो खरेच. राजपुरी व दुसरी काही ठिकाणे सिद्दीने घेतली आणि बायकापोरांस गुलाम करून पुरुषांस ठार मारले. या कामगिरीबद्दल सिद्दी सरदारांस मोगलांकडून शाबासकी मिळाली ह्यात नवल नाही. ह्यावेळी औरंगजेबाबरोबर मराठ्यांचे युद्ध सुरू होते. तथापि शिवाजीराजांची उमेद खचली नाही. त्यांनी आपले आरमार आणखी वाढवले. तेव्हा सिद्दीने मुंबईच्या इंग्रजांना आपणाकडे वळवण्याचे प्रयत्न केले, पण शिवाजीराजांच्या धाकास्तव इंग्रज तटस्थ राहिले.

मुंबई बंदराचे पूर्वकाठावरील पेण पनवेलच्या पश्चिमेचा उरण वगैरे प्रदेश फार सुपीक असून तो शिवाजीराजांचे ताब्यात होता. ह्या प्रदेशास कुर्ला असे म्हणत व त्यातून मुंबईचे इंग्रजांस पुष्कळ सामानसुमानाचा पुरवठा होई. हा कुर्ला दरसाल उद्ध्वस्त करून सिद्दी हा इंग्रजांना व शिवाजीराजांना उपद्रव देत असे. म्हणून सिद्दीचा मोड करण्यासाठी इंग्रजांशी तह करून व त्याचे नुकसान भरून देऊन, त्याचेशी सख्य करण्यास शिवाजीमहाराज तयार झाले. सन 1673 मध्ये सिद्दीने कुर्ला येथील मराठ्यांचे मुलखास पुष्कळ उपद्रव केला. कुर्ल्यातील व्यापार फायदेशीर असल्यामुळे त्या प्रांतास सिद्दीने त्रास दिलेला इंग्रजांना फार बाधक होई. त्यांनी सिद्दीस मुंबई बंदरात येऊ देऊ नये, अशी शिवाजीराजांची इंग्रजांना

ताकीद असे. सन 1674 मध्ये शिवाजीराजांनी आपले आरमार वाढवले व दुसरी फौजही रायगडाहून एकदम सिद्दीवर आणली. तेव्हा मराठ्यांनी सिद्दीचे शेकडो लोक कापून काढले आणि जंजिऱ्यापासून गोव्यापर्यंतचा किनारा काबीज केला. राजपुरी बंदर सिद्दीने घेतले होते, ते फिरून मराठ्यांचे ताब्यात आले. सिद्दी हा दरसाल मुंबईच्या बंदरात न विचारता येऊन उतरे, ते इंग्रजांना बिलकूल खपत नसे. सन 1674 मध्ये शिवाजीराजांनी सिद्दीचा पाडाव करून त्याला सुरतेपर्यंत हाकलून दिले हे वर्तमान ऐकून औरंगजेबास राग आला आणि त्याने सिद्दीस जास्त मदत देऊन पुन्हा शिवाजीराजांचे मुलुखात पाठवले. तो एकदम वेंगुर्ल्यास आला, परंतु विजयदुर्ग व राजापूर येथील शिवाजीराजांच्या आरमाराने त्याला हाकलून परत लावले (ऑक्टोबर 1676). इकडे शिवाजीराजांचा पेशवा मोरोपंत याने जंजिऱ्यास वेढा घातला, परंतु सिद्दीस मोगलांची मदत आल्यामुळे जंजिरा मराठ्यांचे ताब्यात आला नाही. सन 1677 मध्ये सिद्दी संबूळ याने कित्येक ब्राह्मण पकडून अटकेत ठेवले. ब्राह्मणांच्या ह्या कागाळ्या शिवाजीराजे ताबडतोब मनावर घेऊन बंदोबस्त करीत. कारण गोब्राह्मणप्रतिपालन हे शिवाजीराजांच्या राज्याचे ब्रीद असून सिद्दीकडून आपला हा उघड अपमान झालेला शिवाजीराजे कसा सहन करतील?

खांदेरी व कुलाबा यांच्या उत्पत्तीचे संदर्भ :-

'फिरंगी फार प्रबळ झाले असे पाहून छत्रपतींनी चांगलीशी खडकाळ जागा समुद्रामध्ये पाहून तेथे किल्ला बांधावयास आरंभ केला. सन तिस्सा सबाईन व अलफ या साली शके 1600 भाद्रपद मासी गौरीचे मुळावर किल्ला बांधून तो लढाईचे फार उपयोगी असल्याकारणाने खांदेरी असे नाव ठेवले. खेसगड, मांडवेगड, खांदेरी व सागरगड या किल्ल्यांवर फौज ठेवली. समुद्रामध्ये गलबते व आरमार ठेवून फिरंगी लोकांबरोबर लढाया केल्या. परंपरेने लढाई होऊन प्राप्तव्य काही नाही. ते समयी हबशी राजपुरीहून फौज घेऊन खांदेरीनजीक खडक होता, तेथे शके 1601 सन समानीन व अलफ वैशाखमासी किल्ला बांधावयास आरंभ केला व त्याला उंदेरी असे नाव ठेवले. पुढे हबशी याने उंदेरी किल्ल्यावर फौज चढवून तेथून रात्री कुलाबा प्रांतात उतरून गावे मारावी, घरे लुटावी व माणसे जिवे घ्यावी, ह्याप्रमाणे काम ठेविला. फिरंगी यांनी रेवदंडा येथे रयतेस धरून नेऊन ठेवावे; देवळे व मशिदी मोडून टाकाव्या. शिवाजीराजाने तह करण्याविषयी बहुत प्रयत्न केला परंतु तह होईना. देशास फार उपद्रव झाला. किल्लेकोट असता प्रांताचा बंदोबस्त होईना. अलिबागेजवळ नऊघर येथे समुद्रकिनाऱ्याजवळ खडक होता, तेथे शके 1602 सन इहिदे समानीन साली किल्ला बांधून जंजिरे कुलाबा असे नाव ठेविले.[160]

'जंजिरा पाण्यात किल्ला, जेर न होय, असाध्य तो आपणास यावा, समुद्रात सत्ता करावी, म्हणून बहुत चित्तांत हेतू धरून, आरमार करावे' असा बेत करून, महाराजांनी नवीन जहाजे तयार करविली. त्यांची नावे :- गुराब, तरांडी, गलबते, दुबारे, शिबाडे, नगार,

माचवे, बाथोर, तिरकटी, पाल अशा जातीची चार-पाचशे तयार करविली. दहा-पाच लक्ष रुपये खर्च केला. त्याजवर सरदार दर्यासारंग व मायनाक भंडारी यांसी सुभेदारी देऊन तोफा वगैरे सामान दर्यावर्दी केले. लढाऊ कोळी व खलाशी ठेवले. ते सावकारी माल जहाजे लुटून, हरजिनसी दर्यातील पैदास्त करून महाराजांस आणून देऊ लागले. समुद्रात सत्ता वसविली. दर्याकिनारी जागोजागी शहरे मारू लागले. बेटे चांगली पाहून किल्ले बांधिले.' जमिनीच्या बाजूने हबशाला सामान मिळण्याची बंदी झालीच होती. आरमाराचे योगाने समुद्रातूनही सामान त्यास न मिळे असा बंदोबस्त करण्यात आला. पाच-सात वर्षात शिवाजीराजांचे मोठे बलाढ्य आरमार तयार झाले. कोळी व भंडारी हे उत्कृष्ट खलाशी त्यांच्या आरमारावर होते; आणि गलबते बांधण्याचे कारखानेही त्यांनी ठिकठिकाणी स्थापन केले. विजयदुर्ग, कुलाबा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अंजनवेल या ठिकाणी त्यांच्या गोद्या होत्या, तेथे मोठमोठी जहाजे बांधण्यात येत असत.[161]

राज्याभिषेकाच्या वेळी शिवाजीराजांचे आरमार बरेच प्रचंड होऊन युद्धसामुग्रीचा संग्रहही चांगला झाला होता. त्याचा उपयोग शिवाजींना तर झालाच, पण पुढे संभाजीराजांनीही या आरमाराच्या मदतीने पुष्कळ विजय संपादले. तथापि सिद्दीला पश्चिम किनाऱ्यावरून साफ उखडून देण्याची शिवाजीराजांची मनीषा तृप्त झाली नाही. 'घरात जैसा उंदीर तैसा आमचे राज्यास सिद्दी' असे शिवाजीराजे नेहमी म्हणत, तेच सर्व मराठेशाहीत परिणामास आले.

समुद्रावर जहाजे ठेवून आपली सत्ता वाढविण्याची शिवाजीराजांना अनिवार इच्छा होती. इंग्रज म्हणत, 'तो स्वत: खलाशी नव्हता म्हणून बरे, नाही तर त्याने जमिनीचा पृष्ठभाग साफ करून टाकला, त्याप्रमाणेच समुद्राचाही करून टाकला असता.' शिवाजीराजांना समुद्रस्नानाची अतिशय आवड असल्यामुळे ते लहान असताना मुद्दाम महाड येथे बाणकोटच्या खाडीवर येऊन राहिले होते. त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग किल्ला बांधण्यात ते स्वत: खपत होते. त्यांचे समुद्रावरील पराक्रम कमी योग्यतेचे नाहीत. त्यांनी दाभोळ बंदर व त्याच्या टापूतील अनेक ठिकाणे बादशहा औरंगजेबापासून हिसकावून घेतली. पश्चिम किनाऱ्यावर अनेक किल्ले ताब्यात ठेवून त्यांच्या योगाने समुद्रावर आपला ताबा चालविण्याची तजवीज केली. जंजिऱ्याच्या सिद्दीशी सतत झुंज चालवली. कुलाबा येथे आरमाराचे मुख्य ठिकाण करून, तेथे दारूगोळ्याची तजवीज ठेवली, तिचा पुढे चांगला उपयोग झाला. त्यांच्या आरमारात आरंभी, म्हणजे बार्सिलोरवर हल्ला करण्याच्या वेळेस (1665), 30 पासून 150 टन आकाराची लहान मोठी 85 जहाजे असून, त्यात 3 मोठ्या डोलकाठ्यांची होती. परंतु पुढे सहा वर्षांनी त्यांचे आरमारात 160 जहाजे झाली. इंग्रजांस आपली शक्ती दाखविण्याकरिता त्यांनी हे सर्व आरमार एकदा मुंबईच्या बॅक बे बंदरात आणले होते. दमणनजीक पोर्तुगीझ लोकांचे एक मोठे लढाऊ जहाज त्यांनी

पकडून घेतले व कारवार काबीज केले. किनाऱ्यावर लागलेल्या निवारसी मालावरील आपला हक्क त्याने कधी जाऊ दिला नाही आणि मरणापूर्वी थोडा वेळ त्याने दर्यावर्दी कामात कधी काळी आपणास इंग्रजांचे आरमार वरचढ होईल ह्या भीतीने त्यांचेवर दाब ठेवण्याकरिता खांदेरी बेट काबीज करून तेथे नाविक युद्धाची मजबुती केली.

शिवाजीराजांच्या आरमारखात्यात एकंदर पाच हजार लोक होते. शिवाजींच्या वेळेस आरमाराचा स्वतंत्र सुभा नव्हता, तो पुढे पेशव्यांनी केला. ठिकठिकाणच्या बंदरी किल्ल्याकडेच शिवाजीराजांनी आरमाराची व्यवस्था सोपवली होती. प्रसंगानुसार लष्करचे कामगारही आरमारावर पाठवण्यात येत असत. मोरोपंत पिंगळे, नेताजी पालकर, रघुनाथ बल्लाळ यांनी आरमारी युद्धात पुढाकार घेतलेला आहे. भिवजी गुजर व कान्होजी आंगरे हे शिवाजीराजांच्या आरमारात नोकरी करून पुढे प्रसिद्धीस आले. ता.19 जानेवारी सन 1675 चे एक पत्र छापलेले आहे, त्यावरून आरमारासंबंधी शिवाजीराजांची दक्षता व्यक्त होते. ते पत्र असे :-

'राजेश्री जिवाजी विनायक सुभेदार व कारकून सुभे मामले प्रभावी प्रती राजेश्री शिवाजी राजे दंडवत. दौलतखान व दरियासारंग यांसी ऐवज व गल्ला राजश्री मोरोपंत पेशवे यांणी वराता सुभे मजकुरावरी दिधल्या. त्यास तुम्ही काही पावविले नाही म्हणोन कळो आले. त्यावरून अजब वाटले की ऐसे नादान थोडे असतील! तुम्हास समजले की याला ऐवज कोठे तरी ऐवज खजाना रसद पाठविलिया मजरा होईल म्हणत असाल; तरी पद्मदुर्ग वसवून राजपुरीच्या उरावरी दुसरी राजपुरी केली आहे. त्याची मदत व्हावी, पाणी फाटी आदिकरून सामान पावावे, या कामास आरमार वेगीने पावावे, ते नाही. पद्मदुर्ग हबशी फौजा चौफेर जेर करीत असतील; आणि तुम्ही ऐवज न पाववून, आरमार खोळंबून पाडाल! एवीढी हरामखोरी तुम्ही कराल आणि रसद पाठवून जरा करू म्हणाल, त्यावरी साहेब रिझतील की काय? हे गोष्ट घडायाची तऱ्ही होय. न कळे की हबशियांनी काही देऊन आपले चाकर तुम्हाला केले असतील! त्याकरिता ऐसी बुद्धि केली असेल! तरी ऐशा चाकरांस ठीकेठीक केले पाहिजेत! ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करू पाहतो? या उपरि तऱ्ही त्याला ऐवज गल्ला राजेश्री मोरोपंतांनी देविला असेल तो देवितील. तो खजाना रसद पावलियाहून अधिक जाणून तेणेप्रमाणे आदा करणे की ते तुमची फिर्याद न करीत व त्यांचे पोटास पावोन आरमार घेऊन पद्मदुर्गाचे मदतीस राहत ते करणे. याउपरी बोभाट आलिया तुमचा मुलाहिजा करणार नाही. गनिमाचे चाकर गनीम जालेस ऐसे जाणून बरा नतीजा तुम्हास पावेल. ताकीद असे.'[162]

9) शिवाजीराजांकडे आलेले इंग्रज वकील :

आरमारी बाबतीतच शिवाजीराजांचा संबंध इंग्रजांशी आला. त्यांची वाढती सत्ता पाहून आपला व्यापार बरा की आपण बरे, अशा तटस्थ वृत्तीने वागून इंग्रजांनी शिवाजीराजांशी उघड विरोध असा कधी केला नाही. उलट त्यांच्याशी सख्य जोडण्याच्या इच्छेने त्यांनी चार वेळा आपले वकील शिवाजीराजांकडे पाठवले. त्यांनी राजापुरची इंग्रज वखार लुटली त्याची भरपाई मागण्यासाठी इंग्रजांनी सन 1672 च्या आरंभी आपला वकील युस्टिक यास शिवाजीराजांचे भेटीस पाठवले. पण लुटीच्या भरपाईचे बोलणे त्याने साफ झिडकारून टाकले आणि व्यापाराच्या गोष्टी बोलण्यासाठी त्यांनी आपला वकील सुंदरजी मुंबईस पाठविला. तो परत आल्यावर पुन्हा दुसरा वकील पिलाजी नावाचा शिवाजीराजांनी सन 1672 च्या फेब्रुवारीत मुंबईस पाठवला. पण त्याचाही दृश्य परिणाम काही झाला नाही. इंग्रजांचा टॉमस निकल्स नावाचा आणखी एक वकील सन 1673 च्या मे महिन्यात शिवाजीराजांचे भेटीस रायगडावर आला, त्यापासूनही काही फलनिष्पत्ती झाली नाही. पण शिवाजीराजांनी त्यानंतर आपला वकील भिमाजी पंडित मुंबईस पाठवला, तेव्हा त्याजबरोबर मुंबईच्या प्रेसिडेंटने आपला वकील नारायण शेणवी यास शिवाजीराजांकडे पाठवले, (जून 1673). नंतर ते दोघे शिवाजीराजांना भेटून परत मुंबईस गेले. बोलाचालीचा विषय काय तो फक्त राजापुरच्या लुटीचा होता. यानंतर तिसरा मोठा वकील हेन्री ऑक्झिंडन राज्याभिषेकाचे समयी मुंबईहून शिवाजीराजांचे भेटीस गेला, त्याचीच हकिगत विशेष महत्त्वाची असून त्यात त्या समारंभाचे इत्थंभूत वर्णन आहे. निराजी रावजीने त्यांची रायगडावर चांगली बडदास्त ठेवली. त्यावेळी ऑक्झिंडन याने शिवाजीराजांशी व्यापारी तह केला, त्यात इंग्रजांच्या चार मागण्या दाखल असून त्यातून दोनच शिवाजीराजांनी मंजूर केल्या असे आहे. त्या चार मागण्या अशा:- (1) महाराजांच्या राज्यात इंग्रजांचा व्यापार चालावा. (2) व्यापारी मालावर इंग्रजांस जकात माफ असावी. (3) इंग्रजी शिक्क्याच्या मोहरा, रुपये व पैसे महाराजांचे राज्यात चालावे. (4) जहाजे फुटून किनाऱ्यास लागलेला इंग्रजांचा माल त्यास परत द्यावा. यांपैकी पहिली दोन कलमे शिवाजीराजांनी मंजूर केली व शेवटची दोन नामंजूर केली.[163]

शेवटचा वकील सॅम्युएल ऑस्टिन सन 1675 च्या सप्टेंबरमध्ये रायगडास जाऊन शिवाजीराजांना भेटला आणि धरणगावची वखार लुटली त्याची भरपाई त्याने मागितली. पण शिवाजीराजांकडून त्या कामी काही इंग्रजांस लभ्यांश झाला नाही.[164]

शिवाजीराजांचा दरारा इंग्रजांस किती होता याचा उल्लेख ईस्ट इंडिया कंपनीच्या इतिहासात पदोपदी आढळतो. कोणी मराठा मुंबईस आला तरी, शिवाजीराजेच आले असे इंग्रजांना वाटे. त्यांजला शिवाजीराजे हे एक सामान्यनामच होऊन बसले होते. सन 1703 साली इंग्रज व्यापाऱ्यांनी सुरतच्या डायरीत असे लिहून ठेवले आहे की, ‘शिवाजीराजे पुन्हा सुरतेवर येत आहे. त्याची फौज तर अगोदरपासून सुरतच्या आसपास गोळीबार करीत

आहे.' या भीतीने त्यांनी सुरतच्या ठाण्याची विशेष मजबुती केली. त्यावेळेस कित्येक इंग्रज कारकून मंडळीस लष्करी काम सांगण्यात आले, ते त्यांनी केले नाही, म्हणून कित्येकास शिक्षाही झाल्या. हा सगळा प्रभाव शिवाजीराजांच्या नावाचा. बंगालमधील इंग्रज व्यापाऱ्यांना शिवाजीराजे तर अमरच आहेत असे वाटे. सन 1680 च्या एप्रिल महिन्यात शिवाजीराजे मरण पावले, ही बातमी मुंबईच्या प्रेसिडेंटाने कलकत्त्यास कळवली, त्या वेळेस कलकत्त्याहून जबाब आला तो असा - 'राजा शिवाजी इतक्या वेळा मेला आहे, की तो अमरच आहे असे कित्येकास वाटू लागले आहे. त्याच्या मरणाची वार्ता लोकांस खरी न वाटण्याचे कारण असे की, आजपर्यंत त्यास जिकडे तिकडे विजयच येत गेले आणि त्याच्याप्रमाणे त्याच्यामागे हिमतीने काम चालविणारा कोणी नसल्यामुळे मराठ्यांच्या तावडीतून सुटल्याचा आम्हास प्रत्यक्ष अनुभव येईल तेव्हाच शिवाजी खरोखर मेला असे आम्ही समजू...' शिवाजीराजे होता होईल तो इंग्रजांना दुखवीत नसत. परकीयांना विनाकारण त्रास द्यावा, असा त्यांचा हेतू कधीच नव्हता. स्वत: शिवाजीराजांना इंग्रजांची भीति बिलकूल वाटत नसे. 'इंग्रज लोक हे कुशल व्यापारी आहेत; दूर देशाहून आपल्या देशाशी व्यापार चालविण्यात त्यांच्या इतके हुशार दुसरे कोणी नाहीत; व्यापाराच्या योगाने देशास सधनता प्राप्त होते,' इत्यादी गोष्टी मनात आणून, शिवाजीराजांनी इंग्रजांना आपल्या मुलखात व्यापार करण्यास उत्तेजन दिले.

10) शिवाजीराजांच्या लुटीचा अर्थ :

'दरोडखोर व लुटारू' हे शब्द शिवाजीराजांना मूळ मुसलमान तवारीखकारांनी लावले, आणि इंग्रज ग्रंथकारांनी त्या शब्दांचा केवळ वाच्यार्थ तेवढा घेतला. वास्तविक मुसलमानांच्या ताब्यातून शिवाजीराजांनी स्वदेश विमुक्त केला, तेव्हा मुसलमान लोकांनी त्यांना बंडखोर, लुटारू इत्यादी अपशब्द लावले ह्यात नवल नाही. शिवाजीराजांचे राज्य व्यवस्थितपणे स्थापले जाईपर्यंत त्यांना बंडखोर हीच संज्ञा मिळणे रास्त व राज्यक्रांती होताना केव्हाही असाच प्रकार व्हायचा. शिवाजीराजांनी लूट केली ती युध्यमान परिस्थितीत शत्रू मुलुखात केली. स्वत:च्या मुलुखात किंवा ताब्यातील जागिरीत कधी केली नाही. शहाजहान व मुराद दिल्लीवर चालून गेले, तेव्हा त्यांनी आपलेच सुरत शहर लुटले, तसा प्रकार शिवाजीराजांनी कधी केला नाही. खाफीखान म्हणतो, 'शिवाजी पुष्कळ संपत्ती लुटून आणी; परंतु त्यांचा असा नियम होता की, मशिदीला व कुराणाला हात लावू नये किंवा कोणा बायका-पुरुषांची अब्रू घेऊ नये. कुराणाचे पुस्तक लुटीत त्यांचे हाती आले असता ते ते मोठ्या सन्मानाने आपल्या हाताखालील मुसलमानांना देऊन टाकत. लुटीकरता कोणीही इसम पकडलेला असल्यास, मग तो हिंदू असो वा मुसलमान असो,

त्यांची यथायोग्य काळजी घेण्यात येऊन, त्यास कोणताही त्रास देण्यात येत नसे. लुटीसंबंधाचे शिवाजीराजांचे नियम असे सक्त होते की, कोणतीही लूट लोकांनी पैदा करून आणली तर ती सरकारात भरावी लागे.' एखाद्या शहरी गेल्यावर तेथील धनसंपन्न लोकांजवळून ज्याच्या त्याच्या लायकीप्रमाणे ते रकमा मागत व वसूल करत. हा स्वराज्याप्रीत्यर्थ भरावयाचा एक प्रकारचा कर होता. पण राज्य स्थापन झाले नव्हते तोपर्यंत त्या करास कायद्याचे स्वरूप आले नव्हते. कोणाही राज्यसंस्थापकास असले प्रसंग आल्याशिवाय राहात नाहीत. राज्यस्थापन करताना युद्ध करावे लागते, युद्धास खर्च लागतो व अर्थात तो खर्च कोणत्या तरी रूपाने लोकांवरच बसतो. मग त्या रूपास झोळी, लूट, कर, दंड, शिक्षा म्हणून लोकांवर बसविलेला खर्च, अगर दुसरे वाटेल ते नाव द्यावे. सीझर व सिकंदर यांनी जिंकलेल्या देशातून अपार संपत्ती स्वदेशास नेली हे मशहूर आहेच. शिवाजीमहाराज लूट करीत, ती नेहमी शत्रूच्या मुलखात युद्ध चालू असताना करीत. सुरत, जालना, जुन्नर इत्यादी शहराची लूट मोगल व विजापूरकर यांचेबरोबर युद्ध चालू असताना शिवाजीराजांनी केलेली आहे. त्यातही शत्रूच्या मुलुखातील शेतकरी पेशाची गावे लुटून शिवाजीराजांनी सामान्य रयतेस त्रास कधी दिला नाही. शत्रूची धनाढ्य शहरे, तेथील पैसेवाले सावकार, शत्रूंचे ठिकठिकाणचे खजिने व लष्करास लागणारा पैसा व सामान ही लुटून किंवा पाडाव करून त्यांनी आणली, परंतु पेशवाईत पुढे दुसऱ्या बाजीरावाने ज्याप्रमाणे आपलेच सावकार व आपलीच रयत लुटण्याचा सपाटा चालवला, तशाप्रकारे स्वराज्यात शिवाजीराजांनी कधीच लूट केली नाही. एवढेच नव्हे तर स्वराज्यात शत्रूंनी लूट केली असता ती भरून देणे हे, ते आपले कर्तव्य समजत. युद्ध चालू असताना शत्रूच्या मुलखाची लूट करणे हे शत्रूला कमजोर करण्याचे एक साधन होय. सामान्य दरोडेखोर व राज्यसंस्थापक यांचे हेतू भिन्न असतात. लूट करताना स्त्रियांस त्रास द्यायचा नाही, लहान मुलास, म्हाताऱ्यास किंवा शरण आलेल्यांस मारायचे नाही, कोणासही निष्कारण दुखापत करायची नाही, देवस्थाने, साधुसंत, फकीर वगैरे लोकांस लुटावयाचे नाही. ही शिस्त शिवाजीराजांनी तंतोतंत पाळली. लुटीत गायी पकडीत नसत. बैल घेणे असतील तर ओझ्यास हवे असतील तेवढेच घेत. शेतकऱ्यांना कधीही लुटत नसत. हे लुटीचे नियम शिवाजीराजे सर्वदा मोठ्या सक्तीने अमलात आणीत असत. शहरात किंवा सावकाराजवळ कोठे किती पैसा संचित आहे. याची इत्थंभूत बातमी हेरांकडून शिवाजीराजांना व त्यांच्या सेनानायकास आगाऊ कळत असे त्याप्रमाणे शहराबाहेर येऊन मराठी फौजेचा तळ पडे; त्या ठिकाणी शहरातील मोठमोठे सावकार व महाजन बोलावून आणीत. नंतर शहराच्या ऐपतीची वाटाघाट होऊन, अमूक एक रक्कम सर्वांनी मिळून द्यावी, अशी त्यांचेकडे मागणी करीत. त्याप्रमाणे पैसा वेळेवर पोहोचला, तर लगेच मराठी लष्कर दुसरीकडे निघून जाई. ठरल्याप्रमाणे पैसा न पोहोचला तर मोठमोठ्या सावकारांना व प्रमुख मंडळीस पकडून ठेवीत. कित्येक सावकार मोठे बिलंदर असून आपल्या संपत्तीचा थांग कोणास लागू देत

नसत. अशा लोकांना मात्र कित्येक प्रसंगी दुस्सह, जाच सोसावा लागे. मुलुखगिरीहून परत आल्याबरोबर लुटीची संपूर्ण यादी तयार करून सरनोबत सगळी लूट घेऊन राजदर्शनास येई. तेथे लुटीचा झाडा देऊन त्यास ती सरकारात जमा करावी लागे. त्या प्रसंगी कामगिरीबद्दल सरनोबताने व्यक्तिश: शिफारस करावी म्हणजे सरकारातून त्या लोकांस बक्षिसे देण्यात येत. कामगिरीवर जाताना प्रत्येकाचा झाडा घेऊन त्याजवळील सामानाची यादी करून ठेवण्यात येई आणि मुलुखगिरीतून परत आल्यावर त्या यादीबरहुकूम पुन्हा सर्वांचा झाडा घेऊन फाजील सामान किंवा दागदागिना जवळ सांपडल्यास तो सरकारजमा होई. कामगिरीवर कोणी मेल्यास किंवा जखमा वगैरे लागून घायाळ झाल्यास त्याजला सरकारातून खर्च व वेतन मिळे.

संभाजीराजांना जवळ घेऊन शिवाजीराजांनी मृत्युपूर्वी सरकारच्या तमाम कोठारातून एकंदर ऐवज जवाहीर, कापड व सामान काय शिल्लक आहे, त्याची यादी तयार केली.[165] मुख्य खजिन्यात रोकड शिल्लक पाच लाख होन व ठिकठिकाणच्या किल्ल्यांवरील शिल्लक तीस लाख होन मिळून एकंदर रोख शिल्लक या यादीत एक कोटी रुपयांहून जास्त नाही. मृत्युसमयी शिवाजीराजांपाशी एक कोटींहून जास्त रोकड शिल्लक असावी असा तर्क होता. कदाचित त्यांना खर्चही भारी करावे लागल्यामुळे शिल्लक फारशी राहिली नसेल. त्याशिवाय जवाहीर म्हणून वेगळे होते त्याची यादी आहे, तीत हिरे, माणके, मोती वगैरे अनेक जिनसांची व दागिन्यांची नावे आहेत. पण नुसत्या नावांवरून त्याची किंमत करता येत नाही. तांबे, लोखंड, शिसे वगैरे धातू व तरवारी, चिलखते वगैरे हत्यारे यादीत आहेत. बंदुकीची दारू दोन लाख खंडी आहे, पण बंदुका किंवा तोफा दाखविलेल्या नाहीत. कापडी भांडारात निरनिराळ्या जातीचा उंची व हलका कपडा व नाना तऱ्हेचे लिहिण्याचे कागद यांची यादी आहे. सुगंधी तेले, अरगजा, औषधी वस्तू, तसेच केशर, जायफळ, खारीक, खजूर, बदाम इत्यादी सामान दहा-पाच खंडीच्या मापाने दाखविलेले आहे. धान्याचे कोठारात सर्व प्रकारचे धान्य मुबलक दिलेले आहे. ओवा, मध, हिंगूळ, अभ्रक, हरताळ अशा प्रकारचे अनेक जिन्नस यादीत असून सामान्यत: संसारास उपयोगी पडणारा कोणताही जिन्नस तीत नाही असे नाही. कापूस सात हजार खंडी, छत्र्या बारा हजार, पालख्या तीन हजार, निरनिराळ्या जातींचे घोडे तीस हजार दाखल आहेत. घोड्यांची गाडी शिवाजींपाशी होती असे दिसत नाही. हत्ती पाचशे, उंट तीन हजार, गायीबैल सहा हजार अशी आणखी कित्येक जनावरे दाखल आहेत. गुलाम या संज्ञेखाली एक हजार पुरुष व सहाशे स्त्रिया दाखल आहेत. अडीचशे वर्षांपूर्वी हिंदुस्थानातील एका सामान्य गृहस्थाने आपल्या राष्ट्राचे स्वतंत्र राज्य स्थापन करताना एकंदर कमाई किती केली हे समजण्यास ही यादी उपयोगी पडेल. फारशी ग्रंथकार फक्त ऐहिक संपत्तीची यादी देतो, परंतु शिवाजींची अत्यंत मौल्यवान कमाई ग्रँट डफ्ने मात्र दाखवली आहे, ती अशी :- ‘शिवाजींनी जिंकलेला

प्रदेश व मिळवलेली संपत्ती मुसलमानांना इतकी जाचक झाली नाही, परंतु त्याने राज्याची व्यवस्था बांधून आपल्या लोकांना जो कित्ता घालून दिला आणि मराठे लोकांचे ठिकाणी जो नवीन हुरूप त्याने उत्पन्न केला, तोच मुसलमानांना खरोखर जाचक झाला.'

11) जागतिक संस्कृतीत शिवाजीराजांचा दर्जा :

शिवाजीराजे कोणास जागिरी तोडून देत नसत ही गोष्ट खरी, तरी देवस्थानास व विद्योत्तेजनाकडे उत्पन्न तोडून देऊन बराच खर्च करण्याची शिवाजीराजांची वहिवाट होती. अन्नसत्रांचे, देवस्थानांचे वगैरे धर्मादाय त्यांनी चालवले व नवीनही सुरू केले आणि त्या पैशाची अफरातफर न होता, ज्या-त्या कार्याकडे त्याचा योग्य विनियोग व्हावा अशी हिशेबाची सक्त तपासणी त्यांनी ठेवली. दक्षिणा म्हणून जी संस्था पुढे पेशवाईच्या वेळेस प्रसिद्धीस आली आणि जी अजूनही रूपांतराने थोडीबहुत अस्तित्वात आहे, तिचे जनक शिवाजीमहाराज होते. परीक्षा घेऊन द्रव्यद्वारा पंडितांना बक्षिसे देणे हे या संस्थेचे काम होते. त्यावेळच्या मानाने लोकसुखाभिवृद्धि करण्याकडे शिवाजीराजांचे लक्ष फार होते; पण तत्कालीन समाजातील प्रमुख मंडळींचे त्यांना पाठबळ नव्हते. यासंबंधात पाश्चात्त्य स्थितीचा संदर्भ दाखवणे बोधप्रद होईल. शिवाजीराजांच्या पूर्वी शंभर वर्षे युरोपातील सामान्य लोकशिक्षण आपल्यापेक्षा फारच पुढे होते. युरोपात अनेक ठिकाणी मोठमोठी विद्यापीठे होती. तेथे जाऊन अभ्यास केल्याशिवाय विद्वान म्हणवून घेण्यास मनुष्य लायक होत नसे. भाषा, गणितशास्त्र, भूगोल, नौकाशास्त्र व दुसरे अनेक व्यावहारिक विषय यांचा त्यांना अभ्यास करावा लागे. हे शिक्षण लोकांत बरेच पसरलेले होते; म्हणजे आपल्या इकडच्यासारखे एकाच वर्गात प्रचलित नव्हते. इकडे शिवाजीराजांच्या वेळेस सामान्य शिक्षण फारसे नव्हतेच आणि जे होते त्यास शास्त्रीय ज्ञानाची जोड नव्हती. विद्यादानाचा बहुतेक उद्योग ब्राह्मणांच्या हातात होता, त्यातही नुसते वेदपठण प्रधान मानले जात असे. वैदिक व शास्त्री यांच्याशिवाय इतर मंडळींना शिक्षणाची फारशी आवश्यकता वाटत नसे. वेदपठण, व्यावहारिक हिशेब व थोडेसे लिहिणे-वाचणे ह्यापलिकडे जास्त विद्या फारच थोड्यांना येत असे. प्रत्यक्ष व्यवहाराच्या अनुभवाने बुद्धि कितीही तरतरीत झाली, तरी ती विद्येने सुसंस्कृत होत नसे. इतिहासात शिवाजीराजांच्या वेळची जी नावे प्रसिद्ध आहेत, त्यात विद्वान हे पद ज्यांना योग्यपणे लावता येईल अशी मंडळी फारच थोडी, असे सामान्य अनुमान करण्यास हरकत नाही. चिटणीस वगैरे घराण्यांचा लिहिण्याचाच धंदा असल्यामुळे, त्यांना लिहिणे-वाचणे चांगले येत असे; पण त्या विषयास सोडून इतर विषयात त्यांचा अभ्यास बेताचाच असे. जो-तो आपल्या धंद्यापुरते पाही. पुराणिकांना व

वैदिकांना बालबोध वाचता येई खरे पण लिहिण्याचे नावाने सही तरी करता येत असे की नाही याचा वानवा वाटतो.

शिवाजीराजांचा काळ धामधुमीत गेल्यामुळे, केवळ शांततेच्या वेळी उदय पावणाऱ्या विद्येच्या विषयांकडे लक्ष देण्यास त्यांना फुरसत मिळाली नाही. शिवाय एकंदर परिस्थितीच्या पलिकडे नवीन वाट फोडण्याची कल्पकता त्यांच्या तरी डोक्यात कशी यावी! अशा कामी, राज्यकर्त्यांना दिशा दाखवून देण्याचे काम विद्वानांचे व विचारवंतांचे असते. प्रथम विद्वान लोक नवीन दिशा दाखवतात आणि मग त्या कामास राजाश्रय मिळतो. सबब या विषयाची जबाबदारी शिवाजीराजांपेक्षा रामदास व अष्टप्रधान यांच्यासारख्या समाजातील धुरीणांवरच विशेष येते.

शिवाजीराजांच्या पूर्वी शंभर वर्षे सर टॉमस मोर नावाचा विद्वान गृहस्थ इंग्लंडमध्ये झाला. त्याने शिक्षणाचे योग्य स्वरूप प्रतिपादून राष्ट्रास सज्ञान करण्याचा मार्ग दाखवून दिला. त्यांच्या पूर्वी थोडे दिवस कोलंबस वगैरे मंडळींनी गणित, भूगोल इत्यादि शास्त्रांचा व्यावहारिक रित्या अभ्यास करून अनेक शोध लावले आणि बाहेर जग केवढे विस्तृत आहे याची ओळख लोकांना करून दिली. शिवाजीराजांच्या जन्माच्या आधी थोडे दिवस लॉर्ड बेकन याने शास्त्रीय ज्ञानाचे व शिक्षणाचे महत्त्व लोकांना दाखवले. या योगाने पाश्चात्त्य लोक अज्ञाननिद्रेतून जागे झाले. विद्या मिळवून त्यांनी शास्त्रज्ञानाची प्रगती केली. ते धर्मात व व्यवहारात चालत आलेले जुने प्रघात व दुराग्रह तपासून पाहू लागले. त्यांची मने सुसंस्कृत झाली. ज्ञानाने त्यांचे सामर्थ्य वाढले. अशाप्रकारच्या शास्त्रीय ज्ञानाची व विद्येची जरूर इकडे कोणालाही भासलेली नाही; म्हणून बुद्धिने व कल्पकतेने इकडील लोक कमी नसतानाही त्यांना शास्त्रीय व्यावहारिक शिक्षण न मिळाल्यामुळे ते पंगू राहिले आणि हे पंगुत्व उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेले. पूर्वी अमूक एक काळपर्यंत आपल्याकडे राष्ट्रीय व्यवहारात योग्य प्रगती होत गेली. पण मध्यंतरी ती केव्हातरी एकदम खुंटली. म्हणूनच समाजाचे चलन थांबले. शिवाजीराजांच्या स्वराज्यात प्रत्यक्ष अनुभव राष्ट्रास मिळू लागला खरा; परंतु त्यास विद्येची जोड नसल्यामुळे राष्ट्राचे बौद्धिक दैन्य कायम राहिले. प्रत्यक्ष अनुभवाने राष्ट्राची एक बाजू जोरात आली. अगदी अप्रसिद्ध व हीन स्थितीत असलेले लोक भराभर पराक्रम गाजवू लागले. भिक्षुकांचे मुसद्दी झाले, शेतकऱ्यांचे सेनापती व जागीरदार झाले, कारकुनांचे अंमलदार बनले. त्यांना शास्त्रीय विद्येची जोड असती तर राष्ट्राचा भावी इतिहास निराळा बनला असता.

तथापि संस्कृत व मराठी भाषांबद्दल शिवाजीराजांचा उद्योग अनुपमेय वाटतो. दरबारचे लेख मराठी भाषेत लिहिण्याचा क्रम त्यांनी सुरू केला. राजव्यवहारकोश म्हणजे दरबारी शब्दांची परिभाषा तयार करवून फारशी शब्दांचा उपयोग करू नये, अशी तजवीज त्यांनी केली. शिवाजीराजांच्या मृत्युनंतर मराठी भाषेचा फैलाव फार जोराने झाला. फारशी भाषेचा रिवाज बंद करून संस्कृतचा प्रचार चालू होताच मराठी भाषेस स्फुरण चढले आणि

राज्याबरोबर त्या भाषेचीही वाढ झाली. राज्याच्या सीमा वाढत गेल्या तसतशा मराठी भाषेच्याही सीमा वाढल्या. राज्यविस्ताराबरोबर हिंदुस्थानातील इतर भाषांशी मराठीचा सहवास घडून तिचे स्वरूप विस्तृत बनत गेले. राजकारणात, दळणवळणात, बखरी वगैरे निरनिराळ्या प्रकारच्या लेखनात मराठीचा उपयोग होऊ लागल्याबरोबर, स्वराज्याच्या अभिमानाने ग्रंथकर्ते व कवी यांनी मराठीला बरेचसे संस्कृतमय पण स्वकीय असे स्वरूप आणून दिले. लहानमोठ्या अनेक लेखकांचे साह्य भाषेला मिळाले. मराठेशाहीतील ऐतिहासिक गद्य हा मराठीचा एक बहुमोल अलंकार असून त्याची उभारणी शिवाजीराजांनीच केली.

शिवकालीन समाजाचे वैशिष्ट्य पुस्तकी विद्येत नसून तत्कालीन व्यावहारिक अनुभवात दिसून येते. सर्व प्रकारचे हुन्नरी कसब देशात भरपूर होते. शिवाजीराजांच्या वेळची किल्ले वगैरेंची बांधकामे आज दोनशे वर्षे सृष्टीतील आघात सहन करीत आहेत. इतकेच नव्हे, तर ती कामे मोडून टाकण्यास निसर्गाचा व इतरांचा प्रयत्न चालला असतानाही त्यांचा भंग होत नाही! या कामी पूर्वजांच्या कामगिरीची ओळख करून घेण्याकरता महाराष्ट्रातील काही किल्ले प्रत्येकाने मुद्दाम जाऊन पहावेत. युद्धकला व त्यासाठी लागणारे साहित्य तयार करून त्याचा उपयोग करणे, हरएक प्रकारचे दगडी व इतर जातीचे बांधकाम, वसुलाची व्यवस्था, राज्याचा बंदोबस्त, हुन्नर व कलाकौशल्ये, नानाविध व्यापारी जिनसांची पैदास इत्यादि विषयात केवळ प्रत्यक्षानुभवाच्या जोरावर शिवाजीराजांच्या वेळचा समाज अनेक विषय हाती घेण्यास तयार होता. शिवाजीराजांप्रमाणेच त्यांच्या प्रधानांना व साह्यकर्त्यांना विशिष्ट शिक्षण मिळाले नसतानाही ते आपापली कामे करण्यास लायक व समर्थ झाले, याचे कारण ते जगाच्या प्रत्यक्षानुभवामुळे तरबेज होऊन बाहेर पडले होते.

अशा विभिन्न दृष्टींनी विचार केला म्हणजे दिसून येईल की, 'मृतप्राय झालेल्या मराठी राष्ट्रास शिवाजीराजांनी जिवंत कळा आणली', ही त्यांची कामगिरी परकी अमलाखाली नि:सत्व बनलेल्यांना सदैव उत्तेजन देणारी आहे. परकी अमलाखाली लोकांची दुर्दशा कशी व किती बाजूंनी होते हे आज आपण प्रत्यक्षच पाहत आहोत. जिवंत व वर्धमान राष्ट्रातील नानाविध व्यवसाय आपणही आज स्वीकारतो, पण त्यास खरे तेज येत नाही. हल्लीच्या स्काउटिंगचे किंवा युरोपात होणाऱ्या ऑलिम्पिक खेळांचे उदाहरण मनात आणल्यास यातील फरक व्यक्त होईल. आपणास युद्धकलेत किंवा नाविक कलेत तर शिरकाव नाहीच, परंतु स्काउटिंगमध्येसुद्धा अमूक एका मर्यादेपलिकडे आपली प्रगती होऊ शकत नाही. मग विमानोड्डाण, हिमालयाच्या अज्ञात शिखरांचे आरोहण अशा बाबतीत तर जिवंत राष्ट्रांच्या कर्तबगारीची वर्णने वाचूनच आम्हाला आपली भूक शमवावी लागते. हा प्रकार ध्यानात आणला म्हणजे मृत राष्ट्रास शिवाजीराजांनी जिवंतपणा कसा आणला हे लक्षात येईल. शिवाजीराजांचा एखादा लहानसा सेनानी अगर वकील विजापुरास, सुरतेस किंवा दिल्लीस गेला तर त्याचा योग्य मरातब होऊ लागला. चिनमध्ये किंवा तुर्कस्तानात एखादा

इंग्रज आज गेला असता त्याचा यत्किंचित अपमान झाल्यास लगेच अखिल इंग्रज राष्ट्राकडून त्याचा प्रतिकार घडतो, हेच या जिवंतपणाचे लक्षण आहे. व्यापार, कलाकौशल्य, व्यायामाचे व पराक्रमाचे नानाविध व्यवसाय अशा अनेक विषयात पाहिजे त्यास बुद्धिबळाने पुढे येण्याची सोय जिवंत राष्ट्रात असते. एखादी नवीन चीज कोणी तयार केली तर तिचा योग्य परामर्ष घेणारा राष्ट्रचालक संनिध असल्यामुळे पुरस्काराची द्वारे सर्वांना सारखीच खुली असतात. याच कारणास्तव मोगल बादशहाचे वेळेस सुद्धा एकंदर हिंदी राष्ट्राची मोठी भरभराट होऊ शकली. परंतु हा वाहता झरा औरंगजेबाचे वेळेस आटू लागताच शिवाजीराजांनी आपल्या कर्तबगारीने त्यात नवीन चैतन्य उत्पन्न केले. ही त्या थोर व धूर्त पुरुषाची कामगिरी अलौकिक गणली पाहिजे.

आजकालच्या व्यवहारात सुद्धा शिवाजीराजांच्या चरित्रापासून पुष्कळसा उपयुक्त बोध; विचार करील त्याला दिसल्याशिवाय राहणार नाही. प्रबलांच्या मगरमिठीतून दुर्बलांनी आपले राजकीय स्वांत्र्य कसे पैदा करावे, या प्रश्नाला तर शिवाजीराजांचा सर्वच उद्योग विशेष लागू आहे. हल्ली जो स्वराज्याचा लढा इंग्रज व हिंदी लोकांचा चालू आहे, त्यामानाने शिवाजीराजांच्या वेळी मुसलमान मराठ्यांची परिस्थिती बिकट होती असे म्हणावे लागते. धर्मसंरक्षणाचा प्रश्न त्यावेळी अत्यंत अवघड होता, तसा आज नाही. तथापि मुसलमान झालेल्या हिंदूंना स्वधर्मात परत घेण्याचे शिवाजीराजांनी जे चातुर्य व धाडस व्यक्त केले ते खरोखरच अप्रतिम म्हटले पाहिजे. मुख्यत: हिंदू-मुसलमानांच्या तीव्र विरोधाचा प्रश्न शिवाजीराजांनीनी सोडविताना त्या काळी जी विशेष दूरदृष्टि दाखवली ती आजसुद्धा आपणास अनुकरणीय आहे. औरंगजेबाचे मनात हिंदूसंबंधाने कितीही धर्मद्वेष वागत असो, शिवाजीराजांनी सर्व धर्मांना अत्यंत नि:स्पृह व समान दृष्टीने वागवले, म्हणून त्यांच्या राज्यात कोणीही मुसलमान धर्माचरणाचे बाबतीत नाखूष नव्हता. हिंदूइतकेच त्यांच्या जिवास जीव देणारे मुसलमान लोकही त्यांचे ऋणानुबंधी होते. तसेच एकनाथ तुकारामांसारख्या वंदनीय साधूंच्या शिकवणीने अस्पृश्यतेचे प्रखर व कटू स्वरूप त्यावेळी उत्पन्नच झाले नव्हते. आज आपणास सर्व भूतांचे ठायी समान भाव दाखविणारे तसले साधू पुन्हा निपजावे असेच वाटत आहे. विद्या, कला, भाषा, व्यापार इत्यादिकांसंबंधाने देखील आज जे भेदभाव नजरेस येऊन अल्पसंख्य व बहुसंख्य याजमध्ये तेढ आलेली दिसते, तशी अनिष्ट भावना शिवाजीराजांच्या राज्यव्यवस्थेत बिलकूल निर्माण झाली नाही. मुख्यत: राष्ट्रातील प्रत्येक इसमास आपापल्या मर्जीप्रमाणे निर्वाह करण्यास भरपूर उद्योगक्षेत्र शिवाजीराजांच्या राज्यात मिळाल्याने आपसातील वैमनस्यास थाराच राहिला नाही. हे प्रकार तत्कालीन कागदपत्रांमुळे भरपूर लक्षात येतात.

12) तुलना :

कोणत्याही दोन ऐतिहासिक व्यक्तींची तुलना हुबेहूब जुळणे शक्य नाही. तथापि अशा तुलनेपासून वर्ण्य व्यक्ती मनात ठसण्यास मदत होते. शिवाजीमहाराज हे अनेक बाबतीत लोकोत्तर पुरुष होऊन गेले. त्यांनी आपल्या राष्ट्राचे गुणावगुण बरोबर ओळखून लोकांचा स्वाभिमान जागृत केला आणि त्यांची एकी करून त्यांना नानाविध पराक्रम करण्यास उद्युक्त केले. शिवाजीराजांपेक्षा जास्त पराक्रम गाजविणारे किंवा जास्त देश जिंकून त्यांचेवर राज्य करणारे पुरुष जगाच्या इतिहासात पुष्कळ आढळतील. पण त्यांच्याइतका गुणसमुच्चय एका व्यक्तीत एकत्रित झालेला सहसा आढळत नाही. फार काय शिवाजीराजांमध्ये अमूक एक दोष दाखवा असा प्रश्न कोणी केल्यास आपणास बहुधा निरूत्तर व्हावे लागते.

ग्रीसचा सिकंदर बादशहा जगाच्या इतिहासात मोठा पराक्रमी गणला जातो. परंतु सिकंदरास सर्व जग जिंकण्याची हाव होती. जिंकलेल्या प्रदेशाची सुधारणा करून राज्यव्यवस्था ठरविण्यात त्याने लक्षच घातले नाही. शिवाजीमहाराज त्याच्यासारखे जगज्जेतृत्वासाठी किंवा दिगंत कीर्तिसाठी हपापलेले नव्हते. शिवाय सिकंदराच्या बापाने अगोदरच मोठे राज्य कमावून ठेवलेले होते, तशी गोष्ट शिवाजीराजांची नव्हती. तसेच, शहर काबीज केल्यावर तेथील लोकांची नाहक कत्तल करणे, अमोलिक ग्रंथसंग्रह जाळून टाकणे, शरण आलेल्या बंदिवानांना यमसदनी पोहोचविणे व सुरादेवीच्या भक्तीत बेफाम होणे, असली घोर पापे शिवाजीराजांनी कधीच केली नाहीत. प्रसिद्ध रोमन सरदार ज्युलिअस सीझर व शिवाजीराजे यांच्यात वरच्याहून जास्त साम्य आहे. दोघेही धोरणी, राजकारणकुशल व व्यवस्थित होते. पण सीझरही जगज्जेतृत्वाच्या हावेपासून अलिप्त नव्हता. रोमन राष्ट्राच्या विस्तृत व संपन्न पायावर सीझरने पराक्रम गाजवणे व मुळात काहीच नसताना शिवाजीराजांनी आपल्या राष्ट्रास स्वातंत्र्य प्राप्त करून देणे, यात पुष्कळ फरक आहे.

युरोपच्या इतिहासातील तिसरा मोठा पुरुष नेपोलियन बोनापार्ट होय. शिवाजीराजे व बोनापार्ट यांजमध्ये जरी अनेक बाबतीत पुष्कळ विरोध आहे, तरी दोघांमध्ये साम्यही बरेच आहे. निष्ठा व कल्पकबुद्धि, लोकांवर छाप बसविण्याची विलक्षण हातोटी, राष्ट्र उर्जितावस्थेस आणण्याची अनावर उत्कंठा इत्यादि महान पुरुषांना आवश्यक लागणारे गुण दोघांमध्ये होते. पण फ्रेंच राज्यक्रांतीने तयार केलेले आयते वातावरण नेपोलियनला मिळाले आणि शिवाजीराजांनी तसे वातावरण ‘स्वत: निर्माण केले’ हा फरक ध्यानात ठेवला पाहिजे. अठराव्या व एकोणिसाव्या शतकात युरोपीय राष्ट्राचे शिक्षणही निराळ्या तऱ्हेचे होते. ह्यामुळे हरएक विषयात नाव गाजविण्यास बुद्धिमान पुरुषास युरोपात जसा अवकाश होता, तसा हिंदुस्थानात नव्हता. अर्थात मोठमोठे विजय संपादून दिगंत कीर्ति मिळवण्याची सवड बोनापार्टला युरोपात मिळाली तशी शिवाजीराजांना हिंदुस्थानात मिळाली नाही. नेपोलियनची विद्वत्ता जबर होती. ते विद्वान लेखक व हुशार कायदेपंडित

होते. त्यावेळी तशाप्रकारचे शिक्षण युरोपात प्रचलित होते. शिवाजीमहाराज तसे विशेष विद्वान नव्हते. नैसर्गिक बुद्धिमत्ता व जगाचा विस्तृत अनुभव एवढ्यावरच शिवाजीराजांनी आपली कमाई केली. फ्रान्ससारख्या संपन्न देशात विद्या, कला, लोकोपयोगी कामे इत्यादि विषयात नवीनच सुधारणा करून देशास उर्जितावस्था प्राप्त करून देणे व सभोवारच्या इतर राष्ट्राला भावी उन्नतीचा मार्ग दाखवणे ह्यात बोनापार्टला संधी मिळाली, ती हिंदुस्थानात तत्कालीन परिस्थितीत शिवाजीराजांना शक्यच नव्हती. ऑस्ट्रिया, रशिया, प्रशिया, इंग्लंड इत्यादि रणशूर राष्ट्रांशी घनघोर संग्राम करण्याचे अनेक प्रसंग बोनापार्टवर आल्यामुळे त्याच्याकडून युद्धकलेत जसे नवीनच स्वरूप प्राप्त झाले, तसे शिवाजीराजांच्या हातूनही थोडेबहुत स्वरूप झाले, तेच पुढे पेशवाईत वृद्धिंगत पावले.

दुसऱ्या कित्येक गोष्टीत शिवाजीमहाराज बोनापार्टची बरोबरी करू शकतील. इतकेच नाही, तर काही बाबतीत ते महत्तम दिसतात. नेपोलियनची इच्छा जरी युद्धाने प्राणहानी करण्याची नव्हती, तरी परिणामी त्याच्या संग्रामांनी भयंकर प्राणहानी झालेली आहे. शिवाजीराजांच्या हातून तशी प्राणहानी झाली नाही. स्वत:विषयी अनावर महत्त्वाकांक्षा नेपोलियनच्या ठिकाणी होती, परंतु राष्ट्रहितापुढे स्वतःची महती शिवाजीमहाराज मुळीच समजत नसत. नवीन फौज तयार करणे, किल्ले वगैरे प्रचंड काम तयार करून देशाचा बंदोबस्त करणे, देशात सुरळीत राज्यव्यवस्था व आबादानी करणे, ह्या बाबतीत शिवाजीमहाराज नेपोलियन इतकेच कल्पक व दूरदृष्टीने भारलेले दिसतात. नेपोलियनच्या पराक्रमाचा पाया फ्रान्ससारख्या संपन्न देशावर निर्माण झाला. शिवाजीराजांपाशी मुळात काहीच नव्हते. सर्व देश परचक्राखाली दडपून गेलेला होता. अशा स्थितीत शिवाजीराजांनी परचक्रातून स्वराष्ट्रास सोडवून त्यास भाग्योदय प्राप्त करून दिला आणि मूळचाच स्वतंत्र असलेला फ्रान्ससारखा सुशिक्षित व सुसंपन्न देश नेपोलियनने महतपदास चढवला, ह्यात काही अंशी शिवाजीराजांचीच कर्तबगारी जास्त आहे. शिवाजीराजांचे खासगी वर्तन अत्यंत निर्मळ व पवित्र होते, तसे नेपोलियनचे नव्हते. अनावर महत्त्वाकांक्षा व जबरदस्त बुद्धिमत्ता ह्यांच्या योगाने बोनापार्टने युरोपीय राष्ट्राचे प्रखर वैर मात्र संपादले; पण भलतीच महत्त्वाकांक्षा धारण न केल्यामुळे, शिवाजीराजांचे शत्रूसुद्धा निर्वीर्य होऊन, त्यांचा स्नेह संपादून राहू लागले, हा त्यांच्या सौजन्याचाच प्रभाव होय.

वास्तविक शिवाजीराजांशी तुलना करण्यास सर्व बाजूंनी साजेल असा पुरुष सापडणे कठीण आहे. काही अंशी मोगल बादशाहीचा संस्थापक बाबर बादशहा याचेशी शिवाजीराजांचे साम्य आहे. बाबराचे वडिलोपार्जित राज्य लयास गेले होते. शिवाजीराजांप्रमाणेच त्याचे आयुष्य विपत्तीत गेले. अंगचे अप्रतिम साहस, बुद्धिमत्ता व सोशिकपणा ह्या गुणांच्या जोरावर त्याने उत्तर हिंदुस्थानची बादशाही कमावली. शिवाजीराजांप्रमाणेच बाबरही आईच्या अर्ध्या वचनात असे. बाबर शूर असून राज्यकारभारातही काही कमी नव्हता. शिवाजीराजांसारखाच तोही अल्पायुषी झाला. तो

जास्त दिवस जगला असता तर कदाचित त्याचाही लौकिक मोठा झाला असता. तथापि बाबरही परदेश जिंकण्याच्या दोषापासून मुक्त नाही. बाबराप्रमाणे शूर व सोशिक, अकबराप्रमाणे सर्वांवर समदृष्टि ठेवून राज्यकारभाराची व्यवस्था करण्यात कुशल, शहाजहानप्रमाणे काटकसर करून प्रजेच्या सौख्यात दंग असणारे असे शिवाजीराजे हे प्रतापी मोगल बादशहांच्या अनेक सद्गुणांचा निष्कर्ष होते. बाबर व अकबर यांचेप्रमाणे शिवाजीराजांनी स्वत: संकटे भोगली असल्यामुळे, गरिबांचे हाल कसे असतात हे त्यांना चांगले समजत असे. जहांगीर किंवा शहाजहानप्रमाणे शिवाजीराजे ऐषआरामी नव्हते आणि ऐषआराम करण्यास वडिलांनी केलेली कमाई शिवाजीराजांपाशी नव्हती. औरंगजेबाची जबरदस्त उद्योगशीलता शिवाजीराजांच्या ठिकाणी असूनही कपट व विश्वासघात यांच्या योगाने औरंगजेबाचा नाश झाला, ते दुर्गुण शिवाजीराजांना शिवले नाहीत. सारांश, शिवाजीराजांशी तुलना करणारा साजेल असा एकच पुरुष इतिहासात सापडणे कठीण आहे. इतक्यावरूनच 'ते लाकोत्तर पुरुष होते' असे म्हटले पाहिजे.

इंग्लंडचे इतिहासातही शिवाजीराजांसारखा पुरुष झाला नाही. इंग्लंडात स्वराष्ट्रास स्वातंत्र्य मिळवून देण्याचे कृत्य नवव्या शतकाचे अखेरीस आल्फ्रेड राजाने केले. त्यावेळी डेन्स लोकांनी सर्व इंग्लंड देश आक्रमून टाकला होता; त्यांजपासून थोडासा प्रदेश परत मिळवून आल्फ्रेडने स्वदेशाची बाजू राखली आणि कित्येक लोकोपयोगी कामे केली. त्याबद्दल त्यास 'थोर' ही पदवी देण्यात आली आहे. त्यामानाने पाहता शिवाजीराजांची कामगिरी आल्फ्रेडच्या पुष्कळच जास्त योग्यतेची असल्यामुळे थोर अगर त्याहून श्रेष्ठ असे पद त्यांना सर्वथैव योग्य आहे. आल्फ्रेडनंतर इंग्लंडवर परचक्र आले नाही असे नाही. डेन्स लोकांनीच तो देश पुनरपि जिंकला आणि पुढे फ्रान्समधून नॉर्मन लोकांनी येऊन तो देश संपूर्णपणे काबीज केला. तेव्हा इंग्रजांना काहीच उपाय न राहिल्यामुळे शेवटी ते नॉर्मन लोकांत मिसळून गेले आणि तसे संमेलन होण्यास त्यांना साधनेही विपुल होती. आल्फ्रेडपेक्षा एका अर्थाने स्कॉटलंडच्या रॉबर्ट ब्रूसशी शिवाजीराजांची तुलना शोभण्यासारखी आहे. अमेरिकेतील संयुक्त राज्याचा संस्थापक वॉशिंग्टन याचेशी थोड्याबहुत अंशाने शिवाजीराजांची तुलना करता येईल. तसेच युरोपच्या इतिहासात हॉलंड देशास स्वातंत्र्य मिळवून देणारा ऑरेंजचा सरदार, पहिला विल्यम याचेशीही शिवाजीराजांची तुलना बऱ्याच अंशी शोभण्यासारखी आहे.

रा.राजवाडे लिहितात, ''शिवाजीराजांचे वर्तन न्यायाचे, नीतीचे, पराक्रमाचे, स्वधर्मपरायणतेचे व परधर्मसहिष्णुतेचे होते. अनेक लढायात विजय संपादन करणे; मैदानात, समुद्रतीरावर किंवा डोंगरावर तीन-चारशे किल्ले बांधणे; नवीन सैन्य तयार करणे, नवीन आरमार निर्मिणे; नवे कायदे करणे; स्वभाषेला उत्तेजन देणे; कवींना आश्रय देणे; नवी शहरे वसवणे; स्वधर्म स्थापन करून त्याचे ऐश्वर्य वाढवणे; सारांश, स्वराष्ट्राचा उद्धार करून स्वदेशाला स्वतंत्र व सुखी करणे; ह्या लोकोत्तर कृत्यांनी जर कोण्या पुरुषाने ह्या

भूमंडळाला अक्षय ऋणी करून ठेवले असेल तर ते शिवाजीराजांनीच होय. शिवाजीराजांची खासगी वर्तणूक व सार्वजनिक पराक्रम इतके लोकोत्तर होते की, त्यांच्याशी तुलना करावयास जी-जी म्हणून व्यक्ती घ्यावी ती-ती, ह्या नाही त्या गुणाने शिवाजीराजांहून कमीच दिसेल.''

ह्या अवतारी पुरुषाविषयी लिहिता-लिहिता समर्थ म्हणतात, 'तयाचे गुणमहत्त्वासी! तुलना कैची?' 'यशवंत, कीर्तिवंत, सामर्थ्यवंत, वरदवंत, नीतिवंत, जाणता, आचारशील, विचारशील, दानशील, कर्मशील, सर्वज्ञ, सुशील, धर्ममूर्ति, निश्चयाचा महामेरु, अखंड निर्धारी, राजयोगी,' अशी नाना प्रकारची विशेषणे शिवाजीराजांना रामदासांनी लावली आहेत. नि:स्पृही व स्पष्टवक्त्या अशा समकालीन ग्रंथकाराने हे गुणवर्णन केलेले आहे हे लक्षात घेतले असता, शिवाजीराजांच्या अंगी असलेल्या जाज्वल्य गुणांच्या इयत्तेचा अंदाज सहजासहजी करता येतो व कित्येक इंग्रज व मुसलमान बखरकारांनी ह्या महापुरुषाची निंदा केलेली पाहून त्यांच्या मनातील कुत्सितपणाचा ठाव घेण्यास संधी मिळते.''

ज्या पुरुषास कधीही कोणतेही दुर्व्यसन शिवले नाही; ज्याने परस्त्रीस मातेसमान मानले; ज्याने स्वधर्माप्रमाणेच परधर्मास आदर दाखवला; ज्याने युद्धात पाडाव केलेल्या शत्रूंचे लोकांस त्यांच्या जखमा बऱ्या करून स्वगृही पोहोचवले; ज्याने फौज, किल्ले, आरमार इत्यादि योजनांनी स्वदेशसंरक्षणाची योग्य तजवीज करून ठेवली; ज्याने सर्वांचे आधी स्वत: संकटात उडी घालून आपल्या लोकांना स्वदेशाची सेवा करण्यास शिकवले; ज्याने अनेक जिवावरच्या प्रसंगी केवळ बुद्धिसामर्थ्याने स्वत:चा बचाव केला, ज्याने औरंगजेबासारख्या प्रतापी बादशहाचे भगिरथ प्रयत्न सतत तीस वर्षेपावेतो यत्किंचितही चालू दिले नाहीत; इतकेच नव्हे तर तीन राज्यांचा पाडाव करून अखिल भरतखंडात अपूर्व असे स्वराष्ट्राचे स्वतंत्र राज्य स्थापन करून, त्याची कीर्ति पृथ्वीवर अजरामर करून ठेवली; त्या प्रतापी व पुण्यशील पुरुषाची योग्यता पूर्णपणे वर्णन करण्यास कोण समर्थ आहे! पुण्यास प्रत्यक्ष राहत्या वाड्यात पाच वर्षे पावेतो औरंगजेबाचे सुभेदार तळ देऊन बसले, तेव्हा त्यांची ती मगरमिठी सुरतेचे नाक दाबून मोठ्या युक्तीने शिवाजीराजांनी सोडवली, ह्या त्यांच्या युद्धकौशल्याची इतिहास सदैव तारीफच करीत राहील. कोणास कधी जागिरी अगर जमिनी तोडून न देणारे; न्यायाचे कामात कोणाची भीडमुर्वत न धरणारे; दुष्टांचा काळ पण गरिबांचे कनवाळू; एकंदर रयतेस पोटच्या मुलांप्रमाणे वागविणारे; सदैव सावध व उद्योगी; नेहमी मातेच्या अर्ध्या वचनात राहून अहर्निश राष्ट्राची चिंता वाहणारे; स्वदेश, स्वभाषा व स्वधर्म या विविध संपत्तीचे संगोपन करणारे; पापभीरू परंतु रणशूर असे हे आधुनिक काळचे अद्वितीय राज्यसंस्थापक छत्रपति शिवाजीराजे; प्राचीन पुण्यश्लोकांचे पंक्तीस बसण्यास सर्वथैव पात्र आहेत.

तळटीपा :

1 तस्य तस्यामजायन्त पुत्रा: षट्शुभलक्षणा:
तेषां मध्ये शंभुशिवौ द्वावेवान्वयवर्धनौ। शि.भा. 5.23; तं.शि.

2 'शहाजीराजांस प्रथम पुत्र पंचवीस वर्षांचे वयात संभाजीराजे जिजाबाईंचे पोटी जाले.' श्रीशिवाजी प्रताप पृ.26.

3 शहाजीची मुले केव्हा व कोणत्या ठिकाणी जन्मास आली हे निश्चितपणे ठरविण्यास लागणारा पुरावा अद्यापि अपुरा आहे. जेधे शकावलीत फाल्गुन व.3 शके 1551 शुक्रवार ता. 19.2.1630 ही शिवाजीराजांची जन्मतिथी नमूद आहे. या दोन प्रचलित तिथींपैकी वर दिलेल्या पहिलीचीच संगती तत्कालीन घडामोडींशी जुळते.

4) प्रशस्ति, राज्य व्यवहार कोश.

5) खं. 15.266.

6) श्रीशिवशाहीचा लेखनालंकार.

7) शि. च. सा. ले. 95 - 96.

9) खं. 18.7, 9, 19; खं. 17.7

10)पुणे शहरासंबंधी प्राचीन माहिती प्रसिद्ध झाली आहे. मुसलमानी अंमल होण्यापूर्वी ह्याचे नाव 'पूनक' असे असून ते हल्लीच्या शनिवारपेठेच्या जागेवर होते. मुसलमानी अमलात त्यास पुणेवाडी म्हणू लागले. त्या वाडीचे पाटील झांबरे व कुळकर्णी राजर्षि अद्यापि पुण्यात नांदत आहेत. शेजारी दुसरी अनेक खेडी होती, त्यांचा हळूहळू पुणे शहरात समावेश झाला. नागझरीपलिकडे लोहगाव म्हणून खेडे होते, तेथे तुकारामबुवांची सासुरवाडी असून, याच ठिकाणी त्यांच्या कीर्तनास शिवाजीराजे जात असत. ह्या लोहगावला व इतर खेड्यांना पुढे 'कसबा पुणे' अशी संज्ञा मिळाली. ही गोष्ट शिवाजीराजांच्या पूर्वी घडली. ह्या कसब्याचे देशमुख शितोळे व देशपांडे होनप यांची घराणी हल्ली पुण्यात आपल्या जुन्या ठिकाणीच आहेत. (1935 सालची टीपनोंद)

11) खंड 17.19.

12) खं. 17.2; स. प. पृ. 102.

13) खं. 18.16, 7, 8, 9.

14) नीर म्हणजे 'पाणी', यापासून नहर (कालवा), नेर = उदकप्रवाह, हा शब्द उत्पन्न झाला. नीरा नदीचा मूळ अर्थही तोच असावा.

15) व 16) Paper by Sir Jadunath Sarkar, Ind. Hist. Quar. VII 362-364.
दादोजीचे मृत्युनंतर लगेच शके 1569 (1647) मध्ये दादाजीपंत नऱ्हेकर याचे विद्यमाने भेद करून कोंढाणा ऊर्फ सिंहगड किल्ला शिवाजीराजांनी हस्तगत केला असे लेख आढळतात. त्या पूर्वी सन 1644 मध्ये दादोजी कोंडदेवाने गडावर कचेरी भरवून न्यायमनसुब्याची सुरुवात केली इतकेच दिसते. शेडगावकर बखरीत सन 1644 हेच शिवाजीराजांच्या बंडाळीचे आरंभसाल दिलेले आहे.

17) खंड. 15.267.

18) खं. 15.268

19) खं. 15.364.

20) श्रीशिवाजी प्रताप बखर पृ.73.

21) 'बाप करी बाप पावे, बेटा करी बेटा पावे,' असे वचन शिवप्रताप बखरीत आहे.

22) खं. 15.3

23)ज्याच्या हाती शस्त्र आहे त्याला दैन्य कशाचे व भय कशाचे असेच वाटत असते. खं.15.3

24) अमात्याची राजनीति, पृ.3

25) शिवछत्रपतींचे सा प्र. चरित्र.

26) हा रघुनाथ नारायणाचा चुलता होय.

27) पालीजवळ सं. भोर. हा कागद सरस्वती मंदिर मासिकात छापला आहे.

28) स.प. पृ.113

29)स.1639 चा खं.15.437 चा एक कागद आहे त्यावर ही मुद्रा आहे. शि.च. राहित्य भाग 3 लेख 526 हा कागद शिवाजीराजे यांचे नावाने खेडेबारे येथील देशमुखास आज्ञापत्रासारखा लिहिलेला असून तो इसन्ने सलासीन आलफ म्हणजे इ.स.1631 सालचा आहे. यावरून तेवढ्या अल्प वयातसुद्धा शिवाजीचे नावाने कागद लिहिण्यात येत होते असे दिसते. हा प्रकार विचारणीय आहे.

30) शि.च. सा. 3.391 प. सा. 551 व शि.प्र.पृ.73

31) शि.प्र.पृ.73 व प.सा.551

32) शिवप्रताप पृ.121. मागे शहाजीचरित्र पृ.80 वर हीच भेट वर्णिली आहे.

33) प.सा. 604, 615 व 720.

34) प. सा. 708

35) जे. श.

36) कृष्णाजीचा शिरच्छेद केला आणि बाजीराव मोरे ता.28.8.1656 रोजी कैदेतून पळून गेला, तोच पुढे जयसिंहास सामील झाला असे अन्यत्र आढळते.

ये येऽत्र चंद्रराजस्य सहायाश्च सनाभयः।

तांस्तानशातयद्वीर: शिव: शक्तिमतां वर:॥
तदा प्रतापवर्मा यश्चंद्रराजस्य बांधव:।
एलायित: शिवभयाद्येदिलं प्रत्यपद्यत॥

37) कायम, भक्कम.

38) प. सा. 717-722

39) प.सा. 459.

40) पहा - शहाजी चरित्र पृ.73.

41) बुसातीन-ए-सलातीन.

42) जे. श.

43) आबाजी सोनदेव व निळो सोनदेव हे सख्खे भाऊ, गोत्र भारद्वाज, निळो सोनदेवाचा मुलगा रामचंद्र नीलकंठ हुकमतपन्हा. आबाजी सोनदेव पुढे राजारामाचे वेळी हजर होता. पहा रा.खं.8 ले. 48 व 53.

44) कृष्णाजी भास्कर नावाचे अनेक इसम शिवकालीन इतिहासात आढळतात. वाईचा कुलकर्णी कृष्णाजी भास्कर अफझलखानाचे प्रकरणात होता. औरंगजेबाकडे कृष्णाजी भास्कर पंडित नावाचा वकील सन 1658 मध्ये शिवाजीराजांनी पाठविला असा उल्लेख राजवाडे खं.8-6 यात आहे. कृष्णाजी भास्कर पंडित मलकापुरकर जमेनीसांचा पूर्वज याचा उल्लेख स.1712 च्या कागदात आहे. (का.सं.प.या., न.आ.)

45) प. सा. 747.

46) म.सा.छो. व. हीत ‘प्रधानगड’ असे नाव आहे ते इतरत्र आढळत नाही. पनवेलच्या पूर्वेस आठ मैलांवर प्रवाळगड आहे तोच हा कदाचित असेल.

47) प. सा. 765.

48) शहाजी राजांनी कर्नाटकातून पोवळ्यांचा पलंग, चौलक्ष होनाची दाब (=कमरकट्टा), जिरेबख्तरे व टोप (=चिलखत) व फिरंग तलवार जलमार्गे पाठविली असे विधान म.सा.छो. बखरीत आहे. त्यातील ही भवानी तलवार पोर्तुगिझांचे द्वारे इकडे आली असावी. ती परत लंडनला गेली हा प्रवाद खरा नाही.

49) प.सा.777, 810. सन 1659 मध्ये ‘संगमिसी’ नावाची 20 गलबते बांधून शिवाजीराजांनी कल्याण-भिवंडीचे खाडीत पहिले आरमार सिद्ध केले. त्या गलबताचे ‘संगमिसी’ हे नाव ‘संगमेश्वर’ नावावरून पडले असे प्रो.पिसुर्लेकर कळवतात.

50) खं.8.6 सोनोपंत डबीर हा राजनीतिनिपुण गृहस्थ आरंभापासून शिवाजीराजे व जिजाबाईंजवळ होता. सन 1649 मध्ये सिंहगड परत देण्याचे संबंधात त्याने महाराजांशी वाद केला तो मागे सांगितला आहे. पुढे मुराद, शहाजहान, औरंगजेब, शायिस्ताखान जयसिंह यांजकडे महाराजांनी त्यास आपला वकील म्हणून पाठविल्याचे उल्लेख ठिकठिकाणी येतात. एकदा तो दिल्लीसही गेला होता. त्याचे पूर्ण नाव सोनाजी विश्वनाथ

असून त्याचा समकालीन परमानंद कवि त्यास ‘अग्रजन्मा’ म्हणजे ब्राह्मण असे संबोधतो. पौष वद्य 30 श. 1586 (ता.6.1.1665) च्या सूर्यग्रहणप्रसंगी महाबळेश्वरी जिजाबाई व सोनोपंत यांची तुला झाली असे जेधे शकावलीत नमूद आहे. पुढे लवकरच तो मरण पावला आणि त्याचा पुत्र त्रिंबकपंत महाराजांबरोबर आगऱ्यास गेला. महाराज निघून गेल्यावर त्रिंबकपंत व रघुनाथपंत कोरडे यांस बादशहाने कैदेत घातले, त्यातून ता.2.4.1667 रोजी त्यांची सुटका झाली. त्रिंबकपंताचा पुत्र रामचंद्र हा राज्याभिषेकसमयी महाराजांचा सुमंत होता.

51) पहा - शहाजी चरित्र पृ.64.

52) प. सा. 774.

53) हा कृष्णाजी भास्कर पुढे सन 1680 पावेतो जिवंत होता. संभाजीने ता.28.10.1680 रोजी त्यास दिलेले आज्ञापत्र उपलब्ध आहे. सत्का. 9-41 पहा.

54) सातारा येथील बहिरोपंत पिंगळे याच्या कुळकर्ण्याच्या दप्तरात पंताजी गोपिनाथ सुभेदार हे नाव एका हुकूमनाम्यावर आहे.

55) खं. 15 - ले. 302.

56) जिवा महाला संकपाळ. कोंडवळीचा राहणारा, जात न्हावी. पंचम संमेलनवृत्त ले.4.

57) प्रतापगडच्या या युद्धात कान्होजी जेधे हजर असावा. त्याच्या मुलास सर्जेराव हा किताब शिवाजीराजांनी पूर्वीच दिला होता. यानंतर वृद्धापकाळाने जर्जर झालेला हा गृहस्थ काही काळ आजारी राहून श.1682 च्या भाद्रपदात (सन 1660 च्या सप्टेंबरात) मरण पावला. प.सा.सं. 830, शि.च.सा. ले. 239 बाजी सर्जेराव पुढे इ.स. 1700 मध्ये मरण पावला.

58) मंबाजी भोसले भारला गेला असे शि.भा. कार सांगतो. कॅप्टन मोडक यांनी लष्करीदृष्ट्या या प्रकरणाचे काल्पनिक विवेचन केले आहे.

59) खं.8.11. अफझलखानाचा वध झाल्यानंतर लवकरच जिजाबाईने अज्ञानदास मागील टीप पुढे चालू : शाहिरास बोलावून त्याजकडून ह्या अद्भुत प्रकरणावर एक पोवाडा रचला आणि पाठीमागून काही दिवसांनी दुसरा एक पोवाडा रचला. ह्याबद्दल एक शेर सोन्याचा तोडा व एक घोडा तिने शाहिरास बक्षिस दिला, हे त्यात नमूद आहे. असले ऐतिहासिक प्रसंग जागृत ठेवण्याचे त्यावेळचे साधन असले पोवाडे हेच होते. ह्या पोवाड्यांवरून असे कळते, की शिवाजीराजांच्या ताब्यात त्यावेळी 40-50 किल्ले होते. शिवाजीराजांना ‘महाराज’ आणि ‘छत्रपति’ ही विशेषणे त्यापूर्वीच लावली जात होती; ‘शिवाजीच्या तळ्यात पाणी पिती सर्व जीवू’ ह्या वाक्यावरून शिवाजीराजांचे राज्य लोकांस आवडत होते; शिवाजीराजांजवळ द्रव्यसंचय चांगला असून आदिलशाहीच्या बरोबरीने त्याने आपला इतमाम ठेवला होता; खान धर्मवेडा असून, तुळजापूर, पंढरपूर येथील कृत्यांशिवाय त्याने पालीच्या खंडोबाची कुचेष्टा केली; औंधच्या यमाईची खोड काढली; इत्यादि गोष्टी व

असेच आणखी पुष्कळ प्रकार ह्या पोवाड्यावरून उघड होतात. श्रीशिवाजीप्रताप बखरीत पृ.78.88 पर्यंत याप्रकरणाची हकिकत अत्यंत चित्तवेधक अशी दिलेली आहे.

60) खं. 15.363

61) सिद्दी जोहर उर्फ सलाबतखान याने दगाबाजी करून पन्हाळ्यावरून शिवाजीराजांना जाऊ दिले अशी आदिलशहाची खात्री होऊन तो त्यास शिक्षा करणार, तो त्याने बंड उभारून आपण मोगलांचे ताबेदार आहोत असा पुकारा केला. त्यावरून 'आदिलशहाने त्याला पकडून विष देऊन मारले' असे शि.भा. व दुसरे कित्येक लिहितात. हा प्रकार सन 1661 च्या आरंभीचा असला पाहिजे. प.सा.845; शि.भा. 28-21; डॉ.फ्रायर; बुसातीन-ए-सलातीन इ.

62) वाशीमचे राजे उदाराम याचे मूळ नाव उद्धव रामजी. हा सावरगावचा कुळकर्णी. त्याला फारसीचा अभ्यास चांगला असल्यामुळे तो एका अमीराबरोबर दिल्लीस गेला. तेथे अकबर बादशहाचे नजरेस त्याची हुशारी येऊन त्याला त्याने सन 1592 मध्ये वाशीम व माहूरचे दरम्यान 52 महालांची देशमुखी दिली. तेव्हापासून मोगल बादशहाची नोकरी करून तो सन 1632 मध्ये वयाचे 66व्या वर्षी मरण पावला. त्याच्याच मार्फत निजामशाही सरदार लखूजी जाधवराव सन 1614 मध्ये जहांगीर बादशहास जाऊन मिळाला. त्यामुळे त्याचे मलिकंबरशी वाकडे आले. शहाजहानने बापाविरूद्ध बंड केले त्यात त्यास उदाजीराम व जाधवराव या दोघांचे चांगले पाठबळ होते. सन 1624 मध्ये भातवडीच्या लढाईत तो मलिकंबरविरूद्ध लढला. उदारामची स्त्री पराक्रमी निघाली. नवऱ्याचे पश्चात् तिने पराक्रम करून अल्पवयी मुलगा जगजीवन याचा सांभाळ करून घराण्याचा लौकिक वाढवला. सन 1637 मध्ये जगजीवनरावास देशमुखीची सनद मिळाली. औरंगजेबाने जगजीवनास बऱ्हाणपुरास भेटीस बोलावून त्याचा गौरव केला; त्यावेळी त्या शहरात एक 'पुरा' वसवण्यात आला, तो जगजीवनपुरा म्हणून आजही प्रसिद्ध आहे. त्याने माहूरचा किल्ला नीट बांधला. हा जगजीवन औरंगजेबाबरोबर सन 1658 मध्ये दिल्लीकडे गेला असता तिकडे युद्ध झाले त्यात मरण पावला. त्याच्या आईने औरंगजेबाचे दक्षिणेत चांगले साह्य केल्यावरून त्याने तिला राज्यव्याघ्री (राय बाघन) असा किताब दिला. सन 1660 मध्ये शिवाजीराजांचे करतबलखानाशी उंबरखिंडीत युद्ध झांले. त्यात या राज्यव्याघ्रीने मोगलांचा बचाव केला.

62)(शि.भा. 25-52, 53 व 28-55,61; शारदाश्रम वार्षिक).

63) पेणच्या पू. 15 मैल.

64) अध्याय 29.

65) प.सा.857, 871; शि.भा. अ.31.

66) पुण्यातील छाप्याचे वर्तमान खुद्द शिवाजीराजांनी त्याचा राजापूरचा अधिकारी रावजी पंडित यास लिहिले ते रावजीने इंग्रज व्यापारी गिफर्ड यास कळवले आणि गिफर्डने ते

सुरतेला लिहून पाठवले, ते हल्ली उपलब्ध आहे.
67) मॉडर्न रिव्ह्यू; प.सा. 996.
68) प.सा. 812, 818, 823, 843.
69) डॉ.बाळकृष्णकृत शिवाजी 2.103; प.सा.999.
70) प.सा. 1041.
71) Dr.Balkrishna's Shivaji, Vol.1, Part II P. 536. ता. 11.11.1664 च्या एका डच पत्रात हा मजकूर वेंगुर्ल्याहून लिहिलेला आहे. अर्थात् कार्तिक मासी शिवाजीराजांनी मुधोळवर लढाई केली असे जेधे शकावली म्हणते ते खरे दिसते. जुन्या कागदात बाजी घोरपड्याचे नाव सन 1625 पासून पुढे आढळते. शि.च.सा.खं. 4 ले. 718-725 यात खंडोजी व बाजी हे घोरपडे बंधू जावजीचे पुत्र अशी नावे आढळतात.
72) त्रै. 11 ले. 10 पृ. 47.
73) प.सा.1045.
74)प.सा.1057
75) पुरुषोत्तम कवीच्या शिवकाव्य नामक संस्कृत ग्रंथात पाचव्या चमत्कारात मुरारबाजीच्या पराक्रमाचे सुरस वर्णन दिलेले आहे.
76) हे कवन संवत 1979च्या श्रावण मासच्या (ऑगस्ट 1923) नागरी प्रचारिणी पत्रिकेत बाबू जगन्नाथदास रत्नाकर, बी.ए., अयोध्येच्या महाराणीचे प्रायव्हेट सेक्रेटरी, यांनी प्रसिद्ध केले आहे. बाबू महाशय लिहितात, 'सुमारे चाळीस वर्षांपूर्वी मी पाटणा येथे कॉलेजात असताना तेथील गुरुद्वार मंदिराचे महंत बाबा सुमेरसिंग यांजकडून मला दोन पत्रे मिळाली, एक हे शिवाजीराजांनी जयसिंहास लिहिलेले व दुसरे गुरुगोविंदसिंहांचे. दोन्ही पत्रे उर्दू भाषेत व गुरुमुखी लिपीत लिहिलेली असून दोहोंचीही भाषासरणी अत्यंत मनोरम केवळ फिर्दौसीच्या शहानाम्याच्या तोडीची व तत्कालीन परिस्थितीचे हुबेहूब चित्र दर्शविणारी आहे. बाबा सुमेरसिंगापाशी ही पत्रे साठ वर्षे होती असे त्यांनी श्री.रत्नाकरांस समक्ष सांगितले. या सुंदर पत्राचे हिंदी, इंग्रजी व मराठी भाषांतर 'शिवाजी सुवनीर' (सोव्हेनियर) पुस्तकात छापले असून, पत्रसार संग्रहात ले.1042 वर त्याचा गोषवारा दिलेला आहे. बहुधा जयसिंहाच्या पदरच्या एखाद्या रसिक लेखकाने शिवाजीराजांच्या भेटीत घडलेला हा प्रकार ऐकून तो कवनरूपाने वर्णिला असावा.
77) पन्हाळ्याच्या वेढ्यात शिवाजी सापडला असता 'सरनोबत नेताजी पालकर याचा मेहुणा रात्रीस गैरहजर जाला. वर्तमान राजांस विदित होऊन रागास येऊन एक महिन्याची गैरहजिरी करू लागले. त्या समयी नेताजींनी बहुत रदबदली केली, म्हणोन स्वामींनी इतराजी करून त्यांस दूर केले. कडतोजी गुजर राजगडचा किल्लेदार होता त्यास प्रतापराव नाव ठेवून सरनोबती दिली.' एवढाच या संबंधाचा खुलासा सापडतो. दोन तडफदार माणसांचा असा खटका उडाल्याची उदाहरणे पुष्कळदा घडतात.

78) प.सा. 1145
79)प. सा. 1152
80) या अद्भूत प्रसंगाची कसोशीने छाननी करून हे प्रकरण शक्य तितक्या संक्षेपाने वाचकांपुढे मांडले आहे.
81)यासंबंधाने त्रै.4 पृ.37 वर मजकूर आहे तो असा -'पातशहाने महाराजांना अटकेत ठेविले. पुढे डाल्यांच्या भोईंनी पाठविण्याचा राबता पाडिला. डाल्यांचा झाडा कशास, म्हणून तोही राबता मोडला. पुढे हिरोजी फर्जंद यास महाराजांनी आपला पोषाख देऊन आपले पलंगावर निजविले व मदारी मेहतर फरास यास सांगितले की हा मनसुबा तिघांशिवाय फुटू न देणे. पुढे शिवाजीराजे काशीहून देशास आले; हिरोजी व मदारी सुटून रायगडास आले.'
82) वसंत व्याख्यान मालेतील व्याख्यान- ता. 8 मे 1917
83) फारसी कागद सर जदुनाथ सरकार यांजकडून.
84) ता.22.4.1667, प.सा.1158
85) पहा प.सा.1160, 1175-78, 1183-84 व 1186. हि.रे.क. भाग 9 पृ.109 व भाग 10 पृ.36 यातील पिसुर्लेकर व हॅरीस यांचे निबंधांत मोगल पोर्तुगीझ तहांची स्पष्टता आहे.
86) हा दाऊदखान खुरेशी अरब सरदार होय. पुढे बाळाजी विश्वनाथाचे वेळेस दाऊदखान पन्नी म्हणून एक अफगाण सरदार दक्षिणेत प्रसिद्धीस आला. तो या खुरेशीहून वेगळा. पन्नी खुरेशीहून तीसएक वर्षांनी लहान होता. पन्नी हा पुढे कर्नूलचा नबाब झाला, तेथे त्याचा वंश अद्यापि नांदतो. पन्नीच्या भावाच्या नातवाने पुढे सन 1750 मध्ये नासिरजंगाचा खून केला.
87) ही अतिशयोक्ती दिसते, वर सुरतेचा आकडा पहा.
88) कपारी = दऱ्या.

89) मौजे मुदलगाव येथे महापुरुष तपोनिधि देवभारती गोसावी महादेवाच्या देवालयात अनुष्ठान करीत. त्यावेळेस औंढ्या-पाट्यावर शिवाजीराजे छावणी करून होते. सालेर-मोल्हेर किल्ल्याचे मोहमीस जात हाते, ते महापुरुषाचे दर्शन घेण्यास आले. त्यांही आशीर्वचन दिधले की जा, नववे दिवशी किल्ले फत्ते होतील. जाताच किल्ले घेतले, तेव्हा मुदलगाव भगवानास मुकासा करून दिला." स.प.पृ.147.
90) Modern Review 1908. कानूनगो = कायदे जाणणारा, मुसलमानांचा एक मुलकी कामगार.
91) पर्णाल-पर्वत-ग्रहणाख्यानात याचे मार्मिक वर्णन आहे, ते असे :-

मृतं किमिति नो तस्मिन् युद्धे सालेरिपर्वते।
तेपां तत्कंदनं श्रुत्वा मया किं जीव्यतेऽधुना॥
अफजलोपि हतो येन एकेनैव महामति:

महाबलो महाबाहुरेदिलस्याति संमत:॥
द्रष्टव्यं स्वामिभिस्तत्र कियद्यत्नेन रक्षित:
तथापि पक्षिवत्तूर्णं पुत्रेण सहनिर्गत:॥
ततस्तेनातिनिपुणं प्रविचार्य विवेकत:
काजी हैदरनामासौ प्रेषितो यवनोत्तम:॥

93) हा बहुधा जगदेवराव जाधव, लखुजीचा भाऊ असावा. याचा मुलगा मानसिंग पुढे शाहूकडे आला.

94) सातारा स. 1651 मध्ये घेतला असे ऑर्म (पृ.51) सांगतो, पहा शि.च.प्र.पृ.210.

95) सभासद ब. पृ.63.

96) हा ग्रंथ बडोद्याचे लायब्ररीत असून ती प्रत ता.1.1.1672 रोजी नकलून पुरी केली, असा उल्लेख त्यात आहे. पिलाजी नामक राजाच्या विनंतीवरून आपण हा ग्रंथ लिहिला असे कृष्ण शेष लिहितो. हा शेष कायस्थ वगैरे जातीची निंदा करतो. त्यावेळी ब्राह्मण व प्रभू या जातींमध्ये वैमनस्ये उत्पन्न होऊन ग्रामण्ये माजली त्यांची हकिगत ‘प्रभुरत्नमाला’ वगैरे ग्रंथात दिलेली आहे.

97) पहा भट्टवंश काव्य संस्कृत व राजवाडे खं.6.459.

98)पहा ‘कायस्थ धर्मप्रदीप’.

99) या प्रसंगाची रसभरित वर्णने बखरीत आहेतच. शिवाय इंग्रज वकील हेन्री ऑक्झेंडेन या समारंभाला गेला होता, त्याने आपल्या रोजनिशीत तपशीलवार हकिगत नमूद केलेली उपलब्ध आहे. डच लोकांच्या पत्रांतही पुष्कळ माहिती आहे. या ठिकाणी ती सर्व तपशीलवार हकिगत देणे शक्य नाही. 15000 होन वजन +1000 होन त्यावरची दक्षिणा असे धरल्यास 1 होन म्हणजे 7/20 तोळा या हिशेबाने शिवाजीराजांचे वजन 5600 तोळे होते. 15000 होन वजनाचेच समजल्यास 5250 तोळे= 135 इंग्रजी पौंड होईल.

100) सर जॉर्ज ऑक्झेंडेन सुरत वखारीचा मुख्य ता.14.7.1669 रोजी मरण पावला, त्याचा हा नातेवाईक. समारंभाचे वेळी जेरल्ड आँजियर सुरतेला इंग्रजांचा मुख्य अधिकारी होता.

101) पाचाड हे गाव रायगडाचे उतरणीवर असून तेथे शिवाजींनी मातुश्रींसाठी भव्य वाडा बांधून त्यात विहिरी, बागा वगैरे सिद्ध करून वैधव्यावस्थेस साजेशी सिद्धता केली. शेवटची पाच-दहा वर्षे मातुश्रींनी तेथे काढली. रायगडावरून जाता-येताना महाराज मातुश्रींचा आशिर्वाद घेऊन कार्योपक्रम करीत. जिजाबाईंचे जन्मस्थान सिंदखेड व अंत्यस्थान पाचाड येथील वाड्याच्या रचनेत व बांधणीत पुष्कळ साम्य दिसते.

102) रायगडावरील जगदीश्वराच्या देवालयात दोन संस्कृत श्लोक कोरलेले आहेत, त्यातील आद्यंत असा :-

प्रासादो जगदीश्वरस्य जगतामानन्ददोऽनुज्ञया

श्रीमच्छत्रपते: शिवस्य नृपते: सिंहासने तिष्ठत:॥
श्रीमद्रायगिरौ गिरामविषये हीराजिना निर्मितो
यावच्चन्द्रदिवाकरौ विलासतस्तावत्समुज्जृंभते॥

103) हा शक 104 वर्षे चालला. इ.स. 1777 मध्ये दुसरा शाहू गादीवर आला, त्याप्रसंगी सखाराम बापू व नानाफडणविस यांना तो गैरसोयीचा वाटला आणि त्यांनी हुकूम काढून तो बंद केला. (धडफळे यादी)

104) सोयं शिवच्छत्रपतेरनुज्ञां मूर्धाभिषिक्तस्य निधाय मूर्घ्नि
अमात्यवर्यो रघुनाथनामा करोति राजव्यवहारकोशम्।

105) ही नावे शुक्रनीतीतून घेतली असा कयास निघतो. शुक्रनीतीत खालील वचने आहेत:-

अष्ट प्रकृतिभिर्युक्तो नृप: कैश्चित् स्मृत: सदा।
सुमन्त्र: पण्डितो मंत्री, प्रधान: सचिवस्तथा।
अमात्य: प्राड्विवाकश्च तथा प्रतिनिधि: स्मृत:
एका भृतिसमास्त्वष्टौ राज्ञ: प्रकृतय: सदा ॥

भृतिसमा=सारखा तनखा घेणारे.

106) शि.च. सा.खं. 1 ले. 90.

107) सभासद पृ. 63.

108) हा पितांबर शेणवी ता.1.9.1678 चे सुमारास मरण पावला. तत्पश्चात गणेशभट, नंतर संभाजींचे कारकिर्दीत येसाजी गंभीरराव व राजारामाचे कारकिर्दीत गणेश रघुनाथ हे गृहस्थ गोव्यात मराठ्यांचे वकील होते. (History Record of Goa P.19.) कोट्याचे गुळगुळे पंडित या पितांबराचेच वंशज असावेत.

109) इ.सं. 'गोमंतकाच्या इतिहासाची साधने', या प्रकरणात धर्माजी नागनाथाचा पत्रव्यवहार छापलेला आहे.

110) फोंडा नावाचे दुसरे एक ठिकाण कोल्हापूर-देवगड रस्त्यावर असून त्यावरून फोंडाघाट नाव पडले आहे, ते हे गोव्याकडचे फोंडा नव्हे. गोव्याजवळच्या ठिकाणाचे मूळ नाव 'पोंदा' असून ते पणजीच्या आग्नेयेस 20 मैलांवर आहे.

111) पेशवे दप्तर भाग 45, पृ.20.

112) जेधे शकावलीत नेताजींचे सर्वच चरित्र उद्बोधक आहे. नेताजीने केलेला एक निवाडा छापलेला आहे, त्यात 'नेताजी पालकर वृत्तीचे निवाडे दूरदृष्टीने विचारून करतात; मुद्दाम महाबळेश्वरास मनुष्य पाठवून विज्ञानेश्वराचा ग्रंथ आणवला आणि पंडित विद्वांस यांच्या मुखांतरे वृत्तीच्या विशेष विवंचना होत्या त्या संपूर्ण मनास आणून धर्मशास्त्राचा मथितार्थ काढून सकळ गोत व सभानायक मिळोन धर्मत: आपले पूर्वज स्मरोन निवाडा केला' असे शब्द आहेत. (स.प.पृ.115 ले.9). असेच आणखी नेताजीचे पुष्कळ निवाडे छापलेले आहेत, ते वाचकांनी पत्रसारसंग्रहात पहावेत. सकवारबाई म्हणून गायकवाडांकडची

शिवाजीराजांची बायको होती; तिच्या पोटची कन्या कमळजाबाई नावाची, जानोजी पालकरास दिलेली होती. हा जानोजी पालकर बहुधा नेताजीचाच संबंधी असावा. शिवाजीराजांचे पश्चात् नेताजीने संभाजीराजांची नोकरी केली. सन 1681 मध्ये तो बागलाणात लढत असल्याचा उल्लेख सापडतो. त्यानंतर लवकरच तो वृद्धापकाळी मरण पावला.

113) मादण्णाचे घराणे :-हा वारंगळ प्रांतात हनुमकोंडा येथे राहत असे. त्याचा बाप भानुपंत त्या प्रांती मुलकीखात्यात नोकर होता. त्याच्या बायकोचे नाव भागम्मा. त्यास चार पुत्र झाले. पहिला आकण्णा, दुसरा मादण्णा (मत्तण्णा?), तिसरा विसण्णा व चौथा मृत्युंजय. भानुपंतास एक मुलगी होती तिचे मुलगे यंगण्णा ऊर्फ रुस्तुमराव, व गोपण्णा ऊर्फ रामदास हे दोघेही कर्तबगार होते. लिंगाप्पा नावाचा मादण्णाचा पुतण्या कुतुबशाहीत सुभेदारीवर होता. आकण्णालाही मल्लू नावाचा एक मुलगा होता. या घराण्याचे वंशज विद्यमान असतील तर त्यांची संपूर्ण हकिगत बाहेर येणे जरूर आहे.

114)Journal of Indian History, August 1931 & Foreign Biographies of Shivaji. कृष्णस्वामी अय्यंगार, सुरेंद्रनाथ सेन वगैरे संशोधकांनी मादण्णाच्या कारभाराची छाननी करून त्याची वाखाणणी केली आहे. सन 1686 मध्ये सूर्यग्रहण प्रसंगी मादण्णाने ग्रामदान केल्याचा ताम्रपट उपलब्ध आहे.

115) याचा राज्यकाल सन 1659-1682. पहा तंजावरचे मराठी राजे पृ.15.

116) इ.सं. तंजावरचे घराणे.

117) कर्नाटकात स्वारी करण्याचा शिवाजीराजांचा इरादा सन 1675 च्या जुलैत मोरोपंत पिंगळ्यांचे तोंडून फ्रेंच व्यापारी वारोन यास राजापूर येथे कळला होता. (मार्टिनची पत्रे).

118) सर जदुनाथ यांजकडून माहिती. ब्रि. म्यू. ओरि. 1641 नंबरच्या फारसी लेखावरून.

119)याशिवाय चाळीसहजार पायिक शिबंदी बरोबर असल्याचे लेख आहेत ते युक्त दिसत नाहीत.

120)प. सा. 2-1920.

121) पुढे पाऊणशे वर्षांनी इंग्रज-फ्रेंचांनी अन्वरुद्दीन व चंदासाहेब यांना हाताशी धरून त्या भागात जी दंगल उडवली तिची प्रथमावृत्ती खुद्द शिवाजीराजांनी घडवून आणली होती, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. नानासाहेब पेशवे निजामास ‘आम्ही शिवाजींचे चेले आहोत’ असे सन 1751 मध्ये लिहितात त्याचे मर्म या मागच्या इतिहासात आढळून येते. मार्टिनचा पत्रव्यवहार Sen's Foreign Biographies of Shivaji यात छापला आहे तो वाचकांनी पहावा.

122) 91 क. बखर.

123) किलाफ, संशय, वहीम

124) हा शिवाजींचा सेनापती. शिवाजींनी बंधूस लिहिलेल्या पत्रात यास शिवदिग्विजय बखरीत पृष्ठ 314, 315, 333 वर चिरंजीव म्हणून संबोधलेले आढळते; आणि एकोजीचा

व्यवहार उलगडण्यास त्यासच शिवाजीराजांनी मागे ठेवले; यावरून तो एकोजींच्या मातुल घराण्यातला असला पाहिजे. त्याचे नाव बहीरराव व किताब हंबीरराव. ह्या दोन नावात मोडी वाचनाची चूक आहे असे मानतात ते बरोबर वाटत नाही. शिवदिग्विजय पहा.

125) पारसनीस इ.सं. तं. इतिहास, व ऐ.स्फु.ले. 4.2. शिवदिग्विजय कर्त्याने या पत्रांचे उतारे दिले आहेत, त्यावरून त्यास अस्सल कागद उपलब्ध झाले होते असे दिसते.

126) हलमस्त = humble but proud. Molesworth.

127) या वरून गुप्तरूपे रात्री तराफ्यावरून पळून गेले, हा खोटा प्रवाद मागाहून प्रचलित झाला असावा.

128)फेब्रुवारी सन 1678 अखेरीस वेलवाडीचे प्रकरण आटपून मग तोरगळास शिवाजीराजे आले व पुढे एप्रिलात पन्हाळ्यास पोहोचले. पत्र बहुधा तोरगळाहून लिहिले असावे म्हणून त्याची अंदाजी तारीख मार्च सन 1678 समजावी.

129) प्रतापजी, भीवजी, संताजी व रायभानजी काका असे चार शहाजींचे दासीपुत्र नमूद आहेत. संताजी प्रथमपासूनच शिवाजीराजांना सामील होता.

130) याचे वंशज अरणीचे जहागीरदार विद्यमान आहेत.

131) राजव्यवहार कोशाच्या प्रथम व अंतिम प्रशस्तीत या घराण्याचे वर्णन आहे ते वाचनीय आहे. हणमंते धर्मपरायण असल्यामुळे यास दीक्षित संज्ञा होती. रघुनाथाचा भाऊ जनार्दनपंत शिवाजीराजांचा भरवशाचा सेवक होता. जनार्दनपंताचे मुलगे दोन. वडील गंगाधर याजकडे शिवाजीराजांचे खासगी महाल व बागबगीचे यांचे काम होते. धाकटा श्रीनिवास एकोजीजवळ कारभारी होता.

132) Dr.Sen यांच्या Foreign biographies of Shivaji पुस्तकात शिवाजींच्या कर्नाटक स्वारीची फ्रेंच गव्ह.मार्टिन याने लिहिलेली हकिगत छापली आहे ती वाचनीय आहे.

133)पहा सरकारकृत Shivaji and His Times पृ.327; स.प.पृ.149.

134) कार्तिक शु. 6 शके 1598 (ता.1.11.1676) संभाजीराजे शृंगारपुरास जाऊन राहिले. तेथे भवानीबाई लेक जन्मली. जेधे शकावली.

135) याचा बाप बजाजी या वेळी हयात असून विजापूरचे विरुद्ध मोगलांस सामील झाला होता. असे किती तरी सरदार तेव्हा व पुढे औरंगजेबाने शिवाजीराजांकडून फोडून आपल्या पक्षात आणले होते.

136) या याद्या सभासदाने दिल्या आहेत.

137) स. प. पृ. 148

138) यालाच शिवाजींनी विश्रामगड असे नाव दिले.

139) सांप्रदायिक वि. वि. खं. 1 ले.21.

140) शि. द. पृ. 373.

141) पहा शिवाजी निबंधावली - श्रीशिवाजी महाराजांची कौटुंबिक माहिती.

142)डग्लस - बुक ऑफ बॉम्बे, भाग 1, पृ.346.
143) स. प. पृ. 152-154
144) अमात्याची राजनीति पृ.3
145) जयसिंह प्रशस्ति, राजवाडकृत संकीर्ण लेख.
146) हा कन्यकुब्ज ब्राह्मण, काश्यपगोत्री उपनाव त्रिपाठी, बापाचे नाव रत्नाकर राहणार त्रिविक्रमपूर. रत्नाकरास चिंतामणि, भूषण, मतिराम व नीलकंठ असे चार पुत्र होते. भूषण प्रथम काही दिवस चित्रकूट येथील राजांच्या आश्रयास होता. त्यानेच त्यास कविभूषण ही पदवी दिली. शिवाजीराजे आगऱ्याहून निसटून गेल्याची बातमी कळताच त्या लोकोत्तर पुरुषाचे दर्शन घेण्यासाठी मुद्दाम तो रायगडास आला. नंतर परत जाताना त्याने छत्रसालाची भेट घेतली. भूषणाच्या कवनात उच्च प्रकारचे कवित्व असून त्यात इतिहासाचा विपर्यास बहुधा नाही. शिवाजीराजांनी त्यास लाखो रुपये बक्षीस दिले. शिवाबावनी ग्रंथ त्याचाच होय. त्याची हयात सुमारे 102 वर्षांची म्हणजे स.1614-1716 ची असून तो सन. 1667-74 पावेतो दक्षिणेत शिवाजीराजांजवळ राहत होता. राज्याभिषेक समारंभ पाहून तो परत स्वदेशी गेला. स. 1708 व 1715 या सालात तो पुन्हा इकडे शाहूचे भेटीस आला होता.
147) पर्णा. प. ग्र.आ. 2-52.
148) खं. 8, ले. 26, 27.
149) खं. 15, ले. 340.
150) शि. च. सा. 3.438.
151) पहा शिवाजी सूव्हनीर (सोव्हेनियर), मराठेशाहीतील किल्ले.
152) चित्रगुप्त बखर पृ. 132-134.
153) खं. 8-28.
154) पायीचे लोक. खलक = खालच्या प्रतीचा सेवकवर्ग.
155) लक्ष ठेवून.
156) रांधने = रांधने = शिजविणे .
157) ब्राह्मण हे धर्मगुरू असून, त्यांनी राजाचे अभीष्टचिंतन करून राहावे यासाठी त्यांच्या योगक्षेमास काही गाव किंवा उत्पन्ने तोडून देण्याची वहिवाट पूर्वापार होती, त्यास अग्रहार असे म्हणत.
158) अमात्याची राजनीति पृ.22-23.
159) शिवदिग्विजय, चित्रगुप्त बखर, म.सा.छो.ब., व इंग्रजी पत्रव्यवहार यात सिद्दीची माहिती भरपूर आहे.
160) खं. 3 ले. 568
161) Radha Kumud Mukerji : 'Indian Navy'

162) खंड 8. 31.
163) पहा खं. 8.29.
164) या वकिलातीच्या संपूर्ण हकिगती 'Foreign Biographies of Shivaji' by Dr.Surendranath Sen या पुस्तकात छापलेल्या वाचण्यालायक आहेत. काही माहिती त्यांच्याच Historical records of Goa या पुस्तकातही आहे.
165) वर ह्या पुस्तकाचे पृ.234 पहा. इंडिया ऑफिस लायब्ररीतील एका हस्तलिखित प्रतीत ही याद सापडली, ती 'मॉडर्न रिव्ह्यू'च्या जानेवारी 1910 चे अंकात छापलेली आहे.

- समाप्त -